ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
No. MH. 80. Licence No. 173

वर्ष ३९ — पुणे, बुधवार, ३ जानेवारी, १९७ — अंक १

POONA 4

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइझ्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar

## आराम बसगाड्या वातानुकूलित करणार

अनेक राज्यांची रस्तावाहतूक मंडळे काही मार्गावर आराम-गाड्या चालवीत असतात. ह्या गाड्यांतून गर्दीने उतारू घेण्यात येत नाहीत आणि सामानाचीही स्वतंत्र व्यवस्था असते. पण त्या वातानुकूलित मात्र नसतात गुजरात राज्य रस्तेवाहतूक मंडळाने आपल्या आराम गाड्यांत सुखद हवामान राखणारी यंत्रे बसविण्याचे ठरविले आहे. एस. टी. गाड्यांवर बसविण्यास योग्य अशी डिझेलवर चालणारी यंत्रे बनविण्याचे काम किर्लोस्कर गटातील एका कंपनीने स्वीकारले आहे. ती हाती घेऊन लव-करच अहमदाबाद-बडोदा मार्गावर त्यांचा प्रथम उपयोग करण्यात येऊ लागेल. बहुधा पुढील उन्हाळ्यात प्रवाशांना ह्या सोयीचा लाभ होईल. त्याशिवाय आरामगाड्यांतून ध्वनिमुद्रित अभिजात संगीतही ऐकविण्यात येणार आहे. गुजरात राज्य-वाहतूक मंडळाचे जनरल मॅनेजर म्हणाले की राज्यवाहतूक मंडळ हे १०० टक्के सरकारी मालकीचे आहे. मंडळ दरसाल सुमारे ४५ कोटी रुपयांची उलाढाल करते. त्यापैकी बराच मोठा हिस्सा म्हणजे १८ कोटी रुपये करादाखल भरावे लागतात. मंडळ दरसाल सुमारे ५८ लाख प्रवाशांची नेआण करते. त्यात काम करणाऱ्या सेवकांची संख्या ३१ हजार आहे. मंडळाच्या कार्याचा विस्तार होत असून येत्या वर्षी ७७० नव्या गाड्या घेण्यात येणार आहेत. त्यासाठी ५.५ कोटी रुपये खर्च करावे लागतील. सेवकांच्या राहण्याच्या सोयीकडे मंडळ लक्ष पुरवीत आहे. गेल्या वर्षी नोकरांच्या राहत्या जागांसाठी ४५ लाख रुपये खर्च करण्यात आले होते. येत्या वर्षी ह्याच कामासाठी ५० लाख रुपये खर्च करण्याचा विचार आहे.

---

## पाकिस्तानला संरक्षण-खर्च कमी करण्याची सूचना

अमेरिकेच्या पाकिस्तानमधील वकिलातीमधील एक अधिकारी मि. सिडने सोबर ह्यांनी कराचीमधील पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट ह्या संघटनेपुढे एक व्याख्यान दिले. सदर व्याख्यानातील काही भाग लेखाच्या रूपाने प्रसिद्ध करण्यात आला आहे. लेखात असे म्हटले आहे की पाकिस्तानने विकासा-खेरीज होणाऱ्या खर्चात कपात करणे आवश्यक आहे. कोठल्याही देशाला अप्रिय वाटणारे आर्थिक निर्णय घ्यावे लागतात. बहुधा त्यांच्यामागे असेच अप्रिय वाटणारे राजकीय निर्णय असतात. परंतु असे निर्णय घेण्यास एखादे राष्ट्र कितपत तयार आहे, ह्या गोष्टीला कोठूनही मिळणाऱ्या बाह्य मदतीपेक्षा अधिक महत्त्व आहे. पाकिस्तानात हरितक्रांती झालेली असली तरी देशातील अन्नधान्याचे उत्पादन पुरेसे वाढलेले नाही. १९७२ साली पाकिस्तानला परदेशांतून धान्य आयात करावे लागले. पाकिस्तानच्या रोजगार बाजारात त्यातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक कामगारामागे तीन नवे कामगार उतरत आहेत. सध्या चालू असलेली बेकारी वाढू द्यावयाची नाही असे जरी ठरविले तरी त्यासाठी दरसाल ७५,००० नव्या रोजगारांची निर्मिती करावी लागेल. पाकिस्तानचा लोकसंख्येच्या वाढीचा सध्याचाच वेग कायम राहिला तरीही येत्या पंचवीस वर्षांत त्यात दुपटीची भर पडेल. अर्थातच अन्नधान्य, आसरा आणि सामाजिक सुखसोयी ह्यांची त्या प्रमाणात वाढ करावी लागेल. पाकिस्तानमधील साक्षरतेची वाढ १५ टक्क्यांनी होत आहे. बहुतेकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊ शकत नाहीत. कारण त्या फार महाग आहेत. हिवतापाने व इतर रोगांनी कायमचे ठाणे मांडलेले आहे. बहुसंख्य लोकांच्या आहारात सकस व पोषक पदार्थांचा बराच अभाव आहे.

---

## नॅट विमानाला जन्मापूर्वीच नख लागणार होते

भारत आणि पाकिस्तान ह्यांच्यात १९६५ व १९७१ साली झालेल्या युद्धांत ब्रिटिश बनावटीच्या नॅट विमानांनी चांगला पराक्रम दाखविला. पण ही विमाने न घेता त्यांच्याऐवजी फ्रेंच बनावटीची विमाने घ्यावीत असा सल्ला भारतीय विमान दलाच्या अधिकाऱ्यांनी १९५० साली दिला होता. विमान कंपनीने फ्रेंच एजंटाला २.५ टक्के कमिशन देण्याचे नाकारल्यामुळे त्या वेळी हा व्यवहार होऊ शकला नाही. तथापि १९५६ साली फ्रेंच बनावटीची काही विमाने घेण्याचे आणि ती भारतात बन-विण्याचा करार करण्यात आला. ह्या विमानाचे फ्रेंच नाव "उरेगॉन" असे असून हिंदी नाव "तुफानी" असे आहे. १९५५ साली फ्रेंच कारखान्याने खुद्द पंडित नेहरू ह्यांच्याकडे पैशाच्या मागणीसाठी तक्रार केली. त्यानंतर पंडितजींनी त्यात लक्ष घातले व मग सौदा झाला. भारताच्या लष्करी माहिति खात्याचे माजी संचालक श्री. बी. एन्. मुलिक त्यांनी नेहरू-बरोबर केलेल्या कामासंबंधी तीन पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी तिसऱ्या पुस्तकात वरील माहिती बरीच विस्ताराने देण्यात आली आहे. नॅट विमानांच्या बाबतीत एक स्वतंत्र प्रकरणच पुस्तकात आहे. ज्या नॅट विमानांनी भारताच्या लष्करी मोहिमांत उत्कृष्ट कामगिरी बजावली ती वायुदलात सामील करण्यासंबंधी काय हालचाली पडद्यामागे झाल्या त्यची माहिती प्रथमच प्रकाशात येत आहे. सध्या भारताच्या वायुदलात अत्याधुनिक बनावटीची व विविध प्रकारची कामगिरी बजावणारी आणि ध्वनीच्या दुप्पट वेग असणारी विमाने घेण्याचा विचार चालू आहे. त्या दृष्टीने ह्या मागच्या इतिहासाला विशेष अर्थ प्राप्त होत आहे.

---

**हरयाणात ५० टक्के वीजकपात**— हरयाणा राज्यात विजेच्या पुरवठ्यात ५० टक्के कपात करण्यात आली आहे.

**डिझेल रेल्वे इंजिनची बनावट**—भारतात तयार होणाऱ्या डिझेल रेल्वे इंजिनची किंमत सुमारे २६ लाख रुपये होते. परंतु ते तयार करण्यासाठी लागणाऱ्या परदेशीय भागांची किंमत बरीच मोठी होत असे. आता चार सरकारी संघटनांच्या सहकार्याने परदेशीय भागांची किंमत ४ लाख रुपयांपर्यंत खाली आली आहे. इंजिनांतील ८५ टक्के भाग आता देशात तयार झालेले असतात.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ३ जानेवारी १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## परदेशांतील सुशिक्षित हिंदी लोक का परततात ?

### आर्थिक लाभ आहे, पण स्वास्थ्य नाही.

अविकसित देशांतील बुद्धिमान लोक शिक्षणासाठी अगर व्यवसायासाठी परदेशांत जातात. त्यामुळे विकसनशील देशांना त्यांच्या ज्ञानाचा फायदा मिळत नाही अशी तक्रार करण्यात येत असते. असे परदेशांत गेलेले लोक स्वदेशात येण्यास तयार नसतात, असाही प्रवाद प्रचलित आहे. भारताच्या कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्च ह्या संघटनेने संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे ह्याविषयाची पाहणी केली आहे. ह्या पाहणीत भारतामधून परदेशांत गेलेल्या लोकांचाही अर्थातच समावेश आहे. पाहणीसाठी ६०० भारतीयांची निवड करण्यात आली होती. हे सर्वजण वैद्यकीय व्यवसाय सोडून इतर तांत्रिक क्षेत्रांतील होते आणि ते प्रगत देशांत कमीत कमी दोन वर्षे वास्तव्य करून नंतर भारतात परत आलेले होते. त्यांच्यापैकी प्रत्येकाने पदवी अगर पदविका अगर व्यावसायिक दाखला मिळविला होता असेही नाही. त्यांच्यापैकी बहुतेक जण शिक्षण संस्थांतून अगर संशोधन संस्थांतून काम करीत होते. पाहणीसाठी जमा करण्यात आलेल्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष असे आहेत. परदेशातून परत आलेल्या तंत्रज्ञांपैकी फक्त ४ टक्के लोकांनी परत आल्याबद्दल पश्चात्ताप होत असल्याची भावना व्यक्त केली. ५० टक्के लोकांनी परतल्याबद्दल कधी कधी पश्चात्ताप होत असल्याचे सांगितले, आणि ४६ टक्के लोकांनी परत आल्याबद्दल स्वत:ला समाधान असल्याची भावना व्यक्त केली. परदेशातील त्यांच्या वास्तव्याबद्दल विचारता, पाऊण हिस्सा लोकांनी वास्तव्य सुखाचे झाले असे सांगितले. एक पंचमांश लोकांनी कमी जास्त प्रमाणात समाधान व्यक्त केले आणि १·४ टक्के लोकांनी परदेशांतील वास्तव्य सुखप्रद झाले नाही असे सांगितले.

परदेशांतून परत आल्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्या लोकांची एक तक्रार अशी असते की भारतात त्यांच्या कर्तबगारीला व शिक्षणाला पुरेसा वाव नसतो. ह्याबद्दल विचारणा केली असता ९० टक्के लोकांनी असा अभिप्राय व्यक्त केला की परदेशांत काम करण्याची परिस्थिती आणि शिक्षणपद्धती ह्या दोन्ही अधिक चांगल्या आहेत. तथापि, परदेशांतील समाजात त्यांना फारसे मानाचे स्थान मिळत नसावे असे दिसते. कारण परत आलेल्यांपैकी ६५ टक्के लोकांनी त्यांना भारतात मिळालेल्या सामाजिक स्थानाबद्दल समाधान व्यक्त केले. ह्याचा अर्थ असा की परदेशांत जाणाऱ्या लोकांचे केवळ आर्थिक लाभ झाला तर भागते असे नाही. आर्थिक लाभाबरोबरच सामाजिक स्थानाचीही अपेक्षा ते करीत असतात. २४ टक्के लोकांना परदेशांत अगर स्वदेशात राहणे सारखेच वाटत होते. ११ टक्के लोकांना परदेशीय समाजातील प्रतिष्ठेचा लाभ झालेला दिसला. फक्त एकपंचमांश लोक देशभक्तीने प्रेरित होऊन परत आलेले दिसले. भारतात परत आलेल्या बहुतेक शास्त्रज्ञांना अगर तंत्रज्ञांना कौटुंबिक जिव्हाळ्याने खेचून आणलेले दिसून आले. काही जण आपल्या वृद्ध मातापितरांसाठी परत आले तर काही इतर नातेवाइकांच्या प्रेमापोटी परत आलेले दिसले. परदेशांत जाऊन भरपूर पैसा कमावून स्वदेशी आलेले भारतीय कमी नाहीत. अशा लोकांनी परदेशांत जाऊन वैयक्तिक स्वार्थ अधिक चांगल्या रीतीने साधला असे म्हणता येईल. परंतु त्यांच्यातील ज्यांना काही तरी नवीन करावे, ज्ञानसाधना सतत करीत राहावी असे वाटत असेल त्यांचे केवळ आर्थिक सुस्थितीने समाधान होणार नाही. ज्ञानसाधनेच्या हव्यासापायी द्रव्यलाभाचा मोह बाजूला सारणारे अर्थातच अत्यल्प असणार हे उघड आहे.

---

## वीजनिर्मितीच्या साधनांची आयात करावी लागणार ?

४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमअखेर भारतामधील विद्युतनिर्मितीची क्षमता २·१ कोटी मेगॅवॅट होती. ती पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात ४·१५ कोटी मेगॅवॅट इतकी वाढवावयाची असेल तर वीजनिर्मितीच्या साधनांची आयात करावी लागेल आणि ह्या आयातीसाठी पुरेसे परदेशीय चलन उपलब्ध करून द्यावे लागेल असा अभिप्राय भारताच्या वीज व पाटबंधारे खात्याने व्यक्त केला आहे. त्यासाठी भारतामधील संबंधित कारखान्यांवर अवलंबून चालणार नाही असे खात्याचे म्हणणे आहे. परंतु नियोजन खात्याला आणि उद्योगविकास खात्याला हे म्हणणे मान्य नाही. या खात्याच्या मताने भारतामधील विद्युतसामग्रीचे कारखाने देशाच्या सर्व गरजा भागवू शकतील. मात्र त्यांचा पुरेपूर वापर करण्यात आला पाहिजे.

---

## १४ बँकांत महाराष्ट्र बँक आणि कॅनरा बँक ह्यांचे वैशिष्ट्य

१४ राष्ट्रीयीकृत बँकांनी १९७१ साली मध्यवर्ती सरकारला नफ्यापैकी ४·४४ कोटी रुपये दिले. भारत सरकारने ह्या बँका स्वतःकडे घेताना त्यांना जी रक्कम भरपाईदाखल दिली होती, तिच्याशी ह्या बँकांनी सरकारला दिलेल्या रकमेची टक्केवारी ५·१% पडते. १९७० मध्ये ती ४·७% पडली होती. १४ पैकी १० बँकांनी १९७० पेक्षा १९७१ मध्ये सरकारकडे अधिक रक्कम वर्ग केली; तीन बँकांनी पूर्वीइतकीच रक्कम वर्ग केली तर एका बँकेने ( इंडियन बँक ) फारच कमी रक्कम वर्ग केली. कॅनरा बँक आणि महाराष्ट्र बँक ह्यांनी इतर सर्व बँकांपेक्षा अधिक प्रमाणात रक्कम वर्ग केली आहे, ह्याचा अर्थ न दाखविलेले तोटे त्यांच्या बाबतीत कमी होते. त्यांचे ताळेबंद अधिक वस्तुनिष्ठ होते इतकेच नव्हे तर त्यांचे गुप्त रिझर्व मोठे होते असा त्याचा अर्थ आहे.

| | १९७० | १९७१ |
|---|---|---|
| १. अलाहाबाद बँक | ४·२ | ४·२ |
| २. बँक ऑफ बरोडा | ५·६ | ६·४ |
| ३. बँक ऑफ इंडिया | ५.५ | ५·७ |
| ४. बँक ऑफ महाराष्ट्र | ६·५ | ७·० |
| ५. कॅनरा बँक | ७·८ | ८·६ |
| ६. सेंट्रल बँक ऑफ इंडिया | १·८ | १·९ |
| ७. देना बँक | ४·४ | ५·६ |
| ८. इंडियन बँक | २·२ | ०·९ |
| ९. इंडियन ओव्हरसीज बँक | ३·२ | ३·२ |
| १०. पंजाब नॅशनल बँक | ६·० | ६·० |
| ११. सिंडिकेट बँक | ५·७ | ६·४ |
| १२. युनियन बँक ऑफ इंडिया | ६·१ | ६·४ |
| १३. युनायटेड बँक ऑफ इंडिया | ५·५ | ६·१ |
| १४. युनायटेड क. बँक | ५·५ | ६·२ |
| एकूण | ४·७ | ५·१ |

## दिल्लीत नवीन दुग्धालय

दिल्ली येथे सार्वजनिक मालकीच्या विभागात नवे दुग्धालय स्थापन करण्यात येणार आहे. दुग्धालयात रोज ४ लाख लिटर दुधावर संकरण करता येणारी यंत्रसामग्री बसविण्यात यावयाची आहे. १९७३–७४ च्या सुमारास त्याची उभारणी पूर्ण होईल असा अंदाज करण्यात आला आहे. त्याचबरोबर दिल्ली येथे सध्या चालू असलेल्या दुग्धालयात आणखी नवी यंत्रसामग्री बसविण्यात येत आहे. नव्या यंत्रसामग्रीमुळे रोज ३ लाख, ७५ हजार लिटर दुधावर संस्कार करणे शक्य होईल. १९७४–७५ च्या सुमारास दिल्ली शहरातील नागरिकांची दुधाची गरज पुरविण्यासाठी रोज ७ हजार लिटर दूध जंतुरहित करून बाटल्यांत भरावे लागेल. ही गरज लक्षात घेऊन हालचाली सुरू करण्यात आल्या आहेत.

## दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी कर बसवा

गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स ह्या संस्थेचे डायरेक्टर प्रा. व्ही. एम्. दांडेकर ह्यांनी पत्रकारांशी बोलताना महाराष्ट्रातील भीषण दुष्काळाला तोंड देण्यासाठी कर बसविण्याची सूचना केली आहे. ते म्हणतात की महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळामुळे ज्यांच्यावर प्रत्यक्ष आघात झालेला नाही अशा लोकांवर दुष्काळ-मदत कर बसविण्यात यावा. ही अशी एक मोठी आपत्ती आहे की जिचा मुकाबला करताना नियोजनेची आणि एकसूत्री प्रयत्नांची फार आवश्यकता आहे. सरकारच्या मताने परिस्थितीला तोंड देण्यासाठी १४३ कोटी रुपये लागतील. पण हा अंदाज कमी आहे. ह्या कामासाठी ३०० कोटी रुपये लागतील; तरच दुष्काळग्रस्त लोकांना काम पुरविणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, लोकांच्या आरोग्याचे रक्षण करणे आणि उपयुक्त गुरे उपासमारीपासून वाचविणे शक्य होईल. ज्यांना कर देण्याची ऐपत आहे त्यांच्याकडून ते दुष्काळात सापडलेले नसतील तर कर वसूल करण्यात यावा. दुष्काळग्रस्तांना मदत पोचविण्याच्या ऐच्छिक प्रयत्नांनी काहीही भागणार नाही. दुष्काळात गुरांची संख्या मृत्यूमुळे मोठ्या प्रमाणावर घटत आहे. त्यामुळे शेतीच्या पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांजवळ जमीन कसण्यासाठी बैल नसण्याची शक्यता आहे. म्हणून सरकारने यंत्रचलित नांगरांच्या तुकड्या तयार ठेवाव्या आणि त्यांचा उपयोग नांगरटीसाठी करावा. शेतीला उपयुक्त असतील अशी जनावरे वाचविण्यात यावीत आणि बाकीची सरकारने आपल्या ताब्यात घेऊन कत्तलखान्याकडे रवाना करावी.

## शेरास सव्वा शेर !

एका कापड दुकानी एका फोटोग्राफर ग्राहकाने छपन्न रुपयांचे कापड खरेदी केले. पैसे देताना ग्राहकाने पन्नास रुपयेच व्यापाऱ्याच्या हाती ठेवले, पण व्यापारी तेवढे घेण्यास तयार होईना. तेव्हा ग्राहक रागाने कापड तेथेच टाकून बाहेर निघून जाऊ लागला. व्यापारी रागाने म्हणाला, "एकदा कापड फाडल्यावर तुम्ही नको म्हणता हे सभ्यपणाला धरून नाही." त्यावर फोटोग्राफरने आपल्या मोठ्या आवाजाने पाचपन्नास माणसे दुकानात गोळा केली व त्यांच्यादेखत तो व्यापाऱ्याला म्हणाला, "तुमच्या कापडात सहा रुपये सूट देणे तुमच्या जिवावर येते आणि माझ्याकडून लग्नातील फोटो काढून घेतलेत, त्याच्या बिलात आ[illegible] रुपये कमी केलेत, तेव्हा माझा विचार केलात काय ?"

व्यापाऱ्याचा चेहरा फोटो काढण्यासारखा झाला, हे सुज्ञां[illegible] सांगावयास नकोच ! 'करावे तसे भरावे' हे नीतिशास्त्र सर्व[illegible] व्यापारी बंधूंना सारखेच लागू आहे, पण लक्षात कोण घेतो ?

—श्री. ग. सवनीस, 'व्यापारी मित्र' डिसेंबर १९७

मिसेस् निक्सन विवाहापूर्वी एक्स्ट्रॉ नटी—मिसेस् पॅट निक्सननी वेनहूर, स्मॉल टाउन गर्ल, इत्यादी बोलपटात एक्स्ट्रॉ नटी म्हणून काम केले होते. त्यांची निक्सनशी एका हौशी नाट्य-संचात गाठ पडली, तेव्हा निक्सन वकिली करीत होते आणि पॅट शिक्षिका होत्या. १९४० मध्ये त्यांचा विवाह झाला.

आंतरराष्ट्रीय 'स्त्री-वर्ष'—१९७५ हे 'स्त्री-वर्ष' पाळण्याचे युनायटेड नॅशन्सनी ठरविले आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार देण्याच्या आवश्यकतेकडे जगाचे लक्ष वेधणे, हा त्याचा उद्देश आहे. सेक्रेटरी-जनरलनी १९७४ अखेर कार्यक्रम तयार करावयाचा आहे.

दरमाणशी उत्पन्न—आजच्या बाजारभावाने भारताचे दरमाणशी वार्षिक उत्पन्न ६०६ रु. (८१ डॉलर्स) आहे. विकसित देशांत ते सरासरीने १६,००० रु. आहे. विकसनशील देशांतील दरमाणशी उत्पन्नाची सरासरी १,३५० रु. आहे.

गाढवांसाठी बँकेची कर्जे—बँक ऑफ बरोडाने ओझेवाहू गाढवांच्या खरेदीसाठी ३०० ते ४०० रु. कर्ज देण्यास प्रारंभ केला आहे. शेतीसाठी आवश्यक अशा जनावरांच्या खरेदीसाठी बँक कर्जे देत आली आहेच.

परराष्ट्र खात्यातील तोषखाना—भारतीय शिष्टमंडळांना परदेशात ४५० रु. पेक्षा जास्त किमतीच्या भेटी मिळाल्या तर त्या तोषखान्यात ठेवल्या पाहिजेत, असा सरकारी नियम आहे. ह्या भेटींची किंमत जेवढ्या रकमेने जास्त भरेल, तेवढी किंमत देऊन ह्या भेटी ज्याच्या त्याला घेता येतात. १९६९ साली ४०० रु. च्या, १९७० साली ९४२ रु. च्या आणि १९७१ साली ३,३४५ रु. च्या भेटी अशा रीतीने तोषखान्यात ठेवल्या गेल्या. "पंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री ह्यांना मिळालेल्या सर्व भेटी तोषखान्यात ठेवण्यात आल्या का?" ह्या प्रश्नास 'मला त्याची माहिती नाही' असे परराष्ट्रखात्याच्या उपमंत्र्यांनी राज्यसभेत उत्तर दिले.

इंदिरा गांधींचे प्रवास—१९७२ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी एकूण १२० दिवस दिल्लीच्या बाहेर होत्या. म्हणजे, प्रत्येक तीन दिवसांपैकी एक दिवस त्यांनी दिल्ली बाहेर खर्च केला. पश्चिम बंगालला त्या आठ वेळा गेल्या, उत्तर प्रदेशात पाच वेळा आणि आंध्र व महाराष्ट्र ह्या राज्यात प्रत्येकी सहा वेळा गेल्या. केरळ, काश्मीर, मणिपूर, मेघालय, राजस्तान, त्रिपुरा, ह्यांच्या वाट्याला प्रत्येकी एक एकच भेट आली. त्यांचे प्रवासातील प्रत्येक दिवसाचे कपडे स्वतंत्र सूटकेसमध्ये घातलेले असतात.

परदेशी प्रवाशांची संख्या वाढली—१९७२ मध्ये ३,२५,००० परदेशी प्रवासी भारतात आले. १९७१ मध्ये त्यांची संख्या ३,००,९९५ एवढी होती.

लंडनमधील हायकमिशनमधील कर्मचारी—लंडनमधील हायकमिशनमधील कर्मचाऱ्यांची संख्या १९५९ मध्ये १,३०० होती, ती १९६९ मध्ये ७४८ वर आणण्यात आली. आता ती ५२५ आहे. १९७४ अखेर ती ३५० वर येईल.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीनिमित्त लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :-२८३३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



BANK TO BANK...

THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659-60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our Branches – Bombay Office at Mandvi, Bombay – 9.

OUR MOTTO IS SERVICE AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT, *General Manager.*

K. B. KIRTIKAR, *Chairman.*

## औद्योगिक धोरण काय ते ठरवा

बंगाल नॅशनल चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेने भारत सरकारला औद्योगिक धोरण स्पष्टपणे जाहीर करण्याची विनंती केली आहे. ह्यासंबंधीच्या आपल्या निवेदनात संघटना म्हणते की राष्ट्रीयीकरण, मक्तेदारी गटाची वाढ, संयुक्त औद्योगिक संघटना आणि खाजगी विभागाच्या वाढीला ठेवण्यात येणारा वाव ह्या सर्व बाबतींत काही तरी निश्चित धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. १९५६ साली करण्यात आलेल्या औद्योगिक धोरणविषयक ठरावाचा पाठपुरावा सरकारने पुन्हा केला आहे. १९७० साली ह्याच मूलभूत धोरणाचे समर्थन करण्यात आले ही गोष्ट स्वागतार्ह आहे, तथापि, काही सरकारी प्रवक्त्यांनी परस्पर विरोधी सूर काढलेले आहेत. त्यामुळे बराच गोंधळ निर्माण झाला असून चिंता उत्पन्न झालेली दिसते. अलीकडे काही खाजगी कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण तशी जरूर नसतानाही करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे काही वेळा राष्ट्रीयीकरणाची जरबही दाखविण्यात आली आहे. खाजगी मालकीच्या कंपन्यांना सरकारकडून आणि वित्तीय संस्थांकडून जी कर्जे देण्यात आली आहेत त्यांचे रूपांतर सामान्य भागभांडवलात करण्यात आले आहे. ह्या प्रकारांनी खाजगी विभागात बरेच अस्थिर वातावरण निर्माण झालेले आहे. परिणामी, खाजगी उद्योगधंद्यांत भांडवल गुंतविण्याची प्रवृत्ती मंदावली आहे आणि उद्योगधंद्यांची वाढ होण्यास आवश्यक असणारे वातावरण गढूळ झालेले आहे. सध्याच्या राष्ट्रीयीकरण झालेल्या औद्योगिक संघटनांचा व सरकारी मालकीच्या संस्थांचा कारभार एकंदरीने समाधानकारक चाललेला नाही.

अशा परिस्थितीत खाजगी कंपन्या ताब्यांत घेण्याचे अगर राष्ट्रीयीकरणाचे धोरण पुढे रेटण्यापेक्षा सरकारने खाजगी व सार्वजनिक मालकीच्या संयुक्त संघटनांना योग्य ती संधी देऊन पाहावी. असे करण्यात आले तर दोन्ही विभागात असलेले फायदे पदरात पडून त्यामधील दोष मात्र टाळता येतील, आणि देशापुढे जी सामाजिक-आर्थिक उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत ती साध्य करता येतील. खाजगी मालकीच्या विभागात निर्माण होणाऱ्या संपत्तीवर, नफ्यावर आणि त्यातील अनुभवजन्य ज्ञानावर सामाजिक नियंत्रण अधिक राहू शकेल. त्यामुळे गोंधळ आणि तर्कवितर्क ह्यांनाही आपोआपच आळा बसू शकेल. सरकारने कांहीं आजारी औद्योगिक संघटना चालविण्यासाठी आपल्या ताब्यात घेतल्या आहेत. त्या स्वतः चालविण्यापेक्षा उद्योगपतींना सरळ विकण्याचा विचार सरकारने करावा. अशा आजारी संघटनांचा कारभार अधिक कार्यक्षम रीतीने चालविण्याची जबाबदारी मात्र त्यानी घेतली पाहिजे. नव्या उद्योगधंद्यांची वाढ होण्यासाठी अधिक प्रेरक कायदे आणि उपाय करण्यात आले पाहिजेत. त्याचप्रमाणे मध्यम प्रतीच्या आणि छोट्या उद्योगधंद्यांत अधिक विविधता आणून त्यांचे स्वरूप अधिक अद्ययावत करण्यात आले पाहिजे. असे करण्यात आले तर बेकारी कमी करण्यासाठी अधिक रोजगार उपलब्ध होऊ शकतील आणि सामाजिक न्यायाचाही विस्तार होईल. मध्यम प्रतीच्या व छोट्या उद्योगधंद्यांकडून योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही तर मोठ्या उद्योगधंद्यांना आपले उद्योगधंदे विस्तारण्याची आणि त्यात अधिक विविधता आणण्याची मुभा देण्यात यावी. आर्थिक व सामाजिक दृष्ट्या जरूर असेल तर नवीन कारखाने काढण्यासही परवानगी द्यावी.

---

## आरोग्य सेवेचे राष्ट्रीयीकरण करण्याची सूचना

इंडिअन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. ए. के. एन्. सिन्हा ह्यांनी ग्रामीण भागांतील लोकांना आरोग्याबद्दलच्या सोयी उपलब्ध करून द्यावयाच्या असतील तर देशातील आरोग्य-सेवेचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी केली आहे. ते म्हणतात की वैद्यकीय पदवीधर खेडेगावी जाण्यास तयार नसतात हे म्हणणे खोटे असून राजकीय थापेबाजपणाचे आहे. हे मात्र खरे की ग्रामीण भागात डॉक्टरांना आपली उपजीविका चालविण्याइतकी प्राप्ती होणे कठीण जाईल. कारण तेथील एक तृतिआंशाइतक्या लोकांचे दररोजचे उत्पन्न ५० पैशांपेक्षाही कमी आहे. म्हणून ग्रामीण भागांतील डॉक्टरांना पुरेशी प्राप्ती होण्यासाठी आरोग्यसेवेचे राष्ट्रीयीकरण करणे एवढाच उपाय आहे. ग्रामीण भागातील लोकांना डॉक्टरांनी सांगितलेली औषधे घेण्याचे आर्थिक सामर्थ्य नसते. म्हणून पदवी घेतलेल्या डॉक्टरांना खेडेगावी पाठविणे म्हणजे राष्ट्रीय अपव्यय करण्यासारखे होईल. इंडिअन मेडिकल असोसिएशनने १० वर्षांपूर्वी राष्ट्रीयीकरणाची एक योजना सरकारला सादर केली होती. परंतु सरकारने तिजकडे काहीच लक्ष दिले नाही. अलीकडेच सरकारने जी ग्रामीण आरोग्य योजना जाहीर केली आहे ती उपयुक्त ठरणार नाही. आयुर्वेद आणि होमिओपॅथी ह्या चिकित्सापद्धतीचे ४ महिन्यांचे शिक्षण घेतलेले वैद्य ग्रामीण भागात धाडणे योग्य होणार नाही. योग्य व लायक डॉक्टर मिळण्यासारखे असताना असे करणे अनिष्ट आहे. आधुनिक वैद्यकीय पद्धती आणि आयुर्वेद व होमिओपॅथी ह्यांची संमिश्र पद्धती वापरात आणणेही हिताचे ठरण्यासारखे नाही.

---

## इंडियन हायकमिशनमध्ये नौकर कपात

लंडनमधील इंडिअन हायकमिशनमधील नौकरांची संख्या आता ५२५ वर आणण्यात आली आहे अशी माहिती राज्यसभेत देण्यात आली. एका प्रश्नाला उत्तर देताना परराष्ट्र खात्याचे उपमंत्री श्री. सुरेंद्रपाल सिंग म्हणाले की १९७४ पर्यंत तेथील नोकरांची संख्या ३५० पर्यंत कमी करण्याचा सरकारचा इरादा आहे. हायकमिशनमध्ये मोठ्या रकमांचा गैरवापर करण्यात येत आहे ह्या आरोपाचा त्यांनी इन्कार केला. ते पुढे म्हणाले की तेथील काम व नौकरांची संख्या ह्यांची नीट पहाणी करण्यात आली आहे. १९५९ साली नौकरांची संख्या १,२०० होती. ती १९६९ साली ७४८ करण्यात आली होती. युरोपमधील देशातील भारताच्या वकिलातीत काम करणारांच्या संख्येवरही सरकारचे लक्ष आहे असे सांगण्यात आले.

# व्यवस्थापनातील समस्या ( ४ )

## एका कंपनी संचालकाची व्यथा

( लेखक : एक संचालक )

जवळ जवळ २० वर्षे भरभराटीत चाललेल्या एका प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचा मी संचालक–संस्थापक. सुरुवातीच्या काळात रु. १०० पगारावर मी काम करीत होतो. वीस वर्षांच्या अवधीत रु. ५०० पर्यंत पगार झाला. प्रॉव्हिडंट फंड, पगारी रजा, वगैरे काही नाही. फक्त कंपनीच्या होणाऱ्या फायद्यावर ७½% कमिशन व काही वर्षे बोनस मिळाला एवढेच. १५ वर्षांचा विशिष्ट पगाराचा करार असल्यामुळे व कंपनीच्या हाती असलेल्या फायदेशीर पण अनिश्चित धंद्यामुळे कंपनीला भरपूर फायदा होऊनही पगार वाढवून घेण्याचे त्या काळात कधी मनावर घेतले नाही व संस्थेचा संस्थापक असल्यामुळे त्याबद्दल कधी खेदही वाटला नाही. संस्था वाढवायची व स्थिर करावयाची या जिद्दीने व तळमळीने स्वतःचा स्वार्थ न पाहता काम केले. भागीदारांना २% पासून ३० % पर्यंत डिव्हिडंड वाटले. सरकारी इन्कम टॅक्स ६५% असल्याने ३–४ लाखांपर्यंत टॅक्सच भरला. कंपनीच्या २१ व्या वर्षी हाती असलेला किफायतशीर धंदा दुर्दैवाने नाहीसा झाला. नवीन धंद्याचे प्रयोग सुरू झाले. त्यात तात्काळ जम बसेना पूर्वीच्या फायद्याच्या मानाने फायदा एकदम कमी झाला. एका वर्षी नवीन धंद्यातील मशीनरीवर काढलेल्या घसाऱ्यामुळे नुकसान आले. याबद्दल शेअरहोल्डर्सनी वस्तुस्थिती जाणून व धंद्यातील माझी सचोटी जाणून तक्रार केली नाही. कारण आजवर शेअरहोल्डर्सना त्यांच्या शेअररकमेच्या दुप्पट रक्कम डिव्हिडंड-रूपाने मिळाली होती. कंपनीच्या भरभराटीच्या काळात सरकारलाही इन्कम टॅक्स रूपाने भरपूर लाभ झाला होता.

कंपनीच्या अडचणीच्या व पडत्या काळात इन्कम टॅक्स अधिकाऱ्यांनी सहानुभूतीचे धोरण तर ठेवलेच नाही उलट जखमेवर मीठ चोळावे तसे झालेली खरोखरीची नुकसानी खोटी ठरविण्याचा खटाटोप करून टॅक्स बसविण्याचा अत्याचार सुरू केला. माझा पगार ५०० रु. टॅक्स ऑफिसरच्या डोळ्यात सलू लागला व त्याने त्यातले रु. २५० च ( म्हणजे वार्षिक रु. ३,००० च ) मान्य केले व बाकीवर टॅक्स बसविला. कंपनीला भरपूर नफा होत असताना मॅने. डायरेक्टरना पगार इतका कमी का असे जोपर्यंत इ. टॅक्स ऑफिसर विचारीत नाही तोपर्यंत कंपनीला फायदा नाही म्हणून मॅनेजिंग डायरेक्टरचा पगार कमी करावा असे अप्रत्यक्षरीत्या सुचविणे म्हणजे अव्यापारेषु व्यापार होय. हल्ली बँकेतील शिपाई, कॅशियर इत्यादींचे पगार रु. ४०० पासून रु. ७००/- पर्यंत आहेत. अशा परिस्थितीत ज्याचेवर लाखो रुपयांच्या उलाढालीची व सुरक्षिततेची जबाबदारी आहे व जो संपूर्ण वेळ हिशेब, टायपिंग, पत्रव्यवहार हे सर्व काम एकहाती करून केवळ हुद्द्याने मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पाहतो त्याला रु. ५०० पगार मिळणे ( तेही २० वर्षांनंतर ) सर्वथैव चुकीचे आहे काय ? कंपनीच्या पडत्या परिस्थितीची त्याला जाण आहे व त्या दृष्टीने जास्तीत जास्त काटकसरीचा कारभार तो करीत आहे.

संस्था काय अगर व्यक्ती काय, नफानुकसानीच्या रहाट-गाडग्यांतून कोणीही सुटलेले नाही. मंदीची लाट येते, चालू धंदा अनपेक्षितपणे बंद पडतो, अंदाज चुकतात, फसगत होते या कारणाने धंद्यात नुकसानी झाली; संचालकाने अप्रामाणिकपणे जाणूनबुजून केलेली नाही; तर ती ग्राह्य मानणे कोणासही भाग आहे. नुकसानीत चाललेल्या धंद्यांनीही कामगारांना विशिष्ट बोनस दिलाच पाहिजे असा एकीकडे कायदा करावयाचा आणि दुसरीकडे "परवडण्या"च्या तत्त्वावर कंपनीला फायदा झाला नाही म्हणून त्याच्या संचालकाचा पगार कमी करण्याचे दडपण आणावयाचे हे कोणत्या सामाजिक नीतीत बसते, समजत नाही. पगार तसाच अफाट असेल तर या दडपणाचे स्वरूप समजता येईल किंवा ते न्याय्यही ठरेल. परंतु ४ मुलाबाळांच्या पित्याच्या संसाराच्या किमान गरजा व कंपनी संचालक या नात्याने त्याने सांभाळावयाची किमान सामाजिक प्रतिष्ठा जपण्याइतपतही त्याला वेतन मिळत नसतांना त्याचेवर इन्कम टॅक्स ऑफिसरने आपली कुऱ्हाड चालविली तर त्या कंपनी संचालकाने काय करावयाचे ? गेली दोन वर्षे या व्यथेला मी तोंड देत आहे. सरकारी कायदे अनेक वेळा किती भोंगळ आणि अन्यायमूलक असतात व कोणाचाही कोणत्याही प्रकारचा तारतम्यभाव न बाळगता ठोकपणे त्याची अमलबजावणी करणारे ऑफिसर्स असले म्हणजे 'माकडाच्या हातात कोलीत' देण्याचा कसा प्रकार होतो याची 'अर्थ'च्या वाचकांना कल्पना यावी म्हणून त्या व्यथेला जाहीर वाचा फोडली आहे.

---

**टान्झानिआकडून काजूंची आयात**—भारताने टांझानिआकडून पुढील वर्षी ८५ हजार टन काजूगर आयात करण्याचे ठरविले आहे. आयातीची किंमत १०·६१ कोटी रुपये होईल. भारताच्या काजू कॉर्पोरेशनचे प्रतिनिधी आणि टांझानिआच्या शेतीमंडळाचे प्रतिनिधी ह्यांनी ह्या संबंधीच्या करारावर सह्या केल्या. काजूगराचे उत्पादन भारतात पुरेसे होत नाही.

**परदेशांत अन्नधान्याची खरेदी**— भारतामधील अनेक राज्यांत उद्भवलेल्या दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्यासाठी परदेशांत अन्नधान्याच्या खरेदीला प्रारंभ झाला आहे. अमेरिका, कॅनडा, अर्जेंटिना, इत्यादी गहू पिकविणाऱ्या देशांकडून ५ लाख टन गव्हाची खरेदी करण्यात आली आहे. ह्या खरेदीमुळे तातडीची गरज भागून पुढील खरेदी अधिक कसोशीने करण्यास लागणारा अवधी मिळू शकेल.

## चोरट्या आयातीचा टेलिव्हिजन कारखानदारीवर परिणाम

मुंबईतील टेलिव्हिजनचे सेट्स तयार करण्याचे कारखानदार चिंतेत पडले आहेत. अनेक कारखानदारांनी सेट्स घेणाऱ्या ग्राहकांच्या आगाऊ याद्या तयार केल्या होत्या. परंतु आता त्यांची मागणी कमी झाली असून आगाऊ पैसे देणारी गिऱ्हाइके दुर्मिळ होत चालली आहेत. तयार सेट्स विकणारे असे दोनच मोठे कारखाने सध्या आहेत. बारीकसारीक कारखाने आपले सेट्स भाडे-खरेदी पद्धतीने विकू लागणार अशी चिन्हे दिसत आहेत. बडे कारखाने त्यांच्या आर्थिक सुदृढतेमुळे विक्रीचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करून आपला माल विकू शकतील पण ह्या उत्पादनक्षेत्रात नव्याने येणाऱ्या अगर आलेल्या कारखान्यांची मात्र तारांबळ उडाली आहे. त्याचे कारण म्हणजे टी. व्ही. सेट्ची होणारी चोरटी आयात. कारखानदारांनी चोरट्या आयातीला प्रतिबंध करण्यासाठी कडक उपाय योजावे अशी मागणी सरकारकडे केली आहे. परंतु अजून परिस्थितीत बदल झालेला नाही. टी. व्ही. सेट्ची चोरटी आयात मुंबईत फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे त्याच्या किमती भराभर घसरत चालल्या आहेत. जपानमध्ये तयार झालेला १९ इंची पडद्याचा 'टोशिबा' सेट मुंबईत २ हजार रुपयांना मिळू शकतो. अशाच हिंदी सेट्ची किंमत मात्र २,३०० रुपये द्यावी लागते. शहरात टेलिव्हिजन सेट्ची देखभाल व दुरुस्ती करण्याचा धंदा खाजगी दुकानदारांनी चालविलेला आहे. हे लोक आयात केलेल्या सेट्चीही दुरुस्ती करतात. त्यामुळे परदेशी सेट्ची चोरटी आयात करण्यास अप्रत्यक्ष उत्तेजनच मिळत आहे. टी. व्ही. सेट जवळ ठेवणाराला परवाना घ्यावा लागतो. सेट्च्या मालकाला परवाना मिळवून देण्याची व्यवस्थाही चोर बाजारात माल आणणारी मंडळी ह्या ना त्या मार्गाने करीत असतात.

---

## नाताळ भेट कार्डाबरोबर १० लक्ष रु. चे लॉटरी तिकीट

न्यूयॉर्कमधील मिसेस इडा मॅगून ह्या ६५ वर्षे वयाच्या विधवा मोलकरणीला तिची शेजारीण मिसेस जोसेफ ह्यूजेस ही दरवर्षी नाताळच्या वेळी भेटकार्ड आणि त्याच्याबरोबर आयरिश स्वीपस्टेक्सचे लॉटरीचे तिकीट पाठविते. यंदाच्या ह्या तिकिटाला १० लक्ष रु. चे बक्षीस मिळाले. ह्या रकमेपैकी काही रकम मिसेस ह्यूजेसला आणि काही रकम धर्मादाय देण्याचा आपला मानस मिसेस मॅगूननी व्यक्त केला आहे.

---

## माधवराव शिंदे बॉंबे डाइंगचे बोर्डावर

ग्वालेरचे माजी संस्थानाधिपती, श्री. माधवराव शिंदे, हे बॉंबे डाइंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे डायरेक्टर झाले आहेत. कंपनीने श्री. शिंदे (वय २७ वर्षे) ह्यांच्या तारुण्याला महत्त्व दिले आहे, असे कंपनीतर्फे सांगण्यात आले आहे.

---

## वाचकांचा पत्रव्यवहार

### प्यादेगिरीचे कसब

श्री. गि. के. पंडित ह्यांच्या "प्यादेगिरीचे कसब" ह्या मार्मिक लेखातील कसब वापरून रंकाचा राव जरी झाला, तरी तो आपल्या कामात व पर्यायाने आपल्या जीवनात समाधानी असेलच काय? याचे उत्तर म्हणजे लेखातील श्री. रामराव कुलकर्णी यांचे शेवटचे वाक्य—"मला मात्र माझ्यासारखा मनुष्य आवडत नाही." मनुष्य जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात काम करीत असला, तरी त्याच्या व्यवसायात प्रगती होऊन त्यास मानसिक समाधान मिळेल, तेच कसब अंतिम हिताचे होईल, हाच वरील लेखाचा गर्भितार्थ नाही काय?

### तरुणांची कुचंबणा

श्री. सु. वि. मेहेंदळे ह्यांच्या "नव्या शिक्षणाच्या, ताज्या रक्ताच्या तरुणांची कुचंबणा" ह्या लेखात निर्दिष्ट केलेली समस्या चिंतनीय असून तीमध्ये व्यवस्थापकीय क्षेत्रातील सध्याची ज्वलन्त परिस्थिती प्रतिबिंबित झाली आहे. कंपनीच्या अंतिम हिताच्या दृष्टीने शेठ चंद्रकांत यांनी केलेल्या बहुमोल सूचना कार्यवाहीत आणण्याची शिकस्त करणे श्री. सुरेश दोशी यांना, ते सध्या फक्त ४२ वर्षांचे असल्याने, त्यांनी सहकार्यांची व लवचीकपणाची खेळकर वृत्ती ठेवल्यास, अवघड जाऊ नये, असे वाटते. आपल्या हाताखालचे पदवीधर इंजिनिअर त्यांचे कंपनीत अनुभव मिळवून दुसरीकडे जातात, याचा सूक्ष्म विचार केल्यास श्री. सुरेश दोशी ह्यांना, विचारसरणीमध्ये बदल करणे किती अगत्याचे व अंतिम हिताचे आहे, हे ध्यानी येऊ शकेल.

कोळपेवाडी (अहमदनगर) आर. डी. कुलकर्णी
२६-१२-१९७२

### श्री. संजय गांधी ह्यांची 'मारुती लिमिटेड'

श्री. संजय गांधी ह्यांची 'मारुती लि.' ही कंपनी ४ जून १९७१ रोजी कंपनी कायद्याखाली नोंदण्यात आली. तिचे वसूल भांडवल ७१,८९,१०० रु. आहे.

---

**मुंबईत प्रकाशित झालेले बोलपट :**— १९७२ मध्ये मुंबईमध्ये एकूण ११८ हिंदी बोलपट प्रकाशित झाले, त्यापैकी १०० बोलपट रंगीत होते. १९७१ मध्ये मुंबईमध्ये ९१ हिंदी बोलपट प्रसिद्ध झाले होते. १९७२ मध्ये मुंबईत १० मराठी, ५ गुजराती आणि १ सिंधी बोलपट प्रकाशित झाला. ह्या बोलपटांपैकी फक्त एकच (व्ही. शांताराम ह्यांचा 'पिंजरा') रंगीत होता. १०० रंगीत हिंदी बोलपटांपैकी ८० ईस्टमन कलरमध्ये, ८ गेवा कलरमध्ये, ६ फुजी कलरमध्ये, २ ऑर्वो-कलरमध्ये आणि चारांची रंगपद्धती निर्देशिलेली नव्हती. सिनेमास्कोपमध्ये एकच बोलपट होता, तो म्हणजे 'पाकिजा'.

---

## वेतनाबरोबर समाधानही वाटले पाहिजे

अमेरिकेच्या आरोग्य व शिक्षण खात्याने कामगारांच्या कामाबद्दलच्या मनोवृत्तीविषयी अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यावरून असे दिसते की कामगार हा केवळ मिळणाऱ्या वेतनालाच सर्व महत्त्व देतो असे नाही. त्याच्या दृष्टीने कामासाठी मिळणारे वेतन हे महत्त्वाच्या दृष्टीने पाचव्या क्रमांकाची बाब ठरते. अमेरिकेत ८·२ कोटी कामगार असून त्यांच्यांत दिसणाऱ्या असमाधानामुळे अमेरिकेत सरकार चिंतेत पडले होते. तेव्हा ह्या प्रश्नाचा खास अभ्यास करण्यात आला आणि अभ्यासगटाने आपला अहवाल सरकारला सादर केला. त्यावरून असे दिसून आले की अनेक कामगारांना त्यांचे काम मुळीच आवडत नसून उलट त्यांना त्याचा तिटकारा आहे. कामगारात असलेल्या ह्या असंतुष्टतेची अनेक लक्षणे अहवालात नमूद करण्यात आली आहेत. असमाधानामुळे त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे त्याशिवाय कुटुंबात अस्थैर्य निर्माण होत असून सामाजिक कार्यक्रमात भाग न घेण्याची वृत्ती जोपासली जात आहे. कामगार सामाजिक व राजकीय दृष्ट्या एकांडे बनत आहेत. त्यांच्यांत आक्रमक वृत्ती बळावत आहे. लहान मुले एकाकी पडत आहेत, अंमली औषधे घेण्याकडे कल वाढत आहे आणि दारूचे व्यसन फोफावत चालले आहे. ह्यावर उपाय म्हणून एकसारखे एकच काम करण्याऐवजी त्यात विविधता आणावी, आणि काम देण्याच्या बाबतीत कामगारांच्या म्हणण्याचा विचार करण्यात यावा असे उपाय अहवालात सुचविण्यात आले आहेत. बेकारांसाठी व भत्त्यावर राहणाऱ्यांसाठी नवे रोजगार उपलब्ध करावे असेही सुचविण्यात आले आहे.

## रशिआच्या सहकारी संघटनेचे साह्य

ग्राहकांना लागणाऱ्या रोज खपाच्या वस्तू तयार करण्यासाठी रशिआतील ग्राहक सहकारी संघटना भारतामधील सहकारी संघटनांशी सहकार्य करणार आहे. उभयतांच्या सहकार्याने वस्तूंवर संस्कार करणारे कारखाने काढण्यात यावयाचे आहेत. कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री रशिआ पुरविणार असून त्यात तयार होणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तू रशिआला निर्यात करून किमतीची फेड करण्यात येणार आहे. अर्थात ही निर्यात सहकारी संघटनांमार्फतच होईल. रशिआतील नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झुमर्स फेडरेशन ह्या संघटनेच्या चार प्रतिनिधींशी चर्चा करून सहकार्याविषयी परस्परांशी समजूत करून घेतली. त्यापूर्वी रशिअन संघटनेच्या प्रतिनिधींनी अहमदाबाद, मुंबई, औरंगाबाद व बंगलोर ह्या शहरांना भेटी देऊन ग्राहकांच्या संघटनांची व त्यांच्यातर्फे चालविल्या जाणाऱ्या कारखान्यांच्या गरजांची माहिती करून घेतली. त्यामुळे भारतामधील ग्राहकोपयोगी मालाच्या स्वरूपाची त्यांना चांगली कल्पना आली. भारतामधील ग्राहकांच्या सहकारी संघटना अद्याप बाल्यावस्थेत आणि म्हणूनच बाजारपेठावर फारशा परिणाम करण्यासारख्या समर्थ झालेल्या नाहीत. किंबहुना अशा संस्था अपवादभूतच आढळतात असे म्हटले तरी चालेल. रशिआतील अशा संघटनांची कार्यपद्धती व अनुभव भारतामधील संघटनांना तंतोतंत उपयोगी पडणार नाही. परंतु इतर देशांतील ग्राहक सहकारी संघटनांची माहिती होण्याच्या दृष्टीने उभयता देशांतील अशा संघटनांच्या संबंधाचे स्वागत केले पाहिजे.


## बॉंबे रेंट ॲक्टचे २४ ( १ ) हे बंधनाचे कलम नकारात्मक आहे

सर कावसजी जहांगीर यांच्या मालकीच्या एका इमारतीत विजेच्या लिफ्टची सोय होती. सर कावसजी ह्यांनी ही इमारत विकली. काही वर्षांनी हा जुनाट झालेला लिफ्ट निकामी झाला. या इमारतीत भाडेकरू राहात होते. पुढे ही इमारत एका कंपनीने खरेदी केली. भाडेकऱ्यांनी लिफ्ट दुरुस्त करून चालू करण्याबद्दल मागणी केली, परंतु मालक कंपनीने ती नाकारली. तेव्हा भाडेकऱ्यांनी मालकावर रेंट ॲक्ट कलम २४ ( २ ) व ( ३ ) अन्वये दावा केला व २४ ( ४ ) अन्वये फौजदारी खटलाही केला. फौजदारी खटल्यात मॅजिस्ट्रेटने कंपनीस दोषी ठरवून दंड केला. कंपनीने हायकोर्टाकडे अपील केले असता हायकोर्टाने कंपनीस निर्दोषी ठरवून सोडून दिले. हायकोर्टाने खालील मत व्यक्त केले.

" या कलमाचा हेतू मालकाने भाडेकऱ्यास मिळत असलेल्या सोयी त्याने स्वतः होऊन बंद करता कामा नयेत, असा आहे. तांत्रिक दोषामुळे व ज्या कारणाशी मालकाचा काही संबंध नाही अशा कारणामुळे लिफ्ट बंद पडला, तर तो मालकाचा दोष होऊ शकत नाही. कलम २४ ( १ ) ने मालकावर घातलेले बंधन नकारात्मक आहे; मालकाने काय करू नये, हे त्यात नमूद आहे. सोयी व पुरवठा या बाबतीत मालकाने मुद्दाम त्या बंद केल्यास ते गुन्ह्याचे कृत्य होईल." दिवाणी दाव्याचा निकाल अद्याप लागलेला नाही.

## रासायनिक खतावर सर्वस्वी अवलंबून राहणे धोक्याचे

इंडिअन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स ह्या संघटनेची २६ वी परिषद पश्चिम बंगालमधील कल्याणी विद्यापीठात भरविण्यात आली होती. परिषदेचे उद्‌घाटन डॉ. एन्. आर. धर ह्यांनी केले. ते अलाहाबाद येथील शीला धर इन्स्टिट्यूट ऑफ सॉइल सायन्स ह्या संस्थेचे डायरेक्टर आहेत. ते आपल्या भाषणात म्हणाले की, रासायनिक खतावर सतत अवलंबून राहणे देशाच्या हिताचे नाही. पिकांचे उत्पादन वाढविण्यास निदान भारतात तरी सेंद्रिय खतावर जोर दिला पाहिजे. रासायनिक खताच्या वापराबद्दल जगातील अनुभव असा आहे की त्याच्या वापराने उत्पादन वाढते. परंतु सतत एकसारखे उत्पादन मात्र होऊ शकत नाही. म्हणून शेतीच्या कायमच्या विकासासाठी रासायनिक खते हा उपाय नाही. अमेरिकेत पिकांचे उत्पादन वाढत आहे, पण जमीन नापीक होत चालली आहे.




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 173

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, १७ जानेवारी, १९७३ | अंक २

## आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा असा बेत चालला असेल ना तुमचा ?



## त्यासाठीं आमच्या संचित ठेव योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. **मुदत** ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !

**तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेटसाठी या योजनेखाली बचत करा. मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !**

खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

729 Mar

## सीतेने वनवास न पत्करता अयोध्येचे राज्य चालविले असते तर ?

अखिल भारतीय महिला परिषदेचे अधिवेशन मिरत येथे भरविण्यात आले होते. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना प्रवास व नागरी विमान वाहतूक खात्याच्या उपमंत्री डॉ. सरोजिनी महिशी म्हणल्या की श्रीरामाबरोबर सीताही वनवासात गेली. पण तशी न जाता तिने जर अयोध्येचे राज्य चालविले असते तर ह्या देशाचा इतिहास निराळ्या वळणाने गेला असता. ह्या देशात कायदे करणारांनी अगदी प्राचीन काळापासून अशा प्रकारचे कायदे बनविले आहेत की त्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यांना पुरुषाच्या बरोबरीने अजूनही वागविण्यात येत नाही. ह्यावर उपाय एकच आहे आणि तो म्हणजे स्त्रियांनी सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांत भाग घेतला पाहिजे आणि आपले हक्क बजावण्यासाठी धीराने पुढे आले पाहिजे. ह्याबाबतीत सुशिक्षित स्त्रियांवर विशेष जबाबदारी पडते. स्वातंत्र्यानंतर सर्व स्त्रियांना बरोबरीचे अधिकार देण्यात आले. परंतु ज्या स्त्रिया अशिक्षित राहिल्या त्यांना स्वतःचे हक्क बजाविण्याची संधी अजूनही मिळत नाही. त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचे काम सुशिक्षित स्त्रियांनी केले पाहिजे. आता काळ बदलला आहे आणि बदलत आहे. त्याला अनुसरून अ. भा. महिला परिषद उपयुक्त कार्य करीत आहे. संघटनेने स्वातंत्र्याच्या लढ्यात महत्त्वाची मदत केली. त्याचप्रमाणे नुकत्याच झालेल्या भारत-पाक युद्धातही चांगली कामगिरी करून दाखविली आहे. युद्ध संपल्यानंतरं युद्धात कामी आलेल्या जवानांच्या बायकांना पुन्हा आपल्या पायांवर उभे करण्याच्या कामातही संघटनेने लक्षात घेण्यासारखा वाटा उचलला आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

---

## 'ग्रंथालय भूषण' श्री. हरीभाऊ देशपांडे

महाराष्ट्र-राज्य ग्रंथालय संघाच्या वतीने यंदाच्या वा. वि. भट सत्कार पारितोषिकात 'ग्रंथालय भूषण' ही पदवी व ३०० रु. चे रोख बक्षीस श्री गणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय ह्याचे संस्थापक आणि निरलस कार्यकर्ते श्री. हरीभाऊ देशपाडे ह्यांना देण्यात आले आहे. अमरावती येथे ह्या महिनाअखेर भरणाऱ्या ग्रंथालय परिषदेत त्यांचा सत्कार केला जाईल. श्री. देशपांडे ह्यांनी नुकतेच ७३ व्या वर्षात पदार्पण केले असून गेली ५० वर्षे त्यांनी ह्या क्षेत्रात सेवावृत्तीने, निरपेक्षपणे, सातत्याने, उत्कृष्ट कार्य चालविले आहे. 'ग्रंथालय भूषण' पदवी मिळविण्याचा पहिला मान त्यांना देण्यात सत्कार समितीने दाखविलेली गुण-ग्राहकता अनुकरणीय आहे; केवळ गुणांचीच कदर तिने दाखविली आहे.

---

## 'विलायत'च्या आमिषाला बळी पडणाऱ्या भाबड्या तरुणी

काही दलाल मध्यमवर्गीय तरुणींना विलायतेमधील चैनीचे आमिष दाखवून त्यांची अरबी देशांकडे रवानगी करतात, त्याबद्दल इशारा देणारे पत्रक हरियाणा सरकारने काढले आहे. अरबी देशांतील श्रीमंत लोकांना हिंदी मुली नोकरीस ठेवणे हे प्रतिष्ठेचे लक्षण वाटते. ह्या फलदायी नोकरीच्या आमिषामुळे कित्येक मुली भरमसाठ व्याजाने कर्जे घेऊन दलालांना ५०० रु. ते २,००० रु. दलाली देतात. पासपोर्ट किंवा व्हिसा न घेता हे एजंट ह्या मुलींना चोरट्या मार्गे अरबी देशांकडे पाठवितात. काही मुलींची अरबी लोकांशी लग्ने लावून तिकडे पाठविले जाते हे 'नवरे' अरबी देशांत गेल्यावर 'वधूंना' फारकत देतात आणि बिचाऱ्या मुलींना नको ते धंदे करून पोट भरावे लागते. त्यांना पासपोर्ट किंवा व्हिसा नसल्यामुळे ह्या मुली एजंटांचे भक्ष्य बनतात. काही मुली कुंटणखान्यात दाखल होतात. नव्या वातावरणाशी आणि नव्या मूल्यांशी समरस होणे त्यांना शक्य होत नाही.

---

## काँग्रेस अधिवेशनाचा खर्च ४० लाख रु.

कलकत्ता येथे भरविण्यात आलेल्या विधननगर काँग्रेस अधिवेशनासाठी काँग्रेसला ४० लाख रुपये खर्च आला असावा असा अंदाज करण्यात आला आहे. पक्षाने केलेल्या ह्या खर्चासाठी सुमारे १५ लाख रुपये छोट्या ठेवींच्या रूपाने गोळा करण्यात आले आहेत. कमी पडलेली रक्कम उभारण्यासाठी पश्चिम बंगाल प्रदेश काँग्रेसला मोठ्या प्रमाणावर वर्गणी गोळा करावी लागणार आहे. अधिवेशन ज्या ठिकाणी भरविण्यात आले त्या ठिकाणी सुखसोयी करण्यासाठी बंगाल सरकारने १ कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. अधिवेशनाची सोय म्हणून पोस्ट व टेलिग्राफ खात्याने विधननगर सर्व महत्त्वाच्या शहरांशी टेलेक्स संदेशवहन पद्धतीने जोडले होते. ३०० टेलिफोन्स व एक तात्पुरता एक्स्चेंज ह्यांची उभारणी केली होती. आता ह्या सोयी चालू राहतील.

---

## तरुण राहण्यासाठी प्रे. निक्सन ह्यांचा तोडगा

अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन ह्यांनी आपल्या ६० व्या वाढदिवसाच्या निमित्ताने दिलेल्या एका मुलाखतीत तारुण्य टिकवून धरण्यासाठी तोडगा सांगितला आहे. ते म्हणतात की वाढत्या वयाला थोपवावयाचे असेल तर कंटाळवाणा आयुष्यक्रम सोडून दिला पाहिजे. नेहमी भविष्यकालाकडे नजर ठेवली पाहिजे आणि आवती-भोवती तरुणांचा गराडा राहील अशी दक्षता घेतली पाहिजे. बहुतेक वयस्कर माणसे वयाने वाढतात तसतशी आपला जीवनाचा वेग कमी करत जातात. पण ही फार मोठी चूक आहे. माणसाने आपले आध्यात्मिक जीवन सदैव प्रवाही ठेवले पाहिजे. म्हणजे मग वाढत्या वयाचा कधीही परिणाम होणार नाही. जो मंदावला तो वयस्कर झाला असे समजावे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार १७ जानेवारी, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## हरितक्रांतीचा फायदा छोट्या शेतकऱ्याला नाही

इंडिअन सोसायटी ऑफ ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स ह्या संघटनेच्या २६ व्या परिषदेत बोलताना नॅशनल अग्रिकल्चरल कमिशनचे उपाध्यक्ष श्री. बी. शिवरामन म्हणाले की भारतात झालेल्या हरितक्रांतीचा फायदा छोट्या शेतकऱ्याला मिळत नाही. कारण, बडे शेतकरी अधिक सामर्थ्यवान् आणि वजनदार आहेत. शेतीच्या उत्पादनाचे नवे तंत्र उपलब्ध झाले असले तरी त्याचा कल मोठ्या शेतकऱ्यांकडे वळलेला दिसून येतो. सध्याची धोरणे अशी आहेत की मोठ्या शेतकऱ्याला लहान शेतकऱ्याच्या हिताचा बळी देऊन आपला स्वार्थ साधता येतो. असे करण्यापासून त्याला परावृत्त करण्याचे उपाय योजले जात नाहीत. हल्ली चालू असलेली पाणीपुरवठ्याची पद्धत पाहिजे त्याने पाहिजे तेव्हा पाणी जमेल तर घ्यावे अशी आहे. पाणीपुरवठ्यावर नियंत्रण असे नाहीच. ज्याला पाणी घेण्याची ताकद आहे तो ते घेत आहे. ही पद्धत अतिशय सदोष आहे. त्यामुळे समाजातील सामर्थ्यसंपन्न मोठे शेतकरी उपलब्ध असलेल्या पाण्याचा मोठा हिस्सा स्वतः घेतात. अर्थातच छोट्या शेतकऱ्याला पाण्यासाठी ताटकळत वाट पाहावी लागते. कधी कधी त्याला ते मिळत नाही. पाणीपुरवठ्याच्या बाबतीत सर्व खेड्यांना सारखा न्याय मिळत नाही. ज्या खेडेगावाला एखादा मोठा पुढारी असतो त्या खेड्याला भरपूर पाणीपुरवठा होतो त्यामुळे अनेक छोट्या शेतजमिनीला योग्य वेळी पाणी मिळू शकत नाही. छोट्या शेतकऱ्यांना आणखीही एका अडचणीला तोंड द्यावे लागते त्याच्या शेतात पाण्याचा निचरा करण्याची सोय बहुधा असत नाही त्यामुळे कधी कधी जरुरीपेक्षा अधिक पाणी साठून त्याच्या जमिनीत दलदल माजून राहते.

मोठ्या शेतकऱ्याला मात्र असा त्रास होत नाही. कारण खेड्यातील निम्म्यापेक्षाही अधिक जमीन त्याच्या मालकीची असते. पाणी साचून जमिनीला धोका उत्पन्न होण्याचा संभव दिसला की तो पाणी सरळ जवळपासच्या छोट्या शेतात सोडून देतो. पिकांचे संरक्षण करण्याची सध्याची पद्धतही दोषपूर्ण आहे. पिकांवरील रोगराईचा नायनाट करण्यासाठी औषधे फवारण्यात येतात. परंतु हे काम व्यक्तिशः शेतकऱ्यावर सोपविण्यात येते. खेडे हा घटक धरून एखाद्या भागातील सर्व पिकांवर संरक्षक औषधे अगर रसायने वापरण्यात येत नाहीत. ह्याही बाबतीत मोठा शेतकरी सुरक्षित असतो. त्याची जमीन मोठी असल्यामुळे आसपासच्या शेतातील किडींचा व रोगांचा त्याच्या पिकावर फारसा परिणाम होत नाही. कारण, किडींचा प्रादुर्भाव त्याच्या पिकांवर होण्यास पुष्कळदा वेळ लागतो. ह्याच्या उलट छोट्या शेतकऱ्यांची परिस्थिती आहे. जवळच्या बड्या शेतकऱ्याने आपल्या जमिनीवरील पिकाचे रक्षण करण्यासाठी योग्य उपाय वेळीच योजले नसल्यास त्याचा दणका छोट्या शेतकऱ्याला सहन करावा लागतो. कारण, त्याचे छोटे शेत रोगराईच्या भक्षस्थानी पडण्यास फारसा अवधी लागत नाही. छोट्या शेतकऱ्याला पतीवर कर्जपुरवठा केल्याने त्याची स्थिती सुधारेल हा एक भ्रम आहे. ह्या कर्जपुरवठ्याचा फायदा घेण्याचे त्याचे सामर्थ्य बड्या शेतकऱ्यांच्या मानाने फार तोकडे असते. मुळात छोट्या शेतकऱ्याचे उत्पादन बेताबाताचे असते; आणि प्रचलित समाजपद्धतीत आपले भवितव्य कर्जपुरवठ्यावर अवलंबून ठेवणे त्याला सहाजिकच धोक्याचे वाटते. सतत अनिश्चित परिस्थितीत राहिल्याने हा जुगार खेळण्याची त्याची तयारी नसते.

---

## चित्रगृहांच्या मालकांचे सरकारला निवेदन

सिनेमेटोग्राफ एक्झिबिटर्स असोसिएशन ऑफ इंडिआ ह्या संघटनेने पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांना धंद्यातील अडचणी-संबंधी एक निवेदन सादर केले आहे. निवेदनातील अनेक मागण्यां-पैकी एक मागणी अशी करण्यात आली आहे की सिनेमागृहांना परवाने देण्याबाबत आणि त्यासंबंधीची अंमलबजावणी करण्या-विषयी सर्व देशाला समान अशी योजना तयार करण्यात यावी. त्याचप्रमाणे करमणूक करासंबंधीही सर्वत्र सारखे धोरण स्वीकारण्यात यावे. खेडेगावांतून करमणूक कर व खेळांवरील कर अजिबात रद्द करण्यात यावा. सध्याच्या करपद्धतीमुळे सिनेमागृहांना अनेक मुद्दी कर द्यावा लागतो. शिवाय करमणूक कराचा बोजाही मोठा आहे. तो कमी करून मोठ्या शहरात तो २० टक्क्यांपेक्षा अधिक नसावा अशी मागणी करण्यात आली आहे. छोट्या शहरांतून तर तो आणखीच कमी असावा असे संघटनेने सुचविले आहे सिनेमाच्या धंद्याच्या विकासासाठी वेगळा निधी उभारण्यात यावा आणि करमणूक करापैकी निदान १०टक्के रक्कम त्या निधीसाठी द्यावी अशी सूचना करून निवेदनात मागणी करण्यात आली आहे की ज्या ठिकाणी सिनेमागृहे नसतील

त्या ठिकाणी ती बांधण्यास उत्तेजन देण्यात यावे. भारतात सध्या ५॥ लाखांवर मध्यम शहरे व गावे आहेत. त्यापैकी फक्त २,२३४ गावी सिनेमागृहे आहेत. सध्या तिकिटापोटी मिळालेल्या ५ रुपयांपैकी ३ रुपये सरकार ह्या ना त्या स्वरूपाच्या कराने काढून घेते आणि उरलेले दोनच रुपये काय ते उद्योगधंद्याच्या हाती राहतात. ही परिस्थिती धंद्याला चिंता उत्पन्न करणारी आहे.

### १९६१ पासून ८,५०० अमेरिकन विमानांचा नाश

उत्तर व्हिएटनाम सरकारला पॅरिस येथील वाटाघाटी पुन्हा सुरू करण्यास भाग पाडण्यासाठी अमेरिकेच्या विमानदलाने त्या देशावर नव्याने बाँबचे हल्ले अलीकडे सुरू केले होते. ह्या भयानक हल्ल्यांमुळे उत्तर व्हिएटनामचे भयंकर नुकसान होत आहे. पण खुद्द अमेरिकेच्या विमानांचाही नाश बराच होत आहे. नाताळ संपण्याच्या आदल्या दिवशी अमेरिकेने बाँबहल्ले थांबविण्याचे जाहीर केले. ह्याचे कारण घरचा विरोध अगर जागतिक लोकमत नसून विमानांचा नाश हे आहे, असा जाणकारांचा तर्क आहे. नव्या बाँबहल्ल्यात अमेरिकेची १५ बी–५२ मोठी बाँबर विमाने आणि बरीच लढाऊ विमाने कामास आली. अमेरिकेच्या लष्करी खात्याने जाहीर केलेल्या माहितीप्रमाणे १९६१ पासून अमेरिकेची ८,५०० विमाने नष्ट झाली आहेत. ह्या विमानांची किंमत सुमारे १,०५० कोटी डॉलर्स अथवा ७,६६५ कोटी रुपये आहे. उत्तर व्हिएटनाम, दक्षिण व्हिएटनाममधील मुक्तिसेना, कांबोडिआ आणि लाओस ह्या भागावर अमेरिकेने केलेल्या बाँब हल्ल्यात २ हजार वैमानिक मृत्युमुखी पडले आहेत आणि त्याशिवाय १२,३६० बेपत्ता असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. ५७२ वैमानिक उत्तर व्हिएटनाममध्ये पकडण्यात आले आहेत. ह्या युद्धात अमेरिकेने ७० लाख टन वजनाचे बाँब टाकले. दुसऱ्या जागतिक युद्धात २० लाख टन वजनाचे बाँब टाकण्यात आले होते. कोरिआतील युद्धात अमेरिकेने टाकलेल्या बाँबपेक्षा १० पट अधिक बाँब टाकण्यात आले. ह्या सर्व आकड्यांवरून पूर्वीच्या फ्रेंच इंडोचायनातील देशांची किती दारूण अवस्था झाली असेल त्याची कल्पना येईल.

### मलेशियातील नवी हिंदी बँक

युनायटेड एशियन बँक ही संस्था इंडियन ओव्हरसीज बँक, युनायटेड कमर्शिअल बँक आणि इंडियन बँक ह्यांच्या एकत्रीकरणातून निर्माण झाली आहे. ह्या तीन बँकांचे १९६८ मध्ये राष्ट्रीयीकरण झाले. मलेशियाच्या कायद्याप्रमाणे, राष्ट्रीयीकृत विदेशी बँकांना तेथे व्यवहार करण्यास बंदी आहे. युनायटेड एशियन बँकेची स्थापना ३० डिसेंबर रोजी झाली. तिच्या डायरेक्टर बोर्डावर १० डायरेक्टर असतील, त्यांपैकी सहा मलेशियन हिंदी असतील. मलेशियाचे उद्योगपती टुंकू अरिफ बंडारारा हे चेअरमन असून श्री. विष्णु मूर्ती हे चीफ एक्झिक्युटिव्ह होतील.




पाणी...पाणी
हवं तेव्हा, हवं तितकं
शेतातून सोनं पिकवायचं असेल तर पिकाला वर्षभर, हवं तेव्हा – हवं तितकं पाणी मिळायला हवं.
त्या साठी भरवशाचं असं 'एकच'
किर्लोस्कर एंजिन
३ ते १५ हार्स पॉवर
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड,
रजि. ऑफिस–एल्फिन्स्टन रोड, पुणे-३
® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविला आहे. Tom & Bay/KO-7182-M

# माझ्या परिचयाचे नानासाहेब परुळेकर

—चिं. वि. जोग



[ लोकाश्रयावर सन्मानाने जगणाऱ्या प्रभावी वृत्तपत्राचा आदर्श—छोटा कारखानदार आणि लहान व्यापारी या घटकांच्यावर, औद्योगिक संपत्तीचे जनक म्हणून, अपत्यवत माया - उद्योगव्यवसायातील लोकांच्या सामाजिक जबाबदारीचा आणि समाजकार्याचा पुरस्कार - दैनंदिन आचारधर्मातील जुन्यापुराण्या गोष्टींचा तिरस्कार पण सांस्कृतिक वारसा जपण्याची दक्षता - कार्याचे महत्त्व पटले की त्याचा सातत्याने पुरस्कार — मनोधैर्य—शिक्षणप्रसाराची तळमळ, इत्यादी नानासाहेबांच्या गुणांचे महाराष्ट्र बँकेचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. चिं. वि. जोग, बी. कॉम., एफ. आय. बी ( लंडन ) ह्यांनी स्वानुभवावर घडविलेले मार्मिक, वास्तव दर्शन. ]

प्रांतिक भाषीय वृत्तपत्रे ही ज्या वेळी राजकीय मतप्रचाराची साधने या नात्याने बुडीत धंदा म्हणून चालविली जात असत, त्या काळी या व्यवसायाला सुस्थिर आर्थिक पायावर उभारण्याची महनीय कामगिरी डॉ. नानासाहेब परुळेकरांनी केली. कोणत्या तरी धनिकाच्या अथवा संस्थानिकाच्या राजाश्रयावर आणि राजकीय पक्षाच्या फंडावर गुजराण करणाऱ्या वृत्तपत्रांची चाकोरी मोडून काढून, जनतेचे मुखपत्र या नात्याने लोकाश्रयावर सन्मानाने जगणाऱ्या प्रभावी वृत्तपत्राचा नवा आदर्श 'सकाळ'च्या रूपाने त्यांनी उत्पन्न केला. हरप्रयत्नांनी मिळविलेले ताजे वृत्त आणि कोणत्याही राजकीय दबावाला आणि आर्थिक प्रलोभनाला बळी न पडणारे मतस्वातंत्र्य हे वेदमंत्राइतकेच पवित्र मानण्याचा वृत्तपत्रधर्म त्यांनी आजन्म जोपासला. परिणामी, लोकमान्य टिळक हे जसे तेल्यातांबोळ्यांचे पुढारी, तसे नानासाहेब खऱ्या अर्थाने तेल्यातांबोळ्यांचे वृत्तपत्रकार बनले. उत्तरकालात 'सकाळ'च्या अनुकरणाचे अनेक प्रयत्न झाले असले, तरी मूळ 'सकाळ'ची सर त्यास कधीच आली नाही.

नानासाहेबांचा माझा परिचय गेल्या २९ वर्षांचा म्हणजे मी महाराष्ट्र बँकेत आलो तेव्हापासूनचा असला तरी स. १९५८ मध्ये मी पुणे रोटरी क्लबचा सदस्य झालो, तेव्हा आमचे संबंध अधिक घनिष्ठ बनले. समाजातील छोटा कारखानदार आणि लहान व्यापारी या काहीशा दुर्लक्षित घटकांवर देशातील औद्योगिक संपत्तीचे जनक म्हणून नानासाहेबांची अपत्यवत माया असल्याने आणि या वर्गाविषयी मलाही प्रारंभापासून आस्था असल्याने आम्ही भावनिक दृष्ट्या अधिकाधिक जवळ येत गेलो. कोणत्याही लहान व्यापाऱ्याच्या अथवा छोट्या कारखानदाराच्या कार्यक्रमास नानासाहेब मुख्य पाहुणे आणि मी अध्यक्ष असे समीकरण अलीकडच्या काळात प्रस्थापित झाले होते. अशा कार्यक्रमास छोटे कारखानदार आणि व्यापारी आम्हा उभयतांना आवर्जून बोलवीत आणि आम्ही दोघे अगत्यपूर्वक जात असू.

उद्योगव्यवसायातील, तसेच व्यापारउदीमातील लोकांच्या सामाजिक जबाबदारीची कल्पना अलीकडच्या काळात प्रसृत झाली असली, तरी या विशिष्ट कल्पनेचा पुरस्कार नानासाहेबांनी फार पूर्वीपासून केला. गिऱ्हाइकांशी सचोटीने व्यवहार करा, त्यांनी दिलेल्या पैशाचा झुकत्या मापाने मोबदला द्या आणि दुष्काळ, भूकंप, पूर, यांसारख्या सामाजिक आपत्तीच्या प्रसंगी सामाजिक कर्तव्य म्हणून सढळ हाताने आर्थिक साह्य करा, असे कारखानदार आणि व्यापारी जनांना त्यांचे सांगणे असे. लक्ष्मी निर्माण करून ती सदैव प्रवाही ठेवणे हे वणिकजनांचे आणि कारखानदारांचे जसे काम आहे, तसेच या संपत्तीचा काही भाग समाजाच्या कारणी लावणे हेही त्यांचे कर्तव्य आहे, असे ते मानीत. तसा हितोपदेश ते उद्योग-व्यवसायक्षेत्रातील लोकांना करीत. सामाजिक कर्तव्यपूर्तीच्या बाबतीत मोठ्या कारखानदारांपेक्षा लहान कारखानदार आणि व्यापारी अधिक दक्ष असतो, असे त्यांचे अनुभवसिद्ध मत होते. मृत्यूपूर्वी काही महिने पिंपरी-चिंचवड भागातील कारखानदारांच्या साह्याने त्या भागाचा सुव्यवस्थित नगरविकास करण्याचा ध्यास त्यांच्या मनाने घेतला होता.

उद्योगव्यवसाय क्षेत्रातील लोकांनी स्वतःच्या कामाचे व्याप सांभाळून सामाजिक कार्यात रस घेतला पाहिजे असे नानासाहेबांचे आग्रहाचे सांगणे असे. बँकेचे काम सांभाळून मी असे काम करतो, याबद्दल त्यांना माझे कौतुक असे. त्याबद्दल माझे अभिनंदन करणारे पत्रही त्यांनी मला मध्यंतरी अगत्यपूर्वक लिहिले होते.

दैनंदिन आचारधर्मातील जुन्यापुराण्या गोष्टींचा नानासाहेबांना तिरस्कार असला, तरी तदंगभूत सांस्कृतिक वारसा हरप्रयत्नाने जतन करावयास हवा, असे त्यांचे मत होते. मृत्यूपूर्वी एक वर्ष पोटदुखीच्या रूपाने देवाची घंटा घणघणत असताना महाराष्ट्रातील

गावोगावच्या कीर्तनकारांची परिषद् बोलावून पाच नमुनेदार कीर्तने पुण्यात करण्याचा आणि त्यायोगे लुप्तप्राय कीर्तनविधेला नवा उजाळा देण्याचा कसोशीचा प्रयत्न नानासाहेबांनी केला.

एखादी व्यक्ती अथवा संस्था यांच्या कार्याचे महत्त्व नानासाहेबांना पटले की नानासाहेब त्याचा सातत्याने पुरस्कार करीत असत. त्यास मध्येच सोडून देण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांचा प्रत्येक बाबतीतला सल्लाही प्रत्येक गोष्टीचा बारकाईने विचार करून, उलटसुलट बाजू लक्षात घेऊन, दिलेला असे. भावनेच्या भरात जाऊन कोणताही निर्णय ते घेत नसत. याचा अनुभव पुणे रोटरी क्लबमधील एका विवाद्य प्रसंगी मला आणि कै. दामूअण्णा पोतदार यांना आला. एका प्रकरणात पुणे रोटरी क्लबच्या अध्यक्ष, उपाध्यक्षांनी मध्येच राजीनामा दिल्याने घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला. त्या वेळी मी आणि कै. दामूअण्णा पोतदारांनी नानासाहेबांशी प्रदीर्घ चर्चा करून आमची बाजू समजावून सांगितली. त्या वेळी आमचे म्हणणे पटल्यानंतर नानासाहेबांनी स्वतःचे मनाविरुद्ध दुसऱ्यांदा अध्यक्ष होण्याचे कबूल केले. उत्तरकालात हे सारे प्रकरण कोर्टात जाऊन नानासाहेब, दामूअण्णा आणि मी यांना कोर्टात बेअदबी केल्याचा आरोपही ओढवून घ्यावा लागला. परंतु या साऱ्या प्रकरणात नानासाहेबांचे मनोधैर्य तिळमात्रही खचले नाही. सुयोग्य मार्गदर्शन करून त्यांनी आम्हांस निभावून नेले.

राजकारणाच्या बाबतीत नानासाहेबांची भूमिका तात्त्विक स्वरूपाची असे. भारतात लोकशाही रुजावयाची असेल, तर नगरपालिकांतील स्थानिक स्वराज्याचा कारभार आपण अपक्ष भूमिकेतून आणि नागरिक हितरक्षणाचा एकमेव दृष्टिकोन ठेवून प्रथम सुधारला पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होती. पुणे येथील नागरिक संघटनेचा जन्म त्यामधूनच झाला. परंतु राजकीय पक्षांच्या वाढत्या दडपणामुळे त्यांचा हा प्रयोग अपेक्षेइतका यशस्वी होऊ शकला नाही.

नानासाहेबांना शिक्षणप्रसाराबद्दल आत्यंतिक तळमळ असून, तिचे मूर्त स्वरूप म्हणजे इंडिया फौंडेशन ही त्यांनी उभारलेली संस्था होय. मृत्यूपूर्वी थोडेच दिवस शिक्षणप्रसारासंबंधी काही नव्या योजना हाती घेण्याची कल्पना त्यांनी मजजवळ बोलून दाखविली होती, परंतु त्यांच्या मृत्यूने या साऱ्याच योजनांवर आता कायमचा पडदा पडला आहे.

---

### ‘ गुड मॉर्निंग ’ची जागा ‘ नमस्कारा ’ने घेतली

पुण्यातील टेलिफोन ग्राहकांनी ट्रंककॉलसाठी किंवा तक्रारीसाठी १८० किंवा १९८ नंबर फिरवला म्हणजे ऑपरेटर मुली ‘गुड मॉर्निंग’ किंवा ‘गुड ईव्हिनिंग’ म्हणून त्यांचेशी बोलू लागत. त्याऐवजी आता ‘ नमस्कार ’ हा भारतीय शब्द वापरण्यात येऊ लागला आहे.

### शेतीच्या पतपुरवठ्याच्या यशासाठी सहकारी संस्थांच्या कारभारात सुधारणा आवश्यक

“ शेतीविषयक उद्दिष्टे साध्य व्हावयास सहकारी संस्थांचे शुद्धीकरण आवश्यक आहे. राज्य सरकारांचीच ही जबाबदारी आहे. सहकारी संस्थांच्या कारभाराची निःकृष्टता थांबविली पाहिजे, इतकेच नव्हे तर त्या संस्थांची भक्कम पायावर उभारणी करण्यासाठी राज्य सरकारांनी प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे. खेडेगावांच्या पातळीवरील सोसायट्यांच्या नव्या सभासदांची संख्या वाढायला हवी. सहकारी सोसायट्यांचे सभासद नसलेल्या किंवा सभासद असून कर्जाचा फायदा न मिळालेल्या लोकांची संख्या अद्याप फार मोठी आहे. त्यांना प्राथमिक सोसायट्यांचे कर्ज घेणारे सभासद केल्यास त्यांना रिझर्व्ह बँकेमार्फत होणारा कर्जपुरवठा पोचू शकेल आणि त्यामुळे सहकारी विभागाला नवे टॉनिक मिळेल ”

— रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. एस्. जगन्नाथन

---

### कपास कापड गिरण्यांची निर्गत—काही अडचणी

“ कपास कापडाच्या गिरण्यांच्या उत्पादनापैकी १५% उत्पादनाची निर्गत व्हावी, ही सरकारची सूचना गिरणीच्या धंद्याने मान्य केली आहे. परंतु, कपास कापडाच्या निर्गतीमधील यश कित्येक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय गोष्टींवर अवलंबून आहे. आशियातील आणि आफ्रिकेतील जे कित्येक देश आपले गिऱ्हाईक होते, त्यांनीच आता गिरण्या स्थापन केल्या असून ते आपले स्पर्धक बनले आहेत ! ह्या विभागातील देशांना परराष्ट्रीय चलनाचा तुटवडा असल्यामुळे इच्छा असली तरी त्यांना भारतीय कापड आयात करता येत नाही. निर्गत करणारे देश वाढल्यामुळे इतर बाजारपेठांतील स्पर्धा तीव्रतर झाली आहे. कपाशीचे उत्पादन वाढणे भारताची कापडाची निर्गत वाढण्यास अत्यावश्यक आहे. कामगारांचे वेतन, दर मीटर मागे विचार करता, फार महाग पडते. वेतन आणि उत्पादकता ह्यांचा संबंध नसल्यामुळे आणि चलनवाढीमुळे राहणीचा खर्च व वेतन वाढल्यामुळे परिस्थिती सुधारणे कठीण जाते. यंत्रांचे आधुनिकीकरण, ऑटोमॅटिक यंत्रांचा वाढता वापर आणि उत्पादनाच्या तंत्रात सुधारणा, हाच ह्यावर प्रभावी उपाय आहे. निर्गतीच्या बाजारपेठांना लागणारे कापड पुरेशा प्रमाणात उत्पादन करण्यात २० वर्षांपूर्वीची बंधने आड येतात. ती बंधने दूर करण्याचा सरकारी निर्णय दोन वर्षांपूर्वी झाला तरी तो अद्याप कार्यवाहीत येऊ शकलेला नाही. निर्णय घेतल्यापासून त्याची अमलबजावणी होणे याला दीर्घ काळ लागतो, ही आपल्या देशातील एक मोठीच समस्या आहे. ”

— श्री. कृष्णराज एम्. डी. ठाकरसी

---

## राष्ट्रीय जलनिधीसाठी गंगा-कावेरी कालवा निरुपयोगी ?

हिमालयातील बर्फ वितळून उत्तर भारतामधील नद्यांना पाणी चढते, त्याचप्रमाणे पावसाळ्यातही ते चढते. पण हे सर्व पाणी हिंदी महासागर अगर बंगालच्या उपसमुद्रात वाहून जाते. बाकीच्या भारतात पावसाळ्यानंतर कित्येक नद्या कोरड्या पडतात आणि विस्तीर्ण भूभागाला दुष्काळासारख्या परिस्थितीला तोंड देण्याची पाळी वारंवार येते. ह्या आपत्तीला तोंड देण्यासाठी गंगा नदीचे पाणी दक्षिण भारतामधील नद्यांत सोडणारा मोठा कालवा खणण्याची कल्पना निघाली. मध्यवर्ती पाणीपुरवठा आणि वीज मंडळाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात ह्या योजनेला विरोध करणारी निवेदने ग्रथित करण्यात आली आहेत. अनेक राज्यांच्या मुख्य इंजिनिअरांनी आणि विद्यापीठातील प्राध्यापकांनी राष्ट्रीय जलनिधीसाठी अशा कालव्याचा उपयोग होणार नाही असे मत व्यक्त केले आहे. त्यांच्या मताने ह्या कालव्याची कल्पना स्वप्नाळू, अनावश्यक आणि इतर दृष्टीने धोक्याची आहे. संकल्पित कालव्याची लांबी २,६६५ किलोमीटर असून तो पूर्ण करण्यासाठी २,५०० कोटी रुपये खर्च येणार आहे. इ. स. २,००० मध्ये ही योजना पूर्ण होण्याची शक्यता आहे. मध्यप्रदेशाच्या मुख्य इंजिनिअरांच्या मताने गंगा-कावेरी कालव्याचा विचार सुद्धा करण्याचे कारण नाही. कालव्यासाठी प्रचंड खर्च तर येईलच; पण शिवाय तो सुस्थितीत राखण्यासाठी दरसाल ७०० कोटी रुपये खर्च येईल तो वेगळाच. हा कालवा फार तर मोठा पाणीपुरवठा करणारा होईल. पण राष्ट्रीय जलनिधीतील एक दुवा म्हणून त्याचा उपयोग होणार नाही. कारण, जलनिधीतील पाणी कोणत्याही दिशेला वळविता आले पाहिजे.

ह्या कालव्याचे पाणी गंगेकडून कावेरीकडे म्हणजे उत्तरेकडून दक्षिणेकडे जाईल; उलट फिरविता येणार नाही. केरळचे मुख्य एंजिनिअर म्हणतात की कालव्यातून वाहतूक करता येणार नाही. कालव्यातील पाण्याची गती इतकी असेल की बोटींना तो वापरता येणार नाही. शिवाय कालव्याच्या मार्गात अनेक ठिकाणी ते धबधब्यासारखे खाली कोसळेल. कालव्याच्या योजनेत अनेक धरणांचा समावेश आहे. एके ठिकाणी तर अरुंद व लांब असा बोगदाही खणावा लागणार आहे. ह्या कारणामुळे वाहतुकीसाठी कालव्याचा उपयोग फक्त सहा महिने आणि तोही अल्प अंतरासाठीच करता येईल. बाकीचे महिने कालवा कोरडाच राहणार आहे. मध्यवर्ती सरकारचे पाटबंधारे मंत्री श्री. राव ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे वर्षातून ५ महिनेपर्यंत ह्या कालव्यातून २,५०० कोटी घनफूट पाणी मध्य भारत, पश्चिम भारत व दक्षिण भारत ह्या भागांतील अवर्षणग्रस्त प्रदेशापर्यंत नेता येईल. कालव्याची रुंदी ७० मीटर ठेवण्यात यावयाची आहे आणि खोली तीन मीटरपर्यंत राहावयाची आहे. कावेरी नदीला कालवा जोडण्यापूर्वी तो सोन, नर्मदा, तापी, गोदावरी, कृष्णा व पेन्नार नद्यांच्या खोऱ्यांतून वाहणार आहे. भारतात पावसाळ्याचे प्रमाण अतिशय विषम आहे. त्याला ह्या कालव्यानेच उत्तर देता येईल. कालव्याच्या मार्गात विंध्य पर्वताचा फार मोठा अडथळा आहे पण तो दूर करता येण्यासारखा आहे. एकदा विंध्य पर्वतराजी भेदून कालवा बाहेर पडला की मग केवळ गुरुत्वाकर्षणाने पाणी सतत वाहू शकेल; त्यात अडथळे उत्पन्न होणार नाहीत.

---

## अमेरिकन लोकांचा शौक

अमेरिकन लोकांना निरनिराळ्या प्रकारच्या खेळांचा शौक किती आहे ह्याची कल्पना सहज येत नाही. पण अनेक प्रकारच्या खेळांवर ते अवाढव्य खर्च करीत असतात. १९७२ साली अमेरिकेच्या खेळशौकिनांनी १०,००० कोटी डॉलर्स अथवा ७५,००० कोटी रुपये खेळावर खर्च केले. ही रक्कम अमेरिकेच्या संरक्षण खात्याच्या अंदाजपत्रकापेक्षाही जास्त आहे. बोटिंग, टेनिस, बर्फावरील घसरगुंडी, गॉल्फ, इत्यादी खेळांवर ती खर्च करण्यात आली. गेल्या वर्षाच्या मानाने २५ टक्के अधिक बोटींची विक्री करण्यात आली. टेनिसच्या खेळाडूत २० टक्के वाढ झाली आणि गॉल्फ खेळणारे ४ टक्क्यांनी वाढले. बॉबी फिशरने जागतिक विजय मिळविल्यावर बुद्धिबळाची लोकप्रियता एकदम वाढली. अमेरिकेतील कित्येक घरांतून आता पियानोप्रमाणेच बिलियर्ड खेळण्याची टेबलेही दिसू लागली आहेत.

---

## युद्धाने अर्थव्यवस्था उध्वस्त

पाकिस्तानचे अध्यक्ष श्री. भुत्तो ह्यांनी भावलपूर येथील वकिलांच्या संघटनेपुढे बोलताना अशी कबुली दिली की भारताशी नुकतेच झालेले युद्ध पाकिस्तानला परवडणारे नव्हते. ते म्हणाले की गेल्या वर्षी झालेले युद्ध फक्त १४ दिवसच चालले पण त्यामुळे पाकिस्तानची अर्थव्यवस्था उध्वस्त होण्याच्या मार्गाला लागली. युरोपीय देशांना जसे दुसरे महायुद्ध परवडले नाही तसेच पाकिस्तानला हे युद्ध परवडले नाही. युद्ध अल्पकाळ चालले तरी त्याचा भार सहन करण्याची शक्ती पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेत नव्हती. सध्या देशाला चलनवाढीचा आणि इतर घातक आर्थिक प्रवृत्तींचा धोका उत्पन्न झाला आहे. त्यावर उपाय म्हणजे लोकांनी अंग मोडून काम करणे हा एकच आहे. आर्थिक व इतर प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी चळवळीचे मार्ग स्वीकारणे अतिशय खेदजनक म्हणावे लागेल.

---

## प्रेसिडेंट भुट्टोंची बक्षिसी अजून वाटावयाची आहे

सिमला शिखर परिषदेच्या वेळी प्रेसिडेंट भुट्टो आणि त्यांचे समवेत आलेली मंडळी ह्यांची देखभाल करणाऱ्या सेवकांसाठी प्रेसिडेंट भुट्टो ह्यांनी १०,७०० रु. दिले. ही बक्षिसी अद्याप दिली गेलेली नाही. बक्षिसी कोणाला व किती द्यावयाची हे ठरविण्यासाठी अद्याप हिमाचल प्रदेशाचे सरकार माहिती जमा करीत आहे. सुमारे २०० लोकांना बक्षिसी मिळेल असा अंदाज आहे.

## हिंदमधील पहिली भुयारी रेल्वे

हिंदमधील पहिल्या भुयारी रेल्वेचे काम गेल्या महिन्याच्या २९ तारखेला सुरू झाले कलकत्ता येथे बांधण्यात येणाऱ्या ह्या रेल्वेमार्गाच्या बांधकामाचा शुभारंभ पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी केला. हा रेल्वेमार्ग डमडम ते टॉलीगंज असा होणार असून त्याची लांबी १६·४३ किलोमीटर इतकी होईल. त्यापैकी १·५ किलोमीटर मार्ग जमिनीवरच होणार असून बाकीचा भूमिगत होणार आहे. मार्गावरील दोन स्टेशनांतील सरासरी अंतर सुमारे १·०२ किलोमीटर इतके असेल. कलकत्ता शहरातील वाहतूक इतकी अवाढव्य वाढली आहे की अशा प्रकारच्या जलद व मोठ्या प्रमाणावर वाहतूक करण्याच्या मार्गाची अतिशय आवश्यकता भासत आहे. डमडम एवढे एकच स्थानक जमिनीवर राहील. बाकीची सर्व स्थानके भुयारात असतील. रेल्वेमार्गाचे बांधकाम पुरे होण्यास सहा ते सात वर्षे लागतील. १९७९ च्या सुमारास बांधकाम पूर्ण होईल असा अंदाज आहे. ह्या मार्गावर धावणाऱ्या गाड्यांना एकाच वर्गाचे ८ डबे असतील व प्रत्येक डब्यात जास्तीत जास्त ३२० उतारू बसू शकतील. गाड्यांचा जास्तीत जास्त वेग तासाला ८० किलोमीटर इतका राहील पण स्थानकांवर थांबण्याचा व पुन्हा धावण्याचा काळ लक्षात घेतला तर हा वेग दर तासाला ३३ किलोमीटर इतकाच पडणार आहे. डमडम पासून १·५ किलोमीटर लांबीचा दुहेरी मार्ग १९७५ च्या सुमारास तयार होईल. त्यावर चाचणी घेण्यात येईल.

भुयारी रेल्वे बांधण्यासाठी अंदाजे १४०·३ कोटी रुपये खर्च येणार आहे. त्यापैकी २३·७ कोटी रुपयांचा खर्च परदेशी चलनात करावा लागणार आहे. डब्यात वापरण्यात येणारे काही भाग, सिग्नलसाठी लागणारी सामग्री, विजेची उपकरणे, इत्यादी प्रकारचा माल आयात करावा लागणार आहे. प्रथम तर डबेसुद्धा आयात करावे लागतील. मद्रास येथील रेल्वे डब्याच्या कारखान्यात मग ते बनविण्यात येऊ लागतील. कलकत्त्याच्या भागातील भूमीचे स्वरूप लक्षात घेता जमिनीवर असणाऱ्या बांधकामाला धक्का न लावता हे काम करणे अवघड आहे. तरी पण हिंदी रेल्वेने ते अंगावर घेतले असून रेल्वे करीत असलेल्या एका अतिशय बिकट कामात त्याचा समावेश करावा लागेल. कलकत्ता शहरातील वाहतुकीचा प्रश्न म्हणजे एक कायमची डोकेदुखी होऊन बसली आहे. शहरातील रस्त्यावरून आणखी बसगाड्या अगर इतर वाहने चालविणे अशक्य झालेले आहे. रस्ते रुंद केल्याखेरीज आणखी गाड्या रस्त्यावरून जाऊच शकणार नाहीत. रस्ते रुंद करावयाचे तर सध्या उभ्या असलेल्या अनेक इमारती व बांधकामे पाडून टाकावी लागतील. अशा परिस्थितीत मध्यवर्ती सरकारला ह्या भुयारी मार्गाच्या बांधकामाला परवानगी देणे भागच पडले. भुयारी रेल्वे मार्गावरील गाड्यांसाठी विजेचा पुरवठा मात्र हुकमी झाला पाहिजे.


दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" 
दूर ध्वनी : मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१ : २६०३०६ नं.२ : २९०००६

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी १० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक



"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."
—पं. जवाहरलाल नेहरू

महाराष्ट्रातील सहकारी चळवळींची प्रेरक शक्ती

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक



## श्री. बापूसाहेब के. एम. पाटील

एलएल्. बी.

जन्म बाडी ता. पाचोरे येथे दिनांक ५–१०–१९२५ रोजी एका शेतकरी कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षण बाडी या खेडेगावात, माध्यमिक शिक्षण पाचोरा व बडोदा येथे आणि एलएल्. बी. पर्यंतचे उच्च शिक्षण बडोदा व पुणे येथे झाले. सन १९५० मध्ये त्यांनी वकिलीच्या व्यवसायास सुरुवात केली. लहानपणापासूनच सार्वजनिक कामाची आवड असल्यामुळे कॉलेजमध्ये असताना खानदेश स्टुडन्टस् असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी म्हणून त्यांनी काम केले. तद्वत्च वकिलीचे व्यवसाया-बरोबरच त्यांचे लक्ष सार्वजनिक कार्याकडे होते म्हणून ते १९५२ साली पाचोरा नगरपालिकेचे सभासद म्हणून निवडून आले. कार्याचे क्षेत्र मिळाल्याबरोबर ते लोकप्रिय नगरपिते होऊन सन १९५५ ते १९५७ पावेतो त्यांनी नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून काम केले. तद्वत्च पाचोरा ता. कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काही वर्षे काम केले व कॉंग्रेस संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील राहिले. सार्वजनिक कार्यातील त्यांची ती धडपड पाहून त्यांना १९६० मध्ये जळगाव जिल्हा विकास मंडळाचे मानद चिटणीस म्हणून नेमण्यात आले. जिल्हाभर कामा-निमित्त फिरण्याची संधी मिळाली व त्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र विस्तृत झाले व त्यामुळे त्यांना जिल्ह्यातील अग्रेसर नेत्यात स्थान मिळाले. सन १९६२ पावेतो त्यांनी मानद चिटणीस म्हणून काम केले व त्यानंतर जिल्हा परिषदा अस्तित्वात आल्यावर ते जळगाव जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष म्हणून १९६२ मध्ये निवडून आले.

जिल्हाभर विकास कार्यक्रमावर लक्ष देत असतानाच त्यांनी शेतकऱ्यांचे प्रगतीकडे खास लक्ष पुरविले व शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांची सारखी धडपड असे. त्यामुळे त्यांची अखिल भारतीय कापूस सल्लागार समितीवर निवड झाली. त्या काळात त्यांनी त्या विषयावर बरेच लिखाण केले. स्वतः जातिवंत शेतकरी असल्याने शेतीविकासाच्या निरनिराळया योजना आखून त्या कार्यान्वित करून शेतीचे उत्पन्न वाढ-विण्यासाठी खूप धडपड केली व करीत आहेत व त्यात त्यांना यशही प्राप्त झाले आहे. केवळ जिराईत शेतीने भागणार नाही म्हणून त्यांनी बागायतीकडेही खास लक्ष पुरविले व जळगाव जिल्ह्यात केळीचे उत्पन्न वाढवून त्यास बाजारपेठ उपलब्ध व्हावी व शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा म्हणून ठिकठिकाणी फ्रुट सेल सोसायट्या स्थापन करून त्यांचे फेडरेशन तयार केले व स्वतः त्या फेडरेशनचे अध्यक्षपदाची धुरा हाती घेऊन केळीला परदेशी व्यापारपेठ मिळवून दिली. त्या निमित्ताने त्यांनी रशिया, इटली, फ्रान्स, इंग्लंड, आदी अनेक देशांत अभ्यास–दौरा केला व आपल्या देशास परकीय चलन उपलब्ध करून दिले. या बरोबरच जिल्ह्यात कापसाला योग्य भाव मिळावेत म्हणून त्यांनी कापूस उत्पादकांची सहकारी सूतगिरणी स्थापन केली व सुरुवातीस त्यांही स्पिनिंग मिलच्या चेअरमन पदाची धुरा त्यांनी बरीच वर्षे सांभाळली. सन १९६७ मध्ये त्यांची जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. शेती विकासाच्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या फंडातून अनेक विविध योजना हाती घेतल्या. तद्वत्च ग्रामीण विभागाशी दळणवळणाच्या सोयीच्या दृष्टीने ग्रामीण रस्त्यांचे कामावरही विशेष भर दिला व एक आदर्श जिल्हा परिषद म्हणून या जिल्हा परिषदेच्या कार्याचा अनेक वरिष्ठ नेत्यांनी उल्लेख केला आहे. शेतकरी जीवनाशी सेवा सोसायट्यांचा फार संबंध. त्यामुळे पर्यायाने मध्यवर्ती सहकारी बँकेचाही संबंध. त्या दृष्टीने मा. आप्पासाहेब जे. एम. पाटील निवृत्त झाल्यावर त्या बँकेचे चेअरमन पदाची धुरा ते सांभाळीत आहेत. श्री. बापूसाहेब के. एम. पाटील कार्यक्षम व ग्रामीण व शेतकरी जीवनाशी समरस असलेले व त्यांचे विकासासाठी सातत्याने धडपड करीत असलेले कार्यकर्ते विधान सभेवर पाचोरा मतदार संघातून नवकॉंग्रेसचे उमेदवार म्हणून निवडून आले. जिल्ह्यात त्यांचे कार्यामुळे त्यांना खास लोकप्रियतेचे स्थान प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील सर्व जनतेला त्यांचे कार्याची माहिती आहे. तसेच माहे ऑक्टोबर १९७२ मध्ये ते इजिप्त, सुदान, या देशांत कपाशीची माहिती घेण्याकरीता मा. ना. यशवंतराव मोहिते, सहकार मंत्री, यांचे बरोबर गेले होते.

---

**कर्जाऊ दिलेल्या विजेची परतफेड** — महाराष्ट्र सरकारने गुजरात सरकारला त्या राज्यातील विजेच्या तुटवड्याचे वेळी ११ कोटी युनिट वीज उसनी दिली होती. १ जानेवारी, १९७३ पासून गुजरातने दररोज ५,००,००० युनिट विजेची परतफेड करण्यास प्रारंभ केला आहे. दररोज ७,५०,००० युनिट विजेची परतफेड व्हावी, अशी महाराष्ट्र सरकारची मागणी होती.

## संस्थानिष्ठांची कुचंबणा, तोंडपुंज्यांची चलती

'अर्थ' या पाक्षिकातील "बढती कुणाला" याबद्दल श्री. श्याम रघुनाथ सासरे यांची प्रतिक्रिया वाचली. त्यांनी मांडलेले विचार मुद्देसूद वाटले. तसेच आपल्या दिनांक २०-१२-७२ च्या अंकातील "व्यवस्थापनातील समस्या" या लेखांक ३ मधील "प्यादेगिरीचे कसब रंकाचे राव बनविते", हा श्री. गि. के. पण्डित यांचा लेख वाचला. त्यांत त्यानी श्री. रामराव कुलकर्णी यांनी प्रगती कशी केली हे त्यांच्याच शब्दांत सांगितले आहे.

सध्याच्या काळात जे लोक श्री. रामराव कुलकर्णी यांचा कित्ता गिरवितात तेच यशस्वी होतात असे मला आवर्जून सांगावयाचे आहे. कारण, प्रायव्हेट संस्थांमध्ये काम करणाऱ्यांत कर्तव्यतत्पर, कसबी, बुद्धिमान कामगारांची मुळीच कदर होत नाही. उलट, त्यांची नेहमी कुचंबणाच होते व कामचलावू, वरिष्ठांची हांजी हांजी करणारे लोकच झपाट्याने पुढे येतात, ह्याची रामराव कुलकर्णी सारखी अनेक उदाहरणे देता येतील. सर्वांनाच रामराव कुलकर्णी बनता येत नाही. तरीही आज जे लोक रामराव कुलकर्णीसारखे वागतात त्यांचेच भले होते. सध्याच्या काळात तत्त्व, स्वाभिमान वगैरे विसरून जो कोणी "जसे वारे असेल तसे उफणावे" किंवा "जीधर बम् उधर हम्" या म्हणीप्रमाणे वागेल त्याचेच आयुष्यात भले होईल. अन्यथा तुमच्या इतर चांगल्या गुणांना इथे शून्य किंमत आहे. या दृष्टीने श्री. कुलकर्णी यांचे निवेदन सुरेख आहे.

दि. २६।१२।७२ — शरद रामराव अपराजित
कृषि-विस्तार अधिकारी
दि बीड जिल्हा म. स. बँक लि. शाखा – दिंद्रुड

---

## प्रत्येक टेलिफोन कॉलला दीड रुपया

अमेरिकेतील टेलिफोन कंपन्यांनी फोन कॉलचा सध्याचा दर दुप्पट करून तो दीड रुपया व्हावा, अशी सरकारकडे मंजुरी मागितली आहे. न्यूयॉर्क टेलिफोन कंपनीचे उत्पन्न त्यामुळे २५० कोटी रुपयांनी वाढेल. सध्या लोकल कॉलला वेळेचे बंधन नाही. प्रत्येक पाच मिनिटांच्या वेळेचा एक कॉल मोजला जाईल, अशीही सुधारणा करण्यात येणार आहे. टेलिफोनचे ग्राहक पूर्वीपेक्षा फार दीर्घ काळ बोलत राहतात, असे टेलिफोन कंपनीचे म्हणणे आहे. ७२% कॉल्स ५ मिनिटांत संपतात, तर २८% कॉल्स प्रत्येकी सरासरी १६ मिनिटांचे होतात! १९६४ मध्ये ही सरासरी १२ मिनिटे होती.

---

## श्री. वा. काळे ह्यांचे 'चिंतन'

रविवार दि. २१ रोजी सकाळी ७-१० वाजता आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून श्री. वा. काळे ह्यांचे 'चिंतन' ध्वनिक्षेपित होईल.

## ब्रिटनचा युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटीमध्ये प्रवेश

### भारताच्या हितसंबंधांना धोका

ब्रिटनचा यु. इ. कम्युनिटीमधील प्रवेशाचा भारताच्या परराष्ट्रीय व्यापारावर दूरगामी परिणाम होणार आहे—ब्रिटनशी होणाऱ्या व्यापारावर आणि यु. इ. कम्युनिटीमधील इतर देशांशी होणाऱ्या व्यापारावर. १९३९ चा भारत-ब्रिटन व्यापारी करार रद्द करण्याची नोटीस ब्रिटनने भारतावर पूर्वीच बजाविली आहे; त्यामुळे भारताला त्या देशात जकातीचे बाबतीत मिळणारी सूट नाहीशी झाली आहे. यु. इ. कम्युनिटीमध्ये भारताचे आणि भारतासारख्या इतर विकसनशील देशांचे हितसंबंध सांभाळण्यासाठी ब्रिटनकडून कितपत कोशीस केली जाईल, हे लवकरच लक्षात येईल. ब्रिटनमधील व्यापारी सवलती रद्द केल्यामुळे होणारे भारताचे नुकसान भरून निघावे, तागासारख्या जिनसांच्या निर्गती-मधील दीर्घकाळ भासत असलेल्या अडचणी दूर व्हाव्यात, आयात-निर्गतीमधील प्रतिकूल तफावतीची जागा अनुकूल तफावतीला मिळावी आणि युरोपातील समृद्ध बाजारपेठेत भारताला न्याय्य वाटा मिळावा, अशी भारताची मागणी आहे. युरोपातील (यु. इ. कम्युनिटीत समाविष्ट असलेल्या) देशांकडे भारत जेवढी निर्गत करतो, त्यापेक्षा त्याची आयात १२५ कोटी रुपयांनी अधिक आहे; भारताची तेथे निर्यात वाढत गेलेली नाही. यु. इ. कम्युनिटीने भारताच्या चहा, काजू, लाख, कपास कापड, हस्तकौशल्याच्या वस्तू, इत्यादींचे बाबतीत थोडी सहानुभूती दाखविली आहे, परंतु भारताला खूपच मोठ्या प्रत्यक्ष कृतीची अपेक्षा आहे. त्या कृतीचे स्वरूप एकाद्या व्यापारी कराराचे असावयास हवे.

---

## राष्ट्रीयीकृत बँकांचे नामधारी संचालक?

### सरकारी खुलासा

"बँकांच्या कारभारात कर्जे देण्यास सर्वांत महत्त्वाचे स्थान आहे. परंतु, राष्ट्रीयीकृत बँकांच्या डायरेक्टर बोर्डाला रबर स्टँप मारण्याइतपतही त्याबाबतीत अधिकार नाही. व्यवस्थापकांनी मंजूर केलेली कर्जे बोर्डाच्या माहितीसाठी ठेवण्याचीही आवश्यकता नाही. सरकारने नेमलेल्या मॅनेजिंग कमिटीकडे सर्वाधिकार येणार आहे. ह्या कमिटीत सरकारी सभासदांचाच भरणा राहणार आहे. म्हणजे, सरकारी बहुमताचाच प्रभाव पडणार आहे. त्यामुळे, बँकांचे कर्मचारी आणि अधिकारी ह्यांचा ह्या बोर्डावर जाण्यास मिळण्याचा कसून प्रयत्न चालू आहे. बोर्डाची सभा वर्षातून किमान सहा वेळा तरी व्हावी, असा कायदा आहे."

वरील प्रकारची टीका इकॉनॉमिक टाइम्सच्या २७ डिसेंबरच्या अंकात प्रसिद्ध करण्यात आली होती, त्यासंबंधी भारत सरकारच्या अर्थ खात्याने खुलासा प्रसिद्ध केला आहे. "प्रत्येक बँकेचा सर्वोच्च अधिकार डायरेक्टर बोर्डाकडेच राहील. बोर्डाने मध्यवर्ती सरकारच्या मंजुरीने दिलेले अधिकार मॅनेजिंग कमिटी उपभोगील. कमिटीच्या सभांचे वृत्तांत बोर्डाला कळविले जातील. कमिटी बोर्डाच्या हाताखालीच काम करील." असा तो खुलासा आहे.

## बँक कॅशिअरला ३ वर्षे सक्त मजुरी

**पेइंग-इन स्लिपा बाजूस काढून ठेवून कॅश लांबविली**

महाराष्ट्र स्टेट को. बँकेच्या चेंबूर शाखेचे कॅशिअर बालकृष्ण जे. पेढणेकर ह्यांना बृहन्मुंबईच्या सेशन्स कोर्टाचे जज्ज श्री. डी. जी. ताटके ह्यांनी विश्वासघाताबद्दल तीन वर्षे सक्त मजुरी आणि ५०० रु. दंड अशी शिक्षा ठोठावली.

डिसेंबर १९६९ ते मार्च १९७० ह्या मुदतीत आरोपी हा कौंटरवर रिसीव्हर कॅशिअरचे काम करीत होता, आणि बँकेच्या खातेदारांकडून रोख रकम स्वीकारीत होता. २४ मार्च, १९७० रोजी कॅश तपासतेवेळी गुन्हा उघडकीस आला.


"१८ डिसेंबर, १९६९ रोजी बँकेच्या एजंटने माझ्या जवळील कॅशमधून १०,००० रुपयांचे एक बंडल नेले आणि चार दिवसांत ते परत करण्याचे कबूल केले. ही रकम सामावून घेण्यासाठी मी पेइंग इन स्लिपा बाजूस काढून ठेवीत होतो" असा आरोपीचा बचाव होता. पण त्यावर कोर्टाने विश्वास ठेवला नाही. कारण १०,००० रुपयांपेक्षा खूप मोठी तूट हिशेबात येत होती. बाकीच्या १९,५०० रुपयांच्या तुटीबाबत आरोपीचे म्हणणे असे की एजंटाजवळ ही कॅश देऊन मी बाहेर गेलो होतो. हा खुलासाही कोर्टाने अमान्य केला.

**रेडिओचा खप अपेक्षेप्रमाणे नाही** — १९७१ चे मानाने १९७२ मध्ये मोठ्या कारखानदारांच्या रेडिओ सेट्सचा खप आठ टक्क्यांनी घटला. एकूण विक्री १८ लक्ष सेट्सची होईल अशी अपेक्षा होती, पण प्रत्यक्ष विक्री १६ लक्ष सेट्सचीच झाली. सुमारे चार लक्ष सेट्स कारखान्यांकडे पडून आहेत. छोट्या कारखानदारांचा खप २०% ने वाढला, परंतु एकूण विक्रीत त्यांचा वाटा अल्प आहे. रेडिओच्या खपापैकी ७५% खप शहरात आणि २५% खप ग्रामीण भागात होतो.

**नॉर्वेजिअन पंडिताने हिंदु धर्म स्वीकारला**—ॲक्सेल जेनसन ह्या ४० वर्षे वयाच्या नॉर्वेजिअन ख्रिस्ती पंडिताने ३ जानेवारी रोजी दिल्ली येथे हिंदु धर्म स्वीकारून अरविंद हे नाव धारण केले. हिंदु मुलीशी विवाह करून भारतामध्येच स्थायिक होऊन, गीता आणि वेद ह्यांचे नॉर्वेजिअनमध्ये भाषांतर करण्याचा त्याचा विचार आहे.

**कॉफी-प्रेमी अमेरिकन**—अमेरिकेत दरमाणशी दर साल १३·६ पौंड कॉफी खपते. अजिबात कॉफी न पिणाऱ्यांपेक्षा दररोज पाचापेक्षा जास्त पेले कॉफी जे पितात, त्यांना हृदयविकार होण्याचा दुप्पट संभव असतो, असे बॉस्टन विद्यापीठाच्या मेडिकल सेंटरच्या संशोधनाला आढळून आले आहे.

**बँक ठेवींच्या वाढीची गती मंदावली** — १९७१ मध्ये बँकांकडील ठेवी १,१५४ कोटी रुपयांनी वाढल्या होत्या; १९७२ मधील वाढ १,२०९ कोटी रु. ची आहे. म्हणजे, आकड्यांच्या दृष्टीने वाढ दिसत असली तरी ठेवींच्या वाढीच्या गतीचे प्रमाण १९·९% वरून १७·३% वर उतरले.




# नहीं –
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुआवजा मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



कमल सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: १७६१०२


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३९ पुणे, बुधवार, ७ फेब्रुवारी, १९७३ अंक ३

आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा
असा बेत चालला असेल
ना तुमचा ?



त्यासाठीं आमच्या संचित ठेव
योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक!
तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेट साठी या योजनेखाली बचत करा.
मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही!
खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

729 Msr

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा.

### वाढीव भाग-भांडवलावर १० टक्के डिव्हिडंड

### सन १९७२ मधील गौरवास्पद प्रगती

### ठेवीमध्ये रु. ४.३२ कोटींची वाढ

सातारा येथील युनायटेड वेस्टर्न बँकेने सन १९७२ मध्ये अतिशय चांगली प्रगती केलेली असून ऑडिटपूर्व ताळेबंदानुसार दि. ३१ – १२ – १९७२ अखेर बँकेच्या ठेवीत रु. ४·३२ कोटींची वाढ होऊन त्या रु. २१·९० कोटीवर केलेल्या आहेत. ठेव वाढीप्रमाणे २५ टक्के पडते.

बँकेच्या वसूल भाग-भांडवलात सन १९७२ मध्ये रु. ५ लाखाची वाढ होऊन देखील बँकेच्या संचालक मंडळाने गेल्या वर्षाइतकेचे म्हणजे १० टक्के डिव्हिडंड देण्याची शिफारस केलेली आहे. बँकेचे वसूल भांडवल आता रु. ३८·१३ लाख झाले आहे.

ऑडिटपूर्व नफातोटा पत्रकानुसार बँकेच्या नफ्यातही वाढ झाली असून राखीव निधीकडे रु. २ लाख वर्ग केले आहेत. यामुळे आता राखीव निधी रु. १६·५० लाख झाला आहे बँकेच्या सेवकवर्गासही सन १९७२ करिता ८⅓ टक्के बोनस बँकेने जाहीर केला आहे.

सन १९७२ मध्ये बँकेच्या कर्जव्यवहारातही बरीच म्हणजे रु. २·५१ कोटींची वाढ होऊन तो वर्षअखेर रु. १३·२८ कोटीचेवर गेला आहे.

बँकेने सन १९७२ मध्ये विदर्भामध्ये नागपूर, अमरावती, अकोला, वर्धा, यवतमाळ, मलकापूर व खामगाव या ७ ठिकाणी आपल्या नवीन शाखा उघडल्या आणि वर्षअखेर तिच्या एकूण ६१ शाखा झालेल्या आहेत. आता विदर्भातील भंडारा व चंद्रपूर हे दोन जिल्हे सोडल्यास बँकेच्या महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत शाखा आहेत ही अभिमानाची बाब होय. या दोन जिल्ह्यांत देखील चालू साली शाखा उघडण्याचा बँकेचा विचार आहे.

सन १९७२ मधील बँकेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची वा अभिमानाची गोष्ट म्हणजे सातारा येथे बँकेच्या हेड-ऑफिसच्या नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन तिचे उद्घाटन भारताचे उपराष्ट्रपती, मा. डॉ. गोपाळस्वरूप पाठक यांच्या हस्ते व केंद्रीय अर्थमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली दि. ५ जानेवारी, १९७३ रोजी मोठ्या थाटात झाले.



बँकेच्या सन १९७२ मधील गौरवास्पद प्रगतीबद्दल सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत असून त्याबद्दल बँकेचे अध्यक्ष, संचालक व सेवकवर्ग यांचे अभिनंदन होत आहे.

---

### अर्ज करताक्षणी टेलिफोन : १९८६ पर्यंत थांबा

सध्या टेलिफोन मिळविण्यासाठी कित्येक वर्षे वाट पाहावी लागते; १९८६ नंतर कुणालाही अर्ज करताक्षणी टेलिफोन मिळू शकेल; 'वेटिंग लिस्ट'चे कारणच उरणार नाही, असे त्या खात्याच्या उपमंत्र्यांनी पणजी येथील आपल्या भाषणात सांगितले. तोपर्यंत सर्व टेलिफोन ऑटोमॅटिक एक्स्चेंजवर आलेले असतील.

---

इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

फोन : २३२ तार : IVwpijoay

☆ अर्थ ☆

बुधवार, ७ फेब्रुवारी, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## शेतीच्या उत्पादनात वाढ हीच आर्थिक प्रगतीची गुरुकिल्ली

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. कॉलिन क्लार्क ह्यांनी दिल्ली येथे भारताच्या आर्थिक विकासावर भाषण केले. ते म्हणाले की, सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न सोडविण्यासाठी शेतीच्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे हा एकच उपाय आहे. शेतीचे उत्पादन वाढले तर अन्नधान्याच्या किमती कमी होतील आणि त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या इतर क्षेत्रांत उत्पादन होणाऱ्या मालाच्या किमतीवरही परिणाम होईल व त्या उतरण्यास मदत होईल. अर्थातच उत्पादनाच्या खर्चात घट होईल. त्याचा परिणाम होऊन अर्थव्यवस्थेच्या औद्योगिक व सेवाविभागांची रोजगार उपलब्ध करून देण्याची पात्रताही वाढीस लागेल. शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी भारताने अधिक प्रमाणावर रासायनिक खतांचा वापर केला पाहिजे. रासायनिक खतांचे देशातील उत्पादन वाढविण्यात आले पाहिजे. परंतु पुरेशा प्रमाणात ते वाढत नाही तोपर्यंत रासायनिक खतांची आयात मोठ्या प्रमाणावर करण्यात यावी. देशाच्या परदेशीय चलनाच्या साठ्यावर कितीही ताण पडला तरी शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांची आयात करण्यात आलीच पाहिजे. भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीचा विभाग हा सर्वांत मोठा आहे, आणि म्हणूनच देशाच्या आर्थिक प्रगतीची किल्ली ह्या विभागाकडे योग्य लक्ष देण्यात गुंतलेली आहे. ह्या विभागातील उत्पादन वाढविण्यासाठी सरकारने निश्चित उपाययोजना आजपर्यंत केलेली नाही. अमेरिकेचे भारतामधील माजी वकील प्रा. गालब्रेथ ह्यांनी रासायनिक खताला दुसऱ्या प्रकारची पर्यायी जमीन म्हटले आहे, ते बरोबर आहे.

भारत सरकारने गरीब शेतकऱ्यांना अल्प किमतीत खताचा पुरवठा केला पाहिजे. ज्या ठिकाणी पाण्याचा अपुरा पुरवठा आहे अशा ठिकाणीही खते वापरण्यात आली तर पिकांचा संपूर्ण नाश टाळता येतो असा अनुभव आहे. देशातील ४० टक्के लोक दारिद्र्याच्या अगदी खालच्या पातळीवर आहेत. अशा लोकांत शेतमजुरांचा समावेश आहे. अशा भूमिहीन मजुरांना देण्यात येणारी किमान मजुरी ठरविण्यात आली पाहिजे. त्याशिवाय ज्यांना स्वतःच्या मालकीची जमीन नाही अशा शेतमजुरांत जमिनीची फेरवाटणी करण्यात आली पाहिजे. परंतु असे करण्यापूर्वी शेतमजुरांना शिक्षण देण्यात आले पाहिजे. मेक्सिको देशात त्यांना शिक्षण देण्याची दक्षता घेण्यात आली नाही. त्याचा परिणाम असा झाला की शेतीच्या उत्पादनात घट झाली. सहकारी शेतीच्या प्रयोगामुळे दुष्काळ पडण्याची भीती आहे. १९३३ साली रशियात सहकारी शेतीमुळे दुष्काळ पडला व १९६१ साली चीनमध्येही असाच अनुभव आला. तथापि ट्रॅक्टर्सचा वापर आणि पीकसंरक्षणासाठी करण्यात येणारे औषधांच्या फवाऱ्यांचे उपाय ह्या बाबतीत सहकार्य करण्यास हरकत नाही. परंतु शेतकऱ्यांना ह्या सोयी उपलब्ध करून देण्याचे कार्य खाजगी मालकीच्या संघटनांकडे सोपविण्यात यावे. ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या लोकांचा ओघ थांबविण्यासाठी ग्रामीण भागात उद्योगधंद्यांची पसरण करण्यात आली पाहिजे. ग्रामीण भागांतील लोकांना त्यांच्या घराजवळच रोजगार मिळू लागला तर शहराकडे येण्याच्या त्यांच्या प्रवृत्तीला हळूहळू आळा बसू लागेल. भारताच्या आर्थिक प्रगतीत सर्वांत मोठा अडथळा म्हणजे त्यावर राजकारणाची पडलेली असह्य छाया आहे.

## अमेरिकेच्या विमानदलाचे मर्यादित यश

व्हिएटनाममध्ये गेली काही वर्षे चाललेल्या युद्धाचा शेवट दृष्टिपथात आला आहे. ह्या युद्धात दक्षिण व्हिएटनामच्या लष्कराला अमेरिकेच्या विमानदलाने सतत व जोरदार पाठिंबा दिला होता. लंडनमधील लष्करी तज्ज्ञांनी अमेरिकन विमानदलाच्या कामगिरीचे मूल्यमापन केले आहे. ते म्हणतात की, दीर्घकाल चाललेल्या ह्या युद्धात अमेरिकन विमानदलाला कोठलाही निर्णायक विजय मिळविता आला नाही. पण कम्युनिस्ट लष्कराला विजय मिळू न देण्याचे कार्य मात्र विमानदलाने केले. शत्रूच्या पुरवठ्याच्या मार्गांची विमानदलाने जबरदस्त नासाडी केली. त्याला युद्धसाहित्य मिळण्यात अतिशय अडचणी निर्माण केल्या. शिवाय अत्यंत आणीबाणीच्या प्रसंगी कम्युनिस्ट लष्कराच्या बळालाही मर्मग्राही तडाखे लगावले. परंतु व्हिएटनाममधील युद्ध मुख्यतः गनिमी काव्याचे होते. लपूनछपून आलेल्या संधीचा फायदा घेण्यात गनिमी सैनिक तयार केलेले असतात. त्यांच्या हालचालींना केवळ विमानांच्या हल्ल्यांनी पायबंद घालणे अशक्यच होते. अमेरिकन विमानदलाला ह्या कामी यश आले नाही. शिवाय उत्तर व्हिएटनाममधील शहरवासी नागरिकांच्या मनोधैर्याला हादरा देण्याचेही विमानदलाला फारसे जमले नाही. ग्रामीण भागातील जनताही चिकाटीने लढतच राहिली. तथापि व्हिएटनाममधील जनता कडव्या लष्करी शिस्तीची होती म्हणूनच तिला हे जमले. अमेरिकेने आपले विमानदल मुक्त हस्ताने वापरले नसते तर दक्षिण व्हिएटनाम उत्तर व्हिएटनामच्या लष्कराने निश्चितपणे काबीज केला असता, ह्यात शंका घेण्याचे कारण नाही.

## शहरांतून उंच उंच इमारती न बांधण्याचा सल्ला

मुंबईसारख्या मोठ्या लोकवस्तीच्या शहरांतून राहाण्यासाठी जागा मिळणे दुरापास्त झाले आहे. इमारती बांधण्यासाठी जागा पुरेशी नाही. अशा स्थितीत २२–२३ मजल्यांच्या उंच इमारती बांधून बिऱ्हाडांच्या जागा उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न होत आहेत. ह्या प्रश्नासंबंधी विचार करण्यासाठी दिल्ली येथे आर्किटेक्ट, इंजिनिअर्स, शहरसंयोजक आणि बांधकामतज्ज्ञ ह्यांची एक परिषद भरविण्यात आली होती. परिषदेने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की मोठ्या शहरांतून गगनचुंबी उंच इमारती फार मोठ्या प्रमाणावर बांधणे योग्य होणार नाही. शहरांतील राहत्या जागांची टंचाई कमी करावयाची असेल तर चार ते पाच मजल्यांच्या इमारती बांधण्यास प्राधान्य देण्यात आले पाहिजे. कारण अशा इमारतींना लिफ्टसारख्या सोयीची गरज भासत नाही. कमी उत्पन्नाच्या गटांतील लोकांना राहाण्याच्या जागा देण्यासाठी प्रयत्न व्हावयास पाहिजेत. पण उंचउंच इमारती हे ह्या प्रश्नाचे उत्तर नाही. देशांतील बहुसंख्य लोक कमी उत्पन्न असणाऱ्या गटांतील आहेत. त्यांना राहाण्याच्या जागा तातडतोब उपलब्ध करून दिल्या नाहीत तर हा प्रश्न आवाक्याच्या बाहेर जाईल. सध्या मोठ्या शहरांतून खूप गर्दी झाली असून ती आणखी वाढतच चालली आहे. आणखी २५ ते ३० कोटी लोक मोठ्या शहरांत सामावून घेणे अशक्य आहे. त्यांची व्यवस्था करण्यासाठी स्वतंत्र नवीन शहरेच वसवावी लागतील.

## आहारात संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते

जपान ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनने एका आगळ्या विषयासंबंधी बोलपट घेऊन तो दूरचित्रवाणीवर दाखविण्याचे ठरविले आहे. हा बोलपट निरनिराळ्या देशांतील लोकांच्या आहाराविषयीचा असून त्याचे चित्रीकरण १२ देशांत करण्यात येणार आहे. कॉर्पोरेशनचे तीन तंत्रज्ञ भारतात येणार असून येथील आहारा-विषयी बोलपट तयार करतील. बोलपटाचे नाव 'भारत: मसाल्याची भूमि' असे ठेवण्यात येणार आहे. आहारात मसाल्याच्या पदार्थांचे स्थान काय आहे ते बोलपटात दाखविले जाईल. मसाला हा पदार्थ युरोपखंडात पैदा होऊ शकत नाही. काही वर्षांपूर्वीच्या शालेय पाठ्यपुस्तकांतून मसाल्यांच्या पदार्थांचा व्यापार करण्यासाठी युरोपिअन दर्यावर्दी भारतात येत असा मजकूर असे. त्यावरून युरोपच्या व आशिआच्या संस्कृतीत मसाल्याच्या पदार्थांमुळे परिवर्तन होऊ घातलेले दिसते. जपानचे कॉर्पोरेशन जो बोलपट तयार करणार आहे, त्यात माणसाच्या आहारात मसाल्याच्या पदार्थांमुळे कसा फरक होत गेला ते इतिहासदृष्ट्या दाखविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. अन्नाचा व संस्कृतीचा संबंध दाखविणाऱ्या बोलपटांच्या मालिकेंपैकी तो एक असेल. ह्या मालिकेतील बोलपटांचे चित्रीकरण आतापर्यंत फ्रान्स, स्वित्झरलंड, इंग्लंड, पश्चिम जर्मनी, इत्यादी देशांत झालेले आहे. लोकांची पाकनिष्पत्ती आणि आहाराच्या सवयी ह्यांत त्यांच्या संस्कृतीचे प्रतिबिंब दिसते असा बोलपट निर्मात्यांचा दावा आहे. भारतामध्ये घेण्यात येणाऱ्या बोलपटाचे काही चित्रण मुंबईत व काही कोचीन येथे करण्यात येणार आहे.

## एम. सी. एम. जाहिरात एजन्सी कंपनीची योजना

जाहिरात एजन्सीच्या क्षेत्रात मास कम्युनिकेशन अँड मार्केटिंग प्रायव्हेट लि. ह्या कंपनीने आता तिसरा अनुक्रम पटकाविला असून संपूर्णपणे भारतीय मालकीच्या कंपन्यांत ती पहिल्या अनुक्रमाची बनली आहे. तिचा वार्षिक धंदा २·५ कोटी रुपये झाला आहे. कंपनीच्या जाहिरातदारांची वार्षिक उलाढाल २,००० कोटी रु. आहे. कंपनीचे वसूल भागभांडवल सध्या फक्त ३·५ लक्ष रु. आहे, ते २२ लक्ष रु. करण्यात यावयाचे आहे. त्यांपैकी ९ लक्ष रु. चे भाग कंपनीच्या ४० वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्याची कंपनीची योजना आहे. हे भाग त्यांना खरीदता यावेत ह्यासाठी कंपनी त्यांना कर्ज देईल. जाहिरात एजन्सीचा धंदा करणाऱ्या कंपनीला एका महिन्याच्या उलाढाली इतका पैसा सहजी हाताशी असायला हवा, असे ह्या कंपनीचे चेअरमन, श्री. दिलीप एस. डहाणूकर ह्यांनी सांगितले.

## पंजाब नॅशनल बँक लि. औद्योगिक क्षेत्रात उतरणार

दि पंजाब नॅशनल बँक लि. च्या बॅंकिंगच्या धंद्याचे १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण झाले आणि तिच्या २ कोटी वसूल रुपयांच्या भागांचे पोटी तिला ८·७० कोटी रु. रोख्यांचे स्वरूपात आणि १·५ कोटी रोखीने भरपाई मिळाली. ह्या बँकिंग कंपनीच्या भागांची बाजारातील किंमत १९७२ मध्ये रु. २३ ते रु. ३० एवढी होती. राष्ट्रीयीकरणानंतर तिने ७,००० भागधारकांना प्रत्येक भागावर रु. ५·४० डिव्हिडंड दिले आहे. भागधारकांना देऊ केलेली रोख रक्कम भागांच्या बाजारभावापेक्षा जास्त आहे. ज्यांना रोख रक्कम हवी असेल त्यांचे भाग बँकिंग कंपनीच विकत घेईल. कंपनी केरळमध्ये खताचा कारखाना आणि इतर राज्यांत नायलॉन धाग्यांचा कारखाना व इलेक्ट्रिक आर्क फरनेस उभारणार आहे.

## बँकांचे 'सर्व्हिस चार्जेस'

एका मोठ्या बँकेने घरगुती वापराच्या उपकरणांच्या खरेदीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जाची जाहिरात वाचून एक शानदार पोशाख केलेला, सुशिक्षित दिसणारा, गृहस्थ बँकेत आला आणि त्याने रेफ्रिजरेटरसाठी कर्ज मागितले. बँकेच्या अधिकाऱ्याने कर्जाची योजना त्याला समजावून सांगितली आणि म्हटले, "कर्जावर १०% व्याज द्यावे लागेल. बँकेचे 'सर्व्हिस चार्जेस' २% होतील." त्या गृहस्थाने विचारले, "मी विकत घेणार असलेल्या रेफ्रिज-रेटरच्या सर्व्हिसिंगसाठी बँकेचा मेकॅनिक दर महिना येणार का दर पंधरा दिवसांनी येणार?" २% हा आकार कर्जखात्याच्या सर्व्हिसिंगचा आहे; कर्जदाराने घेतलेल्या उपकरणाच्या सर्व्हिसिंगचा नाही, हे त्याला पटवून देण्याला कितीतरी वेळ लागला.

# व्यवस्थापनातील समस्या (५)

## कुणाचा कुणाला मेळ नाही

लेखक : सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.

मे. फॅशन्स प्रा. लि. या विख्यात रेडिमेड वस्त्रांच्या कंपनीचे मॅ. डायरेक्टर एस्. नामदेव हे धंद्याच्या भवितव्याबाबत काळजीत पडले होते. श्री. नामदेव हे एक कसबी शिंपी होते. १९६८ साली त्यांनी परदेशात जाऊन तेथील गारमेंट फॅक्टरीज पाहून मोठ्या उत्साहाने फॅशन्स प्रा. लि. ही कंपनी काढली. भारतात तयार कपड्यांचा व्यवसाय वाढतच होता. शिलाईचे दर वाढत असल्याने गोरगरिबांना तयार कपडे परवडत होते. तसेच टेरिलिन, टेरिकॉट, या जातीच्या महाग कापडाचे उत्पादन वाढून त्यांनाही गिऱ्हाईक वाढते होते. मोठ्या शहरांतून आधुनिक पद्धतीचे तयार शर्टस्, पँटस् व तरुणींचे पाश्चात्य पद्धतीचे पोशाख, स्लॅक्स, स्कर्टस, वगैरेंना मागणी चांगली होती. फॅशन्स लि. ने दरवर्षी नवीन ब्रँडचे विविध प्रकारच्या कापडाचे रेडिमेड कपडे बाजारात आणले व ते चांगले पॅाप्युलर ठरले. श्री. नामदेव यांनी जर्मनीतून आधुनिक यंत्रे आणून कपड्यांचे उत्पादन व विविधता सतत वाढती ठेवली. जसजसा धंद्याचा व्याप वाढला तसतसा नोकरवर्ग, अधिकारी वर्गही वाढला. कंपनीचा नवीन कारखाना ठाण्यास स्थापण्यात आला. मुख्य कचेरी व सेल्स ऑफिस फोर्ट विभागातच ठेवण्यात आले. आयात केलेल्या मशिनरींसाठी कारखान्यावर निर्यातीचे बंधन सरकारने घातले. त्यासाठी श्री. नामदेवांना परदेशी बाजारपेठांचा अभ्यास व गिऱ्हाइकांशी बोलणी करण्यासाठी वारंवार परदेशी जावे लागले. सुदैवाने त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन त्यांना एक्स्पोर्ट ऑर्डर्सही चांगल्या मिळत गेल्या. भारतीय कापड व मजुरी स्वस्त असल्याने परदेशी बाजारपेठेत फॅशन्स कंपनीचे दर मंजूर होत. कपड्यांची फॅशन मात्र प्रत्येक ऑर्डरला गिऱ्हाइकांचे आवडीनुसार बदलावी लागे. त्यामुळे डिझाईन्स व प्रॉडक्शनसाठी लागणारे साचे, टेम्प्लेटस यासाठी कंपनीला बराच खर्च करावा लागे आणि या गोष्टी वेळेवर हाती न आल्यास उत्पादनाला विलंब होण्याची भीती असे.

१९७१ च्या जानेवारी महिन्यात श्री. नामदेव यांनी आपल्या सर्व अधिकाऱ्यांची एक संयुक्त बैठक प्रथमच बोलावली. एकमेकांच्या परस्परांबद्दल फार तक्रारी होत्या आणि त्यांचे निवारण करणे श्री. नामदेवांना आवश्यक वाटले. पण त्यांना स्वतःला उद्योगव्यवस्थापनाचा फारसा अनुभव नसल्याने व रोजच्या समस्या निराळ्या आढळत गेल्याने त्यांनी एका व्यवस्थापन सल्लागाराचा—श्री. मित्रा यांचा—सल्ला घेण्याचे ठरविले. परदेशात असे सल्लागार सर्रास नेमण्यात येतात असे श्री. नामदेवांच्या लक्षात आले होते. श्री. मित्रा यांच्या सांगण्यावरून त्या अधिकाऱ्यांच्या बैठकीतील संभाषण त्यांच्या नकळत टेप करून घेण्यात आले, त्याचा गोषवारा खाली दिला आहे.

श्री. थॉमस–प्रॉ. मॅनेजर : "सर, मला असे वाटू लागले आहे की माझ्यावर परत एखादी टेलरिंग फर्म काढण्याची पाळी येणार आहे. आपण मला आपला जुना विश्वासू कामगार म्हणून नव्या कंपनीत बढती देऊन प्रॉडक्शन मॅनेजर बनविले. परदेशी पाठवून आधुनिक तंत्र व यंत्र कसे वापरावे हे शिकण्याची संधी दिली. पण गेली २ वर्षे आपण घेतलेल्या देशी-व विदेशी ऑर्डर्स पुऱ्या करता करता माझी फजिती होत आहे. वर्षाचे बारा महिने व दिवसाचे बारा तास मी येथे असतो, पण माझे मलाच समाधान मिळत नाही.

आता हेच पाहा. येत्या उन्हाळ्यासाठी आपण जाळीदार 'आरपार' शर्ट काढणार आहोत. आपले सेल्स मॅनेजर सेलवाणी यांनी केवढ्या जाहिराती देऊन ठेवल्या आहेत, मी सर्व टेम्प्लेटस, पंचेस तयार ठेवले आहेत. तीन नवीन कटर्स नेमले आहेत पण त्यांना काम नाही म्हणून कंटाळून ते बहुधा पुन्हा कोठेतरी शिंपी म्हणून दुकाने थाटतील व अशी माणसे आपल्यास जाहिरात देऊनही लवकर मिळणार नाहीत. मी शर्ट शिवायचे म्हणून शेड्यूल ठरविले पण अजून मुख्य कापडाचाच पत्ता नाही. खरेदी खात्याने जेवढी सँपल्स आणली, त्यातले एकही आमच्या इन्स्पेक्शनला पास ठरत नाही. जे मिळते आहे त्याचेच शर्ट शिवा म्हणतात. म्हणजे, हे आरपार शर्ट कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे तुटतील. कोण हे शर्ट घेणार ? आपल्या सांगण्यावरून आजपयत आम्ही मालाचा दर्जा राखीत आलो आहोत पण यापुढे असाच दबाव येत राहिला व निकृष्ट माल वापरला तर कंपनीचे नाव राखणे निदान मला तरी जड जाईल. साधा शिलाईचा दोरासुद्धा एक दर्जाचा आम्हांला मिळत नाही. कच्ची शिलाई गिऱ्हाइकांच्या पसंतीस कशी उतरेल ? प्रॉडक्शन सुरू होण्याअगोदरच सेलवाणी काय माल आज पाठवणार याचा तगादा सुरू करतात आणि मग त्या घाईत स्वस्त मालाच्या खोक्यात महाग माल भरला गेला तर तपासायलाही आम्हांला फुरसत मिळत नाही. नियमित व पद्धतशीर काम कसे घ्यावे हेच कळत नाही.

परचेसचे श्री. खरीदकर व श्री. सेलवाणी यांना फोर्ट ऑफिसला फोन केला तर तास तास हे जागेवर नसतात. हेड ऑफिसकडून आमचा कोठलाच प्रॉब्लेम लवकर सुटत नाही. इथे ठाण्यात आम्ही जंगलात पडलो आहोत व बारीक सारीक गोष्टींसाठी आम्हांला मुंबईला माणूस पिटाळावा लागतो. परवाचीच गोष्ट, जकात नाक्यावर आलेला माल सोडवायला आमच्याकडे पैसे नव्हते धावपळ करून आम्हांला जकातीची रक्कम उभी करावी लागली तेव्हा प्रॉडक्शन चालू झाले. आम्हांला किमान महिनाभर चालेल एवढे मटेरियल स्टॉकमध्ये असल्याशिवाय मेल्सने कोणाला शब्द देऊ नये. आम्ही त्याला जबाबदार राहणार नाही."

श्री. सेलवाणी— "सर, आम्ही मार्केटमध्ये हिंडून ऑर्डर्स

मिळवायच्या की प्रॉडक्शन आपल्या हातात पुढल्या महिन्यात काय देईल याची वाट पहात बसायची ? असे केले तर आमचे आरपार शर्ट लोकांना पावसात अंग भिजवायला उपयोगी पडतील किंवा आणखी उशीर झाला तर थंडीत मच्छरदाणी म्हणून अंगावर घ्यायला होतील. गेल्या वर्षी थंडीत कॉटस्वूलचे शर्ट वेळेवर न आल्याने आमचा लाखाचा धंदा हातचा गेला. शिवाय आम्ही जो माल डीलरना देतो त्याचा किती परत हाती घ्यावा लागेल हे सांगता येत नाही. गेल्या वर्षी निळ्या शर्टना पिवळी कफबटणे लागली म्हणून आलेल्या तक्रारींना अजून उत्तरे पाठवीत आहे. जाहिरात, पॅकिंग, सेल्समनना ट्रेनिंग, ही कामे मला करताच येत नाहीत कारण प्रॉडक्शन वेळेवर सॅम्पल देत नाहीत. प्रॉडक्शन प्रोग्रॅमची आम्हांला खात्री देत नाहीत. काही वेळेला आम्ही डीलरकडून अॅडव्हान्स आणतो पण त्यांना मालच देत नाही. निदान १० डीलर्स तरी आम्ही यामुळे गमावून बसलो आहो. जोपर्यंत आपण निश्चित काय माल आम्हांला देणार हे अगोदर कळत नाही तोपर्यंत एक्स्पोर्ट धंदा वाढविणेही धोक्याचे आहे असे वाटते. एक्स्पोर्टच्या नादाने आपण किती सॅंपल्स तयार केली आणि प्रत्यक्ष एक्स्पोर्ट किती झाला याची आकडेवारी पाहण्यासारखी आहे. आपले बरेचसे एक्स्पोर्ट मार्केट आपण तिथल्या बदलत्या फॅशनशी स्पर्धेत मागे पडल्याने गेले आहे. ”

“भारतात वाढत्या करामुळे महाग रेडिमेड कपडे घेणारे अपेक्षेप्रमाणे वाढत नाहीत. आपण कॉटनचे स्वस्त कपडे काढले तर मला वाटते वर्षभर चांगला सेल मिळेल. नायलॉन, टेरिलिन यांच्या रिजेक्शनमुळे आपले फार नुकसान होते. आपले कामगार अडाणी आहेत. बरेच वेळा चुकीने मशीन चालवून माल बिघडवतात व तो चिंधीच्या भावाने विकणे मला फार वाईट वाटते. एक निश्चित पॉलिसी ठरविण्याची वेळ आली आहे. माझे डीलर्स कंपनीवर नाराज होऊ लागले आहेत. मे. स्टाईल लि. आपले मार्केट मारीत आहे याची मला जाणीव असूनही हातात माल नसल्याने मला गप्प बसावे लागते. श्री. खरीदकरांनी जलद पावले उचलून कच्च्या मालाची व्यवस्था केली नाही तर हा पसारा संभाळणे जड जाईल. ”

श्री. खरीदकर– “ सर, मला श्री. थॉमस व श्री. सेलवाणींच्या अडचणींची पूर्ण कल्पना आहे. माझे प्रयत्नही चालू आहेत. पण ते पैशाच्या अभावी जरा तोकडे पडत आहेत. टेरिलिन, टेरिकॉट कापडांना बाजारात खूप मागणी आहे व मिलच्या दुकानांतून तसेच व्यापाऱ्यांकडून त्याची विक्री जोरात असते. तेव्हा आपल्याला उधारीवर व एकदम नवीन डिझाईनचे कापड देण्यास मिलवाले तयार नसतात. मुंबईच्या मिलमध्ये तर उशिरा बिले देण्याबाबत आपण इतके प्रसिद्ध आहोत की आपल्यासाठी स्वतंत्र कापड काढायला किंवा रंगवायला कोणीच तयार नाही. दरही जास्त सांगतात. त्यामुळे मला कलकत्ता, कोईमतूर, अमदाबाद, येथे सारखे फिरावे लागते सेलवाणींपेक्षा माझा प्रवासखर्च गेल्या वर्षी जास्त झाला असेल. पण काय करू ? कारखाना चालू ठेवण्यासाठी काही वेळा आम्ही दुसरीकडचा साधारण नमुन्याप्रमाणे माल आणू पाहतो तर थॉमसना १००% नमुन्याशी जुळेल असाच माल हवा. प्रत्येक मिलचा रंग सुद्धा सारखाच असत नाही. तसेच मालाचे इंडेंट काढताना नक्की किती मीटर कापड लागेल याचा अंदाज नसतो. गेल्या वर्षी हजार शर्ट तयार झाले पण खिशांना कापड कमी पडले व तसेच कापड पुन्हा मिळेना. आमची काय परिस्थिती झाली असेच आम्हालाच माहीत.”

“ जेव्हा मी घरी असतो तेव्हा रात्रीबेरात्री सप्लायर्सचे फोन येतात. बिले देणे माझ्या हातात नसूनही ते ऐकत नाहीत. उद्या आम्हांला त्यांच्याचकडून माल आणायचा असल्याने फोन बंदही करता येत नाही. माझ्या बायकोने तर फोनची धास्ती घेतली आहे. वेळीअवेळी लांबलांबचे लोक फोन करतात तेव्हा तिला हातातील काम सोडून फोन घ्यावा लागतो व भाषेची अडचण असल्याने लोक काय सांगतात ते निरोपही धड घेता येत नाहीत. माझ्या घरचा फोन कंपनीने काढून टाकावा अशी माझी विनंती आहे. ”

श्री. तिजोरीवाला, अकौंटंट– “ सर, आपण ज्या तऱ्हेने धंदा वाढवीत आहोत त्याला भांडवल फार कमी पडते आहे. आपली वसुली चार-चार महिन्यांतही होत नाही आणि सप्लायर्स मात्र महिना दीडमहिन्यात वसुलीला उभे राहतात. नवी मशिनरी आयात करण्यात आपल्याला बरेच कर्ज झालेले आहे आणि त्यामुळे व्याज व हप्ते यांची देणी वेळेवर भागवणे जड होत आहे. आपण काय विकणार व त्यात भाव ठरवताना किती नफा मिळवू शकणार याचे गणित एकदा नक्की करून द्या, नाहीतर खर्च वाढतो आहे आणि जमा दिसत नाही. आता आपले कर्जही थोडे मर्यादेपलीकडे वाढत आहे. सर्वांनी याचे भान ठेवून आपल्या खर्चाचे कार्यक्रम आखावे म्हणून हे सर्व मला सांगावे लागले. असेच व्यवहार चालले तर माझ्या तिजोरीत रोख रकमेऐवजी सप्लायरची बिले व नोटीसाच मला सांभाळाव्या लागतील ”

श्री. मित्रांनी टेपरेकॉर्डर बंद केला व ते श्री. नामदेवांशी चर्चा करू लागले. त्यांनी श्री. नामदेवांना काय सांगितले असावे ?

---

### अमेरिकेला आशिआई डॉक्टरांचा पुरवठा

१९७० मध्ये १३,३०० परदेशी शास्त्रज्ञ, डॉक्टर्स आणि इंजिनिअर्स ह्यांना अमेरिकेत घेण्यात आले. १९६९ चे मानाने ही संख्या २०% ने अधिक आहे तर १९६५ च्या मानाने अडीच पट आहे. अमेरिकेत दरसाल सुमारे ३,००० परदेशी डॉक्टर्स रोजगारासाठी जातात. १९७२ मध्ये भारतामधून १,५१३ डॉक्टर्स गेले; त्या खालोखाल ७८२ डॉक्टर्स फिलिपाइन्स-मधून गेले.

## उष्णोदकाच्या झऱ्यांपासून विजेची निर्मिती

दिल्ली विद्यापीठाने हिमालयाची 'भूस्तर रचना' ह्या विषया संबंधी परिसंवाद भरविला होता. ह्या परिसंवादात भाग घेण्यासाठी पृथ्वीच्या पोटातील उष्णतेचा अभ्यास करणारे अनेक तज्ज्ञ आले होते. हे तज्ज्ञ आणि संयुक्त राष्ट्र संघटनेचे एतद्विषयक तज्ज्ञ ह्यांच्या साह्याने उष्णोदकाचे झरे असलेल्या जागी विजेची निर्मिती करण्याच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यात आला. उष्णोदकाचे झरे असलेली ठिकाणे सध्या मुख्यतः आरोग्य-स्नानासाठी वापरण्यात येतात. तथापि, त्यांचे अस्तित्व पृथ्वीच्या आतील थरात असणारी उष्णता दर्शविते ह्यात शंका नाही. दिल्ली येथे जमलेल्या तज्ज्ञांनी अशी माहिती सांगितली की इतर काही देशांनी ह्या उष्णतेचा उपयोग करून वीज निर्माण करण्याचे तंत्र अवगत केले असून काही देशात तर दरसाल ४०० मेगॅवॅट वीज उष्णोदकाच्या झऱ्यांच्या जागी खोल असणाऱ्या उष्णतेचा उपयोग करून निर्माण करण्यात येत आहे. भारतात शक्तीच्या ह्या उगमाचा अद्याप फारसा विचारच करण्यात आलेला नाही. हिंदमध्ये अशा प्रकारचे उष्णोदकाचे झरे सुमारे ७० ठिकाणी आढळून येतात. त्यांपैकी ४० ठिकाणे हिमालयाच्या आसमंतात आहेत. बाकीची देशभर विखुरलेली आहेत. अर्थात ह्या सर्वच झऱ्यांच्या जागी वीज उत्पन्न करता येईल असे नाही. तज्ज्ञांच्या मताने हिमालयाच्या आसमंतातील उष्ण झऱ्यांपैकी ८५ टक्के ठिकाणी अशी वीज निर्माण करता येईल. इतर ठिकाणांपैकी ६५ टक्के ठिकाणेच ह्या कामासाठी योग्य आहेत. ३७ अंश सेंटिग्रेड उष्णतामान असेल तर त्या झऱ्याला उष्णोदकाचा झरा म्हणतात.

---

## संस्कारित अन्नपदार्थांची मागणी घटली

महाराष्ट्र ॲग्रो-इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कसबेकर ह्यांनी नागपूर येथील संत्रा बागाइत संघाने चालविलेल्या कारखान्याला भेट दिली. हा कारखाना नादारीत निघालेला असून तो चालविण्यासाठी कॉर्पोरेशनने ताब्यात घेतला आहे. भेटीच्या वेळी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, संस्कारित अन्नपदार्थांची बाजारपेठ एकंदरीने संकुचित होत चालली आहे. गिऱ्हाइकांकडून येणारी मागणी घटत चालल्यामुळे डबाबंद अन्नपदार्थ तयार करणारे अनेक कारखाने बंद पडले आहेत अगर बंद पडण्याच्या बेतात आहेत. सध्या देशात सर्वत्रच अर्थव्यवस्था मंदावली असल्याने ग्राहकांकडून संस्कारित अन्नपदार्थांना यावी तशी मागणी येत नाही. तथापि कॉर्पोरेशनचा कारभार समाधानकारक चालला आहे. रशियाकडून व अमेरिकेकडून १४० टन आंब्यांच्या पदार्थांची मागणी आली होती. आंब्यांच्या गेल्या हंगामात कॉर्पोरेशनने ३६० टन आंब्यांचे संस्कारित पदार्थ तयार केले. आंब्यांप्रमाणेच संत्र्यांच्या बाबतींतही समाधानकारक उत्पादन होत आहे. संस्कारित अन्नपदार्थांची अधिक चांगली जाहिरात करणे आवश्यक असून कॉर्पोरेशन आता ह्या बाबीकडे विशेष लक्ष पुरविणार आहे. श्री. कसबेकर ह्यांनी बाजारपेठेत आलेल्या मंदीचे अधिक विश्लेषण केलेले नाही. परंतु ते सहज सुचण्यासारखे आहे. संस्कारित अन्नपदार्थांची मागणी मुख्यतः शहरांतील लोकांकडून येत असते. गेल्या काही महिन्यातील महागाईने त्रस्त झालेले शहरातील लोक आपल्या जवळील पैसा अधिक तातडीच्या गरजांवर खर्च करू लागलेले आहेत.

---

## आरोग्यप्रद भौतिक परिस्थितीचा फायदा फार थोड्यांना

भारत सरकारच्या शास्त्र व तंत्र खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् ह्यांनी दिल्ली येथे स्वच्छ व आरोग्यप्रद भौतिक परिस्थितीविषयीच्या एका परिसंवादाचे उद्घाटन केले. त्या वेळी उद्घाटनाचे भाषण करताना ते म्हणाले की, भारतामधील शहरांतून राहणाऱ्या लोकसंख्येपैकी अवघ्या एकतृतीयांश लोकांना सांडपाण्याच्या निचऱ्याच्या म्हणजेच ड्रेनेजच्या सोयी उपलब्ध आहेत. एकूण लोकसंख्येपैकी ७ टक्के लोकांनाच ह्या आरोग्यप्रद सोयीचा फायदा मिळतो, असा ह्याचा अर्थ आहे. देशातील लोकांपैकी ३० टक्के लोकांना पाण्याच्या तीव्र टंचाईला अजूनही तोंड द्यावे लागत आहे. पाण्याची टंचाई तर आहेच पण त्याचा दर्जाही समाधानकारक नसतो. भारतात सध्या अनेक ठिकाणी भूभौतिक परिस्थिती निकृष्ट दर्जाची दिसून येते. त्याला कारण मनुष्य स्वभावातील दोष आणि कारभारविषयक अनास्था ही आहेत. ही परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न सरकार आपल्याकडून करीत आहे. परंतु अखेर लोकांनी सक्रिय सहकार्य दिले तरच सुधारणा घडवून आणता येणे शक्य होईल. सरकार पाण्याच्या प्रदूषणाबद्दलचा कायदा करीत आहे. त्याचप्रमाणे उद्योगधंद्यांना परवाने देताना त्यांनी प्रदूषण टाळण्याची काय सोय केली आहे ह्याची चौकशी करण्यात येते. त्याबाबतच्या उपायांचा आग्रह धरण्यात येतो. तरीही कानपूरमधून वाहणारी गंगा, असनसोल—दुर्गापूर भागातून वाहणारी दामोदर नदी आणि कलकत्त्यामधील हुगळी ह्या नद्यांतून काठावरील गावांतील सांडपाणी आणि कारखान्यांतील दूषित पाणी मोठ्या प्रमाणावर सोडण्यात येत असतेच.

---

## माणिकशांच्या बॅटनसाठी तयारी

फील्ड मार्शल सॅम माणिकशा ह्यांच्यासाठी सुयोग्य बॅटन (छडी) तयार करण्यात लष्करी खाते गुंतले आहे; ग्रेट ब्रिटन, फ्रान्स इत्यादी देशांकडून नमुने मागविण्यात आले आहेत. भारताच्या पहिल्या फील्ड मार्शलचे बॅटन त्याच्या दर्जाला शोभेल अशा आकाराचे आणि रूपाचे बनविण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. ग्रेटब्रिटनच्या फील्ड मार्शलच्या बॅटनला सुमारे २० हजार रुपये खर्च येतो.

# खोट्या नाण्यांचीच चलती

लेखक : गि. के. पंडित, एम. ए., एलएल. बी., ए. सी. एस.

अर्थशास्त्रामध्ये ग्रॅशॅमचा कायदा सुविख्यात आहे. Bad coins throw good coins out of circulation. वद्चाल खोटे नाणे किंवा बनावट नोट आपल्याजवळ आल्यास काहीही करून ती आपण खपविण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे खोटी नाणी व्यवहारात उपयोगात येऊ लागतात व त्याबदली चांगली नाणी पडून राहातात.

उद्योगधंद्यामध्ये किंवा व्यवसायामध्येसुद्धा व्यक्तींच्या बाबतीत हाच कायदा अनुभवास येतो. प्रामाणिकपणाने व निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्ती अप्रामाणिक व निष्ठाहीन व्यक्तींच्या मार्गात आल्यास त्या चांगल्या व्यक्ती नकोशा होतात व काहीही करून त्यांची उचलबांगडी केली जाते.

एका मोठ्या कन्स्ट्रक्शन कंपनीत 'क्ष' हा सुपरवायझिंग एंजिनीअर म्हणून काम करत होता. 'क्ष' हा अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू अशा वृत्तीचा होता. पण त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांत काम चुकवणारे व खोटेपणाने वागणारेच अधिक होते. कामगारांची खोटी हजेरी ठेवणे, ओव्हरटाईम कामाचा हिशेब ठेवताना कामाचे तास वाढवून ते पैसे वाटून घेणे, रात्रपाळीमध्ये झोपा काढणे इत्यादी प्रकार सर्रास चालू असत. 'क्ष' ने कामाचा ताबा घेण्यापूर्वी जे इंजिनिअर होते त्यांनी स्वतःचा बंगला बांधला, गाडी घेतली व नंतर स्वतंत्र धंदा काढण्याच्या निमित्ताने नोकरी सोडली व त्यांच्या जागी 'क्ष' आला. आपल्या हाताखालील लोकांची लबाडी व खोटेपणाचे वर्तन पाहून 'क्ष' ला चीड आली व हे सर्व प्रकार बंद करून कंपनीच्या पैशाचा दुरुपयोग थांबवावा या हेतूने त्याने सर्व प्रयत्न केले. रात्रपाळीस तो स्वतः जाऊ लागला तेव्हा बाकीचे लोक त्याला 'साहेब, तुम्ही कशाला जागत बसता, आम्ही सगळं बघतो. तुम्ही निवांत झोपा' असे सांगू लागले व पूर्वीचे साहेब रात्री फक्त एकदा येऊन जात तसेच करा, असा सल्ला देऊ लागले. पण 'क्ष' ने आपली वृत्ती बदलली नाही; त्यामुळे रात्रपाळीची खोटी हजेरी, काम न करता झोपणे इत्यादी गैरप्रकारांस सोकावलेल्या नोकरांस 'क्ष' च्या कर्तव्यतत्परतेचा अनिवार त्रास होऊ लागला व तो त्यांच्या डोळ्यांत सलू लागला. त्याला कामाला सहकार्य द्यावयाचे नाही; उलट, कामात घोटाळे करून ठेवावयाचे, नसत्या अडचणी धोकत बसावयाचे, यामुळे काम रेंगाळू लागले. त्यामुळे मुख्य एंजिनीयरनी 'क्ष' ला जाब विचारल्यावर 'क्ष' ने सर्व सत्य परिस्थिती साहेबास सांगितली, पण कोणत्याही परिस्थितीत काम वेळेवर झालेच पाहिजे असे साहेबांनी ठणकावले व 'तुम्हास जबाबदार धरले जाईल' असे बजावले. 'क्ष' च्या स्वाभिमानी वृत्तीस ते न मानवून त्यांनी राजीनामा दिला व लागलीच त्यांच्या जागी दुसरा एंजिनीयर आला. तो अप्रामाणिक, स्वतःच्या पोळीवर तूप ओढून घेणारा असल्याने त्याच्या हाताखालचे लोक खूष राहिले व कंपनीचे काम 'पहिल्यासारखे' चालू झाले व मुख्य एंजिनीयरना आपल्याला योग्य मनुष्य मिळाल्याचे समाधान लाभले व त्यास स्पेशल प्रमोशन दिले.

सामान्यतः सगळीकडे हा ग्रॅशमचा कायदा दिसून त्यास सर्वव्यापी स्वरूप प्राप्त झालेले दिसेल. खोट्या नाण्यांचीच चलती !

---

## बँकेला फसविण्याच्या आरोपावरून दोघांना अटक

मुंबईच्या पोलिसांनी एका खासगी कोचिंग क्लासचे व्हिजिटिंग लेक्चरर डॉ. गजानन मंगेश रेगे आणि करिअर फिल्म्स अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटचे 'भागीदार' श्री. सुदर्शनकुमार लुथ्रा ह्यांना बतावणी करून फसवणूक केल्याच्या आरोपावर अटक केली. त्यांची प्रत्येकी ५,००० रु. जामिनावर सुटका झाली आहे.

— डॉ. रेगे ह्यांनी बँक ऑफ इंडियाच्या हिंद राजस्थान बिल्डिंग मधील शाखेत चालू खाते "कांत माधव, असोसिएटेड सिने-इक्विपमेंट कंपनी ऑफ पूना" ह्या नावाने उघडले. श्री. लुथ्रा ह्यांनी वरील फर्मकडून सिनेमाची काही उपकरणे खरीदण्यासाठी मागितलेल्या कर्जाच्या पोटी सिंडिकेट बँकेने 'अॅडव्हान्स' म्हणून २५,११६ रु. ची पे ऑर्डर दिली. पुण्याच्या ह्या 'फर्म'ची मुंबई येथे कचेरी नाही आणि ह्या 'फर्म'ने दिलेला पत्ता ज्या एका व्यापारी कंपनीचे श्री. लुथ्रा हे भागीदार होते, अशा कंपनीचा पत्ताच 'फर्म'ने बँकेस दिलेला होता असे बँक ऑफ इंडियाचे एजंट श्री. एन. के. भाटिया ह्यांना आढळून आले. त्यांनी "कांत माधव"ला स्वतः तोच असल्याचे सिद्ध करण्यास सांगितले. एवढ्यात एजंटाने पोलिसांना बोलाविले आणि डॉ. रेगे व श्री. लुथ्रा ह्यांना अटक झाली.

---

## पाच वर्षे तुरुंगवास भोगल्यानंतर बँक कर्मचारी निर्दोषी ठरला: नोकरीवर परत रुजू होण्याची वाट पाहात आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वर्धा शाखेमध्ये श्री. जे. पी. मोकाशे हे काम करीत होते. फेब्रुवारी, १९६७ मध्ये एक बनावट ड्रॅफ्ट करून त्याचे पैसे घेतल्याच्या आरोपावरून त्यांना ५ वर्षे तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. परंतु मुंबई हायकोर्टाने त्यांचेवरील कोणताच आरोप सिद्ध होत नाही असे ठरविले. दरम्यान श्री. मोकाशे ह्यांची ५ वर्षांची शिक्षा भोगूनही झाली होती ! स्टेट बँकेत पुनः दाखल केले जाण्याची आणि बुडालेली बढती मिळण्याची ते आता वाट पहात आहेत. स्वतःला आणि कुटुंबीयांना झालेल्या मानसिक यातनांबद्दल भरपाई मागण्याचा त्यांचा विचार आहे. त्यांच्या मुक्ततेसाठी त्यांच्या कुटुंबीयांनी एकूण १२,००० रुपये खर्च केले. वकील फी व कोर्ट खर्च ह्यास ७,००० रुपये लागले आणि ५,०००. रु वर्धा येथील पोलिसांकडे फौजदारी केस काढून घेतली जाईल, ह्या कल्पनेने भरले होते. ही रक्कम परत मिळण्याची श्री. मोकाशे ह्यांना आशा वाटत आहे. श्री. मोकाशे ह्यांचे वडील सेवानिवृत्त शिक्षक आहेत

## उंचीची ठेंगूपणावर मात

अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत, फार थोडे अपवाद वगळता, दोघांपैकी उंच असलेला उमेदवारच गेल्या ७० वर्षांत निवडून आलेला आहे. उंच लोकांना झाडांच्या फांद्यांखालून कधीकधी वाकून जावे लागते किंवा लहान मोटारीत गैरसोयीने बसावे लागते, पण व्यवहारी जगात तेच यशस्वी होतात. पिट्सबर्ग विद्यापीठाच्या पाहणीप्रमाणे, उद्योगधंद्यात प्रवेश मिळणाऱ्या ठेंगण्या उमेदवारांपेक्षा उंच उमेदवारांना प्रारंभीचा पगार १२·४% जास्त मिळतो. उद्योगधंद्याच्या जगात अँन्ड्र्यू कार्नेजीसारखा यशस्वी ठेंगू विरळाच. ठेंगू तरुणांना प्रियाराधनातही मागे पडावे लागते. ठेंगू मुलीही उंच तरुणच पसंत करतात. चित्रपटातील नायकही क्वचितच ठेंगू असतो. क्रीडाक्षेत्रात उंचीचे महत्त्व स्वयंसिद्धच आहे. जॉकी मात्र ठेंगू असतात, पण रेसमध्ये जॉकीपेक्षा घोड्याचेच महत्त्व अधिक असते!

चालू शतकातील अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत उंचीने ठेंगूपणावर कशी मात केली, हे खालील तक्ता दर्शवितो :—

| यशस्वी | | अयशस्वी | |
|---|---|---|---|
| १९०४ थिओडर रूझवेल्ट | ५′१०″ | पार्कर | ५′९″ |
| १९०८ टाफ्ट | ५′१०½″ | ब्रायन | ५′१०″ |
| १९१२ वुड्रो विल्सन | ५′११″ | टाफ्ट | ५′१०½″ |
| १९१६ वुड्रो विल्सन | ५′११″ | ह्यूजेस | ५′१०″ |
| १९२० हार्डिंज | ६′ | कॉक्स | ५′१०½″ |
| १९२४ कूलिज | ५′१०″ | डेव्हिस | ५′११″ |
| १९२८ हूवर | ६′ | स्मिथ | ५′११″ |
| १९३२ फ्रॅंकलिन रूझवेल्ट | ६′२″ | हूवर | ६′ |
| १९३६ फ्रॅंकलिन रूझवेल्ट | ६′२″ | लँडन | ५′११″ |
| १९४० फ्रॅंकलिन रूझवेल्ट | ६′२″ | विल्की | ६′२½″ |
| १९४४ फ्रॅंकलिन रूझवेल्ट | ६′२″ | ड्युई | ५′८″ |
| १९४८ ट्रूमन | ६′९″ | ड्युई | ५′८″ |
| १९५२ आयसेनहॉवर | ५′१०½″ | स्टीव्हनसन | ५′१०″ |
| १९५६ आयसेनहॉवर | ५′१०½″ | स्टीव्हनसन | ५′१०″ |
| १९६० केनेडी | ६′ | निक्सन | ६′ |
| १९६४ जॉन्सन | ६′२″ | गोल्डवॉटर | ५′११″ |
| १९६८ निक्सन | ६′ | हंफ्रे | ५′११″ |
| १९७२ निक्सन | ६′ | मॅकगव्हर्न | ६′ |

" तुम्ही अयशस्वी, तर मीही अपेशी "— आपले काम व्यवस्थितपणे आणि कार्यक्षमतेने करण्याचे आवाहन अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी बँक कर्मचाऱ्यांना युनायटेड बँक ऑफ इंडियाच्या कलकत्ता येथील अठरा मजली इमारतीचे उद्‌घाटन करतेवेळी केले. 'तुम्ही तसे करण्यात कसूर केली तर मीही अयशस्वी ठरेन,' असे ते म्हणाले.

## ऑस्ट्रेलिआला अवर्षणाचा मोठा तडाखा

ऑस्ट्रेलिआच्या पूर्व भागाला अवर्षणाचा मोठा तडाखा बसला आहे. त्यातल्या त्यात व्हिक्टोरिआ राज्यात त्याची तीव्रता विशेषच आहे. इतिहासकालात ह्या राज्यात इतकी कोरडी हवा कधीही पडलेली नाही. उत्तरेकडच्या न्यूसाऊथ वेल्स राज्यात अनेक विस्तृत भागांत पाण्याचा मागमूसही आढळत नाही. क्वीन्सलँड राज्यातही अशीच परिस्थिती आहे. गेल्या डिसेंबर अखेरपर्यंत मेलबोर्न भागाला १० महिन्यांच्या कडक उन्हाळ्याला तोंड द्यावे लागत होते. १८५५ पासून ह्या भागातील पावसाची नोंदणी करण्यात आलेली आहे. गेल्या काही वर्षी ह्या भागात अवघा ११ इंच पाऊस पडला. नेहमीपेक्षा हे प्रमाण निम्म्याने कमी आहे.

## बैलादिला लोखंडाच्या खाणीपासून परदेशीय चलन

मध्यप्रदेशातील रायपूर विभागात बस्तर जिल्ह्यात बैलादिला लोखंडाच्या खाणी आहेत. यांत्रिक अवजारांच्या साह्याने लोहखनिजाचे उत्पादन करणाऱ्या आशिआखंडातील ह्या सर्वात मोठ्या खाणी आहेत. १९६८ साली ह्या खाणीतून लोहखनिज बाहेर काढण्यास प्रारंभ झाला. तेव्हापासून गेल्या डिसेंबरपर्यंत लोहखनिजाच्या निर्यातीने भारताला १०६·८ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळवून दिले आहे. परदेशीय चलन मिळविण्याच्या बाबतीत भारतामधील सर्व खाणींत ह्या खाणी अग्रेसर आहेत. १९६८ पासून डिसेंबर १९७२ पर्यंत एकूण १५२·४७ लाख टन लोहखनिज काढण्यात आले. त्यापैकी १५१·२१ लाख टन खनिज जपानला पाठविण्यात आले.

## नपुसक तरुणांची संख्या वाढत आहे?

स्त्रिया पुरुषांची बरोबरी करायला लागल्या आहेत, इतकेच नव्हे तर त्या पुरुषांवर मात करू पाहात आहेत, त्यामुळे तरुणांत नपुसकत्व वाढत आहे. एकीकडे पुरुष कमजोर होऊ लागले असताना स्त्रियांची लैंगिक भूक वाढू लागली आहे. ही भूक गर्भ राहण्याच्या भीतीमुळे पूर्वी मर्यादित असे, ती भीती संतति-प्रतिबंधक साधनांनी आणि गोळ्यांनी नाहीशी केली आहे. पैसे कमविण्याच्या स्पर्धेमुळे नैसर्गिक पात्रतेच्या आवाक्याबाहेरची उद्दिष्टे गाठण्याचा प्रयत्न पुरुष करू लागले आहेत. ही उद्दिष्टे गाठता आली नाहीत म्हणजेही पुरुष नपुसक होऊ लागतो — मानसिक आणि शारीरिक ताणामुळे रोमान्ससाठी त्राणच उरत नाही. खऱ्या किंवा काल्पनिक अपयशाचे नपुसकत्व हे निदर्शक आहे. 'मेडिकल अॅस्पेक्टस ऑफ ह्यूमन सेक्सच्युॲलिटी' ह्या मासिकाने घेतलेल्या पाहणीचा हा निष्कर्ष आहे. परंतु एका तज्ज्ञाच्या मते, 'ही समस्या पूर्वीपेक्षा बिकट झालेली नाही; जागृतीमुळे मानसोपचार तज्ज्ञांकडील वर्दळ वाढली आहे, एवढेच.'

## बँकिंगच्या आघाडीवर असमाधानाचे वातावरण

गेले वर्ष बँकिंगच्या दृष्टीने असमाधानकारक गेले, असेच म्हणावे लागेल. कारण, ठेवी त्याचप्रमाणे कर्ज आणि शाखा ह्या सर्वांच्याच वाढीची गती मंदावली. प्राधान्याच्या आणि दुर्लक्षित विभागांची कर्जे ही डोकेदुखीचीच बाब कायम राहिली. लीड बँकयोजनेची प्रगती कासवाच्या गतीने चालू आहे.

१९७२ मध्ये कर्जात ३४५ कोटी रु. नी वाढ झाली; १९७१ मध्ये ५९९ कोटी रु. नी वाढ झाली होती, १९७० मध्ये ८६१ कोटी रु. नी वाढ झाली होती. कर्जपुरवठ्याची गती १९७१ मधील १३.५% वरून १२७२ मध्ये ६.९% वर आली. १९७२ मधील ठेवीतील वाढीपैकी बँका फक्त एक चतुर्थांश रकमेचाच उपकारक वापर करू शकल्या; १९७१ मध्ये ते प्रमाण एक द्वितीयांश होते. कर्जाचे ठेवींशी प्रमाण ७२.८% वरून ६६.३% वर खाली उतरले. मोठे कारखाने नवीन उपक्रम फारसे हाती घेत नाहीत; बिगर-बँकिंग क्षेत्रातून ठेवी घेण्याकडे त्यांची प्रवृत्ती वाढत आहे. राष्ट्रीयीकृत बँकांच्या भागधारकांना मिळालेल्या भरपाईचा पैसा ह्या कारखान्यांकडेच गेलेला आहे. कारखानदार कमीत कमी भांडवल वापरण्याची नवी 'तंत्रे वापरू लागले आहेत. बँका एकमेकांशी स्पर्धा करून कर्जदारांना कमी व्याजाचे आणि जास्त सोयींचे आकर्षण दाखवीत आहेत.

शेतीला दिलेल्या कर्जात वाढ झालेली नाही; अशा कर्जदारांची संख्या २ लाखांनी कमी झाली आहे. लघुउद्योगाला दिलेली कर्जेही घटली आहेत; त्या कर्जदारांची संख्या मात्र ३४,००० नी वाढली आहे. स्वतःच्याच मालकीचे व्यवसाय करणारांना दिलेल्या कर्जात वाढ झालेली दिसते; किरकोळ व्यापाऱ्यांना दिलेली कर्जेही वाढली आहेत. शेतीला दिलेल्या कर्जांच्या परतफेडीचा प्रश्न बिकट होत चालला आहे. चालू वर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे तो अधिकच बिकट होण्याचा संभव आहे.

१९७१ च्या मानाने १९७२ साली ठेवीतील वाढीची गती थोडी मंदावली आहे, त्याचे कारण स्वतःजवळील पैसा उपयुक्त मार्गाने वापरण्यात येत नसल्यामुळे ठेवींच्या वाढीचे प्रयत्न पूर्वीप्रमाणे झाले नाहीत. ठेवी ठेवणाऱ्या मध्यम वर्गाची कुवत महागाईमुळे कमी झाली आहे. बँकांची सरकारी रोख्यातील गुंतवणूक आपोआपच वाढली आहे, कारण शिल्लक पैसा व्याजी लावायलाच हवा.

१९७१ मध्ये बँकांनी १,८०१ शाखा उघडल्या होत्या; १९७० मध्ये तर २,१४१ शाखा उघडल्या होत्या १९७२ च्या पहिल्या सहामाहीत फक्त ६३५ शाखा उघडल्या होत्या.

---

## कसोटी सामना आणि नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक

नॅशनल अँड ग्रिंडलेज बँकेने आपल्या ठाणे शाखेसमोर एक स्कोअरबोर्ड उभा करून त्यावर कसोटी सामन्याची ताजी परिस्थिती दाखविणारे आकडे दाखविण्याची व्यवस्था केली आहे. मदन पत्की आणि राजीव श्रीखंडे ह्यांनी ही कामगिरी पत्करली असून त्यासाठी त्यांना प्रत्येकी दररोज २० रु. मानधन मिळेल. ह्या मानधनाच्या पैशांनी ते त्या बँकेत सेव्हिंग्ज खाते उघडतील.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :-३९३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

BANK TO BANK...

THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659-60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT, *General Manager.*
K. B. KIRTIKAR, *Chairman.*

**रत्नागिरी आकाशवाणीची इमारत**—रत्नागिरी येथे आकाशवाणी केंद्रासाठी इमारत बांधण्यात येत आहे. तिचा पायाभरणी समारंभ ५ फेब्रुवारी रोजी झाला. इमारतीस २४ लक्ष रुपये खर्च येऊन ती तीन वर्षात पुरी होईल.

**शास्त्रज्ञाला १२·७५ कोटी रु. नुकसानभरपाई**— एका अमेरिकन कोर्टाने एका शास्त्रज्ञाला १·७ कोटी डॉलर्स ( १२·७५ कोटी रु. ) नुकसानभरपाई देवविली आहे. संशोधनासाठी एका ट्रस्टने त्याला देऊ केलेली मदत त्या ट्रस्टने मध्येच थांबविली, ह्यासाठी त्या शास्त्रज्ञाने ट्रस्टवर दावा लावला होता. अयोग्य कारणासाठी आपली ग्रँट बंद झाली, असे वाटणाऱ्यांना त्यामुळे भरपाईची वाट मोकळी झाली आहे.

**पोस्ट ऑफिस—सर्वात मोठी बँक**—भारतामधील पोस्ट ऑफिसांत २·५ कोटी लोकांच्या ठेवींची खाती असून त्यात २,४४४ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत.

**देवनागरी लिपीत चिनी शब्दकोश**— आचार्य विनोबा भावे ह्यांनी देवनागरी लिपीमधील चिनी शब्दकोश नुकताच पुरा केला आहे. ते आता देवनागरी लिपीमधील जपानी, जर्मन आणि इंग्रजी शब्दकोश तयार करण्यात गुंतले आहेत.

**५७ कोटी रु. च्या तोट्याला सवंध देशच जबाबदार**—हेवी इलेक्ट्रिकल्स लि. च्या प्रचंड तोट्याला सबंध देशच जबाबदार आहे, असे विधान उद्योगमंत्री श्री. सुब्रम्हण्यम् ह्यांनी केले आहे. १२ वर्षांपूर्वी कारखाना स्थापन झाला, तेव्हापासून त्यात गुंतविलेल्या ७७ कोटी रुपयांपैकी ५७ कोटी रुपये तोट्याने खाऊन टाकले आहेत.

**पाकिस्तानी स्त्रियांना लष्करी शिक्षण**—पाकिस्तानच्या संरक्षणविषयक तयारीचा एक भाग म्हणून पाकिस्तानी स्त्रियांना लष्करी शिक्षण देण्यास प्रारंभ करण्यात आला आहे.

**भारतीयाला ब्रिटनमध्ये अटक**—ब्रिटनमध्ये परदेशीयांना बेकायदा प्रवेश मिळवून देणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीस मदत करण्याच्या आरोपावरून बर्मिंगहॅम येथील असिस्टंट कमिशनर ऑफ इंडियाच्या कचेरीतील एका हिंदी कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे.

**मंत्र्यांच्या चपलांची चोरी**—मध्यवर्ती सरकारचे आरोग्य मंत्री उमाशंकर दीक्षित हे मद्रास येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या सभेस गेले होते, परंतु बाहेर पडताना त्यांच्या चपला चोरीस गेल्याचे त्यांना आढळले. ते चपलांच्या दुकानात अनवाणी गेले व घाईघाईने चपला खरेदून निघून गेले.

**विकास योजना स्थगित केल्या** — स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापन वर्षानिमित्त खास विकास योजना चालू करण्यात आल्या होत्या त्या दुष्काळी परिस्थितीमुळे स्थगित करण्यात आल्या आहेत. ह्या योजनांवर आता नवा खर्च केला जाणार नाही.




बँकेच्या धनवर्धिनी ठेव योजनेतील एक योजना

**निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना**

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेड्युल्ड बँक

**महाराष्ट्रात सर्वत्र शाखा**

माधवी, सातारा.




सोल सेलींग एजन्टस्

**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, २१ फेब्रुवारी, १९७३ | अंक ४

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar

## वाचकांचा पत्रव्यवहार

महाशय,

'अर्थ' पाक्षिकाच्या दि. ७ फेब्रुवारी १९७३ च्या अंकांत प्रसिद्ध करण्यात आलेला श्री. गि. के. पंडित, एम्. ए., एलएल. बी, ए. सी. एस्. यांचा 'खोट्या नाण्यांचीच चलती' हा लेख वाचला. अर्थशास्त्रामधील ग्रेशॅमचा 'Bad coins throw good coins out of circulation' हा जो सुविख्यात सिद्धान्त आहे त्याचाच अनुभव उद्योगधंद्यामध्ये किंवा व्यवसायामध्ये व्यक्तींच्या बाबतीत येतो असे लेखकाने आपल्या लेखात सोदाहरण विशद केले आहे.

उपरिनिर्दिष्ट लेखात दिग्दर्शित करण्यात आलेली परिस्थितीच जर बव्हंशी उद्योगधंद्यामध्ये किंवा सामाजिक संस्थांमध्ये प्रकर्षाने दिसून येत असेल तर अशा संस्थांमध्ये काम करणाऱ्या प्रामाणिक व निष्ठावन्त कर्मचाऱ्यांचे भवितव्य काय राहील अशी समस्या सामान्य नागरिकापुढे उभी राहते! परंतु, माझ्या मते, खोट्या नाण्यांची चलती ही तात्पुरतीच असते, कायमस्वरूपी नसते; आणि हीच विचारसरणी प्रामाणिक व निष्ठावंत सेवकांना उत्साहवर्धक दिलासा देणारी आहे.

'अर्थ' पाक्षिकाच्या दि. ७।२।१९७३ च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आलेला श्री. सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम्. बी. ए. यांनी लिहिलेला लेख 'कुणाचा कुणाला मेळ नाही' व्यवस्थापनातील समस्या (५) या शीर्षकाखालील, वाचला. लेखकाने सदरी लेखात दिग्दर्शित केलेली समस्या ही खरोखरच आजच्या व्यवस्थापकापुढील ज्वलंत समस्या असून ती योग्य रीतीने सुटण्यावरच त्याची यशस्विता मुख्यत्वे अवलंबून आहे, याबाबत कोणाचे दुमत होईलसे वाटत नाही.

प्रस्तुत लेखातील श्री. नामदेव हे मूलतः एक कसबी शिंपी होते; तथापि त्यांनी आपले स्वकर्तृत्वावर व धडाडीवर मे. फॅशन्स प्रा. लि. ही रेडिमेड वस्त्रांची कंपनी काढून तिचे ते मॅनेजिंग डायरेक्टर झाले व कंपनी नावारूपाला आणली. श्री. नामदेव यांनी आपल्या कंपनीसाठी जर्मनीहून आधुनिक यंत्रे आणून आपले कंपनीतील कपड्यांचे उत्पादन व विविधता सतत वाढती ठेवली व धंद्याचा व्याप जसजसा वाढला तसतसा अधिकारी व नोकरवर्ग वाढविला.

तथापि वरील लेखात दिग्दर्शित करण्यात आलेल्या परिस्थितीवरून एकच उणीव, कंपनीच्या व्यवस्थापनात प्रकर्षाने जाणवते ती ही की, कंपनीच्या विविध खातेप्रमुखांच्या कामकाजावर मॅनेजिंग डायरेक्टर यांचे जे एकसंध नियंत्रण लागते व कंपनीचे विविध खातेप्रमुखांमध्ये जो मध्यवर्ती नियंत्रणास पात्र राहून, सुसंवाद (Communication) लागतो त्याचा अभाव कंपनीच्या कामकाजात दिसून येतो. अन्यथा, कंपनीचे प्रॉडक्शन मॅनेजर श्री. थॉमस, पर्चेस ऑफिसर श्री. खरीदकर, सेल्स ऑफिसर श्री. सेलवाणी व अकौंटंट श्री. तिजोरीवाला यांनी अधिकाऱ्यांच्या बैठकीत जी उत्तरे दिली तशी त्यांनी दिली नसती.

वरीलप्रमाणे परिस्थिती निर्माण होण्याचे मुख्य कारण कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. नामदेव यांना उद्योगव्यवस्थापनाचा फारसा अनुभव नव्हता व त्यामुळे ते कंपनीच्या विविध खात्यांच्या कामकाजावर आवश्यक ते सर्वसाधारण नियंत्रण ठेवू शकले नाहीत हेच दिसून येते.

तथापि श्री. नामदेव यांनी श्री. मित्रा यांना व्यवस्थापकीय तज्ज्ञ सल्लागार म्हणून नियुक्त केलेले आहेच. तरी श्री. नामदेव यांनी श्री. मित्रा यांच्याशी कंपनीच्या संपूर्ण कामकाजासंबंधी व समस्यांसंबंधी सविस्तर रीतीने मनमोकळेपणे, त्यांना आवश्यक तो मुशाहिरा देऊन, चर्चा करून त्यांच्याकडून मार्गदर्शन करून घ्यावे व त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सातत्याने चालू ठेवावी असे वाटते.

समस्या लेखकास व आपणास माझ्या शुभेच्छा.

**आर. डी. कुलकर्णी**

**अक्कलकोट**

---

**लॉटरींनी १३ कोटी रु. दिले**—मार्च, १९६९ मध्ये महाराष्ट्र सरकारने लॉटरी सुरू केली, तेव्हापासून १९७२ अखेर लॉटऱ्यांपासून खर्च वजा जाता १३ कोटी, ३ लक्ष रु. उत्पन्न मिळाले.



☆ अर्थ ☆

बुधवार, २१ फेब्रुवारी, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


# डॉलर घसरला; येन आणि मार्क वाढला.

## भारताच्या निर्गतीवर विपरीत परिणाम ?

सुमारे १३ महिन्यांपूर्वी प्रमुख देशांच्या मध्यवर्ती बँकांची वॉशिंग्टन येथे बैठक होऊन त्यावेळचा आंतरराष्ट्रीय चलनविषयक पेचप्रसंग सोडविण्यासाठी 'स्मिथसोनिअन' करार करण्यात आला, पण इतक्या लवकर तो करार संतुष्टात येईल, अशी कल्पना नव्हती. ह्या करारान्वये डॉलरचे अवमूल्यन करण्याचे ठरले होते, तर येन आणि मार्क ह्या चलनांची किंमत वाढविण्याचे ठरले होते. देशादेशांतील येण्या-देण्यात समतोल आणण्यास हा उपाय अयशस्वी ठरला आणि ब्रिटनने पौंडाला किंमत बाजाराभावाप्रमाणे वाढू-कमी होऊ देण्यास मोकळीक दिली. कराराचे इतर भागही अव्यवहार्य ठरले. घेतलेली सर्व दक्षता आणि केलेली उपाययोजना निरुपयोगी ठरावी, इतकी गंभीर परिस्थिती निर्माण होत गेली. चलनविषयक अस्थिरता निर्माण होण्याचे मुख्य कारण जपानची होणारी वाढती निर्गत हे होय. अखेर, १२ फेब्रुवारी रोजी अमेरिकेने डॉलरचे १०%ने अवमूल्यन केल्याचे जाहीर केले. त्यामुळे सोन्याची अधिकृत किंमत प्रत्येक औंसाला ३८ डॉलर्सऐवजी ४२.२२ डॉलर्स झाली.

ह्या अवमूल्यनामुळे अमेरिकेत खपणारा आयात माल तेथे अधिक महाग होईल. अमेरिकन लोकांचा परदेशी प्रवास आणि होटेल बिले ह्यांचाही खर्च वाढेल, कारण तेवढेच परकीय चलन देण्यासाठी आता अधिक डॉलर्स लागतील, कारण इतर चलनांच्या मानाने डॉलर आता पूर्वीपेक्षा कमी किंमतीचा झाला आहे. डिसेंबर, १९७१ मध्ये डॉलरचे ८.५७% अवमूल्यन झाले होते त्यात ह्या नव्या अवमूल्यनाची भर पडली आहे. चलनाच्या जागतिक स्पर्धेत आता जपानच्या येनने अमेरिकेच्या डॉलरला चांगलाच धक्का दिला आहे आणि डॉलरची प्रतिष्ठा कमी झाली आहे. जपानी सरकार पूर्वीपेक्षा ताठर झाले आहे आणि त्याची आर्थिक शक्ती वाढली आहे. "जपानी मालाच्या आयातीवर आम्ही जबर जकाती बसवू" अशी अमेरिकेने जपानला धमकी दिली तरी तिला "आम्ही आमच्या येनची अधिकृत किंमत वाढविणार नाही" असे स्पष्ट उत्तर जपानने दिले आणि येनची किंमत मागणी-पुरवठ्याप्रमाणे तरती ठेवण्याचा निर्णय केला. अमेरिकेचे आयात होणाऱ्या तेलावरील अवलंबन वाढतच जाणार आहे आणि अमेरिकन मालाची परदेशात थोडी किंमत कमी झाली तरी त्यामानाने अमेरिकन निर्गत वाढण्याची शक्यता नाही. भारतासारख्या देशांना अमेरिका, जपान, युरोपीय देश, इत्यादींच्या चलनाच्या उलाढालीकडे बघत बसून 'आलीयां भोगासी असावे सादर' अशी तयारी ठेवावी लागते, तसे घडू नये म्हणून अधिक स्थिर चलनव्यवस्थेची अत्यंत आवश्यकता आहे. सध्या रुपयाचे भवितव्य पौंडाशी निगडित आहे. पौंडाच्या चढउतारावर रुपयाचा चढउतार अवलंबून आहे. ब्रिटनने पौंडाचे अवमूल्यन केले, तर भारतालाही रुपयाचे अवमूल्यन करावे लागेल. भारताची वार्षिक निर्गत सुमारे १७६० कोटी रुपयांची आहे. त्यापैकी सुमारे ५३० कोटी रुपयांची निर्गत रशिया-नियंत्रित देशांकडे होते; तिच्यावर काही परिणाम होणार नाही पण, सुमारे १२३० कोटी रु. च्या निर्गतीला स्पर्धेस तोंड द्यावे लागते. आजच हिंदी चहा, कॉफी, ताग, कपास, कापड, ह्यांना स्पर्धेस तोंड देणे कठीण जात आहे. म्हणून तर सरकार निर्गत करणारांना १० ते २०% इतके प्रलोभन (इन्सेंटिव्ह्) दाखवीत असते. अशा प्रलोभनाचा फायदा एकूण निर्गतीच्या ६०% निर्गतीला मिळत आहे. तेव्हा सरकारने रुपयाचे अवमूल्यन केले नाही, तर इन्सेंटिव्हज्चा दर वाढवावा लागेल, असा रंग दिसतो.

---

## परदेशीय कर्जे वेळापत्रकाप्रमाणे परत केली

अमेरिकेसारख्या धनाढ्य देशाचे डॉलर चलन संकटग्रस्त झाले असताना भारताचे नियोजनमंत्री श्री. डी. पी. धर ह्यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेसंबंधी आणि परदेशीय कर्जाच्या परतफेडीविषयी आत्मविश्वास व्यक्त केला आहे. भारताला परदेशीय कर्जे वेळेवर परत करता येतील की नाही ह्याविषयी अनेकदा शंका व्यक्त करण्यात येत असतात. अशा शंकेखोरांना श्री. धर ह्यांनी परस्पर उत्तर दिले असे दिसते. लोकसभेच्या नियोजनविषयक सल्लागार समितीपुढे भाषण करताना ते म्हणाले की, परदेशीय कर्जाच्या फेडीसाठी मुदती मागून घेण्यात याव्यात अशा सूचना करण्यात येत आहेत. परंतु त्या अस्थानी म्हटल्या पाहिजेत. सल्लागार समितीची दोन दिवसांची बैठक दिल्ली येथे भरविण्यात आली होती. पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाबाबत कोणता दृष्टिकोन स्वीकारावा ह्याची समितीत चर्चा करण्यात आली. चर्चेत बोलताना श्री. धर म्हणाले की, भारताच्या अर्थव्यवस्थेच्या लवचिकपणाबद्दल देशाने पूर्ण श्रद्धा बाळगली पाहिजे.

कशाही प्रसंगाला तोंड देण्याचे सामर्थ्य हिंदच्या अर्थव्यवस्थेत आहे. भारताने जी परदेशीय कर्जे घेतली आहेत ती परत करण्याच्या काही जबाबदाऱ्या भारतावर आहेत. परदेश व आंतरराष्ट्रीय वित्तीय संघटना ह्यांच्याबाबत भारताने स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची भारताची इच्छा व हिंमत आहे. आतापर्यंत भारताने परतफेडीचे हप्ते कधीही चुकविलेले नाहीत. १९७१ च्या डिसेंबर महिन्यात भारत अडचणीच्या परिस्थितीत सापडलेला होता. भारताने विचारपूर्वक स्वीकारलेला मार्ग सोडून द्यावा म्हणून त्या वेळी अनेक प्रकारची दडपणे आणण्यात आली होती. परंतु भारताने त्यांना मान झुकविली नाही.

भारताने आपल्या इच्छेत बदल करावा म्हणून आणण्यात आलेल्या दडपणाचा व अटींचा स्वीकार करण्यात आला असता तर आज भारताला ताठ मानेने जगात वावरता आले नसते. अर्थात, कोणत्याही देशाला एकाद्या शिलेदाराप्रमाणे वागून चालत नाही व चालणार नाही. जगातील सर्व देशात सतत देवाणघेवाण चाललेली असतेच. परंतु भारताने आपल्या अर्थव्यवस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासंबंधी अविश्वास दाखविण्याचे कारण नाही. त्यासाठी जरूर असणारे सामर्थ्य भारताजवळ जरूर आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेर म्हणजे १९७३–७४ च्या सुमारास भारताला द्याव्या लागणाऱ्या परदेशाच्या मदतनिधीत ५० टक्क्याने कपात होईल असा अंदाज आहे. १९६७–६८ साली परदेशी साह्याचा आकडा ८६३ कोटी रुपयांचा होता. तो कमी होत होत १९६८–६९ मध्ये ५२८ कोटी रुपयापर्यंत खाली आला. मदतीत कपात करण्याची अगर होण्याची ही प्रवृत्ती पुढेही चालूच राहिली आहे. १९६९–७० साली मदतीचा आकडा ४४४ कोटी रुपये झाला. १९७०–७१ मध्ये तो आणखी खाली येऊन ३४० कोटी रुपयावर घसरला. परंतु त्यानंतर म्हणजे १९७१–७२ मध्ये त्यात थोडी वाढ होऊन तो ३५० ते ३६० कोटींवर स्थिरावला. १९७२–७३ मध्ये तो १०० कोटीच्याही खाली जाईल असा अंदाज आहे.

## भारत सरकारच्या कर्जाचा व व्याजाचा वाढता बोजा

परदेशी मदत कमी होत असली तरी कर्जफेडीसाठी व व्याजासाठी तरतूद वाढत्या प्रमाणावर करावी लागेल. १९५०–५१ ते १९७२–७३ ह्या मुदतीत भारताचा कर्जबाजारीपणा दरसाल दर शेकडा १० टक्के चक्रवाढ दराने वाढत गेलो आहे. १९७२–७३ अखेर कर्जाचा बोजा १६,०८४ कोटी रु. च्या घरात असेल, त्यापैकी ७,३२८ कोटी रु. (४५·६%) परदेशी देणे आहे. अल्प मुदतीची कर्जे, राज्यांचे प्रॉव्हिडंट फंड, पी. एल. ४८० ठेवी आणि इतर कर्जे हिशेबात घेतली, तर भारत सरकारचा कर्जाचा बोजा २२,१२७ कोटी रु. वर जाईल. १९७१–७२ मध्ये व्याजापोटी ६८४ कोटी रु. द्यावे लागले; १९७२–७३ मध्ये ती रक्कम ७३० कोटी रु. होईल. त्यासाठी करवाढ आणि चलनवाढ करणे अपरिहार्य होते. परदेशी कर्जामुळे परदेशी चलन खर्च होते, त्याचा ताण पडत जातो. घेतलेल्या कर्जाचा किफायतशीर वापर होऊन त्यातून कर्जफेड आणि व्याज ह्यांची तरतूद झाली आणि वाढाव्यातून आर्थिक विकास व राहणीचे मान वाढू शकले, तरच वाढत्या कर्जाचे समर्थन करता येईल.

## पाकिस्तानमधील चलनी नोटात वाढ

पाकिस्तानच्या स्टेट बँकेच्या अहवालाप्रमाणे तेथील चलनात वाढ झाली आहे. आता पाकिस्तानची लोकसंख्या सुमारे ६ कोटी आहे. पूर्वी पाकिस्तानात असलेल्या पूर्व बंगालची ७·५ कोटी लोकसंख्या आता बाहेर पडलेली आहे आणि तरीही चलनात वृद्धी झालेली आहे. १९७३ च्या जानेवारी अखेर बँकेच्या माहितीप्रमाणे ९८५ कोटी रुपयांचे चलन वापरात होते. नोव्हेंबर १९७१ मध्ये ८६६ कोटी रुपयांचे चलन वापरात होते. पाकिस्तानात झालेल्या विलक्षण चलनवृद्धीचा अन्वयार्थ लावण्याचे प्रयत्न पाकिस्तानमधील आणि परदेशातील अर्थशास्त्रज्ञ करीत आहेत. त्यांच्या मताने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर चलनवृद्धीच्या पडलेल्या दडपणाचीच ही निशाणी आहे. चलनवृद्धीचे मुख्य कारण सरकारी खर्च आहे असे सांगण्यात येत आहे. स्टेट बँक आणि पाकिस्तानातील स्वायत्त वित्तीय संघटना ह्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की सरकारी खर्चाचा हाच वेग चालू राहिला तर पाकिस्तानच्या अंदाजपत्रकात २८० ते ३०० कोटी रुपयांची तूट येईल. अध्यक्ष भुत्तो ह्यांच्या म्हणण्याप्रमाणे गेल्या मे महिन्यात पाकिस्तानच्या रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यामुळे सध्याची चलनवृद्धी आणि चढत्या किंमती उद्भवल्या आहेत. मे मध्ये एका डॉलरची पाकिस्तानी रुपयामधील किंमत ४·७६ रुपये होती. ती त्या वेळी ११ रुपये करण्यात आली. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जागतिक बँक आणि अमेरिका ह्यांनी पाकिस्तानला कबूल केलेली आर्थिक मदत दिली नाही; आणि कामगार चळवळीमुळे औद्योगिक उत्पादनात अडथळा आला.

## शांघाई–सर्वात मोठे शहर

शांघाई हे जगातील सर्वात मोठे शहर आहे. त्याची लोकसंख्या १,०८,२०,००० एवढी आहे. त्या खालोखाल टोकियो (८८,४१,०००), न्यूयॉर्क (७८,९५,०००), पीकिंग (७५,७०,०००), लंडन (७३,७९,०००) आणि मॉस्को (७०,५०,०००), ही शहरे येतात.

## चीनच्या खालोखाल भारताची लोकसंख्या

जगातील सर्वात जास्त लोकसंख्येचा देश म्हणजे चीन. त्याची लोकसंख्या ७८,७३,७६,००० आहे. त्यानंतर भारताचा अनुक्रम लागतो. (५५,०६,७४,०००). रशियाची लोकसंख्या २४,५०,६५,००० तर इंडोनेशियाची १२,४८,९४,००० आहे.

# संरक्षणविषयक जिनसांच्या गरजांची पूर्तता

## खाजगी क्षेत्रातील कारखानदारांच्या काही अडचणी आणि त्यांवर उपाय

[ " संरक्षणविषयक गरजा आणि खाजगी क्षेत्र व लघुउद्योग क्षेत्र ह्यांची त्यांच्या संबंधातील भूमिका " ह्या विषयाच्या चर्चेसाठी पुणे येथील गोखले इन्स्टिट्यूटच्या रा. ब. काळे सभागृहात एक परिसंवाद शनिवार, दि. १० फेब्रुवारी, १९७३ रोजी आयोजित करण्यात आला होता. परिसंवादात स्वस्तिक रबर प्रॉडक्ट्स लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वसंतराव वैद्य ह्यांनी आपल्या भाषणामध्ये खाजगी क्षेत्रातील कारखानदारांच्या अडचणी आणि त्या दूर करण्यासाठी संरक्षणखात्यास करता येण्याजोगे उपाय, ह्यावर आपले अनुभवसिद्ध विचार व्यक्त केले. ]



डावीकडून, बसलेले —(१) श्री. नानासाहेब गोरे, (२) संरक्षणविषयक उत्पादन खात्याचे राज्यमंत्री श्री. विद्याचरण शुक्ल आणि (३) नियोजन खात्याचे राज्यमंत्री श्री. मोहन धारिया. श्री. वसंतराव वैद्य भाषण करीत आहेत.

## 'स्वस्तिक'चे श्री. वसंतराव वैद्य ह्यांचे भाषण

काही नव्या नव्या जिनसांच्या निर्मितीसाठी संरक्षण संघटनेचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट खाते खासगी क्षेत्रामधील फर्म्सशी संपर्क साधीत असते. त्या जिनसांपैकी काहींसाठी मागणी फारच थोडी असते. कोणताही जिन्नस तयार करण्यापूर्वी त्याला दीर्घकाळ प्रयोगावस्थेतून जावे लागते, आणि त्यानंतर संरक्षणखात्याने त्याची कसून तपासणी करून त्याला मान्यता द्यावी लागते. ह्याला लागणारा दीर्घ काळ आणि होणारा खर्च, ह्या मानाने खात्याची मागणी कधी कधी काही डझनांपेक्षाही जास्त नगांची नसते आणि त्यांचे उत्पादन किफायतशीर होत नाही. अशा रीतीने खासगी क्षेत्रातील कारखानदाराला ज्या जिनसांच्या उत्पादनात हशील वाटत नाही, त्यांची घडण (डेव्हलपमेंट) आणि उत्पादन संरक्षणखात्यानेच स्वत: करणे श्रेयस्कर. अर्थात, जरूर ते तांत्रिक साहाय्य खासगी क्षेत्राने अवश्य द्यावे. उदाहरणार्थ, काही रबरी जिनसा बनविण्याचे तांत्रिक ज्ञान काही संरक्षण विभागांना आम्ही दिले आहे; ते विभाग आम्ही पुरविलेल्या रबर कांपाउंडमधून स्वत:च्या कारखान्यात त्यांचे उत्पादन करतात. परंतु आम्ही घडविलेल्या काही जिनसा मोठ्या संख्येने लागतात आणि त्यांची खरेदी दरसाल केली जाते. जिनसांच्या घडणीसाठी बराच वेळ आणि पैसा खर्च केलेल्या फर्मला ऑर्डर मात्र मिळत नसे; कारण दुसरा एखादा स्पर्धक ह्या जिनसा पाहून एक-दोन टक्के कमी किमतीला त्या देण्यास तयार होतो. आता ह्यात सुधारणा झाली आहे; ज्या फर्मने जिन्नस घडविला, त्या फर्मलाच पहिल्या एक दोन ऑर्डरी दिल्या जाव्यात, अशा सूचना संबंधितांना करण्यात आलेल्या असाव्यात. ऑर्डर देणारे अधिकारी मूळ जिनसा तयार करणाऱ्या फर्म्सशी सहानुभूती बाळगणारे असतील, तर ते त्या फर्मला पुरेशा मोठ्या ऑर्डरी देतात. ते अधिकारी इतर फर्म्सशी सहानुभूती बाळगणारे असतील तर प्रारंभीच्या ऑर्डरी लहान दिल्या जातात आणि मोठाल्या ऑर्डरी मागाहून दिल्या जातात, म्हणजे त्यांच्या सहानुभूतीच्या फर्म्सना त्या मिळणे सुलभ व्हावे. जिनसा प्रथम तयार करणाऱ्या फर्मला प्रोत्साहन मिळेल, ह्या दृष्टीने नियमात दुरुस्ती करण्यात यावी, अशी माझी सूचना आहे. पहिल्या फर्मला दीर्घकाळ मोनॉपोली मिळण्याचा संभव असेल तर तिचा प्राथमिक खर्च विचारात घेऊन त्याची भरपाई झाल्यावर मग खुशाल टेंडरे मागवून जिनसांची खरेदी करावी.

जनरल स्टोअर्सला लागणाऱ्या संरक्षणविषयक जिनसात ग्राउंड शीट्स, पी. टी. शूज, जंगल बूट, स्नो बूट, इत्यादी सालोसाल लागणाऱ्या जिनसांचा समावेश होतो. त्या जिनसांची नेहमीची गरज लक्षात घेऊन वक्तशीर ऑर्डरी देत गेल्या, तर कारखानदाराला उत्पादनाचा कार्यक्रम आखणे आणि पार पाडणे सोपे जाईल. परंतु, एकदम मोठी ऑर्डर द्यावयाची, मध्ये मोठा खंड पडावयाचा, पुन: मोठी ऑर्डर द्यावयाची ह्या पद्धतीमुळे आधी शिकून तयार केलेल्या कामगारांना मधल्या काळात काम उरत नाही आणि नव्या ऑर्डरीचे वेळी पुन: नवीन कामगार शिकवून तयार करावे लागतात. परंतु, ९९% रिपीट ऑर्डरी वेळेवर दिल्या जात नाहीत. उत्पादन सतत होत राहिले, तर कारखानदाराला कच्चा माल कमीत कमी किमतीला घेता येईल आणि शिकवून तयार केलेल्या कामगारांच्या कार्यक्षमतेचा फायदा वर्षभर मिळत राहील. परंतु तसे आज घडत नाही आणि उत्पादनखर्च वाढतो आणि अखेर सरकारलाच तो सहन करावा लागतो. कारखानदाराला जास्त किंमत मिळाली तरी तो खूष नसतो, कारण त्याला कच्च्या मालासाठी जास्त रक्कम द्यावी लागते आणि नव्या कामगारांमुळे उत्पादनाची कार्यक्षमता घटते. तेव्हा, नेहमी लागणाऱ्या जिनसांसाठी तीन वर्षांच्या गरजेच्या नगाच्या ऑर्डरी आधी देऊन दरवर्षी वर्षारंभाआधी एक महिना नव्या दरांसाठी वाटाघाटी केल्या तर कारखानदाराला उत्पादनाचे कार्यक्रम व्यवस्थित रीतीने आखून पार पाडता येतील.

कारखानदारांना ऑर्डरी दिल्या जातात त्यासंबंधात काही दिरंगाई संभवते. कच्चा माल मिळायला उशीर होतो किंवा तो वापरण्यापूर्वी आवश्यक असलेल्या इन्स्पेक्शनचा रिपोर्ट लवकर हाती येत नाही. नमुना मंजूर झाल्याखेरीज मोठ्या उत्पादनास प्रारंभ करावयाचा नाही अशी काही टेंडर्सची अट असते. फॅब्रिकपासून जिन्नस बनवावयाचा असेल तर फॅब्रिकचा नमुना मंजूर होऊन येण्यास वेळ लागतो. फॅब्रिक बनवून देण्यास गिरण्या ६ ते ८ आठवडे घेतात. त्यापासून नमुना बनवायला कारखानदाराला एक-दोन आठवडे लागतात. हा नमुना नंतर इन्स्पेक्टरकडे तपासणीसाठी पाठविला जातो. अशा रीतीने मोठ्या उत्पादनास प्रारंभ करण्यास सुमारे तीन महिन्यांचा अवधी लागतो. शेवटचे काही लॉट्स इन्स्पेक्शनला देण्याच्या समयीचा मुदतवाढ मागून घेण्याची आवश्यकता निर्माण होते. ही मुदतवाढ बऱ्याच आधी मागण्याची दक्षता घेतली, तरी ९०% पेक्षा जास्त प्रकरणी मुदतवाढ मिळण्यास पाच ते सहा आठवडे लागतात. मुदतवाढ मागणारे पत्र मिळाल्यापासून आठ ते दहा दिवसात ती दिली जावी, अशी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिली गेली तर कारखानदारांची एक मोठी डोकेदुखी थांबेल.

संरक्षण खात्याला पुरविलेल्या मालाची रक्कम मिळण्याची सध्याची व्यवस्था साधारणत: समाधानकारक आहे. परंतु, ऑर्डनन्स फॅक्टरीजना किंवा डेपोंना कंट्रोलर ऑफ डिफेन्स अकौंट्समार्फत पुरविलेल्या मालाची रक्कम मिळण्याच्या बाबतीत तशी परिस्थिती नाही; रक्कम मिळायला तीन ते चार महिने लागतात. कंट्रोलर ऑफ मिलिटरी अकौंट्सकडे इन्स्पेक्शन नोटची पहिली प्रत आणि माल पाठविल्याचा पुरावा दिला तर कारखानदाराला एक महिन्यात बिलाच्या ९५% रक्कम मिळण्याची सोय होऊ शकेल, अशी व्यवस्था करता यावी. इन्स्पेक्शन रिपोर्ट मिळायला वेळ लागल्यामुळे भांडवल तयार मालात गुंतून पडते तसे होऊ नये हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. इन्स्पेक्शनसाठी येणाऱ्या नमुन्यांची संख्या पूर्वी दरमहा २,५०० ते ३,००० होती ती आता दरमहा १०,००० वर गेली आहे. त्यामुळे इन्स्पेक्शनच्या लॅबोरेटरीज आणि त्यांची क्षमता वाढविली तरी तेवढ्याने हा प्रश्न सुटणार नाही. निर्यातीच्या ऑर्डरींच्या बाबतीत बँका 'पॅकिंग क्रेडिट' देतात तसे संरक्षण-खात्याच्या ऑर्डरींच्या बाबतीतही देण्यास बँकांना उद्युक्त केले तर कारखानदारांची खूप सोय होईल आणि संरक्षणखात्याच्या ऑर्डरी पुरविण्यास कारखानदारांना जास्त प्रोत्साहन मिळेल.

आमच्या कंपनीच्या मोठ्या निर्गतीमुळे तिला प्राधान्य-यादीत स्थान मिळाले. प्राधान्य-यादीत नसलेल्या फर्मने स्वत:च्या वार्षिक उलाढालीच्या किमान १०% ची निर्गत केली तर तिला आयात परवाना मिळण्याच्या बाबतीत प्राधान्य-यादीतील फर्म्सच्या बरोबरीने स्थान मिळते. १९६८ सालापासून माझी कंपनी प्राधान्य-यादीत आहे. परंतु गेल्या वर्षी संरक्षणविषयक जिनसांच्या मागणीत वाढ झाल्यामुळे देशी गिऱ्हाईक आणि परदेशी गिऱ्हाईक ह्यांच्या गरजांपेक्षा संरक्षणविषयक गरजांच्या पूर्तीला आम्ही अग्रस्थान दिले. त्यामुळे आमची निर्गत कमी झाली आणि आम्हांला प्राधान्य-यादीतून बाहेर पडावे लागले. संरक्षणविषयक गरजा भागविणे निर्गतीच्या गरजा भागविण्यापेक्षा कमी महत्त्वाचे आहे, असे कसे म्हणता येईल? गेल्या १२ महिन्यांत आमच्या निर्गतीपेक्षा संरक्षणविषयक उत्पादन सात ते आठ पटींनी वाढले आहे, तरी आम्ही प्राधान्य-यादीत नाही !

संरक्षणाला आवश्यक जिनसांचे उत्पादन करणाऱ्या फर्म्स निर्गत किती करतात हे विचारात न घेता त्यांना प्राधान्य दर्जा देण्यात यावा, अशी माझी आग्रहाची सूचना आहे. आमच्यापेक्षा कमी उलाढाल असणाऱ्या काही ऑर्डनन्स फॅक्टरीज प्राधान्य-यादीत आहेत, परंतु त्यांच्यापेक्षा तत्सम जिनसांचे जास्त उत्पादन करणाऱ्या खाजगी फर्मला तो दर्जा नाकारण्यात येतो. संरक्षण खात्याला खाजगी क्षेत्रामधील आणखी कितीतरी कारखान्यांना सहभागी करून घेता येणे शक्य आहे. त्यामुळे संरक्षणविषयक गरजांच्या पूर्तीचा सर्वंकष कार्यक्रम तयार करता येईल. ह्या राष्ट्रीय उद्दिष्टाला हातभार लावण्यासाठी कित्येक कारखानदार उत्सुक आहेत, ह्याची मला खात्री आहे.

---

### रशिआत योगाला व काही खेळांना बंदी

राज्यकर्त्यांनी म्हणजे साध्या भाषेत सरकारने आपले क्षेत्र आखून घेऊन त्याच्या कक्षेत काम करण्याचे दिवस केव्हाच गेले आहेत. आर्थिक व्यवहारात सरकारने हस्तक्षेप करावा का नाही हा आता वादाचा मुद्दा राहिलेला नाही. राज्यसंस्थेचा राजकीय रंग कसाही असला तरी जगातील सर्वच सरकारे आपल्या अधिकाराची व्याप्ती वाढवत चाललेली दिसतात. पण कम्युनिस्ट राज्यात ह्या व्याप्तीला मर्यादा दिसत नाही आणि तेथील सरकारांचा हस्तक्षेप कोठेही उघडपणे करण्यात येतो. रशिआने अलीकडे योगविद्या आणि इतर काही खेळ ह्यांना बंदी केली आहे. बंदी घातलेले खेळ सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने देशाला घातक आहेत असे कारण बंदीसाठी देण्यात आले आहे. योगविद्येत योगासनांचा अंतर्भाव होतोच. योगासनांवर सर्वात चांगला अनुबोधपट रशिआनेच तयार केलेला आहे. तेव्हा ही बंदी योगविद्येच्या शारीरिक घडण करणाऱ्या व्यायामाला लागू नसण्याचा संभव आहे. त्यापुढील म्हणजे योगाच्या आध्यात्मिक अवस्थांना ती लागू असावी. योगाबरोबरच स्त्रियांच्या फुटबॉलला आणि जुडो ह्या खेळाला व कॉन्ट्रॅक्ट ब्रिजलाही बंदी घालण्यात आली आहे. रशिआच्या खेळ आणि शारीरिक शिक्षण संघटनेने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, फुटबॉल हा खेळ स्त्रियांच्या देहयष्टीला अपायकारक आहे, आणि त्यामुळे स्त्रियांना अहितकारक गोष्टीत रस उत्पन्न होतो. स्त्रियांचे आरोग्य आणि सौंदर्यवर्धन ह्या दृष्टीने ज्यूडोचा खेळही चांगला नाही. फुटबॉलचे सामने रशिआतील युक्रेनमध्ये फार लोकप्रिय झालेले आहेत.

---

### तांब्याबाबत स्वयंपूर्णतेकडे वाटचाल

कोणत्याही देशाच्या औद्योगिक विकासात तांबे ह्या धातूला महत्त्वाचे स्थान आहे. औद्योगिक कच्च्या मालापैकी तो एक महत्त्वाचा धातू आहे. भारत ह्या धातूच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने झपाट्याने पावले टाकीत आहे. १९७३ च्या अखेरीला राजस्थानातील खेत्री विभागातील तांब्याच्या खाणीत उत्पादनास प्रारंभ होईल अशी अपेक्षा आहे. शिवाय मध्यप्रदेशात बालाघाट जिल्ह्यातही काही तांब्याच्या खाणींचा नव्याने शोध लागला असून त्यांचा विकास करण्याचे कामही चालू होत आहे. तांब्याच्या पुरवठ्याची सध्याची परिस्थिती लक्षात घेता भारत १०० टक्के स्वयंपूर्ण होणे कठीण दिसते. तरीसुद्धा १९८० च्या सुमारास देशाच्या गरजेपैकी ७० टक्के गरज देशातील उत्पादनानेच भागविण्यात येण्याची शक्यता दिसू लागली आहे. खेत्री येथील खाणींचा विकास करण्याचे काम आता ७५ टक्के पूर्ण झाले आहे. त्यासाठी ११७ कोटी रुपये खर्च झाला आहे. मध्यप्रदेशातील तांब्याच्या खाणींच्या विभागात ४ कोटी टनांचा साठा असावा असा अंदाज करण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे ह्या खाणी चालू करणे फारसे गुंतागुंतीचे नाही. त्यांचा विकास पूर्ण करण्यासाठी ६ ते ७ वर्षांचा अवधी लागेल. खेत्री प्रकल्पाची उत्पादनक्षमता दरसाल ३१ हजार टनांची आहे. सर्व उत्पादनक्षमता कारणी लावण्याचे काम १९७७–७८ च्या सुमारास पूर्ण होईल. भारतात विजेचे उत्पादन जसजसे वाढत जाईल तसतशी तांब्याची मागणीही एकसारखी वाढत जाणार आहे ही गोष्ट उघड आहे.

---

### भारताचे सर्वांत मोठे तेलवाहू जहाज

शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिआच्या ताफ्यात 'जवाहरलाल नेहरू' हे सर्वांत मोठे तेलवाहू जहाज आता सामील झाले आहे. मद्रास आणि इराणच्या आखातामधील बंदरे ह्याच्या दरम्यान ते तेलाची वाहतूक करील. ह्या बोटीचे वजन ८७ हजार टनांचे असून दुसरी अशीच एक बोट 'लालबहादुर शास्त्री' ह्या नावाची आहे. मोठ्या तेलवाहू बोटींना वापरता येईल असा मोठा धक्का बांधण्याचे काम मद्रास बंदरात चालू होते. परंतु त्याचे काम पुरे होईपर्यंत ह्या बोटी बंदराचा येरझारा करू शकत नसत. आता मद्रास बंदरातील धक्क्याचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे दोन्ही जहाजांचा उपयोग आता करता येऊ लागेल. मद्रास येथील तेलशुद्धी कारखान्याला अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्यासाठी दोन्ही बोटी बांधण्यात आल्या.

---

### पंजाबमधील सहकारी सोसायट्यांतील अफरातफर

पंजाबमधील सुमारे ११,००० सहकारी सोसायट्यांचे हिशेब तपासता, २४७१ सहकारी सोसायट्यांत मिळून २५ लक्ष रुपयांची अफरातफर आढळून आली. त्या सर्व सोसायट्यांवर कारवाई चालू आहे; एक असिस्टंट रजिस्ट्रार, सहा इन्स्पेक्टर्स व सब-इन्स्पेक्टर्स ह्यांना कामावरून कमी करण्यात आले आहे. आतापर्यंत एक डेप्युटी रजिस्ट्रार, दोन असिस्टंट रजिस्ट्रार आणि २७ इन्स्पेक्टर्स व सब-इन्स्पेक्टर्स ह्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. पंजाबच्या सहकारी खात्याचे रजिस्ट्रार श्री. कपूर ह्यांनीच ही माहिती दिली आहे.

### इंजिनिअरांच्या बेकारीत सतत वाढ

दिल्ली ज्युनिअर चेंबरने केलेल्या एका पाहणीप्रमाणे भारतामधील बेकार इंजिनिअरांची संख्या ७७ हजारांच्या आसपास आहे. ह्या दशकाच्या अखेरीस बेकार इंजिनिअरांची संख्या एक लाखाच्या घरात जाण्याचा संभव आहे. प्रत्येक वर्षी देशातील इंजिनिअरिंग कॉलेजमधून २३ हजार इंजिनिअर्स शिकून बाहेर पडतात.

**रामकृष्ण परमहंस तिकीट** — रामकृष्ण परमहंसांच्या स्मृतिदिनी, १८ फेब्रुवारी १९७३ रोजी, पोस्ट खात्याने २० पैशांचे उभे तिकीट काढले.

**१५० बसेसचा भारताकडून पुरवठा** — बांगला देशाला १५० बसगाड्या खरेदी करता याव्या म्हणून भारत सरकारने १ कोटी, २३ लाख, १० हजार रुपयांचे कर्ज मंजूर केले आहे. १९७२–७३ च्या अंदाजपत्रकात बांगला देशाला साह्य करण्यासाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यातूनच वरील कर्ज मंजूर करण्यात आले आहे.

## भारतामधील मोठ्या कंपन्यांचे ऑडिट

| ऑडिट करणारी फर्म | कंपन्यांची संख्या | एकूण जिंदगीशी प्रमाण % | एकूण जिंदगी | प्रत्येक कंपनीची सरासरी जिंदगी | प्रत्येक फर्मची भागीदार संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | लक्ष रु. | लक्ष रु. | ( १९६४ ) |
| ए. एफ. फर्ग्युसन अँड कं. | ९१ | १३·२३ | ९९९७० | १०९९ | १३ |
| लव्हलॉक अँड लुइस | १५७ | ८·३१ | ६३२६५ | ४०३ | ८ |
| प्राइस वॉटर हाऊस पीट अँड कं. | १०४ | ६·०७ | ४५८०६ | ४४० | १५ |
| एस. बी. बिलिमोरिआ | ३० | ६·०७ | ४५७९३ | १५२६ | ६ |
| के. एस. अय्यर अँड कं. | ३६ | ५·९० | ४४४३६ | १०६७ | ३ |
| रे अँड रे | १५ | ५·१३ | ३८३५३ | २५५७ | ४ |
| एस. आर. बाटलीबॉय अँड कं. | २६ | ३·८० | २८८५२ | १११० | ५ |
| दलाल अँड शहा | ३१ | ३·८० | २८६५७ | ९२४ | ४ |
| सी. सी. चोक्सी अँड क. | २९ | ३·५० | २६९६० | ९३० | ६ |
| एन. एम. रायजी अँड कं. | २० | ३·०० | २२६३४ | ११३२ | ४ |
| ब्रह्मय्या अँड कं. | ३३ | २·०० | १५०८१ | ४५७ | ७ |
| सिंगजी अँड कं. | २७ | १·८० | १३४७५ | ४९९ | ६ |
| फोर्ड, रोडस् पार्क | १२ | १·६० | १२४२६ | १०३५ | ६ |
| एम. के. दांडेकर अँड कं. | १० | १·६० | ११९५८ | ११९५ | ४ |
| फ्रेझर अँड रॉस | ३८ | १·३५ | १०३३७ | २७२ | ७ |
| जी. बसू अँड कं. | १८ | १·१२ | ८४६४ | ४७० | ४ |
| सोराब एस इंजिनिअर | २२ | १·१२ | ८४८० | ३८५ | ५ |
| | ६९९ | ६९·४० | ५२४९४७ | | १०७ |
| इतर १९ ऑडिटर्स | १५५ | ११·१५ | ८३८८६ | | |
| सहकारी ऑडिटर्स | ७ | ०·४५ | ३३६१ | | |
| इतर | ३१२ | १९·०० | १४१६१८ | | |
| | ११७३ | १००·०० | ७५३८१२ | | |

### ऑडिटिंग व्यवसायातील बड्या १७ फर्म्स

कंपन्यांच्या ऑडिटचे काम काही थोड्या फर्म्समध्येच वाटले गेलेले आहे, ही तक्रार काही नवी नाही. भारतातील स्टॉक एक्सचेंजवर ज्या कंपन्यांचे भाग खरीदले-विकले जातात अशा आणि काही सरकारी क्षेत्रातील मिळून १,१७३ कंपन्यांच्या ऑडिटर्सची छाननी करण्यात आली, त्यात कंपन्यांची एकूण जिंदगी विचारात घेण्यात आली. एक कोटी रु. पेक्षा कमी जिंदगी असलेल्या कंपन्यांचा त्यात समावेश नाही.

---

### सौ. वैशाली लिमये चार्टर्ड अकौंटंट झाल्या

सांगलीतील बी. एड. महाविद्यालयाचे उपप्राचार्य क. श्री. काळे व सुप्रसिद्ध कवयित्री सौ. विमल काळे यांच्या सुकन्या आणि चार्टर्ड अकौंटंट श्री. विक्रम लिमये यांच्या पत्नी सौ. वैशाली लिमये या दिल्ली येथील इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटसूच्या सी. ए. (चार्टर्ड अकौंटंट) अंतिम परीक्षेत उत्तीर्ण झाल्या. यापुढे त्या आपल्या पतीसमवेत चार्टर्ड अकौंटंटस् व्यवसायात भागीदार म्हणून काम करणार आहेत.

**पोस्ट-तार खात्याचे फॉर्म्स कमी करणार**—पोस्ट आणि तार खात्याच्या कामासाठी सध्या एकूण २,१२५ फॉर्म्स वापरण्यात येतात, त्यांची संख्या कमी करण्यासाठी त्यांची तपासणी करण्यात येत आहे. त्यामुळे दरवर्षी एक कोटी रु. ची बचत होईल.

**एका पेक्षा अधिक अपत्ये आवश्यक**— "एकच अपत्य असले म्हणजे ते लाडावले जाते आणि त्याला स्वतःच्या तंत्राने वागण्याची सवय लागते. कम्युनिझमला योग्य अशी नागरी वृत्ती त्याच्यात निर्माण होत नाही." असे एका मानसशास्त्रज्ञाने एका रशियन वृत्तपत्रात लिहिले आहे. रशियातील जननाचे प्रमाण झारशाहीच्या काळाच्या मानाने ५०% घटले आहे. ह्या प्रवृत्तीला आळा घालण्याची आवश्यकता तेथे निर्माण झाली आहे.

**ओव्हरटाइमवर १० कोटी रु. खर्च**—पोस्ट आणि तार खात्याने ओव्हरटाइमसाठी गेल्या वर्षी १० कोटी रु. खर्च केले. ओव्हरटाइमचा भत्ता मिळविण्यासाठी कर्मचारी आलटून पालटून गैरहजर राहतात आणि मंद गतीने काम करतात, अशी तक्रार आहे.

पुण्यतिथिनिमित्त श्रद्धांजली

# कै. नारायणराव सोपानराव बोरावके

श्री. नारायणराव सोपानराव बोरावके यांचा जन्म ता. १७ ऑक्टोबर १८९२ रोजी झाला. त्यांचे शिक्षण मराठी ७ वी पर्यंत झाले. त्यांनी शेती शिक्षण सहकार इत्यादी क्षेत्रांत अत्यंत भरीव कार्य केले आहे. उसाच्या अनेक जातींची लागवड करून उत्पादनवाढही घडवून आणली. फळझाडे, संत्री, मोसंबी, ग्रेफ्रूट, कागदी लिंबू इत्यादी रोपे व कलमे करण्याची त्याची कामगिरी मोठी आहे. ते १९२९ ते १९३५ पर्यंत अहमदनगर जिल्हा लोकल बोर्डाचे सदस्य होते व त्या वेळीही त्यांनी तेथे मोठी भरीव कार्ये लोकोपयोगासाठी केली. १९५२ च्या दुष्काळ समितीवर त्यांनी खजिनदार म्हणून काम केले. कोपरगाव शेतकी प्रदर्शन हे तर त्यांचे भरीव कार्य असून ते प्रथमपासून ते त्याचे तहाहयात सभासद होते.



## शैक्षणिक-कार्य

राहाता, ता. कोपरगाव येथे चारी नंबर १५ वर प्राथमिक शाळा काढली. श्रीरामपूर येथे रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज १९६० साली सुरू केले. सातारा येथील रयत शिक्षण संस्थेचे ते उपाध्यक्ष होते. पुणे महाराष्ट्र मंडळ टिळक रोड या संस्थेकडेही त्यांचे लक्ष होते. विद्यार्थी वसतिगृहे, हायस्कूल्स व व्यायामशाळा यांना त्यांनी आर्थिक मदत केली. क्षत्रिय माळी ए. सो. चे ते अध्यक्ष होते. सासवड येथे त्यांनी आपल्या जन्मगावी लक्ष्मीबाई विद्यार्थी वसतिगृह काढून खेड्यातील शिकाऊ मुलांच्या राहण्याची व्यवस्था केली. ठिकठिकाणच्या शाळांना त्यांनी योग्य ती आर्थिक मदत वेळोवेळी दिली.

## शेती व्यवसाय

(१) सहकारी साखरकारखाना कोळपेवाडी, कोपरगाव स्थापन करण्याच्या वेळी जास्तीत जास्त शेअरभांडवल मिळवून देऊन कारखाना उभा केला.

(२) गणेश सहकारी साखरकारखाना, राहाता स्थापन करण्याच्या कामी शेअरभांडवल मिळवून देऊन कारखान्यास जमीन मिळवून दिली.

(३) सन १९३२ साली माळीनगर, जि. सोलापूर येथे शेतकऱ्यांचा सहकारी तत्त्वावर पहिला साखरकारखाना महाराष्ट्रात काढून त्याचे संचालकाचे धुरीणत्व पहिल्यापासून केले.

(४) त्यांनी शेतीविषयक खालील सुधारणा केल्या. यांत्रिक ट्रॅक्टर, बैलाचे मोटेऐवजी ऑईल एंजिन्स, पाण्याचे पंप, इलेक्ट्रिक पंप बसवून लिफ्ट इरिगेशन सुरू केले.

(५) सरकारी पद्धतीने कंपोस्ट खत तयार करवून त्यांचा वापर करण्यास सुरुवात केली.

(६) गव्हाच्या व कपाशीच्या सुधारलेल्या जाती लावून उत्पादनवाढ मोठ्या प्रमाणात केली.

(७) हायब्रीड ज्वारीचे बी तयार करून सोलापूर जिल्हा परिषदेस पुरविले.

(८) कमर्शिअल हायब्रीड ज्वारीचे उत्पादन वाढवून धान्य-उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढविले.

## इतर कार्ये

मु. पो. राहाता, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर येथे जनावरांचा दवाखाना काढून तो स्वत: चालवून पुढे तो ग्रामपंचायतीस दिला.

औद्योगिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असलेल्या किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी या कंपनीचे संचालक मंडळामध्ये संचालक म्हणून शेवटपर्यंत काम केले.

पुणे लॉर्ड रे म्युझियम या संस्थेच्या समितीवर विश्वस्त म्हणून काम केले.

दि बँक ऑफ कऱ्हाडचे ते डायरेक्टर होते व अनेक संस्थांच्या कामात त्यांनी हरतऱ्हेने मदत करून त्यांना नावारूपास आणले.

रा. ब. विज्ञानवादी असूनही परमेश्वरावर त्यांची श्रद्धा असे. पाश्चात्य ज्ञानाबरोबर त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान असे.

पुणे-मिरज हा रेल्वे रस्ता ब्रॉड गेज करण्यात त्यांचा मोठा वाटा होता.

## शिकवण

सतत उद्योग करा. खोट्या अभिमानास बळी पडू नका. चांगल्या गोष्टींचे मनन करून त्या आचरणात आणा. वडीलधाऱ्यांचा मान ठेवा. आपसांत झगडू नका. सहकार्याने वागा. एकी हेच बळ, हे तत्त्व वाढीस लावा. तुम्ही कोणतेही काम करा पण ते मनापासून करा. खर्च कमीत कमी करून उत्पादन जास्तीत जास्त वाढवा. प्रत्येक दिवसाचा आगाऊ कार्यक्रम आखून त्याप्रमाणे आखणी करा. ते सर्व अमलात आणा.

अशा अनेक व्यवहारी तत्त्वांचे ते मोठे आधारस्तंभ असून त्याप्रमाणे वागत.

अशा थोर गृहस्थाच्या कामगिरीनिमित्त त्यांना सरकारने बहुमोल पदवी द्यावयास हवी होती. आता त्यांचे स्मरणार्थ पोस्टाचे तिकीट तरी काढावे.

## टेलिव्हिजन सेट्सच्या किमती खाली आणणार

टेलिव्हिजन सेट्सच्या किमती खाली आणण्यासाठी काय करता येईल ह्याचा विचार भारत सरकारचे माहिती व नभोवाणी खाते करीत आहे. चंदीगड येथे एक हजार रुपयांना विकता येण्यासारखा एक सेट तयार करण्यात आला आहे. येत्या सहा महिन्यांत तो विक्रीसाठी बाजारात येण्याची शक्यता आहे. टी. व्ही. सेट्सच्या किमती कमी करण्यासाठी अनेक उपायांचा विचार सध्या चालू आहे. सध्या ह्या सेट्सच्या ज्या किमती आहेत त्यातील एकतृतीयांश हिस्सा अबकारी कर आणि विक्रीकर ह्यांचा आहे. तेव्हा हे कर कमी करण्याच्या शक्यतेचा अंदाज घेण्यात येणार आहे. त्यासंबंधी कारखानदारांशी विचारविनिमय करण्यात येईल. सेट्सच्या किमती उतरविण्यात यश आले तर प्रेक्षकांची संख्या वाढेल असा अंदाज करण्यात येत आहे. सार्वजनिक संस्थांना टी. व्ही सेट्स अल्प किमतीत अगर मोफत देण्याचाही विचार करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीसारख्या ठिकाणी मोफत सेट्स देण्याचे ठरविण्यात आले तर त्यासाठी पैसा उभा करावा लागेल. माहिती व नभोवाणी खात्यातर्फे ह्याविषयी नियोजन समितीशी चर्चा करण्यात येणार आहे. सेट्स मोफत वाटण्यासाठी पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात तरतूद करण्यात येण्याचा संभव आहे. टी. व्ही. च्या ग्रामीण क्षेत्रात प्रत्येक खेडेगावी एक सेट आणि शहरातून प्रत्येक वॉर्डमध्ये एक सेट मोफत पुरविण्यात येण्याची शक्यता आहे. ह्याचा अर्थ टेलिव्हिजनच्या प्रत्येक प्रक्षेपण केन्द्रामागे १ हजार ते २ हजार सेट्स पुरवावे लागतील. त्याच्या खर्चाचा अंदाज घेण्यात येत आहे.

---

## केळ्याच्या पिकासाठी विकासमंडळ

केळ्यांचे उत्पादन, अंतर्गत विक्री आणि निर्यात ह्या सर्व बाबींकडे लक्ष देऊन केळ्यांच्या पिकाचा विकास करण्यासाठी लवकरच सार्वजनिक विभागात एका कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात येणार आहे. सध्या केळ्यांच्या निर्यातीत तोटा होत असतो. तो अंतर्गत विक्रीपासून होणाऱ्या नफ्यातून भरून काढण्याचा प्रयत्न कॉर्पोरेशन करील. तामीळनाडू, केरळ, म्हैसूर आणि आंध्र ह्या चार राज्यांचे मिळून केळी व फळे विकासमंडळ सध्या अस्तित्वात आहे. त्याची पुनर्घटना करण्यात येऊन मध्यवर्ती सरकार नवीन कॉर्पोरेशन स्थापन करणार असून त्यात मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहे. गोवा, पश्चिम बंगाल, ओरिसा, महाराष्ट्र व गुजरात ह्या राज्यांतही केळ्यांचे चांगले उत्पादन होते. त्यांना नवीन संकल्पित कॉर्पोरेशनमध्ये सामील करून घेण्यात येणार आहे. कॉर्पोरेशनच्या भाग-भांडवलात मध्यवर्ती सरकार ४० लाख रुपयांचे भांडवल घालणार आहे. राज्य सरकारामार्फत १० लाख रुपयांचे भांडवल गोळा करण्यात येणार आहे. केळ्यांच्या बाजारपेठेची पाहणी करून त्या संघटित करणे, केळी उत्पादन करणाऱ्या उत्पादकांच्या सहकारी संघटना स्थापन करणे, त्यांच्यामार्फत दीर्घकालीन पुरवठ्याची तरतूद करणे इत्यादी कामे कॉर्पोरेशनने करावयाची आहेत. त्याशिवाय केळ्यांची लागवड, वाहतूक व पॅकिंग ह्या बाबतीत उत्पादकांना तांत्रिक सल्ला देणे, हे कामही कॉर्पोरेशनला करावे लागणार आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेअखेर कॉर्पोरेशनमार्फत १ लाख टन केळ्यांची निर्यात होऊन सुमारे ७ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळेल असा अंदाज आहे.

---

## हिंदी आरमारासाठी गस्त घालणाऱ्या बोटी

भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या अलीकडील युद्धात हिंदच्या आरमाराने अपूर्व कामगिरी केली. तरीही हिंदच्या सागरी किनाऱ्याची लांबी लक्षात घेता आरमाराची आणखी वाढ करण्याची जरुरी सहजच पटते. त्यातूनही हिंदी महासागर हा शांतता-विभाग ठेवण्याच्या भारताच्या आग्रहाला बडी राष्ट्रे साथ देतीलच अशी शाश्वती नाही. म्हणून आरमार बळकट करण्याचे प्रयत्न केव्हाही स्वागतार्हच म्हटले पाहिजेत. कलकत्ता येथील गार्डन रीच कारखान्यात आता गस्त घालणाऱ्या आरमारी बोटी बांधण्यास प्रारंभ करण्यात येणार आहे. किनाऱ्याचे रक्षण करण्यासाठी अशा प्रकारच्या बोटी आवश्यक आहेत. ह्या बोटींवर पाणबुड्यांचा नाश करणारी सामग्री ठेवण्यात येणार आहे. गार्डन रीच येथील कारखान्याने पाच बोटी बांधल्या असून तेथील बोटी बांधण्याच्या सोयींचा येत्या तीन वर्षांत आणखी विस्तार करण्यात यावयाचा आहे. नव्या सोयी उपलब्ध झाल्यावर कारखान्यात २५ ते ३० हजार टन वजनाच्या सागरी बोटी बांधता येतील. १९७६ च्या सुमारास २० हजार टनांची पहिली बोट बांधून पुरी होईल असा अंदाज आहे. त्याशिवाय बंदरातील गाळ काढण्याच्या बोटीही तेथे बांधण्यात येतात. सध्या तेथे कलकत्ता बंदराला उपयोगी पडेल अशी ७,५०० टन वजनाची गाळकाढू बोट बांधण्यात येत आहे. बोटीसाठी ९ कोटी रुपये खर्च येणार आहे. कारखान्याच्या विस्तारासाठी ३ कोटी रुपयांची योजना आखण्यात आली आहे. ६ व्या पंचवार्षिक कार्यक्रमाअखेर कारखान्याची उलाढाल ५० कोटींपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.

---

## धूर ओकणाऱ्या मोटारगाड्यांची नोंद

मुंबई-कलकत्त्यासारख्या मोठ्या औद्योगिक शहरांतून हवा दूषित होत चालली आहे. हवा दूषित करण्यात शहरातील मोटारींच्या संख्येचा व त्यांतून बाहेर पडणाऱ्या धुराचा मोठा वाटा असतो. ज्या मोटारींतून वाजवीपेक्षा अधिक दाट धूर बाहेर येत आहे अशा मोटारींची नोंद करण्याचे काम मुंबईच्या वाहतूक पोलिसांनी हाती घेतले आहे. अलीकडे एक आठवडाभर त्यांनी ही मोहीम चालू केली असता ९३० मोटारींतून बाहेर पडणारा कार्बनमिश्रित धूर वाजवीपेक्षा अधिक दाट होता असे आढळून आले. मध्य मुंबईत अशा ४४४ मोटारी आढळल्या, तर उत्तर मुंबईत २२६ आणि दक्षिण मुंबईत १४३ मोटारींची नोंद करण्यात आली.

## निर्मनुष्य समुद्रकिनाऱ्यावरील नग्नता गुन्हा नाही

इटालीमधील एका कोर्टाने असा निकाल दिला आहे की, निर्मनुष्य असलेला समुद्रकिनारा ही सार्वजनिक जागा म्हणता येणार नाही; आणि म्हणूनच अशा ठिकाणी विवस्त्र अवस्थेत वावरणे हा गुन्हा होऊ शकत नाही. पूर्व जर्मनीतील दोन तरुणी ॲड्रिॲटिक समुद्रावरील किनाऱ्यावर नग्नावस्थेत स्नान करीत होत्या. त्यांपैकी एकीवर एका इटालिअन तरुणाने बलात्कार करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा हे प्रकरण कोर्टापुढे आले होते. इटालीत सार्वजनिक ठिकाणी नग्न अवस्थेत फिरणे हा गुन्हा मानण्यात आला असून तो करणाऱ्यास ६ महिने तुरुंगवासाची शिक्षा देण्याची तरतूद आहे.


## घटस्फोटाचा विमा

आयुष्याचा, घराचा, मोटारीचा, विमा असतो तसा घटस्फोटाचा आणि पोटगीचा विमाही असावा, अशी कल्पना अमेरिकेत मूर्त स्वरूपात येऊ पाहात आहे. मुलांच्या संभाळासाठी घटस्फोटित मातांना कोर्टाने देवविलेली रक्कम अपुरी असते आणि माजी नवरे ती देण्यात कसूर करतात, त्यावर हा उपाय आहे. विमेदाराने दरसाल ५० डॉलर्सचा हप्ता द्यावयाचा आणि घटस्फोटामुळे विवाह मोडल्यास पत्नीला दरमाहा १०० डॉलर्स मिळत रहावेत अशी योजना होऊ शकेल. जास्त हप्ता दिला तर पोटगीचीही व्यवस्था होईल. घटस्फोटाचा विमा प्रत्येक दांपत्याला सक्तीचा केला तरच विमा योजना यशस्वी होऊ शकेल; कारण एरवी फक्त एकमेकांशी न पटणारी दांपत्येच विमा उतरवतील ! मोटारीचा विमा उतरल्याखेरीज ती चालविता येत नाही; विवाहाला तोच कायदा लागू करावा लागेल !

## चलनी नोटेवरील छापील सही माझीच !

एका मोटार मालकाने एका पेट्रोलपंपावर पेट्रोल भरून घेतले आणि तेथील नोकराला १०० रुपयांची नोट दिली. १०० रुपयेवाल्या वनावट चलनी नोटा बऱ्याच प्रमाणात प्रसृत झालेल्या होत्या, म्हणून त्या नोकराने मोटारमालक गिऱ्हाइकाला ओळखीसाठी नोटेवर आपली सही करायला सांगितले. त्याने त्याप्रमाणे सही करून ती नोट नोकराला परत दिली. नोकराने ती सही नीट पाहून जरा चिडून म्हटले, "मी तुम्हांला तुमची स्वतःची सही करायला सांगितले होते; नोटेवर छापलेल्या सहीची नक्कल करायला सांगितले नव्हते." गिऱ्हाइकाला हसू आवरले नाही. त्यांनी उत्तर दिले "नोटेवर ज्याची 'एच. व्ही. आर. अय्यंगार' अशी सही आहे, तो म्हणजे मीच आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा मी गव्हर्नर होतो त्या वेळी माझ्या सहीनेच ही नोट काढलेली होती."


IMPORT SUBSTITUTE
GADRE KEYS



ALL TYPES AS PER SPECIFICATION

GADRE BROTHERS MADHAVNAGAR (MAHARASHTRA)
PHONE NO. 2318 GRAM: "SEWA"



चवदार पिठासाठी
पिठाच्या चक्क्या
•बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
•मजबूत बांधणी
•अद्यावत् यंत्र योजना
•साईज १४", १६", १८"




उत्पादक -
भिडे ॲण्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | | |
|---|---|---|
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)<br>कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)<br>उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६ |

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."
—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**




## पाणी....पाणी
### हवं तेव्हा, हवं तितकं

शेतातून सोनं पिकवायचं असेल तर पिकाला वर्षभर, हवं तेव्हा – हवं तितकं पाणी मिळायला हवं.

*त्यासाठी भरवशाचं असं 'एकच'*

## किर्लोस्कर एंजिन
३ ते १५ हार्स पॉवर

किर्लोस्कर

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड,
रजि. ऑफिस–एल्फिन्स्टन रोड, पुणे-३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स् यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविला आहे.

Tom & Bay/KO-7182-M


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३९ पुणे, बुधवार, ७ मार्च, १९७३ अंक ५

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.



Madison/TGM/7 Mar

TF **ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

## डॉलरच्या अवमूल्यनाचा तागाच्या निर्यातीला तडाखा

अमेरिकेच्या डॉलरचे अवमूल्यन करण्यात आल्यामुळे ताग व तागाचा माल निर्यात करण्याऱ्या परदेशी व्यापाराला मोठा तडाखा बसला आहे. भारतामधून दरसाल जवळजवळ १३१ कोटी रुपये किंमतीचा तागाचा माल परदेशी निर्यात करण्यात येतो आणि त्यापैकी ५४ टक्के किंमतीचा माल डॉलरच्या कक्षेत असणाऱ्या देशांत पाठविला जातो. इंडिअन ज्यूट मिल्स असोसिएशनने ह्याबाबत एक पत्रक काढून अवमूल्यनामुळे तागाच्या निर्यातीचे नुकसान होणार नाही हा समज खोटा असल्याचे जाहीर केले आहे. तागाचा माल व त्याला पर्यायी म्हणून वापरण्यात येणारा कृत्रिम धाग्याचा माल ह्यांत आधीच जोराची स्पर्धा चालू होती. तागाच्या निर्यातीवरील निर्यात-कर रद्द केल्याने तागाच्या मालाची स्पर्धेची शक्ती टिकून राहील असे नाही.

---

## आंतरराष्ट्रीय कायद्यापुढे नवे प्रश्न

दिल्ली येथील इंटरनॅशनल लॉ असोसिएशनच्या परिसंवादात बोलताना भारताचे सरन्यायाधीश श्री. सिक्री म्हणाले की शास्त्र, तंत्र आणि व्यापार ह्यांचा अतिशय वेगाने विकास झाला आहे आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यापुढे नवेनवे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यांचा अभ्यास करून कायदा काय आहे व तो कसा असावा ह्याबद्दल कायदेपंडितांनी मार्गदर्शन केले पाहिजे. माणूस आता चंद्रावर पोचला आहे. पण त्याला पृथ्वीवरील व्यापारी भांडणे आणि चलनाचे प्रश्न सोडविता आलेले नाहीत. जगातील चलनाची सध्या जी बिकट अवस्था झाली आहे ती सोडविण्याचा एक विनोदी मार्ग सांगता येईल. पृथ्वीवरील सर्व सोनेचांदी ह्यांची उचलेबांगडी करून ही सर्व संपत्ती चंद्रावर पाठवून देण्यात यावी. मग कदाचित् हा प्रश्न सुटेल.


---

## भारी एंजिनिअरिंग अर्थव्यवस्थेचा आधार

भाभा अणुशक्ती संशोधन केंद्राचे अध्यक्ष श्री. एच. एन्. सेठना ह्यांनी एका प्रसंगी बोलताना असा अभिप्राय व्यक्त केला की देशाच्या औद्योगीकरणाचा मुख्य आधार भारी एंजिनि-अरिंगच्या धंद्याचा विकास हा आहे. ह्या धंद्यात भारत सरकारने खूप मोठी भांडवलाची गुंतवणूक केलेली असली तरी त्यापासून समाधानकारक उत्पादन होत नाही. विजेच्या निर्मितीसाठी लागणारी यंत्रसामग्री व इतर साधने ह्या धंद्यातील भांडवल-गुंतवणूक बरीच आहे. अवजड एंजिनिअरिंगच्या धंद्यातील उत्पादन इष्ट पातळीवर आणून नंतर ते वाढविण्याकडे लक्ष देण्यात आले पाहिजे. उत्पादन वाढविण्यात यश आले तर देशाची अर्थ-व्यवस्था नव्या युगाची वाटचाल करू लागेल आणि तिची प्रगती नाट्यमय आणि झपाट्याने होईल ह्यात शंका नाही.

---


दर्जेदार किर्लोस्कर एंजिनांना
भारतीय मानक संस्थेचे
प्रमाण पत्र
५ ते ८ हॉर्स पॉवर




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आता भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर ®

किर्लोस्कर एंजिन– शेतकऱ्याची पहिली पसंती

किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स् लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315-M

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ७ मार्च, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## नव्या वर्षाचे अंदाजपत्रक

अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी बुधवार, दि. २८ रोजी लोकसभेस मध्यवर्ती सरकारचे अंदाजपत्रक सादर केले, त्याच्या प्रस्तावनेत त्यांनी ज्या महान उद्दिष्टांचा उल्लेख केला, त्या मानाने प्रत्यक्ष योजना सामान्यच वाटते, अशा टीकेला त्यांनी अप्रत्यक्ष रीत्या वाव देऊन पुरवणी मागण्यांची पूर्वतयारी तर करून ठेवली नसेल ना ?

चालू वर्षी ( १९७२-७३ ) ५५० कोटी रु. ची तूट अपेक्षित असून पुढील वर्षीच्या तुटीचा अंदाज ३३५ कोटी रुपयांचा आहे. श्री. चव्हाण ह्यांनी २९२ कोटी रु. चे नवीन कर बसविण्याचे ठरवून ही तूट ८५ कोटी रु. वर आणून ठेवण्याचे ठरविले आहे. गेली कित्येक वर्षे अर्थमंत्री तूट भरून काढण्यासाठी आवश्यक तेवढी करवाढ न करता बरीचशी तूट तुटीच्या अर्थ-व्यवस्थेने ( नोटा छापून ) भरून काढीत आले आहेत आणि ही व्यवस्थाही अपुरी पडून नियोजितपेक्षा कितीतरी अधिक चलनविस्तार करण्याची पाळी सरकारवर येत असे. विकासाला हा चलनविस्तार पोषक होईल पण त्याचे घातुक परिणाम टळतील, असे त्याचे समर्थन करण्यात येत असे. ह्या खेपेस अर्थ-मंत्र्यांनी हा सोपा मार्ग अवलंबिला नाही आणि अपेक्षित तुटीपैकी ७१% तूट करवाढीने भरून काढण्याचे ठरविले ही प्रशंसनीय गोष्ट आहे. ह्यासंबंधातील पूर्वीच्या चुका त्यांनी सुधारल्या आहेत. परंतु पुरवणी मागण्यांच्या पूर्ततेसाठी चलनविस्ताराचा मोठ्या प्रमाणावर अवलंब करावा लागणार आहे.

अर्थमंत्र्यांनी मुख्यतः अप्रत्यक्ष करातच वाढ केली आहे त्यामुळे ती लोकांना प्रत्यक्ष रीत्या तात्काळ जाणवणार नाही. परंतु तयार मालाची किंमत वाढणे अपरिहार्य आहे. नवीन करवाढ आवश्यक असल्यानंतर ती कुणालाही जाणवणार नाही अशा रीतीने ती कशी करता येणार ? प्रत्यक्ष करांचे बाबतीत, इन्कम टॅक्स आकारताना शेतीचे उत्पन्न बिगर-शेतीचे उत्पन्नात मिळविण्याचा निर्णय महत्त्वाचा आहे. फार दिवसां-पासून ह्या सुधारणेची गरज होती, परंतु हितसंबंधीयांचे वजन त्याच्या आड येत होते. अर्थमंत्र्यांनी फक्त उत्पन्न वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले आहे; खर्चाला कात्री लावण्याकडे लक्ष दिलेले नाही. संरक्षक खात्याच्या खर्चाचा अंदाज १६०० कोटी रु. चा आहे; हा खर्च सालोसाल वाढतच जाणारा दिसतो पे कमिशनच्या अहवालाच्या शिफारशींमुळे सरकारचा खर्च बराच वाढणार आहे. त्याच्या तरतुदीसाठी अर्थमंत्र्यांना उत्पन्नाच्या नव्या बाबी शोधून काढाव्या लागतील.

चालू घडी फारशी न विघडविता समाजवादी समाजरचनेकडे यशस्वी वाटचाल वेगाने होऊ शकते का, असा प्रश्न प्रस्तुत अंदाजपत्रकाने उपस्थित केला आहे.

---

## केरळच्या एंजिनिअरांचे सहकारी कारखाने

एंजिनिअरांसारख्या तंत्रज्ञांची बेकारी आणि तीही भारता-सारख्या मागासलेल्या देशात ही मोठी चिंतेची बाब होऊन राहिली आहे. सरकारी पातळीवर त्यांची बेकारी दूर करण्याचे प्रयत्न होत आहेतच. पण खुद्द एंजिनिअरांनी एकत्र येऊन सहकाराच्या वाटेने स्वतःच स्वतःला रोजगार उत्पन्न करून दिला तर ते अधिक उचित ठरेल. कारण अशा प्रयत्नात त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग होऊन शिवाय त्यांच्यातील संघटनाकौशल्याचीही परीक्षा होते. ह्या बाबतीत केरळ राज्यातील एंजिनिअरांनी चांगले कार्य चालविले आहे. तेथील एंजिनिअरांच्या सहकारी संघटनेने अनेक प्रकारांचे कारखाने काढून चालविले आहेत. त्यांच्या सहकारी संघटनेने आणखी १४ कारखाने काढण्याचा निर्णय घेतला आहे ह्या कारखान्यांतून ८ कोटी रुपयांचे भांडवल गुंतविले जावयाचे आहे. सध्या चालू असलेल्या सहकारी कारखान्यात एक स्कूटर्सचा कारखाना आहे. ह्या व इतर कारखान्यांतून पूर्वी बेकार असलेल्या १ हजार एंजिनिअरांना काम मिळाले आहे. रोजगार मिळालेल्या एंजिनिअरात पदविका व पदवी घेतलेल्यांचा समावेश आहे. नव्याने काढण्यात यावयाच्या कारखान्यांतून मुख्यतः निर्यातीच्या गरजा भागविण्यात येणार आहेत. आणखी १ हजार एंजिनिअरांना त्यात काम मिळणार आहे. आणखीही एक गोष्ट लक्षात घेण्या-सारखी आहे. सहकारी संघटनेतर्फे काढण्यात येत असलेले कारखाने कोणत्याही एका ठिकाणी केंद्रित करण्यात आलेले नाहीत. केरळमधील निरनिराळ्या जिल्ह्यात ते पसरविण्यात येत आहेत. स्वतः स्वतःसाठी उद्योग निर्माण करण्याच्या ह्या कार्य-क्रमामुळे एंजिनिअरांत मोठा उत्साह निर्माण झाला असून त्यांच्या-वरील बेकारीची छाया निवळू लागली आहे.

---

## मध्यवर्ती सरकारचे अंदाजपत्रक

(आकडे कोटी रु. चे)

| | | | |
|---|---|---|---|
| | उत्पन्न | | |
| | १९७२-७३ | १९७२-७३ | १९७३-७४ |
| | बजेट | दुरुस्त | बजेट |
| जमा | ४,४६७ | ४,६२८ | ४,८३१ +२५०* |
| खर्च | ४,१२४ | ४,५९१ | ४,७५२ |
| | +३४३ | +३७ | + ७९ +२५०* |
| | भांडवली | | |
| जमा | २,०९५ | २,६५२ | २,४६० |
| खर्च | २,६८९ | ३,२३९ | २,८७४ |
| | –५९४ | –५८७ | –४१४ |
| एकूण तूट | –२५१ | –५५० | –३३५ +२५०* |
| | | भरून न काढलेली तूट | ८५ |

*बजेटात सुचविलेल्या दरवाढीचा परिणाम

### आता आम्ही म्हातारे झालो

जगाच्या व्यवहारात राजकारण हे असे एक क्षेत्र आहे की ज्यात वयाची अट नाही. त्यामुळेच अनेक देशातील राजकारणी पुढारी वय झाले तरी अधिकारपदावर बसलेले दिसतात. चीनच्या पुढाऱ्यांना ह्याची जाणीव दिसते. चीनचे पंतप्रधान श्री. चौ एन लाय जपानच्या तरुणांपुढे बोलताना म्हणाले की, पेकिंगमधील वरिष्ठ पुढारी आता म्हातारे झालेले आहेत. त्यांनी आपल्या जागा आता तरुण पुढाऱ्यांसाठी खाली कराव्या. चौ एन लाय आता ७५ वर्षांचे असून त्यांनी चीन देशाच्या पंतप्रधानकीची सूत्रे २४ वर्षे सांभाळली आहेत. चिनी पुढारी माओ त्से तुंग त्यांच्याहून फारसे मोठे नाहीत. शिवाय ते मधून मधून आजारीही असतात.

**सहकारी संस्थांतील अफरातफर** — बृहन्मुंबईमधील सहकारी सोसायट्या आणि बँका ह्यांतील अफरातफरीची पाच प्रकरणे १९७१ मध्ये सी. आय. डी. कडे चौकशीसाठी सोपविण्यात आली. त्यात ४५,६८,२०२ रु. च्या अफरातफरीबाबत तक्रार आहे. १९७२ मधील तत्सम सहा प्रकरणात १३,९६,५२७ रु. गुंतलेले आहेत.

**नेपाळला चिनी तंत्रज्ञांची मदत** — चिनी मदतीने उभारण्यात येत असलेल्या सन कोसी हायड्रो इलेक्ट्रिक प्रकल्पासाठी चीन २५ तंत्रज्ञ पाठविणार आहे.

## रेल्वे अर्थसंकल्प (कोटी रु.)

| | प्रत्यक्ष १९७१-७२ | बजेट अंदाज १९७२-७३ | दुरुस्त अंदाज १९७२-७३ | बजेट अंदाज १९७३-७४ |
|---|---|---|---|---|
| एकूण वहातुक उत्पन्न | १०९६·५९ | ११४३·१० | ११७४·०० | १२६४·३५ |
| नित्याचे खर्च | ७९५·३२ | ८०९·१४ | ८५६·६८ | ९१८·२५ |
| घसारा रिझर्व्ह फंडाकडे वर्ग | १०५·०० | ११०·०० | ११०·०० | ११५·०० |
| पेन्शन फंडाकडे वर्ग | १२·०० | १६·०० | १६·०० | १६·०० |
| किरकोळ खर्च | १५·१९ | १५·७३ | १५·७४ | १७·४८ |
| एकूण | ९२७·५१ | ९५०·८७ | ९९८·४२ | १०६६·७३ |
| निव्वळ रेल्वे उत्पन्न | १६९·०८ | १९२·२३ | १७५·५८ | १९७·६२ |
| मध्यवर्ती जमेला दाखल | १५१·२४ | १५९·७० | १६३·१८ | १७२·६१ |
| निव्वळ वाढावा (+) तूट (–) | (+)१७·८४ | (+)३२·५३ | (+)१२·४० | (+)२५·०१ |
| खर्चाचे प्रमाण | ८३·१% | ८१·८% | ८३·७% | ८३·०% |

### ग्रामीण भागातील विद्यार्थी व उच्च शिक्षण

गृहखात्याचे राज्यमंत्री श्री. शरद पवार ह्यांनी एका शिक्षण-संस्थेच्या इमारतीच्या पायाचा दगड बसवताना काही परखड विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की, ग्रामीण भागातील जे विद्यार्थी एस. एस. सी. परीक्षेला बसतात त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी नेटाने प्रयत्न करण्यात आले पाहिजेत. त्यांचा शैक्षणिक दर्जा बेतासबात असल्यामुळे उच्च शिक्षणाचे मार्ग बंद झाल्यासारखे झाले आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थी कठीण मानल्या गेलेल्या विषयांच्या वाटेला जात नाही. इंग्रजी भाषा, गणित व शास्त्रे ह्यांचा अभ्यास करण्याचे तो टाळताना दिसतो. ह्याचा परिणाम असा झाला आहे की उच्च शिक्षणाचे सर्व दरवाजे त्याला पूर्णपणे बंद झालेले आहेत. अलीकडे महाराष्ट्रात नवा बागाइतदार वर्ग निर्माण झाला आहे. ह्या वर्गाने शेतकरी म्हणून चांगले नाव कमाविले आहे. त्यांच्यापैकी काही जणांनी उद्योगधंद्याच्या क्षेत्रातही यशस्वीपणे पदार्पण केले आहे. परंतु त्यांच्या मुलांनी फारशी चांगली कीर्ती मिळवलेली नाही. बागायतदारांनी आपल्या मुलांकडे अधिक लक्ष दिले पाहिजे आणि त्यांना सुबुद्ध करण्याचे आणि अवघड परीक्षा उत्तीर्ण होण्याचे बाळकडू पाजले पाहिजे. इमारतीच्या पायाभरणी समारंभाचे अध्यक्ष डॅ. विठ्ठलराव गाडगीळ म्हणाले की स्पर्धात्मक परीक्षांत महाराष्ट्रीय विद्यार्थी मागे पडत चालला आहे. ह्याचे एक कारण असे आहे की एस. एस. सी. परीक्षेत अवघड व महत्त्वाचे विषय सोडून पास होण्याची त्यांची वृत्ती असते.

# व्यवस्थापनातील समस्या ( ६ )

## खातेबदल व पुनर्रचना

**लेखक : सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.**

" शक्ति प्रॉडक्टस् " ही गेल्या १० वर्षांत उत्पादनात लक्षणीय वाढ व विविध वस्तूंचे उत्पादन यामुळे विख्यात झालेली एक कंपनी ! या कंपनीच्या शेअरचा भावही वाढत वाढत १० रु. वरून १४ रु. चे आसपास स्थिर होऊ लागला होता. या यशाने कंपनीचे संचालक, अधिकारी व कामगार एक प्रकारे निश्चिंत झाले होते. त्या सर्वांना स्थैर्य प्राप्त झाल्याने आपल्या कामात आव्हानात्मक काहीच वाटत नव्हते. ऑर्डर्स येत होत्या, माल तयार होत होता, पगार व महागाईभत्ते वाढून प्रत्येकाचे उत्पन्नही वाढत होते. एक प्रकारे आबादीआबाद होते.

१९७१ च्या सुरुवातीस या कंपनीचे पर्सोनेल मॅनेजर अचानक हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू पावले व त्यांच्या जागी नवे मॅनेजर श्री. बदले यांची नेमणूक झाली. श्री. बदले यांचा औद्योगिक संबंध व मानसशास्त्रीय विषयांचा अभ्यास दांडगा होता. ते एका आंतरराष्ट्रीय कंपनीत चांगल्या जागेवर काम करीत होते. 'शक्ति'च्या संचालकांचा व त्यांचा एका सेमिनारमध्ये परिचय झाला. श्री. बदले यांचा अभ्यासपूर्ण निबंध ऐकून व त्यांच्याशी चर्चा करून संचालकांना त्यांच्याविषयी आस्था निर्माण झाली व त्यांनी श्री. बदले यांना आपल्या कंपनीत येण्याविषयी सुचविले. 'शक्ति'ची आर्थिक स्थिती चांगली असल्याने पगाराचा वादच नव्हता, तरी पण श्री. बदले यांना 'शक्ति'त आपल्याला आव्हानात्मक काम मिळेल का, याविषयी शंका होती. अखेर त्यांनी 'शक्ति'त नोकरी करण्याचा निर्णय घेतला व ते हजर झाले.

पहिल्या पंधरवड्यातच त्यांना कळून चुकले की येथे कामाच्या पद्धती खूपच चांगल्या बसवलेल्या आहेत. सर्वसाधारणपणे नियमित प्रकारचे कागद हाताळणे व निर्णय देणे या पलीकडे फारसे प्रॉब्लेम नाहीत. त्यांना थोडेसे बेचैन झाल्यासारखे वाटले. अखेर त्यांनी छंद म्हणून एक विषय अभ्यासाला निवडला व त्यावर माहिती जमविण्यास सुरुवात केली. त्यांचा विषय होता, 'कारखान्यातील सुपरवायझर्स यशस्वी किंवा अपयशी होण्यासाठी त्यांच्या खात्यांतील व कारखान्यांतील परिस्थिती कितपत कारणीभूत असते ?'

श्री. बदले यांनी कंपनीतील सुपरवायझर्सशी व्यक्तिगत चर्चा केली व त्यात त्यांना असे आढळले की बहुतेक सुपरवायझर्स रोजच्या त्याच त्या कार्यक्रमाला कंटाळले आहेत. प्रत्यक्ष खात्यांत हजर राहण्यापलीकडे दिवसाच्या २/३ तासांच्यावर काम नसते व नवीन अडचणी किंवा प्रश्न फारसे उद्भवत नसल्याने ते थोडे आळसावले होते. बढतीची संधीही फारशी नसल्याने त्यांना कामात विशेष रस नव्हता. श्री. बदले यांनी सर्व खात्यांचाही अभ्यास केला व खालीलप्रमाणे माहिती जमा केली.

सुपरवायझर — त्यांचे शिक्षण, कामातील अनुभव, कामगारांशी वागणूक, कामगारांतील लोकप्रियता, अप्रियता वगैरे, अधिक जबाबदारी उचलण्याची क्षमता, इतर कामांत भाग घेण्याची आवड वगैरे.

खाते — कामाचे स्वरूप, मजुरी कामाला की यांत्रिक कामाला महत्त्व ? कामगारांची संख्या, कामगारांतील नेतृत्व व त्याचा दर्जा, समजूतदार किंवा अडवणूक करणाऱ्या कामगारांचे प्रमाण, यांत्रिकीकरणाला वाव, वगैरे.

ही माहिती जमविण्यास श्री. बदले यांना जवळजवळ दीड महिना लागला. पण यानंतर त्यांना कारखान्यातील खाती व सुपरवायझर्स यांच्याविषयी खूप ज्ञान झाले. या कामी त्यांनी वर्क्स मॅनेजर श्री. कारखानीस यांना विश्वासात घेऊन त्यांचे वेळोवेळी साह्य घेतले.

मार्च महिन्यात त्यांनी व श्री. कारखानीस यांनी सर्व सुपरवायझर्सची सभा घेऊन त्यांना समजावून सांगितले की कामात बदल हा केव्हा व कसा उपयुक्त असतो व या बदलामुळे व्यक्ती आपला विकास कसा करून घेऊ शकते. नवीन प्रकारचे काम स्वीकारण्यात आव्हान असते व त्यामुळे बुद्धीला चालना मिळून आपण आपल्या अनुभवाची कक्षा वाढवू शकतो व आपला वेळही अधिक उत्साहपूर्वक कामात गुंतल्याने आपले मन तरुण राहून मंदपणा कमी होतो, वगैरे, वगैरे.

नंतर श्री. बदले यांनी खातेबदलाची घोषणा करून सुपरवायझरना कोणत्या खात्यात जावेसे वाटते अशा तीन खात्यांची नावे देण्यास सांगितले. बदली सर्वांचीच होणार व प्रत्येकाने नव्या खात्यात काहीतरी विशेष सुधारणा घडवून आणायची आहे. एका वर्षानंतर आवश्यक वाटले तर पुन्हा पूर्वीच्या खात्यात परत घेण्याची सोयही जाहीर केली. चांगल्या कामाबद्दल उत्तेजनात्मक बक्षिसेही जाहीर केली.

एक आठवड्याचे आत सर्वांकडून तीन तीन खात्यांची नावे आली. आलेल्या अर्जांतून व श्री. बदले आणि कारखानीस यांच्या अभ्यासावरून शक्य तेथे मागितलेली खाती देण्यात आली व नवीन खातेबदल जाहीर झाला. नवे खाते ताब्यात घेण्यास एक महिन्याचा अवधी देण्यात आला.

या महिन्यात प्रत्येकाने आपले खाते अधिक पद्धतशीर बनवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. रेंगाळलेली व मागे पडलेली कामे उरकून टाकली. खात्यांची विशेष सफाई करून खात्यातील मशीनरी, स्टोअर, रेकॉर्ड वगैरे नीटनेटके ठेवण्याचा प्रयत्न केला. सारांश, नव्या माणसाने पूर्वीच्या माणसात दोष काढू नये याची काळजी घेतली.

नव्या येणाऱ्या माणसानेही ज्या खात्यात जायचे तेथल्या पद्धतींचा, कामाचा जाणीवपूर्वक अभ्यास केला. यामुळे एक

महिनाभर सर्वजण अतिशय उद्योगात गढून गेले व वातावरणातील शिथीलता संपून सर्वत्र उत्साहाचे, धावपळीचे वातावरण निर्माण झाले. नव्या खात्यात झटपट प्रगती दाखवण्यास कोठे वाव आहे? कामाच्या नव्या कोणत्या पद्धती बसवता येतील? याविषयी सतत विचार मनात येऊ लागले. फार काय, हे सुपरवायझर आपसात याविषयी चर्चा करून एकमेकांचा सल्ला घेऊ लागले. कंपनीत असलेल्या इतर तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींशी या विषयावर चर्चा करू लागले. नव्या कामात रस घेऊन हे सुपरवायझर लक्षपूर्वक काम करू लागले.

हा प्रयोग जवळजवळ वर्षभर चालल्यावर श्री. बदले यांना असे आढळले की प्रत्येक जण नव्या कामात गढला आहे. उत्पादन सुमारे २५% वाढले आहे, उत्पादनखर्चात १०% काटकसर झाली आहे, व इन्सेन्टिव्ह बोनस म्हणून या सुपरवायझरना प्रत्येकी रु. २,००० ते रु. ५,००० बक्षीस मिळेल. याचा आणखी एक असा अनुभव आला की १२ पैकी दोन सुपरवायझर नवी जबाबदारी घेण्यास असमर्थ ठरल्याने नोकरी सोडून गेले.

खाजगी कंपन्यांत बदलीची भीती नसल्याने येणारे स्थैर्य हे व्यक्तींच्या विकासाला मारक ठरते व बदलीने विविध कामाचा अनुभव व हाती असलेल्या कामात जागरूकता वाढते. अपात्र व्यक्तींची खात्यातील मिरासदारी नष्ट होऊन खात्यात सुधारणा घडवून आणणे, त्या व्यक्तींना विशेष न दुखवता, सरसकट बदल्यांमुळे शक्य होते.

'शक्ति'चे संचालक हाच प्रयोग त्यांच्या खरेदी, अकौंट व शासकीय खात्यातही करून पाहाण्यास उत्सुक आहेत व त्या दृष्टीने श्री. बदले यांचा अभ्यास सुरू झाला आहे.

## पंजाबमध्ये फिल्म कॉर्पोरेशन

पंजाब सरकारने फिल्म कॉर्पोरेशन स्थापन करण्याचे ठरविले आहे. त्याची मालकी संयुक्त स्वरूपाची राहील त्याशिवाय कॉर्पोरेशनतर्फे तीन एतद्देशीय भाषांतील वृत्तपत्रेही सुरू करण्यात येणार आहे. एक हिंदीत, एक उर्दूत आणि एक पंजाबी भाषेत निघेल. फिल्म कॉर्पोरेशनचे भांडवल १० कोटी रुपयांचे राहणार असून त्यांपैकी ५१ टक्के भांडवल सरकार घालणार असून बाकीचे भांडवल लोकांना भाग विकून उभारण्यात येणार आहे. कॉर्पोरेशन चंदिगढजवळ एक सिनेनिर्मिती गृह बांधणार आहे. त्याशिवाय चित्रगृहे, करमणूक केंद्रे आणि खुली नाट्यगृहेही बांधण्यात यावयाची आहेत. ही करमणूक केंद्रे ग्रामीण व नागरी अशा दोन्ही भागांत स्थापन करण्यात येणार आहेत.

---

**दहा नवे सहकारी साखर कारखाने** — चालू मोसमात भारतामध्ये एकूण दहा नवे सहकारी साखरकारखाने उभारण्यात येतील. म्हणजे अशा कारखान्यांची संख्या ९० होईल. एकूण साखरेच्या उत्पादनापैकी सुमारे ५०% उत्पादन सहकारी कारखान्यांत लवकरच होऊ लागेल. नियोजित साखर कारखान्यांपैकी महाराष्ट्रात पाच कारखाने निघतील.

## खर्चिक लग्नसमारंभ टाळण्यासाठी परदेशी विवाह

पुढील महिन्यांत ३० जपानी युवक-युवती विवाहबद्ध होण्यासाठी डेन्मार्कला जात आहेत. जपानी पद्धतीचा विवाहसमारंभ फार खर्चाचा असल्यामुळे त्यांनी हा मार्ग स्वीकारला असून डेन्मार्कमध्ये त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी सुरू आहे. ही फक्त सुरुवात आहे. त्यांच्या मागोमाग उन्हाळ्यात आणखी १५० जोडपीही ह्याच शुभ कामासाठी डेन्मार्कला जाणार आहेत. ही सर्व जोडपी लग्नानंतर मधुचंद्रासाठी भूमध्य समुद्राच्या किनारी असलेल्या देशात जातील. जपानी विवाहपद्धतीत आहेर देण्याचा बोजा नवपरिणीतांना सोसावा लागतो. त्यामुळे त्यांच्यावर खर्चाचा अतिशय भार पडतो. परदेशी प्रवास घडवून आणणाऱ्या एका संघटनेने त्यांना असे पटवून दिले की स्वदेशात विवाह करण्यासाठी येणाऱ्या खर्चात त्यांचा विवाह परदेशी होऊन शिवाय मधुचंद्रही साजरा करता येईल. विवाह आणि मधुचंद्र ह्या दोन्हींसाठी प्रत्येक जोडप्याला स्वदेशी २,५०० डॉलर्सपेक्षा जास्त खर्च आला असता. आता तेवढ्या खर्चात विवाह व परदेशी प्रवास त्यांना करता येईल. डेन्मार्क आणि इतर युरोपीय देश ह्यांत आहेर अगर देणग्या देण्याचा खर्च विवाहबद्धांना अगर त्यांच्या मातापित्यांना करावा लागत नाही. जोडप्यांचे स्नेहीसोबती आणि नातलग ह्यांना तो करावा लागतो. जपानी जोडप्यांचे विवाह डेन्मार्कमधील म्युनिसिपल हॉलमध्ये साजरे करण्यात येणार आहेत. विवाहविधी केवळ कायदेशीरपणे करण्यात येणार असल्याने पौरोहित्य कोपनहॅगनच्या मेयॉरनी करावयाचे कबूल केले आहे. जपानी जोडपी आपल्या पद्धतीप्रमाणे चेरीची झाडे लावतील.

---

**Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.**

**FORM IV**

**(See Rule 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. | Place of publication | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 2. | Periodicity of its publication | Fortnightly |
| 3. | Printer's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 4. | Publisher's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 5. | Editor's name | S. V. Kale |
| | Nationality | Indian |
| | Address | 823, Shivajinagar, Poona 4 |
| 6. | Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital | S. V. Kale<br>823 Shivajinagar Poona 4 |


I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 7-3-1973

S. V. Kale
Signature of Publisher.

## नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.चे चेअरमन

# श्री. माधवराव काशीराम बोरस्ते



श्री. माधवराव बोरस्ते यांचा जन्म निफाड तालुक्यातील साकोरे या गावी दि. १०–२–१९२७ रोजी साधारण आर्थिक परिस्थिती असलेल्या परंतु सुसंस्कार व सदाचार यांनी संपन्न असलेल्या शेतकरी कुळात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण साकोरे येथे व माध्यमिक शिक्षण पिंपळगाव बसवंत येथे झाले. हिंदी प्रवीण परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. अभ्यासाव्यतिरिक्त मैदानी व मर्दानी खेळांची त्यांना अतोनात आवड असून शालेय जीवनात त्यांनी त्यांत कौतुकास्पद प्रावीण्य मिळविले. आजही बहुविध कार्याच्या व्यापातूनही ते वेळ काढून व्हॉलीबॉलच्या मैदानावर ज्या वेळी उतरतात तेव्हा नवे खेळाडू त्यांचे कसब पाहून चकित होतात.

विद्यार्थीदशेत विद्याभ्यासाबरोबर त्यांनी समाजसेवेचे धडे गिरविले. राष्ट्रसेवादलातील शिस्त अंगी बाणवून घेताघेता राष्ट्रसेवादलाच्या पिंपळगाव विभागाच्या विभाग संघटकाचेही काम त्यांनी केले.

जिल्ह्यातील एक जेष्ठ नेते पद्मश्री कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या प्रोत्साहनाने वयाच्या बाविसाव्या वर्षी स्वतःच्या सामाजिक व राजकीय जीवनास त्यांनी प्रारंभ केला. उत्तम प्रकृती, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, जिज्ञासू वृत्ती यांच्या जोडीला अभ्यासू वृत्ती व अभ्यासपूर्ण माहितीनिशी पुढे आलेल्या समस्येवर निश्चित स्वरूपाचा निर्णय घेण्याची हातोटी व स्पष्टवक्तेपणा या त्यांच्या गुणांमुळे अल्पावधीतच ते लोकप्रिय झाले.

स्थानिक ग्रामपंचायतीचे सरपंचपद त्यांनी १५ वर्षे ओळीने भूषविले. स्थानिक शेतकी पतपुरवठा संस्थेचे कार्यही त्यांनी प्रगतीपथावर नेले. सन १९५७ मध्ये लोकल बोर्डाचे सदस्य झाले. त्यातील वर्क्स कमिटीचे अध्यक्षपदही एक वर्ष त्यांनी भूषविले.

या सुमारासच पिंपळगाव येथील यशवंत को-ऑप. कॅनिंग फॅक्टरी आणि निफाड तालुक्यातील ऊस उत्पादकांच्या सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीचे कार्य सुरू होते. या कार्यात त्यांनी सुरुवातीपासूनच मोलाची कामगिरी बजावली. यशवंत को-ऑप. कॅनिंग फॅक्टरीचे अध्यक्षपदही त्यांनी तीन वर्षे भूषविले. ओझर कॅनॉल बागाईतदार संघाच्या अध्यक्षपदाची धुरा दहा वर्षे ते सांभाळीत आहेत. निफाड तालुक्यातील श्रमजीवी जनतेच्या जीवनाशी निगडीत असलेल्या निफाड सहकारी साखर कारखान्याचे ते गेली बारा वर्षे संचालक आहेत. गेल्या तीन वर्षांपासून कारखान्याचे उपाध्यक्ष आहेत. या सर्व संस्थांच्या कामकाजात स्वतःच्या कर्तृत्वाने, व अभ्यासू वृत्तीने त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा जनमानसावर उमटविला आहे. निफाड तालुका पंचायत समितीच्या अध्यक्षपदी त्यांची गेल्या वर्षी निवड झाली आहे. निफाड तालुक्याचा व पर्यायाने जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याचा त्यांनी ध्यास धरला आहे.

नासिक जिल्ह्याचा कृषी औद्योगिक विकास साधण्याचे कंकण हाती बांधलेल्या नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ते गेली तीन वर्षे संचालक आहेत. या बँकेच्या कर्जवाटपाचा व्यवहार सुमारे दहा कोटी रुपयांचा झालेला आहे. जिल्ह्याचा सर्वस्पर्शी विकास साधीत असताना, जिल्ह्यातील सहकारी क्रयविक्रय संस्था, प्रक्रिया संस्था, सहकारी साखर कारखाने, नागरी सहकारी बँका, व्यापारी सहकारी बँका, इ. सहकारी संस्थांच्या उभारणीचे काम बँकेने अत्यंत कुशलतेने आणि आत्मीयतेने केले. आज या संस्था समृद्ध होऊन आर्थिक दृष्ट्या भक्कम पायावर उभ्या आहेत. नासिक जिल्ह्याचा आर्थिक दृष्ट्या केंद्र बिंदू असणाऱ्या नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन म्हणून यावर्षी त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

यंदाचे वर्ष नासिक जिल्ह्याची परीक्षा पाहणारे वर्ष आहे. दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस तीव्र बनत आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई उग्र स्वरूप धारण करीत आहे. खरीप पिके अवर्षणामुळे अजिबात आलेली नाहीत. जिल्ह्यातील १६४५ गावांपैकी १६४४ गावांत शासनाने दुष्काळी परिस्थिती जाहीर केलेली आहे. घेतलेले पीककर्ज कसे फेडावयाचे, नव्या पिकांसाठी द्रव्य–सहाय्य कोठून उभे करावयाचे, या चिंतेत जनता पडली आहे. याकरिता तिचे डोळे लागले आहेत जिल्हा बँकेकडे, जीव जगविण्यासाठी धान्य आणि पाणी मिळविण्याकरिता शासनाकडे आणि विकास कार्याकडे, काही रोजगार मिळावा म्हणून दुष्काळी कामाकडे. जिल्हा बँक आणि पंचायत समिती यांचेकडून असलेल्या जनतेच्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात म्हणून माधवराव बोरस्ते यांनी कमर कसली आहे. शासनाकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यारिता ते अविश्रांत प्रयत्न करीत आहेत. ते स्वतः उत्तम प्रशासक असल्याने काम करवून घेण्याच्या निश्चित कल्पना त्यांचेजवळ आहेत. बँकेचा आणि पंचायत समितीचा सेवकवर्गही खुल्या दिलाने त्यांचेसमोर अडचणी मांडू शकतो आणि योग्य मार्गदर्शन मिळाल्याने नव्या जिद्दीने कामाला लागतो.

यासोबतच काही नव्या संस्था उभारण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले आहे. नासिक जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी संस्थांचे

सर्व चिटणीस आणि सेवक पूर्वी प्रत्येक तालुक्याच्या सुपरवायझिंग युनियनकडे होते. आता जिल्ह्याकरिता एक देखरेख संस्था निर्माण झाली असून नासिक जिल्हा देखरेख सहकारी सोसा. मर्यादित या नावाने ती ओळखली जाते. जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी संस्थांतील सेवकांवर ती नियंत्रण ठेवते. याही संस्थेचे अध्यक्षपद जिल्हा बँकेचे अध्यक्ष असल्याने श्री. माधवराव बोरस्ते यांचेकडे चालून आले आहे.

निफाड तालुक्यात एक सहकारी साखर कारखाना आहेच. करंजवण धरणामुळे या तालुक्यातील ओलीखालील क्षेत्र येत्या एक दोन वर्षातच मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे. कर्मवीर काकासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली रानवड परिसरात दुसरा सहकारी साखर कारखाना उभा करण्याच्या प्रयत्नात श्री. माधवराव बोरस्ते व त्यांचे सहकारी आहेत. त्याचप्रमाणे निफाड तालुक्यात तालुका पातळीवर डेअरी आणि बेकरी सुरू करण्यातही त्यांच्या प्रयत्नांचा मोठा वाटा आहे.

विदेशात झालेल्या औद्योगिक प्रगतीचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी जपानचा दौरा केलेला आहे. जपानी जनतेची जिद्द आपल्यातही निर्माण होऊन औद्योगिक क्षेत्रात आपण भारतीयांनीही आपला ठसा उमटवावा अशी त्यांची अपेक्षा आहे.

विद्यार्जनाच्या काळात विद्यार्थ्यांनी राजकीय चळवळीत सक्रीय भाग घेऊ नये व विद्यार्जनाकडे मनापासून लक्ष केंद्रीत करावे यातच विद्यार्थ्यांचे हित आहे हे त्यांचे मत ते आग्रहाने प्रतिपादन करीत असतात.

अशा या कर्तबगार आणि सव्यसाची व्यक्तिमत्त्वाच्या नेतृत्वाखाली नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक विकासाची नवी क्षितिजे धुंडाळून प्रगतीची वाटचाल नव्या उमेदीने करील यात शंका नाही.

---


### परदेश-प्रवासी एजंटाबाबत इशारा

देशात नोकरी मिळविण्यात अपयश आल्यामुळे अनेक अडाणी व निरक्षर लोकसुद्धा परदेशात उद्योगव्यवसाय पहाण्यास जाऊ इच्छितात. त्यांच्या ह्या मनस्थितीचा फायदा घेऊन अनेक लबाड एजंट त्यांना परदेशी नोकरी लावून देण्याची प्रलोभने दाखवतात व पैसे घेऊन त्यांना परदेशी पाठवतात. अशा लोकांविरुद्ध सावध राहण्याचा इशारा गुजरात सरकारने दिला आहे. हाँगकाँगमध्ये नोकरी देण्याच्या आश्वासनावर भाळून कित्येक भारतीय नागरिक तेथे गेले आणि पस्तावले. नोकरी न मिळाल्यामुळे त्यांना परत मायदेशी पाठविण्यात आले, व पदरचा पैसा जाऊन निराशा पदरी आली. शिवाय, अशा लोकांच्यामुळे हाँगकाँगमधील अधिकारी खऱ्याखुऱ्या प्रवाशांकडेही साशंकतेने पहातात. परिणामी, त्यांना तेथे फार त्रास सोसावा लागतो आणि गैरसोयींना तोंड द्यावे लागते.

---







# ग्रंथपाल आणि ग्रंथकार पारखी

कै. रघुनाथ शतानंद पारखी यांच्या 'Library Classification : Evolution of a Dynamic Theory' या पुस्तकात डॉ. रंगनाथन् यांच्या गतिमान (dynamic) ग्रंथवर्गीकरण पद्धतीचा ऊहापोह केलेला आहे. वेदामध्ये वर्णिलेल्या ज्ञानाच्या चार विभागांपासून सुरुवात करून प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या ज्ञानवर्गीकरणपद्धती, तसेच युरोपातील बेकन, कान्ट, स्पेन्सर, कॉम्ट (Comte) यांच्या वर्गीकरण पद्धतींचाही विचार केलेला आहे. त्यानंतरचा टप्पा म्हणून डॉ. ड्युई यांची दशांश वर्गीकरण पद्धती, लायब्ररी ऑफ काँग्रेसची वर्गीकरण पद्धती, ब्राऊन यांची विषय वर्गीकरण पद्धती, इत्यादी सात जगन्मान्य ग्रंथवर्गीकरण पद्धतींचा परामर्श घेऊन, अनुभवाच्या पलीकडे जाऊन आजमितीस अज्ञात असलेल्या ज्ञानकक्षांची कल्पना करून डॉ. रंगनाथन् यांनी प्रतिपादिलेल्या गतिमान (dynamic) ग्रंथवर्गीकरण पद्धतीचा विचार या ग्रंथात केलेला आहे. कै. पारखी यांना कै. डॉ. रंगनाथन् यांचे सान्निध्य या ग्रंथाचे लेखनाचे वेळी सुदैवाने मिळाल्यामुळे या विषयावरील अत्याधुनिक कल्पनांचा समावेश या ग्रंथात झालेला आहे.

फर्ग्युसन कॉलेजच्या ग्रंथालयातील त्यांची कामगिरी आणि अभ्यासू व्यक्तींमधील लौकिक सर्वश्रुत आहे. पद्मभूषण रंगनाथन्नी लिहिलेला प्रत्येक ग्रंथ त्यांनी आत्मसात केला आणि ते आपल्या गुरूशी एकरूप झाले. 'वर्गीकरण' ह्या त्यांच्या आवडीच्या विषयातील त्यांचे संशोधन सतत चालू होते. "भारताच्या अग्रेसर ग्रंथमालेतील एक श्रेष्ठ ग्रंथपाल" असे त्यांचे वर्णन डॉ. रंगनाथन् ह्यांनी केले आहे. "त्यांना विद्यापीठाची पदवी नव्हती, त्यांना वेतनही बेताचे होते, परंतु ग्रंथपालात ते स्वकर्तृत्वामुळे तेजाने तळपत होते" असेही त्यांनी म्हटले आहे. त्यांची कित्येक इंग्रजी पुस्तके आंतरराष्ट्रीय कीर्तीची ठरली असून, डॉ. रंगनाथन् खेरीज दुसऱ्या कोणत्याही भारतीय ग्रंथपालाने त्यांच्याप्रमाणे कामगिरी करून दाखविलेली नाही. बंगलोर येथील शारदा रंगनाथन् व्याख्यानमालेची १९६८ ची व्याख्याने ते तयार करीत असतानाच, ग्रंथपालाइतकाच मोठा ग्रंथकारही असणाऱ्या पारखींना मृत्यूने गाठले. त्यांच्या टाचणांचे आधारेच प्रस्तृत ग्रंथ आता प्रसिद्ध झाला आहे.

पद्मभूषण डॉ. रंगनाथन् ह्यांनी प्रस्तुत पुस्तकाच्या प्रारंभी कै. पारखी ह्यांच्या कर्तृत्वशाली जीवनाचा आढावा घेतला आहे, त्यावरून कै. पारखींच्या कामगिरीची यथार्थ कल्पना येते. "उद्योगप्रियता, प्रयत्नशीलता आणि ग्रंथालयशास्त्राशी एकरूपता, ह्याबाबतीत त्यांची बरोबरी कोण करू शकेल? १९२१ ते १९६८ पर्यंत, म्हणजे आयुष्याच्या अखेरीपर्यंत, त्यांनी सातत्याने ग्रंथालयशास्त्राची सेवा केली. मद्रासच्या स्कूल ऑफ लायब्ररी सायन्समध्ये बाकीचे विद्यार्थी पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले होते, त्यात हा साधा मॅट्रिक पास विद्यार्थी प्रथम गोंधळून जावयाचा, पण त्याने दीर्घ अभ्यासाने ज्ञान आत्मसात करून परीक्षेत वरचा अनुक्रम मिळविला होता."

---

### साधन-संपत्तीचा नाश दुष्काळाला कारणीभूत

मुंबईमध्ये देशात पडलेल्या दुष्काळासंबंधी एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवाद भरविण्याच्या कामी भौतिक परिस्थिती आणि पशुपक्षी ह्यांच्या जपणुकीविषयी आस्था असणाऱ्या संघटनांनी पुढाकार घेतला होता. परिसंवादात भाग घेतलेल्या वक्त्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला की सध्या देशाच्या अनेक भागात उत्पन्न झालेली दुष्काळी परिस्थिती माणसाच्या वागण्यामुळेच मुख्यतः निर्माण झाली आहे. गेल्या काही वर्षांत सर्व जगभर आणि भारतातही वनांचा बेजबाबदारपणे नाश करण्यात आला व येत आहे. गुराढोरांच्या बाबतीतील धोरण अनाकलनीय असे आहे. पाण्याखाली असलेल्या जमिनीत भराव घालून वाटेल त्या प्रमाणात नवीन जमीन उपलब्ध करून देण्यात येत आहे आणि एकंदरीने नैसर्गिक साधनसंपत्तीची वारेमाप उधळण करण्यात येत आहे. म्हणून नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करताना तिची नासधूस होणार नाही अशी दक्षता घ्यावयास हवी. जमीन आणि तिच्यापासून उत्पन्न होणाऱ्या संपत्तीचा वापर कसा करावा ह्याविषयी योजना आखण्यात आली पाहिजे. विकास घडवून आणताना नैसर्गिक संपत्तीचा नाश होणार नाही अशा पद्धतीने तो केला पाहिजे. लोकप्रतिनिधींना ह्यासंबंधी बरेच कार्य करता येण्यासारखे आहे. त्यांनी आपआपल्या मतदारसंघातील लोकांना भौतिक परिसराची जपणूक करण्याचे शिक्षण दिले पाहिजे आणि कृतिसन्मुख असा संवर्धनाचा कार्यक्रम अमलात आणला पाहिजे. असे शिक्षण आणि असा कार्यक्रम या जोडगोळीने नैसर्गिक साधनांचा जास्तीत जास्त चांगला उपयोग करून घेता येईल. एरव्ही सध्यापेक्षाही मोठ्या दुष्काळाला तोंड द्यावे लागेल.

---

### खेळण्याच्या पत्त्यांच्या पानावर येशू चरित्र आणि वचने

येशू ख्रिस्ताची चित्रे असणारे अनेक जिन्नस आहेत, त्यात आता ख्रिस्ताचा संदेश देणाऱ्या पत्त्यांच्या डावाचा समावेश झाला आहे. किलवर, चौकट, बदाम आणि इसपिक ह्यांची पाने आता ल्यूक, मॅथ्यू, मार्क आणि जॉन ह्यांची होतील. त्यांची परंपरागत प्रतीके त्यावर छापलेली असतील. ५२ पत्त्यांपैकी प्रत्येक पत्त्यावर रंगीत चित्र असेल; त्यावर बायबलमधील वचन दिलेले असेल आणि बायबलमधील प्रसंगाचे चित्र असेल. ल्यूकच्या एक्क्यापासून जॉनच्या राजापर्यंतच्या पत्त्यांवर क्रमाने ख्रिस्तचरित्र चित्रित केलेले असेल. उदाहरणार्थ, मार्कच्या एक्क्यावर वधस्तंभावरील येशू ख्रिस्त दाखविलेला आहे.

---

## अमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांची चोरटी निर्यात

पॅरिसमध्ये दाखविण्यात आलेल्या टेलिव्हिजन चित्रपटात पाकिस्तानच्या वायव्य सरहद्द प्रांतातून होणाऱ्या चोरट्या निर्यातीची कहाणी चित्रित करण्यात आली आहे. पाकिस्तानच्या ह्या प्रांतातून दरसाल २०० टन अमली पदार्थ आणि बरीच शस्त्रास्त्रे चोरून बाहेर पाठविण्यात येत असतात. अमली पदार्थांना मोठी बाजारपेठ लाभते ती अमेरिका आणि पश्चिम युरोपमधील देशांची. शस्त्रास्त्रे इराणचा व तुर्कस्थानचा आपला मार्ग शोधतात. खैबर खिंडीतून जाणाऱ्या मार्गाच्या परिसरात जे लोक राहतात त्यांना जीवन जगण्यासाठी दुसरा कोणताच मार्ग उपलब्ध नाही असा अभिप्राय चित्रपटात व्यक्त करण्यात आला आहे. ह्या चोरट्या व्यापारात गुंतलेल्या लोकांनी आपले जाळेच विणलेले आहे. मालाच्या वाहतुकीची त्यांनी चोख व्यवस्था ठेवलेली आहे. सरहद्दीवरील कोणत्या कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना लांच द्यावी लागेल ह्याची माहिती ते पुरवतात, त्याचप्रमाणे कोणत्या बोटीने माल पाठवावा याचीही माहिती ते देतात. मालाची किंमत तो किती आहे आणि त्याचा दर्जा काय आहे ह्यावरून ठरविण्यात येते. एखादा टन अमली पदार्थ पॅरिसमध्ये पोचविण्यास एक महिन्यापेक्षा जास्त अवधी लागत नाही. मूळ मालाची किंमत फारशी नसते; पण तो इष्ट स्थळी पोचविण्यासाठी मात्र लाखो डॉलर्स खर्च करावे लागतात. पाकिस्तानचे सरकार ह्या चोरट्या व्यापाराविरुद्ध काहीही उपाययोजना करू शकलेले नाही. असे प्रयत्न करण्याचे आता सोडून देण्यात आले आहे. कारण ह्या भागातील पख्तून लोक व्यापाराला पाठिंबा देतात; प्रसंगी शस्त्रही उचलतात.

---

## हिन्दी बनावटीच्या शस्त्रास्त्रांचा पुरवठा मित्रदेशांनाच

हिन्द सरकारने असा निर्णय घेतला आहे की भारतात बनविण्यात आलेल्या शस्त्रास्त्रांचा व दारूगोळ्याचा पुरवठा सरकारी पातळीवरच मर्यादित करण्यात यावा आणि हा पुरवठाही जे देश भारताशी स्नेहाने वागतात व शांतताप्रिय आहेत त्यांनाच करण्यात यावा. भारताच्या संरक्षणविषयक कारखान्यांतून आता गरजेपेक्षा अधिक उत्पादन होऊ लागल्याने शिलकी उत्पादनासाठी बाजारपेठा बघाव्या लागत आहेत. मात्र कोणत्याही देशाला त्याचा पुरवठा मोफत करण्यात येणार नाही. त्याची रीतसर विक्रीच करण्यात येईल. पाकिस्तान व चीन ह्यांच्याशी झालेल्या युद्धामुळे संरक्षणविषयक उत्पादनाचा चांगलाच विकास झाला. हा सर्व विकास देशातील साधनसामग्री वापरूनच करण्यात आलेला आहे. त्यामुळे अल्पशा प्रमाणात का होईना पण भारताला ह्या निर्यात क्षेत्रात पदार्पण करणे शक्य झालेले आहे १९७१ साली पाकिस्तानशी झालेल्या युद्धात भारताने वापरलेल्या शस्त्रसंभारापैकी बहुतेक भाग देशातच बनविलेला होता. संरक्षण-उत्पादनाची किंमत १९६१–६२ साली ४१ कोटी रुपयांच्या घरात होती. ती १९७१–७२ साली १३८ कोटी रुपयांपर्यंत वाढली. आता सुमारे १५० कोटी रुपयांचे युद्धसाहित्य निर्माण होत असावे असा अंदाज आहे. जागतिक बाजारात भारताच्या एतद्विषयक उत्पादनसामर्थ्याविषयी फारशी कल्पना नाही. आता ह्याविषयी अधिक रीतसर प्रसिद्धी करून मालाविषयी मागण्या मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. निरनिराळ्या देशातील भारतीय दूतावासातील अधिकाऱ्यांचे सहाय्य ह्या कामी घेण्यात येईल.

---

## जपानी कल्पनाचातुर्याची एक कहाणी

दुसऱ्या महायुद्धानंतर औद्योगिक दृष्ट्या खचून गेलेल्या जपानने आपली अर्थव्यवस्था पुन्हा सावरून अमेरिकेलाही शह देण्यास प्रारंभ केला. ह्या महान् प्रयत्नात जपानी उद्योगपतींनी व जनतेने अपूर्व कार्य केले. आलेल्या संधीचा फायदा घेण्याचे, इतकेच नव्हे तर इतरांना न दिसलेली संधी अचूक हेरण्याचे त्यांचे सामर्थ्य अजबच म्हटले पाहिजे. व्हिएटनाममधील युद्धाने जपानच्या उद्योगधंद्यांना थोडेफार उत्तेजन मिळाले. आता त्याच युद्धात वापरलेल्या तोफगोळ्यांच्या कवचांचा उपयोग करून एक नवीनच धंदा जपानमधील एका उद्योगपतीने सुरू केला आहे, आणि त्या धंद्यापासून त्याला चांगला फायदाही होत आहे; शिवाय धंद्याच्या उभारणीत त्याचे विलक्षण कल्पनाचातुर्य दिसते ते वेगळेच. तोफगोळ्यांच्या व इतर दारूगोळ्यांच्या रिकाम्या नळकांड्यांचा उपयोग करून त्याने अतिशय आकर्षक अशा देवदेवतांच्या मूर्ती आणि घराच्या सजावटीला उपयोगी पडतील अशा वस्तू तयार केल्या आहेत. ह्या वस्तूंत अगदी छोट्या मुखवट्यापासून तो ३ फूट उंचीच्या देवतांच्या मूर्तींचा समावेश आहे. ह्या कलात्मक वस्तूंना आग्नेय आशियात भरपूर बाजारपेठ लाभत आहे. देवतांच्या मूर्तींत एक २० किलोग्रॅम वजनाची असून ती तयार करण्यासाठी सात कवचांचा उपयोग करण्यात आलेला आहे. कलावस्तूंच्या आकारावरून आणि कलात्मक दर्जाप्रमाणे त्यांच्या किंमती ठरविण्यात आल्या आहेत. १० हजार येन अथवा ३५ डॉलर्सपासून लक्षावधी येन किंमतीच्या वस्तू तयार करण्यात आल्या आहेत.

---

## हिंदमधील पुरुषांचे आयुर्मान अधिक

स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासूनच्या काळांत भारतामधील स्त्री–पुरुषांच्या आयुर्मर्यादेची अपेक्षा बरीच वाढलेली आहे. तरी पण विकास पावलेल्या देशांतील नागरिकांच्या तुलनेने ती अजूनही कमी आहे. संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या लोकसंख्याविषयक वार्षिकात ह्यासंबंधी माहिती देण्यात आली आहे. तीवरून असे दिसते की भारतामधील पुरुषांच्या आयुष्याची अपेक्षा ४४·८९ वर्षे आहे.

**डबल डेकर आगगाडीचे डबे** — डबल डेकर आगगाडीचे डबे प्रयोगादाखल सुरू करण्याचा सरकारचा विचार आहे. तूर्त ते डेकन क्वीन आणि ताज एक्सप्रेस ह्यांसारख्या कमी अंतर धावणाऱ्या गाडीला जोडून पाहण्यात येतील.

**किमतीत एका वर्षात १३% वाढ** — गेल्या बारा महिन्यात किमतीत १३% वाढ झाली आहे.

**आंतरजातीय विवाहांना मदत** — महाराष्ट्र राज्य सरकारने 'उच्चवर्णीय' हिंदू आणि हरिजन ह्यांच्या ७४ विवाहांना आर्थिक मदत दिली आहे.


**संरक्षणाचा वाढता खर्च** — १९७३-७४ च्या अंदाजपत्रकात लष्करावरील खर्च ४६·४२ कोटी रु. नी कमी करून हवाई दलावरील खर्चात ४१·२३ कोटी रु. नी आणि नाविक दलावरील खर्चात १५·२६ कोटी रु. नी वाढ केली आहे. लष्करावर १,०२९·२६ कोटी रु., हवाई दलावर ३३०·८७ कोटी रु. आणि नाविक दलावर ८७·४१ कोटी रु. खर्च केले जातील. पेन्शनासाठी ६८·४० कोटी रु. लागतील आणि भांडवली खर्चासाठी १९६·३६ कोटी रु. ची तरतूद आहे.

**छाप्यांत ६·७६ कोटी रुपये मिळाले** — काळ्या पैशासाठी गेल्या दोन वर्षांत घातलेल्या १,००७ छाप्यांत मिळून ६·७६ कोटी रु. मिळाले.

**क्रॅश हेलमेटला शिखांचा विरोध** — मोटारसायकली चालविणारांनी डोक्यावर क्रॅश हेलमेटस् घातली पाहिजेत, असा सक्ती करणारा कायदा ब्रिटनमध्ये १ जून रोजी अमलात येईल. शिखांना त्यामुळे स्वतःच्या धर्माविरुद्ध वागावे लागेल. "आमची पागोटी हेलमेटसारखीच काम देणारी आहेत. गेल्या दोन महायुद्धांत प्रत्यक्ष रणांगणावरही आम्हांला हेलमेट न घालण्याची सवलत होती. ब्रिटनमधील रस्त्यांचा अपवाद करण्याची काय जरूर?" अशी तक्रार ब्रिटनमधील शीख पुढारी करू लागले आहेत.

**इंडियाला भारत म्हणा** — इंडिया हे नाव बदलून त्याऐवजी भारत या नावाने आपला देश ओळखला जावा, ह्यासाठी घटनेत दुरुस्ती सुचविणारे एक बिल राज्यसभेत मांडण्यात आले आहे. इंडियन आणि रेड इंडियन ह्यांचा कित्येक परदेश घोटाळा करतात तो टाळण्याचा त्या बिलाचा उद्देश आहे. श्री लंका, झइरे, झँबिया आणि ग्वायना ह्या नवीन नावाच्या देशांचे उदाहरण देण्यात आले आहे.

**स्टेट बँकेची ब्रिटनमधील दुसरी शाखा** — स्टेट बँक ऑफ इंडियाची एक नवी शाखा लंडनच्या वेस्ट एन्डमध्ये उघडण्यात आली, उदघाटन एअर इंडियाचे चेअरमन श्री. जे. आर. डी. टाटा ह्यांच्या हस्ते झाले.




# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र — घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

[illegible] विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: [illegible] १०२


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, २१ मार्च, १९७३ | अंक ६

## आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा असा बेत चालला असेल ना तुमचा ?



## त्यासाठीं आमच्या संचित ठेव योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !
तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेटसाठी या योजनेखाली बचत करा.
मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !
खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
| --- | --- | --- |
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड आफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

729 Mar

## मध्यमवर्ग उत्पन्नापैकी २० टक्के बचत करतो

आर्थिक विकासाच्या कोणत्याही अवस्थेत भांडवलाच्या संचयाला असाधारण महत्त्व असते. असा संचय होण्याचा वेग मंदावला तर विकासाची गती खुंटली नाही तरी मंदावते. काहीही कारणाने राष्ट्रीय उत्पन्नापासून भांडवल साठविण्याचे थांबले तर परदेशांकडून मदत घेऊनही आर्थिक विकासाची गाडी मार्गाला लावावी लागते. तेव्हा भांडवलाच्या संचयाला प्राधान्य द्यावेच लागते. असा संचय होण्याचा एक मार्ग म्हणजे नागरिकांनी आपल्या उत्पनात बचत करणे आणि ती बचत उत्पादक संघटनात गुंतविणे. मग अशा संघटना सार्वजनिक मालकीच्या असोत अगर खाजगी मालकीच्या असोत. भांडवलाच्या संचयाच्या प्रवृत्तीचा अभ्यास करण्यासाठी नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च ह्या संघटनेने एक तपासणी केली होती. ह्या तपासणीची फलश्रुती संक्षेपाने प्रसिद्ध करण्यात आली आहे. ह्या तपासणीसाठी सर्व देशभर पसरलेल्या ५ हजार घरकुलांची निवड करण्यात आली होती. तपासणीमध्ये कुटुंबाचे उत्पन्न कशा प्रकारचे आहे, त्या उत्पन्नातून करण्यात येणाऱ्या बचतीचे स्वरूप व पद्धत कशा प्रकारची आहे, त्याचप्रमाणे खर्चाचे स्वरूप कसे आहे इत्यादि माहिती मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तपासणीत सिद्ध झालेल्या माहितीवरून काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यांची रूपरेखा सामान्यतः अशी आहे : देशात कुटुंबागणिक जे उत्पन्न आहे ते बऱ्याच प्रमाणात केंद्रित झालेले आहे. प्रत्येक कुटुंबात खर्च करता येण्यासारखे उत्पन्न किती आहे ही कसोटी धरून कुटुंबाची वर्गवारी करण्यात आली असता असे आढळून आले की ह्या कुटुंबांपैकी वरच्या थरातील २० टक्के कुटुंबांत खर्च करता येणाऱ्या उत्पन्नापैकी ५३ टक्के उत्पन्न केंद्रित झालेले होते. अगदी खालच्या थरातील २० टक्के कुटुंबांत ५ टक्के उत्पन्न केंद्रित झालेले होते.

सरासरीने पाहता कुटुंबांच्या उत्पन्नापैकी ५० टक्के उत्पन्न अन्नपदार्थांच्या खरेदीवर खर्च करण्यात येते. धान्य आणि डाळी ह्यांचा अपवाद सोडून इतर पदार्थांवर होणाऱ्या खर्चाची सरासरी ग्रामीण भागात कमी असून नागरी भागात ती अधिक आहे. मध्यमवर्गाचे उत्पन्न आणि त्याचा खर्च ह्यांची तपासणी करता असे दिसून आले की हा वर्ग आपल्या उत्पन्नापैकी बराच हिस्सा म्हणजे २० टक्के बचत करतो. एकूण कुटुंबांत बचत करण्याची जी प्रवृत्ती दिसते त्यापेक्षा मध्यम वर्गाची प्रवृत्ती अधिक आहे. सामान्यपणे कुटुंबांची प्रवृत्ती ७·९ टक्के बचत करण्याची आहे. मध्यमवर्गाची दुसरी अशी वृत्ती दिसून येते की जीवनाच्या मूलभूत गरजा योग्य रीतीने पूर्ण झाल्या म्हणजे उरलेला पैसा हा वर्ग नेहमी लागणाऱ्या व दीर्घकाल टिकणाऱ्या वस्तू खरेदी करण्यात खर्च करतो. ज्या मानाने उत्पन्न वाढेल त्या मानाने अशा प्रकारच्या अधिकाधिक वस्तू तो खरेदी करतो. तपासणीसाठी १९६७–६८ साल निवडण्यात आले होते. त्या सालात मध्यमवर्गाचा कल सायकली व रेडिओ घेण्याकडे दिसून येतो. आगामी वर्षात फर्निचर, स्वयंपाक घरातील साधने, स्कूटर्स, टेलिव्हिजन, मोटारी, इत्यादी वस्तू हा वर्ग खर्च करील असा अंदाज आहे. ज्या कुटुंबांचे उत्पन्न सालिना ५ हजार रुपयांपासून १० हजार रुपयांपर्यंत आहे, अशा कुटुंबांचा समावेश पाहणीसाठी मध्यमवर्गात करण्यात आलेला होता.

---

## अमरावती शहर चर्मकला सहकारी संस्था

अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक संस्थांमध्ये चर्मकारांचीही एक सहकारी संस्था आहे. ही संस्था अमरावती येथेच असून तिला १८ वर्षे झाली आहेत. ही संस्था अखिल महाराष्ट्रातील सव चमायोगी संस्थांमध्ये उत्तम कामकाज करणारी म्हणून बक्षीसधारी आहे. ह्या संस्थेने आतापावेतो २ ढाली, ३ प्रशस्तिपत्रे आणि ५ रोख बक्षिसे मिळविली आहेत. ह्या संस्थेने आतापावेतो अमरावती शहरातील व आजूबाजूच्या गावांतील जनतेसाठी एकूण ९ लाख, ४० हजार लहानमोठी पादत्राणे तयार केली आहेत. ह्या संस्थेच्या सभासदांकडून प्रतिवर्षी ६८ हजार पादत्राणे तयार करण्यात येतात. ही संस्था सर्व प्रकारच्या जनतेच्या आवडीनिवडीचा व खात्रीचा माल तयार करून, योग्य दराने विक्री करते. लंडनसारख्या ठिकाणीही तेथील काही प्रतिष्ठित अधिकारी व त्यांच्या कुटुंबीयांनी ह्या संस्थेचा माल वापरून मालाच्या टिकाऊपणाबाबत वैयक्तिक प्रशस्ती केलेली आहे.

मागासलेल्या व हरिजन वर्गातील ही संस्था असून ह्या संस्थेने निष्ठेने, चिकाटीने व श्रद्धेने ही सहकारी संस्था १८ वर्षांत आदर्श व प्रगतिशील केली.

---

## पुरुषांसाठी शहराचा नकाशा

नवीन शहरात जाणारे लोक रात्री 'चैन' करायला मिळणाऱ्या ठिकाणांची चौकशी तेथील टॅक्सीवाल्यांकडे किंवा होटेलातील वेटर्सकडे करतात. बर्लिन, कलोन, फ्रँकफुर्ट, हॅम्बर्ग आणि म्युनिक येथे जाणारांच्या सोयीसाठी एका जर्मन प्रकाशकाने "पुरुषांसाठी शहराचा नकाशा" छापून प्रसिद्ध केला आहे. तो १५ रुपयांना विकत घेतला म्हणजे अशा चौकशांची आवश्यकता उरणार नाही. त्या नकाशात वेश्यागृहे, नृत्यालये, मद्यालये, इत्यादि आकर्षणांच्या जागा दिलेल्या आहेत. पण जर्मन भाषा न येणारांची काय सोय? अर्थपूर्ण चित्रे काढून आणि त्या त्या ठिकाणी ती छापून परदेशी लोकांनाही हव्या त्या ठिकाणी पोचता येईल अशी सोय ह्यामुळे झाली आहे. ( उदाहरणार्थ, खिडकीतून खुणा करणारी तरुणी, टेबलावर ग्लास असून हातांनी टाळ्या वाजविणारे प्रवासी, खरोखर पाहिजे त्या स्थळी वस्त्रे नसणारी पण जरूर नाही ते भाग झाकणारी तरुणी, इत्यादि. )

---

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २१ मार्च, १९७३



संस्थापक
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## परदेशांतील संयुक्त मालकीच्या कंपन्या यशस्वी

भारताने परदेशांत स्थापन केलेल्या संयुक्त मालकीच्या कंपन्या यशस्वी होत आहेत. ह्या औद्योगिक संघटनांनी आतापर्यंत ७·९६ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळविले आहे. १९६० मध्ये अशा प्रकारच्या औद्योगिक संघटना उभारण्याचे प्रयत्न भारत सरकारने सुरू केले. परंतु त्यांच्यापासून नफा होऊ लागण्यास अनेक कारणांनी विलंब लागला. ह्यासंबंधी एक गोष्ट विशेष लक्षात ठेवण्यासारखी आहे. सुमारे १·१४ कोटी रुपयांची परदेशीय चलनातील प्राप्ती नफा, तांत्रिक ज्ञानदान आणि कारभारविषयक फी ह्या मार्गांनी झालेली आहे, आणि ती अवघ्या १० संघटनांनी मिळविलेली आहे. आतापर्यंत अशा १५० संघटनांना मंजुरी देण्यात आलेली असून त्यांपैकी प्रत्यक्ष उत्पादन ३७ कंपन्या करू लागल्या आहेत. ६१ कारखाने उभारणीच्या निरनिराळ्या अवस्थांत असून सुमारे ५० प्रकल्प रद्द करण्यात आले आहेत. उत्पादन सुरू झालेल्या ३७ संघटनांपैकी निम्म्यापेक्षा अधिक १९६९ नंतर उत्पादनक्षम झालेल्या आहेत. अर्थातच त्यांच्या व्यवहारातून इतक्यात नफा अपेक्षिणे योग्य होणार नाही. इतर कंपन्यांनी मिळविलेल्या नफ्यापैकी १ कोटी रुपये भारताला पाठविण्यात आलेले आहेत. परदेशात संयुक्त मालकीच्या कंपन्या काढण्यात भारताचे दोन उद्देश होते. एक तर अशा संघटनां- मुळे निर्यात वाढविण्यास मदत होणार होती. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्यामुळे अविकसित देशांत आर्थिक सहकार्य वाढीला लागणार होते. संयुक्त मालकीच्या बहुतेक कंपन्या आशिया, आफ्रिका, पश्चिम आशिया व दक्षिण अमेरिका ह्या भूभागांत आहेत. सर्वांत जास्ती म्हणजे २२ कंपन्या मलेशियात आहेत.

---

## बड्या उद्योगधंद्यांना देण्यात येणारी कर्जे

लोकसभेतील एका सभासदाने अशी सूचना केली की, सार्व- जनिक मालकीच्या वित्तीय संघटनांकडून बड्या उद्योगधंद्यांना देण्यात येणारी कर्जे बंद करण्यात यावीत. त्यांनी हा प्रश्न लोकसभेत प्रश्नाच्या रूपाने उपस्थित केला असता अर्थमंत्री श्री. चव्हाण उत्तर देताना म्हणाले की, इंडस्ट्रिअल फायनॅन्स कॉर्पोरेशनसारख्या संघटनांमार्फत उद्योगधंद्यातील बड्या गटांना कर्जाच्या रूपाने पैशाचा पुरवठा केला जातो. त्यांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीत वाढ होणारच नाही अशी हमी सरकार देऊ शकत नाही. मात्र देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास होत असताना आणि साधनसंपत्ती वाढत असतानाच हे धोरण अमलात आणणे शक्य होईल. दुसऱ्या एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की, सार्वजनिक वित्तीय संघटनांनी दिलेल्या कर्जाचे रूपांतर सर्वसाधारण भागभांडवलात करण्याचे सरकारचे धोरण कृतीत उतरविण्यात येत आहे. ह्या विषयासंबंधी माहिती देताना लोकसभेचे सदस्य श्री. इंद्रजित गुप्ता ह्यांनी सांगितले की १९७१–७२ साली इंडस्ट्रिअल फायनन्स कॉर्पोरेशन ह्या संघटनेने मोठ्या उद्योगधंद्यांना ११० लाख रुपयांची कर्जे मंजूर केली होती. १९७२–७३ च्या पहिल्या ९ महिन्यांत मंजूर करण्यात आलेल्या कर्जाऊ रकमेचा आकडा ५ पटीने वाढून ५३० लाख रुपयांपर्यंत पोचला आहे. मोठ्या उद्योगधंद्यांच्या वाढीला प्रोत्साहन द्यावयाचे नाही असे सरकारचे धोरण असल्याचे सांगण्यात येते. पण, वरील आकड्यांवरून असे दिसते की सरकारच्या ह्या धोरणात बदल होऊ घातला आहे. त्यावर श्री. चव्हाण ह्यांनी सरकारी धोरणात कोणताही बदल न झाल्याचे सांगितले.

---

## लिंगभेदावर आधारलेला अतिरेक ओसरू लागला

युरोपीय संस्कृतीत स्त्री-पुरुषांचे संबंध केवळ वैवाहिक जीवनावर आधारलेले नसतात. विवाहपूर्व आणि नंतरही पाश्चात्य समाजातील लिंगाधिष्ठित नीती बरीच लवचिक असते. गेल्या महायुद्धानंतर तर हे नीतिनियम अधिकच ढिले पडून स्वैर वर्तनाला फार मोठी भरती आली. पण आता ब्रिटनपुरती तरी चाकाची गती मंद होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. इतर पाश्चात्य देशांप्रमाणे ब्रिटनमध्येही 'ब्ल्यू फिल्म्स' ह्या नावाने कुप्रसिद्ध असलेले उत्तान लैंगिक चित्रपट दाखविणारे खाजगी क्लब्ज आहेत. अशा क्लबातून प्रस्थापित नीतिनियमांना धाब्यावर बसविणारे तरुण-तरुणी आणि क्वचित वयस्कर लोकही गर्दी करीत असतात. पण आता ह्या चित्रपटांतून दाखविला जाणारा स्वैरपणा फार टोकाला गेला आहे असे जनमत होत चालले आहे. खुद्द सरकारही अशा प्रकारच्या चित्रपटांवर कडक बंधने घालण्याचा विचार करू लागले आहे. रस्त्यावरील जाहिराती आणि दुकानांच्या शोभेच्या खिडक्याही त्यातून सुटणार नाहीत. ब्रिटनमधील फक्त ६ टक्के लोकांना अधिक लैंगिक स्वैरता हवी आहे.

---

## निवडणुकांची भित्ति-पत्रके : जाहिरातीबद्दल पैसे

मुंबईच्या कमिशनरांनी शहराच्या निवडणुकीसाठी उभे राहिलेल्या उमेदवारांपासून अगर त्यांच्या एजंटांपासून घोषणा अगर इतर पत्रके भिंतीवर डकविण्याबद्दल पैसे वसूल करण्याचे ठरविले आहे. निवडणुकीच्या हंगामात मोकळ्या भिंतीवर अगर इतरत्र भित्ति-पत्रके चिकटविण्यात येतात. ह्या पत्रकांना जाहिराती समजून प्रत्येक चौरस मीटरमागे २ रुपये घेण्यात येणार आहेत. निवडणुका–मग त्या कोणत्याही पातळीवर असोत– शहरातील इमारतींचे सौंदर्य व स्वच्छता नाहीशी करतात. नंतर काही जबाबदार व्यक्ती अगर पक्ष स्वतः होऊन स्वच्छता करण्याचे काम करतात. पण हा अपवादच म्हणावा लागेल. बहुधा इमारतीच्या मालकांनाच भिंती पुन्हा स्वच्छ कराव्या लागतात. मुंबईत नुकत्याच झालेल्या कॉर्पोरेशनच्या निवडणुकीनंतर गलिच्छ करण्यात आलेल्या भिंतीचे मोजमाप करून उमेदवारांकडून अगर त्यांच्या प्रचारकांकडून सफाईसाठी वरील दराने फी वसूल करण्यात येणार आहे. मुंबईत अशा प्रकारच्या फीची वसुली प्रथमच करण्यात येईल. उमेदवाराने अगर त्यांच्या पुरस्कर्त्यांनी ही फी खुषीने देण्याचे नाकारले तर त्यांच्यावर कायदेशीर उपायही योजण्यात येणार आहेत. तथापि मुंबईतील गेल्या निवडणुकीत पूर्वीच्या मानाने इमारतींची अगर भिंतींची खराबी बऱ्याच कमी प्रमाणात झाली. औद्योगिक भागात मात्र फारसा फरक पडला नाही. मुंबई कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी निवडणुकीसाठी उभे राहिलेल्या उमेदवारांकडून अगर त्यांच्या एजंटांकडून आतापर्यंत २२,८९० रुपयांची रकम फी म्हणून वसूल केली आहे.

---

## भारतात ३० लाखावर दमेकरी रुग्णाइत

दमा आणि घशाच्या विकारासंबंधी संशोधन करून त्या संबंधीची माहिती लोकांत प्रसृत करण्यासाठी दिल्ली येथे एका स्वेच्छेच्या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. संस्थेने संबंधित रोगाविषयी जमविलेल्या माहितीवरून असे दिसून आले आहे की भारतात ३० लाखांवर लोक दम्याच्या विकाराने पछाडलेले आहेत. त्याशिवाय आणखी लक्षावधी लोकांना घशाच्या इतर विकाराने ग्रस्त केलेले आहे. दिल्लीमधील १ टक्का लोक घशाच्या विकाराने ग्रासलेले आहेत तर दिल्लीच्या परिसरातील ग्रामीण भागात त्यांची संख्या ३ टक्क्याच्या आसपास आहे. दिल्लीच्या विद्यापीठांत काम करणाऱ्या नौकरवर्गापैकी व त्यांच्या कुटुंबियांपैकी ६·४ टक्के लोक घशाच्या विकाराने पीडित झालेले आहेत. शहरातील एका कापडगिरणीत राबणाऱ्या कामगारांत घशाच्या विकाराचे प्रमाण १४·८९ टक्के इतके मोठे आढळून आले. संघटनेच्या माहितीप्रमाणे जगाच्या लोकसंख्येपैकी जवळजवळ २ टक्के लोक दम्याच्या रोगाने पछाडलेले आहेत आणि आणखी १० टक्के लोकांना निरनिराळ्या प्रकारच्या घशाच्या बाधा होत असतात. दमेकरी रोगी दीर्घकाळ जगतात अशी एक समजूत प्रचलित आहे पण ती खरी नाही. दम्याच्या विकाराने शरीरव्यापारात अनेक प्रकारची घातक गुंतागुंत उत्पन्न होते आणि रोगी दगावतात. त्याचप्रमाणे रोगावर देण्यात येणारी औषधेही रोग्याच्या मृत्यूला कारणीभूत होतात. वैद्यकीय शास्त्राला अद्याप दमा व ब्रॉंकायटिससारखे घशाचे विकार ह्यांवर खास असे उपाय सापडलेले नाहीत. उपायासंबंधी अधिक संशोधनाची आवश्यकता संघटनेला वाटत आहे.

---

## इक्विटेबल मॉर्टगेजची २४ शहरांत सोय

महाराष्ट्र सरकारच्या एका आज्ञापत्राद्वारे मॉर्टगेजची सोय राज्यातील पुणे, अलिबाग (कुलाबा), रत्नागिरी, नासिक, धुळे जळगाव, अहमदनगर, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, नागपूर, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा व चंद्रपूर या शहरात उपलब्ध करून दिल्याचे जाहीर करण्यात आले आहे. आतापर्यंत ही सवलत फक्त मुंबईलाच उपलब्ध होती, त्यामुळे मुंबईबाहेरील लोकांची फार अडचण होत असे म्हणून मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँण्ड इंडस्ट्रीजने ही सवलत महाराष्ट्रातील प्रमुख शहरी उपलब्ध करून द्यावी यासाठी १९६५ पासून प्रयत्न चालविले होते त्यास आता यश आले आहे. या सोयीमुळे स्थावर मालमत्तेच्या तारणावर कर्ज मिळण्यास जो उशीर लागतो तो कमी होईल आणि खर्चातही बचत होईल.

मुख्यमंत्री आणि उद्योगमंत्री यांनी यासंबंधी केलेल्या घोषणेच्या संदर्भात रेव्हेन्यू अँण्ड फॉरेस्ट डिपार्टमेंटने नोटिफिकेशन क्र. टीएपी १०६९।२८२०१०–एन् अन्वये वरील शहरे ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी अ‍ॅक्ट १८८२ च्या कलम ५ (फ) अंतर्गत जाहीर केली आहेत.

---

## "अर्था"च्या संपादकांचा खुलासा

आर्यभूषण मुद्रणालयात 'अर्थ' पहिल्या अंकापासून १ जानेवारी १९३५ पासून छापला जात आहे. त्या छापखान्यात ९ मार्च रोजी संप सुरू झाला, तो १४ एप्रिल अखेर चालू होता. पुण्यातील-१२ छापखाने संपामुळे बंद होते आणि जे छापखाने चालू होते, ते संपग्रस्त छापखान्यांचे काम भीतीग्रस्त वातावरणामुळे हाती घेऊ शकत नव्हते त्या कारणाने "अर्था"चे २१ मार्च ४ एप्रिल आणि १८ एप्रिल ह्या तारखांचे अंक त्या त्या वेळी निघू शकले नाहीत.

२१ मार्चचा अंक आज प्रसिद्ध होत आहे. ४ एप्रिलचा आणि १८ एप्रिलचा अंक जोड अंक म्हणून शक्य तितक्या लवकर प्रसिद्ध होईल. ह्या विलंबाबद्दल आम्ही दिलगीर आहो.

श्री. वा काळे
संपादक.

# व्यवस्थापनातील समस्या (७)

## कामात सुरळीतपणा कसा येईल ?

लेखक : सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.

श्री. रा. गो. पेटकर, जनरल मॅनेजर, दि टू लिटल कंपनी यांच्या केबिनचा दरवाजा धाडकन उघडला आणि त्यांची सहायक मिस् गुपचुप चेहरा टाकून बाहेर आली व स्वतःच्या जागेवर जाऊन मुसमुसत रडू लागली. साहजिकच तिचे सहकारी तिच्या टेबलाभोवती जमा झाले व आस्थापूर्वक चौकशी करू लागले. थोड्याच वेळात मंडळींच्या लक्षात आले की मिस् गुपचुपने सकाळपासून धावपळ करून सर्वांकडून माहिती गोळा करून, जे स्टेटमेंट तयार केले, ते साहेबांनी न पाहाताच तिच्या अंगावर फेकले व त्यांच्या नेहमीच्या त्रासलेल्या स्वरात ते खेकसले, 'मला काही दाखवू नका ते आता' एखाद्या कोऱ्या फाईलमध्ये लावून कुलुपात ठेवा. काय उपयोग आहे त्याचा ? मला ते स्टेटमेंट सकाळीच हवे होते. आता डायरेक्टर साहेब गेलेसुद्धा. पुढच्या महिन्यात ते येतील तेव्हा हे स्टेटमेंट जुने झाले असेल. आजकाल कोणाला काम सांगायचे कठीण झाले आहे. एकाचा भरवसा देता येत नाही,' वगैरे, वगैरे. मिस गुपचुपचे म्हणणे असे की तिला साहेबांनी हे स्टेटमेंट कशाला हवे आहे, केव्हा हवे आहे, याच्या सूचनाच दिल्या नव्हत्या. तिची सगळी मेहनत वाया गेली व ती यामुळे निरुत्साही झाली. डायरेक्टर साहेब जाण्यापूर्वी अर्धा तास हे स्टेटमेंट तयार होते पण साहेबांनी ते न मागितल्याने तिला आपणहून आत जाणे व साहेबांना डिस्टर्ब करणे प्रशस्त वाटले नाही.

वरीलप्रमाणे प्रसंग बऱ्याच उद्योग-व्यवसायात घडतात. उद्योग-व्यवस्थापन हे संगीताच्या बैठकीसारखे असते. त्यात अनेक वाद्ये असतात, वादक असतात, गायक असतात. या सर्वांचे पद्धतशीर संचालन करून त्यांतून सुसंवादी सूर जमवणे हे कसबी दिग्दर्शकाचेच काम असते. नोकरीत सिनियॉरिटीने अधिकारी होणारे खूप असतात. पण अधिकारी होणे म्हणजे नेमके कसे वागणे, हे समजणारे फारच थोडे आहेत. बहुतेकांची स्थिति आधी होता वाघ्या, त्याचा झाला पाग्या, याप्रमाणे होते. या अधिकाऱ्यांची उच्च पदे हाताळण्याची तयारी असतेच असे नाही. असे अधिकारी हाताखालच्या मंडळींना नीट समजावून घेऊ शकत नाहीत, त्यांना काही नीट समजावून देऊ शकत नाहीत व मग एकच गोंधळ उडतो. सरकारी खात्यात व्यक्तीची बदली करून ही परिस्थिती बदलली जाते तर खाजगी उद्योगात या गोंधळात वरिष्ठ किंवा कनिष्ठ कोणीतरी नोकरी गमावतो किंवा आपणहून नोकरी सोडून दुसरीकडे जातो. दुर्दैवाने अशा गोंधळाचे मूळ कारण शोधून त्यावर उपाय करण्याचा प्रयत्न क्वचितच केला जातो.

उद्योग-व्यवस्थापन ही जर सामूहिक कवायत मानली तर त्यातील प्रत्येक घटकाला त्याने करावयाच्या कामाचे योग्य ज्ञान, योग्य जाणीव असायला पाहिजे. ती जाणीव नसेल तर ती करून द्यायला हवी. नुसती खुर्च्या भरून कामे होणार नाहीत. संगीत खुर्चीच्या खेळाप्रमाणे दर वेळेला प्रत्येक जण वर चढण्याच्या प्रयत्नात दुसऱ्याची खुर्ची पकडण्याचा प्रयत्न करतो व प्रसंगी स्वतःची खुर्ची घालवून बसतो. कारण खुर्च्यांपेक्षा उत्सुक उमेदवारांची संख्याच जास्त असते.

तेव्हा प्रत्येकाला त्याचे काम, जबाबदारी, संबंधित इतर कर्मचारी, त्यांची कामे, त्यांच्यापासून मिळणारे सहकार्य, त्यांना द्यावयाचे सहकार्य, अशा तऱ्हेच्या सर्व गोष्टींची खुलासेवार माहिती असेल तरच त्या त्या व्यक्तीचे काम अपेक्षेप्रमाणे होईल. बॅंडवादकांच्या पथकात प्रत्येकाजवळ नोटेशनची कॉपी असते. ती पाहून व इतर जण काय सूर धरीत आहेत हे ऐकूनच प्रत्येक वादक आपापले वाद्य वाजवतो. प्रसंगी थोडीफार चूक होताच एकमेकाला सावरून श्रोत्यांच्या लक्षात न येईल अशा तऱ्हेने थोडाफार बदल करून संगीत सादर केले जाते.

पट्टीच्या गवयाच्या बैठकीत जसे श्रोतेही गवयाबरोबरच सम पकडतात व त्या सुसंगतीचा आनंद लुटतात तसे उद्योग-व्यवसायात कामे करताना होत नाही. त्यामुळे परिणामी सर्वच जण एकमेकांवर नाराज असतात. जिथे दिवसाचे सहा-आठ तास वर्षानुवर्षे काम करायचे तिथे आपल्या सहकाऱ्यांना, वरिष्ठांना, कनिष्ठांना जाणून घेण्याचे किती प्रयत्न होतात ? आजच्या औद्योगिक जीवनात कर्मचाऱ्यांचा नातेवाईक, शेजारी या मंडळीपेक्षा कारखान्यातील किंवा कचेरीतील सहकाऱ्यांशी अधिक काळ संबंध असतो. पण परस्परांविषयी आत्मीयता वाटण्यापेक्षा मत्सर व तुटकपणा हेच का अनुभवाला यावे ?

खरे पाहता आपण सर्व जाळ्यात अडकलेल्या पक्ष्यांप्रमाणे आहोत व सर्वांनी मिळून उठाव केला तरच या जाळ्यासकट आपल्याला उडता येईल, हे अजूनही अनेकांच्या लक्षात येत नाही. नुसती नोकरी बदलून हे प्रश्न सुटणार नाहीत; एका जाळ्याऐवजी दुसऱ्या जाळ्यात अडकल्यासारखे होईल एवढेच. या आपल्या स्थितीची योग्य जाणीव होईल तर सुटकेचे अनेक मार्ग सापडतील. पृथ्वीवर जन्माला आलेल्याला जसे अजून चंद्रावर किंवा मंगळावर जाऊन राहता येत नाही तसे नोकरी करायची म्हटले म्हणजे कोणत्याही पदावर असले तरी हेच आपले जग समजून तेथील जीवन अधिक सुसह्य कसे करता येईल हे पाहणे आवश्यक आहे.

या लेखाच्या आरंभी दिलेल्या उदाहरणात जर श्री. पेटकरांनी मिस् गुपचूपना दिलेल्या कामासंबंधी चार शब्द अधिक सांगितले असते तर त्यांनी माहिती जमवण्यात जसे

विशेष परिश्रम घेतले तसेच ती वेळेवर पुरवण्यातही दक्षता घेतली असती व पुढचा प्रसंग टळला असता. शिवाय उशीरा हाती आलेली माहितीही जर त्यांनी नजरेखालून घालून आवश्यक त्या सूचना दिल्या असत्या किंवा केलेल्या कामाचे कौतुक केले असते व त्याच वेळी उशीर झाल्यामुळे हे काम कसे फुकट गेले हे सांगितले असते तर पुढील वेळेला मिस् गुपचुपनी हीच माहिती अगोदरपासून जमा करून ठेवली असती व कदाचित साहेबांकडे त्यांनी न मागताही योग्य वेळी पाठवली असती.

परस्परांचा विश्वास, एकमेकांच्या अडचणी समजून मार्ग काढणे व एकमेकांविषयी आत्मीयता दाखविणे, यांसारख्या गोष्टींचा जर कर्मचाऱ्यांनी अभ्यासपूर्वक प्रयत्न केला तर उद्योगक्षेत्रात वारंवार येणारे तणाव कमी होऊन बऱ्याच गोष्टी सुरळीतपणे वेळेवर व अपेक्षेप्रमाणे घडणार नाहीत का, याचा प्रत्येकाने विचार करणे जरूर आहे.

---

## हिंदच्या शस्त्रास्त्रांना परदेशांच्या मागण्या

संरक्षणमंत्री श्री. जगजीवनराम राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले की, हिंदमध्ये तयार होणाऱ्या नॅट ह्या लढाऊ विमानासंबंधी अनेक देशांकडून चौकशी करण्यात येत आहे. गेल्या तीन महिन्यांत केवळ व्यापारी पद्धतीने ६९·१५ लाख रुपये किमतीच्या शस्त्रास्त्रांच्या मागण्या भारताला मिळाल्या आहेत. भारतामधून निर्यात होणारी शस्त्रास्त्रे पाकिस्तानच्या हातात पडणार नाहीत, अशी दक्षता घेण्यात आलेली आहे शस्त्रास्त्रांची निर्यात करण्यात परदेशीय चलन मिळविणे हा एकमेव उद्देश मात्र नाही. परदेशांकडून येणाऱ्या शस्त्रास्त्रांच्या मागण्यांचा विचार करताना भारत ह्या विषयाचा सर्वांगाने विचार करतो आणि मगच अशा मागण्यांची नोंद करून त्या पुरविण्याचे काम अंगावर घेतो.

---

## भारत तेलाबाबत स्वयंपूर्ण होऊ शकेल

रशिअन तज्ज्ञांनी केलेल्या अंदाजाप्रमाणे भारत खनिज तेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ शकेल. रशिअन तज्ज्ञांच्या एका तुकडीने अलीकडे भारताचा एक विस्तृत दौरा केलेला आहे. मंडळातील तज्ज्ञ मि. कालिनिन म्हणतात की, आपल्या स्वतःच्या गरजा पूर्णपणे भागविण्याइतके तेल भारताच्या भूमीत सापडू शकेल. १९६४ मध्ये आंतरराष्ट्रीय भूस्तर काँग्रेसला त्यांनी एक निबंध सादर केला होता. त्या निबंधात असा अंदाज व्यक्त केलेला आहे की भारत हळूहळू खनिज तेलाच्या उत्पादनाची क्षमता वाढवीत जाऊ शकेल आणि ५ कोटी टनांपेक्षाही अधिक उत्पादन करू शकेल. तेलाचे संशोधन आणि त्याचे उत्पादन ह्या बाबतीत रशिआच्या व परदेशांच्या ह्यासंबंधीच्या अनुभवाचा भारताला चांगला फायदा करून घेता येईल.

## चेक बनावट करून वटविण्याचा धंदा

मुंबईमध्ये बनावट चेक वटविल्याची दरसाल सुमारे ५० प्रकरणे होतात आणि त्यामुळे सुमारे २ लक्ष रुपयांचे नुकसान होते.

एखाद्या मोठ्या पोस्टल सॉर्टिंग ऑफिसमधील सॉर्टरशी गुन्हेगार टोळीवाले संगनमत करतात. ज्या पाकिटातील टाचणी चाचपून हाताला लागते, अशा पाकिटात चेक असण्याचा संभव असतो. कंपन्या आणि फर्म्स ह्यांचीच पाकिटे बहुधा पळविली जातात, कारण त्यातील पत्रावर चेक काढणारा आणि त्याची आर्थिक पात्रता ओळखता येते; त्यावरून चेकची रक्कम किती रकमेने वाढविणे सुरक्षित होईल ह्याचा अंदाज बांधता येतो.

चेकची रक्कम मोठी असेल तर ही टोळी चेक 'बेअरर' करते; शाई पुसण्याचे काम करणारे एक रसायन वापरून क्रॉसिंग नाहीसे केले जाते. इतर दुरुस्त्यांसाठी टिपकागद, चेक रायटर, एम्बॉसिंग मशीन, इत्यादी वापरली जातात. एका कुणा तरी बेकाराला व त्याला पकडून तेवढ्यापुरते पैसे देऊन, बँकेत चेक वटविण्यासाठी धाडले जाते.

मोठ्या रकमेच्या बेअरर चेक्सचे बाबतीत बँका विशेष दक्ष असतात, तेव्हा हे गुन्हेगार टोळीवाले त्याच बँकेच्या खातेदाराच्या बनावट सहीने ओळख देऊन बँकेत खाते उघडतात. त्यात लहान रक्कम (उदाहरणार्थ, २०० रु.) भरतात. चोरलेल्या चेकची रक्कम वाढवून आणि चेकवरील पेयीचे नाव बदलून तो चेक ह्या खात्यात भरला जातो. बनावट चेक वटला जाऊन खात्यात जमा झाला आहेना, पेइंग बँक आणि कलेक्टिंग बँक ह्यांना सुगावा तर लागलेला नाहीना, हे पाहाण्यासाठी ह्या टोळीपैकी एखादा मनुष्य बँकेच्या जवळच्याच एका दुकानात जाऊन खात्यातील खऱ्या शिलकीपेक्षा (उदाहरणार्थ, २०० रु.) थोड्या जास्त किंमतीची खरेदी करतो. तो त्या रकमेचा चेक देतो आणि 'चेक वटला गेल्यानंतरच खरीदलेला माल नेईन' असे दुकानदाराला सांगतो. दुकानदार आपल्या नोकराला चेक वटविण्यासाठी पाठवितो त्याच्या पाठीमागे सुरक्षित अंतरावर टोळीतील मनुष्य उभा राहातो. ओपनिंग रकमेपेक्षा मोठ्या रकमेचा हा चेक बँकेने पास केला म्हणजे बनावट (चोरलेला) चेक अडचण न येता वटविला गेला आहे, हे टोळीला समजते. बँकेतील स्वतःच्या खात्यातील रकमेची अशी चाचणी केल्यानंतर टोळीवाले मोठ्या रकमेचा चेक काढतात.

साध्या पोस्टाने चेक पाठविताना टाचण्यांचा उपयोग केला नाही, तर चेक गुन्हेगारांच्या हाती लागणे अवघड जाईल.

---

# डॉ. नानासाहेब परुळेकर

( लेखक : राजाभाऊ थिटे, पुणे )

महाराष्ट्रात मराठी वृत्तपत्रसृष्टीत श्री. आगरकर, श्री. चिपळूणकर, लोकमान्य टिळक, श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. तात्यासाहेब करंदीकर, श्री. शिवरामपंत परांजपे, श्री. काकासाहेब खाडिलकर यांनी ध्येयवादी वृत्तपत्रांत फार मोलाची कामगिरी केली आहे. कै. काकासाहेब लिमये, श्री. नी. शं. नवरे वगैरे अलीकडील संपादकांनी समाजाच्या सर्व थरांत वृत्तपत्राद्वारे बातम्या व मतांचा प्रसार केला. परंतु १९३० नंतरच्या चाळीस वर्षांत महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यांतून, समाजातील सर्व थरांतील बातम्या मिळवून त्या साध्या टांगेवाल्याला समजतील अशा सोप्या भाषेत देण्याचे काम मराठी वृत्तपत्रसृष्टीत प्रथमच डॉ. ना. भि. परुळेकर यांनी सकाळ या दैनिकाद्वारे केले व लाखावर खप नेऊन उच्चांक गाठला. आजची मराठी वृत्तपत्रे सकाळचेच अनुकरण करीत आहेत.

डॉ. परुळेकर अमेरिकेचे एम. ए., पी. एच्‌डी. मास्तरकीचा पेशा काही दिवस केला. पण न्यूयॉर्क टाईम्सचे बातमीदार म्हणून काम करीत असताना मराठीत वार्तापत्र काढावे ही त्यांची मनीषा. जवळ एक पैसाही नसता अ. वि. गृहात १ जानेवारी, १९३२ रोजी 'सकाळ' सुरू केला. सकाळ हे खऱ्या अर्थाने वृत्तपत्र आहे. बातम्या हे त्याचे प्रथम आकर्षण. एखाद्या ठिकाणी गाढव अगर जनावर मरून पडले असले तर ते आरोग्याच्या दृष्टीने समाजाला घातक. त्याचे चित्र पहिल्या पानावर छापून संबंधितांना जागे करणे हे वृत्तपत्राचे कर्तव्य. तसेच छोट्या जाहिराती अत्यंत थोड्या खर्चात येत. त्यामुळे विवाहासारखे अवघड प्रश्न, जागा मिळत नसेल तर जाहिरात. एखादे जुने कपाट विकावयाचे तर त्याला गिऱ्हाईक मिळविण्यासाठी छोट्या जाहिरातीचा फार उपयोग होऊ लागला. आज छोट्या जाहिरातींचे रोजचे रोख उत्पन्न बाराशे रुपये आहे. सिनेमा, नाटक इतकेच काय तमासगीर यांचे प्रश्न व त्याला प्रसिद्धी देऊन होतकरू कलावंतांना समाजापुढे आणण्याचे काम प्रथम सकाळने केले. यामुळे व्यापारी— तो गुजराती असो, मुसलमान असो, पारशी असो, त्याला मराठी वर्तमानपत्र वाचण्यास डॉ. परुळेकरांनी शिकविले. रोज नवीन कल्पना ते संपादकवर्गापुढे मांडत. गावात काय चालले आहे ते मंडईतील भाज्यांपासून ते कोर्टाच्या खटल्यापर्यंतच्या बातम्या देणारे वृत्तपत्र सकाळच होय. बंगालचा दुष्काळ, विजापूरचा दुष्काळ, पानशेत प्रलय, राजस्थानमधील अवर्षण अगर गुजरातमधील पूर अशा वेळी सकाळने उभी केलेली यंत्रणा समाजाच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरली. चित्रकार, फोटो, लेखक, यांच्या चढाओढी, इतकेच काय स्वयंपाकातील पदार्थ यांमुळे सकाळ स्वयंपाकघरात पोचला. डॉ. परुळेकर यांना प्रेसकौन्सिल, पी. टी. आय., आय. ई. एन. एस. यांसारख्या वृत्तपत्रसृष्टीतील कार्यात मानाचे स्थान मिळाले.

डॉ. नानासाहेब वरवर लोकांना फार कडक व शिस्तीचे वाटत. गोष्ट खरी; परंतु मनाने अत्यंत प्रेमळ. त्यांच्या नोकराचे घरातील संसार, मुलेबाळे याची संपूर्ण माहिती त्यांना असे. कोणी नोकर आजारी पडला तर ते त्याच्या घरी जाऊन चौकशी करीत. संपादकानेसुद्धा वेळेवर यावे, गप्पा मारू नये, वाचन करावे, हे कटाक्षाने सांगत.

अशा या कर्तबगार संपादकाने आपली इहलोकीची यात्रा ८ जानेवारी १९७३ ला संपविली. राजकारणात किंवा समाजकारणात जनतेने कसे वागावे याचे उत्कृष्ट लिखाण त्यांच्या संपादकीय लेखांत सापडते. बातमीदाराने अत्यंत थोडक्या शब्दांत बातमी कशी लिहावी याचे धडे ते रोज देत असत. कुचाळकी व निंदानालस्ती ते आपल्या लिखाणात कटाक्षाने टाळत. नगरपालिकेचा कारभार लोकशाही व अपक्ष भूमिकेने चालवून नागरिकांच्या कराचा पुरेपूर मोबदला त्याला कसा मिळेल यासाठी राजकारणी पक्षांपासून अलिप्त अशी संघटना त्यांनी उभी केली. नागरी संघटनेद्वारा पुणे महापालिकेचा कारभार चालवावा या धोरणाने दहा वर्षे नागरिक संघटनेला बहुमत मिळवून त्यांनी कारभार चालविला.

संप, मोर्चा, यांसारख्या चळवळीचा त्यांना तिरस्कार असे. कामगारांनी मागण्या कराव्यात पण त्या संप-टाळेबंदीने नव्हे, सनदशीर मार्गाने कराव्यात हा त्यांचा मनोदय असे. काटकसर हा त्यांचा पिंड. ऑफिसात कोऱ्या कागदाचा कचरा पडला तर तो उचलून लिहिण्यास देत. कारण हा अपव्यय आहे. साधी टाचणी पडलेली आवडत नसे. संपादकांनी वाचन करीत राहावे. पुस्तके ही त्यांची संपत्ती. ते जुनी पुस्तके विकत घेत, त्या वेळी काय पैसा घालवता? असा प्रश्न त्यांना केला तर ते म्हणत, 'लोक व्यसनात पैसा घालवितात तसा मी पुस्तकात घालवितो. हे माझे व्यसन होय' भगवद्‌गीतेचे त्यांना फार वेड. त्यांच्या खिशात छोटीशी भगवद्‌गीता असे. वेळ मिळेल त्या वेळेला ते वाचत असत. कीर्तनकार, प्रवचनकार, वैदिक ब्राह्मण यांचे ज्ञान टिकले पाहिजे यासाठी पुणे कीर्तन प्रसार सभा स्थापून प्रोत्साहन दिले.

बातमीदारास तारा थोडक्या शब्दांत मुद्देसूद कशा लिहाव्यात याचे धडे दर महिन्यातून एकदा देत असत. त्यांची स्मरणशक्ती दांडगी. १९३७ साली लिहिलेला अग्रलेख असो अगर त्या वेळी एखाद्या कामगाराला सांगितलेले काम असो, ते त्यांच्या लक्षात असे. दहा वर्षांनी विचारले तरी ते म्हणत, 'तुम्ही ते काम अद्याप केले नाहीत. हे बरे नव्हे.'

माझी— त्यांची ओळख एका खानावळीतील. त्यांनी पार्सल पोचविण्यास मला कामावर ठेवले, पण संपादकीय, बातमीदार, जाहिरात, वगैरे खात्यांतून काम करवून घेऊन मला पत्रकार बनविले. अत्यंत अडाणी, न शिकलेला माणूसही त्यांनी शिकवून त्याला संपादक केले, शिकविले. आजच्या मराठी वृत्तपत्रांत सकाळमधून शिकून तयार झालेले अनेकजण काम करीत आहेत.

डॉ. परुळेकर आजच्या वृत्रपत्रांत काम करणारांना कारकून म्हणत, ही मंडळी पत्रकार नव्हेत.

पत्रकाराची त्यांची व्याख्या फार निराळी आहे. ते म्हणत, ‘ तारांचे भाषांतर किंवा बातम्या आणणारा किंवा वेळ पडल्यास संपादकीय लिहिणारा हाही पत्रकार नव्हे. पत्रकाराला भाषांतर करता आले पाहिजे, प्रुफे वाचता आली पाहिजेत, इतकेच नव्हे तर आपला अंक कोणत्या गावी किती खपतो व किती खपेल, त्यासाठी काय कसवयास पाहिजे, त्याचा खप वाढवण्यासाठी काय उपाय करावा, जाहिराती कोणत्या येतात, बाकीच्या का येत नाहीत, भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र यांचे ज्ञान हवे. याशिवाय अद्ययावत मशिनरीची, छपाईची, कंपोजची माहिती पाहिजे. फोटोग्राफी, सायकल, ड्रायव्हिंग, या सर्व गोष्टी जो आत्मसात करील तोच खरा पत्रकार होय ’

त्यांचे लक्ष छापखान्यातील वॉचमनपासून संपादक, मॅनेजर-पर्यंत सर्वांच्या बारीकसारीक हालचालींवर असे. त्यामुळे ज्याला वचक म्हणता येईल तो त्यांचा असे. कारण त्यांनी स्वतः सायकलवरून अंक विकले, परदेशांतून सर्व माहिती मिळविली. आपल्या मराठी माणसाची मने ओळखली. म्हणून महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने मराठी माणसाचे सकाळ हे पत्र चालवून देवाची घंटा वाजेपर्यंत अहोरात्र कष्ट करून समाजाचे ऋण फेडले. खऱ्या अर्थाने पत्रकार झाला व डि. लिट. पदवी मिळवून भारतरत्न खऱ्या अर्थाने ठरले; अशा या थोर, विद्वान पत्रकाराला शतशः प्रणाम !

---

### आशियातील लोकांचे १०० कोटींचे नुकसान

अमेरिकेचा आजारी डॉलर सुधारण्याची चिन्हे अजूनही दिसत नाहीत. डॉलरची किंमत १० टक्के उतरविल्याने गटांगळ्या खाणारा डॉलर स्थिरावेल असे वाटत होते. पण अजूनही त्याची अवस्था प्रश्नचिन्हांकितच आहे. दरम्यान त्याच्या दुखण्याचे दुःख आशियातील विकसित- देशांना भोगावे लागणार आहे. आंतरराष्ट्रीय चलनांच्या बाजारात उद्भवलेल्या कठीण परिस्थिती-मुळे आशियातील विकाससन्मुख देशांचे १०० कोटी डॉलर्सचे नुकसान होईल असा अंदाज संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या एका अर्थशास्त्रज्ञाने केला आहे. विकसनशील देशांनी कष्टाने साठ-विलेल्या शिलकेची किंमत घटण्याचे प्रसंग ह्या देशांवर गेल्या काही वर्षांत अनेकदा आले आहेत. पण त्याला ते मुळीच जबाबदार नाहीत.

---

**बांगला देशासाठी शेतीची अवजारे** — बांगला देश जपानकडून यंत्रचलित नांगर आणि इतर शेतीची अवजारे आयात करण्याचा विचार करीत आहे. बांगला देशाच्या सरकारने जपानकडे पुरवठ्यासंबंधी विचारणा केली आहे. जपानकडून अगर जागतिक बँकेकडून कर्ज मिळताच आयात करण्यात येईल. त्या देशाला ५ हजार ट्रॅक्टर्सची तातडीची गरज आहे.


BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth, BELGAUM**

Invest in our “ Family Benefit Deposit Scheme ” and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT,** *General Manager.*

**K. B. KIRTIKAR,** *Chairman.*



## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | |
| --- | --- |
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) |
| | कार्यकारी संचालक : ३६१४९७ (डायरेक्ट लाईन) |
| | उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २९०००६ |

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळींची प्रेरक शक्ती*


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड


मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
| --- | --- |
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**





इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

## न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३१

तार : Vijay




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 173

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, ४ व १८ एप्रिल, १९७३ | अंक ७ व ८

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइझ्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**

TF **ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.



Madison/TGM/7 Mar

"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**



## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | |
|---|---|
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन) उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २९०००६ |

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक






प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत. देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर ®

किर्लोस्कर एंजिन- शेतकऱ्यांची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविला आहे.

Tom & Bay/KO-7315-M

☆ अर्थ ☆

बुधवार, ४ व १८ एप्रिल, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## ग्रामीण भागांतील रोजगार योजना फलद्रूप

भारत सरकारच्या शेती खात्याच्या समाजविकास विभागाचा १९७२–७३ सालाचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. अहवालात दिलेल्या माहितीवरून ग्रामीण भागांतील बेकारीचे उच्चाटन करण्याकरिता जी तातडीची योजना आखण्यात आली होती तिला यश येत आहे असे दिसून येते. ह्या योजनेची अमलबजावणी राज्य सरकारांनी मध्यवर्ती सरकाराच्या मार्गदर्शनाप्रमाणे करावयाची होती. योजना १ एप्रिल १९७१ ह्या दिवशी सुरू करण्यात आली आहे. योजनेचा सालिना खर्च ५० कोटी रुपयांचा असून तो सर्वच्या सर्व मध्यवर्ती सरकार करणार आहे. ही योजना दोन हेतूंनी आखण्यात आलेली आहे. पहिला हेतू असा की देशातील सर्व जिल्ह्यांतून रोजगार निर्मिती करणाऱ्या योजना सुरू करण्यात याव्यात, आणि त्या स्थानिक गरजा लक्षात घेऊन अंगमेहनतीला प्रोत्साहन देणाऱ्या असाव्या. त्याचप्रमाणे स्थानिक विकासाची कामे लक्षात घेऊन त्यांना उपयुक्त ठरणारी कायम स्वरूपाची उत्पादन साधने निर्माण करण्यात यावीत हा योजनेचा दुसरा हेतू होता. प्रत्यक्ष योजना एप्रिलमध्ये हाती घेण्यात आली असली तरी कामास प्रारंभ ऑक्टोबर मध्येच करणे शक्य झाले. त्यापूर्वीचा काळ योजनेचा आराखडा तयार करण्यात आणि नवीन कामासाठी लागणारी कारभारयंत्रणा साध्य करण्यात गेला. शिवाय पावसाळा–सुरू झाल्यामुळे योजनेची अमलबजावणी करण्यास थोडाफार उशीर लागणे अपरिहार्यच होते.

## संरक्षण यंत्रणेत अधिकाऱ्यांची टंचाई

हिंद सरकारच्या संरक्षण खात्याने लष्करात आणि नौदलात लागणाऱ्या अधिकाऱ्यांची टंचाई भासत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. १९७२–७३ सालाच्या अहवालात ह्यासंबंधी चर्चा करण्यात आली आहे. अधिकाऱ्यांची टंचाई भासते ती मुख्यतः संरक्षक दलाच्या तांत्रिक शाखेत. टेलिकम्युनिकेशन्स आणि इलेक्ट्रॉनिक्स ह्या तांत्रिक शाखेत प्रवीण असलेले अधिकारी मिळणे विशेष दुरापस्त होत चालले आहे. ह्याशिवाय इतर तांत्रिक क्षेत्रात ही टंचाई कमीअधिक प्रमाणात भासत आहेच. नाविक दलातील उच्च दर्जाचे कारभारी व एंजिनिअरिंग व इलेक्ट्रिकल पदवीधर ह्यांचाही तुटवडा बराच दिसत आहे. देशाच्या रोजगार बाजारात तांत्रिक तज्ज्ञांची जी उणीव भासत आहे त्याचेच हे प्रतिबिंब आहे. इंडियन मिलिटरी ॲकेडमी आणि लष्करातील नोकऱ्यांच्या इतर श्रेणी ह्यामधून दरसाल योजनाबद्ध रीतीने होतकरू उमेदवारांची भरती करण्यात येत असते. परंतु त्याप्रमाणे योग्य ती माणसे मिळत नाहीत असे दिसून आले आहे. अर्थातच दरसाल करावयाची भरती थोड्याफार प्रमाणात अपुरी राहते. लष्करात अधिकाऱ्यांची योग्यता प्राप्त करून घेण्यासाठी ज्या दर्जाची तरुण माणसे हवीत ती पुरेशा प्रमाणात लष्करात दाखल होण्यासाठी पुढे येत नाहीत असे दिसते. ह्यावर उपाय म्हणून अल्प मुदतीची कमिशन्स देण्यात आलेल्या लोकांनाच कायम स्वरूपाची कमिशन्स देण्याची पद्धत संरक्षण खात्याने सुरू केली आहे. अल्प मुदतीची कमिशन्स मिळालेल्यांना त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन कायम स्वरूपाची कमिशन्स देण्यात येऊ लागली आहेत.

## शेती महामंडळावर कामगारांचा प्रतिनिधी

महाराष्ट्रात राज्य सरकारच्या मालकीचे शेतीमहामंडळ ही संघटना सर्वांत मोठी जमीन धारण करणारी संस्था आहे. ह्या संघटनेच्या चालक मंडळावर आता कामगारांचा प्रतिनिधी घेण्यात येणार आहे. महामंडळाच्या कचेरीसाठी एक प्रशस्त इमारत बांधण्यात येत आहे. इमारतीसाठी जवळ जवळ १५ लाख रुपये खर्च येईल. शेतीमहामंडळ १९६३ साली कमाल जमीन धारणा कायदा अमलात आल्यावर कार्यान्वित झाले. मंडळाने १३ मोठ्या शेतवाड्या आपल्या ताब्यात घेतल्या असून सर्व वाड्यांची मिळून जमीन ८४ हजार एकर आहे. पश्चिम महाराष्ट्रातील ७ जिल्ह्यांत मंडळाची जमीन पसरली आहे. मंडळात ९,००० कायम नोकर आणि १३,००० हंगामी नोकर काम करीत असतात. आतापर्यंत मंडळाच्या बोर्डावर शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी होते, पण कामगारांचा प्रतिनिधी मात्र नव्हता.

## अमेरिकन विद्यापीठात अतींद्रिय विषयाचा अभ्यास

अमेरिकेतील विसकॉन्सिन विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमात जादूटोणा, भविष्य आणि भूतपिशाच्च ह्या विषयांचा समावेश केला आहे. अमेरिकेतील अनेक विद्यार्थी दृश्य म्हणून खरे भासणाऱ्या जडसृष्टीच्या अभ्यासाला कंटाळले असून त्यांना भौतिक सृष्टीच्या पलीकडे असणाऱ्या सत्याचा ध्यास लागलेला आहे. विद्यार्थ्यांची ही प्रवृत्ती लक्षात घेऊन अनेक अमेरिकन विद्यापीठांनी अतींद्रिय सृष्टीच्या अभ्यासासाठी सोय करण्यास प्रारंभ केला आहे. ह्यासंबंधी बोलताना कॅलिफोर्निआ विद्यापीठातील स्वप्नाचा अभ्यास करणारे एक प्राचार्य म्हणाले की पाश्चात्त्य जगात जडवादाने संपूर्ण जीवन ग्रासलेले आहे. ह्या प्रवृत्तीविरुद्ध विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया सर्व जगभर होत आहे. त्याचाच हा परिणाम आहे.

**७ ॲव्हरो विमानांची मागणी**—इंडियन एअरलाइन्स ह्या देशांतर्गत विमानवाहतूक कंपनीसाठी आणखी ७ ॲव्हरो जातीची विमाने घेण्यात येणार आहेत. कंपनीच्या विमानांच्या ताफ्यात १५ ॲव्हरो विमाने आधीच आहेत. ह्या नव्या विमानांची मागणी हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. कडे नोंदविण्यात आली आहे. एका विमानाला १ कोटी रुपयाची किंमत द्यावी लागते.

**हातमाग व्यवसायासाठी वित्तमंडळ** — उत्तर प्रदेश सरकारने हातमाग व यंत्रमाग ह्या धंद्यासाठी एक वित्तमंडळ स्थापन केले आहे. हे मंडळ धंद्याच्या अडचणी सोडवून त्याचा विकास करण्याचा प्रयत्न करील. वित्तमंडळाचे अधिकृत भांडवल ५ कोटी रुपयांचे आहे. विणकरांना जमीन, इमारती आणि यंत्रसामग्री घेण्यासाठी दीर्घ मुदतीची कर्जे मंडळामार्फत देण्यात येणार आहेत.

**रशिआतून केरोसिनची आयात**—भारताने सोव्हिएट रशिआकडून १९७३ मध्ये ६,५५,००० टन केरोसिनची आयात करण्याचा करार केला आहे.

**'महिला' स्पेशल**—खास स्त्रियांसाठी आगगाड्या सुरू करण्यात याव्यात अशी सूचना श्रीमती सहोदराबाई ह्यांनी लोकसभेत केली.

**रेल्वे नोकरांना बदली भत्ता** — बदली झाल्यानंतर नवे बिऱ्हाड लावण्यासाठी, मुलांना नवीन शाळात घालण्यासाठी, त्यांच्या पुस्तक खरेदीसाठी बराच खर्च येतो तो भागविण्याकरिता रेल्वे नोकरांनी बदलीभत्त्याची मागणी केली होती. आर्बिट्रेशन बोर्डाने तृतीय श्रेणीच्या नोकरांना अर्ध्या महिन्याच्या पगाराइतका (कमाल २०० रु. वजा २५%) आणि चतुर्थ श्रेणीच्या नोकरांना अर्ध्या महिन्याच्या पगाराइतका (कमाल २०० रु. वजा १२·५%) भत्ता देवविला आहे. त्याचा फायदा एकूण १३ लक्ष लोकांना मिळेल.

**विमा एजंटाच्या कमिशनमधून कर कापून घेणार** — येत्या जूनपासून विमा एजंटांच्या कमिशनमधून इन्कम टॅक्स कापून घेतला जाईल. "विम्याचे काम मिळविण्यासाठी मिळणारा मोबदला" अशी ह्या कमिशनची व्याख्या करण्यात आली आहे. त्यात रिन्युअल कमिशनचाही समावेश होईल. १९७३–७४ मध्ये १०% दराने कर कापून घेतला जाईल. एजंटाचे एकूण उत्पन्न लक्षात घेऊन कमी दराने कर कापून घेण्याची किंवा अजिबात न कापण्याची तरतूद केलेली आहे. इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडून तसे सर्टिफिकेट घेतले म्हणजे त्या सर्टिफिकेटाप्रमाणे कर कापून घेतला जाईल.

## बुडीत पोस्ट शाखेला टेलिफोन्सचा आधार

पोस्ट आणि तार खात्याने गेली तीन वर्षे सतत नफा दाखविला आहे. १९६९-७० मध्ये १५·४ कोटी रु. नफा झाला, १९७०-७१ मध्ये २२·९ कोटी रु. नफा झाला आणि १९७१-७२ मध्ये ३७·१ कोटी रु. नफा झाला. सुस्थितीचे मुख्य कारण टेलिफोन शाखेने केलेला मोठा नफा हे होय.

गेल्या दहा वर्षांत पोस्टल शाखेने फक्त दोनदा (१९६२-६३ आणि १९६३-६४) नफा दाखविला आहे. १९६७-६८ मध्ये त्याने १४·१२ कोटी रु. तोटा दाखविला. हा तोटा कमी कमी होत १९७०-७१ मध्ये १ कोटी रु. वर उतरला. १९७१-७२ मध्ये ७·४१ कोटी रु. तोटा झाला.

टेलिकम्युनिकेशन्सच्या तीन शाखांनी मिळून (टेलिग्राफ, टेलिफोन व वायरलेस) १९७१–७२ मध्ये ४४·६ कोटी रु नफा दाखविला. पोस्टल खात्याच्या ७·४१ कोटी रु. तोट्याच्या पार्श्वभूमीवर हा नफा उठून दिसत आहे. ह्या नफ्यापैकी ३६·२ कोटी रु. टेलिफोन शाखेने, ८·२ कोटी रु. टेलिग्राफ खात्याने आणि ०·२ कोटी रु. वायरलेस खात्याने दिले.

| वर्ष | पोस्ट शाखा | टेलिकम्युनिकेशन | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | टेलिग्राफ | टेलिफोन | वायरलेस | टेलिकम्यु. एकूण | एकूण |
| १९६२–६३ | (+) ०·७९ | (–) १·३७ | (+) ०·५८ | — | (–) ०·७९ | — |
| १९६३–६४ | (+) ३·४४ | (–) २·०५ | (+) १·०४ | (–) ०·११ | (–) १·१२ | (+) २·३२ |
| १९६४–६५ | (–) १·२८ | (–) ०·८३ | (+) २·१४ | (–) ०·०३ | (+) १·२८ | — |
| १९६५–६६ | (–) ३·२८ | (–) ५·२५ | (+) ३·३१ | (–) ०·१३ | (–) २·०७ | (–) ५·३५ |
| १९६६–६७ | (–) ८·३४ | (–) ५·८३ | (+) ११·०४ | (+) ०·०३ | (+) ५·२४ | (–) ३·१० |
| १९६७–६८ | (–) १४·१२ | (–) ७·०४ | (+) ८·५१ | (+) ०·०८ | (+) १·५५ | (–) १२·५७ |
| १९६८–६९ | (–) ६·१६ | (–) ७·४४ | (+) ११·६० | (–) ०·११ | (+) ४·०५ | (–) २·११ |
| १९६९–७० | (–) ५·१४ | (–) ४·८० | (+) २५·३८ | (–) ०·०६ | (+) २०·५२ | (+) १५·३८ |
| १९७०–७१ | (–) ०·९६ | (–) ७·०३ | (+) ३०·०८ | (+) ०·८२ | (+) २३·८७ | (+) २२·९१ |
| १९७१–७२ | (–) ७·४१ | (+) ८·२३ | (+) ३६·१७ | (+) ०·१५ | (+) ४४·५५ | (+) ३७·१४ |

## ग्रामीण भागांतील वीजपुरवठा वाढणार

ग्रामीण भागांत विजेचा पुरवठा होऊ लागला की तेथील जीवनाची घडी पालटण्याची पूर्वतयारी झाली असे म्हणता येईल. तेथील रोजच्या जीवनरहाटीला कलाटणी मिळण्यास विजेच्या पुरवठ्यामुळे प्रारंभ होतो. ह्या बाबतीत अजूनही खूप प्रगती व्हावयास पाहिजे हे उघडच आहे. मध्यवर्ती सरकारचे पाणी-पुरवठा व वीजमंत्री श्री. के. एल. राव लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणाले की ५ व्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस ग्रामीण भागांतील ८० टक्के जनतेला विजेचा पुरवठा होऊ लागेल. बाकीच्या भागांना पुरवठा करण्याचे काम पुढील काही वर्षांत पूर्ण होईल. त्याची तयारी आतापासून सुरू करण्यात आली आहे. लोकसभेत देशात सध्या पडलेल्या विजेच्या तीव्र टंचाईबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली असता ते पुढे म्हणाले की लोकसभेच्या सभासदांच्या चिंतेशी सरकार सहमत आहे. कारण विजेच्या टंचाईमुळे इतके नुकसान झाले आहे की अर्थ-व्यवस्थेवर तिचा फार विपरीत परिणाम झाला आहे. वादळे, पूर आणि दुष्काळ ह्या तिन्ही आपत्तीमुळे जितके नुकसान झाले आहे त्यापेक्षाही अधिक नुकसान विजेच्या टंचाईमुळे झालेले आहे. देशाची अर्थव्यवस्था प्रगत करावयाची असेल तर ५ व्या पंच-वार्षिक कार्यक्रमाच्या कालखंडात १·८ कोटी ते २ कोटी मेगॅवॅट विजेची निर्मिती करण्यात आली पाहिजे. सध्या दरसाल १० लाख मेगॅवॅट वीज अधिक निर्माण करण्यात येत असते. परंतु वीज-निर्मितीचा हा वेग वाढवून दरसाल ३० ते ४० लाख मेगॅवॅट वीज अधिक निर्माण करण्यात आली पाहिजे. तरच देशाची अर्थ-व्यवस्था विकास पावू शकेल

---

## बेकारांच्या संख्येत भयप्रद वाढ झाली

बेकारीचा प्रश्न भारताला भयप्रद रीतीने भेडसावू लागला आहे. तसा हा प्रश्न जुनाच आहे, परंतु त्याची तीव्रता गेल्या काही वर्षांत विलक्षण वेगाने वाढत चाललेली आहे. १९७२ मध्ये देशातील बेकारीच्या वाढीचा वेग जितका होता तितका तो पूर्वी कधींच आढळून आलेला नाही. त्या मागील दोन वर्षांत बेकारांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत होतीच. त्यामुळे त्या वाढत्या वेगाने अधिकच चिंताजनक वातावरण तयार झाले आहे. देशातील रोजगार विनिमय केंद्रात बेकारांची नोंद करण्यात येत असते. सर्वच बेकार केंद्रातून आपली नावे नोंदवीत नसले तरी केंद्रातील बेकारांच्या आकड्यावरून परिस्थितीवर चांगला प्रकाश पडतो. रोजगार विनिमय केंद्रात जमा झालेल्या माहितीवरून असे दिसते की १९७० मध्ये बेकारांच्या संख्येत १८·८ टक्क्यांनी वाढ झाली. १९७१ मध्ये ही वाढ २५·३ टक्क्यांनी झाली आणि १९७२ मध्ये ३५ टक्क्यांनी झाली. बेकारांचे प्रत्यक्ष आकडे असे आहेत. १९७० अखेर ४१ लाख लोक बेकार होते; त्यांची संख्या १९७१ मध्ये ५१ लाखांपर्यंत वाढली आणि १९७२ मध्ये तर तिने ६९ लाखांची मर्यादा गाठली. त्यातही शिक्षित बेकारांच्या संख्येत अधिक वेगाने वाढ झाली. १९७० मध्ये त्यांची संख्या १८ लाख होती ती १९७१ मध्ये २३ लाखांपर्यंत वाढली. १९७२ मध्ये ती आणखी फुगून ३३ लाख झाली. टक्के-वारीच्या भाषेत ही वाढ अनुक्रमे २६ टक्के आणि ४३ टक्के झाली. ह्या संख्येत २३ हजार एंजिनिअरिंगची पदवी घेतलेले आणि ६० हजार पदविका घेतलेले आहेत. शिक्षित बेकारांत ५३·१ टक्के मॅट्रिक अगर पदवीपर्यंत पोचलेले होते.

---

## मध्यप्रदेशातील फक्त ९ टक्के जमीन ओलिताखाली

मध्यप्रदेश राज्याचे गव्हर्नर श्री. सत्यनारायण सिन्हा ह्यांनी इंदोर येथे बोलताना राज्यातील शेतीच्या व्यवसायासंबंधी काही विचार व्यक्त केले. जवाहरलाल नेहरू शेतकी विद्यापीठाच्या ५ व्या पदवीदान प्रसंगी भाषण करताना ते म्हणाले की मध्य-प्रदेशातील शेतीची अवस्था फारशी चांगली म्हणता येणार नाही. भारतात शेतीची जी अवस्था आहे तिला मध्यप्रदेशाचा अपवाद आहे असे नाही. जगात शेतीच्या व्यवसायाच्या विकासात अग्रेसर असणारे जे देश आहेत त्यांच्या मानाने भारत अजूनही १०० वर्षे मागासलेला आहे. तेव्हा मध्यप्रदेशातील शेती प्रगत असण्याचा संभव अर्थातच नाही. भारतात लागवडीखाली असलेल्या जमिनीपकी अवघी २३ टक्के जमीन ओलिताखाली आलेली आहे. खुद्द मध्यप्रदेशात तर ९ टक्के जमीनच निश्चित पाणीपुरवठा असणारी अशी आहे. तथापि ह्या बाबतीत हळूहळू सुधारणा होत आहे आणि ओलिताखालील जमीन वाढू लागली आहे. मध्यप्रदेशात सध्या १९ मोठ्या व मध्यम पाणीपुरवठ्याच्या योजना हाती घेण्यात आल्या आहेत. त्याशिवाय अनेक छोट्या पाटबंधाऱ्यांची कामेही सुरू आहेत. ही सर्व कामे पूर्ण झाली म्हणजे ५ व्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस राज्यातील लागवडीयोग्य जमिनींपैकी चौथा हिस्सा जमीन ओलिताखाली येईल असा अंदाज आहे. अलीकडे देशाच्या अनेक भागांत अवर्षणाचे संकट ठाण मांडून बसले आहे. ह्या संकटाच्या निमित्ताने अजूनही निसर्गावर कसे अवलंबून राहावे लागत आहे आणि देशातील लागवडीची पद्धत किती जुनी व टाकाऊ झाली आहे ते पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

---

**भारतातील वाघांची संख्या**—भारतात एकूण १,८२७ वाघ आहेत. त्यांपैकी मध्य प्रदेशात ४५७, उत्तर प्रदेशात २६२ आणि महाराष्ट्रात १६० आहेत; आसामात १४७, ओरिसात १४२, म्हैसूरमध्ये १०२, बिहारमध्ये ८५, नागालँडमध्ये ८०, राजस्तानमध्ये ७४, प. बंगालमध्ये ७३, अरुणाचल प्रदेशात ६९, केरळात ६०, आंध्रमध्ये ३५, तामीळनाडूत २३, मेघालयात ३२, गुजरातमध्ये ८, त्रिपुरात ७ आणि मणिपूरमध्ये १ अशी इतर राज्यातील वाघांची संख्या आहे.

## ओलिताखालील जमीन दुप्पट करण्याची योजना

पावसाच्या लहरीपणामुळे पडणाऱ्या दुष्काळाचे स्वरूप गेल्या वर्षी मोसमी पावसाने दगा दिल्यामुळे उग्रपणे स्पष्ट झाले आहे. दुष्काळाच्या आपत्तीला तोंड देण्याचा प्रभावी उपाय म्हणजे ओलिताखाली अधिकाधिक जमीन आणणे हा होय. मध्यवर्ती पाणीपुरवठा व वीजमंत्री श्री. के. एल्. राव ह्यांनी राज्यसभेत ह्या प्रश्नासंबंधी माहिती दिली आहे. ते म्हणाले की पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या आरंभापासून दरसाल १० लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्यात आली आहे. पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत दरसाल २० लाख हेक्टर जमीन नव्याने ओलिताखाली आणण्याचे प्रयत्न करण्यात येतील. दरसाल १० लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणण्याचे काम जगात अद्वितीय आहे असेच म्हणावे लागेल. देशात एकूण १६·४ कोटी हेक्टर जमीन लागवडीखाली आहे. त्यापैकी ४·४ कोटी हेक्टर जमिनीला चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर हुकमी पाणीपुरवठा होऊ लागेल. आमच्या अंदाजाप्रमाणे लागवडी-योग्य असणाऱ्या जमिनींपैकी निम्मी जमीन २० ते २५ वर्षांच्या अवधीत ओलिताखाली आणता येणे शक्य आहे. ह्याविषयी अधिक तपशीलवार पाहणी केली आणि नदीखोरे योजना एकमेकांना जोडण्यात आल्या तर आणखी १० ते १५ टक्के जमीन बारमाही पाणीपुरवठा असणारी होऊ शकेल. ज्या जमिनीला पाण्याचा निश्चित पुरवठा नाही अशी जमीन १२ कोटी हेक्टरसच्या जवळपास असावी. राज्याराज्यांतील वादांमुळे अडकून पडलेली तीन प्रकरणे लवादाकडे सोपविण्यात आलेली आहेत. पैकी दोन न्यायालयात प्रविष्ट झालेली आहेत.

---

## आहारात विविधता असेल तर त्यातील धान्यांवरील भार कमी होईल

भारत सरकारच्या शेतीखात्याच्या अन्न व आहारसमितीतर्फे आहारविषयक तज्ज्ञांचा एक परिसंवाद दिल्ली येथे भरविण्यात आला होता. परिसंवादाचे उद्घाटन शेतीखात्याचे राज्यमंत्री श्री. अण्णासाहेब शिंदे ह्यांनी केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की हिंदच्या जनतेच्या रोजच्या आहारांत अधिक विविधता आणून त्यात धान्यावर असलेला जोर कमी करण्यात आला पाहिजे. हिंदमधील आहाराच्या सवयींसंबंधी अनेकदा पाहणी करण्यात आलेली आहे. पाहणीत गोळा झालेल्या माहितीवरून असे दिसते की वयात आलेल्या हिंदी माणसाच्या आहारात दररोज सरासरी ४६५ ग्रॅम अन्नधान्याचा समावेश असतो. हे प्रमाण वाजवीपेक्षा अधिक आहे. समतोल आहाराच्या दृष्टीने पाहता ४०० ग्रॅम धान्य पुरेसे होते. त्यांतही ग्रामीण भागांतील रोजची सरासरी ४९० ग्रॅमपेक्षाही अधिक आढळून आली. काही काही ठिकाणी तर ह्या सरासरीने ७०० ते ८०० ग्रॅमचीही मर्यादा ओलांडलेली दिसून आली. अर्थातच आहारशास्त्रात ज्याला पूरक अन्न म्हणतात अशा पदार्थांची कमतरता आढळून आली. बटाटे, रताळी आणि इतर कंदपदार्थ रोजच्या आहारात असावे तितके असत नाहीत. त्यामुळे 'अ' ह्या जीवनसत्त्वाचा अभाव साहजिकच उत्पन्न होतो म्हणून पूरक अन्नपदार्थांच्या सेवनांत वाढ करण्यास खूपच वाव आहे. हे पदार्थ योग्य प्रमाणात सेवन करण्यात आले तर सध्या अन्नधान्याच्या मागणीचे जे दडपण वाढले आहे ते खूपच कमी होईल आणि समतोल आहार घेण्याचेही साधून जाईल.

---

## हिप्पींचे जन्मस्थान अमेरिका नाही

फ़ोर्ड फौंडेशनमध्ये समाजशास्त्राचे प्राध्यापक असलेले डॉ. लर्नर ह्यांनी असे म्हटले आहे की लांब केस वाढवून देशोदेशी भटकणारा हिप्पींचा संप्रदाय खरे तर ब्रिटनमध्ये उगम पावलेला आहे. पण त्याचे श्रेय किंवा अपकीर्ती मात्र अमेरिकेच्या खाती जमा करण्यात येत आहे. ही गैरसमजूत होण्यास अमेरिकेतील जनता-संपर्काची प्रभावी साधने जबाबदार आहेत. कोणत्याही नव्या गोष्टीला ह्या साधनाद्वारे इतकी प्रसिद्धी देण्यात येते की सर्व जगभर ती अमेरिकेतूनच निघाली आहे असा समज सहज पसरतो. खुद्द अमेरिकन लोकांना स्वतःची अशी दीर्घ ऐतिहासिक परंपरा नाही. त्यामुळे कोठल्याही नावीन्याचे ते लवकर स्वागत करतात. परिणामी मूळच्या त्यांच्या नसलेल्या कथा व व्यथा त्यांच्या माथी बसतात.

---

## भारत सरकारच्या खर्चात बजेटपेक्षा १३०३ कोटी रु. नी वाढ

भारत सरकारने १९७२-७३ च्या अंदाजपत्रकापेक्षा १३०२·९४ कोटी रुपये अधिक खर्च केला, त्याला पार्लमेंटची मंजुरी घेण्यात येत आहे. १९७२-७३ च्या म्हणजे चालू वर्षीचे दुरुस्त अंदाजाचे आकडे तयार करताना हा खर्च हिशेबात घेण्यात आलेला आहे. त्यामुळे १९७२-७३ च्या दुरुस्त तोटयाचा ५५० कोटी रु. चा आकडा बदललेला नाही. पार्लमेंटने कोणत्याही खर्चास दिलेल्या संमतीपेक्षा जास्त खर्च झाला, तर ह्या जादा खर्चास मंजुरी घेण्यात आली पाहिजे, असे घटनेचे बंधन आहे. पुरवणी मागणीत समाविष्ट असलेल्या बाबींचे उत्पन्न आणि वसुली २२८·९८ कोटी रु. नी वाढल्यामुळे प्रत्यक्ष जादा खर्च १०७३·९६ कोटी रु. झाला आहे.

---

**बँकेतून चोरलेले ७ लक्ष रु. परत मिळाले** — इंडियन ओव्हरसीज बँकेच्या जालंदर शाखेतून तेथील मेहतरने चोरलेले ७·६ लक्ष रु. सापडले आहेत. त्याने त्यापैकी थोडी रक्कम घरी नेली होती आणि बाकीची तेथेच काही कागदांखाली लपवून ठेवली होती.

**चंबळेवरील पूल खचत आहे** — धोलपूरजवळील चंबळ नदीवरील पूल खचत आहे, त्यामुळे तो तूर्त रहदारीला बंद करण्यात आला आहे. मुंबई–दिल्ली हमरस्ता ह्या पुलावरून जातो.

## विकसनशील देशांतील शास्त्रीय संशोधन

जगातील विकसनशील देशांच्या मागासपणाचे एक प्रमुख कारण म्हणजे तेथील शास्त्रीय संशोधनाची व तांत्रिक ज्ञानाची अप्रगल्भ अवस्था. ह्या देशांतील संशोधनाची व तंत्रज्ञानाची सध्याची अवस्था आणि विकास ह्यासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या संबंधित समितीने एक प्रबंध तयार केला आहे. त्यातील माहिती-वरून ह्या देशातील व प्रगत देशांतील संशोधनात किती अंतर आहे ते समजून येते. सर्व जगात जरी शास्त्रीय संशोधनाची प्रगती होत असली तरी त्यातील फारच थोडा वाटा अविकसित देशांना मिळत आहे. प्रबंधात अशी माहिती देण्यात आली आहे की शास्त्रीय संशोधन व तांत्रिक ज्ञान ह्यांची जगात जी साधन-संपत्ती उपलब्ध आहे, त्यापैकी फक्त दोन टक्के साधनसामग्रीचाच काय तो अविकसित देशांना सध्या फायदा मिळत आहे. ९८ टक्के साधनांचा उपयोग विकास पावलेल्या देशांतून करण्यात येतो आणि तोही त्यांच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनेच करण्यात येतो आणि जी दोन टक्के सामग्री विकसनशील देशांतील संशोधनाच्या कारणी वेचण्यात येते त्यापैकी फारच अल्प भाग त्या त्या देशांतील खऱ्याखुऱ्या गरजांसाठी खर्ची पडतो. शिवाय प्रगत देशांतील काही संशोधन अशा प्रकारचे असते की त्यामुळे मागासलेल्या देशांच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो. विकसनशील देशांतून आयात करण्यात येणाऱ्या मालावर त्याचा परिणाम होतो आणि त्यांची अर्थव्यवस्था अडखळू लागते.

---

## रशिआत दुष्काळाचे फेरे येत असतातच

रशिआने यंत्रयुगात अमेरिकेच्या खालोखाल प्रगती केली आहे. पण तेथील शेती अजूनही मागासलेल्या अवस्थेत आहे. म्हणूनच अलीकडे दुष्काळाच्या आपत्तीला तोंड देण्यासाठी रशिआने अमेरिका, कॅनडा, इत्यादी देशांकडून मोठ्या प्रमाणावर गहू आयात केला. मुंबईतील रशिआचे व्हाइस कौन्सल मि. ट्रेपेझीनिकॉव्ह ह्यांनी अहमदाबाद येथे एका प्रसंगी बोलताना ह्या परिस्थितीवर प्रकाश टाकला आहे. ते म्हणाले की, वाहतुकीची सोय आणि हवामान ह्या कारणांनी रशिआला गहू आयात करावा लागला. रशिआच्या पूर्व भागात धान्याची टंचाई भासत होती. तेथे यूक्रेनसारख्या पश्चिमेकडील प्रांतातून धान्य पाठविणे महागात पडले असते. त्यापेक्षा प्रशांत समुद्रावरील बंदरातून परदेशांकडून आयात करणे अधिक इष्ट होते. शिवाय रशिआतील हवामान अमेरिका अगर कॅनडा ह्या देशांच्या मानाने बरेच प्रतिकूल आहे. रशिआत दर तीन वर्षांनी पावसाच्या अभावी दुष्काळी परिस्थिती उत्पन्न होत असते. कधी कधी तर दर दोन वर्षांनीही अवर्षणाचा तडाखा बसतो म्हणून शेतीला अधिक प्रमाणात खताचा पुरवठा करून धान्याचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न सतत करण्यात येत आहेत. रशिआतील राज्यपद्धती-विषयी बोलताना ते पुढे म्हणाले की, आता रशिआत कामगारांची हुकूमशाही नाही. क्रांतीच्या पहिल्या काही वर्षात अशी हुकूमशाही होती. आता रशिआत सरकार, कम्युनिस्ट पक्ष आणि जनता ह्या सर्वांनी चालविलेले अधिराज्य आहे. तेथील कम्युनिस्ट पक्ष पर्यवेक्षकाचे काम करीत नाही; फक्त तात्त्विक दिशा व धोरण आखून देतो.

---

## चिंतनाचा व्यावहारिक उपयोग निश्चित होतो

भारत हा देश योगविद्येची जननी म्हणून प्रसिद्ध आहे. ह्या विद्येभोवती अध्यात्माचे एक प्रकारचे गूढ वलय रेंगाळत राहिले आहे. म्हणून सामान्य माणसे तिच्या वाटेस सहसा जात नाहीत. पण पूर्वकालच्या ऋषीमुनींच्या म्हणण्याप्रमाणे अध्यात्म हे सुखाचे फार मोठे व प्रभावी साधन आहे. ह्याच सुखाचा शोध पाश्चात्त्य शास्त्रज्ञ भौतिक जगतावर प्रभुत्व गाजवून करू पाहत आहेत. त्यांच्या प्रयत्नामुळे माणसाला अनेक सुखसाधने मिळू लागली असली तरी माणूस २० व्या शतकातही पूर्ण समाधानी नाही. अमेरिकेसारख्या वैभवसंपन्न देशातही मानसिक रोग्यांची होत असलेली वाढ चिंतेची बाब झाली आहे. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून पाश्चात्त्य देशांतील शास्त्रज्ञ योगविद्येच्या व्यावहारिक उपयोगाकडे वळत आहेत. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, इत्यादी देशांतून योगविद्येतील चिंतनप्रकाराचे शास्त्रीय संशोधन करण्यात येत आहे. त्यांच्या अभ्यासावरून असे दिसून आले आहे की भारतीय तपस्व्यांनी सांगितलेल्या चिंतन-ध्यानाच्या मार्गाने व्यक्तीच्या आयुष्यात स्वागतार्ह बदल घडवून आणता येतो. ध्यान-चिंतनाच्या मार्गावर वाटचाल करीत असलेला माणूस अधिक ध्येयनिष्ठ, अधिक कार्यक्षम आणि समर्थ बनतो. २० व्या शतकांतील मानवावर परिस्थितीचा ताण असह्य होत चाललेला आहे. तो ताण सोसण्याचे त्राण कमी कमी होत चालले आहे. ध्यान-चिंतनाच्या साह्याने माणसाला आपल्या मध्यवर्ती मज्जा-तंतूवर होणारे आघात अधिक चांगल्या प्रकारे सोसता येतात. त्याच्या मानसिक ठेवणीत फरक पडतो आणि माणूस म्हणून जगण्याच्या प्रयत्नात तो अधिकाधिक यशस्वी होत जातो.

---

## रासायनिक खतांची वाढती गरज

देशांतील रासायनिक खतांची गरज वाढत चाललेली आहे. ती पुरवण्यासाठी पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत १० ते १२ नवे खतकारखाने काढावे लागतील, अशी माहिती राज्यसभेत देण्यात आली. संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी असेही सांगितले की १९७८–७९ च्या सुमारास ४५ लाख टन अधिक खताची गरज लागणार आहे. एक कारखाना काढण्यासाठी १४० कोटी रुपये भांडवल घालावे लागते. सध्या भारत दरसाल १६० कोटी रुपये किमतीची रासायनिक खते आयात करीत आहे. खतांच्या कारखान्यांच्या बाबतीत सरकारच्या धोरणात बदल झालेला नाही. खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या अशा दोन्ही कारखान्यांना ह्या क्षेत्रात वाव आहे. ह्या बाबतीत परदेशांचे सहकार्य घेण्याचे सरकारचे धोरण चूक म्हणता येणार नाही.

## कर चुकविण्यासाठी थकबाकी ?

इन्कम टॅक्सच्या थकबाकीच्या वसुलीसाठी कठोर उपाय योजण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. कोर्टदरबाराचा अवलंब करून, कालहरण करून, थकबाकी वाढविण्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्याचाही सरकारचा विचार आहे. १ फेब्रुवारी १९७३ रोजी सर्वांत जास्त थकबाकी असणाऱ्या पहिल्या अनुक्रमाच्या १२ कंपन्यांचा तपशील पार्लमेंटास सादर करण्यात आला, तो खालीलप्रमाणे :—

| | ( रुपये लक्ष ) |
|---|---|
| आर. बी. श्रीराम दुर्गाप्रसाद ( प्रा. ) लि. | ३१०·४५ |
| डालमिया सिमेंट अँड पेपर मार्केटिंग कं. लि. | १११·९३ |
| श्री चांगदेव शुगर मिल्स लि. | ९५·१२ |
| नॉर्थ बेंगॉल शुगर मिल्स कं. लि. | ९१·५१ |
| बी. आर. सन्स लि. | ८६·०९ |
| एस. बी. इंडस्ट्रिअल डेव्ह. कं. लि. | ७९ ०८ |
| डालमिया जैन एअरवेज लि. | ७८·२८ |
| कॅन्यू अँड कं. लि. | ७७·३५ |
| स्टील ( १९५७ ) ( प्रा. ) लि. | ७२·९५ |
| फिल्मिस्तान ( प्रा. ) लि. | ६८·६१ |
| बेंगॉल ज्यूट मिल्स कं. लि. | ६३·९४ |
| असोसिएटेड सिमेंट कं. लि. | ५२·४५ |

वरील १२ कंपन्यांपैकी पाच कंपन्या अगोदरच नादारीत गेलेल्या आहेत किंवा जाण्याच्या मार्गावर आहेत; दुबार करवसुली टाळण्यासाठी केलेल्या पाकिस्तान-भारत करारानुसार केलेल्या क्लेम्सची चौकशी तीन कंपन्यांच्या बाबतीत चालू आहे आणि बाकीच्या कंपन्यांची 'माहीत असलेली' जिंदगी जप्त करण्यात आली आहे.

---

## इटलीत सक्तीच्या रक्तदानासाठी कायदा

इटली देशामध्ये रुग्णांना लागणाऱ्या रक्ताचा रक्तपेढ्यांकडून पुरेसा पुरवठा होत नाही. कारण, नागरिकांकडून रक्तदानाने गोळा होणारे रक्त पुरेसे मिळत नाही. ह्यावर उपाय म्हणून इटालीच्या पार्लमेंटमध्ये एका सभासदाने एक कायदा करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. ह्या बिलाचे जर कायद्यात रूपांतर झाले तर इटलीमधील प्रत्येक निरोगी आणि सुदृढ माणसाला आयुष्यात एकदा तरी सक्तीने रक्तदान करावेच लागेल. इटालीच्या इस्पितळातून आणीबाणीच्या वेळी जरूर असणाऱ्या रक्ताची इतकी टंचाई आहे की रक्ताचा काळा बाजार सुरू झाला आहे. असा कायदा इटालीच्या घटनेविरुद्ध नाही. कारण, काही रोगांविरुद्ध लस टोचण्याची तेथे सक्ती आहेच.

---





सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

## शेतीविषयक शिक्षण व ग्रामीण गरजा ह्यांची सांगड हवी

हिंदमधील बहुसंख्य जनता अद्यापही ग्रामीण भागांत राहणारी व म्हणूनच शेतीच्या व्यवसायावर अवलंबून आहे. ह्या व्यवसायाचे आधुनिकीकरण घडवून आणण्यात म्हणण्यासारखे यश आलेले नाही. कारण हरितक्रांती अजून महत्त्वाच्या सर्व पिकांपर्यंत पोचलेली नाही. शेतीच्या व्यवसायाची भरभराट घडवून आणण्यासाठी तांत्रिक ज्ञानाची व ते देणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता चालू सालच्या दुष्काळामुळे पुन्हा एकदा दुःखद रीत्या स्पष्ट झालेली आहे. नवी दिल्ली येथे भरविण्यात आलेल्या एका परिसंवादात शेतीसंशोधन आणि विकास ह्या विषयावर झालेली चर्चा ह्या संदर्भात उपयुक्त ठरणारी आहे. भारतामधील सर्वच शिक्षणाची पुनर्घटना करण्याची जरुरी असली तरी ग्रामीण भागातील शिक्षणासंबंधीची पुनर्घटना विशेष महत्त्वाची मानावी लागेल. लोकांना शेतीचे शिक्षण देताना ग्रामीण गरजांची दखल घेण्याचे आवाहन परिसंवादात करण्यात आले. परिसंवादात भाग घेणाऱ्या तज्ज्ञांनी शेतीविषयक शिक्षण आणि राष्ट्रीय विकासात विद्यार्थ्यांचे स्थान ह्याविषयी अनेक प्रकारचे विचार व्यक्त केले. बंगलोर येथील शेतकी शास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू श्री. नाईक म्हणाले की समाजाने जी मूल्ये स्वीकारली आहेत ती साध्य करण्यास तंत्रज्ञानाने मदत केली पाहिजे आणि हेच अंतिम उद्दिष्ट लक्षात ठेवून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात आले पाहिजे. ह्या दंडकाच्या दृष्टीने विचार करता सध्याची शिक्षणपद्धती फारच मर्यादित म्हणावी लागते. म्हणून पुढे ठाकलेली कामे करण्याची धमक ह्या पद्धतीत आढळून येत नाही.

शिक्षणपद्धती– अशी असली पाहिजे की तीमुळे विद्यार्थ्यांत नवी जाणीव उत्पन्न झाली पाहिजे. विद्यार्थ्यांना देण्यात येणारे शिक्षण त्याला रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारे तर असलेच पाहिजे, परंतु त्याची कामासाठी तयारी केली पाहिजे; त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार झाला पाहिजे आणि सामाजिक ध्येयपूर्तीची आसही त्याला लागली पाहिजे. पंजाब शेतकी विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. रंधवा म्हणाले की शेतकी विद्यापीठांतून देण्यात येणारे शिक्षण ग्रामीण जीवनातील प्रश्न सोडविण्यास पात्र असे असले पाहिजे. त्याचप्रमाणे ग्रामीण जीवनात जे नवे नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत त्यांचीही दखल ह्या शिक्षणाने घेतली पाहिजे. शेतकी विद्यापीठांतून जे विशेषज्ञ शिकून बाहेर पडतात त्यांना परिस्थितीची खरीखुरी जाणीव असली पाहिजे. तशी त्यांनी करून घेतली पाहिजे. ग्रामीण भागातील जीवनाच्या गरजांची त्यांना नीट समजूत पटलेली असली पाहिजे. शेतकी शिक्षणविषयक तज्ज्ञ श्री. पारोळकर म्हणाले की आगामी काळात सर्व शेतीविषयक शिक्षणात एकसूत्रता आणण्यात आली पाहिजे. ग्रामीण भागांचा विकास करण्यासाठी ज्या योजना आखण्यात येतात त्यांचा आणि शेतीशिक्षणाचा मिलाफ साधण्यात आला पाहिजे. हे साध्य करण्यासाठी शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांनी आपल्या कार्यपद्धतीत सतत बदल करण्याची तयारी दाखविली पाहिजे. तरूण शेतकऱ्यांचे क्लब्ज वाढण्यात यावे व त्यांची श्रमशिबिरे भरविण्यात यावी. ह्या ठिकाणी शेतकी विद्यापीठांतील विद्यार्थी आणि तरूण शेतकरी ह्यांनी परस्परांचा परिचय करून घेऊन काम करावे म्हणजे त्यांच्यात सहकार्याची व बंधुत्वाची भावना निर्माण होऊ शकेल.

---

## कारखान्यातील कामगारांत वाढ

### बृहन्मुंबई, ठाणे आणि पुणे ह्यांची आघाडी

महाराष्ट्राच्या १९७२–७३ च्या आर्थिक आढाव्याप्रमाणे, १९७१ मध्ये महाराष्ट्रातील कारखान्यांमधील एकूण कामगारांपैकी ७५% कामगार बृहन्मुंबई, ठाणे आणि पुणे ह्या जिल्ह्यात होते. त्यातील मुंबईचा वाटा ६०%, ठाण्याचा १०% आणि पुण्याचा ८% होता.

एकूण लोकसंख्येत फॅक्टरी कामगारांचे दर हजारी लोकवस्तीशी प्रमाण मुंबईत ९९, ठाण्यात ४७ आणि पुण्यात २५ पडते. नागपूरमध्ये ते १५ तर रत्नागिरी, परभणी, बीड आणि उस्मानाबाद ह्यांत ते फक्त १ एवढेच होते.

फॅक्टरीतील रोजगार १९६१-७१ ह्या दहा वर्षांत २७% ने वाढला. ठाणा जिल्ह्यातील वाढ २०२% झाली. त्याखालील वाढ कुलाब्यात (१६७%), पुण्यात (१२७%), चंद्रपूरमध्ये (११०%), सांगलीत (७३%) आणि कोल्हापुरात (६३%) झाली.

धुळे, जळगाव, अहमदनगर, सोलापूर, औरंगाबाद, परभणी, बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर आणि भंडारा येथे रोजगारात घट झाली.

पूर्वी कापड गिरण्यांना रोजगाराच्या दृष्टीने असलेले महत्त्व तुलनेने कमी होत जाऊन सर्वसाधारण आणि इलेक्ट्रिकल, इंजिनिअरिंग, औद्योगिक रसायने, रंग इत्यादींचे महत्त्व वाढले आहे. सर्व उद्योगधंद्यांच्या मिळून उत्पादनात २१०% नी भर पडली.

---

## दहा साखर कारखाने मद्य बनविणार

महाराष्ट्र सरकारने दहा साखर कारखान्यांना मद्य निर्मितीचे परवाने दिले आहेत. प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या डिस्टिलरीचे उत्पादन एप्रिलमध्ये बाजारात येईल. हा कारखाना दररोज मद्याच्या १२,००० बाटल्या तयार करील; वार्षिक उत्पादन ३५ लक्ष लिटरवर जाईल.

---

## १९७१-७२ मधील अग्रेसर धनाढ्य

### संपत्ती करदात्यांतील चौगुल्यांचा पहिला क्रमांक जाऊन फत्तेसिंग गायकवाडांना मिळाला

| | | रुपये |
|---|---|---|
| (१) | फत्तेसिंगराव गायकवाड, बडोदे | ६,०७,७६,४७२ |
| (२) | व्ही. डी. चौगुले | ५,३२,२५,६२५ |
| (३) | डॉ. जे. धर्म तेजा | २,९६,८७,७९७ |
| (४) | निजाम ट्रस्ट | २,१३,७४,११२ |
| (५) | राणा वर्मा | २,१०,८८,९९९ |
| (६) | निजाम सरफेखस ट्रस्ट | १,९९,८४,४८५ |
| (७) | व्ही. एम्. साळगावकर | १,७९,३९,६६२ |
| (८) | वाय. डी. चौगुले | १,६५,००,४२८ |
| (९) | एल. डी. चौगुले | १,६४,४३,४७६ |
| (१०) | कर्नल हरेंद्रसिंग | १,४२,३०,०३८ |
| (११) | महाराव मदनसिंहजी | १,३६,२७,५६३ |
| (१२) | नवानगरच्या राजमाता | १,२१,७५,५७१ |
| (१३) | मिसेस उषादेवी | १,०६,२०,९०० |
| (१४) | आर. एम्. साळगावकर | १,०१,९७,५४१ |
| (१५) | डॉ. करणसिंग | ६७,७१,२३६ |
| (१६) | रेवाचे मार्तंडसिंग देव | ५६,७९,००० |
| (१७) | विजयाराजे शिंदे | ५५,७६,७१९ |
| (१८) | राजमाता गायत्रीदेवी | ४८,८६,६२४ |

श्री. फत्तेसिंग गायकवाडांची संपत्ती १९६९-७० मध्ये ५,९३,०९,२९० रु. होती; १९७०-७१ मध्ये ४,०४,८५,१५० रु. होती; १९७१-७२ मध्ये ६,०७,७६,४७२ रु. आहे.

श्री. व्ही. डी. चौगुले ह्यांची संपत्ती १९६९-७० मध्ये ६,०४,५९,३५० रु. होती; १९७०-७१ मध्ये ६,०८,९०,०९९ रु. होती; १९७१-७२ मध्ये ५,३२,२५,६२५ रु. आहे.

---

## कर्मचाऱ्यांना चार महिन्यांचा पाणीभत्ता

### अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा निर्णय

सततच्या दुष्काळामुळे सध्या जिल्ह्यांत सर्वत्र पिण्याच्या पाण्याचे खूपच दुर्भिक्ष्य जाणवत असल्याने पाणी मिळविणे ही मोठी अवघड बाब होऊन बसली. या प्रश्नाची गरज व निकड लक्षात घेऊन आपल्या सेवकांना काही अंशी मदत करण्याच्या दृष्टीने जिल्हा सहकारी बँकेच्या सव सेवकांना माहे मार्च ते जून या चार महिन्यांचा पाणी भत्ता द. म. रु. १० प्रमाणे देण्याचा खास निर्णय बँकेच्या संचालक मंडळाच्या सभेत नुकताच घेण्यात आला असल्याचे बँकेचे व्हा. चेअरमन श्री. गोपाळराव सोले पा. यांनी सांगितले.

बँकेने योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याबद्दल बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

---

BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth, BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

**S. Y. KAMAT,** *General Manager.*

**K. B. KIRTIKAR,** *Chairman.*



बँकेच्या धनवर्धिनी ठेव योजनेतील एक योजना

**निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना**

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेड्युल्ड बँक

**महाराष्ट्रात सर्वत्र शाखा**



शेतकऱ्याच्या समृद्धीतील
विश्वसनीय सहकारी
शेतीला मनाजोगा पाणीपुरवठा करण्यासाठीं शेतात किर्लोस्कर पंपसेट बसविला की भरघोस पीक पदरांत पडणारच. किर्लोस्कर पंप विनासायास दीर्घकाल काम देतो. तो चालविण्यास कमी खर्च येतो आणि म्हणून त्याची किंमत लवकर वसूल होते किर्लोस्कर आसिआ स्टार्टर पंपसेटचे खात्रीपूर्वक रक्षण करतात. आणि म्हणूनच जाणते शेतकरी किर्लोस्कर पंपसेटची निवड करतात
वैशिष्ट्ये :
• चालविण्यास सुलभ • विजेचा खर्च कमी
• मजबूत बांधणी म्हणून दुरुस्तीचा खर्च कमी
• सुटे भाग त्वरित उपलब्ध
• विक्रीपूर्व व विक्रीनंतरची सेवा.
'केडी' मोनोब्लॉक
'केई' मोटर पंपसेट
'किर्लोस्कर-आसिआ' स्टार्टर
KIRLOSKAR-ASEA
अधिक माहितीसाठी लिहा—
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे-२.

# आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा असा बेत चालला असेल ना तुमचा ?



# त्यासाठीं आमच्या संचित ठेव योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !
तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेटसाठी या योजनेखाली बचत करा.
मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !
खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना-म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

729 Mar


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )


ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३९ | अंक १

## महाराष्ट्र दिन विशेषांक



# दि सांगली बँक लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस :
राजवाडा चौक, सांगली.

★ समाजातील सर्व थरांतील लोकांना बचतीची सवय लावणारी—शेत, उद्योग, व्यवसायाला आर्थिक हातभार लावणारी बँक.

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यात शाखाविस्तार.

★ छोटी बचत योजना, दामदुप्पट योजना, पेन्शन स्कीम, मंथली इन्कम डिपॉझिट स्कीम, रिकरिंग डिपाझिट, कॅश सर्टिफिकेटस यांसारख्या लाभदायी बचतयोजना.

वा. त्रिं. कोरके
चेअरमन

# दि मिरज स्टेट बँक लि., मिरज

स्थापना : १९२९ रजिस्टर्ड ऑफिस : मिरज

- सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
- ठेवींवरील आकर्षक व्याजांचे दराबद्दल समक्ष चौकशी करावी.
- सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व लॉकर्सची उत्तम सोय.
- रिकरिंग डिपॉझिट व मासिक उत्पन्न देणाऱ्या मुदत ठेवी स्वीकारल्या जातात.

**मुदत ठेवींवरील कांही व्याज दर**

| | | |
|---|---|---|
| मुदत १ वर्ष | व्याज | ६ १/२ टक्के |
| मुदत ३ वर्ष | " | ७ टक्के |
| मुदत ३७ महिने | " | ७ १/४ टक्के |
| मुदत ६१ महिने | " | ७ ३/४ टक्के |

व्याज प्रत्येक सहामाहीस दिले जाते. व्यापारी लोकांना, मोठे व लघु उद्योगधंद्यांना व शेतीकरता कर्जे दिली जातात. ४३ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या स्थानिक बँकेत आपले खाते उघडून आपले आर्थिक हित साधा. अधिक माहितीकरिता कृपेने समक्ष चौकशी करावी.

मॅनेजर




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर ®

किर्लोस्कर एंजिन– शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**
१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315-M

☆ अर्थ ☆
महाराष्ट्र दिन विशेषांक
बुधवार, २ मे, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## अमेरिकेशी व्यापार वाढविण्यास भरपूर वाव

ईस्टर्न इंडिआ कौन्सिल ऑफ इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेने भारताच्या अमेरिकेशी होणाऱ्या व्यापाराबद्दल एक परिसंवाद भरविला होता. ह्या परिसंवादात अमेरिकेला भारताकडून अधिक निर्यात करण्याची शक्यता आणि ह्या संदर्भात कलकत्ता बंदराचा उपयोग, ह्या विषयी प्रामुख्याने चर्चा करण्यात आली. परिसंवादात अमेरिकेचे कॉन्सल-जनरल मि. गॉर्डन ह्यांनी भाग घेतला होता. आपल्या भाषणात ते म्हणाले की अमेरिका परदेशातून जी आयात करते त्यात भारताचा वाटा अवघा ०·८ टक्के इतका अल्प आहे. भारताकडून अमेरिकेला जी निर्यात केली जाते ती दुप्पट वाढविण्याची शक्यता आहे. ती वाढविण्यासाठी तागाचा माल आणि एंजिनिअरिंग धंद्याचा माल ह्यांना प्राधान्य देण्यात आले पाहिजे. तसे ते देण्यात आले तर भारताच्या निर्यातीत मोठी वाढ होणे शक्य आहे. कारण, अमेरिकेत भारताच्या मालाला खूप मोठी बाजारपेठ लाभणे शक्य आहे अशी खात्री अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केलेली आहे. बाजारपेठ काबीज करण्यास तागाच्या मालाला असाधारण स्थान आहे. तागाच्या मालाची निर्यात वाढविण्यासाठी काय करता येईल ह्याचा विचार व्यापारी व सरकारी पातळीवर करण्यात येत आहे. तथापि केवळ ह्याच मालाच्या निर्यातीने भारताला स्वयंपूर्ण होण्यास मदत होईल असे मात्र नाही. पूर्व भारतात आता नवनव्या प्रकारचा एंजिनिअरिंगचा माल तयार होऊ लागला आहे. एंजिनिअरिंगच्या धंद्याचा हा गाभाच आहे. एंजिनिअरिंगचा माल अमेरिकेत निर्यात करण्यास भरपूर वाव आहे. अमेरिका दर साल १७·५ कोटी डॉलर्स किंमतीचे पोलादाचे नळ आयात करते.

पण इतक्या मोठ्या निर्यातीत भारताचा हिस्सा फक्त १० लाख डॉलर्सचा आहे. शिवाय तारांचे दोर, काटेरी, तारा, खिळे, नट व बोल्टस, विजेच्या तारा, विजेच्या मोटारी इत्यादी मालही अमेरिका मोठ्या प्रमाणावर आयात करते. ह्या मालाच्या निर्यातीत भारताचा काही भाग नाही म्हटले तरी चालेल. अमेरिकेला होणाऱ्या निर्यातीत भारताने दुप्पट वाढ केली तर भारताला ७१६ कोटी रुपयांचे परदेशीय चलन प्राप्त होईल. सध्या ३१९ कोटी रुपयांचे चलन भारत मिळवीत आहे. अमेरिकेची आयात दर साल १० टक्क्यांनी वाढेल असा अंदाज आहे. ह्याचा अर्थ असा आहे की भारताने निर्यातीचे सध्याचे प्रमाण जरी कायम राखले तरी १९७३ साली भारताला १९७२ शी तुलना करता ३४ कोटी रुपयांचा अधिक माल निर्यात करावा लागेल. अमेरिकेच्या कॉन्सल-जनरलने केलेल्या ह्या भाषणाचे स्वागत करण्यात आले आणि संघटनेत सामील असलेल्या कारखानदारांनी आणि व्यापाऱ्यांनी निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरविले. परिसंवादाचा समारोप करताना शिंदिआ कंपनीचे अधिकारी श्री. त्रिवेदी म्हणाले की भारताचा निर्यात व्यापार हाताळण्याच्या कामी कलकत्ता बंदर महत्त्वाची कामगिरी बजावील. पुढील वर्षी हालदिआ येथील बंदरही तयार होईल. त्याचीही निर्यात व्यापाराला मोठी मदत होईल. सध्या कलकत्ता बंदरातून दर साल ७४ लाख टन वजनाच्या मालाची चढउतार करण्यात येते नवे बंदर तयार झाले म्हणजे दोन्ही बंदरातून दर साल २ कोटी टन वजनाच्या मालाची देवाण घेवाण करता येऊ लागेल. अमेरिकेशी होणाऱ्या व्यापारात कलकत्ता बंदराचे स्थान फार महत्त्वाचे आहे. १९७१ मध्ये दरमहा १८ बोटी ह्या बंदरातून अमेरिकेला जाणाऱ्या मालाची वाहतूक करीत असत.

---

## इन्कम टॅक्सच्या जाळ्यात पकडण्यासाठी जोरदार प्रयत्न

१९७१–७२ मध्ये इन्कमटॅक्स आणि कॉर्पोरेशन टॅक्स ह्यांची मिळून १,००२ कोटी रु. ची वसुली झाली. १९७०–७१ मधील वसुली ८४० कोटी रु. ची होती. म्हणजे, एका वर्षात वसुलीत १६२ कोटी रु. ची वाढ झाली. इन्कमटॅक्स खात्याने वसुलीसाठी खास प्रयत्न केले आणि करआकारणीचे कामही त्वरेने पार पाडले, त्याचा मुख्यतः हा परिणाम आहे. १९७१-७२ मध्ये ३८ लक्ष कर आकारणीची कामे पार पडली; १९७०-७१ मधील कामापेक्षा ही ३ लक्षांनी जास्त आहेत. लहान उत्पन्नदारांच्या समरी असेसमेंटच्या नव्या पद्धतीमुळे २३ लक्ष प्रकरणांत (एकूण असेसीच्या ६०·१%) असेसींना कचेरीत बोलाविण्यांत आलेच नाही. करदात्यांची संख्या ३१ मार्च १९७१ रोजी ३०,१२,५७० होती, ती ३१ मार्च, १९७२ रोजी ३२,०८,५१६ झाली आणि ३१ ऑगस्ट १९७२ रोजी ३३,६०,४४६ वर गेली.

छापे घालून करचुकवेपणा पकडण्याच्या धोरणामुळे १९७२-७३ च्या पहिल्या आठ महिन्यांत ४११ छाप्यात ३·१५ कोटी रुपये मिळाले. बड्या उद्योगसमूहांच्या करआकारणीवर नजर ठेवून करचुकवेपणाच्या पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी इन्कम टॅक्स खात्याने एक स्वतंत्र संघटनाच निर्माण केली आहे.

## इन्कमटॅक्स, कॉ. टॅक्स, वेल्थ टॅक्स, गिफ्ट टॅक्स आणि इस्टेट ड्यूटी ह्यांच्या वसुलीत वाढ

(आकडे कोटी रु. चे)

| | ३१-३-७३ अखेर | ३१-३-७२ अखेर | वाढ |
|---|---|---|---|
| इन्कम व कॉर्पोरेशन-टॅक्स | ११५०·४८ | १००२·५७ | १४७·९१ |
| वेल्थ टॅक्स | ३५·९८ | २५·३० | १०·६८ |
| गिफ्ट टॅक्स | ३·८९ | ३·५४ | ०·३५ |
| इस्टेट ड्यूटी | ९·८८ | ९·०६ | ०·८२ |

## ग्राहकांची पिळवणूक सर्वांत जास्त होते

रोजखर्चाच्या वस्तूंत करण्यात येणाऱ्या भेसळीविषयी माहिती देऊन ती कशी टाळावी ते शिकविणारी एक संस्था मुंबईत आहे. तिला ग्राहक मार्गदर्शन संस्था असे म्हणता येईल. ह्या संस्थेचे अध्यक्ष अमेरिकेतील भारताचे माजी वकील श्री. जी. एल. मेहता आहेत. मुंबई येथील रोटरी क्लबांत 'गिऱ्हाइकांचे संरक्षण' ह्या विषयावर बोलताना ते म्हणाले की ग्राहक हा सर्व देशभर अस्ताव्यस्त पसरलेला असतो. त्यांची संघटना नसते. ह्या असंख्य लोकांचे रक्षण करण्यासाठी जे कार्य करीत आहेत त्यांना रोटरी संघटनेसारख्यांनी हातभार लावला पाहिजे. सध्या सर्व जण आपली पिळवणूक होत असल्याचे सांगत असतात. जिकडे तिकडे पिळवणुकीविरुद्ध हाकाटी करण्यात येत आहे. परंतु सर्वांत जास्त पिळवणूक जर कोणाची होत असेल तर ती ग्राहकांची. ग्राहकाच्या कमजोरीचा फायदा उद्योगधंदे, व्यापार, संघटित कामगार तर घेतातच; पण सरकारही तसेच करते. कारण, लोकसभेत ग्राहकांच्या हितसंबंधाची जपणूक करणारी मंडळी असली तरी बाहेर खासदारांवर ग्राहकांच्यावतीने दडपण आणणारा गट अस्तित्वात नाही. अमेरिकेत ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी अनेक उपाय योजण्यात येत असतात. मालाच्या जाहिरातदारांना आपल्या मालाचा दर्जा सिद्ध करावा लागतो. इतकेच काय, पण मध्यवर्ती व्यापार मंडळाने अशी शिफारस केली आहे की मालाबद्दल टीका करणाऱ्या लोकांचे म्हणणेही जाहिरातीद्वारा प्रसिद्ध करण्यात यावे. खाजगी उद्योगधंद्यांच्या नंदनवनांत अशा प्रकारचे उपाय योजावे लागत आहेत.

**जगाच्या सदसद्विवेक बुद्धीला आवाहन** — पाकिस्तानने भारतातील पाकिस्तानी युद्धबंद्यांच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी रु. १·२५ चे खास पोस्टाचे तिकीट काढले आहे. कैदेतून सुटण्याची वाट पाहणारे सैनिक काटेरी तारेच्या मागे उभे असलेले त्यावर दाखविलेले आहेत. डाव्या बाजूला एक दुःखी मुलगा त्यांची वाट पाहात आहे, असे चित्र आहे. "भारतातील ९०,००० युद्धकैदी — जगाच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन" असे त्या तिकिटावर शीर्षक आहे.

## आरोग्यावर खर्च फार कमी होत आहे

जागतिक आरोग्य संघटनेने जमा केलेल्या माहितीप्रमाणे आग्नेय आशिआतील ८ देश आपआपल्या देशातील जनतेच्या आरोग्यावर फार कमी खर्च करतात. ह्यात भारताचाही समावेश असून जगातील देशात ह्या बाबतीत वरील देशांचे सर्वांत खालचे क्रमांक लागतात. मंगोलिआ दर डोई ३७ डॉलर्स अथवा २७७.५० रुपये खर्च करतो तर श्रीलंका अवघे ३ डॉलर्स म्हणजे २२·१० रुपये खर्च करतो. भारत, बांगला देश, ब्रह्मदेश, इंडोनेशिआ, नेपाळ आणि थायलंड तर दरडोई एका डॉलरपेक्षाही कमी रक्कम आरोग्यावर खर्च करतात. ह्या देशातील आरोग्यविषयक सेवा कशी सुधारता येईल ह्याचा विचार आता करण्यात येत आहे. ह्या चर्चेत वरील देशांचे प्रमुख आरोग्याधिकारी भाग घेत आहेत. चर्चेत पुढे येणाऱ्या माहितीवरून एक अहवाल तयार करण्यात येईल आणि तो संघटनेकडे पाठविला जाईल. राष्ट्रीय आणि स्थानिक पातळीवर सर्व देशातील लोकांना आरोग्याच्या सोयी कशा मिळवून देता येईल ह्याचा विचार अहवालात प्रामुख्याने करण्यात यावयाचा आहे. आग्नेय आशिआतील उपसंघटनेचे डायरेक्टर श्री. गुणरत्ने ह्याबद्दल म्हणतात की मंगोलिआचा अपवाद सोडून आरोग्यविषयक सल्ला देणारी तज्ज्ञ माणसेही आग्नेय आशिआतील देशात अपुरी आहेत. त्यातच वाढत्या लोकसंख्येमुळे तज्ज्ञांची उणीव कमी होत जाण्याऐवजी वाढतच चाललेली आहे. सर्वच देशात इस्पितळांची संख्या पुरेशी नाही. आहेत त्या इस्पितळांची वाटणी नीट झालेली नाही. शिवाय इस्पितळांतील वैद्यकीय सोयींचा लाभही घ्यावा तितका घेतला जात नाही.

**हिंदच्या कारखान्याना ऑर्डरी मिळाल्या**—लिपझिग येथील आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शनात बऱ्याच कारखान्यांनी भाग घेतला होता. प्रदर्शन ८ दिवस चालले होते. ह्या अवधीत हिंदी कारखानदारांनी आणि निर्यात संघटनानी आपल्या मालासाठी सुमारे २·८४ कोटी रुपये किमतीच्या मागण्या मिळविल्या.

**रक्तदानाची इटलीत सक्ती**—प्रत्येक निरोगी आणि सशक्त इटालिअन नागरिकाने एकदा तरी रक्तदान केले पाहिजे, असा कायदा तेथे करण्यात येणार आहे. इस्पितळांतील रक्तपुरवठा अपुरा पडतो आणि रक्ताचा काळाबाजार सुरू होतो, त्यावर हा उपाय आहे.

**परदेशी प्रवासी वाढले**— १९७२ मध्ये भारतात ३,४२,९५० परदेशी प्रवासी आले; १९७१ मध्ये ३,००,९९५ आले होते. म्हणजे १९७१ च्या मानाने १९७२ मध्ये १३·९% अधिक आले.

**दुष्काळनिधीला २५ लक्ष रु.** —महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी मुख्य मंत्र्यांच्या दुष्काळ निवारण फंडास २५ लक्ष रु. दिले आहेत.

# हरितक्रांती आणि कृषि-नियोजन

डॉ. गोविंद बाळकृष्ण देवडीकर, पीएच. डी.
( डायरेक्टर, महाराष्ट्र असोसिएशन फॉर दि कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, पुणे ४ )

ज्ञान-विज्ञानाच्या कार्यक्षेत्रास अनेक पैलू आहेत. त्यातील एक पैलू म्हणजे तत्कालीन सामाजिक समस्या सोडविण्याच्या सांघिक प्रयत्नात सहभागी होणे. सद्यःपरिस्थितीत प्रकर्षाने जाणीव होणारी सर्वांत महत्त्वाची राष्ट्रीय समस्या म्हणजे हरितक्रांतीनंतर लगेच या वर्षी चालू असलेली भयानक टंचाई. कृषि-विज्ञानाच्या दृष्टिकोनातून आपण या समस्येचा विचार करू.

अन्नधान्यांचे राष्ट्रीय उत्पादन योग्य पातळीवर राहील अशी दक्षता घेण्याकरिता कृषि-विज्ञानाची कार्यपद्धती सर्वसाधारणपणे ठरलेली आहे. पिकांच्या सुधारलेल्या जातींची निवड, योग्य मशागत आणि खते तसेच रोगप्रतिबंधक रसायनांचा वापर, अशा मार्गांनी पिकांचे उत्पादन वाढविण्यात गेल्या शतकापासून बरीच प्रगती झाली. परंतु वाढत्या लोकसंख्येच्या मानाने पिकांची ही उत्पादनक्षमता फारच मर्यादित असल्याचे स्पष्ट झाले. यावर उपाय म्हणून पडीक जमिनी लागवडीखाली आणणे, त्यावर भरपूर खते वापरून पिकांचे उत्पादन वाढविणे अशा मार्गांनी गरज आणि पुरवठा यांचा मेळ जमविण्याचे प्रयत्न सुरू झाले. तरीपण बऱ्याच देशांत लागवडीस आणण्यासारखी जमीनच फारशी उपलब्ध नाही. तसेच बहुतेक पिकांच्या बाबतीत ठराविक मर्यादेबाहेर खते वापरल्यास उत्पादन वाढण्याऐवजी उलट ते घटते असेही दिसून आले. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीच्या संदर्भात १९६० च्या आसपास झालेल्या काही कृषिसंशोधनामुळे पिकांची उत्पादनक्षमता वाढविण्याचा एक अनपेक्षित मार्ग सापडला.

गहू आणि भातांच्या कमी उंचीच्या बुटक्या जाती जपान वगैरे देशांत अनेक शतकापासून अस्तित्वात आहेत. केवळ मूलभूत अशा शास्त्रीय संशोधनाकरिताच या बुटक्या जातींचा प्रयोग क्षेत्रावर उपयोग केला जात असे. त्यांना विशेष व्यावहारिक महत्त्वही दिले जात नसे. गेल्या एक-दोन दशकातच असे दिसून आले की या बुटक्या जाती सर्वसाधारण मर्यादेपेक्षा अनेक पटीने नत्र-स्फुरद खते पचवून त्याच प्रमाणात धान्याचे उत्पन्न अधिक देऊ शकतात. या बुटक्या जातीची दांडी जोमदार असल्यामुळे धान्याच्या भाराने झाड आडवे लोळत नाही आणि धान्य जमिनीत झडून नुकसान होत नाही. त्यांची पाने काटकोनात आडवी न वाढता लघुकोनात उभी वाढतात त्यामुळे ठराविक क्षेत्रात रोपांची संख्या वाढविता येते. उत्पन्नाला पोषक असे हे गुणसमूह आनुवंशिक आहेत हे सिद्ध झाल्यानंतर स्थानिक जातींशी या बुटक्या जातींचा संकर करून या उपयुक्त गुणसमूहांचा समावेश स्थानिक जातीत करणे सहज-सुलभ झाले. अशा व्यावहारिक हेतूने असे संकर मेक्सिकोमध्ये डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी फार मोठ्या प्रमाणावर केले. त्यांनी निवडलेल्या सुधारित जातींबद्दल नुकतेच त्यांना नोबेल पारितोषक मिळाले.

बुटक्या जातींचे वरील आनुवंशिक गुणसमूह संकर पद्धतीने स्थानिक जातीत आणण्याचे असेच प्रयत्न यानंतर अनेक देशांत सुरू झाले. अन्नधान्याची तूट व आयात अडचणीमुळे भारतीय कृषिशास्त्रज्ञांनी सांघिक सूत्रबद्ध पद्धतीने हे प्रयत्न विशेष निकडीने हाती घेतले व केवळ ३-४ वर्षांच्या अवधीतच स्थानिक व बुटक्या जातीच्या संकरातून गव्हाच्या व त्यानंतर भात वगैरे पिकांच्या अनेक सुधारलेल्या जाती निर्माण केल्या. यामुळे इतर देशांप्रमाणे भारतातही काही पिकांच्या उत्पादनक्षमतेत जी अनपेक्षित पातळी उंचावली त्यास "हरित-क्रांती" हे नाव देण्यात आले. या हरित-क्रांतीचा अनुभव भारतातही आला व त्यामुळेच आपण १९७०-७१ या सुमारास अन्नधान्याची आयात करण्याऐवजी स्वयंपूर्ण होण्यापर्यंत प्रगती केली. परंतु यावर्षीच्या अवर्षणामुळे आपण परत पूर्वपदावर आलो. त्यामुळे हरित-क्रांती ही एक निरर्थक कल्पना किंवा वल्गना आहे असे वाटणे साहजिक आहे. या सद्यःपरिस्थितीत आपल्या एकंदर राष्ट्रीय नियोजनाचा व विशेषतः त्यातील कृषिविषयक घटकांचा साकल्याने पुनर्विचार करणे उपयुक्त आहे.

यावर्षी तीव्र टंचाईची झळ विस्तृत प्रमाणात अनेक देशांना पोहचलेली आहे. त्यामुळे अनेक दशकानंतर क्वचित येणारी अपवादात्मक नैसर्गिक आपत्ती असेच या चालू टंचाईचे स्वरूप आहे हे आपण समजू शकतो. तरीपण भारतासारख्या खंड-प्राय देशांत अवर्षण किंवा अतिवृष्टी यामुळे स्थानिक स्वरूपाची थोडी फार टंचाई दरवर्षी कुठेतरी असतेच असे गृहीत धरून त्याकरिता सुरक्षित तरतूद करणे हा एक नियोजनाचाच भाग समजणेही अत्यंत आवश्यक आहे.

अन्नधान्य आणि कृषि-उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा सातत्याने पुरेसा ठेवण्याकरिता किमान चार पथ्ये सांभाळली पाहिजेत — ती अशी : (१) कृषिसंशोधन हे प्रवाही आणि अद्ययावत असणे, (२) हे संशोधन शेतकऱ्यापर्यंत पोहोचविणारी विस्तारयंत्रणा अत्यंत प्रभावी राखणे, (३) अशा सुधारित तंत्राचा स्वीकार करून त्वरित कार्यवाहीत आणणारा प्रागतिक सुज्ञ शेतकरीवर्ग तयार करणे आणि (४) या कार्यवाहीस पोषक असे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक ग्रामीण वातावरण नियोजनापूर्वक उभारणे. या चतुःसूत्रीतील कोणतेही सूत्र कच्चे असेल तर सर्वच यंत्रणा

निष्प्रभ होते. या दृष्टीने आपण यापैकी प्रत्येक घटकाचा विचार करू.

आपल्या कृषिसंशोधन यंत्रणेस अनेक मर्यादा आहेत व त्यात सुधारणेला खूपच वाव आहे, हे मान्य केले तरी ही यंत्रणा बहुतेक अविकसित देशांपेक्षा निश्चितच सरस आहे. किंबहुना काही विकसित देशांशी ती समबलही ठरेल. या प्रगतीचे मुख्य कारण म्हणजे बहुतेक महत्त्वाच्या पिकांच्या संशोधनात सुसूत्रता आणि समन्वय साधण्याकरिता भारतीय कृषि-अनुसंधान समितीने संकलित योजना किंवा कोऑर्डिनेटेड प्रॉजेक्ट्स ची व्यवस्था केलेली आहे. त्यानुसार प्रत्येक प्रांतातील ठराविक पिकांवर काम करणारे संशोधक दरवर्षी एकत्र येतात, स्वतःच्या कार्याचा आढावा देतात, त्यावर साङ्गोपांग विचारविनिमय करतात आणि पुढील वर्षाकरिता अखिल भारतीय पातळीवर योजनाबद्ध असा सांघिक कार्यक्रम आखतात. अशा व्यवस्थेमुळेच केवळ तीन-चार वर्षांच्या अल्पावधीत गहू आणि भाताचे दर-हेक्टर उत्पादन त्वरित वाढवून १९७० साली आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णतेच्या पातळीजवळ पोहोचू शकलो. यावरून आपल्या देशातील कृषि-संशोधन विभागाची कार्यक्षमता सिद्ध होते. अर्थात या यंत्रणेत अनेक दोषही आहेत. ते सुधारल्यास ही कृषिसंशोधन आघाडी अधिक कार्यक्षम होईल.

बहुतेक प्रांतात कृषि-विद्यापीठे स्थापन करताना त्यांचे उर्वरित जुन्या शेतकीखात्याशी संबंध अनिश्चित राहिले. त्यामुळे संशोधनाचा विस्तार शेतकऱ्यांपर्यंत पोहचविणाऱ्या साखळीचे मधले दुवे अत्यंत दुर्बल झाले. संशोधकाने सुधारलेल्या पिकांच्या नवीन जातींच्या व्यावहारिक उपयुक्तता सिद्ध झाल्यानंतरही अशा जातींची जिल्हा पातळीवरील चाचणी, बियांचे उत्पादन, शुद्धीकरण आणि योग्य पद्धतीने वितरण या कार्यक्रमात प्रभावी सुसूत्रता राहिली नाही. या नवीन जातींना खते आवश्यक असतात पण खतांचे पुरेसे उत्पादन, योग्य भावात योग्य वेळी वितरण, यातही धारमेळ नाही. गेल्या वर्षी नत्र खतांचा पुरवठा तीस टक्क्यांनी कमी झाला त्यामुळे उत्पादक जातींचा विस्तार निरर्थक ठरला. तसेच या जातींना योग्य वेळी पाणी देणेही आवश्यक असते. एकंदर शेतजमिनीपैकी फार तर १५–२० टक्के क्षेत्र बागायती आहे. बाकीच्या ८० टक्के कोरडवाहू शेतीची पूर्वापार दैन्यावस्था चालूच आहे. याच कारणामुळे बागायत करणारा सधन शेतकरी व कोरडवाहू कसणारा निर्धन शेतकरी यांच्यामधील आर्थिक विषमता हरित-क्रांतीनंतर पराकोटीला पोहचलेली आहे.

या नवीन उत्पादक जातींची मशागत फार काळजीपूर्वक, दक्षतेने करावी लागते. त्यामुळे संशोधनाचा फायदा तज्ज्ञ किंवा प्रागतिक शेतकरीच घेऊ शकतात. परंतु एकंदर शेत-जमिनीपैकी फार तर दहा टक्केच जमीन अशा प्रागतिक शेतकऱ्यांकडे असेल. बाकीची नव्वद टक्के शेत-जमीन तांत्रिक



मुख्य कार्यालय–सातारा

आता महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत
बँकेच्या शाखा आहेत.

*गरजेनुरूप ठेवयोजना या तत्त्वानुसार बनविलेल्या*

-: धनवर्धिनी ठेव :-

*योजनाद्वारे बँक आपली सेवा करू इच्छिते.*

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :

| | | |
|---|---|---|
| स्थापना | युनायटेड वेस्टर्न बँक इमारत | शेड्यूल्ड |
| १९३६ | सातारा | बँक |

माहितीचा अभाव असलेल्या अप्रगत शेतकऱ्यांकडेच आहे. यांचे पारंपारिक कृषिजीवनाचा स्थायिभाव शतकानुशतके होता तसाच आजही चालू आहे. अनेक ठिकाणी विखुरलेल्या अपुऱ्या कोरडवाहू जमीनीचे अस्ताव्यस्त आकाराचे तुकडे ते कसे तरी नांगराने खरडतात, खताविना मिळेल ते बी पेरतात आणि पावसाकडे डोळे लावून यदृच्छया जे पिकेल ते घेऊन कष्टमय जीवन जगतात. जवळपास औद्योगीकरण नसल्यामुळे सुमारे सत्तर टक्के लोकसंख्या अशा पद्धतीने ग्रामीण भागात शेतीव्यवसायातच रेंगाळलेली आहे. विकसित देशात हेच प्रमाण या उलट आहे. आपल्या औद्योगीकरणात आलेला अतिरेकी प्रादेशिक असमतोल या परिस्थितीस कारण आहे. औद्योगिक किंवा इतर व्यवसायात स्थलांतर करण्यास खेड्यांच्या जवळपास शहरी वातावरणच उपलब्ध नाही. या संदर्भात व्यापक आणि मूलगामी अशा आर्थिक आणि सामाजिक नियोजनाचा असा अभाव असताना केवळ कृषिसंशोधनातच अवास्तव चमत्काराची अपेक्षा करणे अयोग्य होईल. राष्ट्रीय नियोजन हे पक्ष-निरपेक्ष असेल तरच त्यात वास्तवता असू शकेल.

कृषि-पदवीधर हे शेती करण्याऐवजी नोकरीच पसंत करतात हे सत्य आहे. शेती-शिक्षणातील जे दोष असतील ते सुधारणेही अगत्याचे आहे. परंतु हीच परिस्थिती इतर व्यावसायिक पदवीधरांचीही आहे. उदाहरणार्थ, वाणिज्य पदवीधर क्वचितच व्यापार करतात. कृषि-पदवीधर शेती करीत नसतील तर खेडेगावातील सांस्कृतिक परिस्थिती हेही त्याचे एक कारण असू शकेल.

आपली खेडी ही रुक्ष आणि ओसाडच असणार हे आपण निष्कारण गृहित धरतो. इतर देशात शहरापेक्षाही खेडी सुंदर, सुसंस्कृत व आकर्षक करणे हा नियोजनाचाच एक आवश्यक भाग समजला जातो. गेल्या वीस वर्षात फार तर वीज आणि पाणीपुरवठा या पलीकडे ग्रामीण जीवनात मूलभूत असा फारसा विचारच झालेला नाही. उदाहरणार्थ, वैयक्तिक शेत-बांधांचा विचार न करता सलग खेड्यातील सर्वच जमिनीचे संकलित वर्गीकरण करून ती सर्व जमीन शास्त्रीय पद्धतीने वापरण्याची सूत्रबद्ध योजना करणे अत्यावश्यक असते. यालाच लँड यूस प्लॅनिंग म्हणतात. या पद्धतीने रस्ते, बांध, पाण्याचे पाट, निचऱ्याचे चर, किमान क्षेत्र, योग्य आकार असलेल्या नवीन शेतांची फेर-रचना, घरे, धान्य-कोठारे, गोठे, कुंपणे, सुरक्षित कुरणे, फळोद्याने, लहानसे वन-विभाग, सौंदर्यस्थळे, वाचनालये, धार्मिक आणि सांस्कृतिक केंद्रे, वगैरेंचा साकल्याने विचार होतो. विज्ञानाचा पुरेपूर उपयोग करून घेऊन उपयुक्तता, स्वच्छता, सांस्कृतिक आणि सौंदर्यदृष्टीचा समन्वय नियोजनपूर्वक साधल्यास ग्रामीण जीवन आकर्षक होईल. अशा संदर्भात चरितार्थास आवश्यक अशा आठ-दहा हेक्टरच्या, वरील प्रकारच्या नवीन शेतावर स्वतंत्र व्यवसाय करण्यास कृषि-पदवीधर बहुसंख्येने तयार होतील.

खेड्यातील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजेकरता जवळपास लहानसे शहर व तिथे शेत-मालावर आधारित उद्योग असतील तरच ग्रामीण जीवन सुसह्य होते. यामुळे शेती आणि उद्योग यांमध्ये परस्पर पूरक समतोल राहून आर्थिक देवाणघेवाण होऊ शकते. इतर काही देशांचे नियोजनाचा इतिहास पाहिल्यास प्रथम रस्ते, रेल्वे व दळणवळणाच्या मार्गांच्या मूलभूत फेररचनेस अग्रक्रम देऊन मर्यादित लोकसंख्येची लहान शहरे समप्रमाणात विखुरली जातील याची दक्षता अगोदरच घेतली जाते. त्यामुळे नवीन उद्योगांची अशी स्थानके पूर्व-नियोजनाने निश्चित केली जातात. ही क्रिया अद्यापही इतरत्र चालू आहे. त्यामुळेच ग्रामीण भागातील अवास्तव लोकसंख्येचे प्रमाण कमी होते, शेतांचे क्षेत्र किमान मर्यादेच्या वरती राहते, शेतीला प्रोत्साहन मिळते, खेड्यांना बाळसे येते. एकंदर ग्रामीण जीवनाचा सुसह्य असा कायापालट होतो. वस्तूंची मागणी वाढते. त्यामुळेच औद्योगिक विकासालाही शाश्वत स्वरूपाची चालना मिळते. आपल्या राष्ट्रीय नियोजनात मात्र अशा तंत्राची जाणीव अभावानेच स्पष्ट होते. यामुळे गेल्या वीस वर्षात काही जुनाट शहरांचीच बेसुमार अस्ताव्यस्त वाढ होऊ दिली. त्यातून असह्य विकृत आणि अमानुष समस्या निर्माण झाल्या. आपणच अशा केलेल्या चुकांचे केवळ तात्पुरत्या स्वरूपाचे निराकरण वरचेवर करीत राहणे हाच आपल्या नियोजनाचा स्थायीभाव झालेला आहे.

विकसित देशांचे मानाने राष्ट्रीय नियोजनाच्या क्षेत्रात आपण उशीरा पदार्पण करीत आहोत. हे एका अर्थी चांगलेच आहे. त्यामुळे इतरत्र झालेल्या चुकांचे केवळ अंधानुकरण करण्याऐवजी काही नवीन आदर्श निर्माण करण्याची सुवर्णसंधी आपणास लाभलेली आहे. किमान गरजांचीही पूर्तता होऊ न देणारे अविकसित देशातील दारिद्र्य हे भयानक असते. ते नाहीसे करणे हे नियोजनाचे अर्थातच प्राथमिक कर्तव्य आहे. तसेच अवास्तव गरजांचा अतिरेकी पुरवठा करणारे विकसित देशातील वैपुल्य हे सुद्धा भयानक वैफल्य निर्माण करते. याचा प्रत्यय विकसित देशांना आलेलाच आहे. ही दोन्हीही टोके कटाक्षाने टाळणारे व मानवी मूल्यांची जोपासना करणारे नियोजन आपणास हवे. आपल्या काही पारंपारिक शाश्वत मूल्यांची जाणीव आपणात पुरेशी नसली तरी इतर देशातील काही विचारवंत त्यांचे महत्त्व समजू शकतात. त्यांची सुद्धा भारतीय नियोजनातून काही नवीन आदर्श निर्माण व्हावेत हीच अपेक्षा आहे.

आधुनिक ज्ञान-विज्ञान आणि तंत्राच्या आधाराने आपले सामाजिक परिवर्तन करताना काही शाश्वत मानवी मूल्यांचाही समन्वय साधणारे नियोजन असेल तरच नवीन आदर्श निर्माण करता येतील.

( आकाशवाणी, पुणे केंद्र, च्या सौजन्याने )

### दर्यावर्दी देशांत भारताचा १६ वा क्रमांक

मध्यवर्ती सरकारच्या जहाज व वाहतूक खात्याने १९७२-७३ सालाचा आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात दिलेल्या माहितीप्रमाणे दर्यावरील व्यापारी वाहतूक करणाऱ्या देशांत बोटींच्या वजनाप्रमाणे भारताचा क्रमांक १६ वा लागत आहे. भारताच्या व्यापारी बोटींच्या काफिल्यात आता २५८ बोटी आहेत. राष्ट्राच्या मालकीच्या बोटींच्या एकूण वजनापैकी १०·२२ लाख टन वजनाच्या बोटी सार्वजनिक मालकीच्या विभागांतील आहेत. एकूण वजनाशी त्यांचे प्रमाण ४७ टक्के एवढे पडते. बोटींपैकी १९९ बोटी परदेशी व्यापारात गुंतलेल्या आहेत. भारतीय बोटी अलीकडील काही काळात सर्व महत्त्वाच्या परदेशी दर्यामार्गावर वाहतूक करू लागल्या आहेत. १९७२ मध्ये भारताने आपल्या काफिल्यात ९६,००० टन वजनाच्या नव्या बोटींची भर घातली. त्यांतील बहुतेक बोटी अगदी कोऱ्या करकरीत बांधून घेतलेल्या होत्या. अवजड मालाची वाहतूक करणाऱ्या ५५ हजार टन वजनाच्या एका मोठ्या बोटीचा त्यात समावेश आहे. कोचीन येथे बांधण्यात येत असलेल्या बोटी बांधण्याच्या कारखान्यास ४५·९२ कोटी रुपये खर्च येणार आहे. बहुधा पुढील वर्षी कोचीन जहाज बांधणी गोदीत पहिली बोट बांधण्यास सुरुवात होईल. ह्या आधुनिक गोदीत ८५ हजार टन वजनापर्यंतच्या बोटी बांधण्याची सोय करण्यात येत आहे. १९७१-७२ साली बोट वाहतूक मंडळाने ३०·८८ लाख टन वजनाच्या मालाची वाहतूक करून ८·०७ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविला. मंडळाच्या मालकीच्या आता ७७ बोटी असून ३९ बोटींच्या मागण्या मंडळाने नोंदविलेल्या आहेत.

---

### रशिआकडून ६ लाख टन रॉकेलची आयात

मध्यवर्ती सरकारच्या खनिज व रसायने खात्याच्या मंत्र्यांनी लोकसभेत अशी माहिती दिली की देशातील रॉकेल तेलाची टंचाई दूर करण्यासाठी रशिआकडून ६ लाख टन रॉकेलची आयात करण्यात येणार आहे. एका प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले की देशात विजेची टंचाई भासू लागल्याने रॉकेलची मागणी वाढतच चालली आहे. राज्य सरकारांनी रॉकेल तेलाच्या खपावर नियंत्रण ठेवलेले आहे. परंतु संपूर्ण नियंत्रण ठेवण्यासारखी परिस्थिती अद्याप उद्भवलेली नाही. राज्य सरकारांच्या प्रयत्नास मध्यवर्ती सरकारही हातभार लावीत आहे. ज्या ठिकाणी केरोसीन अगर डिझेल तेलाची टंचाई भासत आहे त्या ठिकाणी त्यांचा पुरवठा करण्याचे प्रयत्न भारत सरकार करीत आहे. सध्या हाल्दिआ येथे केरोसिन शुद्ध करण्याचा एक कारखाना उभारण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कोचीन येथील तेलशुद्धीच्या कारखान्याचाही विस्तार करण्यात येत आहे. ही दोन्ही कामे पूर्ण झाली म्हणजे देशांतील रॉकेलची मागणी समाधानकारक रीतीने भागविता येईल अशी आशा वाटत आहे. १९७१ साली देशातील खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या तेल-कारखान्यांनी ३६ लाख, ३१ हजार टन तेलाचे उत्पादन केले. १९७२ साली ३० लाख, ८९ हजार टन तेलाचे उत्पादन करण्यात आले. गेल्या तीन वर्षांत देशातील तेलाची मागणी वाढत चालली आहे ती पूर्णपणे भागविण्यात आली. मात्र असे करण्यासाठी देशांतर्गत उत्पादनाला परदेशांकडून आयात करून मदत घ्यावी लागली. परदेशांकडून आयात करण्यात येणाऱ्या तेलाचे सर्व व्यवहार इंडिअन ऑईल कॉर्पोरेशन मार्फत करण्यात आले.

---

### डॉक्टरांची वाण अजूनही आहेच

लोकांच्या आरोग्यरक्षणाचे काम डॉक्टर्स, वैद्य इत्यादी मंडळी करीत असतात. वैद्यकीय व्यवसायातील लोकांची चिकित्सा पद्धती आणि औषधपद्धती भिन्न असली तरी रोग प्रतिकारार्थ त्यांची आवश्यकता असतेच. आज शहरातून अलोपॅथी पद्धतीने उपचार करणाऱ्या डॉक्टरांची गर्दी झालेली दिसते. ग्रामीण भागांत डॉक्टर्स जाण्यास तयार नसतात. ह्याचा परिणाम असा होतो की ह्या व्यवसायात गर्दी झाल्याचा भास होतो. पण हा खरोखरीच भास आहे. कारण, लोकसंख्येच्या प्रमाणात डॉक्टर्स आजही उपलब्ध नाहीत. दर ३,५०० नागरिकांसाठी एक डॉक्टर असावा असे मानण्यात येते. ह्या हिशोबाने भारतात अजूनही ४०,३४० डॉक्टर्सची कमतरता आहे, असे भारत सरकारच्या आरोग्य खात्याच्या १९७२-७३ च्या वार्षिक अहवालावरून दिसून येते. सध्या शिक्षित डॉक्टर्सची संख्या १ लाख, ३० हजार, ५३० आहे. जरूरी मात्र १ लाख, ७० हजार, ८७० डॉक्टर्सची आहे. १९७२ अखेर लोकसंख्या आणि डॉक्टर्स ह्यांच्यातील प्रमाणाचा विचार करता भारतात ४,३६६ नागरिकांमागे एक डॉक्टर उपलब्ध आहे. डॉक्टर्स प्रमाणेच वैद्यकीय व्यवसायातील अनुषंगिक माणसेही पुरेशा प्रमाणात नाहीत. १९,९०० दंत-वैद्यांची आवश्यकता असताना फक्त ८,४०० दंतवैद्य आहेत. दर ३० हजार लोकांसाठी एका दंतवैद्याची जरूरी भासते. पण त्यांची संख्या अपुरी असल्याने ६७,८४५ लोकांना एकच दंतवैद्य असे प्रमाण पडते. परिचारिकांची कथाही अशीच आहे. १ लाख, २० हजार परिचारिकांची गरज आहे. पण त्यांचे काम ८२ हजार, ३३० परिचारकांवर भागवावे लागत आहे.

---

**पाकिस्तानचे नवे तिकीट** – भारताच्या ताब्यात असलेल्या ९० हजार पाकिस्तानी सैनिकांकडे जगाचे लक्ष वेधून घेण्यासाठी पाकिस्तानच्या पोस्टखात्याने नवे तिकिट काढले आहे. तिकिटाची किंमत १·२५ रुपये असून त्यावर काटेरी कुंपणामागे अडकून पडलेल्या व त्यातून सुटू पाहणाऱ्या सैनिकांची गर्दी दाखविली आहे. डाव्या एक बाजूला एक छोटा मुलगा त्यांच्या सुटकेची वाटपाहाता आहे असे दाखविले आहे.

# दि. सांगली बँक लिमिटेड

## रजिस्टर्ड ऑफिस : राजवाडा चौक, सांगली

**सांगली बँकेच्या भागीदारांच्या तारीख ५ एप्रिल १९७३ रोजी दुपारी चार वाजता भरलेल्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रसंगी चेअरमन**

**श्री. बा. चिं. कोरके यांचे भाषण.**

सद्‌गृहस्थ व सद्‌भगिनींनो,

बँकेच्या भागीदारांच्या छप्पन्नाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रसंगी आपले हार्दिक स्वागत करण्यास मला अत्यानंद होत आहे.



आजच्या सभेच्या कामकाजास सुरूवात करण्यापूर्वी गेल्या वर्षी स्वतंत्र भारतदेशाचे पहिले प्रमुख राज्यपाल माननीय राजाजी या थोर व्यक्तीच्या दुःखद निधनाने देशाचे जे अपरिमित नुकसान झाले आहे त्याबद्दल व इतर आमच्या बँकेशी निगडित असलेल्या व्यक्तींच्या दुःखद निधनाबद्दल या प्रसंगी अतीव दुःखाच्या भावना व्यक्त करणे हे माझे कर्तव्य आहे, असे मी समजतो.

आपण अशा वेळी भेटत आहोत की जेव्हा आपला देश गेल्या वर्षभरापासून अत्यंत ओढग्रस्त व बिकट परिस्थितीतून जात आहे. आपल्या देशातील अनेक भागांत, विशेषत: महाराष्ट्र व गुजरात येथे, लागोपाठ गेल्या दोन वर्षातील अवर्षणामुळे सत्वर हरितक्रांती घडवून आणण्याचे आपले स्वप्न भंग पावले असून गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे व ग्रामीण भागांतील लाखो शेतकरी व त्यांचे आश्रित यांचेवर कामधंदा व चरितार्थ शोधण्यासाठी राज्यातील दूरवर भागांत वणवण भटकण्याची पाळी येऊन ठेपली आहे. त्यांच्या हालअपेष्टा कमी होण्याच्या दृष्टीने राज्यसरकार व अनेक सामाजिक संस्था कसोशीने झटत असल्या तरी या लोकांची स्थिती अत्यंत करुणाजनक आहे. शेती विकासाकडे आतापर्यंत आपले दुर्लक्ष झाले होते; ती विकासाची कामे आता त्वरित हाती घेतली गेली असल्याने ही आपत्ती एक छुपे वरदानच समजता येईल व त्यामुळे लोकांच्या हालअपेष्टा काही प्रमाणात कमी होतील अशी अपेक्षा आहे. या विकासयोजना पूर्ण केल्या गेल्यास व या वर्षी पर्जन्यवृष्टी समाधानकारक झाल्यास आतापर्यंत पडीक असलेल्या पुष्कळशा जमिनींना पाणीपुरवठा होवून त्या लागवडीखाली आणणे शक्य होईल. आपल्या देशांत लागवडीखाली असलेल्या एकूण जमीनीपैकी पाणीपुरवठ्याखाली ओलीत जमीनीचे प्रमाण पंचवीस टक्क्यांचेवर असताना महाराष्ट्रात मात्र सदर प्रमाण आठ ते दहा टक्के एवढेच आहे ही खेदाची गोष्ट आहे. या करिता नदी, नाले, तलाव, व विहिरी यांतील प्रत्येक थेंबाचा शेतीसाठी उपयोग करण्याच्या उपाययोजना असून त्या परिसरातील जमिनींची उत्पादनशक्ती वाढविण्याची आवश्यकता सरकारने व लोकांनी विचारात घेऊन अत्यंत क्रियाशील राहिले पाहिजे. सुदैवाने या भागातील शेतकी व्यवसायाशी निकट संबंध असल्याने व दीर्घकाळ मंदीच्या तडाख्यात सापडलेले इंजिनिअरिंग क्षेत्रातील उद्योगधंदे सुधारण्याची चिन्हे दिसत असून मुख्यतः ऑइल इंजिन व सिमेंट पाइप्सचे कारखान्याचे उत्पादनात हल्ली जलद वाढ होत आहे.

सन १९७१ मध्ये सरासरी ठोकळ किमतीमध्ये चार टक्के वाढ झाली होती. चालू साली ही वाढ ७·८ टक्क्यांवर गेली आहे. गेल्या वर्षातील भाववाढीशी तुलना करता या सालातील भाववाढीचे वैशिष्ट्य म्हणजे अन्नधान्याच्या किमतीत निश्चित वाढ झालेली असून ही वाढ या सालातील एकूण भाववाढीच्या $\frac{2}{3}$ इतकी आहे. बेकारीचे वाढते प्रमाण, विशेषत: सुशिक्षित वर्गातील वाढती बेकारी, ह्यामुळे राष्ट्राच्या सामाजिक व राजकीय घडणीवर धोकादायक परिणाम होण्याची शक्यता आहे.

चालू सालातील आंतरराष्ट्रीय महत्त्वाची घटना म्हणजे डॉलरचे अवमूल्यन ही होय. युनायटेड स्टेटस्‌ने गेल्या एक वर्षात डॉलरचे दोन वेळा अवमूल्यन केले. भारतीय रुपया ज्याच्याशी संलग्न आहे त्या ब्रिटिश स्टर्लिंगचे मात्र अवमूल्यन न होता गेल्या वर्षाच्या जून महिन्यापासून त्याच प्रमाणात ते प्रचारात आहे. डॉलरचे अवमूल्यन झाल्यानंतर आंतरदेशीय चलन परिस्थितीचा सर्वांगीण दृष्टीने विचार करून भारत सरकारने स्टर्लिंग पौंडाप्रमाणे रुपयाचे अवमूल्यन न करता त्याची किंमत आहे तीच ठेवण्याचा निर्णय घेतला व सध्या काही काळ तरी स्टर्लिंगला अनुसरून रुपयाचे चलन तरते ठेवावे असे ठरविले.

सतत होणाऱ्या भाववाढीचे सत्र रोखण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने काही उपाययोजना अमलात आणल्या अन् बँकांना उपलब्ध होणाऱ्या कर्जास त्यामुळे अधिक आळा बसणार आहे. तसेच रिझर्व्ह बँकेने १ एप्रिल, १९७३ पासून काही विशिष्ट मुदतीच्या ठेवीवरील व्याजाचे दरात थोडीशी वाढ केल्याचे जाहीर केले असून कर्जाचे बाबतीत व्यापारी बँकांना व्याजाचे दरात वाढ करण्यास हिरवा कंदील दाखविला आहे. अशा रीतीने रिझर्व्ह बँकेने पुढाकार घेऊन पैशाची किंमत वाढविण्याच्या बाबतीत उपक्रम हाती घेतला आहे.

ताळेबंदावरून पाहता बँकेच्या सर्व व्यवहारात समाधानकारक प्रगती झाल्याचे दिसून येते. बँकेचे वसूल झालेले भांडवल रुपये २९ लाखावर कायम आहे. अहवालाच्या साली बँकेच्या एकूण

कामकाजात विशेषतः ठेवी, गुंतवणूक व कर्जे या बाबतीत भरीव प्रगती झाली असून बँकेच्या ठेवी तेवीस कोटीच्या वर गेल्या असून चालू साली त्यांत रुपये चार कोटी शाहत्तर लाखाची वाढ झाली आहे. गेल्या वर्षी ठेवीच्या वाढीचे प्रमाण १२·८ टक्के होते. ते ह्या वर्षी २६ टक्क्यापर्यंत वर गेले आहे.

बँकेच्या सरकारी रोख्यातील गुंतवणुकी सन १९७१ मध्ये रुपये ६·४६ कोटी होत्या त्या वाढवून चालू साली रुपये ९·१८ कोटी झाल्या आहेत. अहवालाच्या साली या वाढीचे प्रमाण ४२ टक्के पडते. गेल्या सालातील ०·९ टक्क्याची वाढ पाहता चालू सालातील वाढीचे प्रमाण पुष्कळ समाधानकारक आहे. ठेवीमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ पाहता ही वाढ होणे आवश्यकच होते.

कर्जाच्या आकड्यातही वाढ झाली असून चालू साली कर्जाचा आकडा १३·३६ कोटीवर गेला आहे. त्यांचे वाढीचे प्रमाण २१·२ टक्के पडते. गेल्या वर्षी कर्जे ११·०२ कोटी दिली गेली होती व त्यांचे वाढीचे प्रमाण १३·७ टक्के होते.

शेती विकासाकरिता दिलेल्या कर्जामध्ये आतापावेतो १०७ पाणीपुरवठा योजनेकरिता दिलेल्या कर्जाचा समावेश असून एकूण ६४४ शेतकऱ्यांना त्याचा फायदा मिळाला आहे व ४,६५२ एकर कोरडी जमीन त्यामुळे ओलीत झाली. ९६१ शेतकऱ्यांना पीक कर्जे एकूण ६२·६६ लाख रु. देण्यात आली असून सध्याची भीषण दुष्काळ परिस्थिती असूनहि या कर्जाच्या वसुलीचे प्रमाण शेकडा ७५ पडते हे नमूद करण्यासारखे आहे.

गेल्या वर्षी माझ्या भाषणामध्ये शेतकऱ्यांना कर्जे देण्यास सुलभ व्हावे म्हणून राज्य सरकारकडून कांही सवलती मिळाव्यात अशी विनंती करण्याचा उल्लेख केला होता. परंतु मला नमूद करण्यास खेद वाटतो की आम्ही ज्या सवलती मागितल्या होत्या त्या अद्यापिही मंजूर होण्याची चिन्हे दिसत नाहीत. शेतकी कर्जाकरीता तारण म्हणून देण्यात येणाऱ्या जमीन गहाणाच्या दस्तास स्टॅम्प ड्युटी माफ केल्याची सवलत फक्त राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांना देण्यात आली असून इतर, राष्ट्रीयीकरण न झालेल्या, बँका प्रायॉरीटी सेक्टर्सना कर्जे देण्याच्या बाबतीत तेवढ्याच हिरीरीने भाग घेत असताना देखील त्यांना ह्या सवलतीचा फायदा अद्यापिही मिळू शकलेला नाही. शेतकी कर्जाच्या वसुलीच्या बाबतीत सहकारी बँकांना लॅन्ड रेव्हेन्यूची थकबाकी वसूल करण्याबाबत जो अग्रहक्क व जे इतर अधिकार दिलेले आहेत त्या पद्धतीने कर्जवसुलीचे अधिकार व सवलती व्यापारी बँकांना अद्यापि दिलेल्या नाहीत.

शेतकी कर्जाव्यतिरिक्त आपली बँक लघुउद्योग धंद्यांना त्यांची गरज भागविण्याकरिता योग्य ते साहाय्य करीत आहे. चालू सालातील भीषण दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन सांगली जिल्ह्यांतील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दुष्काळग्रस्त भागातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना साहाय्य करण्यासाठी सांगली बँकेने प्रत्येक विद्यार्थ्यास २०० रुपये प्रमाणे अल्प व्याजाचे दराने एकूण ५ लाख रुपये कर्ज सांगली जिल्हा दुष्काळग्रस्त विद्यार्थी साहाय्यक समिती, सांगली यांचे मार्फत मंजूर केले असून त्याचा सांगली जिल्ह्यांतील अंदाजे २,००० विद्यार्थ्यांना फायदा मिळणार आहे.

सन १९७२ साली निव्वळ नफा रु. ४·०८ लाख झाला असून तो गेल्या सालापेक्षा रु. ०·६० लाखांनी जास्त आहे व त्याच्या वाढीचे प्रमाण १७·२ टक्के पडते. सन १९७१ मध्ये हे नफ्याचे प्रमाण ३७·२ टक्क्यांनी उतरले होते.

चालू सालातील नफ्यासंबंधी मला असे स्पष्टीकरण करावयाचे आहे की खाली नमूद केल्याप्रमाणे काही अपरिहार्य खर्चाचा बोजा ठोक उत्पन्नावर पडला नसता तर नफ्याची रक्कम निश्चित योग्य प्रमाणात जास्त वाढली असती.

(१) नोकर वर्गाची मागील सर्व थकबाकी.

(२) नोकर लोकांच्या बोनसचे प्रमाण सन १९७१ पासून ८·३३ टक्के ठरल्यावरून गेल्या सालातील देणे निघत असलेली जादा बोनसची रक्कम.

(३) पेमेंट ऑफ ग्रॅच्युटी ॲक्ट बँकांना लागू केल्यामुळे नोकर लोकांना काही ठराविक कालावधी व अटी पूर्ण झाल्यानंतर २० महिन्यांचा मूळ पगार व महागाई भत्ता इतकी जास्तीत जास्त ग्रॅच्युटीची रक्कम.

(४) बँकेचे कामकाज व शाखाविस्तार वाढल्याने चालू साली नोकर लोकांच्या संख्येत झालेल्या वाढीमुळे पगार या सदरामध्ये व इतर नित्यावश्यक खर्चामध्ये वाढ.

दुर्दैवाने वर नमूद केलेल्या कारणामुळे गेल्या वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत कर्जवाटपाचे प्रमाणात सर्व बँकिंग क्षेत्रात शिथिलता निर्माण झाल्याने आमच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत व चालू साली डिव्हिडंडचे प्रमाण आणखी घटून ११ टक्क्यावर खाली आणावे लागले.

तारीख २६–३–१९७३ रोजी रविवार पेठ, पुणे शाखेच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला आणि सदर इमारतीमध्ये रविवार पेठ शाखेचे ऑफिस सुरू करण्यात आले. सदर इमारतीत अद्ययावत् सोयींनी युक्त व मजबूत तळघर बांधण्यात आले असून बँकेची रोख रकम व मौल्यवान वस्तू ठेवण्यासाठी स्ट्राँग रुमची सोय व गिऱ्हाइकांच्या सोयीकरिता सेफ डिपॉझिट व्हॉल्टमध्ये लॉकर्सची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच वाढत्या गरजेप्रमाणे हेड ऑफिसच्या इमारतीत वाढ करण्याचे कामही चालू असून तेही लवकरच पूर्ण होईल. तसेच आमच्या काही प्रमुख शाखांमध्ये आमचे गिऱ्हाइकांना त्वरित व सुलभ सेवा उपलब्ध होण्याच्या

दृष्टीने अद्ययावत् सोयी केल्या असून काही प्रमुख शाखांच्या इमारतीत पूर्वीची जागा अपुरी पडू लागल्याकारणाने नवीन प्रशस्त इमारती भाड्याने घेऊन त्यांत योग्य त्या सुधारणा केल्या आहेत.

मला नमूद करण्यास आनंद वाटतो की अहवालाचे साली आम्ही आठ नवीन शाखा सुरू केल्या असून वर्षाचे शेवटी हेड ऑफिस सोडून बँकेच्या एकूण ७३ शाखा झाल्या आहेत. चालू साली वाटेगाव ( जि. सांगली ) येथे आम्ही नवीन शाखा सुरू केली असून आणखी पाच नवीन शाखा सुरू करणार आहोत. या पाच शाखा पैकी मुंबई येथे दोन व अहमदाबाद येथे एक अशा शाखा उघडल्या जातील.

महाराष्ट्र व म्हैसूर राज्यात ठिकठिकाणी पसरलेले व्यापारी वर्गातील आमचे आश्रयदाते व इतर ठेवीदार व कर्जदार यांना मी बँकेतर्फे असे आश्वासन देतो की सांगली बँक पूर्वीप्रमाणेच त्यांच्या सेवेला तत्पर राहील, एवढेच नव्हे तर आमची कार्यक्षमता वाढवून सर्वांच्याकडून मोठ्या प्रमाणात आश्रय व सदिच्छा संपादन करण्याचा आटोकाट प्रयत्न करील.

पुनः एकदा सर्वांचे आभार मानून मी आपले भाषण पुरे करतो.

जयहिंद.

---

### पाकिस्तानची लोकसंख्या ६·५ कोटी

१९७२ मध्ये पाकिस्तानात शिरगणती करण्यात आली. शिरगणतीत गोळा केलेल्या कच्च्या माहितीप्रमाणे १९७२ च्या सप्टेंबरमध्ये पाकिस्तानची लोकसंख्या ६·५ कोटी होती. ह्या पूर्वीची शिरगणती १९६१ मध्ये करण्यात आली होती. त्या शिरगणतीमधील आकड्यांशी तुलना करता तेव्हापासूनच्या १० वर्षांत पाकिस्तानची लोकसंख्या ५१·३३ टक्यांनी वाढल्याचे दिसून येते. लोकसंख्येत ३·४ कोटी पुरुष आणि ३·४५ कोटी स्त्रिया आहेत. पाकिस्तानमधील घटक राज्यातील लोकसंख्येची टक्केवारी अशी आहे. पश्चिम पंजाब ५७·५९ टक्के; सिंध २१·५२ टक्के; वायव्य सरहद्द प्रांत १२·९५ टक्के; बलुचिस्तान ३·७२ टक्के; जमातींचा प्रदेश ३·८६ टक्के आणि राजधानी ०·३६ टक्के. कराची शहराची लोकसंख्या सर्वांत जास्त म्हणजे ३० लाखांवर होती.

**लॉटरीच्या बक्षिसावर इनकमटॅक्स** – "संयुक्त प्रदेशाच्या डिसेंबरच्या सोडतीत मला १ लक्ष रुपयांचे बक्षीस मिळाले, ते 'प्राप्ती' मध्ये धरता येणार नाही; त्या बक्षिसाला प्राप्तीच्या व्याख्येत बसविणे घटनेच्या २४६ व्या कलमाशी विसंगत आहे; तेव्हा माझा कापून घेतलेला ३१,०५० रु. इनकमटॅक्स मला परत देवविण्यात यावा" असा रिट पिटिशन अर्ज श्री. बी. एन. केसरी ह्यांनी अलाहाबाद हायकोर्टात केला आहे.


THE UGAR SUGAR WORKS LIMITED

Registered Office :
Vakhar bhag,
Sangli ( Maharashtra State )
Phone – Sangli – 191

Factory Office :
P. O. : Ugarkhurd
( Dist. Belgaum )
( Mysory State )
Phone– Sangli – 187

MANUFACTURERS OF


(1) white Crystal Sugar of all grades.
(2) Quality Industrial Alcohol.
(3) Quality Indian Made Foreign Liquors — First In India — to get I. S. I. Certification mark.

The present Crushing capacity of the Factory is 2,000 M. Tonnes of cane per day.

The Shares of the Company are listed on the Bombay and Bangalore Market.



"भिडे" ओव्हर पिक
पॉवर लूम्स ५६," ६०" व ६४"




भिडे अॅन्ड सन्स प्रा. लि;
—सांगली—

फोन नं. २०६९

रघुनाथराव भिडे
कार्यकारी संचालक

## ‘भारत मित्रा’चा ४५ वा वर्षारंभ अंक

रिवण-गोवा येथील ‘भारतमित्र’ मासिकाला ४५ वे वर्ष सुरू झाले, ह्याबद्दल आम्ही त्याचे संपादक, प्रकाशक व मालक श्री. ना. भा. नायक ह्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. मराठीला मारण्याचा चंग बांधलेल्या फिरंग्यांच्या विरोधास आणि जुलमास न जुमानता श्री. नायक ह्यांनी भारताबद्दलचे प्रेम वाढविणाऱ्या आणि स्वातंत्र्यवीरांना स्फूर्ती देणाऱ्या ह्या मासिकाची आर्थिक व चालकत्वाची सर्व जबाबदारी पत्करली, एवढेच नव्हे तर त्याबद्दल फिरंग्यांची कठोर शिक्षाही भोगली. गोव्याची फिरंग्यांच्यापासून मुक्तता होण्यापूर्वीच्या काळातील ‘भारतमित्रा’चे अंक पाहिले, म्हणजे त्यांना किती दिव्यातून आपले ध्येय गाठावे लागले, ह्याची कल्पना येते. ‘भारतमित्रा’चे द्वारा श्री. नायक ह्यांनी आर्थिक, राजकीय व सामाजिक जागृती केली. आज ७५ व्या वर्षीही श्री. नायक ह्यांची ध्येयनिष्ठा कायम आहे आणि अनेक आघात सोसूनही त्यांनी आपली जिद्द सतत राखली आहे. स्वत:च्या जबाबदारीवर मासिक यशस्वी करून वाचकांना कार्यप्रवण करणे किती अवघड काम आहे, ह्याचा ज्यांना अनुभव आहे त्यांनाच श्री. नायक ह्यांच्या कामगिरीची थोडीफार कल्पना येईल. त्यांनी विविध विषयावर ३५ ग्रंथ लिहिले असून त्यांतील सुमारे १२ ऐतिहासिक आहेत. मराठी भाषेची आणि भाषिकांची त्यांनी ही जी प्रचंड सेवा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केली, तिचे चीज महाराष्ट्र राज्याकडून आणि मराठी साहित्य संस्थांकडूनही झालेले नाही, पण त्याची श्री. नायक ह्यांना खंत नाही. कारण, त्यांचा पिंडच त्यागाचा आणि सेवेचा आहे. ७५ व्या वर्षीही उत्साह टिकविण्याची त्यांची वृत्ती आमच्या सारख्यांना लाजविणारी आहे. ‘भारत मित्रा’च्या पहिल्या पृष्ठावर अनेक सुवचने छापलेली असतात, ती काळजीपूर्वक वाचणारांच्या जीवनाचे सोने झाल्याविना राहणार नाही. आम्ही श्री. नायक ह्यांना निरामय आरोग्य आणि समाधानी जीवन चिंतितो आणि ‘भारत मित्रा’चा सुवर्णमहोत्सव साजरा होण्याचा त्यांना आनंद लाभो, असे इच्छितो.

## अमेरिकेच्या ज्ञानकोशाला बांगला देशात बंदी

बांगला देशाच्या स्वातंत्र्य लढ्याला अमेरिकन सरकारने पाठिंबा तर दिला नाहीच; उलट पाकिस्तानची बाजू घेऊन तो दडपण्यास अप्रत्यक्ष हातभार लावला. तरीसुद्धा स्वतंत्र झालेल्या बांगला देशाला आर्थिक मदत देऊन अमेरिका आपली गेलेली पत परत मिळविण्याची खटपट करीत आहे. पण ह्या प्रयत्नांना कधी कधी भूतकाळाचा खो मिळतो. न्यू अमेरिकन एनसायक्लोपीडिआ ह्या ग्रंथाच्या ७० व्या खंडात बांगला देशाच्या जनतेची बदनामी होण्यासारखा मजकूर छापलेला आहे. हे कारण देऊन बांगला देशाच्या सरकारने ह्या खंडाच्या सर्व प्रती जप्त केल्या आहेत आणि नव्या प्रती देशात आणण्यावर बंदी घातली आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

माननीय प्रिय संपादक,

‘अर्थ’ पाक्षिक, पुणे, यांना,

सप्रेम नमस्कार, वि. वि.

महाशय,

‘अर्थ’ पाक्षिकाच्या दि. २१ मार्च १९७३ च्या अंकातील ‘व्यवस्थापन समस्या (७)’ या शीर्षकाखाली प्रसिद्ध झालेला ‘कामात सुरळीतपणा कसा येईल?’ हा श्री. सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम्. बी. ए. यांचा लेख वाचला. आजच्या झपाट्याने विकास पावणाऱ्या बदलत्या औद्योगिक प्रगतीच्या युगात, भारतासारख्या विकसनशील देशाला सातत्याने कामात सुरळीतपणा राखणे ही खरोखर अत्यंत निकडीची ज्वलंत अशी व्यवस्थापकीय समस्या असून तिजसंबंधी प्रस्तुत लेखकाने, संगीतातील बैठकीची सुसंवादिता, सामूहिक कवायत, इत्यादी अत्यंत सुयोग्य अशी उदाहरणे देऊन, उद्योगव्यवस्थापनामध्ये सुसंवादिता राखणे कसे शक्य व अगत्याचे आहे याचे अत्यंत मार्मिक असे विवेचन करून, दि डू लिटल कंपनीचे जनरल मॅनेजर, श्री. रा. गो पेटकर यांनी त्यांच्यापुढील समस्या कशा रीतीने हाताळणे अगत्याचे होते हे खुबीदारपणे दाखविले आहे. धन्यवाद!

आपल्या ‘अर्थ’ पाक्षिकात ज्या व्यवस्थापकीय समस्या प्रकाशित केल्या जातात त्यावर, संबंधित विद्वान लेखकांकडून किंवा आपणाकडून काही प्रश्न उपस्थित करून त्यावर वाचकांचे विचार मागविल्यास त्यांच्या व्यवस्थापकीय बुद्धिकौशल्यास उत्तेजन दिल्यासारखे होईल असे मला वाटते.

माझ्या वरील विचारांशी, समस्या लेखक, आपण व माझे वाचकबंधू सहमत होतील ना?

अक्कलकोट
२४-४-१९७३

आपला विश्वासू
आर. डी. कुलकर्णी

## बँकांनी ग्रामीण भागात दूरवर पोचावे

स्टेट बँक ऑफ इंडिआच्या पर्यवेक्षक संघटनेची ८ वी वार्षिक परिषद अहमदाबाद येथे भरविण्यात आली होती. परिषदेचे उद्‌घाटन सुप्रीम कोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. पी. बी. गजेंद्रगडकर ह्यांनी केले. ह्या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की देशातील बँकांनी केवळ व्यापारी संघटना ह्या भूमिकेतून काम करता कामा नये. त्यांनी आपल्या कार्यक्षेत्राचा विस्तार करीत राहिले पाहिजे आणि समाजात आर्थिक-सामाजिक बदल घडवून आणण्याच्या कामी मदत केली पाहिजे. असा बदल घडवून आणण्यात बँकांना फार महत्त्वाचे कार्य करता येणे शक्य आहे. त्यांनी आपला व्याप देशाच्या बारीकसारीक कोपऱ्यापर्यंत पसरविला पाहिजे. काही विविक्षित औद्योगिक गटांना साह्य देण्यापुरतीच दृष्टी त्यांनी ठेवता कामा नये. देशातील प्रत्येक होतकरू माणसाला बँकांचा लाभ झाला पाहिजे.

# दुष्काळ व वीज कपातग्रस्त कारखान्यांना आर्थिक मदत

## दुष्काळ पीडितांना तात्पुरत्या नोकऱ्या देण्याचे धोरण

### दि युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष श्री. वि. श्री. दामले यांचे भागधारकांच्या सभेत भाषण.

अहवाल साली सर्वच बँकांकडील कर्जव्यवहाराची परिस्थिती असमाधानकारक होती आणि त्यामुळे बँकांकडे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक न झालेल्या रकमा पडून होत्या. आपल्या बँकेची परिस्थितीसुद्धा सर्वसाधारणपणे अशीच होती. ठेवीमध्ये वाढ होत असताना कर्जव्यवहाराचे प्रमाण टिकले नाही तर नफ्यावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते. बँकेकडील आपल्याला शिल्लक रकमांची थोडीफार गुंतवणूक या वर्षी करता आली, तरी देखील रु. ५० लाख गुंतवणूक न होता वर्ष अखेरीस पडून होते. कर्ज व्यवहार जितक्या जास्त प्रमाणात वाढले तितक्या प्रमाणात रकमेची गुंतवणुक होत जाते. त्या दृष्टीने चालू वर्षी विशेष प्रयत्न केले जात आहेत, असे आश्वासन दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. भागधारकांच्या वार्षिक सभेत बँकेचे अध्यक्ष वि. श्री. दामले यांनी दिले. बँकेची ही सभा स्वतःच्या भव्य इमारतीत भरली होती हे यंदाचे वैशिष्ट्य होते.



भारतातील अनेक राज्यांत आणि विशेषतः महाराष्ट्रात या वर्षी पडलेल्या दुष्काळाच्या भीषण छायेत आपण सध्या वावरत आहोत. यासंबंधी सरकार व जनता आपापली कर्तव्ये पार पाडीत आहेत. आपली बँक देखील याबाबतचे आपले कर्तव्य पार पाडीत आहे. मुख्य मंत्री दुष्काळनिधीला आपण रु. १०,००१ ची देणगी दिलेली आहे. त्या शिवाय दुष्काळग्रस्त भागांतील आपल्या बँकेच्या शाखांकडे काही दुष्काळपीडित लोकांना तात्पुरत्या नोकऱ्या दिल्या गेल्या आहेत.

वीजकपातीमुळे औद्योगिक उत्पादनावरही अनिष्ट परिणाम होत आहे. उद्योगधंद्याच्या याबाबतच्या अडचणी सोडविण्याकरिता बँकेतर्फे आर्थिक मदत देण्यात येत आहे.

**बँकिंग कमिशन :—**

बँकिंग कमिशनने आपला अहवाल सादर केल्याला आता एक वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. कमिशनने केलेल्या बऱ्याच महत्त्वाच्या शिफारशीसंबंधांने केन्द्र सरकारने अद्यापही निर्णय घेतलेला नाही. हा निर्णय लवकर घेतला जावा असे मला वाटते.

**ठेव व्याजदरात वाढ :—**

मी माझ्या गेल्या वर्षीच्या भाषणांत बकांकडील ठेवीवरील व्याजाच्या दरात वाढ होणे आवश्यक आहे असे मोठ्या आग्रहाने प्रतिपादन केले होते. मला हे नमूद करण्यास अत्यंत आनंद वाटतो की, रिझर्व्ह बँकेने योग्य असा निर्णय घेतलेला असून दि. १ एप्रिल १९७३ पासून ठेवीवरील व्याजाच्या दरात वाढ करण्यास बँकांना परवानगी दिली आहे. ही वाढ समाधानकारक आहे. परंतु जास्तीत जास्त व्याजाच्या दरात देखील किमान पाव टक्का वाढ होणे अत्यंत जरूर होते. याबाबत रिझर्व्ह बँकेने फेरविचार करावा अशी माझी विनंती आहे.

**भागभांडवल :—**

बँकेच्या त्या वेळच्या सर्व भागधारकांना दोन शेअर्सला एक असे हक्काचे एकूण १३,२९१ शेअर्स देऊ केले गेले. ३,१४४ शेअर्स अद्याप शिल्लक आहेत. वर्षअखेर बँकेचे सर्व रु. २० लाखाचे शेअर्स विकले जातील.

**राखीव निधी :—**

अहवालसाली बँकेच्या राखीव निधीत रु. दोन लाख वर्ग केलेले असून सालअखेर राखीव निधी रु. १६·५० लाख झालेला आहे. एकूण मुक्त राखीव निधी रु. १८·४२ लाख म्हणजे वाढीव वसूल भाग भांडवलापेक्षा जास्त होतो.

**ठेवी :—**

बँकेच्या ठेवींमध्ये अहवालसाली रु. ४३५ लाखांची म्हणजे जवळ जवळ २५ टक्के इतकी वाढ झाली आहे हे नमूद करण्यास मला विशेष आनंद वाटतो. बँकेच्या एकूण ठेवी जवळ जवळ रु. २२ कोटीपर्यंत गेल्या असून चालू वर्षी त्या रु. २५ कोटींचेवर जातील अशी मला खात्री वाटते. इतर बँकांच्या सरासरी ठेववाढीच्या प्रमाणाशी आपल्या बँकेचे प्रमाण सुसंगतच आहे.

**कर्जव्यवहार :—**

अहवाल सालअखेर बँकेच्या कर्जव्यवहारात बरीच म्हणजे रु. २४७·६७ लाखाची वाढ झालेली आहे. गेल्या वर्षी ही वाढ फक्त रु. १३४·३८ लाखाची होती हे विचारात घेता अहवालसाली कर्जव्यवहारात वाढ करण्याच्या आपल्या प्रयत्नास यश प्राप्त झाले आहे.

**डिव्हिडंड :—**

देखील संचालक मंडळाने गेल्या वर्षीइतकेच म्हणजे १० टक्के डिव्हिडंड देण्याची शिफारस केलेली आहे. मी माझ्या गेल्या वर्षीच्या भाषणात वाढीव भागभांडवलावर देखील तितकेच डिव्हिडंड देऊ शकू असा विश्वास व्यक्त केला होता तो खरा ठरला आहे याचे मला समाधान वाटते.

**सबसिडीअरी कंपनी :—**

बँकेच्या दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झिक्युटर कंपनी लि.

या सबसिडीअरी कंपनीने अहवालसाली समाधानकारक प्रगती केलेली आहे. तसेच तिने गेल्या वर्षीइतकेच म्हणजे ५ टक्के डिव्हिडंड जाहीर केले आहे.

**दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि. :—**

माझ्या गेल्या वर्षीच्या भाषणात मी या वर्षी सातारा स्वदेशी कमर्शिअल बँकेच्या अंतिम मूल्यमापनाचे काम पूर्ण होईल असा उल्लेख केला होता. मला हे नमूद करण्यास अत्यंत समाधान वाटते की, त्या बँकेच्या भागधारकांना द्यावयाची नुकसान-भरपाईची शेवटची रक्कमही दिली गेली. या भागधारकांना एकूण २३५ टक्के रक्कम दिली गेली ही गोष्ट त्या बँकेस व तसेच आपल्या बँकेसही भूषणावह आहे यात शंकाच नाही.

**संचालक मंडळ :—**

बँकेशी गेल्या ३२ वर्षांहून अधिक काळ घनिष्ट संबंध असलेले व सन १९६२ ते १९६९ या काळात बँकेचे अध्यक्ष असलेले संचालक मंडळातील माझे एक सहकारी श्री. रा. ना. गोडबोले हे या वार्षिक सर्व साधारण सभेनंतर संचालक पदावरून निवृत्त होत आहेत. श्री. गोडबोले यांनी मी बँकेत आल्यापासून मला अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांची निवृत्ती ही जशी बँकेस जाणवणारी ठरणार आहे त्याचप्रमाणे ती मला व्यक्तिगत नुकसानीची ठरणार आहे. अर्थात बँकांवरील सामाजिक नियंत्रणाच्या संदर्भात ते निवृत्त होत असल्याने त्यास आपणा कोणाचाच इलाज नाही. त्यांचे यापुढचे आयुष्य सुखसमृद्धीचे व समाधानाचे जावो अशी इच्छा मी व्यक्त करतो.

बँक व नोकरवर्ग यांचे संबंध अत्यंत सौहार्दाचे व सहकार्याचे राहिले. बँकेच्या प्रगतीविषयी वाटणारा जिव्हाळा व परस्पर समजुतीने कोणताही प्रश्न हाताळण्याची मनोवृत्ती यांमुळे बँकेची चांगली प्रगती होत आहे. अहवालसाली बँकेने जी चांगली कामगिरी केली आहे त्यांत भागधारक, खातेदार, हितचिंतक व नोकरवर्ग या सर्वांचाच वाटा आहे. समाजाच्या सर्व थरांमध्ये बँकेविषयी जी आत्मीयता आणि आपुलकी दिसून येते त्यात बँकेच्या संस्थापकांच्या पुण्याईचा मोठा भाग आ: सर्वांचे हे प्रेम असेच कायम राहावे अशी इच्छा व्यक्त करतो.

## वेदग्रंथाची संहिता प्रकाशित

पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी दिल्ली येथील गंगेश्वर आश्रमात चारी वेदांच्या संहितेचे प्रकाशन केले. १९६५ साली एका अंध स्वामींनी वेदांची प्रमाणित आवृत्ती तयार करण्यास प्रारंभ केला होता. त्यांचे नांव गंगेश्वर महाराज असे आहे. वेदग्रंथांच्या ज्या प्रकाशित आवृत्ती आहेत त्यात अनेक चुका स्वामींना आढळून आल्या होत्या. त्या दुरुस्त करण्यासाठी त्यांनी अनेक संस्कृत पंडितांचा सल्ला घेतला आणि वेदाचा पाठ निर्दोष पद्धतीने म्हणू शकणाऱ्या ५० ब्राह्मणांचे साह्य घेतले. वेदांची निर्दोष प्रत तयार करण्याच्या ह्या खटाटोपाला २॥ वर्षे लागली. १,००० पृष्ठांचा हा ग्रंथ आता तयार झाला असून त्याचे वजन २२ किलोग्रॅम आहे.


**दलाल अँड कंपनी**

सोन्यामारुती चौक, लक्ष्मी रोड, पुणे २,
(टे. २४९९४)
शाखा : २९६, महात्मा गांधी रोड, पुणे १.
(टे. २६२३७)

खालील मालाचे विक्रेते

**अँकर ब्रँड :**

◆ टीक प्लाय ◆ कमर्शिअल प्लायवुड ◆ फ्लश डोअर्स ◆ कमर्शिअल ब्लॉक बोर्ड्स ◆ टीक ब्लॉक बोर्ड्स ◆ स्ट्रिप्स ◆ कॉंक्रीट शटरिंग प्लायवुड पार्टिकल बोर्ड्स ◆ नोव्हा माउंट

ओकल बोर्ड्स

**फॉरमायका डेकोरेटिव्ह लामिनेटेड शीट्स :**

◆ हार्ड बोर्ड्स ◆ इन्सुलेशनरी बोर्ड्स इन्सुलेशन टाइल्स ◆ फेव्हिकॉल ॲडेझिव्हज.



NOW
EARN INTEREST
EVERY MONTH
WITH
BANK OF INDIA
MONTHLY
INCOME
CERTIFICATES

# दि बँक ऑफ कराड लि., कराड.

## मा. चेअरमन श्री. म. वि. खंडकर यांचे २७ व्या वार्षिक सभेतील भाषण



बँकेचे डायरेक्टर्स व बँकेचे भागदार,

आपल्या बँकेच्या २७ व्या वार्षिक साधारण सभेस आपण उपस्थित राहिलात याबद्दल आपणा सर्वांचे स्वागत करण्यास मला फार आनंद वाटत आहे.

३१ डिसेंबर १९७२ अखेर संपलेल्या वर्षात बँकेस रु. ४,६४,८२७–६२ नफा झाला. त्यातून इन्कमटॅक्स साठी रु. २,६८,५५०–०० ची तरतूद केल्यावर निव्वळ नफा रु. १,९६,२७७–६२ राहतो. त्यांतून रिझर्व्ह रु. १,००,०००–००, डि. इक्वीलायझेशन रु. १०,०००–०० व इतर रु. ३४,४५०–०० वर्ग केले आहेत. डिव्हिडंड साठी रु. ४८,७८९–०० ची तरतूद केली आहे. बँकेने गेली २ वर्षे ९ टक्के डिव्हिडंड दिले आहे. या संपलेल्या वर्षासाठीही ९ टक्के डिव्हिडंड प्रपोज केले आहे त्यास आपण मान्यता देणेची आहे.

बँकेच्या ठेवींमध्ये रु. एक कोटीची वाढ झाली असून ठेवी ३१–१२–१९७२ अखेर रु. ४,७७,०००–०० झाल्या आहेत. बँकेने शेती, लघु–उद्योग, ट्रॅन्सपोर्ट व लहान व्यापारी वगैरे प्रायॉरिटी सेक्टर मध्ये येणाऱ्या धंद्यांना एकूण कर्जाच्या ( २ कोटी ८५ लाखांच्या ) ६० टक्केपेक्षा जास्त कर्ज दिले आहे.

अहवालाचे वर्ष हे बँकेच्या इतिहासातील एक महत्त्वाचे वर्ष होय. बँकेच्या स्थापनेला ता. १२–३–१९७१ रोजी २५ वर्षे पूर्ण झाली व बँकेचे कामकाज सुरू होऊन ३ एप्रिल १९७१ ला २५ वर्षे पूर्ण झाली. बँकेचा रौप्यमहोत्सव नामदार अर्थमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्याच अध्यक्षतेखाली साजरा व्हावा अशी चालकांची इच्छा होती, त्याप्रमाणे थोड्या उशिरा का होईना सदर रौप्यमहोत्सव समारंभ ता. ८ जून १९७२ रोजी भारताचे अर्थमंत्री नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने कराड येथे टिळक हायस्कूलचे प्रांगणात साजरा झाला. याचवेळी बँकेचे संस्थापक व आद्य चेअरमन श्री. नानासाहेब देशपांडे यांच्या संबंधीचे 'कर्मयोगी नाना—व्यक्ति आणि महती' या पुस्तकाचे नामदार श्री यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. वरील समारंभास सहकार मंत्री नामदार यशवंतराव मोहिते आपुलकीने हजर राहिले. नामदार यशवंतराव चव्हाण व नामदार यशवंतराव मोहिते यांनी बँकेबद्दल आपुलकी व प्रेम व्यक्त केले याबद्दल बँक त्यांची ऋणी आहे.

कर्मयोगी नाना या पुस्तकाचे प्रकाशन बँकेच्या रौप्यमहोत्सव समारंभात होणे हे उचित होय. कारण कै. नानांनीच या बँकेला आजचे स्वरूप व स्वास्थ्य प्राप्त करून दिले आहे. या पुस्तकाचा छपाई वगैरेचा खर्च बँकेने करावा अशी संचालकांची इच्छा असूनही कै. नानासाहेब यांचे चिरंजीव श्री. रामभाऊ ऊर्फ दादासाहेब देशपांडे व श्री. बापूसाहेब देशपांडे यांनी तो खर्च स्वत: केला आहे हे भागदारांचे निदर्शनास आणू इच्छितो.

अहवालाचे साली बँकेने आपल्या नफ्यातून चीफ मिनिस्टर स्केअर्सिटी रिलिफ फंडास देण्यासाठी रु. ५,०००–०० ची तरतूद केली आहे. ती लवकरच त्यांना देण्यात येईल.

अहवालाचे वर्षी डॉ. वा. गो. देशपांडे, श्री. ना बा. बुधकर व श्री. भू. चं. दलाल क्रमाने डायरेक्टर मधून निवृत्त होत आहेत. श्री नानासाहेब बुधकर हे निवडणुकीस उभे नाहीत. श्री. नानासाहेब का उभे राहात नाहीत अशी आपणापैकी पुष्कळाना शंका येणे साहजिक आहे व सर्व संचालकांनाही याबद्दल खेद वाटतो आहे. यासाठी मी त्यासंबंधी थोडा खुलासा केल्यास तो अप्रस्तुत होणार नाही असे वाटते. पूर्वीचे ऑनररी चेअरमन ( पार्ट टाईम ) यांनी बोर्डावर असू नये असे रिझर्व बँकेने सुचविले असल्याने श्री. नानासाहेब यांच्यासारखी अनुभवी व प्रतिष्ठित व्यक्ती आम्हांला बोर्डावर हवी असूनही निरुपाय होत आहे, याबद्दल संचालकांना खेद वाटतो आहे. श्री. नानासाहेबांच्या उत्तम कामगिरीबद्दल सभेचे काम संपल्यावर त्यांचा याच सभेमध्ये सत्कार करणेचा आहे.

बँकेने ४१५८ शेअर्स किंमत रु. १००–०० प्रमाणे ४,१५,८००–०० चे विक्रीस काढण्याचे ठरविले आहे. आपण सर्वांनी शेअर्स घेण्याचे बाबतीत सहकार्य दिले आहे. त्याप्रमाणे याही वेळी द्यावे अशी सर्वांना विनंती आहे.

रिझर्व बँकेकडून ॲडव्हान्सेस करण्यावर मार्जिन वगैरेची बरीच बंधने येत आहेत. किंमती वर जाऊ नयेत या हेतूने ही बंधने घातली जात आहेत. पण त्यात सरकारला यश आलेले दिसत नाही. मालाचा पुरवठा व मागणी डिमांड व सप्लाय या तत्त्वावरच अवलंबून आहे असे वाटते. प्रॉडक्शनमध्ये वाढ झाल्या-खेरीज किंमत कमी येण्याची शक्यता दिसत नाही. वरील सर्व बंधने सांभाळूनच बँकेला ॲडव्हान्सेस करावे लागतात.

---

### गव्हाच्या वाहतुकीपायी वाहतुकीत गोंधळ

अमेरिकेच्या रेल्वे वाहतुकीत आणि बंदरांत गव्हाच्या वाहतुकीमुळे विलक्षण अव्यवस्था माजली आहे. तेथील रेल्वेमार्ग आणि बंदरे प्रचंड प्रमाणावर होणाऱ्या वाहतुकीला अपुरी पडत आहेत. गेल्या जुलै महिन्यात रशिआने अमेरिकेकडून कोट्यवधी डॉलर्सचा गहू खरेदी करण्याचा करार केला. पण त्याची प्रत्यक्ष वाहतूक सुरू होण्यास १९७२ चा ऑक्टोबर उजाडला. त्याचा परिणाम असा झाला की गव्हाच्या बाजारपेठांतून गहू वाहून नेण्यासाठी लागणाऱ्या रेल्वे वॅगन्स अपुऱ्या पडू लागल्या. आता एकदम धांदल उडाली आहे. अमेरिकेतील बंदरे गव्हाच्या आगमनामुळे तुडुंब भरलेली आहेत. बंदरात उभ्या असलेल्या बोटींवर माल चढविण्याचीही गर्दी उसळली आहे. परंतु तरीही कित्येक बोटींना अजून ४० दिवस नांगरूनच पडावे लागेल.

---

### युद्धकैद्यांच्या सुटकेबाबत पाकिस्तानच जबाबदार

ब्रिटनमधील एक मजूर पुढारी व पार्लमेंटचे सभासद मि. मायकेल इंग्लिश म्हणतात की, भारतात पकडून ठेवण्यात आलेल्या पाकिस्तानी युद्धकैद्याबद्दल पाकिस्तानही जबाबदार आहे. ह्या युद्धकैद्यांनी पाकिस्तानच्या संमतीनेच त्यांच्या सुरक्षिततेसाठी भारतात नेण्यात आलेले आहे. बांगला देशाला सर्वांनी मान्यता दिलेली असताना पाकिस्तान मात्र मान्यता देत नाही. अशा परिस्थितीत दुसऱ्या एखाद्या सरकारशी बोलताना जे हक्क सहजपणे प्राप्त होतात ते पाकिस्तानला मागता येणार नाहीत. स्वातंत्र्य काळापासून पाकिस्तानात हुकूमशाही राजवट होती. भारतात मात्र लोकशाही नांदत आहे. अर्थातच दोघांच्या भांडणात ब्रिटनमध्ये भारताला सहानुभूती दाखविली जाते.

---

### राष्ट्रीय बचत योजनांनी ३२५ कोटी रुपये जमविले

१९७२-७३ साली निरनिराळ्या प्रकारच्या राष्ट्रीय बचत योजनांनी लोकाजवळील शिल्लक पैसा गोळा करण्याचा उच्चांक गाठला आहे. ह्या योजनांद्वारा ३२५ कोटी रुपये गोळा करण्यात यश आले आहे. १९७१-७२ सालातील गुंतवणुकीशी तुलना करता ही रक्कम १०० कोटी रुपयांनी जास्त असून १९६९-७० सालाच्या मानाने २०० कोटी रुपयांनी अधिक आहे. गेल्या वर्षीही सरकारने ठरवून दिलेल्या दुरुस्त उद्दिष्टापेक्षा म्हणजे ३०० कोटी रुपयापेक्षा अधिक रक्कम गोळा करण्यात आली होती. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या चार वर्षांत सुमारे ८६६ कोटी रुपयांची रक्कम गोळा करण्यात आली. कार्यक्रमात ठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा ही रक्कम १०० कोटी रुपयांनी अधिक आहे. अजून एक वर्ष बाकी असल्याने राष्ट्रीय बचत योजनांच्या द्वारा १०० कोटी रुपये जमा होण्याची शक्यता वाढली आहे.

---


# दि बँक ऑफ कराड लि.

( शेड्युल्ड बँक )

रजि. ऑफिस : १५ रविवार पेठ, कराड

शाखा : कराड, मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगांव, विटा, कोल्हापूर, मलकापूर, भोर, ताकारी व संगमेश्वर.

## ठेवीवरील व्याजाचे दर

सेव्हिंग्ज ठेव ४॥%

मुदत १ ते ५ वर्षांचे वर ६॥% ते ७॥।%

ठेवींच्या इतर आकर्षक योजनांसंबंधी माहिती बँकेच्या ऑफिसात मिळू शकेल.

म. वि. खंडकर
चेअरमन

बँकिंगचे आपले सर्व व्यवहार आमच्यावर सोपवून निश्चिंत राहा

# दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., पुणे ३०

पुण्यातील एक प्रमुख सहकारी बँक

कर्जाच्या विविध योजना :—

( १ ) सभासद/नाममात्र सभासद जामीनकीवर कर्ज मिळण्याची सोय — २ वैयक्तिक जामीन.
( २ ) भाडेकरार योजनेखाली रेडिओ, सायकल, रेफ्रिजरेटर, मोटार सायकल, इत्यादि नवीन वस्तू खरेदी योजना.
( ३ ) सभासद/नाममात्र — सोने, कायम ठेव, विमा पॉलिसी, नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेट, इत्यादींचे तारणावर कर्ज मिळण्याची सोय.
( ४ ) सभासद/नाममात्र — नजर गहाण व मालतारण इत्यादींवर कर्ज मिळण्याची सोय.

कर्जाच्या इतर योजना व कायम ठेवींवरील विविध आकर्षक व्याजाच्या योजनेसाठी समक्ष भेटा.

मुख्य ऑफिस : ६१२, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे ३०. फोन : ५६२८३.

शाखा : ४८९/अ/२, पर्वती दर्शन, पुणे. फोन : २७३८६.

श्री. वं. गं. वर्वे, बी. कॉम., व्यवस्थापक — मा. म. ना. परांजपे, बी.ए.बी.कॉम.एलएल.बी., कार्याध्यक्ष — मा. भा. ग. रवडे, बी. ए., उप-कार्याध्यक्ष

## कंपनीच्या नावावर अधिकाऱ्यांची चंगळ
### आतिथ्याच्या मिषाने उधळपट्टी

कंपन्यांचे अधिकारी कंपन्यांच्या खर्चाने विमानाचा प्रवास करतात, आलीशान होटेलात चैन करतात, असे दृश्य दिसते. कंपन्यांनीच त्यांना 'एक्सपेन्स अकौंट' मंजूर केलेला असतो. पगारात ती एक प्रकारची अदृश्य वाढच असते. अधिकाऱ्यांची घरे लहान असतात, चांगली नसतात; तेव्हा धंद्याला आवश्यक असलेल्या पाहुण्याचे आतिथ्य होटेलातूनच करण्याची प्रथा आहे. सरकारही अशा खर्चाला मोठ्या प्रमाणावर मंजुरी देते. सरकारी अधिकाऱ्यांनाच कंपन्यांच्या अधिकाऱ्यांकडून फुकटात पाहुणचार मिळू शकतो; ह्या पाहुणचारात त्यांना जे जे हवे ते मिळण्याची तजवीज केली जाते.

जपानमध्ये अशा पाहुणचाराचा अतिरेक झाला आहे; त्या बाबतीत जपानी कंपनीवाल्यांनी अमेरिकन कंपनीवाल्यांनाही लाजविले आहे. पाहुण्यांच्या आतिथ्याचे वेळी यजमानांनाही चैन करायला मिळते. जपानी सरकारच्या संरक्षण खात्यावरील खर्चापेक्षा 'एक्सपेन्स अकौंट' चा खर्च दुपटीपेक्षा जास्त आहे; शिक्षणावरील खर्चापेक्षा २०% अधिक आहे. जे स्वतःच्या खर्चाने होटेलात जातात, अशा दरिद्री लोकांना बंदी करण्यासाठी होटेलांची बिले भरमसाट केली जातात. ओसाका येथील यामाटो या होटेलात दोघांच्या जेवणाचे बिल सुमारे २,००० रु. होते. चार स्कॉच व्हिस्कीचे बिल १,००० रु. वर जाते. काही होटेले कंपन्यांकडेच परस्पर बिले पाठवितात, ती बिले परस्पर दिली जातात.

एक्सपेन्स अकौंटपैकी एक पंचमांश ते चार पंचमांश बिले बोगस असतात! एका सेल्समनचे एका महिन्याचे मद्याचे बिल (३८ वेगवेगळ्या बारमधील) २५,००० रु. झाले; वास्तविक त्याने एकट्यानेच मद्य घेतलेले होते. दुसऱ्या एकाने आपल्या मुलीच्या लग्नाचा सर्व खर्च एक्सपेन्स अकौंटवर टाकला. कंपनीमधील एखाद्या मित्राच्या नावाचा उपयोग करून स्वतःच्या चैनीची व्यवस्था करण्याचेही प्रसंग घडतात. कामगारांना मात्र एक्सपेन्स अकौंटचा फायदा मिळू शकत नाही. म्हणून, तेथील एका समाजसत्तावादी खासदाराने एक्सपेन्स अकौंटवर मर्यादा घालणारे बिल जपानच्या पार्लमेंटात आणले आहे, परंतु एक्सपेन्स अकौंटवरच सरकारी अधिकाऱ्यांचीही चंगळ चालते. त्यामुळे त्या बिलाच्या अमंलबजावणीचा संभव नाही.

---

**किर्लोस्कर कमिन्सची विक्री**—किर्लोस्कर कमिन्स लि. ने सप्टेंबर १९७२ अखेर संपलेल्या वर्षी ८.८० कोटी रु. ची विक्री केली; त्यापूर्वीच्या वर्षी ७.२९ कोटी रु. ची विक्री झाली होती. ठोक नफा ९८.३७ लक्ष रु. वरून १३४.५३ लक्ष रु. गेला. निव्वळ नफा १७.१० लक्ष रु. वरून ४३ लक्ष रु. वर गेला.

## वेश्यागृहांना होटेलचे वातावरण : किफायतशीर व्यवसाय

मोठमोठ्या होटेलांत श्रीमंत लोक जसे पैसे गुंतवितात, तसे प. जर्मनीमधील कर्ट कोहल्सच्या वेश्यागृहांत गुंतवू लागले आहेत. ९% व्याजाची हमी असणाऱ्या ह्या उपक्रमात ३०० लोकांनी सुमारे ७.५ कोटी रु. गुंतविले आहेत. कोहल्सने काढलेला प्रॉस्पेक्टस गुलाबी हृदयमालिकेने सजविलेला असून ".जगातील सर्वांत जुना व्यवसाय सर्वांत निर्धोक आहे" असे त्यावर छापलेले आहे.

कैसरस्लौटर्न ह्या प. जर्मनीतील शहराजवळ ७२ 'सिंगलरूम–अँड बाथ अपार्टमेंट' असणारी एक सुंदर इमारत आहे. तेथे टेनिस कोर्ट, वीर गार्डन, नाइट क्लब, सोलेरियम, इत्यादींची सोय आहे. कर्ट कोहल्स त्या इमारतीला प्रेमदेवाचे केंद्र (इरॉस सेंटर) असे म्हणतो; बाकीचे सर्व तिला वेश्यागृह म्हणूनच ओळखतात.

कर्ट कोहल्स प. जर्मनीत व ऑस्ट्रियात अशी चार केंद्रे चालवितो; इतर युरोपीय देशांतही अशी केंद्रे उघडण्याची त्याची योजना आहे. "मी वेश्यागृहांचा दर्जा सामाजिक दृष्ट्या वरच्या पातळीवर नेला आहे." असे तो म्हणतो. आपल्या भाडेकरू मुलींच्या हिताचे तो संरक्षण करतो. मुलींना होटेलसारखे रम्य वातावरण उपलब्ध करून देऊन वेश्या व्यवसायातील गुन्हेगारी त्याला थांबवावयाची आहे. बोर्डिंग लॉजिंगसाठी प्रत्येक मुलगी त्याला रोजी १७५ रु. देते; प्रत्येक मुलगी रोजी सरासरी १,२०० ते १,६०० रु. कमविते-पण त्यांच्या कमाईत त्याची भागी नसते. मुलींच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक खोलीत गजर करणारे बटण बसविण्यात आलेले आहे. अपत्ये असणाऱ्या मुलींसाठी प्रत्येक केंद्रात नर्सरी चालू करण्यात येणार आहे.

---

**टेलिफोन अधिकाऱ्यांची अपहाराला मदत**—बरेली येथील दोन टेलिफोन एक्सचेंजमधील गैरव्यवहाराची पब्लिक अकौंट्स कमिटीने गंभीर दखल घेतली आहे. आठ गॅझिटेड आणि नॉन–गॅझिटेड अधिकाऱ्यांनी काही टेलिफोन्सचे मीटर्स जाणून बुजून नादुरुस्त राखले, त्यामुळे त्या टेलिफोन्सवरून केलेले कॉल्स नोंदले गेले नाहीत. त्याकारणाने खात्याचे २.६७ लक्ष रुपयांचे उत्पन्न बुडाले. ह्या अधिकाऱ्यांविरुद्ध करण्यात येणाऱ्या कारवाईच्या संथपणाबद्दलही कमिटीने नाराजी व्यक्त केली आहे. जंक्शन बॉक्समधील तारांशी लाइनमेनच्या साहाय्याने लुडबूड करून स्वतःच्या टेलिफोनच्या मीटरची तार दुसऱ्याच्या तारेला जोडून देण्याचे प्रकार घडतात, त्यामुळे भलत्यांचे टेलिफोन बिल वाढते.

**मध्यवर्ती सरकारची ५०० कोटी रु. ची कर्ज उभारणी**—मध्यवर्ती सरकारने १९७३–७४ मधील आपला कर्ज उभारणीचा पहिला कार्यक्रम जाहीर केला आहे. १२ मे ते १४ मे कर्ज स्वीकारले जाईल. सरकारला एकूण ५०० कोटी रु. हवे आहेत.

## आजची महिला टेनिसपटु म्हाताऱ्या पुरूष पटूला हरवू शकेल का ?

स्त्रियांनी पुरुषांची कितीही क्षेत्रात बरोबरी केली असली, तरी खेळांच्या बाबतीत त्यांना बरोबरी करता येणार नाही हे गृहीतच धरले जाते. म्हणूनच, स्त्रियांचे व पुरुषांचे असे स्वतंत्र स्वतंत्र सामने होतात. टेनिस, बॅडमिंटन, टेबलटेनिस, गोल्फ, हॉकी, इत्यादी सामने स्त्रियांचे आणि पुरुषांचे स्वतंत्र असतात. धावणे, पोहणे, इत्यादी स्पर्धाही त्या दोघांसाठी वेगवेगळ्या असतात.

ऑस्ट्रेलियाची महिला टेनिसपटु मार्गारेट कोर्ट ही सध्या यशाच्या शिखरावर विराजमान झालेली आहे. तिचे वय २० वर्षांचे आहे. तिने विंबलडेन स्त्रियांचे टेनिस आजिंक्यपद तीनदा मिळविलेले आहे, चार वेळा तिने अमेरिकेचे आजिंक्यपद मिळविलेले आहे, आणि ऑस्ट्रेलियाची तर ती ११ वेळा चॅंपियन आहे. ती १२ मे रोजी सॅन डिइगो येथे बॉबी रिग्स ह्या टेनिसपटूशी तीन सेट्सचा सामना खेळणार असून त्यातील विजेत्याला ८०,००० रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. रिग्स हा मार्गारेट कोर्टचा बाप शोभेल अशा ५५ वर्षांचा आहे. १९३९ साली त्याने विंबल्डनचे सिंगल्स, डबल्स व मिक्स्ड डबल्सचे अजिंक्यपद मिळविले होते. १९३९ मध्ये आणि १९४१ मध्ये तो अमेरिकेचा सिंगल्स चॅंपियन होता. " खेळताना त्याचा पाय मोडला, तरच त्याचा पराभव होऊ शकेल " असे तज्ज्ञांचे मत आहे " विंबल्डनचे अजिंक्यपद तीनदा पटकविणाऱ्या फ्रेड पेरीच्या मतें मार्गारेटला एक गेम सुद्धा घेता येणार नाही. " माझ्या तीस-पस्तीस वर्षांपूर्वीच्या खेळावरून बांधलेले हे अंदाज आहेत, " अशी बॉबी रिग्सची प्रतिक्रिया आहे.


---

## भरती-ओहोटीच्या सहाय्याने वीज तयार करण्याचा आराखडा


जगाची वाढत जाणारी लोकसंख्या लक्षात घेता इंधनाचा पुरवठा कठीण होत जाणार असा इशारा जाणकार देत आहेत. आधुनिक जीवन इंधनाच्या पुरवठ्यावर सर्वस्वी अवलंबून असल्याने आतापासूनच त्याच्या पुरवठ्यासाठी पर्याय शोधून काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. विजेच्या निर्मितीसाठी समुद्राच्या भरती-ओहोटीच्या पाण्याचा उपयोग करून घेण्याची कल्पना ह्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. भारताला विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला आहे. त्यावर अनेक ठिकाणी फार मोठ्या भरती-ओहोटीचा खेळ चालू असतो. अशा ठिकाणांचा अभ्यास करून कोणत्या ठिकाणी भरती-ओहोटीच्या शक्तीचा उपयोग करून विजेची निर्मिती करणे शक्य आहे ह्या संबंधीचा एक आराखडा तयार करण्यात आला आहे. ही माहिती लोकसभेत देताना शास्त्र व तंत्र खात्याचे मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् म्हणाले की राष्ट्रीय, शास्त्रीय व तांत्रिक समिती देशाच्या किनाऱ्यावरील अशा जागांचा तपशीलवार विचार करीत आहे.

★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

विजय पंपस् कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,
त्यांस "विजय" पंपाची
आवश्यकता आहेच.



कारखानदार—
फोन : २३२
तार : Vijayplow

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

# आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा असा बेत चालला असेल ना तुमचा ?



# त्यासाठीं आमच्या संचित ठेव योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !

**तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेट साठी या योजनेखाली बचत करा.**
**मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !**

खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
| --- | --- | --- |
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

729 Mar

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१९, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No, 17‍३

वर्ष २९ | पुणे, बुधवार, १६ मे, १९७३ | अंक १०

## उन्हाळी, खरीप, रबी हंगामात...

### भरघोस पिके काढून उत्पादनवाढीत
### महाराष्ट्र अग्रेसर ठरवू





## उत्पादन वाढ करून
## सर्वांगीण विकास साधू

प्र. प्रि. संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई.


Swastik FOAM

cosy
sitting
pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

IMPORT
SUBSTITUTE
GADRE KEYS



ALL TYPES AS
PER SPECIFICATION

GADRE BROTHERS MADHAVNAGAR (MAHARASHTRA)
PHONE NO. 2318 GRAM: "SEWA"

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह
लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "
—पं. जवाहरलाल नेहरू

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह
बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

सामुदायिक हितासाठी झटणारी
आगळी बँक

☆ अर्थ ☆

बुधवार, १६ मे, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## जगातील बहुसंख्य तरुणांचे भवितव्य निराशामय आहे

संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या आर्थिक आणि सामाजिक मंडळाच्या पुरस्काराने संघटनेच्या सरचिटणिसांनी जगातील तरुणांच्या भवितव्याच्या दृष्टीने सामाजिक पार्श्वभूमीची पाहणी केली आहे. ह्या पाहणीचा १५० पानांचा अहवाल आता प्रसिद्ध करण्यात आला आहे. तरुणांच्या प्रश्नाबद्दल आस्था असणाऱ्या व त्यांच्यासाठी काम करणाऱ्या संस्थांच्या तज्ज्ञांची ह्या कामी मदत घेण्यात आली होती. त्यामुळे प्रत्यक्ष परिस्थितीशी परिचय असल्याचा भक्कम आधार अहवालाला लाभला आहे. अहवालात असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला आहे की जगातील तरुणांचे भवितव्य फारसे आशाजनक नाही. त्यांना चांगल्या आयुष्यक्रमाची प्राप्ती करून द्यावयाची असेल तर आर्थिक विकासाला चालना देण्यात आली पाहिजे आणि सामाजिक रचनेत बदल घडवून आणले पाहिजेत. हे बदल असे असले पाहिजेत की त्यांच्यामुळे संपत्तीचे उत्पादन झाले पाहिजे आणि त्याचबरोबर देशातल्या देशात आणि देशादेशात उत्पादित संपत्तीची वाटणी अधिक न्याय पद्धतीने झाली पाहिजे. असे बदल घडवून आणले नाहीत तर जगातील तरुणांचा भविष्यकाल निराशेने ग्रासून जाईल. १९८० च्या सुमारास जगातील तरुण लोकांची संख्या २४९ कोटीच्या घरात जाईल. एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण ५५ टक्के इतके होईल. ( २४ वर्षे वयाच्या खालील लोकांना तरुण म्हणून मानण्यात आले आहे. ) महत्त्वाची गोष्ट अशी की तरुणांच्या ह्या प्रचंड संख्येपैकी ६० टक्के तरुण आर्थिक विकासासाठी धडपड करणाऱ्या देशातील असतील.

अहवालात आणखी असे म्हटले आहे की जगाच्या एकूण लोकसंख्येपैकी तीन चतुर्थांश लोक दारिद्र्याने पिडलेले आहेत. जगाच्या उत्पन्नापैकी अवघे १० टक्के उत्पन्न त्यांच्या वाट्याला येते. त्यांच्यापैकी अनेकांना शिक्षण मिळण्याची, अथवा पोटापाण्याची सोय करणारी नौकरी मिळण्याची शक्यता सुद्धा नसते. इतकेच काय, पण त्यांना योग्य असा आहार अगर वैद्यकीय मदतही मिळत नाही. पुष्कळशा विकसनशील देशांतील तरुण वर्ग अतिशय गरीब असतो. त्यातल्या अनेकांना त्यांच्या सामाजिक स्थानामुळे योग्य संधी मिळणे अशक्य झालेले असते. ह्या तरुणांपैकी फारच थोड्यांना अपवादभूत असे आर्थिक सामर्थ्य आणि त्यामुळे उपलब्ध होणाऱ्या सुखसोयी मिळत असतात. अनेक तरुणांच्या मनात सांपत्तिक विषमतेमुळे उत्पन्न झालेल्या कोंडीचे शल्य सतत बोचत असते. त्यामुळे प्रचलित समाजातील कोणतीच मूल्ये आणि संकेत त्यांना मान्य असत नाहीत. शिवाय त्यांची आणखीही एक तक्रार असते. वयात आलेली मोठी माणसे ज्या ध्येयांची व मूल्यांची तरफदारी करीत असतात त्याप्रमाणे ती वागत नाहीत असा तरुणांचा आरोप आहे. अलीकडे सर्व जगभर अनेक देशांत तरुणांची निदर्शने झाली. सध्याच्या जागतिक सामाजिक परिस्थितीचा तरुणांच्या मनावर काय परिणाम होत आहे त्याची ही खूणच समजली गेली पाहिजे. प्रचलित समाजात मान्यता पावलेल्या अनेक संस्था आणि वागणुकीचे आदर्श तरुणांना मुळीच मान्य नाहीत असेच ह्या निदर्शनावरून दिसून येते. त्यातच भर म्हणून अनेक देशांतून शिक्षणाची परिस्थिती तरुणांच्या गरजांना व आकांक्षाना साद न देणारी अशी झालेली दिसून येत आहे.

---

## बिगर-बँकिंग कंपन्यांकडील ठेवी

मार्च, १९७० अखेर २,२११ बिगर-बँकिंग जॉइंट स्टॉक कंपन्यांनी पत्रके भरून पाठविली. त्यांपैकी १५३५ व्यापारी / औद्योगिक ( बिगर-आर्थिक ) कंपन्या आणि ४५० आर्थिक कंपन्या ह्यांच्याकडे ३४६ कोटी रु. च्या ठेवी आणि ठेवीत न गणती केलेली २८७ कोटी रु. ची कर्जे होती.

**ठेवींची आणि कर्जांची खाती आणि त्यातील रकमा**

| | १९६२ | १९६९ | १९७० |
|---|---|---|---|
| खात्यांची संख्या | १,७८,००० | ६,२४,००० | ७,१४,००० |
| रकम ( कोटी रु. ) | १३५·५० | ५९३·७० | ६३३·३० |

२२२१ कंपन्यांपैकी ३७० कंपन्यांकडे एकूण ठेवींच्या ८३·३% ठेवी आणि कर्जांच्या ८०·२% कर्जे होती.

महाराष्ट्रातील कंपन्यांकडे ३०८ कोटी रु. च्या ठेवी व कर्जे होती; तामीळनाडूतील कंपन्यात ७८·१० कोटी रु. ची होती. पश्चिम बंगालमधील कंपन्यात ६७ कोटी रु. ची होती. म्हणजे, ह्या तीन राज्यातील कंपन्यांकडे एकूण ७१·६% ठेवी व कर्जे होती.

---

### प्राप्ती-कराच्या वसुलीवर टाकण्यात आलेला प्रकाश

राज्यसंस्थेला कारभार चालविण्यासाठी अनेक प्रकारचे कर बसवून ते वसूल करावे लागतात. त्यांत अप्रत्यक्ष कर आणि प्रत्यक्ष कर असे दोन भाग पडतात. अप्रत्यक्ष करांचा बोजा सर्वसामान्य लोकांना कुरकुरत का होईना, पण पेलावाच लागतो. अविकसित देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणताना असे कर बसवावेच लागतात; त्याशिवाय विकासकार्यासाठी लागणारा पैसा गोळा करणे कठीण जाते असा अर्थशास्त्रज्ञांचा अभिप्राय आहे. प्रत्यक्ष करांचे ओझे मात्र कोणत्याही देशातील धनिक गणल्या जाणाऱ्या थोड्या लोकांनाच वाहावे लागते. भारतात ह्या प्रकारच्या करांचे प्रमाण फार आहे; त्यांतही मोठ्या उत्पन्नावर बसविण्यात येणाऱ्या प्राप्ती कराचे प्रमाण कर देणाराचे कंबरडे मोडण्याइतके मोठे आहे असा युक्तिवाद करण्यात येतो. हे प्रमाण कमी केले, निदान सह्य केले, तर कर चुकविण्याची वृत्ती कमी होऊन काळ्या पैशाचे एक मोठे उगमस्थान नष्ट होईल असेही सांगण्यात येते. प्राप्तीवरील करांची आकारणी व वसुली ह्या बाबतीत खरी परिस्थिती काय आहे ह्याविषयी लोकसभेच्या पब्लिक अकौंटस् कमिटीने आपल्या अहवालात मोलाची माहिती दिली आहे. प्राप्ती कर खात्याचे काम गेल्या काही वर्षांत सुटसुटीत आणि सोपे करण्यात आलेले असल्याने प्राप्ती कर अधिकाऱ्यांच्या संख्येत करण्यात आलेल्या वाढीला कमिटीने विरोध दर्शविला आहे. त्यानंतर प्राप्तीकरासंबंधीची काही आकडेवार माहिती देताना अहवालात असे म्हटले आहे की १९७०-७१, साली प्राप्तीकराची एकूण वसुली ३३ टक्क्यांनी वाढली.

१९६७–६८ साली ६३६·४० कोटी रुपये प्राप्तीकर वसूल करण्यात आला होता. वसुलीचा आकडा १९७०–७१ साली ८४३·६९ कोटी रुपयापर्यंत वाढला. पण त्याचबरोबर कर वसूल करण्यासाठी होणारा खर्चही वाढला. ११·७० कोटी रुपयांवरून हा खर्च १८·६९ कोटी रुपयापर्यंत वर गेला. टक्केवारीच्या भाषेत ही वाढ ६१ टक्के झाली. प्राप्तीकरास पात्र असलेले जितके लोक आहेत त्यांपैकी ११ टक्के लोकांकडून प्राप्तीकरापैकी ७१ टक्के कर गोळा करण्यात आला. म्हणून अशा लोकांवरच प्राप्तीकर अधिकाऱ्यांनी आपले लक्ष केंद्रित केले पाहिजे. मोठमोठी उत्पन्न असणाऱ्या लोकांची त्यांनी कसून चौकशी केली पाहिजे. अशा लोकांकडून उत्पन्न कमी दाखविले जात असते आणि कर चुकविला जात असतो. म्हणून मोठ्या प्रमाणावर कर चुकविणाऱ्यांना आपल्या जाळ्यात पकडण्यासाठी करपात्र व्यक्तींची तपशीलवार पाहणी करण्यात आली पाहिजे. अहवालाच्या वर्षी प्राप्तीकर चुकविण्यासाठी उत्पन्न कमी दाखविण्याची प्रकरणे कमी उजेडात आली. १९६७–६८ साली अशी ३२,९५१ प्रकरणे उघडकीस आणण्यात आली होती. १९७०–७१ साली अशी २३,६२५ प्रकरणे उघडकीस आणली गेली. तरीही खोट्या उत्पन्नाचा आकडा मात्र ४०·१९ कोटीवरून ७०·६९ कोटीपर्यंत वाढला. त्यावरून असा निष्कर्ष सहजच निघतो की मोठ्या उत्पन्नाच्या गटातील लोकांकडून कर चुकविण्याची चलाखी सतत चालू असते. तेव्हा उत्पन्न खोटे दाखविण्याची शक्यता ज्या प्रकरणात अधिक वाटत असेल त्या प्रकरणाबाबत खटले भरण्याची आवश्यकता पुन्हा एकदा सिद्ध होते. परंतु १९७०–७१ साली ७५ प्रकरणांत प्रत्येकी ५ लाखांचे कमी उत्पन्न दाखविले जाण्याची शक्यता असताना फक्त एकाच प्रकरणात खटला दाखल करण्यात आला.

---

### दि रत्नाकर बँक लि. ची सर्वांगीण प्रगति

दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर, ची २९ वी वार्षिक सभा शनिवार, दि. २८ एप्रिल १९७३ रोजी भरली होती. अध्यक्षस्थानी बँकेचे चेअरमन श्री. अप्पासाहेब पायगोंडा पाटील, बी. ए., एलएल. बी., हे होते. त्यांनी आपल्या भाषणात बँकेच्या प्रगतीचा आढावा घेतला. १९७२ साली बँकेला २,०३,०५३ रु. नफा झाला. १९७१ च्या तुलनेने, नफा ७२ हजार रु. नी वाढलेला आहे. बँकेचे वसूल भाग भांडवल ५,०३,३०० रु. असून रिझर्व्ह फंड ५,१७,००० रु. आहे, आणि इतर रिझर्व्हज मिळून बँकेचे स्वतःचे भांडवल ११,४३,९७२ रु. एवढे आहे. बँकेचे मागणी न केलेले भाग भांडवल ५,०३,३०० रु. आहे. अहवालाचे वर्षी ठेवीत ७२ लक्ष रु. ची वाढ होऊन ठेवींची रकम २,४४,६२,३९८ रु. झाली आणि बँकेचे खेळते भांडवल सुमारे ३ कोटी रु. पर्यंत पोचले. वार्षिक सभेने, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मान्यतेने जाहीर केलेल्या ५% डिव्हिडंडला मान्यता दिली. १९–४–१९७३ अखेर एकूण ठेवी २,७१,७४,००० वर गेल्या असून एकूण कर्जे १,६३,२,००० रु. ची आहेत. १९७० व १९७१ मध्ये केलेल्या शाखाविस्तारानंतर १९७२ मध्ये दोन वर्षांत उघडल्या गेलेल्या शाखांचा कारभार स्थिरस्थावर व शिस्तबद्ध करण्याकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. १९७३ मध्ये, नजीकच्या म्हैसूर राज्यात काही शाखा उघडण्यात येतील. बँकेच्या सध्या १२ शाखा आहेत. रत्नाकर बँकेने केलेली ही सर्वांगीण प्रगती उल्लेखनीय आहे. क्रमपद्धतीने निवृत्त होणारे चारही संचालक बिनविरोध निवडून आले, ह्यावरून संचालकांनी कमविलेल्या विश्वासाची कल्पना येते.

---

**लोकसभेत महाराष्ट्राला तीन जास्त जागा**—येत्या लोकसभेत सध्याच्या ५२५ ऐवजी ५४५ सदस्य असतील. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश ह्यांस प्रत्येकी तीन अधिक जागा मिळतील; प. बंगाल, गुजरात आणि राजस्थान ह्यांच्या जागांत प्रत्येकी दोनची भर पडेल. बिहार, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, म्हैसूर, ओरिसा, केरळ आणि हरियाणा ह्यांना प्रत्येक एक जागा जास्त मिळेल.

### लांच देणारावरही बारीक लक्ष पाहिजे

सेंट्रल व्हिजिलन्स कमिशनने आपला १९७१–७२ सालाचा अहवाल लोकसभेला सादर केला आहे. भ्रष्टाचार आणि लाचलुचपत ह्या रोगांनी देशातील जीवन ग्रस्त झालेले आहे. ह्याचा अनुभव कमी-अधिक प्रमाणात सर्वांनाच येत आहे. पण हे प्रकार थांबविण्याची कार्यक्षम उपाययोजना अद्याप सापडलेली नाही. कमिशनने असल्या प्रकारांवर नजर ठेऊन ते थांबविण्यासाठी शिफारसी करावयाच्या असतात. कमिशनने आपल्या १९७०–७१ च्या अहवालातही सरकारी नौकरांत भ्रष्टाचार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालत असल्याचे नमूद केलेले आहे. ह्या परिस्थितीत अहवालाच्या वर्षी फरक पडलेला नाही असा अभिप्राय कमिशनने व्यक्त केला आहे. कमिशनच्या मताने लांच घेणारावर जसे लक्ष ठेवले जाते तसेच लक्ष लांच देऊ करणारावरही ठेवले जात नाही; आणि त्यामुळे अशा प्रकारांना आळा बसलेला नाही. लांच-लुचपतीचे प्रकार कमी करण्यासाठी अगर नष्ट करण्यासाठी सरकारी अगर निमसरकारी नौकरांवर लक्ष ठेवण्यात येते. प्रत्येक वेळी पैसेच घेतले जातात असे नाही. पैशाव्यतिरिक्त इतर अयोग्य मार्गांनेही अधिकारी आपला फायदा करून घेतात. लांचलुचपतीच्या कोणत्याही प्रकारात अधिकाऱ्यांना आमिष दाखविणाऱ्या व्यक्ती अगर संघटना मात्र कधीही उजेडात येत नाहीत. कारण, सरकारची कारभार यंत्रणा ह्या कामासाठी नीट सज्ज करण्यात आलेली नाही. सध्याची आर्थिक परिस्थिती अशी आहे की काही व्यक्ती अगर संघटना ह्यांच्याजवळ अलोट पैसा आहे आणि लांच देण्यासाठी त्याचा मुक्त हस्ताने वापरही करण्यात येतो.

त्यांच्या जवळील ह्या कारणासाठी वापरावयाचा पैसा कमी होत जाण्याऐवजी वाढत जाण्याचाच संभव आहे असा अभिप्राय कमिशनने व्यक्त केला आहे. अर्थातच सरकारी नौकरांना सतत प्रलोभने दाखविण्याने त्यांचे सामर्थ्य दुणावले असण्याची शक्यता आहे. म्हणून कमिशनने असे सुचविले आहे की लांच घेणाराबरोबरच ती देणारावरही करडी नजर ठेवण्यात आली पाहिजे. त्याच-प्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांचा ज्या ज्या ठिकाणी लोकांशी संबंध येतो त्या त्या ठिकाणची कार्यपद्धति गुंतागुंतीची असेल तर ती अधिक सोपी करण्यात आली पाहिजे. नाहीतर कार्य-पद्धतीच्या किचकटपणामुळे लांच देणे आणि घेणे ह्या दोन्ही बाबतीत अधिक संधी मिळू शकतात. नंतर अयोग्य व्यवहाराच्या नेमक्या जागी बोट ठेवणे त्यामुळे अशक्य होते. कमिशनने अशी सूचना केली आहे की सरकारी खाती, संघटित संस्था, राष्ट्रीयी-करण झालेल्या बँका इत्यादींमधील व्यवहारांवर नजर ठेवण्यासाठी अधिक समर्थ यंत्रणा उभी केली पाहिजे. कमिशनने केलेल्या शिफारसी अंमलात आणण्याच्या कामी मध्यवर्ती सरकारची काही खातीही फार विलंब लावतात. ज्या प्रकरणात कमिशनने शिस्तभंगाबद्दल कारवाई करण्याची शिफारस केली होती अशा प्रकारणी तीन तीन वर्षे होऊन गेली तरी काहीच हालचाल झालेली दिसत नाही. १९७१–७२ च्या अहवालात अनेक राजपत्रित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची शिफारस करण्यात आली होती. ५११ प्रकरणी कमिशनने सूचना केल्या होत्या. त्यापैकी ३९८ प्रकरणे राजपत्रित अधिकाऱ्यांशी संबंधित होती आणि ६४ इतर अधिकाऱ्यांविषयी होती.

---

### विजेच्या टंचाईचा खताच्या उत्पादनावर परिणाम

उत्तर भारतात जाणवत असलेल्या विजेच्या टंचाईने खताच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिआच्या नांगल येथील खत कारखान्याला अपुरा विजेचा पुरवठा होऊ लागल्यामुळे कारखान्यांतील उत्पादन दोन तृति-यांशांनी कमी करावे लागले आहे. कारखान्याची उत्पादनक्षमता रोजी १,००० टनांची आहे. परंतु भाक्रा विद्युत्केंद्रातून होणाऱ्या पुरवठ्यात कपात करण्यात आल्यामुळे दररोज फक्त ३०० टन खताचे उत्पादन करण्यात येऊ लागले आहे. त्यातही एक बाब अधिक चिंतेची आहे. भारतात अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करणारी जी राज्ये आहेत त्यांतील शेतकरी जे खत वापरतो त्याच्याच उत्पादनात नेमकी घट झालेली आहे. त्यामुळे उत्तर भारतामधील राज्यांतील अन्नधान्याच्या उत्पा-दनावर वाईट परिणाम होऊन खरीप हंगामातील उत्पादन घटण्याची शक्यता उघड दिसत आहे. कारण, खताचा योग्य पुरवठा झाल्याशिवाय पेरणीच करता येणे अशक्य होऊन बसेल. कारखान्याला भाक्रा केंद्रातून १६४ मेगॅवॅट विजेचा पुरवठा करण्यात येत असे. परंतु आता फक्त ६० मेगॅवॅट वीज पुरविण्यात येत आहे. किंमतीच्या दृष्टीने पाहता कारखान्यात रोज ५ लाख रुपयांच्या खताचे उत्पादन होत असे. आता रोज अवघी २ लाख रुपयांची खतेच निर्माण होत आहेत. भाक्रा धरणाच्या अधिकाऱ्यांशी विजेच्या पुरवठ्यासंबंधी जो करार करण्यात आला आहे त्यातील शर्तीप्रमाणे विजेच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे कारखान्याचे जे नुकसान होईल ते सर्वच्या सर्व भाक्रा वीज केंद्राला भरून द्यावे लागणार आहे. कारखान्यावर त्याचा परिणाम होणार नाही.

---

### शुभलक्ष्मींना दिल्ली विद्यापीठाची एल एल. डी.

दिल्ली विद्यापीठाने सुवर्णमहोत्सवाच्या कार्यक्रमात १५ मे रोजी सुप्रसिद्ध गायिका सौ. शुभलक्ष्मी ह्यांना एल एल. डी. ही सन्मानाची पदवी अर्पण केली. कर्नाटक संगीताच्या त्या अध्वर्यू आहेत. मिराबाईंच्या भजनांनी त्यांनी उत्तर-दक्षिण भारतीय जवळ आणण्याची कामगिरी केली आहे. तामीळ, तेलगू आणि कन्नड गाण्यांप्रमाणे त्या आता तुकारामाचे अभंग आणि तुळसीदासाच्या रचनाही म्हणतात. युनायटेड नेशन्सच्या रौप्य-महोत्सवाच्या वेळी त्यांना गायनासाठी खास निमंत्रण होते.

## टंचाई आणि महागाईमुळे बाहेर जेवून येण्याची प्रवृत्ती वाढली

गेल्या काही दिवसांत मुंबईतील कुटुंबांत बाहेर जेवण घेण्याची वृत्ती वाढलेली दिसून येत आहे. मध्यमवर्गात ही प्रथा तशी होतीच. घरकामाच्या गाड्याला जुंपलेल्या गृहिणीला विश्रांति देण्याचा आणि थोडीशी चैन करण्याचा हा प्रकार आहे. पण, शहरात अन्नधान्याची व इतर खाद्यपदार्थांची टंचाई भासू लागल्यापासून अधिकाअधिक कुटुंबे मुलाबाळांसह बाहेर जेवून येऊ लागली आहेत. मुंबईत मध्यम वर्ग व वरिष्ठ मध्यम वर्ग ज्या भागांतून राहतो तेथील जेवणघरे आता गिऱ्हाइकांनी भरलेली दिसतात. टेबल रिकामे नसेल तर लोक वाट पाहात तिष्ठत उभे राहण्यासही तयार असतात. धान्याच्या काळ्या बाजारातील किंमती त्यांना परवडत नसाव्यात. अर्थात बहुतेक कुटुंबे पूर्ण जेवण घेत नाहीत. ज्याला थाळी अगर राइस प्लेट म्हणतात त्यावरच आपला गुजाराण करतात. मोजके पदार्थ असलेल्या अशा थाळ्यांना दीड ते दोन रुपये पडतात. बहुतेक रेस्टॉरॉं चांगला धंदा करीत आहेत. त्यातही उडपी रेस्टॉरां विशेष लोकप्रिय झालेली दिसतात. त्याशिवाय कॉफीपानगृहे आणि नास्ता पुरविणारी दुकाने ह्यांच्यातही अधिक गर्दी होऊ लागली आहे. भोजनगृहांनी अद्याप दर वाढविलेले नाहीत. पावासारखा सर्वांस आवडणारा पदार्थही मिळेल ह्याचा भरवसा राहिलेला नाही. शिवाजी पार्क भागातील प्रत्येक १० कुटुंबांपैकी ६ कुटुंबे बाहेर जेवतात असा अंदाज आहे. रेस्टॉरां संघटनेच्या एका प्रमुखाने असा अभिप्राय व्यक्त केला आहे की गिऱ्हाइके वाढली म्हणून नफा वाढला असे मात्र नाही. त्याच्या मते अपुऱ्या पुरवठ्यामुळे मालकांना काळ्या बाजारात माल घ्यावा लागत आहे. अर्थात नफा कमी होत आहे.

---

## हातमाग विणकरांना बिनव्याजी कर्जे मिळणार

तामीळनाडूमधील विणकरांचा धंदा सुताच्या टंचाईमुळे अडचणीत सापडला होता त्यामुळे अनेक विणकरांवर बेकारी ओढवली होती. ह्या अडचणीतून त्यांना तारून नेण्यासाठी तामीळनाडूचे मुख्यमंत्री श्री. करुणानिधी ह्यांनी अशी घोषणा केली आहे की राज्यांतील विणकरांना बिनव्याजी कर्जे देण्यासाठी १ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. प्रत्येक विणकराला १०० रुपये कर्ज देण्यात येणार आहे. १९७३ च्या ऑगस्ट-पासून दरमहा १० रुपयेप्रमाणे विणकरांनी कर्जाची फेड करावयाची आहे. तामीळनाडू राज्यांतील विणकरांची संख्या सुमारे ३ लाख आहे. सुताच्या टंचाईमुळे सर्वच विणकर संकटात सापडले असले तरी त्यातल्या त्यात बारीक सुताची टंचाई विशेष जाणवत आहे.

---

## अनेक अविकसित देशांना अवर्षणाचा तडाखा

ह्या वर्षी चारी खंडात पसरलेल्या अनेक अविकसित देशांना अवर्षणाचा तडाखा बसला आहे. अर्थातच त्यांनी आजपर्यंत कधीही अनुभवली नव्हती अशा अन्नधान्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागत आहे. तसे म्हटले तर हवेच्या दृष्टीने अति उष्ण अगर अति थंड अशा जगाच्या भागाला मधून मधून पर्जन्याची अवकृपा भोवते. कधी ह्याच भागात पुराचा हाहाःकारही थैमान घालतो. पण, यंदा हवामानाच्या लहरीपणाचा वरवंटा जगाच्या दूरदूरच्या भागावरही फिरला आहे. त्यामुळे आधीच बेताचे उत्पादन असलेल्या शेतीची विपन्न अवस्था झाली आहे आणि मदतीच्या कार्याला खूप ताण पडला आहे. मध्य अमेरिका, आफ्रिका, भारत आणि आशियातील इतर कांही देश दुष्काळाच्या आपत्तीत सापडले आहेत. लक्षावधी लोकांना उपासमार सहन करावी लागत आहे. भमध्य समुद्रातील सायप्रस बेटसुद्धा अवर्षणाच्या तडाख्यातून सुटलेले नाही. गेल्या ८० वर्षांत झाला नव्हता इतका कमी पाऊस ह्या वर्षी तेथे पडला. त्यातच हिवाळी गव्हाचे पीकही संपूर्ण बुडाले आहे. अविकसित देशांतून गेली दोन वर्षे अन्नधान्याचे दरडोई उत्पादन घटत चालले होते. त्यातच अपुऱ्या पावसाची भर पडली. परिणामी अन्नधान्याच्या उत्पादनात १९७२ साली १ टक्याने घट झाली. परंतु ह्याच काळात लोकसंख्येची वाढ मात्र ४ टक्याने झाली. भारतात तर दुष्काळाने कहरच केला आहे. सुमारे २० कोटी लोक प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीत्या दुष्काळाने पीडित झालेले आहेत. २० कोटी लोक म्हणजे अमेरिकेच्या जवळ जवळ लोकसंख्येइतके. असा दुष्काळ कित्येक वर्षांत पडलेला नाही.

---

**भारतातील मिशनऱ्यांना परदेशी साहाय्य**— ख्रिस्ती मिशनरी आणि ख्रिस्ती संस्था ह्यांना परदेशांतून १९७० साली ३३·४३ कोटी रु. आणि १९७१ साली ४७·६६ कोटी रु. आले असावे, असे राज्यसभेत सरकारतर्फे सांगण्यात आले. प्रागतिक कायदे आणि लोकशाही ह्यांना खीळ घालण्याकडे ह्या मदतीचा उपयोग केला जातो, ह्याबद्दल सरकारकडे निश्चित अशी माहिती नाही, असेही सांगण्यात आले. रक्कम मिळणारांवर तिचा हिशेब देण्याची किंवा माहिती सांगण्याची कायदेशीर जबाबदारी नाही.

**नोबेल पारितोषकाची रक्कम वाढली :** डायनामाइटचा संशोधक आल्फ्रेड नोबेल हा १८९६ मध्ये मरण पावला. त्याने केलेल्या विश्वस्त निधीतून नोबेल पारितोषिके देण्यात येतात. निधीची रक्कम गुंतविण्याच्या अटी १९५३ मध्ये सैल करण्यात आल्या, तेव्हापासून पारितोषकांची रक्कम २००%ने वाढली आहे. गेल्या वर्षीच्या विजेत्यांना प्रत्येकी ४४,००० डॉलर्स (३·१ लक्ष रु.) मिळाले. यंदा ४६,००० डॉलर्स (३·७ लक्ष रु.) मिळतील.

## " डिझेल इंजिनांची मागणी आम्ही पुरी करू; आयात नको "

### इंडियन डि. इं. मॅन्यु. असोसिएशनचे आश्वासन : सरकारचा प्रतिसाद

डिझेल इंजिन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनतर्फे एक शिष्टमंडळ असोसिएशनचे उपाध्यक्ष राजकोटचे श्री. उमाकांत पंडित यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच भारत सरकारचे जॉईंट कमिशनर ( मायनर इरिगेशन ) यांना भेटले. देशातील टंचाईची परिस्थिती लक्षात घेता धान्योत्पादनासाठी निरनिराळ्या राज्यांतून डिझेल इंजिनांची वाढती मागणी येणार असल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. ही मागणी पुरविण्याची कुवत भारतीय डिझेल उद्योगधंद्यात आहे आणि देशातील इंजिनांचे उत्पादन वाढवून ही मागणी आम्ही पुरी करू, यासाठी इंजिनांची आयात करण्याची जरूरी नाही, असे आश्वासन डिझेल इंजिन कारखानदारांतर्फे सरकारला देण्यात आले. कोणत्याही कारणाने परदेशातून डिझेल इंजिनांची आयात करण्याचा प्रयत्न सरकारने करू नये आणि अशी मागणी कोणाकडूनही आली तरी त्यासंबंधी असोसिएशनशी चर्चा न करता काहीही निर्णय घेऊ नये अशी विनंती असोसिएशनतर्फे करण्यात आली. श्री. जैन यांनी ही विनंती मान्य केली.

या सभेत याखेरीज डिझेल इंजिनांचे उत्पादन वाढविण्यासाठी कारखानदारांना येत असलेल्या अडचणी, निरनिराळ्या राज्यसरकारांच्या खरेदी धोरणातील सुसूत्रता, डिझेल इंजिनांना मान्यता कशी द्यावी, भारतीय मानक संस्थेची मान्यता यासाठी आवश्यक आहे काय, अशा अनेक गोष्टींचाही ऊहापोह करण्यात आला. या चर्चेस भारतातील सुमारे प्रमुख १२ डिझेल इंजिन उत्पादक हजर होते.

---

### इंडिअन एअरलाइन्सचे परदेशीय चलनाचे उत्पन्न

इंडिअन एअरलाइन्सचे ह्या वर्षीचे परदेशीय चलनातील उत्पन्न १२ कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता दिसत आहे. गेल्या वर्षी १० कोटी रुपयांचे उत्पन्न झाले होते. परदेशातून येणारे प्रवासी एअरलाइन्सच्या विमानाने अधिकाधिक प्रवास करू लागले आहेत त्याचा हा परिणाम असावा. एअरलाइन्स अधिक विमाने मिळविण्याच्या खटपटीत आहे. ती यशस्वी झाल्यास थायलँड, मलेशिआ आणि सिंगापूरसारख्या नव्या शेजारी देशांना एअरलाइन्सची विमाने जातील. सध्या बांगला देश, नेपाळ व सीलोन ह्या देशांना एअरलाइन्सची विमाने जात असतात. ब्रह्मदेश आणि अफगाणिस्थान ह्या देशांना विमाने जात असत. परंतु सध्या हे दोन्ही मार्ग तात्पुरते रद्द करण्यात आले आहेत.

---

**मोटार गाड्यांपैकी ३५% कोटा टॅक्सींना** — आतापावेतो वार्षिक ४७,००० वाहनांपैकी फक्त ४,००० इतकाच कोटा टॅक्सीजसाठी असे. कोट्याचे प्रमाण वाढविल्यामुळे टॅक्सीमध्ये दरसाल १४,७५० ची भर पडेल. त्यांपैकी शेकडा ५ टक्के टॅक्सी इच्छुक अशा मॅट्रिक किंवा इतर शिक्षित बेकारांसाठी राखून ठेवण्यात येतील. खासगी गाडी दिवसाकाठी सरासरीने फक्त अडीच तास वापरली जाते; बाकीचा वेळ ती बहुधा रस्त्यावरच पार्क केलेली असते. ( तवेले फारच थोडे असतात ) ह्या उलट, टॅक्सी एकावेळी तीन ते चार माणसांची वाहतूक करून दिवसाकाठी सरासरीने १६ तास धावते.

**१९७५ : पवित्र वर्ष**—१९७५ हे पवित्र वर्ष गणले जावे, अशी पोप सहावे पॉल ह्यांनी घोषणा केली आहे. त्या वर्षी सबंध जगातून दशलक्षावधी रोमन कॅथॉलिक रोमची यात्रा करतील. सन १३०० मध्ये पोप आठवे बेनिफेस ह्यांनी ख्रिस्ताचे प्रेषित पीटर आणि पॉल ह्यांच्या थडग्यांना भेट देण्यासाठी असेच आवाहन केले होते, त्यानंतरचे हे २५ वे आवाहन आहे.

**पाकिस्तान्यांचे कॉमनवेल्थ नागरिकत्व रद्द होणार :** बांगला देशाला ब्रिटनने मान्यता दिली, त्याच्या निषेधार्थ पाकिस्तान गेल्या वर्षी कॉमनवेल्थमधून बाहेर पडला. तेव्हा, ब्रिटनमधील सर्व पाकिस्तान्यांचे कॉमनवेल्थ नागरिकांचे हक्क काढून घेणारे बिल पार्लमेंटमध्ये मांडण्यात येणार आहे. सरकारी कायद्याप्रमाणे ज्यांना ब्रिटिश नागरिकत्व मिळू शकेल आणि जे घेऊ इच्छितील, त्यांची गोष्ट वेगळी. ह्यापुढे पाकिस्तानातून ब्रिटनमध्ये येणारेही परकीय समजले जातील.

**एअर इंडियाला १·३४ कोटी रु. तोटा**—एअर इंडियाला १९७२–७३ मध्ये १·३४ कोटी रु. तोटा झाला असल्याचे कच्च्या हिशेबावरून दिसून आले आहे. गेल्या वर्षी १·६६ कोटी रु. तोटा झाला होता. एअर इंडियाने १९७२–७३ मध्ये ५,०४,७०० उतारूंची वाहतूक केली; म्हणजे वाहतूक १८·२% ने वाढली. लोड फॅक्टर सुधारून ४९·४% चा ५१% झाला. पेट्रोलचा खर्च ३ कोटी रु. नी वाढला नसता तर एअर इंडियाने १·५ कोटी रु. नफा दाखविला असता. एअर इंडियाच्या पंचवार्षिक योजनेत ८२ कोटी रु. ची जेट विमानांची खरेदी समाविष्ट आहे.

**गिरनार स्कूटर्स**—गुजरात स्मॉल इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन ह्या सरकारी मालकीच्या कारखान्यात तीन महिन्यांनी स्कूटर्स तयार होऊ लागतील. १९७५–७६ मध्ये २४,००० स्कूटर्सच्या उत्पादनाचे लक्ष्य गाठले जाईल, अशी अपेक्षा आहे.

**रशियात स्वैंपाकासाठी विपुल गॅस** — रशियात गॅसचा पुरवठा इतका मुबलक आहे की, तेथील बिऱ्हाडांना नळीने वाटेल तितका गॅस मिळू शकतो. त्यासाठी दरमहा ठराविक, सुमारे रु. १·६० एवढाच आकार पडतो.

मोटारीचा धूर सोडणाऱ्या नळया काटकोनात बसविल्या

दिल्लीमधील बसगाड्यांना एंजिनामधील धूर सोडणाऱ्या नळ्या रस्त्यांशी काटकोनात बसविण्यात आल्या आहेत. नेहमीची पद्धत ह्या नळ्या रस्त्यांशी समांतर अशा गाड्यांखाली बसविण्याची आहे. नव्या पद्धतीमुळे राजधानीच्या रस्त्यावर धूर हवेत उंच ओकणारी धुराडीच धावत आहेत असे वाटते. मोटारींच्या धुरामुळे हवेचे प्रदूषण कमी व्हावे म्हणून ही तांत्रिक सुधारणा करण्यात आली आहे. पण ह्या पद्धतीमुळे हवा कमी प्रमाणात दूषित होईल ही अपेक्षा चुकीची ठरण्याचा संभव आहे. सरकारच्या शास्त्र व तंत्र खात्याच्या एका प्रवक्त्याच्या मताने पहिलीच पद्धत अधिक निर्दोष आहे. मोटारींचा विषारी धूर हवेत १५-२० फुटांवर सोडणे उतारूंच्या दृष्टीने वाईट आहे; पादचाऱ्यांच्या दृष्टीने उपद्रवकारक आहे आणि एंजिनालाही धोकादायक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. रस्त्यापासून फूट दोन फूट उंचीवर जुन्या पद्धतीने बसविलेल्या नळ्यांतून धूर सोडण्यात येतो. त्यामुळे धुरातील जड कण चटकन रस्त्यावर पडून जातात. ह्या उलट १५-२० फुटावर सोडण्यात आलेल्या धुरातील जड कण हळूहळू खाली येतील आणि ते पादचाऱ्यांच्या अंगावर व मोटारींच्या खिडक्यांच्या द्वारे उतारूंच्या अंगावर पडतील. बसगाडी दुमजली असेल तर ९० अंशाच्या काटकोनात बसविलेल्या धुराच्या नळ्या रस्त्याकडेच्या घराच्या गॅलऱ्यात धूर ओकीत जातील. शिवाय काटकोनात बसविलेल्या नळ्यांमुळे एंजिनवर विरुद्ध दिशेने दाब पडून त्याच्या शक्तीत २० ते ५० टक्के घट होण्याचा संभव एका मोटार एंजिनिअराने व्यक्त केला आहे.

---

स्त्रियांची कुचंबणा आणि विटंबना

"स्त्रियांच्या दृष्टीने कायदा आणि सुव्यवस्था" ह्या विषयावर दिल्ली येथे स्त्रियांचा एक परिसंवाद झाला, त्यात विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांनी भाग घेतला. स्त्रियांची कुचेष्टा करण्याची ५०० प्रकरणे १९७० मध्ये न्यायालयात दाखल केली गेली; १९७२ मध्ये त्यांची संख्या १,४०० वर गेली; "जनता त्याबाबत उदासीन असते इतकेच नव्हे तर कित्येकांना स्त्रियांची झालेली कुचंबणा आणि विटंबना बघण्यात आनंद वाटतो; नोकरी करणारी, एकटी वावरणारी महिला अद्याप समाजाच्या पचनी पडलेली नाही; कामासाठी घराबाहेर पडणारी स्त्री शालीन असणारच नाही अशी काही लोकांची कल्पना," इत्यादी ह्या प्रश्नाच्या कित्येक बाजू त्या परिसंवादामध्ये मांडण्यात येऊन महत्त्वाच्या ठिकाणी चौकीदार ठेवण्यात यावेत, बस स्टॉपशेजारी साध्या पोशाकातील पोलीस उभे करावे, विनयभंगाच्या गुन्ह्याचा आरोपी जामिनावर सोडला जाण्यास कायद्याने अपात्र ठरविला जावा, इत्यादी उपाय सुचविण्यात आले.

---

राष्ट्रीयीकृत बँकांतील ओव्हरटाइम — राष्ट्रीयीकृत बँकांतील कर्मचाऱ्यांना १९७० मध्ये ४८८ लक्ष रु. ओव्हरटाइम मिळाला होता; १९७१ मध्ये ही रक्कम ६१५ लक्ष रु. आणि १९७२ मध्ये ६२० लक्ष रु. झाली.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.


मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :- ३८३३७] सरदारगृह प्रा. लि [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



# महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील आरोग्य सेवेचा प्रश्न

## रोगाचा प्रतिबंध हेच मुख्य उद्दिष्ट

डॉ. एल. एच. हिरानंदानी,
मा. संचालक, अवर्षणग्रस्त प्रदेश वैद्यकीय साहाय्य.

शासनाने टंचाईग्रस्त विभागासाठी स्वतंत्र वैद्यकीय साहाय्य संचालन स्थापन केले आहे. गेल्या साडेतीन महिन्यांच्या अल्पकाळात या विभागाने भरीव कार्य पार पाडले आहे. एकाच छोट्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या जमली तर साथीचा त्वरित फैलाव होतो हे सर्वश्रुत आहे. परंतु सध्या साथीचा उद्‌भव पण झालेला नाही. अशा परिस्थितीत पटकी आणि विषमज्वर सहज पसरतात. पण त्याबद्दल आता दक्षता घेण्यात आली आहे. कामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांपैकी एकासही धनुर्वात झाल्याची वार्ता नाही. रात आंधळेपणाबद्दल बाकी ओरड ऐकू येत होती. पण टंचाईग्रस्तांना इंजेक्शने व औषधे देऊन 'अ' व इतर जीवनसत्त्वे यांचा पुरवठा करण्यात आला आहे. सध्या रात आंधळेपणाच्या एकाही केसची अधिकृतरीत्या नोंद झालेली नाही. प्रत्येक ठिकाणचे पिण्याचे पाणी क्लोरीनने जंतुरहित करण्यात येत आहे. त्यामुळे पटकी, विषमज्वर, गॅस्ट्रोसारख्या पोटाच्या विकारांचा जनतेत प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध घालण्यास खूप मदत झालेली आहे. आतापर्यंत १ कोटी, २० लाख रुपयांची औषधे गरजू व्यक्तींना वाटण्यात आली आहेत.

टंचाई परिस्थिती संपून लौकरच पाऊस सुरू होईल. पण तरीही ग्रामीण फिरती वैद्यकीय सेवा चालूच राहील. सध्या सर्व भारतात ग्रामीण जनतेला मिळत असलेल्या वैद्यकीय सोयी अत्यंत अपुऱ्या आहेत. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रास सुमारे ९०,००० लोकसंख्येची काळजी घ्यावी लागते व हे केंद्र सरासरी सुमारे ६,००० रुपये औषधासाठी खर्च करते. सरकारला खेडेगावात जाणारे डॉक्टर मिळत नाहीत. सध्या राज्यात प्रतिवर्षी १,२०० वैद्यकीय पदवीधर तयार होतात. ह्या वैद्यकीय पदवीधरांना पदवी मिळण्यापूर्वी एक वर्षभर इंटर्नशिप करावी लागते. ह्या काळात त्यांना सहा आठवडे ग्रामीण सेवा करावयाची असते. बाकीचा काळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या विविध शाखांत काम करण्यासाठी ते खर्च करतात.

महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे इंटर्नशिपसंबंधीच्या आपल्या कायद्यात दुरुस्ती करणार असून ग्रामीण सेवेसंबंधीच्या इंटर्नशिपच्या कार्यक्रमात किमान सहा महिन्याइतकी आणि आवश्यक वाटल्यास नऊ महिनेइतकी वाढ करण्यात येणार आहे. या डॉक्टरांच्या सेवेचा आपल्या राज्यातील ग्रामीण विभागाकरता उपयोग करून घेण्यात येईल. ते वसतिगृहाच्या जागेत राहतील आणि सध्या अवर्षणग्रस्त विभागात करतात त्याप्रमाणे वैद्यकीय सेवा करतील. अशा प्रकार ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा प्रश्न महाराष्ट्रात पहिल्या प्रथम कायमचा सोडविला जाणार असून इतर राज्येही याचे अनुकरण करतील अशी मला खात्री आहे.

राज्याच्या ग्रामीण विभागात विखुरलेल्या तीन कोटी लोकांना उपयुक्त वैद्यकीय साहाय्य आपणाला कसे देता येईल ? रोगांचा प्रतिबंध हेच आपले मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. तेव्हा यासंबंधीची योजना खालील धर्तीवर अमलात आणावी असे मी सुचवितो.

१. नवजात अर्भकांना ट्रिपल व्हॅक्सिनचे इंजेक्शन देऊन त्यांना संरक्षित करणे.

२. सुमारे ८० लाख शाळकरी मुलांना डबल व्हॅक्सिनची धनुर्वात अधिक विषमज्वराची इंजेक्शन देऊन त्यांनाही या रोगापासून बचाव करणे.

३. प्रौढ व्यक्तींना पावसाळ्यापूर्वी विषमज्वर व पटकी प्रतिबंधक लस टोचणे.

४. सर्व लोकसंख्येस धनुर्वाताची प्रतिबंधक इंजेक्शने देणे.

५. आरोग्यविषयक शिक्षण : उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीतून कोणते पदार्थ कसे खावेत याचे गावकऱ्यांना शिक्षण देणे. यासाठी समाज शिक्षण कार्यकर्त्यांची मदत लागेल.

६. संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करणे.

एक वैद्यकीय पदवीधर निर्माण करण्याकरता राज्याला दर माणशी ५०,००० रुपये खर्च करावे लागतात. हे लक्षात घेऊन जेव्हा विशेष उपयुक्त असे काम होत नाही अशा वेळी अधिक चांगले प्रशिक्षण मिळावे, चांगला माणूस आणि उत्तम डॉक्टर होता यावे म्हणून इंटर्नीचा उपयोग या सहकार्यासाठी थोडे दिवस करणे अधिक न्याय्य होणार नाही काय ? सर्व सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातून एम. बी. बी. एस. च्या अभ्यासक्रमात प्रवेश देताना दोन वर्षाच्या बंधनपत्राची अट असून विद्यार्थ्यांनी ती मान्य केलेली आहे. मी या ठिकाणी करीत असलेली सूचना अधिक सोपी असून ती डॉक्टर व गरजू गावकरी या दोघांच्याही हिताची आहे. पदव्युत्तर पात्रतेनंतर ग्रामीण विभागात सेवा करणे डॉक्टरांना फायदेशीर ठरणार नाही. उलट यामुळे त्यांच्या कामात अडथळे येतील. तथापि इंटर्नशिपच्या कालावधीत अशा प्रकारची सेवा देऊन केल्यास त्यामुळे त्यांचा फायदाच होईल.

---

**झांझिबारमध्ये कपड्यांवर नियंत्रण —** मांड्या दिसतील अशा अत्यंत अखूड व तंग कपडे घालणाऱ्यांना झांझिबारमध्ये अटक करण्यात येऊन, तेथील जवळच्या पीपल्स कोर्टात त्यांच्यावर खटला भरला जाईल. पहिल्या गुन्ह्याला ताकीद किंवा चार छड्या, असे शासन सांगितलेले आहे. दुसऱ्या व त्यानंतरच्या गुन्ह्यांस वाढती शिक्षा आहे. डोक्याच्या केसांची लांबी दोन इंचापेक्षा जास्त असता कामा नये. परदेशी प्रवाशांनाही हे नियम लागू आहेत. प्रत्यक्ष खेळात भाग घेतेवेळी खेळाडूंवर हे नियम बंधनकारक नाहीत.

## एक्साइजने जप्त केलेले सोने, व्यापारी तोटा नव्हे
### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

देवगड (रत्नागिरी) येथील जे. एस. पारकर ह्यांचा कोकण ते मुंबई गोठवलेले मासे, आंबे इत्यादींची वाहतूक करण्याचा धंदा होता; त्यांच्या मालकीची 'लक्ष्मी' लाँच होती. २४ एप्रिल १९६१ रोजी मध्यवर्ती अबकारी जकात अधिकाऱ्यांनी ह्या लाँच-मधील प्रत्येकी १० तोळे वजनाची ४,९९९ सोन्याची परदेशी खुणांची बिस्किटे पकडली आणि १८ सप्टेंबर १९६१ रोजी हुकूमान्वये जप्त केली. पारकरवर फौजदारी खटला भरण्यात येऊन त्यांना दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा झाली.

पारकरांनी कोल्हापूर येथे १९६२–६३ चे इन्कमटॅक्स रिटर्न भरले होते. इन्कमटॅक्स अधिकाऱ्याने सोन्याच्या किमतीसकट (७०,७८,५८४ रु.) ७०,९८,८३४ रु. प्राप्तीवर कर लादला. अपिलात, अपेलेट असिस्टंट कमिशनरनी सोन्याची किंमत ४७,१९,०५६ रु. धरली. त्यावर पारकरनी अॅपेलेट ट्रायब्यूनलकडे अपील केले, ते त्यांनी नामंजूर केले. तेव्हा पारकरनी मुंबई हायकोर्टात रिट पिटिशन दाखल केली. "माझी फक्त वाहक किंवा अमानतदार (कॅरिअर किंवा बेली) अशी भूमिका होती; मी जप्त केलेल्या सोन्याचा मालक होतो असे मानण्यात आले तर त्याची किंमत नफ्यातून वजा करण्यात आली पाहिजे; कारण ते व्यापारी नुकसान होईल" असे पारकरतर्फे सांगण्यात आले.

रिट पिटिशन न्यायमूर्ति देशपांडे आणि न्यायमूर्ति मुखी ह्यांच्या बेंचपुढे सुनावणीस निघाली. मालावर असेसीचा ताबा होता, असे इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी ठरविले. "रिट पिटि-शनचा विचार करताना ह्या वस्तुस्थितिविषयक निर्णयात फेर-बदल करता येणार नाही आणि सोने जप्त केल्यामुळे झालेले नुकसान व्यापारी नुकसान म्हणता येणार नाही" असे न्यायमूर्ति देशपांडे ह्यांचे मत पडले, तर न्यायमूर्ति मुखी ह्यांच्या मते कर अधिकाऱ्याची चूक होती आणि रिट पिटिशन मंजूर केली पाहिजे.

दोन न्यायमूर्तींच्या ह्या मतभेदामुळे न्यायमूर्ति तुळजापुरकर ह्या तिसऱ्या जज्जाकडे निवाड्याचे काम सोपविण्यात आले. त्यांनी न्यायमूर्ति देशपांडे ह्यांच्या मतास पुष्टी देऊन रिट पिटिशन नामंजूर केली.

---

### लँड डेव्हलपमेंट बँकांचे विलीनीकरण

१ मे रोजी महाराष्ट्र राज्यातील सर्व प्राथमिक लँड डेव्हलपमेंट बँक महाराष्ट्र राज्य सहकारी लँड डेव्हलपमेंट बँकेत विलीन करण्यात आल्या. त्यामुळे ह्या सर्व बँकांचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यात आले आहे. राज्य सहकारी लँड डेव्हलपमेंट बँकेची पुनर्घटना करण्यात येणार आहे. प्रस्तुत विलीनीकरणामुळे सर्व लँड डेव्हलप-मेंट बँकांची जिंदगी व देणी महाराष्ट्र राज्य लँड डेव्हलपमेंट बँकेकडे वर्ग करण्यात आली आहेत.

---


BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth,**
**BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*





बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना

**निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना**

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय विरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेड्युल्ड बँक

**महाराष्ट्रात सर्वत्र शाखा**

# नहीं–
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार

## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और भोजनालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है.
२. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

१८ विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५२३०२ कारखाना: १५५१०२




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 173

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, ६ जून, १९७३ | अंक ११

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**

### ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,

क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई-१.

Madison/TGM/7 Mar

### हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार

कागद क्षेत्रातील अग्रगण्य कारखानदार श्री. बाबूरावजी पारखे ह्यांचे ज्येष्ठ चिरंजीव, कविवर्य ग. दि. माडगूळकर ह्यांचे ज्येष्ठ जामात आणि खोपोली येथील पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्सचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर श्री. सुधाकर मल्हार पारखे (वय ३२) (२) श्री. बाबूरावजी ह्यांचे जावई आणि पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्सचे जनरल मॅनेजर श्री. नागेशराव रघुनाथराव देशपांडे (वय ३६) आणि (३) श्री. बाबूरावजी ह्यांचे भाचे, सोनगड येथील सेंट्रल पल्प मिल्स आणि पारखे उद्योग समूहाचे चीफ सिव्हिल इंजिनिअर श्री. आत्माराम विनायक ऊर्फ दादासाहेब कवठेकर (वय ३८) हे तिघे एकाच उद्योगसमूहातील आणि उद्योग कुटुंबातील कर्तबगार तज्ज्ञ तरुण हैद्राबादहून विजयवाडा येथे टॅक्सीने जात असता हैद्राबादपासून ४० मैलांवरील रामण्णापेठ गावानजीक मोटरअपघातात ठार झाले. श्री. बाबूरावजी आणि त्यांचे कुटुंबीय ह्यांच्यावर सहानुभूतीचा वर्षाव झाला. त्या सर्वांना उद्देशून कुटुंबीयांच्या वतीने पाठविलेल्या आभाराच्या पत्रात खालीलप्रमाणे मजकूर आहे :—

**आता कळवावे असे काहीही उरलेले नाही**

अनेकांनी वर्तमानपत्रांत ती बातमी वाचली व अशक्य, अतर्क्य, अघटित, अनाकलनीय म्हणून उद्गार काढले. शब्दांनाच निःशब्द करणारी ही घटना.

आमच्या औद्योगिक कार्यांचे शिल्पकार आणि आधारस्तंभ

सुधाकरजी पारखे,

नागेशराव देशपांडे

आणि

दादासाहेब कवठेकर,

हे तिघेही एकाच वेळी अपघातात कामी आले.

जगन्नियंत्याच्या योजनेची जाणीव नसणारे आपण पराधीन मानव. विवेकालाही वेड लागावे, श्रद्धेला पक्षाघात व्हावा, देवाच्या न्यायबुद्धीबद्दल संदेह निर्माण व्हावा, अशी आपत्ति. पण......

**वृक्षाचेंही पान हाले त्याची सत्ता।**
**राहिली अहंता मग कोठें !!**

अध्यात्माची कास धरून, प्रयत्नशीलता, धैर्य, गांभीर्य, सारे अंगी बाणविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आलो. व्यावहारिक चढउतारावर त्यायोगे मात करू ही आमची निष्ठा. पण शेवटी आम्हीही माणसेच. आमची मने अशा आपत्तीत का खळबळून उठू नयेत ? ओसंडू द्या त्यांना—धैर्याचे, गांभीर्याचे, अध्यात्माचे बांध फोडून... !

आपण सर्वांनी आमच्या कुटुंबीयांविषयी जे प्रेम व जी सहानुभूती दाखविली त्याबद्दल शतशः धन्यवाद.





प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आता भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर ®

किर्लोस्कर एंजिन– शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315-M

☆ अर्थ ☆

बुधवार, ६ जून, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## बँक रेटमध्ये वाढ म्हणजे धोक्याचा कंदील

### सरकारी खर्चाला कात्री किती लागते आणि उत्पादन किती वाढते हा खरा प्रश्न आहे

रिझर्व्ह बँकेने बँक रेट ६% चा ७% करून भारताच्या चिंताजनक आर्थिक परिस्थितीच्या धोक्याचा लाल दिवा दाखविला आहे. बँक रेट वाढवून फारशी सुधारणा होणार नाही, हे जाणून रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनी, "मागणीच्या मानाने पुरवठा तोकडा पडत असल्यामुळे, विशेषतः शेतीच्या क्षेत्रातील त्रुटीने परमावधी गाठल्यामुळे आणि सरकारी अंदाजपत्रके मोठ्या तुटीची असल्यामुळे आर्थिक परिस्थिती आटोक्यात ठेवण्याची तातडीची गरज आहे" अस म्हटले आहे. चलनाची वाढ उपलब्ध पुरवठ्यावर ताण निर्माण करीत आहे. तेव्हा, सरकारने स्वतःचा खर्च आटोक्यात ठेवणे आणि करवसुलीत वाढ करणे हीच ह्या परिस्थितीवरील खरी प्रभावी उपाययोजना आहे. सरकारला स्वतःच्या पतपत्रिकेवर अमर्याद चलनी नोटा रिझर्व्ह बँकेकडून मिळविण्याचा अधिकार आहे, त्यामुळे चलनवाढीस आळा घालण्याचे सामर्थ्य रिझर्व्ह बँकेजवळ नाही; ती सरकारला फक्त सल्ला देऊ शकते.

अर्थात रिझर्व्ह बँक आपल्या मर्यादित अधिकारात उपाययोजना करू शकते. त्याचाच बँक रेटमधील वाढ हा परिणाम आहे. गेल्या ऑक्टोबर नंतर आतापर्यंत व्यापारी बँकांचा कर्जपुरवठा १,००० कोटी रुपयांनी वाढला आहे; गेल्या वर्षीपेक्षा आता जनतेजवळ १६% अधिक पैसा आहे. घाऊक मालाच्या किमतींचा निर्देशांक (१९६१–६२=१००) १२ मे, १९७३ रोजी २३१·३ वर पोचला. गेल्या वर्षी तो १९२·९ होता. बँकांकडील ठेवी वाढल्यामुळे कर्जाच्या अटी सौम्य करण्याकडे बँकांची प्रवृत्ती झाली आहे. बँकांना पायबंद घालण्यासाठी शेड्यूल्ड व्यापारी बँकांनी रिझर्व्ह बँकेकडे ठेवण्याची रक्कम ठेवींच्या ३% ऐवजी आता ५% करण्यात आली आहे. ह्या जादा रकमेवर बँकांना ४·७५% व्याज मिळेल.

ठेवींची वाढ होत राहण्याची चिन्हे दिसत आहेत, तेव्हा कर्जावरील किमान व्याजाचा दर ठरविण्याची आवश्यकता आहे. (नेहमी कमाल दर ठरविण्याची आवश्यक असते) काही खास प्रकारची कर्जे वगळून बाकीच्या कर्जावर बँकांनी १०% पेक्षा कमी व्याज आता घेता कामा नये. ज्या कर्जावरील व्याजाचा दर वाढविलेला नाही, अशा कर्जाचा फायदा खरोखरच गरजू छोट्या कर्जदारांना मिळत आहेना, हे बँकांनी पाहावयाचे आहे.

अनिर्बंध महागाई आणि मालाचा तुटवडा ह्यावरील रिझर्व्ह बँकेच्या वरील उपायाला अनुलक्षून मध्यवर्ती अर्थ खात्यानेही काही उपाय योजण्यास प्रारंभ केला आहे. अद्याप जे उपक्रम हाती घेतलेले नाहीत किंवा ज्या उपक्रमांपासून सत्वर फलनिष्पत्ती होणार नाही, अशा उपक्रमांची प्रगती रोखून ठेवण्यास अर्थखात्याने इतर खात्यांना सांगितले आहे. १९७३–७४ चे अंदाजपत्रक ८५ कोटी रु.च्या तुटीचे आहे; पे कमिशनच्या शिफारशीच्या अमलबजावणीने त्यात १५० कोटी रु.ची भर पडणार आहे. अनपेक्षित चलनवाढीचा ह्या हिशेबात अंतर्भाव नाही. मध्यवर्ती अर्थखाते सरकारी खर्चात किती बचत करू शकते, हे आता पाहावयाचे आहे.

## छोट्या बँकांची गरज आता वाढली !

"मुंबईत व्यापारी, राष्ट्रीयीकृत व सहकारी बँकांच्या शाखांचे प्रचंड जाळे असतानाही जनता सहकारी बँकेसारख्या छोट्या बँकांना शाखा काढण्यास परवानगी का देण्यात आली ? त्याची कारणे दोन आहेत. एक तर मोठ्या बँकांच्या शाखांतून नोकरशाहीची प्रवृत्ती वाढलेली दिसते. छोट्या बँकांची सेवा ही व्यक्तिगत स्वरूपाची असते व तिच्या ग्राहकांना ती कार्यक्षमतेने मदत करू शकते. त्याचीच आज आवश्यकता आहे."— जनता सहकारी बँक, पुणे, च्या १८ व्या शाखेचे टॅमरिंड लेन, फोर्ट, मुंबई, येथे उद्घाटन करते वेळी रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक डॉ. सी. डी. दात्ये ह्यांचे भाषण.

## मोठे कारखानदार छोट्यांचा पैसा वापरतात

मोठे कारखाने लघुउद्योगांच्या उत्पादनाचे प्रमुख खरेदीदार; पण हे बडे खरेदीदार घेतलेल्या मालाची किंमत महिनोमहिने देत नाहीत. राष्ट्रीयीकृत बँका लघुउद्योगांना प्राधान्येकरून कर्जे देतात, त्यांचा फायदा मोठे कारखाने मालाची बिले तुंबवून ठेऊन स्वतःच उपटतात, अशी लहान कारखानदारांची तक्रार आहे. पब्लिक सेक्टरमधील कारखानेही ह्याला अपवाद नाहीत. "मोठे कारखाने लहान कारखान्यांना मदत करीत नसून लहान कारखानेच मोठ्यांना मदत करीत आहेत" अशी टीका ह्या परिस्थितीवर महाराष्ट्र स्मॉलस्केल इंडस्ट्रिज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे चेअरमन, श्री. नेवाळकर ह्यांनी केली आहे. लघुउद्योगांच्या ताळेबंदात नफा दिसला तरी तो येण्याच्या जिंदगीचे कागदी स्वरूपात असतो; त्यांना स्वतःचा विकास करण्यासाठी आणि कधी कधी इनकम टॅक्स भरण्यासाठीही पैसा राहात नाही.


# शंतनुराव किर्लोस्करांचे ७१ व्या वर्षात पदार्पण

श्री. शंतनुराव किर्लोस्करांनी २८ मे, १९७३ रोजी ७० वर्षे पुरी करून ७१ व्या वर्षात पदार्पण केले. तांत्रिक ज्ञान असणाऱ्यांच्या हातीच उद्योगधंद्यांची सूत्रे असावी, भांडवलदारांच्या हाती ती असू नयेत, ही आताची विचारसरणी आहे. परंतु, ह्या विचारसरणीप्रमाणे प्रत्यक्ष कृती शंतनुरावांनी गेली ५० वर्षे केली आहे—



मॅसेच्युसेट्स इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ( यू. एस. ए. ) ची पदवी उत्तीर्ण होऊनच, स्वतःच्या वडिलांनी स्थापन केलेल्या किर्लोस्कर ब्रदर्स लि. मध्ये ते दाखल झाले; केवळ संस्थापक लक्ष्मणरावांचा पुत्र म्हणून नव्हे. शंतनुराव खेडेगावात, कामगारांच्यात चोवीस तास वाढलेले; त्याला अत्याधुनिक शिक्षणाची जोड मिळाली आणि त्यांनी किर्लोस्करांच्या उत्पादनात विविधता आणून त्यांच्या इंजिनिअरिंग कारखान्यांची ठिकठिकाणी उभारणी केली. त्यांच्या नेतृत्वाखालील कारखाने भारताच्या चार राज्यांत विखुरले असून जर्मनी, फिलिपाइन्स आणि मलेशिया येथेही त्यांनी यशस्वी रीतीने कारखाने उभारले आहेत. निर्गतीची सरकारला निकड होण्यापूर्वी किती तरी आधी त्यांनी निर्गतीचे महत्त्व ओळखले; त्यांची डिझेल इंजिने वीस वर्षांपूर्वीपासूनच निर्गत होत आहेत; आता जगातील वेगवेगळ्या देशांत २ कोटी रुपयांची किर्लोस्कर उत्पादने निर्गत होत आहेत. किर्लोस्करांच्या ११ कंपन्यांचे ते चेअरमन व इतर ९ कंपन्यांच्या संचालक मंडळाचे सदस्य आहेत. उद्योगधंद्याविषयी सरकारी धोरण आणि कारभार सुधारण्यासाठी त्यावर स्पष्ट, उघड आणि तर्कशुद्ध टीका कर्तव्यबुद्धीने करण्यास ते कचरत नाहीत. जेट युगातील मराठी माणूस कसा असायला हवा, हे स्पष्ट करून सांगणे हा त्यांच्या आवडीचा विषय आहे. त्यांच्यासारखे बहुसंख्य कारखानदार असते तर कित्येक उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी टळली असती. त्यांना औद्योगिक क्षेत्राचे, जनतेचे, त्याचप्रमाणे सरकारचेही अत्युच्च मानसन्मान मिळाले आहेत. कर्तृत्वसंपन्न ५० वर्षांच्या त्यांच्या कामगिरीने दोन पिढ्यांचे द्वारा महाराष्ट्रात निर्भेळ कारखानदारीचा वटवृक्ष निर्माण केला आहे. आपल्या पतीच्या उद्योगधर्माचरणातही सौ. यमूताईंनी ( विवाह : १९२७ ) दिलेल्या उत्साही सहकार्याने सुशिक्षित स्त्रियांपुढे आणि दांपत्यांपुढे एक आदर्श घालून दिला आहे. आम्ही श्री. शंतनुरावांना प्रदीर्घ निरामय आयुष्य चिंतितो.



# पुणे बँक ग्राहक संघ

## राष्ट्रीयीकृत बँकांचे फायदे कमकुवत लोकांना मिळवून देणारी पक्षनिरपेक्ष संघटना

श्री. ह. म. गद्रे ह्यांच्या द्रष्टेपणालाच पुणे बँक ग्राहक संघाच्या प्रेरणेचे श्रेय दिले पाहिजे. नंतर राज्य नियोजन मंत्री श्री. मोहन धारिया ह्यांनी पुढाकार घेऊन संघटना उभारण्याचे कार्य केले. सध्या संघाची दोन मार्गदर्शन केंद्रे आहेत. (१) ना. धारियांचे घर, २०३४ सदाशिव पेठ, पुणे ३० आणि (२) काँग्रेस हाऊस, पुणे ५. संघाचे कार्यालय 'महादेव भवन' १३९२, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे आहे. संघाचे अध्यक्ष श्री. ह. म. गद्रे हे असून श्री. सुरेश बापट आणि श्री. दा. ना. गांडेकर हे चिटणीस आहेत.

भारतातील १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर त्या व व इतर सर्व बँकांचे उद्दिष्ट समाजाच्या सर्व थरांतील गरजूंना आर्थिक मदत देण्याचे जाहीर झालेले आहे. बँकांची ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी व त्यांचे फायदे आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांना मिळवून देण्यासाठी कार्यक्रम आखून त्याची पद्धतशीर अमलबजावणी होण्याची जरुरी आहे. हातगाडीवाले, चांभार, सुतार, शिंपी, न्हावी, बुरूड, फेरीवाले, छोटे दुकानदार व ठेकेदार, थोडक्यात स्वतःच्या हिमतीवर अर्थोत्पादन करू इच्छिणारे यांना जरूर ते कर्ज तातडीने व सहजपणे मिळवून देण्याची जरुरी आहे. ह्या लोकांजवळ भांडवल नसल्यामुळे त्यांची गरिबी हटत नाही, त्यांना जे कर्ज देतात ते दरमहा १२ ते ३० टक्क्यांपर्यंत व्याज आकारतात. व्यापारी लोक माल उधार देताना जादा भाव लावतात. त्यामुळे दिवसभर खपून जी कमाई होते त्यातला बराचसा वाटा सावकार व दलाल खातात असे दिसून आले आहे.

ह्या लोकांना बँकेच्या दारात जाऊन लहान लहान कर्जे मागणे जमत नाही. त्यांना तेथे मार्गदर्शन मिळत नाही. ह्या लोकांचे म्हणणे ऐकून घेणे, त्यांची खरी अडचण काय ते समजून घेणे, ते प्रामाणिकपणे मागणी करीत आहेत किंवा नाही ह्याची शहानिशा करणे, मिळालेल्या कर्जाचा विनियोग करून मूळ भांडवल शिल्लक राहून फायदा होण्याची शक्यता अजमावून पाहणे, बँकेत जाऊन कर्जाचा अर्ज करणे, त्यासाठी जामीन मिळविणे व कर्जाचा हप्ता वेळच्या वेळी भरणे, ह्यासंबंधीचे शिक्षण व मार्गदर्शन करण्यासाठी बँकेमधील नोकरवर्गास वेळ नसतो. तेव्हा अशा लोकांना योग्य ते मार्गदर्शन करणे, शिक्षण देणे व कर्जफेडीचे महत्त्व समजून देणे ह्यासाठी बँक ग्राहक संघासारख्या संस्थेची जरुरी आहे असे अनुभवाने सिद्ध झाले आहे.

बँक ग्राहक संघ काढणे फार जबाबदारीचे काम आहे. कार्यकर्त्यांबद्दल बँकांना विश्वास वाटला पाहिजे व बँकिंग धंद्याच्या उद्दिष्टांची व कार्यपद्धतीची त्याला माहिती असणे जरुरीचे असते. संघाने आतापर्यंत शिफारस केलेल्या सुमारे ५०० लोकांना कर्ज मिळाले आहे.

### संस्थेचे कार्य कसे चालते?

१. संस्थेचे कार्य पक्षनिरपेक्ष, बँकनिरपेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष व निष्काम असते.

२. हे केवळ सार्वजनिक काम आहे व त्यात कुठलाही मोबदला कुठल्याही प्रकारे घेतला जात नाही.

३. संस्थेच्या वा कुठल्याही बँकेच्या नावास कमीपणा येणारे काम होऊ दिले जात नाही.

४. शिफारस करण्यापूर्वी स्वतः जास्तीत जास्त चौकशी केली जाते व ग्राहकास योग्य ते मार्गदर्शन केले जाते.

५. बँकेवर वा ग्राहकांवर कुठलेही दडपण आणण्याचा प्रयत्न केला जात नाही. केवळ दप्तर-दिरंगाई वाचविणे, लोकशिक्षण करणे, बँकांना मदत करणे व ग्राहकांच्याही सोयी बघणे हे ग्राहक संघाचे काम आहे.

६. शिफारस केलेल्या प्रकरणाबाबत, जबाबदारी नसली तरी, जमेल ती मदत बँकांना नंतरही करणे आवश्यक आहे. शिफारशीनंतर नैतिक जबाबदारी जास्त वाढते याची जाणीव ठेवावी लागते.

७. कर्जाची शिफारस करताना शक्यतो अर्जदाराच्या जागेस भेट देणे, त्याच्या घराची भाडेपावती वा करपावती बघणे, नगरपालिका व अन्य कुठलेही लायसेन्स जरूर असल्यास तेही बघणे, इलेक्ट्रिक कनेक्शनची माहिती घेणे, व्यवसाय असल्यास कच्चा माल कसा मिळतो, कुठे मिळतो, कसा घेतला जातो, विक्री कोठे होते याची माहिती तपासून घेणे, याबाबतचे ठोक हिशेब बघणे, नसल्यास नंतर तरी ठेवण्यासाठी अर्जदाराला प्रवृत्त करावे, अशी कार्यपद्धती आहे.

८. कर्जाचा विनियोग त्याच कामासाठी होत आहेना व त्यामुळे आर्थिक परिस्थितीत सुधारणा होणार आहे व या सुधारणेतून कर्जाचा हप्ता देता येणार आहे याची खात्री करून घेतली जाते.

९. नंतरही कर्जदाराची अधूनमधून भेट घेऊन तारण असल्यास ते व्यवस्थित ठेवण्याबद्दल त्याला सूचना केल्या जातात व व्याज व मुद्दल वेळच्या वेळी फेडत आहे की नाही हे बघितले जाते.

१०. बँकेने आपल्यावर जसा विश्वास ठेवावा असे कर्जदाराला वाटते तसाच विश्वास आपल्याबद्दल असणारा एक किंवा दोन जामीन देणे महत्त्वाचे आहे. त्याबाबत त्याची इस्टेट असलीच पाहिजे असे नाही. तो नोकरदार किंवा धंदेवाईकही असू शकेल. विनातारण म्हणजे विनाजामीनही कर्ज मिळावे असे नव्हे. जामीनदाराच्या मिळकतीबद्दलची अर्जदाराप्रमाणेच माहिती घेऊन खात्री करून घेऊन, जरूर पडली तर कर्ज फेडण्यास तो पात्र आहे हे बघितले जाते.

११. संस्थेचे कार्यक्षेत्र पुणे कॉर्पोरेशन, खडकी, चिंचवड नगरपालिका व कँपविभाग असे आहे.

# प्रा. सहकारी सोसायट्यांच्या चिटणिसांना ४० ते १०० रु. पगारवाढ

### सहकार मंत्र्यांचे आवाहन

राज्यातील प्राथमिक सहकारी सोसायट्यांच्या सचिवांना किमान ४० ते जास्तीत जास्त १०० रुपये वेतनवाढ देण्याचा निर्णय सहकारमंत्री श्री. यशवंतराव मोहिते यांनी घोषित केला आहे.

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने सहकारी सोसायट्यांच्या सचिवांच्या वेतनावाबत कोरे समितीचा अंतरिम अहवाल विचारात घेऊन वेतनश्रेणीबाबत निर्णय ठरविला.

राज्यातील १३ हजार सोसायटी सचिवांना अंतरिम वेतन-श्रेणी १-७-७२ पासून लागू केली जाईल. थकबाकी म्हणून त्यांना १ कोटी, २८ लाख रुपये द्यावे लागतील. या निर्णयामुळे सर्व सोसायट्यांना मिळून दरवर्षी उत्पन्नापेक्षा २७४·५४ लाख रुपये जादा द्यावे लागतील. हा सर्व बोजा प्राथमिक सोसायट्या, मध्यवर्ती बँका, शिखर बँका व सरकार यांना सोसावा लागणार आहे.

सहकारी सोसायट्यांच्या सचिवांना संवर्गीकरण योजनेनंतर (१) निवड श्रेणी २००–१०–३००, (२) प्रथम श्रेणी १६०–८–२०० व (३) द्वितीय श्रेणी ८०–४–१००–५ १२५–७–१६० अशी आहे. कोरे समितीने शिफारस केलेल्या व शासनाने स्वीकारलेल्या वेतनश्रेणी पुढीलप्रमाणे राहातील—

प्रथम श्रेणी– ३००–२०–५०० दक्षता रोध द्वैवार्षिक २५–६००.

द्वितीय श्रेणी– २००–१०–३०० दक्षता रोध त्रिवार्षिक १५–३६०.

तृतीय श्रेणी– १२५–५–१५०–५–२०० दक्षता रोध द्विवार्षिक ८–२३२.

संवर्गीकरण योजनेप्रमाणेच शासनाने स्वीकृत केलेल्या वेतन-श्रेणीही एकत्रित आहेत.

कोरे समितीने शेती कर्जपुरवठा व्यवस्थेची पूर्ण पुनर्रचना सुचविली आहे. सध्या ज्या सोसायट्या आहेत त्यांपैकी नऊ हजार सोसायट्या कमकुवत सोसायट्या आहेत, त्या दुसऱ्या सोसायट्यांत विलीन कराव्या अशी या पुनर्रचनेची महत्त्वाची शिफारस आहे.

सरकार वेतनश्रेणीत सुधारणा करीत असले तरी औरंगाबाद, नांदेड, बीड, उस्मानाबाद, यवतमाळ, बुलढाणा, जळगाव, नाशिक व नगर या नऊ जिल्ह्यांतील सचिवांनी दबावाचा पवित्रा घेऊन अघोषित संप चालू केला. कर्जमर्यादापत्रके तयार न करणे, सरकारशी असहकार करणे, सोसायट्यांचे दप्तर घेऊन पसार होणे असे प्रकार सुरू केले आहेत. याचा परिणाम दुष्काळ-जर्जर व कर्जपीडित शेतकऱ्यांवर विपरीत होणार आहे म्हणून या भयंकर प्रकारापासून परावृत्त व्हावे.

थकित कर्जातून मार्ग काढण्याचा व शेतकऱ्याला नवीन कर्जाचा पुरवठा करण्याचा प्रयत्न सरकार करीत असून १५० ते १७५ कोटी रुपये नव्याने उपलब्ध होत आहेत. अशा वेळी सोसायट्यांच्या सचिवांचे आडमुठे व सहानुभूतिशून्य धोरण असेच राहिले तर शेतकरी जीवनातून उठेल व राज्य आर्थिक अरिष्टात सापडेल.

---

### सायकलीची सर इतर वाहनांना नाही

संयुक्त राष्ट्र संघटनेचे जिनिव्हा येथे एक माहिती केंद्र आहे. केंद्रामार्फत मुख्यत: आर्थिक व सामाजिक वार्ता प्रसृत करण्यात येत असतात. केंद्रामार्फत वाहन म्हणून सायकलीची तरफदारी करणारे एक वार्तापत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. अलीकडे जगभर दूषितीकरणाचा जो प्रश्न उत्पन्न झाला आहे त्या दृष्टीने विचार करता सायकलीसारखे वाहन नाही असा अभिप्राय वार्तापत्रांत व्यक्त करण्यात आला आहे. वार्तापत्र म्हणते की, सायकल हे एक स्वच्छ, आवाज न करणारे, कमी खर्चाचे, कमी त्रासाचे आणि आरोग्यप्रद वाहन आहे; सध्या जगात सर्वत्र औद्योगिक शक्तीचा पुरवठा अपुरा पडू पाहात आहे. कोठलेही यांत्रिक वाहन घेतले की त्याला इंधनाचा म्हणजे शक्तीचा पुरवठा लागतोच. म्हणजेच ही वाहने खर्चाच्या दृष्टीने महागडी असतात. सायकलीचे मात्र तसे नाही. माणूस, निरनिराळे प्राणी आणि यंत्र आपल्या वजनाच्या प्रमाणात किती शक्तीत किती अंतर तोडतात ह्याचा अभ्यास केला तर सायकलीची श्रेष्ठता पटण्यासारखी आहे. एखादा मनुष्य चालत असला तर त्याला त्याच्या प्रत्येक किलोग्रॅम वजनामागे ०·७५ कॅलरीज एवढी शक्ती प्रत्येक किलोमीटर अंतर तोडण्यासाठी लागते. पण घोडा, साल्मन मासा अगर जेटवर चालणारे विमान ह्यांच्याशी तुलना करता मनुष्य कार्यक्षमतेत कमी भरतो. माणूस सायकल वापरू लागला म्हणजे मात्र त्याची कार्यक्षमता वाढते. सायकलवरून जाऊ लागल्यावर ठराविक अंतर तोडण्यासाठी त्याला चालण्यापेक्षा कमी शक्ती लागू लागते. म्हणजे एक किलोमीटर अंतर तोडण्यास त्याला सायकलीवरून ०·१५ कॅलरीज एवढीच शक्ती पुरते.

---


## Fergusson College, Poona 4

The College will reopen on the 15th June, 1973 for the academic year 1973-74. Applications for admission should be made in the prescribed form immediately after the results of the qualifying examinations are declared.

Students of this College seeking admission to S. Y. B. Sc. class should ensure their admission *immediately*.

D. A. Dabholkar
Principal

31-5-1973.

# व्यवस्थापनातील समस्या (८)

## प्रामाणिकपणा व सचोटीचे बक्षीस

(लेखक : शाम रघुनाथ साखरे, कॅशिअर, बँक ऑफ महाराष्ट्र, तासगाव शाखा)

अदृश्य जिल्हा मार्केटिंग, अदृश्य या सोसायटीत रामराव दोन चार वर्षांपूर्वीपासून सेक्रेटरी म्हणून काम करू लागले. शिक्षणाच्या दृष्टीने ते पदवीधर नव्हते. मात्र कॉलेजचा उंबरठा ओलांडून आले होते. ज्या वेळी त्यांनी सोसायटीत सेक्रेटरीपदाची सूत्रे हाती घेतली त्या वेळी सोसायटी अगदी प्राथमिक अवस्थेत होती. त्यांनी आल्यावर प्रथम सहा महिने सोसायटीचे कामकाज पाहिले व सर्व दृष्टीने विचार करून सोसायटीत लक्ष घालून वाढ करण्याचे ठरवले. प्रथम आल्यावर सर्व वातावरण उदास व निरुत्साही होते. एकूण चारपाच नोकर, किरकोळ धान्य विकणे, विकत घेणे व हिशोब ठेवून, चेअरमन व डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार यांच्या सूचनेची फक्त अंमलबजावणी करणे एवढेच काम होते.

सर्व पाहणी करून रामराव यांनी असलेल्या नोकरांचे पगारांत प्रथम रु. ५० ते ७५ पर्यंत वाढ केली. सोसायटी नुकसानीत असताना पगारवाढ हे पाहून नोकरांनाही आश्चर्य वाटले. पगार वाढवून रामरावांनी नोकर लोकांना कामाची शिस्त लावली. पगार वाढल्यामुळे नोकरवर्ग विश्वासाने व आत्मीयतेने काम करू लागला.

नंतर सोसायटीचे भांडवल वाढवणेसाठी शेअर्स गोळा करण्यास सुरुवात केली व स्वतःच्या गोड स्वभावाने, व्यक्तिमत्त्वाने त्यांनी लोकांशी तसेच सेवा सहकारी सोसायट्यांशी संपर्क साधून भांडवल वाढवले. त्याचप्रमाणे अदृश्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी संपर्क साधून आपण करणार असलेल्या कामांची व सोसायटी वाढीची पूर्ण कल्पना देऊन मोठ्या प्रमाणावर कर्ज उभारणी केली व सोसायटीचा व्यवहार वाढवण्यास त्याचा पुरेपूर उपयोग केला जाऊ लागला. हे सर्व करीत असताना त्यांनी सोसायटीचा नोकरवर्ग व अधिकारीवर्ग यांना विश्वासात घेतले होतेच. मात्र त्यांनी स्वतः त्यासाठी फारच परिश्रम केले होते, जिद्द व चिकाटीने काम करीत होते.

चार-पाच वर्षांत सोसायटीचे व्यवहार व स्वरूप यांत मोठा बदल झाला. ४–५ नोकरांचे जागी १००–१२५ नोकर काम करू लागले. सेक्रेटरी यांचे स्वतंत्र व प्रशस्त ऑफिस थाटले गेले. जिल्ह्याच्या ठिकाणी व जिल्ह्यात सोसायटीच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. लोकांच्या तोंडीही सर्वत्र सोसायटीबद्दल चर्चा चालू झाली. विशेषतः रामराव यांच्याबद्दल लोकमत चांगले बनले. लोकांना चांगला माल, स्वस्त माल मिळू लागला. याचा अभिमान रामराव यांनाही वाटू लागला.

नियमाप्रमाणे जिल्हा मार्केटिंग सोसायटीची जनरल बॉडी मीटिंग होऊन चेअरमन नवीन आले. इतर मेंबरही त्यांच्या मताचे होते.

एके दिवशी सकाळी मार्केटिंग सोसायटीचे चेअरमन यांचेकडून सेक्रेटरी यांना बोलावणे आले. चेअरमन व सेक्रेटरी बसून इतर सर्व गप्पागोष्टी मोकळेपणाने बोलले आणि शेवटी चेअरमन यांनी सेक्रेटरी यांना सांगितले "तीन पोती साखर मला पाहिजे आहे. तरी पाठवून द्या व मग जमाखर्च (?) करून घेऊ." सेक्रेटरी यांना हा प्रसंग नवीनच होता व इतर सोसायटीत असे प्रकार चालतात असे ते ऐकत होते. पण आपल्या सोसायटीत असा प्रकार होऊ द्यायचा का, असा विचार त्यांचे मनात आला. तथापी रामराव यांनी चेअरमन यांना विचारले, "तीन पोती कुणाला विकली म्हणून दाखवायचे व हिशेब कसा दाखवायचा?"

आता काहीतरी उत्तर देणे भाग होते म्हणून चेअरमन अगदी सहजतेने व हसत म्हणाले "अहो, तुम्ही सेक्रेटरी; कसा जमाखर्च करायचा हे काय मी सांगायला पाहिजे! आपणाला सर्व माहिती आहेच. माझे काम झाले पाहिजे; बाकी मला माहीत नाही."

रामराव तेथून ऑफिसमध्ये आले. पण त्यांचे लक्ष कामात लागेना. साखर पाठवावी व मोकळे व्हावे असाही विचार त्यांचे मनात आला. पण वेळीच याला पायबंद घालावा हा विचार त्यांचा पाठपुरावा करू लागला. साखर न पाठवून निरोप द्यावा का? हा विचार त्यांना त्रस्त करू लागला. साखर न पाठवावी तर स्वतःच्या नोकरीचा प्रश्न आहे. या सर्व विचाराने ते बेचैन झाले. निदान आपण सचोटीने वागू व काही पुरावा म्हणून त्यांनी बंद पाकिटातून चेअरमन यांना चिठ्ठी पाठवली व त्यात लिहिले, "आपणास किती पोती साखर पाठवणे व त्याची किंमत केव्हा पाठवता ते कळवावे."

चिठ्ठी पाहून चेअरमनमधील "चेअरमन" जागृत झाला व ते काय समजायचे ते समजले व प्यादं हलवलं पाहिजे हा विचार त्यांचे मनात आला. कारण, "मी चेअरमन; तळे राखणार तो पाणी पिणार", हा रास्त मार्ग त्यांना दिसत होता. शिवाय जिल्हा मार्केटिंगसारख्या मोठ्या पदावर काम करीत असतांना एवढाही मोबदला मिळू नये काय? रामराव तर पगार घेतात, भत्ता घेतात. शिवाय शेवटी जबाबदारी चेअरमनचीच ना? मग त्यांनी एवढी का टाळाटाळ करावी?

दुसरे दिवशी सेक्रेटरी यांचे टेबलावर ऑर्डर होती, त्यात लिहिले होते "कामाचा व सोसायटीचा व्याप फारच वाढला आहे त्यामुळे आम्हांला पदवीधर मनुष्य नेमणे आवश्यक आहे व त्याची आम्ही १ तारखेपासून नेमणूक करीत आहोत. आपण त्यांचे असिस्टंट म्हणून तूर्त काम करावे. पुढील ऑर्डर नंतर दिली जाईल."

यात रामराव यांचे बरोबर का चेअरमन यांचे बरोबर व अशा परिस्थितीत स्वाभिमानी व विश्वासू रामराव यांनी काय करावे, हे वाचकांनी सांगावे.

---

## वॉटरगेटच्या भानगडीमुळे सोने भडकले

अमेरिकेच्या अध्यक्षांच्या गेल्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने डेमोक्रॅटिक पक्षाच्या निवडणूक कचेरीत हेरगिरी करण्याचा प्रयत्न केला. तो उघडकीस येऊन जगभर त्याचे पडसाद उठले. लंडन व पॅरिसमधील जाणकारांच्या मते सोन्याची किंमत एकदम भडकण्यास हे प्रकरणही कारणीभूत झाले आहे. युरोपच्या खुल्या बाजारात सोन्याची किंमत दर औंसाला १०० डॉलरपेक्षाही अधिक चढली. ह्या प्रकरणामुळे अध्यक्ष निक्सन ह्यांच्या प्रतिष्ठेला जबर धक्का बसून युरोपमधील चलने आणि पौंड ह्यांना अधिक बळकटी आली आणि त्या मानाने डॉलर कमकुवत झाला. प्रे. निक्सन अमेरिकन काँग्रेसपुढे एक व्यापार-विषयक बिल आणणार आहेत. त्याचा उद्देश व्यापार अधिक सवलतीचा करण्याचा आहे. परंतु वॉटरगेट प्रकरणी प्रे. निक्सन ह्यांच्यावर शिंतोडा उडाल्यामुळे ह्या बिलाला काँग्रेसची मंजुरी ते मिळवू शकतील की नाही ह्याविषयी संशय उत्पन्न झाला आहे. अर्थातच युरोपमधील देश सावधपणे पावले टाकत आहेत. सोन्याची किंमत भडकण्यास इतरही कारणे झाली. डॉलरचे सोन्यांत रूपांतर करून घेण्याची उसळलेली लाट हेही एक कारण सांगता येईल. शिवाय लंडन व झ्यूरिक ह्या मोठ्या सोने-बाजारांत सोन्याचा पुरवठाही कमी होऊ लागला आहे. सोव्हिएट रशिआ आणि दक्षिण आफ्रिका हे देश जगातील सोने निर्माण करणाऱ्या देशांत अग्रगण्य आहेत. त्यांच्याकडून पूर्वीप्रमाणे सोने बाजारात येत नाही. जगांतील सर्वच देश चलनवृद्धीच्या भोवऱ्यात सापडले आहेत. पाश्चिमात्य देशही त्यातून सुटलेले नाहीत. चलनवृद्धीमुळेही सोन्याचे भाव चढण्यास मदत झाली आहे.

---

## उत्तर प्रदेशातील साखरेचे उत्पादन

चालू हंगामात उत्तर प्रदेशातील साखरेचे उत्पादन १० लाख टन ठरविण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र सुमारे १३·५ लाख टन उत्पादन होईल असा अंदाज आहे. पुढील वर्षाच्या हंगामाचे चित्र मात्र उत्साहजनक नाही. साखरेसाठी लागणाऱ्या उसाचा पुढील हंगामात तुटवडा पडण्याचा संभव निर्माण झाला आहे. कारण उसाच्या शेतकऱ्याला पुरेसा पाणीपुरवठा मिळत नाही आणि खताचीही टंचाई भासत आहे. उसाच्या पिकाला १५,००० टन खताची जरुरी आहे, पण फक्त ५०० ते ६०० टन खतच मिळू शकेल असे दिसत आहे. मुंबईहून काहीं प्रमाणात खत येऊ लागले आहे. तरीसुद्धा राज्याच्या शेतीखात्याला जरूर असणाऱ्या खताच्या ५० % पेक्षा अधिक खत मिळविण्याची आशा वाटत नाही. गेल्या वर्षी उस शेतकऱ्यांना ६०,००० टन खत पुरविण्यात आले होते. खताच्या कारखान्यांना करण्यात येणाऱ्या विजेच्या पुरवठ्यांत ४० टक्के कपात करण्यात आली, साहजिकच त्यांच्या उत्पादनात घट झाली आहे. ज्या ठिकाणी पाणी उपसण्यासाठी डिझेल पंपांचा उपयोग करण्यात येतो तेथील परिस्थितीही बिकट झाली आहे. कारण डिझेल तेलाचा पुरवठाही अपुरा पडत आहे. राज्य सरकारच्या उस-विभागाने पुढील हंगामांत १६ लाख टन साखर तयार करण्याचे उद्दिष्ट ठरविले आहे. त्याचप्रमाणे उसाखाली असलेल्या जमिनीत १५ टक्क्यांनी वाढ करण्याचेही ठरविले होते. सध्या उत्तर प्रदेशांतील २६ लाख एकरांत उसाची लागवड करण्यात येते. लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठीं प्रयत्न करण्यात येत आहेत. पण नव्या लागवडीला पाण्याचा पुरवठा अपुरा पडणार आहे. तेव्हा अखेर पावसाने हात दिला तरच तरणोपाय आहे.

---

## पाकिस्तानी दैनिकाचे अरण्यरुदन

कराची येथे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या एका दैनिकाने भारताच्या ताब्यात असलेल्या ९० हजार पाकिस्तानी कैद्यांविषयी परखड विचार व्यक्त केले आहेत. आपल्या एका अग्रलेखात हे पत्र म्हणते की, बांगला देशातील बिहारी मुसलमानांना परत येऊं देण्यास विरोध करून पाकिस्तानचे सरकार युद्धकैद्यांचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा करीत आहे. पाकिस्तानने आता हा प्रश्न हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायालयांत गुदरला आहे. ह्याचा अर्थ असा होतो की युद्धकैद्यांचा प्रश्न भारताशी सरळ वाटाघाटी करून सोडवण्याचा दरवाजा बंद करण्यात आला आहे. कारण ह्या आंतरराष्ट्रीय कोर्टाचा निकाल जाहीर होईपर्यंत युद्धकैद्यांचा प्रश्न तसाच लोंबकळत राहणार आहे. पाकिस्तान जागतिक कोर्टात गेल्यामुळे सिमला कराराचा भंग झाला आहे, असे भारत मानू शकेल. वास्तविक भारत-बांगला देश संयुक्त पत्रकात कैद्यांच्या, बंगाल्यांच्या व पाकिस्तानी नागरिकांच्या त्रिविध अदलाबदलीबद्दल जो मार्ग सुचविण्यात आला आहे तो अनेक दृष्टींनी उत्साहजनक आहे. भारताने सुचविलेल्या मार्गाबद्दल पाकिस्तानला काही खुलासा हवा असेल तर दोन्ही देशांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यासही भारताने तयारी दाखविली आहे. परंतु तसे करण्यापूर्वी संयुक्त पत्रकातील अटी मात्र पाकिस्तानने मान्य केल्या पाहिजेत अशी भारताची भूमिका आहे. पाकिस्तानने बंगालमधील बिहारी परत घेण्याची तयारी दाखविली तर मग काहीं अडचण उरणार नाही. खुद्द पाकिस्तानात बिहारी मुसलमानांबद्दल सरकारने घेतलेल्या भूमिकेला एकमुखी पाठिंबा नाही. पाकिस्तानांतील विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीने बिहारी मुसलमानांच्या परतीला पाठिंबा दिलेला आहे.

---

## विजेरीवर चालणाऱ्या मोटारगाड्या

विजेरीवर चालणाऱ्या प्रवासी व मालवाहू मोटारी रस्त्यावर धावू लागण्याचे दिवस फारसे दूर राहिलेले नाहीत. ब्रिटनमध्ये अशा मोटारींना लागणाऱ्या विजेऱ्या तयार करण्यात क्रांति होत आहे. नव्या प्रकारच्या विजेऱ्या वजनाने हलक्या असतील, पण त्यांची शक्ती मोठी असेल.

---

## चीनच्या औद्योगिक वाढीला दुष्काळाचा तडाखा

दिल्ली येथील इन्स्टिटयूट ऑफ डिफेन्स स्टडीज ह्या संघटनेने केलेल्या मूल्यमापनाप्रमाणे गेल्या वर्षी चीनमध्ये जो दुष्काळ पडला त्यामुळे त्या देशाच्या औद्योगिक प्रगतीचा वेग बराच मंदावला आहे. ह्या अभ्यासासाठी चीनमधील दोन प्रांत नमुन्यादाखल घेण्यात आले होते. दोन प्रांतांतील परिस्थितीवरून सर्व चीनविषयी निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. ते अर्थातच सर्वांशांनी बरोबर असणारे नसले तरी सबंध देशांतील परिस्थितीची थोडीबहुत कल्पना देण्याइतपत निर्दोष मानण्यास हरकत नाही. चीनचे राज्यकर्ते शेतीला सर्व अर्थव्यवस्थेचा पाया समजतात आणि उद्योगधंद्यांना त्या खालोखाल प्रमुख स्थान देतात. दुष्काळामुळे शेतीची दुरवस्था झाली आणि म्हणून औद्योगिक प्रगती मंद झाली असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे. मोठ्या औद्योगिक संघटनाप्रमाणेच चीनमध्ये छोट्या व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांनाही मानाचे स्थान देण्यात आलेले आहे. ह्याचे एक उदाहरण म्हणून छोट्या खतकारखान्याचे देता येईल. चीनमध्ये अशा प्रकारचे छोटे खतकारखाने जवळजवळ साडेसात हजार आहेत आणि ते सर्व देशभर पसरून ठेवण्यात आलेले आहेत. दरम्यान गेल्या दोन वर्षांत चीनचा अमेरिकेबरोबर होणारा व्यापार बराच वाढला आहे. १९७१ साली चीनने अमेरिकेला ५० लाख डॉलर्सपेक्षाही कमी किमतीचा माल पाठविला होता. उलट अमेरिकेकडून चीनला करण्यात येणारी आयात दुर्लक्षणीय होती. १९७२ साली हे चित्र बदलून चीनला प्रतिकूल अशी तफावत उभयता देशांच्या व्यापारात झाली. अमेरिकेची चीनकडून आयात ३·२३ कोटी डॉलर्सच्या घरांत गेली. उलटपक्षी अमेरिकेने चीनला निर्यात केलेल्या मालाची किंमत ६ कोटी डॉलर्सपेक्षा थोडी अधिक झाली.

---

## शस्त्रास्त्रासाठी लागणाऱ्या पोलादाचा कारखाना

आधुनिक शस्त्रास्त्रे तयार करण्याच्या कसबात भारत हळूहळू स्वयंपूर्ण होऊ लागला आहे. पण अजूनही काही खास प्रकारचे पोलाद तयार होत नाही. त्यासाठी परदेशांवर अवलंबून राहावे लागते. असे पोलाद फार मोठ्या प्रमाणावर लागते असे नाही. पण जे लागते, ते शस्त्रास्त्र निर्मितीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. ह्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी ४८ कोटी रुपये खर्चून एक कारखाना उभारण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. तोफखान्याच्या बाबतीतही असेच स्वावलंबनाचे धोरण स्वीकारण्यात येत आहे. अजून भारताच्या लष्करात दुसऱ्या महायुद्धात वापरल्या गेलेल्या २५ पौंडी तोफा आहेत. ह्या तोफेऐवजी दुसरी तोफ तयार करण्यात भारतीय शास्त्रज्ञांना व तंत्रज्ञांना यश मिळाले आहे. ह्या तोफा तयार करण्यासाठी ४० कोटी रुपयांचा कारखाना स्थापन करण्यात यावयाचा आहे.

---

## मालमत्ता करण्याचा हक्क मूलभूत मानता येत नाही

संरक्षण उत्पादन खात्याचे राज्यमंत्री श्री. व्ही. सी. शुक्ल ह्यांनी मुंबई येथे बोलताना भारताच्या घटनेत समाविष्ट केलेल्या मूलभूत हक्कांविषयी आपले विचार व्यक्त केले आहेत. प्रोग्रेसिव्ह ग्रुपतर्फे आयोजित केलेल्या आपल्या व्याख्यानात ते म्हणाले की घटनेत मूलभूत हक्कांचा जो निर्देश करण्यात आलेला आहे त्यात मालमत्ता करण्याच्या हक्काचा समावेश आहे. हा हक्क मूलभूत हक्कांत समाविष्ट करण्यात ऐतिहासिक चूक झालेली आहे. देशाला जर प्रगती करावयाची असेल तर ह्या हक्काची मूलभूत हक्कांतून हकालपट्टी करण्यात आली पाहिजे. नाहीतर देशाची प्रगतिपथावरील पावले अडखळत पडतील. मूलभूत हकात निर्देश केलेले हक्क हवेसारखे विरळ आहेत. उलट, मालमत्ता करण्याचा हक्क हा व्यावहारिक व जड स्वरूपाचा हक्क आहे. हा हक्क फक्त कायदेशीर असू शकतो; मूलभूत असूच शकत नाही. अमेरिकेसारख्या भांडवलशाही देशातही ह्या हक्काला फक्त कायदेशीर स्वरूपच आहे. कोणत्याही लोकशाही समाजात मालमत्तेचा हक्क हा मूलभूत मानता येणार नाही. सरकारने ज्या ज्या वेळी नवी वाट शोधण्याचा प्रयत्न केला त्या त्या वेळी प्रचलित परिस्थिती ज्यांना बदलावयास नको आहे त्यांच्या गटांकडून सरकारला प्रखर विरोध सहन करावा लागला आहे. गतकालात न्यायसंस्थेतील नौकरांनी लोकसभेची इच्छा डावलण्याचे प्रयत्न केले आहेत. परंतु लोकांची इच्छा ही सार्वभौम ठरणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जीवनावश्यक सर्व वस्तूंचा व्यापार स्वतःच्या हातात घेऊन सरकार दलालांचा वर्ग नाहीसा करील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या मताने किमतीमधील चढउतार दलालच घडवून आणतात.

---

## परदेशात काम करणारे हिंदी तंत्रज्ञ

उच्च शिक्षण घेतलेले हिंदी तंत्रज्ञ अजूनही परदेशात जाण्यास उत्सुक असतात. त्यामुळे भारत हुषार तज्ज्ञांना मुकत आहे. अशा शास्त्रज्ञांचा व तंत्रज्ञांचा बरोबर आकडा सांगता येत नाही. परंतु असा अंदाज आहे की ३०,००० कुशल तंत्रज्ञ परदेशात काम करीत आहेत. एकट्या अमेरिकेत ३,००० हिंदी शास्त्रज्ञ आणि २,००० पदव्युत्तर शिक्षण घेतलेले एंजिनिअर्स कामावर आहेत. त्याशिवाय विविध ज्ञानशाखातील उच्च शिक्षण घेणारे १० हजारावर विद्यार्थी वेगळेच. ह्या पारंगत तंत्रज्ञांत डॉक्टर्स व वैद्यकीय व्यवसायातील इतर कुशल लोक आहेतच. पण त्याशिवाय वाहतुकीचा खास अभ्यास केलेले अर्थशास्त्रज्ञ, रासायनिक एंजिनिअर्स, शेतीतज्ज्ञ, इत्यादींचाही समावेश आहे. भारताला ह्या तंत्रज्ञांची गरज नाही असे मात्र म्हणता येत नाही.

---

**D. E. Society's**
**Brihan Maharashtra College of Commerce**
**Poona-4.**

## "Admission For The Academic Year 1973-74."

The College will reopen on 15th June, 1973 for the academic year 1973-74. In view of the limited accommodation, admissions to the B. Com. Part. I, S. Y. B. Com. and T. Y. B. Com. classes will be given in the first instance to the students of this College. Students from other Colleges will be admitted, only if vacancies are available.

**Hours for Admissions :— 11·00 a. m. to 2·00 p. m.**

1. The programme of the admission to the various classes will be as follows ;—

| | |
|---|---|
| P. D. Com. | : From 7th June to 9th June. |
| B. Com. Part I<br>S. Y. B. Com.<br>T. Y. B. Com. | From 4th June to 7th June.<br>(B. Com. Part I, S.Y.B. Com. and T. Y. B. Com. students who could not enroll themselves between 4th and 7th June, should secure the admission between 11th June and 14th June.) |
| M. Com. | : From 21st June to 25th June. |

( M. Com. Classes will begin from 1st July 1973 ).

Students of this College must bring their Identity Card and their statement of marks with them at the time of taking the admission.

2. Students seeking admission to the Pre-Degree Commerce class should bring with them the following along with the admission form :—

(1) S. S. C. Statement of Marks ( Two copies of the same )
(2) School leaving certificate ( do )
(3) Identity card-size photograph ( Two copies )

Forms of application for admission and Copies of the Prospectus will be available in the College Office during Office hours.

3. Students should note the following College timings for the new academic year :—

| | |
|---|---|
| P. D. Com. and T. Y. B. Com. | : 8-00 a.m. to 11-20 a.m. |
| B. Com. Pt. I & S. Y. B. Com. | : 11-45 a. m. to 2-45 p.m. |
| M. Com. | : 6-00 p. m. to 8-15 p. m. |

**N. K. Kulkarni**
Principal.

म. ए. सोसायटीचे

## गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स

**पुणे ४**

* उन्हाळ्याच्या सुटीनंतर दि. १५ जून १९७३ पासून शैक्षणिक वर्षाची सुरुवात.
* बी. कॉम्. पदवीसाठी, अॅडव्हान्स्ड अकौंटिंग अँड ऑडिटिंग, अॅडव्हान्स्ड कॉस्ट–अकौंटिंग व इंडस्ट्रियल मॅनेजमेंट या विषयांची सोय,
* एम्. कॉम्. ( दुसरा भाग ) च्या अभ्यासक्रमासाठी अॅडव्हांस्ड अकौन्टिंग, अॅडव्हांस्ड कॉस्टिंग, बिझिनेस अॅडमिनिस्ट्रेशन व कंपनी लॉ अँड टॅक्सेशन् या विषयांची सोय.
* एम्. कॉम्. व बी. कॉम्. चे वर्ग सकाळी ७॥ ते ११॥. पदवीपूर्व व एफ्. वाय्. कॉम्. चे वर्ग दुपारी ११॥ ते ४॥
* माहितीपत्रक व 'प्रवेश अर्ज' कचेरीत ७५ पैशाला मिळेल. टपालाने पाहिजे असल्यास १ रु. ची तिकीटे पाठवावीत. कार्यालयाची वेळ सकाळी ९ ते दुपारी २.
* १९७२–७३ मध्ये याच महाविद्यालयात शिकत असलेल्या व मार्च १९७३ मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या विविध परीक्षांत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांनी निकाल लागल्यावर ताबडतोब प्रवेश घ्यावा. उशिरा आल्यास प्रवेशाची हमी नाही.

दि. ३१ मे १९७३

श. वा. चिरमुले,
प्राचार्य

## गुजरात राज्यांत नवीन गौळवाडे स्थापणार

गुजरात राज्यांत सध्या ८ गौळवाडे आहेत. त्यांत येत्या ५ वर्षांत आणखी आठांची भर घालण्यात यावयाची आहे. गुजरातच्या शेती व गौळवाडे खात्याच्या मंत्र्यांनी ही माहिती देताना आणखी असे सांगितले की राज्यांत ८ निरनिराळ्या जिल्ह्यांत नवीन गौळवाडे स्थापन करण्यात येतील. ते सर्व कार्यान्वित झाले म्हणजे मुंबई–दिल्लीसारख्या मोठ्या शहरांची गरज तर भागविता येईलच. पण त्याशिवाय इतरत्रही काही दूध-पुरवठा करता येणे शक्य होईल. गौळवाडे स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने डेअरी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनची संघटना उभारली आहे. कॉर्पोरेशनचे भांडवल २ कोटी रुपयांचे असेल. त्यांतील ५० लाख रुपयांची सोय चालू आर्थिक वर्षांत करण्यात आली आहे. नव्या गौळवाड्यांच्या स्थापनेची सुरुवात म्हणून अमरेली, कच्छ आणि वलसाड जिल्ह्यांत त्यांची प्राथमिक संघटना करण्यात येणार आहे. राज्य सरकारला मध्यवर्ती सरकारकडून ८ कोटी रुपयांची मदत मिळणार आहे. ह्या रकमेचा उपयोग करून दूधसागर, अमूल, इत्यादी गौळवाड्यांचा विस्तार करण्यात येणार आहे. विस्ताराचे काम पूर्ण झाल्यावर मुंबईच्या दूधदुभत्याच्या गरजा नीट भागविता येणे शक्य होईल. सध्या राज्यांत मेहसाणा, खेडा., सुरत, बडोदा, भडोच, बनासकंठा, साबरकंठा आणि अहमदाबाद ह्या ठिकाणी गौळवाडे आहेत. ह्या सर्व गौळवाड्यांत मिळून दररोज सरासरी १० लाख लिटर दूध तयार होते. तथापि ह्या गौळवाड्यांतून पूर्ण उत्पादनक्षमतेने उत्पादन होत नाही. तसे ते झाले तर दुधाचे उत्पादन सध्याच्या दुप्पट होण्यासारखे आहे. दुधाचा पुरवठा भरपूर व्हावा म्हणून राज्य सरकार चांगल्या दुधाळ गाईंची व म्हशींची पैदास करण्याची खटपट करीत आहे.

---

## स्टेट्समनच्या वार्षिकातील अपप्रचार

लंडन येथून प्रसिद्ध होणाऱ्या स्टेट्समनच्या वार्षिकात १९७१ अखेर झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धाबद्दल गैरसमज पसरविण्यासारखा अपप्रचार करण्यात आलेला आहे ह्या घडामोडींसंबंधी माहिती देताना स्वच्छ असे म्हटले आहे की १९७१ च्या डिसेंबर महिन्यात भारताने पाकिस्तानशी युद्ध सुरू केले. असे विधान वार्षिकात तीन ठिकाणी करण्यात आले आहे. जगाच्या नकाशातील कालदर्शक विभाग आणि टेलिकम्युनिकेशन्स ह्या बाबतीत मात्र भारताला वगळण्यात आलेले आहे. बांगला देशाची पाकिस्तानी लष्कराच्या मगरमिठीतून सुटका करण्यात तेथील मुक्तिवाहिनीने बरीच कामगिरी केलेली आहे. तिचा उल्लेखच करण्यात आलेला नाही. भारताने पूर्व पाकिस्तानच्या लष्कराचा पराभव केला असा उल्लेख करून पश्चिम आघाडीवरील घटनांबाबत संपूर्ण मौन्य पाळण्यात आलेले आहे.

---




बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना

**निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना**

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते,

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेड्युल्ड बँक

**महाराष्ट्रात सर्वत्र शाखा**




**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

MARATHI

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | | |
|---|---|---|
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी | दूर ध्व नी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)<br>कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)<br>उपकार्यालय नं.१: २६०३०६ नं.२: २९०००६ |

राज्य सहकारी भूविकास बँक व राज्यातील तिच्या २५ जिल्हा शाखा यांच्यामार्फत तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच ट्रॅक्टर व जमीन-सुधारणेकरिता कर्ज-वाटप करण्यात येते. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

डी. एस. जोशी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक



"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५


| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक




## ★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

विजय पंपस् कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो, त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच.




कारखानदार—
फोन : २३२
तार : Vijayplow

## न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, २० जून, १९७३ | अंक ११

## आतां घरांत एखादा टेलीव्हीजन सेट घ्यावा असा बेत चालला असेल ना तुमचा ?



## त्यासाठीं आमच्या संचित ठेव योजनेखाली बचत करा...

या योजनेमुळे मिळणारा फायदा सर्वाधिक आहे. मुदत ठेवींमध्ये मिळणाऱ्या फायद्यापेक्षाही अधिक !
तुमच्या मनात भरलेल्या त्या नवीन टेलिव्हिजन सेटसाठी या योजनेखाली बचत करा.
मग पाहा खरेदीचा बोजा असा काही जाणवणारच नाही !
खालील कोष्टक पहा म्हणजे तुमच्या हे लक्षात येईल की ही योजना म्हणजे खरोखरी एक वरदानच आहे.

| रक्कम | मुदत (महिने) | परत मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| रु. १००० | १८ | रु. ११०० |
| रु. १००० | ३३ | रु. १२०० |
| रु. १००० | ४६ | रु. १३०० |
| रु. १००० | ६० | रु. १४०० |
| रु. १००० | ६९ | रु. १५०० |

या योजनेखाली शंभर रुपयाच्या पटींमध्ये देखील ठेव स्वीकारली जाते.
आमच्या कोणत्याही शाखेतून अधिक तपशील मिळू शकेल.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.

729 Mar

## व्यापारी बँकांची प्रगती

| | जून १९६९ | जून १९७० | जून १९७१ | डिसेंबर १९७१ | जून १९७२ | डिसेंबर १९७२ |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. व्यापारी बँका ... | ८९ | ८५ | ८० | ८३ | ८३ | ८३ |
| २. भारतातील कचेऱ्या ... | ८२६२ | १०१३१ | १२१०३ | १२९८५ | १३६२० | १४७३९ |
| (अ) ग्रामीण ... | १८३२ | ३०६२ | ४२७९ | ४८८९ | ४८१५ | ५३२५ |
| (ब) निम-शहरी ... | ३२२२ | ३६९५ | ४०१७ | ४२२४ | ४३७३ | ४५८७ |
| (क) इतर शहरी ... | १४४७ | १५८३ | १७७७ | १८५० | २३२३ | २४६१ |
| (ड) मेट्रोपॉलिटन व बंदरी शहरे | १६६१ | १७९१ | १९४० | २.२२ | २१०९ | २३६६ |
| ३. किती लोकसंख्येस एक कचेरी (हजार) | ६५ | ५४ | ४६ | ४३ | ४२ | ३७ |
| ४. शेड्यूल्ड बँकाकडील ठेवी (कोटी रु.) | ४६४६ | ५२७० | ६२१६ | ६९३७ | ७५९६ | ८१४६ |
| ५ शेड्यूल्ड बँकांची कर्जे (कोटी रु.) | ३५९९ | ४२१३ | ४७६३ | ५०५२ | ५४६६ | ५३९८ |
| ६. दर कचेरीतील सरासरी ठेवी (लक्ष रु.) | ५८ | ५३ | ५२ | ५४ | ५६ | ५६ |
| ७. दर कचेरीने दिलेली कर्जे (लक्ष रु) | ४५ | ४२ | ४० | ३९ | ४० | ३७ |
| ८. कर्जे–ठेवी प्रमाण % ... | ७७·५ | ७९·९ | ७६·६ | ७२·८ | ७०·८ | ६६·३ |
| ९ इन्व्हेस्टमेंट–ठेवी % ... | २९·३ | २८·५ | २९·१ | ३१·० | ३०·४ | ३५·१ |
| १०. रोकड–ठेवी प्रमाण % ... | ८·२ | ६·८ | ६·५ | ६·३ | ६·५ | ६·६ |

**बँकांकडील ठेवीत प्रचंड वाढ**— शेड्यूल्ड व्यापारी बँकांकडे १ जून, १९७३ रोजी ८,८३०·२१ कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. एका आठवड्यात त्या ४३·६० कोटी रु. नी वाढल्या. २८ ऑक्टोबर १९७२ नंतरच्या ७ महिन्यांत ठेवींमध्ये ९३८·७० कोटी रु. ची भर पडली आहे. एका वर्षापूर्वीच्या मानाने १ जून रोजी १,४५३·४७ कोटी रु. नी ठेवी अधिक होत्या. म्हणजे त्यात १९·५% ची भर पडली.

**चारमिनार सिगारेट्सची निर्यात**—दि वझीर सुलतान टोबॅको कंपनीला रशियाकडून १० कोटी सिगारेटसची ऑर्डर मिळाली आहे. चारमिनार फिल्टरकिंग सिगारेटस या काही पेट्या तिकडे नुकत्याच रवाना झाल्या.

**नटराजाच्या मूर्तीच्या निर्यातीचा प्रयत्न**—१,००० वर्षांची पुरातन नटराजाची मूर्ती कस्टम्सला फसवून अमेरिकेकडे पाठविण्याचा कट फसला. पेटीवर "दुर्मिळ ग्रंथ" असे लिहिले होते पण आत अमूल्य मूर्ती होती. दक्षिण भारतातील देवळातून ती चोरलेली असावी. अमेरिकेत तिला ८० लक्ष रु. किंमत आली असती.

**रेल्वेज–लघुउद्योगांचे गिऱ्हाईक** — रेल्वेज दर साल ४० कोटी रु. किंमतीचे वेगवेगळ्या ५०० प्रकारचे सुटे भाग आयात करतात. रेल्वेजची सुटच्या भागांची वार्षिक खरेदी ४०० कोटी रु. ची आहे. लघुउद्योगांना हे आकर्षक आव्हान आहे, असे श्री. चंद्रकांत किर्लोस्कर हे आयात केल्या जाणाऱ्या सुटच्या भागांच्या पुणे येथे भरलेल्या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी म्हणाले.

**शिक्षकांचे पगार सहकारी बँकांमार्फत मिळणार**— महाराष्ट्रातील सरकारी मदतीने चालणाऱ्या ५,५०० शाळांतील ७०,००० शिक्षकांना १९७३–७४ च्या शालेय वर्षापासून सहकारी बँकांमार्फत पगार दिले जातील.

**८५० कोटी रु. ची तूट नोटा छापून भरून काढली**— १९७२–७३ मधील तुटीच्या अर्थव्यवस्थेला ८५० कोटी रु. च्या कृत्रिम चलनाची मदत घ्यावी लागली. १९७२–७३ च्या अंदाजपत्रकातील दुरुस्त अंदाजातील ५५० कोटी रु. च्या आकड्यापेक्षा हा आकडा ३०० कोटी रु नी मोठा आहे.

**निर्मनुष्य ड्रायव्हरने आगगाडी चालविली**—१·५ किलोमीटर लांबीची ९,००० टन वजनाची एक मालगाडी रशियातील युक्रेन राज्यातील २०० कि मी. मार्गावर 'ऑटोमेटिक' ड्रायव्हरने चालविली ! त्या गाडीच्या विजेच्या इंजिनांना इंजिन ड्रायव्हर नव्हता. ठरलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आगगाडीने प्रवास केला प्रत्यक्ष इंजिन ड्रायव्हर जी कामे करतो, ती सर्व ह्या निर्मनुष्य ड्रायव्हरने केली.

**नागालँडमधील खेड्यांना वीज**—पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात नियोजन मंडळाने नागालँडसाठी एक ग्रामीण विद्युत् पुरवठा योजना मंजूर केली आहे. योजनेसाठी सुमारे ३ कोटी रुपये खर्च येईल. योजनेप्रमाणे निदान २०० खेडेगावांना तरी विजेचा पुरवठा करण्यात येईल. त्याशिवाय राज्यातील विद्युत् पुरवठा वाढविण्यासाठी आणखी २·३० कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २० जून, १९७३





संस्थापक
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक
श्रीपाद वामन काळे


"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## शस्त्रास्त्रांचा धंदा चालू ठेवण्यासाठी निर्यात

निक्सन सरकार अमेरिकेतील शस्त्रास्त्रांचा उद्योगधंदा चालू ठेवण्यासाठी शस्त्रास्त्रांची विक्री अधिक मुक्त हस्ताने करण्याचे धोरण स्वीकारील असे दिसत आहे. अलीकडेच अमेरिकन सरकारने इराण, कुवेत आणि सौदी अरबस्थान ह्या देशांना ४०० कोटी डॉलर्स अथवा ३,००० कोटी रुपयांची शस्त्रास्त्रे पुरविण्याचे कबूल केले आहे पाकिस्तानला घातक शस्त्रे सोडून इतर प्रकारची शस्त्रे विकण्यात येत आहेतच. ह्याविषयी भारताने दिलेल्या धोक्याच्या इशाऱ्याचा काही उपयोग झालेला नाही. इस्राइल हा देश अमेरिकेचा दोस्त आहे. त्यालाही अरब देशांना करण्यात येणाऱ्या शस्त्रपुरवठ्याबद्दल चिंता वाटत आहे. त्यामुळे अरब देशांचा इस्राइलला असलेला धोका वाढेल असे अमेरिकेला वारंवार कळविण्यात आले आहे. परंतु त्याचा काही परिणाम झालेला नाही. अशा धोक्याला तोंड देण्याचे सामर्थ्य इस्राइलपाशी आहे असा युक्तिवाद अमेरिका करीत आहे द. व्हिएटनाममधील सरकारला करण्यात येणारा शस्त्रास्त्रांचा पुरवठा आता बंद झाला आहे. अशा परिस्थितीत अमेरिकेतील शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांचे मालक आपल्या मालासाठी नव्या बाजारपेठा शोधत आहेत. अमेरिकेच्या रिपब्लिकन पक्षात ह्या कारखानदारांचे चांगले वजन आहे. सरकारातही त्यांचे पाठीराखे आहेत तेव्हा नव्या धोरणाबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. अविकासित देशांना आणि अरब देशांना शस्त्रास्त्रे पुरविण्यावर बंधने घालण्याचे धोरण फसले आहे. कारण ब्रिटन, फ्रान्स व इतर युरोपीय देश त्यांना शस्त्रास्त्रे विकत आहेत असा युक्तिवाद अमेरिकेतर्फे करण्यात येत आहे. शिवाय शस्त्रास्त्रांच्या विक्रीमुळे अमेरिकेची परदेशीय देणीघेणी सुधारतील असेही सांगण्यात येत आहे.

## कृषिउद्योगांची वाढ शेतीला आवश्यक

इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संघटनेचे सरचालक डॉ. स्वामिनाथन् ह्यांनी रशिअन वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत भारताच्या समतोल विकासाविषयी महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात की, भारतामधील शेतीच्या विकासाशी कृषिउद्योगांच्या वाढीची सांगड घालण्यात आली पाहिजे ह्या दोन्ही क्षेत्रांची परस्परांशी हळूहळू जुळणी करीत गेल्यास अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील व लोकांचे उत्पन्न वाढून देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासही मदत होऊ शकेल. कृषिउद्योगांच्या वाढीमुळे रोजगारी तर वाढेलच; पण ग्रामीण भागातील लोकांच्या खरेदीच्या शक्तीतही त्यामुळे भर पडेल. ह्या मार्गाने शेती व उद्योगधंदे ह्यांची सांगड घडून येईल आणि विकास समतोल पद्धतीने साधता येईल. सोव्हिएट रशिआत अशा प्रकारचा समतोल विकास घडवून आणण्यासाठी शेतीशास्त्रज्ञांनी आणि तंत्रज्ञांनी चांगले कार्य केले आहे. अलीकडे भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यान शास्त्रीय व तांत्रिक सहकार्याचा ५ वर्षांचा करार करण्यात आला आहे. त्याचा फायदा भारताला शेतीच्या बाबतीत झाला आहे. तांदुळाच्या सुधारलेल्या जातींविषयी एक परिसंवाद लवकरच ताश्कंद येथे भरविण्यात येणार आहे. त्यात भारत भाग घेणार आहे. रशिआने वालुकामय ओसाड जमिनी लागवडीयोग्य करण्याच्या कामी बरेच उपयुक्त कार्य केलेले आहे. ओसाड व रेताड जमीन शेतीसाठी वापरात आणण्यात भारत रशिआतील प्रयोगांपासून बरेच शिकू शकेल त्यासाठी रशिआचे सहकार्य मिळण्यास अडचण पडणार नाही.

---

## बांगला देशात खर्च झालेली मदत परत देणार नाही

पाकिस्तानचे नियोजन आणि विकासमंत्री मि. मुबाशिर हसन ह्यांनी पाकिस्तानला आर्थिक मदत देणाऱ्या देशांना असे सांगितले आहे की मदतीदाखल मिळालेल्या कर्जाचा जो हिस्सा बांगला देशावर खर्च झाला आहे त्याची परतफेड पाकिस्तान करणार नाही. सध्या ही परतफेड स्थगित केल्याचे सांगून ते म्हणाले की, मदत देणाऱ्या राष्ट्रांच्या संघटनेला पाकिस्तानने अशी स्पष्ट समज दिली आहे की, कर्जाचा हा हिस्सा परत देण्याचे बंधन पाकिस्तानवर नाही. त्याची जबाबदारी ढाक्यामधील प्रशासकांवरच आहे. पाकिस्तानने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय कर्जाबद्दल ढाका येथील प्रशासकांशी तडजोड करण्याविषयी पाकिस्तानला सांगण्यात आलेले नाही. ज्या देशांनी पाकिस्तानला मदत दिलेली आहे त्यांनी काही गोष्टी लक्षात ठेवायला पाहिजेत. मिळालेल्या कर्जांनी आणि मदतीच्या पैशाने पाकिस्तानला स्वतःची आर्थिक घडी सावरता आलेली नाही. अर्थातच आर्थिक घडी नीट बसल्याशिवाय कर्जाच्या परतफेडीचा प्रश्नच उद्भवत नाही. •

## मोठ्या लिमिटेड कंपन्यांची १९७१-७२ मधील कामगिरी

(बिगर-आर्थिक, बिगर-सरकारी, प्रत्येकी १ कोटी रु.पेक्षा अधिक वसूल भांडवल असलेल्या ३४६ कंपन्यांचा १९७१-७२ मधील कामगिरीचा हा आढावा आहे.)

१९७१-७२ मध्ये, ह्या ३४६ कंपन्यांची विक्री ११.०% ने आणि उत्पादनाची किंमत ११.५%ने वाढली.

एकूण खर्चाच्या वाढीचे प्रमाण एकूण उत्पादनवाढीच्या प्रमाणापेक्षा जास्त असल्याने करपूर्व नफ्यात फक्त २.८% ने वाढ झाली.

ठोक नफ्याचे निव्वळ विक्रीशी प्रमाण १२.३% चे ११.७% वर आले. ठोक नफ्याचे एकूण गुंतविलेल्या भांडवलाशी प्रमाण ११.३ % चे ११.१% झाले त्याचप्रमाणे करानंतरच्या नफ्याचे नेटवर्थशी म्हणजे वसूल भांडवल + रिझर्व्हजशी प्रमाण १२.०% वरून ११.८% वर उतरले. ह्या सर्वच दृष्टींनी कंपन्यांचा किफायतशीरपणात घट झाली.

३४६ कंपन्यांपैकी ३१८ कंपन्यांनी मिळून एकूण ६०० कोटी रु. ठोक नफा मिळविला, तर २८ कंपन्यांनी मिळून एकूण १५ कोटी रु. तोटा दाखविला. २८९ कंपन्यांच्या करपूर्व नफ्याची रक्कम ४५१ कोटी रु. भरली तर ५७ कंपन्यांचा एकूण तोटा ३२ कोटी रु. भरला. नफा मिळविणाऱ्या २५५ कंपन्यांनी १४७ कोटी रु. नफा न वाटता स्वतःच्या कामासाठी वापरात आणला.

वसूल भांडवल, रिझर्व्हज्, तरतुदी, घेतलेली कर्जे, व्यापारी व इतर देणी, इत्यादींची बेरीज ३४६ कंपन्यांच्या बाबतीत ५७७ कोटी रु. होते. त्या सर्वांचे मिळून उत्पादन ५,०९१ कोटी रु. झाले. म्हणजे, प्रत्येक कंपनीने सरासरीने वापरलेल्या भांडवलाच्या रकमेच्या ८.८ पट उत्पादन केले. कंपन्यांच्या ५७७ कोटी रु फंडसपैकी ३७२ कोटी रु. स्वतःच्या भांडवलातले होते, घसारा व इतर तरतुदींचे २५२ कोटी रु. होते आणि रिझर्व्हज् व वाढावा ह्यांचे १२० कोटी रु. होते.

### काही तुलनात्मक आकडे

| | १९७०-७१ कोटी रु. | १९७१-७२ कोटी रु. |
|---|---|---|
| विक्री | ४,५११ | ५,००६ |
| उत्पादनाची किंमत | ४,५६७ | ५,०९१ |
| एकूण उत्पन्न | ४,६५७ | ५,१०४ |
| एकूण खर्च | ४,१०४ | ४,६०९ |
| ठोक नफा | ५५३ | ५८५ |
| दिलेले व्याज | १४६ | १६६ |
| करपूर्व नफा | ४०७ | ४१९ |
| कराची तरतूद | १६५ | १८५ |
| करानंतर नफा | २४२ | २३४ |
| डिव्हिडंडची रक्कम | १२२ | १२५ |
| न वाटलेला नफा | १२० | १०९ |

### बर्माशेल अणुशक्तीच्या उद्योगात शिरणार

बर्माशेल कंपनी खनिज तेलाच्या व्यापाराबद्दल सर्व जगात प्रसिद्ध पावलेली आहे. आता ह्या कंपनीने अणुशक्ती उत्पादनाच्या क्षेत्रात पदार्पण करण्याचा निर्णय घेतला आहे. गल्फ ऑइल ह्या अमेरिकेच्या प्रचंड तेल कंपनीच्या सहकार्याने अणुशक्ती निर्माण करण्याची केंद्रे उभारण्याचे काम ती करणार आहे. कंपनीने त्यासाठी ८ कोटी डॉलर्सचा एक कार्यक्रम तयार केला आहे. गल्फ ऑइल ही कंपनी अमेरिकेत ६ नवी अणुशक्ती केंद्रे बांधणार आहे, अशी अणुशक्ती केंद्रे युरोपात बांधण्याचे काम मिळावे म्हणून कंपनी प्रयत्नशील आहे. गल्फ कंपनीत अर्धे भांडवल बर्माशेल घालणार आहे. जगात खनिज तेलाच्या पुरवठ्याचा प्रश्न बिकट झाला आहे. त्यातून उद्भवणाऱ्या संभाव्य अडचणींना तोंड देण्यासाठी ही तयारी चालू आहे.


बँकेतील नोकरीसाठी बँकिंग व बुककिपींग या विषयांचा आवश्यक व उपयुक्त अभ्यासक्रम

**बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स**

४० वी बॅच सोमवार दि. ९ जुलैपासून सुरू होईल.

मुदत :- २ महिने. वेळ :- सकाळी. माध्यम :- इंग्रजी व मराठी

डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे २.

## वृत्तपत्रांच्या खपाच्या मानाने त्यांच्या जाहिरातींच्या दरात भरमसाट वाढ

वृत्तपत्रांचे जाहिरातींचे दर वाढले, परंतु त्या मानाने त्यांचा खप वाढलेला नाही. म्हणजे जाहिराती अधिकच महाग झाल्या आहेत. जीवनावश्यक जिनसांच्या किंमतींच्या वाढीवर हीच वृत्तपत्रे सडकून टीका करीत असतात. काही तुलना येथे दिल्या आहेत.

| वृत्तपत्र | १९६४–७२ खपामध्ये वाढ % | १९६४–७२ जाहिरातींच्या दरांत वाढ % |
|---|---|---|
| १० ते २५ हजार खप | | |
| फ्री प्रेस जर्नल | –११ | ६५ |
| फिनॅन्शिअल एक्सप्रेस | १७ | १० |
| इकॉनॉमिक टाइम्स | ११५ | ५१ |
| मातृभूमी | ९२ | २२ |
| २५ ते ५० हजार खप | | |
| मराठा | –१७ | ६५ |
| नवशक्ती | १४ | १२० |
| नवा काळ | –१० | २३० |
| तरुण भारत ( पुणे ) | २१९ | २०८ |
| केसरी | ४७ | ६० |
| ५० हजार ते १ लाख | | |
| सकाळ | ४४ | २५८ |
| १ लाख ते २ लाख | | |
| टाइम्स ऑफ इंडिया | २६ | ८१ |
| इंडियन एक्सप्रेस | १६ | ३३ |
| हिंदू | ३४ | १०८ |
| लोकसत्ता | २१ | ३१ |
| महाराष्ट्र टाइम्स | १०६ | १०६ |

१९६४–७२ ह्या मुदतीत, सर्व वृत्तपत्रांच्या खपाचा एकत्रित विचार केला तर खपात ४४·५% वाढ झाली आणि जाहिरातींच्या दरांत ९६·९% वाढ झाली. तरुण भारत, ( पुणे ), महाराष्ट्र टाइम्स, मातृभूमि, इत्यादींनी खपाच्या वाढीच्या मानाने जाहिरातीचे दर भरमसाट केलेले नाहीत.

## बँक अधिकारी निर्दोषी

सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे तीन वरिष्ठ अधिकारी गेले ३५ दिवस सक्तीच्या रजेवर होते. लाईफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनकडून ४·५ कोटी रु. ची ठेव मिळविण्यासाठी दिलेले कमिशन नियमाविरुद्ध होते असा त्यांचेवर आरोप होता, त्याची सेंट्रल ब्यूरो ऑफ इनव्हेस्टिगेशनने चौकशी केली. त्यात हे अधिकारी दोषमुक्त ठरले. ते आता पुनः कामावर रुजू झाले आहेत.

## भुईमुगाच्या लागवडीऐवजी सूर्यफुलाची लागवड

गेल्या वर्षी आंध्र, मध्यप्रदेश आणि तामीळनाडूमधील काही निवडक भागांत सूर्यफुलाची लागवड करण्यात आली होती. ही लागवड बरीच यशस्वी झाल्याचे सांगण्यात येत आहे. हे यश ध्यानात घेऊन चालू खरीप व रब्बी हंगामात २ लाख हेक्टर अधिक जमिनीत सूर्यफुलाची लागवड करण्याचा विचार सरकार करीत आहे. येत्या तीन वर्षांत सूर्यफुलाच्या लागवडीखालील क्षेत्र तिप्पट वाढण्याची शक्यता दिसत आहे. हिंदमध्ये सध्या खाण्याच्या तेलाची टंचाई खूपच जाणवत आहे. सूर्यफुलाचे तेल उपलब्ध होऊ शकले तर ही टंचाई बरीच कमी होण्याचा संभव आहे. भुईमुगाशी तुलना करता सूर्यफुलाचे उत्पादन आणि त्यापासून मिळू शकणारे तेल ह्यांचे प्रमाण बरेच अधिक आहे. गेल्या वर्षी सूर्यफुलाच्या लागवडीखाली असणाऱ्या काही चांगल्या जमिनीत सूर्यफुलाचे उत्पादन भुईमुगापेक्षा १५ पटीने अधिक आले. शिवाय त्यापासून मिळणारे तेल ५० टक्के आहे. भुईमुगापासून मिळणाऱ्या तेलाचे प्रमाण ४० टक्के आहे. काही तज्ज्ञांच्या मताने सध्या जितकी जमीन भुईमुगाच्या पिकाखाली आहे त्यांपैकी निम्मी जमीन त्या पिकाला योग्य अशी नाही. परंतु दुसऱ्या पर्यायी पिकाचा अभाव असल्यामुळे शेतकरी भुईमुगाची पेरणी करत असतो. हे खरे असेल तर अशा जमिनीत सूर्यफुलाची लागवड करण्यास हरकत असू नये. तथापि, सूर्यफुलाचे तेल वापरण्याची तयारी ग्राहक कितपत दाखवतो आणि त्या तेलाची बाजारात किती लवकर आवक होते ह्यावर ह्या बाबतीतील यश अवलंबून आहे. गेल्या वर्षी ज्यांनी सूर्यफुलाची लागवड केली त्यांना पस्तावण्याचा प्रसंग आला. कारण, त्यांचे पीक बाजारपेठेत नेण्यास खाजगी किंवा सरकारी अशी कोणतीच संघटना उभारण्यात आली नव्हती. त्यामुळे ह्या उत्पादकांची कुचंबणा झाली.

## ऑस्ट्रेलिअन गृहिणींचा वाढत्या किंमतींना विरोध

ऑस्ट्रेलिआच्या पंतप्रधानांच्या पत्नी मिसेस मार्गारेट व्हिटलाम दिल्ली येथील दूरचित्रवाणीवर मुलाखत देताना म्हणाल्या की ऑस्ट्रेलिआपुढे वाढत जाणाऱ्या किंमतींचा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. ऑस्ट्रेलिअन गृहिणी रोज खपाच्या वस्तूंना द्याव्या लागणाऱ्या वाढत्या किंमतींना विरोध करण्यास पुढे सरसावल्या आहेत. त्यांची संघटना आता बरीच प्रभावी होत चालली आहे. वाढत्या किंमतींना वस्तू विकणाऱ्या अनेक दुकानांवर त्यांनी बहिष्कारही घातलेला आहे. ऑस्ट्रेलिआपुढे उभ्या असणाऱ्या प्रश्नांपैकी काही प्रश्न भारतासारखेच आहेत. भारताच्या मानाने ऑस्ट्रेलिआची लोकसंख्या कमी असली तरी तेथेही सामाजिक समस्या आहेतच. त्यांपैकी एक मोठी समस्या म्हणजे राहत्या घराची टंचाई.

## स्वस्तिकचे तांत्रिक सल्लागार श्री. बी. जी. वैद्य ह्यांचा युरोपचा दौरा



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लि. चे तांत्रिक सल्लागार, श्री. बी. जी. वैद्य हे १७ जून, १९७३ रोजी युरोपीय देशांच्या दौऱ्यासाठी मुंबईहून रवाना झाले. प्लॅस्टिक्स-लिनोलिअम एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलने कॉमन मार्केट देश आणि पूर्व युरोपीय देश ह्यांकडे प्लॅस्टिक्सच्या वेगवेगळ्या उद्योगांच्या सहा प्रतिनिधींचे एक मंडळ पाठविले आहे. त्याचे एक सभासद ह्या नात्याने श्री. वैद्य हे गेले आहेत. हे मंडळ लंडन, ॲम्स्टरडॅम, पॅरिस, ब्रुसेल्स, ड्यूसेलडॉर्फ, फ्रँकफूर्ट, प्राग आणि मॉस्को येथील प्रमुख व्यापारी संस्थांना भेट देईल आणि तेथील बाजारपेठेचा अभ्यास करील. प्लॅस्टिक व रबरी उत्पादनाच्या नव्या तंत्रांचाही ते अभ्यास करील. विविध प्रकारच्या स्वस्तिक उत्पादनांच्या विक्रीबाबत चर्चा करणे, हे श्री. वैद्य ह्यांचे उद्दिष्ट आहे. युरोपीय बाजारपेठेत आजही स्वस्तिकच्या मालाचा चांगला खप आहे. १९७२ मध्ये स्वस्तिकने १९ लक्ष रु. चे पीव्हीसी गमबूट निर्गत केले होते. १९७२ मध्ये ती ४० लक्ष रु. वर जाईल अशी अपेक्षा आहे. श्री. वैद्य १७ जुलै रोजी परत येतील

---

### प्रथिनाच्या संशोधनाला दिलेले चुकीचे वळण

आशिआतील लोकांच्या आहारात प्रथिनांची कमतरता असल्याचे सांगितले जाते. भारतामधील लोकांचा आहारही ह्या बाबतीत निकृष्ट आहे. अर्थात ही उणीव भरून काढण्यासाठी प्रथिनयुक्त अन्नपदार्थांचा पुरेसा पुरवठा झाला पाहिजे. दारिद्र्याने गांजलेल्या आशिआ खंडातील देशांच्या ह्या गरजेचा आपल्या फायद्यासाठी उपयोग करून घेण्याची कारवाई उद्योगधंद्यांत प्रगत असलेले देश करीत आहेत, असा आरोप डॉ. नरेंद्र सिंग ह्यांनी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या एका प्रकाशनात केला आहे. डॉ. सिंग हे भारताच्या मध्यवर्ती अन्न संशोधन संस्थेत काम करणारे आहार-विषयक तज्ज्ञ आहेत. प्रकाशनात लिहिलेल्या आपल्या लेखात ते म्हणतात की औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले देश स्वतःच्या राजकीय व आर्थिक हितसंबंधासाठी विकसनशील देशांतील प्रथिनांच्या संशोधनाला चुकीचे वळण देत आहेत. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाच्या बुरख्याखाली हे देश पेट्रोलपासून प्रथिने बनविण्याच्या संशोधनाला प्राधान्य देत आहेत. वास्तविक हिरव्या वनस्पतीपासून प्रथिने बनविण्यास अधिक वाव आहे. अशा संशोधनाला ४० वर्षांपूर्वीच प्रारंभ झालेला आहे. पेट्रोलपासून प्रथिने बनविण्याविषयीचे संशोधन त्या मानाने अगदी अलीकडे सुरू झालेले आहे. तरीसुद्धा पेट्रोलिअमपासून प्रथिने बनविण्यास हितसंबंधीयांनी भरपूर पाठिंबा दिला आहे. असा प्रयत्न भारतात फ्रान्सच्या मदतीने ३ वर्षांपूर्वीपासून करण्यात येत आहे. बडोदा येथे एक छोटासा प्राथमिक कारखानाही चालू करण्यात आलेला आहे. हिरव्या वनस्पतीपासून प्रथिने बनविण्याची खटपट डॉ. सिंग हॉलंडमधील प्रयोगशाळेत करीत आहेत.

---

### आत्मघाताच्या कारणांचे संशोधन

संरक्षण खात्याच्या मानसशास्त्रीय विभागाने दिल्ली शहरातील आत्मघाताच्या प्रकरणांचा अभ्यास केला आहे. आत्मघाताची अनेक कारणे संशोधकांनी नमूद केलेली आहेत. घरी होणाऱ्या छळाला कंटाळून सुना आत्मघातास प्रवृत्त होतात अशी सामान्यतः समजूत आहे आणि ती अजूनही अगदीच निराधार आहे असे म्हणता येणार नाही. तथापि, सासरी होणाऱ्या छळापायी आत्मघात करणाऱ्या सुनांची संख्या आता बरीच घटली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. हल्लीच्या अर्थप्रधान जमान्यात आर्थिक कारणावरून होणाऱ्या आत्मघातांची संख्या वाढत चाललेली आहे संरक्षणखात्याने केलेल्या अभ्यासावरून ह्या अनुमानाला पुष्टी मिळत आहे. आत्मघातांची माहिती जमा करीत असताना अभ्यासकांना असे दिसून आले की आत्मघातांचे प्रमाण मासिक प्राप्ती २५० रुपयांपेक्षा कमी असलेल्या घरांतून अधिक आहे. त्यातही आत्मघाताच्या प्रकारात स्त्रियांची संख्या अधिक दिसून आली. केवळ घरकाम करणाऱ्या १० स्त्रियांपैकी ९ जणींनी ह्याच कारणापायी आत्महत्या केल्याचे आढळून आले. ह्याचा अर्थ असा की आर्थिक दुरवस्थेचा जाच सर्वच कुटुंबांना सोसावा लागत असला तरी त्याची घातक धार मुख्यतः स्त्रियांनाच सोसावी लागते. आर्थिक कारणाशिवाय इतर कारणे आत्मघाताच्या प्रकारामागे नसतात असे मात्र म्हणता येणार नाही. अतीव दारिद्र्यामुळे लोक आत्मघातास प्रवृत्त होतात हे तर खरेच. पण, त्याशिवाय इतर अनेक कारणे असू शकतात. एकटेपणाची भावनाही आत्महत्येला प्रवृत्त करणारी असते. वयस्कर माणसांना ह्या भावनेची बाधा होण्याचा संभव अधिक असतो. तरीसुद्धा ही भावना आर्थिक कारणातून उद्भवण्याची शक्यता नजरेआड करता येणार नाही.

---

## दुष्काळग्रस्तांकडून सोन्याची विक्री होत आहे

महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांतील शेतकरी व इतर ग्रामीण लोक आपल्या जवळील सोने विकून टाकू लागल्याच्या वार्ता येत आहेत. सोने अडीअडचणीला उपयोगी पडते म्हणून ते शक्य तर न विकण्याची वृत्ती भारतात रूढ आहे. अगदीच नाइलाज झाला म्हणजे मगच सोने विकून आत्यंतिक गरज भागविण्याची वृत्ती येथे परंपरागत आहे. म्हणूनच सोन्याची विक्री होऊ लागली की संकट दुसऱ्या मार्गाने निभवून नेण्याचे सर्व प्रयत्न फसले असा त्याचा अर्थ आहे. अंगावरील सोन्याचे दागिने विकावे लागणे हे अशुभ असल्याची भावना भारतामधील स्त्रियांत तर फार काळापासून रूढ आहे. सोन्याचा हा पडून असणारा साठा बाजारात येऊ लागल्यामुळे चोरट्या सोन्याची मागणी कमी होईल असे मात्र म्हणता येणार नाही. मोठ्या शहरांत अनेकांच्या जवळ काळ्या पैशाचा साठा असल्याने शक्य तितक्या लवकर ह्या पैशाचे सोन्यात रूपांतर करण्यास ते लोक उत्सुक असतात. शिवाय लग्नकार्याच्या मोसमात सोन्याची मागणी वाढत जाते. त्यामुळे सोन्याच्या मागणीला एकदम चालना मिळण्याची शक्यता नाही. इतिहासकाळात भारत हा देश नेहमीच सोन्याची आयात करणारा देश दिसून येतो. मग ही निर्यात कायदेशीर असो अगर बेकायदेशीर म्हणजे चोरटी असो. म्हणूनच भारतात जोपर्यंत विवाह होत आहेत तोपर्यंत लंडनमधील सोन्याचा बाजार चालणारच असा अभिप्राय व्यक्त करण्यात आलेला आहे. भारतामधून सोन्याची निर्यात सोन्याच्या आयातीपेक्षा जास्त झाली ती एकदाच. १९२९ साली जगावर कोसळलेल्या आर्थिक अरिष्टाच्या वेळी मात्र भारतामधून सोन्याची निर्यात आयातीपेक्षा जास्त झाली. पण हा काळ फक्त तीनच वर्षांचा होता.

## दिल्लीत भीक मागणारे गोरे भिकारी

नवी दिल्लीतील कॉनॉट प्लेस म्हणजे हौशी खरेदी करणारांचे एक जबरदस्त आकर्षण आहे. अशा ठिकाणी भिकारी दृष्टीस पडणे कठीणच. पण अलीकडे तेथेही भिकारी दिसू लागले आहेत आणि तेही गोरे. अनेक देशांतून ते आलेले आहेत. पश्चिम जर्मनी, स्वित्झर्लंड, डेन्मार्क, कॅनडा इत्यादी देशांतील भिकाऱ्यांचा त्यात समावेश आहे. हे गोरे भिकारी चांगल्या सधन कुटुंबातीलही असतात, आणि वर शिकलेले असतात. त्यांना जर विचारले की भीक मागण्याची लाज वाटत नाही का? तर ते उत्तरतात "त्यात लाज कसली? आम्हाला जगावयाचे आहे." पुष्कळसे भिकारी असे म्हणतात की मानसिक शांतता आणि मुक्ती ह्यांच्या प्राप्तीसाठी त्यांनी घरेदारे सोडली आहेत. सर्वच भिकारी भिक्षेवर जगतात असे नाही. त्यांच्यापैकी पुष्कळांना घरून पैसे येत असतात. पण ते वेळेवर आले नाहीत तर भीक मागण्याशिवाय त्यांना गत्यंतर उरत नाही. भीक मागून किती तरी भिकारी रोज १५ रुपयांपर्यंत कमाई करतात. कधी कधी कमाई २५ रुपयांपर्यंतही जाते. पण त्यासाठी त्यांच्यातील स्त्रियांना हात पसरावा लागतो. जमलेल्या भिकेपकी ७५ टक्के पैसा ते अन्नावर खर्च करतात. बाकीच्या पैशातून सिगरेट, विड्या, चरस, गांजा, इत्यादींवर होणारा खर्च भागविला जातो. भिकाऱ्यांची बहुधा जोडपी असतात. पण त्यांचा विवाह झालेला असतोच असे नाही; ते एकत्र राहात असतात इतकेच. कॉनॉट प्लेस भागात वावरणारे हिंदी लोक सामान्यतः सधन असतात. त्यांच्याकडून रुपया, आठ आणे मागून घेऊन ही जोडपी हॉटेलात जातात आणि आपली क्षुधा शमवतात. पुरुषही ह्या बाबतीत मागासलेला नाही.

---

## पिच्छोला सरोवर कोरडे पडले

अरवली पर्वताच्या पायथ्याशी वसलेले उदयपूर शहर सरोवरांचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. शहरानजीक असलेला सरोवरातील राजवाडा हौशी प्रवाशांचे एक आवडते ठिकाण म्हणून जगभर ज्ञात आहे. आता ह्या राजवाड्यात एक अलिशान हॉटेल चालविण्यात येत असले तरी त्याचे आकर्षण कमी झालेले नाही. सरोवराच्या मध्यावर बांधलेला हा पुराणा राजवाडा अप्रतिम मानला जातो. राजवाडा पाहण्यासाठी जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी आता दिसत नाही. कारण हे सरोवर अगदी कोरडे ठणठणीत पडले आहे. पाण्यातून ने-आण करणारे नावाडी बेकार झाले आहेत. सरोवरात नेहमी ३० ते ५० फूट खोलीपर्यंत पाणी असते. पण आता राजस्थानला बसलेल्या अवर्षणाच्या तडाख्याने सरोवरातून पायीच जाता येते. अर्थात, ओसाड पडलेल्या राजवाड्यात शुकशुकाट आहे. हे सरोवर निर्जल झाल्याची माहिती कोणालाही नाही. सरोवरात पाणी नसल्यामुळे हॉटेल बंद करण्यात आलेले आहे. उदयपूर शहराची वस्ती सुमारे २ लाख असून त्यातील अनेक जणांना प्रवाशांच्या रहदारीमुळे उद्योगधंदा मिळत असे. शिवाय, सरोवराच्या पाण्याचा त्यांना भरपूर लाभ होत असे. तेच कोरडे पडल्याने उदयपूरच्या रहिवाशांची दैना उडाली आहे. आता पावसाळा तोंडावर आला आहे. पाऊस पुरेसा पडला नाही तर सरोवर भरण्याची आशा नाही. दरम्यान तळयातील सुंदर इमारती दुरून एखाद्या अवाढव्य प्राण्याप्रमाणे पसरलेल्या दिसतात. त्यातून माणसे राहात असतील अगर राहिली असतील अशी कल्पना सुद्धा येत नाही. पिच्छोला सरोवराप्रमाणेच अजमीरजवळील पुष्कर सरोवरही जवळजवळ आटले आहे. त्याचा फायदा घेऊन शेकडो वर्षांत साफ न केलेले हे तीर्थ आता गाळ उपसून स्वच्छ करण्यात येत आहे.

---

**पाकिस्तानचे नवे तळ**—पाकिस्तान इराणच्या सहकार्याने पश्चिम बलुचिस्थानात दोन नवे लष्करी तळ उभारीत आहे. बलुचिस्थानचे माजी मुख्य मंत्री सरदार मेंगल ह्यांनीच ही माहिती जाहीर केली आहे. त्याशिवाय मध्य बलुचिस्थानातही आणखी एक तळ उभारण्यात येणार आहे. अलीकडेच बलुचिस्थानातील काही टोळ्यांनी बंडाळी माजविली होती. त्या संदर्भात ही माहिती अर्थपूर्ण वाटते.

## भारतामधील मोठ्या शहरांतील प्रदूषण भयावह

सेंट्रल पब्लिक हेल्थ एंजिनिअरिंग इन्स्टिटयूटने भारतामधील काही शहरांच्या हवेच्या प्रदूषणाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की ह्या शहरातील हवेचे प्रदूषण भयावह अवस्थेला पोचले आहे. दिल्ली व कलकत्ता येथील हवेत गंधक मिश्रित अशा एका विषारी वायूचे प्रमाण फार वाढलेले आहे. अमेरिकेत ह्या वायूचे प्रमाण काही कमाल मर्यादेपर्यंतच राखले पाहिजे असा दंडक आहे. रशिआ आणि पश्चिम जर्मनी ह्या देशांतही अशा प्रकारचे निर्बंध जारी करण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्या देशांतील मोठ्या शहरांतील हवेच्या प्रदूषणाला काही प्रमाणात आळा बसला आहे. युरोपमधील बहुतेक शहरांतून असे निर्बंध घालण्याचे प्रयत्न चालू आहेत. बहुतेक युरोपीय देशांतून दर चौरस मैलामागे १५० ते २०० टन विषारी धूळ हवेतून पडत असते. ह्या उलट, कलकत्त्यात १९७० मध्ये हे प्रमाण १५९ असे होते तर दिल्लीत १९७१ मध्ये ८११ टन होते. हवेत असे दूषित धूलकण पसरणे आरोग्याच्या दृष्टीने घातक असते. अशा प्रकारच्या हवेमुळे दमा, कायमचा खोकला आणि फुप्फुसाचे इतर रोग फैलावण्याचा धोका उत्पन्न होतो. मोटारींच्या नळ्यांतून आणि घराघरांतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे कॅन्सर होण्याचा संभव असतो. शिवाय वैद्यकीय शास्त्राला कारण सांगता येणार नाही अशा प्रकारच्या व्याधीही उत्पन्न होतात. शहरातील कचऱ्यांना आग लावून नाश करण्यात येतो व पिकांच्या रक्षणासाठी औषधे फवारण्यात येतात ह्या पद्धतींमुळेही हवेच्या प्रदूषणात भर पडत जाते. ग्रामीण भागात हवा प्रदूषित झालेली नाही. परंतु तेथे सांडपाण्याची नीट व्यवस्था नसते. शिवाय मलमूत्राचा निचराही समाधानकारक नसतो. त्यामुळे अनेक खेड्यांतून दुर्गंधी पसरलेली दिसते.

---

## इंडिअन एअर लाइन्ससाठी रशिआची विमाने !

हिंदमधील अंतर्गत विमानवाहतूक करणारी इंडिअन एअरलाइन्स ही कंपनी रशिअन बनावटीची विमाने घेण्याचा विचार करीत आहे. रशिआची विमाने भारतात वापरण्यासाठी कितपत योग्य ठरतील ह्याचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांचे एक मंडळ रशिआचा दौरा करण्यास गेले होते. ह्या मंडळाने आपली पाहणी पुरी केली असून आपला अहवाल ते लवकरच पुरा करील. रशिआत बनणाऱ्या प्रवासी विमानांची पाहणी केल्यावर टी. यू. १५४ ह्या रशिअन विमानासंबंधी तज्ज्ञांचा बरा ग्रह झाल्याचे समजते. भारतामधील प्रमुख विमानमार्गांवर ते वापरण्यासारखे असल्याचे त्यांचे मत आहे. ह्या विमानात १६६ प्रवासी बसू शकतात. इंडिअन एअर लाइन्सचे अध्यक्ष श्री. सेन ह्यासंबंधी वार्ताहरांशी बोलताना म्हणाले की मंडळाने आपली पाहणी समाधानपूर्वक पार पाडली आहे. रशिआच्या प्रतिनिधींनी दिलेला सहकारही चांगला होता. आता विमानाची किंमत, ती प्रत्यक्ष ताब्यात मिळण्याचे वेळापत्रक, विमाने घेतल्यास त्यांची दुरुस्ती व देखभाल इत्यादी बाबींविषयी बोलणी करण्यात येत आहेत. पुढील महिन्यात मंडळ आपला तपशीलवार अहवाल सरकारला सादर करील व मगच सरकार निर्णय घेईल. विमानांना लागणारे सुटे भाग देण्याचे आणि हिंदी तज्ज्ञांना शिक्षण देण्याचे रशिआने मान्य केले आहे. पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात इंडियन एअर लाइन्सला १२० उतारू बसू शकणाऱ्या २५ विमानांची गरज लागणार आहे. रशिआशी चाललेली बोलणी फलद्रूप झाली तर १९७४ च्या अखेरीस अगर १९७५ च्या प्रारंभी रशिअन विमाने हाती येतील असे दिसते.

---

## रक्तदानाच्या खरेदीची पद्धत बंद करण्याची मागणी

आधुनिक वैद्यकीय उपायात रक्तदानामुळे मिळू शकणाऱ्या रक्ताला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. कोणत्याही कारणामुळे रोग्याच्या अंगातील रक्त कमी झालेले असेल तर त्याला बाहेरून रक्ताचा पुरवठा करून आपत्ती टाळता येण्याची शक्यता असते. रक्तदान करणाऱ्यांना संबंधित संस्थांकडून पैसे देण्यात येतात. म्हणजे हे रक्त विकतच घेतलेले असते. अशा साठविलेल्या रक्ताच्या बँकाच अस्तित्वात आलेल्या आहेत. ह्या उलट लोकांनी पैसे न घेता स्वेच्छेने रक्त द्यावे म्हणूनही प्रयत्न करण्यात येत असतात आणि युद्धासारख्या प्रसंगी रक्तदानाच्या आवाहनांना प्रतिसादही चांगला मिळतो. रक्तदानाला पैसे देण्यात येत असल्यामुळे ह्या उपयुक्त कामात अपप्रवृत्ती शिरलेल्या आहेत. काही गरजू लोक आपले रक्त देऊन स्वतःची आर्थिक गरज भागविताना दिसतात. त्यांत अनेकांचे रक्त संक्रमण करण्याच्या योग्यतेचे नसण्याचा अगर ते दूषित असण्याचा धोका असतो. म्हणून दिल्ली येथील रक्ताच्या बँकेच्या प्रतिनिधींनी सरकारला अशी विनंती केली आहे की पैसे देऊन रक्त जमविण्याच्या पद्धतीला बंदी घालण्यात यावी आणि स्वेच्छेने करण्यात येणाऱ्या रक्तदानाला प्रोत्साहन देण्यात यावे. ह्यासाठी एक कायदाच करण्यात यावा असे सुचविण्यात आले आहे. दरम्यान, स्वेच्छेच्या रक्तदानाला उत्तेजित करण्यासाठी काही उपाय सुचविण्यात आले आहेत, ते असे. सरकारी नोकऱ्या देताना जे लोक नियमितपणे रक्तदान करीत असतील त्यांना प्राधान्य देण्यात यावे; त्याचप्रमाणे सरकारच्या शिक्षणखात्याने रक्तदानाची मोहिम विद्यार्थ्यांत पसरावी म्हणून विशेष प्रयत्न करावे.

---

## अफगाणांना हिप्पींचा तिरस्कार

अफगाणिस्थानात सुमारे चारपाच हजार हिप्पींनी धुमाकूळ घातला आहे. त्यात अमेरिकन्स, स्कँडिनेव्हिअन्स, फ्रेंच, ब्रिटिश, जर्मन, इत्यादी तरुण आहेत. लेबॅनॉन, इराण आणि तुर्कस्थान ह्या देशांच्या सरकारांनी अमली पदार्थ सेवन करण्यावर कडक निर्बंध घातल्याने त्यांनी आता अफगाणिस्थानात स्थलांतर केले आहे. त्यांचा तेथेही तिरस्कार होत आहे.

# व्यवस्थापनातील समस्या (९)

## नको असलेले अधिकारी कमी करण्याचे आधुनिक व्यवस्थापन तंत्र

( सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम्. बी. ए. )

आजच्या औद्योगिक क्षेत्रातील समस्या या दिवसेंदिवस अधिक क्लिष्ट व अवघड होत चालल्या आहेत. उत्पादनात प्रमाणाबाहेर वाढ किंवा घट, विक्रीत तशीच फार मोठी वाढ किंवा घट, उत्पादनव्यवस्थेत किंवा विक्रीव्यवस्थेत मोठे बदल, व्यवस्थापन-पद्धतीत बदल, कंपनीच्या नेतृत्वात बदल, इत्यादी कारणांमुळे कंपनीतील महत्त्वाच्या जागांवर असलेले अधिकारी या वेळी अपात्र किंवा अनावश्यक वाटू लागतात. या अधिकाऱ्यांची कंपनीतील नोकरी, व्यक्तिगत महत्त्व, वय, समाजातील दर्जा वगैरे लक्षात घेता त्यांना सहजासहजी कामावरून दूर करणे व त्यांच्या जागी दुसऱ्या कोणास बढती देणे किंवा नवी नेमणूक करणे या विषयीचे निर्णय घेणे संचालकांस जड जाऊन महत्त्वाचे बदल टाळले जातात किंवा पुढे ढकलले जातात. याउलट, काही कंपन्यांत अशा अधिकाऱ्यांना बढती देऊन पण अडचणीच्या जागी बदलले जाते; त्यांना एखादे लहान ऑफिस दिले जाते. त्यांना दिलेल्या विशेष सवलतींपैकी एखादी नाकारली जाते किंवा त्यांना इच्छेविरुद्ध रजेवर पाठविले जाते. स्वतःच्या प्रतिष्ठेला जपणारे अधिकारी यापासून योग्य तो बोध घेऊन बाणेदारपणे राजीनामा देतात व दुसऱ्या दिवसापासून पुन्हा नोकरी शोधण्याच्या उद्योगाला लागतात. आजच्या आधुनिक व्यवस्थापन तंत्रांनुसार वरील मार्ग हे रानटीपणाचे मानले जातात. त्याऐवजी अमेरिकेसारख्या प्रगत औद्योगिक समाजात अनावश्यक अधिकाऱ्यांना दूर करण्याचे शास्त्रशुद्ध मार्ग उपयोगात आणले जात आहेत. त्यासंबंधी खालील माहिती सर्व संबंधितांस खास मार्गदर्शक ठरेल अशी आशा आहे.

मि. थॉमस ह्यूबार्ड या गृहस्थांनी टी. एच. इनकॉर्पोरेटेड ही कंपनी केवळ अधिकारी कमी करण्याच्या कामासाठी स्थापन केली आहे. मि. ह्यूबार्ड ह्यांना एका जाहिरात कंपनीतून ज्या तऱ्हेने कमी करण्यात आले व जी भरपाई देण्यात आली त्यावरून टी. एच. कंपनी काढण्याची कल्पना सुचली व आज-पर्यंत गेल्या ५ वर्षांत त्यांनी २,०००हून अधिक अधिकारी कमी करण्यास वेगवेगळ्या शेकडो कंपन्यांना मदत केली आहे.

मि. ह्यूबार्ड म्हणतात, 'एखाद्या अधिकाऱ्याला' विशेषतः जुन्या व वरिष्ठ अधिकाऱ्याला कामावरून कमी करणे हे उद्योग-व्यवसायाच्या प्रगतीस अनेकदा आवश्यक होते. वस्तुतः हे एक अतिशय तापदायक काम आहे. बऱ्याच वेळा कामावरून कमी होणाऱ्या अधिकाऱ्यांपेक्षा त्यांना कमी करणारे अधिकारी किंवा संचालक जास्त नर्व्हस होतात आणि प्रसंगी जरुरीपेक्षा अधिक भरपाई मंजूर करतात. यासाठी मि. ह्यूबार्ड यांची कंपनी हे काम मोठ्या कौशल्याने पार पाडून सन्मानपूर्वक हा प्रश्न हाताळते. अधिकाऱ्याला कामावरून कमी केल्याचे प्रत्यक्ष सांगण्यापूर्वी काय व कसे बोलायचे, किती भरपाई मंजूर करायची या सर्वांचा विचार व तयारी टी. एच. कंपनी अगोदर करते व वेळ पडल्यास या प्रसंगाची एक रंगीत तालीमही करण्यात येते. यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांना योग्य तो धीर घेऊन हा प्रसंग पार पाडता येतो. टी. एच. कंपनीच्या सहकार्याने अधिकारी कमी करण्याची क्रिया हलुवारपणे, परस्पर संबंध फारसे न दुखावता, व जाणाऱ्या अधिकाऱ्याच्या मनातील कटुता कमी करून साधण्यात येते.

मानसशास्त्राच्या दृष्टीने हा प्रश्न सोडविण्याचा मि. ह्यूबार्ड यांचा प्रयत्न असतो. त्यांच्या मते, बऱ्याच कंपन्या नुकसान-भरपाई किंवा निवृत्तिवेतन म्हणून मोठी रक्कम देऊन या अधिकाऱ्यांना कमी करतात व काही अधिकारी पुन्हा नोकरीच्या मागे न लागता या पैशावर उर्वरित आयुष्य काढण्याचे ठरवितात. पण दीर्घकाळ नोकरीत घालविलेली ही माणसे बहुधा या आळशी जिण्यास कंटाळतात, आयुष्यात निराश होतात किंवा दारूचे गुलाम होतात. काही लोक नवीन व्यवसायात पडण्याचा जुगारी निर्णयही घेऊन फसतात.

वरील अपाय टाळण्यासाठी मि. ह्यूबार्ड हे एक पर्यायी वेतन-योजना सुचवितात. त्याप्रमाणे, कामावरून कमी झालेल्या अधिकाऱ्यास दुसरी नोकरी मिळेपर्यंत किंवा टी. एच. कंपनी त्याच्यासाठी दुसरी नोकरी शोधेपर्यंत कंपनीने त्याला पगार व औषधोपचार, विमा इ. सवलती चालू ठेवाव्यात. यामुळे कामा-वरून कमी झालेल्या अधिकाऱ्यास पूर्वीच्याच इतमामाने वावरता येते व आपल्या कुटुंबियांशी व मित्रमंडळींशी खोटे बोलून किंवा त्यांना चुकवून नवीन नोकरी शोधण्याची पाळी येत नाही. त्यांचा मानसिक तोल सावरला जातो. टी. एच. कंपनी या अधिकाऱ्यांना उपयुक्त अशी नोकरी स्वतःच्या मार्गदर्शना-खाली मिळवून देते. मात्र यासाठी टी. एच. कंपनी इतर कंपन्यांना शिफारस करीत नाही पण या अधिकाऱ्यांनाच त्यांनी मुलाखतीची तयारी कशी करावी, कोणत्या प्रकारच्या कंपन्यांत त्यांना चांगला वाव मिळेल, कोठे त्यांची प्रगती होईल, इ. माहिती ही कंपनी पुरवते.

मि. ह्यूबार्ड ह्यांच्या मते निदान ८५% लोकांना तरी दुसरी चांगली नोकरी बहुधा अधिक पगाराची मिळवून देण्यात ते यशस्वी झाले आहेत. अधिकारी कमी करण्याच्या या कामासाठी टी. एच. कंपनी साधारणपणे त्या अधिकाऱ्याच्या वार्षिक पगाराच्या १५% इतकी फी आकारते. मि. ह्यूबार्ड हे इंग्लंड व युरोपातील इतर प्रगत देशांत आपल्या कंपनीच्या शाखा उघडणार आहेत. त्यांच्या मते आधुनिक उद्योगव्यवसायांची ही एक गरज आहे. भारतासारख्या देशात या तऱ्हेची कंपनी असले कार्य यशस्वीपणे करू शकेल काय?

( इकॉनॉमिक टाइम्स, दि. ६ मे १९७३ वरून )

## पाणथळ जमिनीची सुधारणा करणार

देशांतील पाणथळ जमिनीची सुधारणा करून ती लागवडी-योग्य करण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. ज्या भागांत अशा जमिनी आहेत तेथील प्रश्न आता बराच तीव्र स्वरूपाचा झाला आहे. पाणथळ जमिनीचा विस्तार नक्की किती आहे ते सांगणे कठीण आहे. पण अंदाजे १·२ कोटी एकर जमीन पाण्याच्या मुराव्यामुळे निरुपयोगी झाली आहे असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. पाणथळ जमीन ह्याचा अर्थ असा आहे की जमिनीच्या खाली असणाऱ्या पाण्याची पातळी वाढून ती पिकांच्या मुळांच्या खोलीच्याही वर येते. त्यामुळे वनस्पतींच्या वाढीला लागणारी हवा मुळांना मिळत नाही आणि त्यांची वाढ होत नाही. अशा प्रकारे पाण्याची पातळी वाढली तर आणखी एक संकट उत्पन्न होते. निदान तसे होण्याचा संभव बळावतो. जमिनीच्या खालच्या थरातील क्षार उफाळून वर येतात व जमीन नापिकी करून टाकतात, अगर जमिनीची उत्पादनक्षमता बरीच कमी करतात. म्हणून अशा प्रकारे निकामी झालेल्या जमिनीची सुधारणा केल्याशिवाय ती लागवडीस आणता येत नाही. जमिनीखालील पाण्याची पातळी वाढण्याचे कारण म्हणून निसर्गनिर्मित पाण्याच्या निचऱ्यात आणण्यात आलेले अडथळे सांगता येतील. भूविकास घडवून आणताना पाण्याच्या नैसर्गिक निचऱ्याला मर्यादा घालाव्या लागतात हे खरे असले तरी पाणी वाहून जाण्याची दुसरी काही तरी व्यवस्था करणे आवश्यक असते. तिकडे यावे तितके लक्ष देण्यात येत नाही. जमिनीच्यावर व खालीही पाण्याला वाहून जाण्यासाठी वाट ठेवली आणि पाणी साठून राहणार नाही अशी व्यवस्था केली तर हा प्रश्न सुटण्यास मदत होईल. त्याशिवाय नलिका विहीरी खोदूनही जमिनीखालील पाण्याची पातळी कमी करता येईल. क्षारांचा त्रास योग्य खतांचा वापर करून टाळता येतो.

---

## गिर्यारोहणाला मिळालेले प्रोत्साहन

१९५३ मध्ये तेनसिंग नोर्गे ह्या नेपाळी गिर्यारोहकाने गौरीशंकर शिखरावर चढण्याचा पराक्रम केला. त्यानंतर १९५४ मध्ये गिर्यारोहणाला प्रोत्साहन देण्यासाठी हिमालयन मौंटेनि-अरिंग इन्स्टिटयूटची स्थापना करण्यात आली. ह्या संघटनेने गिर्यारोहणाची आवड असणाऱ्यांना शिकवून तयार करण्याचे कार्य तेव्हापासून चालविले आहे. संघटनेने १९७२ पर्यंत २,४८९ पुरुष आणि ३२५ स्त्रिया ह्यांना गिर्यारोहणाचे प्राथमिक शिक्षण दिले आहे. ३४७ पुरुषांना गिर्यारोहणाच्या उच्च अभ्यासक्रमाचे शिक्षण देण्यात आले. हा अभ्यासक्रम ६४ स्त्रियांनींही पुरा केलेला आहे. त्याशिवाय ६५० तरुणांना विशेष साहसी अशा प्रकारचे शिक्षण देण्यात आले आहे. साहसामुळे मनोधैर्य वाढ-विण्यास मदत होते आणि प्रासंगिक निर्णय त्वरित घेण्याची संवय होते.

## ब्रिटिश कायदा न जुमानणारे शीख

ब्रिटनमध्ये राहणारे शीख लोक आणि त्या देशातील कायदा ह्यांच्यात संघर्ष निर्माण होऊ पाहात आहे. शीख लोक लांब केस वाढवून त्यांची विशिष्ट प्रकारची पगडी वापरतात. ब्रिटनमध्ये बसगाड्या चालविणारे अनेक शीख आहेत. वास्तविक कायद्या-प्रमाणे त्यांनी ठराविक टोप्या वापरावयास पाहिजेत. टोप्या वापरण्यास त्यांचा धार्मिक विरोध झाल्यामुळे ब्रिटिश सरकारने तेवढ्यापुरता कायदा सैल केला आहे. पण आता मोटारसायकली-वर बसणाऱ्यांनी पोलादी शिरस्त्राण घातलेच पाहिजे असा कायदा जारी करण्यात आला आहे. शीखांनी धर्माविरुद्ध म्हणून त्या कायद्यालाही विरोध सुरू केला आहे. कायदा मोडणाऱ्यांना ५० पौंडाच्या दंडाची शिक्षा सांगितलेली आहे. काही कडवे शीख तर टोपी वापरणाऱ्या शीखांना धर्मबाह्य ठरविण्याची धमकी देत आहेत.

---

## नेपाळच्या कस्तुरीच्या निर्यातीला बहर

नेपाळमधून निर्यात होणाऱ्या कस्तुरीला बहर आला आहे. एक दुर्मिळ सुवासिक वस्तू म्हणून कस्तुरीला सोन्याच्या दर औंसापेक्षाही जास्त किंमत येते. गेल्या १० महिन्यात नेपाळला कस्तुरीच्या निर्यात व्यापारामुळे ३६ लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती झाली आहे. हिमालयाच्या पठारातून कस्तुरी मृग आढळून येतात. त्यांच्या नाभीतून कस्तुरी मिळविण्यासाठी त्यांची फार मोठ्या प्रमाणावर शिकार करण्यात येते. परिणामी आता त्यांची संख्या रोडावत चालली आहे. अर्थातच ही निर्यात अशीच टिकून राहील अशी खात्री नाही. कस्तुरीचा केवळ सुगंधी द्रव्य म्हणूनच उपयोग नाही. औषधी विज्ञानातही कस्तुरीला महत्त्व आहे. तिचा पुरवठा तिबेटमार्फत होई. चीन तिबेटकडे गेल्यापासून कस्तुरी मिळविण्याचा हा मार्ग बंद झाला आहे.

---

## इतिहासात कृतज्ञतेला थारा नसतो : इराणला धडा

पाकिस्तानचे माजी अध्यक्ष आयूबखान ह्यांनी आपल्या 'फ्रेन्डस् नॉट मास्टर्स' ह्या आत्मचरित्राची पर्शिअन भाषेतील आवृत्ती प्रसिद्ध करण्याची खटपट चालविली होती. पण इराणच्या शहांनी ही खटपट फोल ठरविली आहे. १९६५ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्यात झालेल्या युद्धात इराणने पाकिस्तानला केलेल्या मदतीचा उल्लेख वरील पुस्तकात नसल्याने इराणच्या शहांचा घुस्सा झालेला आहे. पाकिस्तानातील 'नवा-इ-वक्त' ह्या उर्दू दैनिकाने ह्या बाबतीत अशी माहिती दिली आहे की १९६५ पूर्वीच इराणच्या शहाने पाकिस्तानाशी संरक्षण करार करण्याची तयारी दाखविली होती. परंतु आयूबखान ह्यांनी तिकडे दुर्लक्ष केले. युद्ध सुरू झाल्यावर मात्र अतिशय घाईने त्यांनी इराणकडे मदतीची याचना केली. इराणने शक्य झाली ती मदत दिली असा शहांचा दावा आहे.

### जपान तेलासाठी रशिआकडे झुकू लागला

अमेरिका आणि चीन ह्यांच्यांतील तणाव कमी झाल्यापासून जपान आपल्या परदेशीय राजकारणाची दिशा बदलू पाहात आहे. अमेरिका, चीन अगर रशिआ ह्यांच्या परराष्ट्रीय धोरणापासून अलिप्त राहण्याची प्रवृत्ती जपानमध्ये बळावत चालली आहे. तथापि आर्थिक दडपणामुळे ती रशिआकडे अधिक झुकू पाहात आहे, ह्याचे कारण आहे जपानची तेलाची तहान. जपानमध्ये उद्योगधंद्यांचा एकसारखा विस्तार होत आहे. तो चालू ठेवण्यासाठी त्याला तेलाची अधिकाधिक जरूरी लागत आहे. खुद्द जपानमध्ये तर खनिज तेलाचा थेंबही मिळत नाही. अशा परिस्थितीत जपान आमच्या गरजेपैकी ८० टक्के गरज पश्चिम आशिआतील अरब देशांकडून तेल आयात करून भागवीत आहे. अरब देशांकडून तेलाची आयात करावयाची तर समुद्रमार्ग अबाधित राहिले पाहिजेत. पश्चिम आशिआतील देशाचे राजकारण तेलाभोवती फिरत राहिल्याने तेलाच्या पुरवठ्याची शाश्वती जपानला वाटत नाही. म्हणून दुसऱ्या देशांकडून तेल मिळविण्याच्या खटपटीत जपान आहे. रशिआतील सायबेरिआचा प्रदेश जपानला जवळ आहे आणि आणीबाणीच्या परिस्थितीत तेथून तेल आयात करणे कठीण जाणार नाही ह्याची जपानला जाणीव आहे. सायबेरिआत तेलही भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. रशिआने जपानशी तेल पुरविण्याचा एक करारही केला आहे. कराराप्रमाणे रशिआ जपानला पुढील २५ वर्षांत दरसाल २.५ ते ४ कोटी टन अशुद्ध तेलाचा पुरवठा करणार आहे. शिवाय हा पुरवठा बोटींनी न करता सरळ तेलाचे नळ टाकून करता येण्यासारखा आहे. पुरवठ्याची व्यवस्था करण्यासाठी जपान रशिआला मोठे कर्जही देण्यास तयार आहे.

---

### अमेरिकेतील गव्हाचे भाव वाढविणार

भारत, चीन व रशिआ ह्या देशांकडून येऊ पाहणाऱ्या मागणीमुळे अमेरिकेत गव्हाचे भाव वाढत जाण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. परदेशाकडून येणाऱ्या गव्हाच्या मागणीत सारखी वाढ होत चालली आहे. भारत अमेरिकेकडून २० कोटी बुशेल गहू आयात करण्याची शक्यता आहे. रशिआने १९७२–७३ साली अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर गहू खरेदी केला. १९७३–७४ साली इतक्या मोठ्या प्रमाणावर रशिआ गहू खरेदी करणार नाही. तरी पण अडीअडचणीला उपयोगी पडावा म्हणून राखीव साठा करण्याची शक्यता आहे. चीन मात्र बराच गहू खरेदी करील असा अंदाज आहे पुरवठा करणाऱ्या देशांपैकी कॅनडाजवळ शिल्लकी गहू फारसा नाही. पश्चिम युरोपने बराच गहू रशिआला निर्यात केला आहे. आता तेथे फारसा गहू मिळण्यासारखा नाही.

---


BANK TO BANK...

THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*



सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣


— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :- ३०३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष २९ | पुणे, बुधवार, ४ जुलै, १९७३ | अंक १३

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स – कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**




**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई – १.

### इन्कमटॅक्सची जादा आकारणी बेकायदा ठरली

कु. लता मंगेशकर ह्यांनी आपल्या १९६२-६३, १९६३-६४ आणि १९६४-६५ च्या इन्कमटॅक्स रिटर्न्समध्ये अनुक्रमे १,४३,६५० रु., १,३८,२५१ रु. आणि १,१९,८५० रु. असे व्यावसायिक उत्पन्न दाखविले होते. करदात्रीच्या व्यावसायिक लौकिकाला अनुसरून हे आकडे नव्हते असे इन्कमटॅक्स अधिकाऱ्याचे मत झाले.

मद्रास येथील वासु फिल्म्सच्या जागेची इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांनी झडती घेतली तेव्हा त्यांना काही हिशेबाच्या वह्या मिळाल्या. 'भरोसा' ह्या बोलपटातील कु. लताच्या गाण्याबद्दल दिलेल्या रकमांच्या नोंदी एका वहीत होत्या. एकाच दिवशी दोन रकमा दिलेल्या दाखविण्यात आल्या होत्या. एकापुढे 'W' आणि दुसरीपुढे 'B' अशी अक्षरे लिहिलेली होती. वासुदेव फिल्म्सच्या मॅनेजिंग पार्टनरने सांगितले की 'W' ह्याचा अर्थ 'White' म्हणजे त्या रकमेची पावती घेतलेली आहे आणि 'B' ह्याचा अर्थ 'Black' म्हणजे त्या रकमेची पावती घेतलेली नाही. पैसे दिल्याचे श्री. वासु मेनन ह्यास प्रत्यक्ष ज्ञान नव्हते आणि लेजर-बुक दाखल करण्यात आलेले नव्हते. करदात्री कु. लता मंगेशकरला काही वेतन काळ्या पैशाच्या स्वरूपात घेण्याची सवयच होती असा सर्वसाधारण निष्कर्ष इन्कमटॅक्स ऑफिसरने काढला आणि तीन वर्षांतील दडवलेले उत्पन्न अनुक्रमे ६०,५५० रु., ७५,००० रु. आणि ७७,००० रु. असले पाहिजे असा अंदाज केला; त्याप्रमाणे कर बसविला. त्याचप्रमाणे असिस्टंट कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स, फिल्म विभाग, ह्यांनी करदात्रीवर दंड बसविला. कु. लता मंगेशकरने अपेलेट असिस्टंट कमिशनरकडे अपील केले, ते त्याने फेटाळून लावले. तेव्हा करदात्रीने इन्कमटॅक्स अपेलेट ट्रिब्युनलकडे अपील केले. कु. लता मंगेशकरला जेवढी रक्कम मिळाली त्यापेक्षा जास्त रक्कम त्यांना मिळाली असली पाहिजे असे मानण्यास जागा नाही, असे अपलेट ट्रिब्युनलला आढळून आले; त्याने तीनही वर्षांची जादा कर आकारणी आणि दंडाचा हुकूम हे सर्व रद्द ठरविले. इन्कमटॅक्स खात्याने हायकोर्टाकडे कायद्याचा प्रश्न सोपविण्याची परवानगी अपेलेट ट्रिब्युनलने मागितली ती नाकारण्यात आली. इन्कमटॅक्स खात्याने हायकोर्टात अर्ज करून ट्रिब्युनलने दिलेला हा निवाडा रद्द करण्याची मागणी केली. हायकोर्टाने ती मागणी नाकारली.

---

### बँकेच्या लेजरकीपरला दोन वर्षे सक्तमजुरी

रमेश वासुदेव पंगम हा महाराष्ट्र स्टेट को. बँकेत लेजरकीपर होता. एप्रिल, १९७१ मध्ये त्याने कॅनरा बँकेच्या परेल शाखेत एम. आर. राणे ह्या नावाने एक खाते उघडले, शिव आर्ट प्रिंटिंग ब्यूरोचा एक कोरा चेक चोरला, त्यावर ७,००० रुपयांचा मजकूर लिहून तो चेक एम. आर. राणे ह्या बनावट खात्यात भरला. हा चेक कॅनरा बँकेकडून महाराष्ट्र स्टेट को. बँकेत आल्यावर रमेशने तो नष्ट करून टाकला. चेक परत आला नाही तेव्हा तो पास झाला अशा कल्पनेने कॅनरा बँकेने ती रकम राणेच्या खात्यात जमा केली. नंतर रमेशने कॅनरा बँकेच्या ह्या खात्यातून ६,९०० रु. काढले आणि त्याचा उपयोग स्वतःची देणी भागविण्याकडे केला. जून, १९७१ मध्ये हा गुन्हा उघडकीस आला. मुंबईच्या सेशन्स जज्जाने गुन्हेगार लेजरकीपरला दोन वर्षे सक्तमजुरी आणि ३,००० रु. दंड अशी शिक्षा ठोठावली.

---

### खोटा चेक कॅश करणारास तीन वर्षे सक्तमजुरी

एका तेल कंपनीने एका फर्मच्या बिला-पोटी क्रॉस्ड चेकने रु. ५२,२३२·४८ पाठविले. मर्कंटाइल बँकेवर काढलेला हा चेक वाटेत गहाळ झाला. चौहानच्या ताब्यात तो आला. त्याने दोघांच्या संगनमताने चेक कॅश करण्याचा डाव रचला. एका कंपनीचे आपण मालक आहोत असे भासवून त्याने माहीम येथील एका बँकेत चालू खाते उघडले. खोटी सही करून चेक ह्या बनावट खात्यात भरला. काही दिवसांनी त्या तिघांनी खात्यातून ५१,००० रु. काढून घेतले. ज्या फर्मला तेल कंपनीने चेक पाठविला होता, तिने तक्रार केल्यानंतर गुन्हा उघडकीस आला. जज्जांनी चौहानला दोषी ठरवून तीन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा दिली; साथीदारांना दोषमुक्त केले.


बँकेतील नोकरीसाठी बँकिंग व बुककीपिंग या विषयांचा आवश्यक व उपयुक्त अभ्यासक्रम

**बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स**

४० वी बॅच सोमवार दि. ९ जुलैपासून सुरू होईल.

मुदत :— २ महिने. वेळ :— सकाळी. माध्यम :— इंग्रजी व मराठी

**डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे २.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ४ जुलै, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## श्रीमंत देशांच्या गटबाजीस पंतप्रधानांचा विरोध

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी आपल्या परदेशांच्या दौऱ्यात टोरोंटो येथे कॅनडातील उद्योगपती व व्यापारी ह्यांच्या पुढे भाषण करून असा इशारा दिला की जगातील श्रीमंत देशांनी आपले स्वतंत्र क्लब्ज स्थापन करणे जगाच्या हिताचे ठरणार नाही. जे देश अविकसित आहेत त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी सध्याचे व्यापारी धोरण बदलण्याची आवश्यकता आहे. श्रीमंत देशांनी स्वतःचे गट बनविण्याचे धोरण स्वीकारल्यास अविकसित देशांना कष्टमय जीवन जगावे लागले. त्याचे परिणाम जगाच्या भवितव्यावर फार वाईट होतील. जगातील लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्यात आला पाहिजे हे तर खरेच, पण त्याचबरोबर प्रगत समाजातील लोक पुन्हा न मिळणाऱ्या साधनसंपत्तीचा जो भरमसाट वापर करीत आहेत त्यावरही निर्बंध घालण्यात आले पाहिजेत. दारिद्र्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे. पुष्कळशा देशांचे दारिद्र्य हे त्यांच्या वासाहतिक पिळवणुकीचा परिणाम आहे. अविकसित देशांतील माणूस व्यक्तिशः जितकी संपत्ती वापरतो त्याच्या वीसपट संपत्तीचा उपभोग औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांतील व्यक्ती घेत आहेत. काही देशांत औद्योगिक क्रांती आधी झाली. त्याचा फायदा त्यांना मिळत आहे. परंतु ह्या देशांनी जगातील हवा, पाणी आणि इतर संपत्तिसाधने ह्यांच्यावर आपला अग्रहक्क असल्यासारखे वागावे हे बरोबर आहे काय? राष्ट्राराष्ट्रांत समजुतीचे वातावरण निर्माण करण्याच्या धोरणाला आता पुष्कळांचा पाठिंबा मिळत आहे. परंतु ह्या समजुतीच्या वातावरणाचा उपयोग सत्तेची वाटणी करण्यासाठी होता उपयोगी नाही. मानवी जीवन सुधारण्यासाठी त्याचा उपयोग झाला पाहिजे.

---

## सहकारी बँका छोट्या शेतकऱ्यांना मदत करीत नाहीत

रिझर्व्ह बँकेचे कार्यकारी संचालक डॉ. सी. डी. दाते ह्यांनी आंध्र प्रदेशातील कोऑपरेटिव्ह सेंट्रल बँकांच्या प्रतिनिधींसमोर भाषण करताना सहकारी बँकांच्या कामासंबंधी काही परखड विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले की सहकारी बँकांनी छोट्या शेतकऱ्यांच्या कर्जाच्या गरजा भागवाव्या अशी अपेक्षा होती. पण व्यवहारात मात्र ही अपेक्षा खोटी ठरून ह्या बँका मोठ्या जमीनदारांनाच मदत करीत असल्याचे दिसून येते. मोठ्या जमीनदार शेतकऱ्यांचे प्रमाण लोकसंख्येत २५ टक्के इतकेच आहे. परंतु त्यांच्या मालकीची जमीन मात्र लागवडीयोग्य जमिनीपैकी ७५ टक्के इतकी आहे. रिझर्व्ह बँक सहकारी बँकांच्या धोरणाला उलटी दिशा लावण्याचे प्रयत्न जारीने करीत आहे. छोट्या शेतकऱ्यांना मदत करण्याचे धोरण सहकारी बँकांनी स्वीकारले नाही तर त्यांच्या अस्तित्वाला काही हेतूच राहणार नाही. सहकारी बँका सध्या ज्या पद्धतीने काम करीत आहेत त्याचा विचार करता असे वाटते की छोट्या शेतकऱ्यांना मदत करण्याची इच्छाच त्यांना नाही. काही वेळा तर सहकारी बँकांची चक्क फसवणूक करण्यात येते. खोटी पिके आणि खोट्या जमिनी दाखवून कर्जे मिळविण्यात येतात. एका विशिष्ट जिल्ह्यात ८० टक्के जमिनीत भाताची लागवड होत असे. त्या जिल्ह्यात भाताच्या पिकासाठी देण्यात आलेल्या कर्जापैकी ८० टक्के कर्ज केळ्याची लागवड करण्यासाठी वापरण्यात आले. दुसऱ्या एका ऋणकोने उसाची लागवड करण्यासाठी बँकेकडून कर्ज घेतले. पण त्या जिल्ह्यात उसाची लागवड कधीच करण्यात येत नव्हती. अशा प्रकारच्या व्यवहारांनी सहकारी बँकांच्या कार्यक्षमतेविषयी शंका उत्पन्न होतातच पण त्याचबरोबर सर्व सहकारी क्षेत्राबद्दल लोकांच्या मनात नावड उत्पन्न होऊ लागते. त्याचा परिणाम सहकारी बँकांनाही भोगावा लागतो.

---

## रशिआ-अमेरिकेच्या दरम्यान समजुतीचे वातावरण

दुसऱ्या महायुद्धात रशिआ व अमेरिका खांद्याला खांदा लावून लढले आणि त्यांनी नाझी जर्मनीचा सपशेल पराभव केला. पण नंतर मात्र त्यांच्यात गेली २७ वर्षे शीतयुद्ध चालू होते. रशिआच्या कम्युनिस्ट पक्षाचे चिटणीस मि. ब्रेझनॉव्ह ह्यांनी आपल्या अमेरिकेच्या भेटीत हे शीतयुद्ध समाप्त झाल्याचे बोलून दाखविले. राजकीय दृष्ट्या दुरावलेले हे देश भौगोलिक दृष्ट्या अगदी जवळ आहेत. अमेरिकेचे अलास्का राज्य रशियाच्या ईशान्य कोपऱ्यापासून हाकेच्या अंतरावर आहे. अलास्काचा प्रदेश अमेरिकेने झारकालीन रशियाकडून १८६७ साली विकत घेतलेला आहे. त्याचे क्षेत्रफळ सुमारे ५,८६,४०० चौरस मैल आहे. ह्या प्रदेशासाठी अमेरिकेला त्या वेळी ७२ लाख डॉलर्स म्हणजे दर एकरामागे २ सेंट्स मोजावे लागले. अलास्कात विपुल नैसर्गिक संपत्ती आहे.

---

## तरुणांना लष्करी नौकरीचे आकर्षण वाटत नाही

भारताच्या संरक्षण खात्याच्या प्रशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना इंडिअन मिलिटरी ॲकॅडमी आणि नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी ह्यांतील जागा भरण्यासाठी पुरेसे लायक उमेद्वार मिळू शकत नाहीत म्हणून चिंता वाटू लागली आहे. लष्कर, नौदल व हवाई दल ह्यांमधील नौकऱ्यांचे तरुणांना पुरेसे आकर्षण वाटत नाही म्हणून हा तुटवडा भासत आहे असा खुलासा संरक्षण खात्याच्या प्रवक्त्याने केला आहे. संरक्षण खात्याच्या मानसशास्त्रीय विभागाने ह्यासंबंधी केलेल्या पाहणीवरून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. तरुणांना ज्या प्रकारच्या नौकऱ्यांविषयी आकर्षण वाटते त्यांचा क्रम लावला असता लष्करातील नौकऱ्यांच्या आवडीचा क्रमांक १० वा लागला. मोठमोठ्या कंपन्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जागांसाठी क्रमांक एकचे आकर्षण असल्याचे आढळून आले. आता असे ठरविण्यात आले आहे की जे उमेद्वार नौदल आणि हवाईदल ह्यांना लागणाऱ्या पात्रतेपर्यंत पोचले नाहीत त्यांना लष्करांत घेण्याचा विचार करण्यात यावा. तरुणांच्या नावडीमागे काही आर्थिक कारणेही असावीत असा अंदाज आहे. कमी उत्पन्नाच्या गटातील लोकांच्या निवड झालेल्या मुलांना दरमहा फक्त ४० रुपये भत्ता सध्या देण्यात येतो. त्यामुळे मुलांचे पालक मुलांना लष्करात घालण्यास उत्सुक नसतात. ह्या भत्त्यात वाढ करण्यात यावी आणि दरमहा ७०० रुपये उत्पन्न असणाऱ्यांच्या मुलांनाही भत्त्याच्या कक्षेत समाविष्ट करावे असे सुचविण्यात येत आहे. ब्रिटनमध्ये संरक्षणविषयक संस्थांत उमेद्वाराला प्रवेश मिळाला की त्याचा सर्व खर्च सरकार करीत असते. अशी किंवा तत्सम प्रथा भारतात सुरू करण्यात यावी असेही सांगण्यात येत आहे.

---

## प्राप्तिकर खात्याचा अफाट पसारा

प्रत्यक्ष करांची आकारणी आणि वसुली करणाऱ्या प्राप्तिकर खात्याचा पसारा केवढा मोठा आहे ह्याची सहज कल्पना येण्यासारखी नाही. रेल्वे खाते आणि पोस्ट-टेलिग्राफ खाते सोडले तर त्यांच्या खालोखाल प्राप्तिकर खात्याची संघटना सर्वांत मोठी आहे. केवळ मनुष्यबळाचाच विचार केला तरी खात्याच्या पसाऱ्याची थोडीबहुत कल्पना येण्यासारखी आहे. खात्यात ५० प्राप्तिकर कमिशनर्स काम करतात व त्यांना मदत करणाऱ्या असिस्टंट कमिशनर्सची संख्या ४७० आहे. त्याशिवाय ३,००० प्राप्तिकर अधिकारी आणि ३० हजार अराजपत्रित नौकर खात्याच्या पगारपत्रकावर आहेत. पण इतका व्याप असूनही सुमारे २ वर्षांपूर्वीपर्यंत ३३ लाख करदात्यांची प्रकरणे हाताळणे खात्याला बरेच जड जात होते. प्रकरणांचा निकाल लवकर लावता यावा म्हणून कराची आकारणी झटपट करण्याची एक योजना अमलात आणली गेली. योजनेप्रमाणे शहरातील ज्या प्राप्तिकरपात्र लोकांची वार्षिक उत्पन्ने ५० हजार रुपयांपर्यंत असतील त्यांच्याकडून भरून आलेली माहिती खरी धरून त्यांना प्रत्यक्ष न बोलावता अगर त्यांच्या हिशेबाची पुस्तके न मागवता, ताबडतोब कराची आकारणी करण्यात येऊ लागली. ग्रामीण भागातील करपात्र लोकांसाठी झटपट कर आकारण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा २५ हजार ठेवण्यात आली होती. देशातील प्राप्तिकराच्या उत्पन्नापैकी ७१ टक्के उत्पन्न एकूण करपात्र लोकांपैकी ११ टक्के लोकांकडून मिळते. त्यांचे वार्षिक उत्पन्न दरसाल १५ हजारांच्या आसपास असते. प्राप्तिकर अधिकाऱ्यांना अशा छोट्या प्रमाणात लक्ष घालावे लागले नाही तर बड्या असामीकडे अधिक लक्ष देता येईल अशी कल्पना होती.

---

## अमेरिकन तरुणांना पौर्वात्य धर्माबद्दल आस्था

अमेरिकेतील डेट्राइट विद्यापीठात धार्मिक अभ्यासशाखेचे प्रमुख असलेले प्रा. व्यंकटेश्वरन् ह्यांनी अमेरिकेतील तरुणांत होत असलेल्या बदलाबद्दल माहिती सांगितली आहे. डेट्राइट विद्यापीठांत ह्या ज्ञानशाखेचे प्रमुख काम पाहात असलेले ते पहिलेच हिंदू प्राध्यापक आहेत. ते म्हणतात की गेल्या दोन-तीन वर्षांत अमेरिकेतील तरुणांत वेगळ्या दिशेने बदल घडून येत आहे. प्रचलित समाजव्यवस्थेबद्दल अस्वस्थ असणारा अमेरिकन तरुण आतापर्यंत अमली पदार्थांच्या सेवनाकडे झटकन् वळत असे. त्यामुळे तो समाजापासून दुरावत चालला होता. पण आता तो वैयक्तिक पातळीवर तत्त्वज्ञानाकडे आकर्षित होऊ लागला आहे. त्याशिवाय निरनिराळ्या प्रकारच्या योगमार्गाकडेही त्याची प्रवृत्ती होऊ लागली आहे. ह्याचा एक परिणाम म्हणून हिप्पी पंथाला काहीशी ओहोटी लागलेली दिसत आहे. अमेरिकेत आता धार्मिक तत्त्वज्ञानाच्या विचक्षक अभ्यासाला शैक्षणिक क्षेत्रात चांगली मान्यता मिळालेली आहे. त्यातही पौर्वात्य धर्मांच्या अभ्यासांत जी मानसशास्त्रीय तत्त्वे गोवलेली दिसतात त्यांची त्यांना अधिक जाणीव होऊ लागली आहे. हिंदुधर्मातील आत्म्याची कल्पना अगर बुद्धधर्मातील निर्वाणाची कल्पना त्यांना आता पटू लागलेली आहे. निदान ह्या कल्पनांचा अर्थ जाणून घेण्याची धडपड ते करू लागले आहेत. दहा वर्षांपूर्वी विद्यापीठाच्या धार्मिक ज्ञानशाखेत सर्वजण जेझुइट पंथाचे होते. आता मात्र ह्या ज्ञानशाखेत सर्व धर्मातील मूळ ग्रंथांचा, धार्मिक तत्त्वज्ञानाचा आणि मोठमोठ्या साधुसंतांना आलेल्या अनुभवांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा समावेश करण्यात आलेला आहे. हिंदुधर्माच्या आधारभूत ग्रंथांतील म्हणजे वेद व उपनिषदे ह्यांतील उतारे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येतात.

---

**बनावट चहाचा कारखाना**—फेरोजपूरपासून काही मैलांवर एका गावी बनावट चहा तयार करण्याचा कारखाना आढळून आला आहे. खऱ्या चहात थोडीफार भेसळ करून तो बाजारात पाठविण्याचे प्रकार बरेच सापडतात. पण मुदलातच खोटा बनावट चहा बनविण्याचा हा पहिलाच कारखाना असावा.

## 'द्रव्याच्या बॅटरीवरील वैराग्याचा लाउडस्पीकर

पुणे येथील लक्ष्मीरोडवर दर आठवड्याला एखाद्या तरी जुन्या दुकानाचे आधुनिकीकरण होत असते किंवा जुन्या दुकानाच्या जागी नवे दुकान निघत असते. त्यानिमित्त शानदार उद्घाटन-समारंभ आयोजित केले जातात आणि त्यांच्या प्रचंड जाहिराती प्रसिद्ध होतात. अशा समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून कधी धनिक उद्योगपती तर कधी संन्यासीही असतात. अशाच एका दुकानाचा उद्घाटनसमारंभ एक सुप्रसिद्ध उद्योगपतीच्या अध्यक्षतेखाली एका योगी महाराजांच्या हस्ते साजरा झाला. सर्व तऱ्हेच्या उत्तमोत्तम अपूर्व फॅशन्सच्या साड्यांचे, त्याचप्रमाणे स्लॅक्स, बेलबॉटम्स, लुंगी-कुर्ता, घरारा सूटस्, मिनीमिडीज, इत्यादी तरुणींच्या नव्या पेहरावांचे ते दुकान होते. आकर्षक हेअर स्टाइल्स, मेकअप इत्यादींचीही त्यात व्यवस्था होती. ह्या दुकानाच्या जागेसाठी १,००,००० रुपये तरी पागडी पडली असेल आणि काळ्या पैशांनीच दुकानाची सजावट केलेली असेल. उद्योगपतीने किंवा व्यापाऱ्याने आपल्या अनुयायांना प्रोत्साहन देणे ह्यात काहीच वावगे नाही. परंतु अशा उपक्रमांना अध्यात्मी संन्याशांनी 'अभय असो' असा आशीर्वाद देण्यासाठी समक्ष जावे आणि त्याची भरमसाट जाहिरात होऊ द्यावी, हे कित्येकांना खटकले.

विसंगत वाटणाऱ्या घटना नेहमीच घडत असतात. उदाहरणार्थ, अद्ययावत सुखसाधनांनी समृद्ध घरातही स्वामी परमहंस, स्वामी विवेकानंद, ज्ञानेश्वरमहाराज ह्यांची चित्रे प्रमुख ठिकाणी लावलेली कित्येकदा आढळतात. त्यांच्या साक्षीनेच मद्यपान चालू असते. भिंतीवर लावलेल्या कॅलेंडरांपैकी काहींवर देवादिकांची चित्रे असतात, तर काहींवर उन्मादक, अर्धनग्न तरुणींची चित्रे असतात. कोपऱ्यातल्या शिवाजीमहाराजांच्या अर्ध-पुतळ्याशेजारीच फिल्मी मासिकातील नटया वाऱ्याने फडफडत असतात. अर्थ, धर्म आणि काम ही सर्व येथे गुण्यागोविंदाने नांदत असतात!

पुरुषार्थाच्या ह्या तीन प्रकारांपैकी अर्थ हा धर्मापेक्षा अधिक इष्ट आणि धर्म हा कामापेक्षा अधिक इष्ट, म्हणून तो आधी प्राप्त करून घ्यावा, असे कौटिल्याने सांगितले आहे. अर्थ की अनर्थ, धर्म की अधर्म, सुख की दुःख ह्यात तिसऱ्यापेक्षा दुसऱ्या-विषयी आणि दुसऱ्यापेक्षा पहिल्याविषयी अगोदर विचार करणे बरे. धर्म व अर्थ ह्यांना विरोध न येईल अशा रीतीने कामाचा उपभोग घ्यावा. धर्म, अर्थ व काम हे तीनही परस्परांवर अव-लंबून आहेत. त्यांपैकी एकाचाही अतिरेक झाला तर तो आपला व दुसऱ्या दोघांचाही नाश करतो. धर्म, अर्थ व काम ह्या तिहीतून अर्थ हाच कौटिल्याच्या मते प्रमुख आहे. कारण, धर्म व काम हे संपत्तीवर अवलंबून आहेत.

कौटिल्याचे हे विवेचन ध्यानात घेतले, म्हणजे वैराग्यानंदही संपत्तीला का महत्त्व देतात, हे लक्षात येईल. श्रीमंत लोकच योग्यांची, साधुसंतांची देखभाल करू शकतात. उद्योगपतींना आणि व्यापाऱ्यांना सुखार्थी लोकांची गिऱ्हाइके हवी असतात; तीच त्यांचे अन्नदाते असतात. वैराग्यानंदांनाही जमण्यासाठी, स्वतःच्या किमान गरजा भागविण्यासाठी धनिकांची आवश्यकता भासतेच. राजे लोक ऋषिमुनींच्या आश्रमांचा प्रतिपाल करीत; 'तपश्चर्येचा षष्ठ भाग देती, म्हणुनि अविनाशी फलद तेचि होती' असे दुष्यंत राजाने ऋषिमुनींविषयी शाकुंतलात म्हटले आहे. म्हणजे, ही देवघेव असते आणि म्हणूनच आजच्या धनिकांनी आजच्या वैराग्यानंदांच्या सुखसोईकडे पाहिले, तर त्यात नवल नाही. त्यामुळे त्यांना स्वतःला मनःस्वास्थ मिळण्याची किंवा अस्वास्थ्याची तीव्रता कमी होण्याची अपेक्षा असते.

हेच स्वामी महाराज सामान्य जनांना धनलोभाचा त्याग करण्याचे ब्रह्मज्ञान सांगत असतात; धनिकांवर कोरडे ओढून दरिद्री लोकांचे मनोरंजन करतात. पक्वान्ने खाणारांचे हाल ऐकताना उपाशी लोक नाही का देहप्रारब्ध विसरून जात?

'सुखाला संपत्तीची आवश्यकता नाहीं' असे जीवनाचा झगडा माहीत नसणाराच फक्त म्हणू शकतो. 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें, उदास विचारें वेंच करी' ही तुकाराम महाराजांची शिकवण कौटिल्याच्या अर्थवादाशी विसंगत नाही.

---

## सांगली बँकेचे नवे सरव्यवस्थापक श्री. चतुर

दि सांगली बँक लि. चे नवे सरव्यवस्थापक म्हणून श्री. के. डी. चतुर यांनी नुकताच चार्ज घेतला आहे.

श्री. चतुर यांनी १९५६ साली अर्थशास्त्र हा विषय घेऊन पुणे विद्यापीठाची एम. ए. ची पदवी सर्वप्रथम क्रमांकाने संपादन केली. त्यानंतर लागलीच पंजाब नॅशनल बँकेमध्ये व्यवस्थापकीय श्रेणीमध्ये नेमणूक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला व त्यानुसार त्यांना या बँकेच्या नासिक रोड, पुणे कँप व खोदाद सर्कल, दादर-मुंबई या शाखांमध्ये शाखाप्रमुख म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर १९७२ च्या डिसेंबर-मध्ये त्यांना या बँकेचे विभागीय व्यवस्थापक म्हणून बढती मिळाली व त्यांनी या पदावर मिरत येथे काम करीत असताना उत्तर प्रदेशातील सहा जिल्ह्यांमध्ये समाविष्ट असलेल्या चव्वे-चाळीस शाखांचे नेतृत्व केले.

श्री. चतुर यांची शैक्षणिक क्षेत्रामध्ये सतत पहिल्या श्रेणीमध्ये गणना होती आणि त्याच वेळी त्यांनी इतर क्षेत्रांमध्ये भाग घेतला होता.

पुणे बँकिंगच्या क्षेत्रामध्ये पदार्पण केल्यानंतर त्यांनी ज्या विभागांमध्ये निरनिराळ्या जागांवर काम केले तेथे त्या विभागांचा आर्थिक व इतर बाबतीत सर्वांगीण विकास व्हावा यासाठी श्री. चतुर सतत कार्यरत राहिले आहेत. आता ते २ जून १९७३ पासून सांगली बँक लिमिटेडचे जनरल मॅनेजर म्हणून काम पाहात आहेत.

### मद्रास कसोटी सामन्याला २७ लाखांचे उत्पन्न

गेल्या जानेवारीत भारत आणि इंग्लंड ह्यांच्यात मद्रास येथे एक क्रिकेटचा कसोटी सामना खेळण्यात आला. ह्या सामन्याच्या तिकिटविक्रीच्या पोटी २७ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले. आजपर्यंत कोठल्याही कसोटी सामन्याला एवढे उत्पन्न झाल्याचा दाखला नाही. खर्च वजा जाता तामीळनाडू क्रिकेट असोसिएशनला १८ लाख रुपये निव्वळ नफा झाला अशी माहिती संघटनेच्या चिटणिसांनी सांगितली. निव्वळ नफ्याचा हा भारतामधील उच्चांकच आहे. ५ दिवसांचा हा कसोटी सामना पाहाण्यासाठी रोज सरासरी ४७ हजार प्रेक्षक हजर राहात होते. सामना झालेल्या चेपॉक स्टेडिअमचे काम ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल. पश्चिमेकडील प्रेक्षागाराचे काम आता तावडतोब हाती घेण्यात येणार आहे. आतापर्यंत स्टेडिअमसाठी ६० लाख रुपये खर्च झाले आहेत. खर्चाचा अंदाज ९० लाखाचा आहे.

### व्हाइसरॉयच्या डायरीतील हेरगिरीचे प्रकरण

ब्रिटनमधील वृत्तपत्रांतून सध्या 'दि व्हाइसरॉयज जर्नल' ह्या दैनंदिनीतील काही उतारे प्रसिद्ध होत आहेत व पुस्तकावर अभिप्रायही देण्यात येत आहेत. ह्या उताऱ्यांतून भारतात सत्तांतर होण्याच्या काळाच्या काही घडामोडी प्रथमच प्रकाशात येत आहेत. व्हाइसरॉय फील्ड मार्शल वॅव्हेल ह्यांच्या ह्या रोजनिशीत हेरगिरीच्या एका प्रकरणाची हकीकत दिली आहे. व्हाइसरॉयचे खाजगी चिटणीस म्हणून सर जॉर्ज ॲबेल नावाचे अधिकारी काम करीत असत. त्यांच्या हाताखाली एक हिंदी लघुलेखक होता. ह्या लघुलेखकाने गुप्त पत्रांच्या नकला पं. नेहरूंना पुरविण्याचे काम चालविलेले होते पं. नेहरू ही पत्रे सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स ह्यांना दाखवून व्हॉइसरॉय साहेबांचे खाजगी राजमंडळ कॉंग्रेसच्या विरुद्ध असल्याचे पटवून देण्याचा प्रयत्न करीत. ह्या प्रकरणाची माहिती लॉर्ड वॅव्हेल ह्यांना त्यांच्या बदलीनंतर सत्तांतर होण्यापूर्वी ५ महिने आधी झाली.

---

### पाकिस्तानांत बीभत्स चित्रपटांची चलती

पाकिस्तान हे एक आदर्श इस्लामी राष्ट्र बनविण्याचे ध्येय तेथील राज्यकर्त्यांनी ठेवले आहे. व्यवहारात मात्र ह्या ध्येयाच्या अगदी उलट प्रकार चित्रसृष्टीत घडत आहेत. लाहोर व कराची येथील चित्रपटगृहांत मामुली चित्रपटांच्या जाहिराती करून प्रत्यक्ष मात्र बीभत्स व पिसाट लैंगिक दृश्ये दाखविणारे परदेशी चित्रपट रात्री दाखविले जात असतात. प्रेक्षकांना ही अंदरकी बात माहीत असते. कराचीतील नागरिकांचे असे म्हणणे आहे की हे प्रकार पोलिसांच्या डोळेझाकीच्या मदतीने चालत आहेत. अशा चित्रपटगृहांविरुद्ध कडक उपाय योजण्याबाबत प्रे. भुत्तो ह्यांनी काही दिवसांपूर्वी राज्यसरकारांना सूचना पाठविल्या होत्या. पण राज्यांची सरकारी यंत्रणा त्याबाबत काही हालचाल करीत नाही. पाकिस्तानचे माहितिमंत्री म्हणतात की निग्रही लोकमतानेच ह्या चित्रपट प्रदर्शकांना आळा घालता येईल.





BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659-60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*

# व्यवस्थापनातील समस्या (१०)

## आंधळं दळतंय ........!

(सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.)

मे. व्हरायटी प्रॉडक्टस् लि. या कंपनीचे कार्यकारी संचालक श्री. मर्चंट यांनी आपल्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक महत्त्वाची सभा बोलावली. या सभेत ते म्हणाले, "आपल्या व्हरायटी कंपनीचा गेल्या वर्षीचा ऑडिट झालेला ताळेबंद नुकताच माझ्या हाती आला आहे. तो वाचून मला धक्काच बसला आहे. माझ्या समजुतीप्रमाणे आपला एकंदर उपक्रम भरभराटीस येत होता. १५ वर्षांपूर्वीच सुरू केलेली आपली कंपनी १० लाख रु. वरून १० कोटी रु. ची वार्षिक उलाढाल करू शकली, तसेच ५ लाख रु. भागभांडवलावरून आपण २ कोटी रु. चे भागभांडवल वाढवले. दर वर्षाआड आपण एकेक नवीन प्रॉजेक्ट सुरू केला व आज आपण विविध प्रकारचे १५ उत्पादन विभाग चालवितो. भारतातील तसेच परदेशातील विविध प्रकारच्या कारखान्यांना तसेच गिऱ्हाइकांना लागणारा माल आपण करतो. 'व्हरायटीचा' माल म्हणजे दर्जेदार उत्पादन समजले जाते. आपल्या सर्व नव्या योजनांना सरकारी मंजुरी तसेच बँकांचे कर्ज उपलब्ध होते. पण धंदा म्हणजे चॅरिटी नव्हे. नफा नसेल तर धंदा-उद्योग उभारायचा कशासाठी? ही सर्व मेहनत आकर्षक नफा नसेल तर व्यर्थ आहे. भागभांडवलाचे २ कोटी रु. जर निव्वळ १२% व्याजाने ठेवले तर आपल्या भागधारकांना वार्षिक २४ लाख रु. करपूर्व उत्पन्न झाले असते. पण एवढा प्रपंच करून, १० कोटी रु. उलाढाल करून, आमचे हाती फक्त १० लाख रु. करपूर्व उरले आहेत. कर दिल्यावर तर ५ लाख रु.ही राहात नाहीत. हा नफा उलाढालीच्या अवघा १% व भागभांडवलाच्या ५% आहे. इतक्या अल्प नफ्याच्या प्रमाणामुळे आपले भागही बाजारात अपेक्षेइतक्या दराने विकले जात नाहीत. आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय, असंच होत असावं. इतक्या कमी नफ्याचे प्रॉजेक्टस् आम्ही नक्कीच अपेक्षिले नव्हते. हिशेबाचे कामात लपवाछपवी मला पसंत नाही हे आपण जाणताच. विक्रीचे किंवा नफ्याचे प्रमाण फुगवून भागधारकांची म्हणजे आमची स्वतःचीच फसवणूक करणे मला मान्य नाही. तेव्हा माझे तुम्हा सर्वांना आवाहन आहे की ही परिस्थिती अशीच न घसरता कंपनीला सांगण्यासारखा नफा होईल यासाठी काय करायचे त्यावर सर्वांनी विचार करावा, चर्चा करावी व प्रत्यक्ष कृतीला प्रारंभ करावा.

"आपले नवे बजेट मॅनेजर, श्री. काटकर हे यासंबंधी काही सूचना मांडतील त्यांचाही विचार करावा. मला त्यांच्या सूचना स्वीकाराव्या असे वाटते पण जर कोणाचे काही मतभेद, शंका असतील तर जरूर मांडाव्या. मात्र विरोधासाठी विरोध असू नये. तसा विरोध मला मान्य होणार नाही."

यावर श्री. काटकर यांनी गेल्या ५ वर्षांतील प्रत्येक विभागात किती उत्पादन झाले? प्रत्यक्ष खर्चाचे प्रमाण कसे होते? अप्रत्यक्ष खर्च त्या त्या विभागांनी किती प्रमाणात भागवले? नफ्याच्या व नुकसानीच्या बाबी कोणत्या होत्या? यासंबंधी आकडेवारी व आलेखाद्वारे निवेदन केले. यासाठी लागणारी माहिती ही संबंधित विभागांकडून वेळोवेळी संचालकांकडे आलेली होती. तेव्हा यात हेतुपुरस्सर कोणाला पक्षपात अथवा अन्याय नव्हता.

नंतर त्यांनी कंपनीचे जे १५ उत्पादन विभाग होते त्यांपैकी प्रत्येक विभागाशी स्पर्धा करणाऱ्या ज्या कंपन्या होत्या त्यांची आकडेवारी व नफ्याची विक्रीशी तसेच भांडवलाशी टक्केवारी दाखवून दिली. व्हरायटीत वस्तूंच्या निवडीला, उत्पादनाला महत्त्व दिले जाते. पण नफ्याकडे कसे दुर्लक्ष होते हे पटवून दिले. श्री. काटकर पुढे म्हणाले, "विक्री खाते जोरदार विक्री वाढवते, जाहिरातखाते नवीन नवीन जाहिराती प्रसिद्ध करते. उत्पादनाचे आकडे वाढत आहेत पण त्याचबरोबर उत्पादनाचा व इतर खर्च वाढत आहे याविषयी मात्र एकंदरीत बेफिकिरीची वृत्ति दिसते. आता तर बोनस हा सुद्धा सरकारने सक्तीचा केला आहे. त्यामुळे नफा नसला तरीही व्यक्तिगत कोणाचे फारसे नुकसान होत नाही. यासाठी खर्चाविषयी सर्वांनी जागरूक राहावे म्हणून आम्ही प्रत्येक विभागाचे वार्षिक, तसेच मासिक बजेट केले आहे. प्रत्येक विभागाकडे कंपनीने दिलेली अचल (Fixed) व चल (current) भांडवल गुंतवणूक किती आहे याची माहिती जमा केली आहे व त्या त्या विभागात या भांडवलावर किती टक्के नफा अपेक्षित आहे हे निश्चित केले आहे. याप्रमाणे वेगवेगळ्या विभागात त्या त्या भांडवलावर १०% ते ३५% नफा करानंतर मिळावयास हवा. या हिशोबाचे कागद सर्वांना वाटण्यात येतील. त्यावर विचार करून आपण दोन दिवसांनी पुन्हा जमूया. मध्यंतरी माझी मदत लागल्यास निःसंकोच मला भेटावे. मी आपल्या शंकांचे निरसन करू शकेन."

यानंतर दोन दिवस सर्व विभागप्रमुख कागदपेन्सिली घेऊन उलटसुलट आकडेमोड करीत होते. बहुतेक सर्वजण श्री. काटकरांना भेटूनही गेले.

दोन दिवसानंतरच्या सभेला सर्वजण वार्षिक परीक्षेला यावे तशा तयारीने आले. प्रत्येकाजवळ फायलींचा ढीग होता. प्रथम प्रत्येकाने श्री. काटकर यांनी जिथे चुकीचे आकडे किंवा अंदाज धरले होते ते निदर्शनास आणून दिले. पण 'भांडवलावर अपेक्षित नफा' या तत्त्वाला कोणाचाच विरोध नव्हता. नफ्याच्या प्रमाणास मात्र बऱ्याच जणांचा आक्षेप होता. एका जुन्या अधिकाऱ्याने तर 'श्री. काटकर यांनी माझे खुर्चीवर बसावे व एक वर्षात हा ३०% नफा मिळवावा, मी आपणहून राजीनामा देईन' असे भावनेच्या भरात सांगितले.

यावर श्री. मर्चंट यांनी विधायक सूचना मांडण्यास आवाहन केले. प्रत्येकाने आपापल्या विभागाचे नफ्याचे प्रमाण वाढण्यासाठी काय करता येईल ते थोडक्यात सांगितले. ही चर्चा जवळजवळ ४ तास चालूनही अपुरी राहिली व पुन्हा दुसऱ्या दिवशी यावर ३ तास चर्चा झाली. आलेल्या काही महत्त्वाच्या सूचनांचा गोषवारा येथे दिला आहे.

१. भांडवलाशी नफ्याची सांगड घातल्याने आपल्या खात्यातील भांडवल कमी कसे करता येईल यावर प्रत्येकाने योजना दिली. उदा. "ते नवे मशीन २ लाख रु. चे आहे व त्यावर ताशी ५०० नग होतात. पण आमचे बजेट दिवसाला २,००० नगांचेच असल्याने आम्हांला एवढे ऑटोमॅटिक मशीन नको. ४०,००० रु. चे मशीन चालेल." सारांश, वापरात नसलेली मशीनची उत्पादनक्षमता सर्वांच्या ध्यानात आली व उगाच नव्या मशीनचा हव्यास परवडणार नाही हे त्यांना पटले.

खात्यात पडून राहिलेला माल हाही भांडवलात धरला जाणार असल्याने खात्यातील मालाचे साठे कमी करण्याच्या योजना आल्या. त्यायोगे कंपनीच्या खेळत्या भांडवलाची गरज जवळजवळ २० लाख रु. कमी झाली.

२. मनुष्यबळाचा खर्च महागाईबरोबर वाढत असल्याने कमी माणसांत अधिक उत्पादन कसे करता येईल याच्या योजना आल्या. व्हरायटीचे कामगारांना सरासरी वेतन रु. ४००/– द. म. होते. तेव्हा एक कामगार म्हणजे सरासरी ५,००० रु. चा खर्च; हा भांडवलाच्या प्रमाणात वाढू नये म्हणून हलक्या कामासाठी शक्य तेथे सोप्या सोप्या यंत्रांची मागणी आली. काही गोष्टी बाहेरून लघुउद्योगांकडून किंवा इतर व्यवसायांकडून करवून घेणे स्वस्त वाटू लागले. ओव्हरटाईमचा वापर अगदी आवश्यक तेव्हाच करण्याचे ठरले. ज्या सेवांची तितकी गरज नव्हती त्या आम्हांला नकोत व त्यांचा खर्च आमचे विभागावर नको अशी आग्रहाची मागणी आली. या सर्वांचा परिणाम म्हणजे कामगार वेतनात वार्षिक ५ लाख रु. व उत्पादनासंबंधित अप्रत्यक्ष खर्चात १० लाख रु. बचत होऊ शकली.

३. विक्री खात्याने नेहमीच्या ५०% खर्चात जाहिरातीचे बजेट बसवले. काही ठिकाणी विक्रीचे दर वाढवण्याचा निर्णय घेतला.

४. कंपनीच्या मेंटेनन्स खात्याकडून निश्चित स्वरूपाच्या कामाची मागणी झाली व जे जॉब केवळ मशीन्स आहेत, सुतार–गवंडी आहेत म्हणून करवून घेतले जात होते, त्यांचा खर्च त्या त्या विभागांवर पडणार असल्याने अनावश्यक कामे टाळली गेली किंवा थोडे पैसे देऊन पण बाहेरून करून घेण्यात आली. त्याचा हिशेब मिळाला.

५. कमी लाभाचे उपक्रम सोडून देण्यात आले व काही विभागांत उत्पादन वाढले.

६. कंपनीत अनावश्यक पण पडून राहिलेली मशीनरी व माल बाजारभावाने विकून जवळ जवळ ४० लाख रु. वसूल झाले.

७. कंपनीची खरेदी अधिक किफायतशीर कशी होईल याच्या योजना झाल्या. वर्ष अखेरीस कंपनीची उलाढाल पुन्हा जवळ जवळ १० कोटी रु.च झाली पण करपूर्व नफा १० लाख रु. वरून ७० लाख रु. वर झाला. हा नफा २ कोटी रु. भागभांडवलावर ३५% झाला व यापुढील वर्षी याहून चांगली प्रगती होण्याची आशा निर्माण झाली. 'भांडवलावर अपेक्षित नफा' या सूत्राचा लोकांच्या विचारशक्तीस, कर्तबगारीस चालना देणारा मूलमंत्र म्हणून बहुतेक सर्व उद्योगांत वापर करण्यासारखा आहे. आजचे मोठमोठे सरकारी किंवा संयुक्त क्षेत्रांतील प्रकल्प तोट्यातून नफ्याकडे नेण्यास या सूत्राचा उपयोग करता येणार नाही का ?

---

## शेतीच्या जुन्या पद्धतीकडे वळलेला प्रगतिशील शेतकरी

शेतीचे यांत्रिकीकरण करून उत्पादन वाढविण्याच्या ह्या जमान्यात उत्तरप्रदेशातील एका प्रगतिशील शेतकऱ्याने जुन्या पद्धतीने शेती करून आपल्या व्यापाची व्याप्ती वाढल्याचा दावा केला आहे. ह्या शेतकऱ्याने आपली यांत्रिक अवजारे विकून टाकली आणि परंपरागत जुन्या पद्धतीने आपली जमीन कसण्यास प्रारंभ केला. त्याबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी त्याला आली नाही. १९६४ साली त्याने बैलांच्या साह्याने मशागत करण्यास सुरुवात केली. यांत्रिक अवजारांत वारंवार होणारा बिघाड, तो दुरुस्त करण्यास लागणारा विलंब, जळणाच्या तेलाकरिता करावी लागणारी धडपड, इत्यादी प्रकारांनी तो कंटाळून गेला होता. त्यांचे नाव मि. बाली असे असून ते ७४ वर्षांचे आहेत. त्यांच्या शेताच्या भोवताली मात्र अजूनही यांत्रिक पद्धतीने चालविलेली शेतीच आहे. १९५० साली इतर अनेक शेतकऱ्यांप्रमाणे त्यांनी उत्तरप्रदेशातील तराई भागातील ओसाड जमीन लागवडीखाली आणण्यास प्रारंभ केला. त्या वेळी त्यांनी ट्रॅक्टर्स आणि इतर अवजारे वापरून जमिनीचा एक मोठा तुकडा लागवडीयोग्य केला. १९६४ साली त्यांच्याजवळ १३ ट्रॅक्टर्स होते. ते विकून टाकून त्यांनी बैलांच्या ४७ जोड्या पैदा केल्या. आता त्यांना अवजारांच्या दुरुस्तीची डोकेदुखी होत नाही. त्याचप्रमाणे खतासाठीही वणवण फिरावे लागत नाही. शिवाय आपल्या शेतावर त्यांनी शेकडो मजुरांना कामही दिले आहे. मि. बाली ह्यांच्या म्हणण्याचा पडताळा पाहाण्यासाठी भारतामधील व परदेशी शेतीतज्ज्ञ ह्यांनी त्यांच्या शेताला भेटी दिल्या आहेत. पंतनगर विद्यापीठातील दोघा तज्ज्ञांनी त्यांच्या शेतीवर जाऊन त्यांच्या उत्पादनतंत्राचा तपशीलवार अभ्यास केला आहे.

---

## पंजाबातही हरितक्रांतीचा फायदा बड्या शेतकऱ्यांनाच

हिंदमध्ये ब्रिटिश राजवट असताना पंजाबचा उल्लेख तलवार धारण करणारा अथवा भारताचा खड्गहस्त असा करण्याची पद्धत पडली होती. स्वातंत्र्योत्तर काळात पंजाबने धनधान्य समृद्ध असा प्रदेश असल्याची सार्थ कीर्ती मिळविली आहे. सरकारने गव्हाचा ठोक व्यापार हाती घेतल्यानंतर राज्यनिहाय गव्हाची खरेदीची जी उद्दिष्टे ठरवून दिली आहेत त्यांतील पंजाबचे उद्दिष्ट अर्धेअधिक आताच साध्य झाले आहे. त्या राज्यातील हरितक्रांतीमुळे अन्नधान्याच्या उत्पादनात विपुल वाढ झाली हे खरे. पण ह्या क्रांतीचा फायदा महाराष्ट्रातील बड्या शेतकऱ्यांप्रमाणेच तेथील बड्या शेतकऱ्यांनीच मिळविला आहे. सधन पंजाबात आजही ग्रामीण भागांतील लोकसंख्येपैकी ४३·५ टक्के लोक अतीव दारिद्र्यातच जीवन कंठीत आहेत. त्यांपैकी बहुतेक शेतमजूर असून शेतीवर राबणाऱ्या लोकांत त्यांची संख्या २० टक्के आहे. हरिजनांचा भरणा बराच आहे. प्रगतिशील शेतीच्या तंत्राची व हरितक्रांतीची फळे समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोचलेली नाहीत किंवा राज्याच्या सर्व भागांतील लोकांनाही त्याची ओळख झालेली नाही. शेतीच्या नव्या तंत्राचा उपयोग करून घेण्यासाठी प्रथम बरीच भांडवल गुंतवणूक करावी लागते. ती करण्याइतका पैसा फक्त श्रीमंत व ऐपतदार शेतकऱ्यांनाच उभारणे शक्य आहे. उलट, छोटे शेतकरी हे कसेबसे जगणारे असल्यामुळे त्यांना नलिकाविहिरी खोदणे सुद्धा शक्य झालेले नाही. त्यामुळे ग्रामीण भागांतील मोठ्या शेतकऱ्यांच्या व छोट्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील तफावत कमी तर झालेली नाहीच, उलट ती वाढली असल्याचे दिसून येते. रोजगारीत वाढ झाली असली तरी शेतमजुरांपैकी अनेकजण हलाखीच्या स्थितीतच जगत आहेत.

---

## पूर्व युरोपीय देशांशी होणारा भारताचा व्यापार

ब्रिटन-अमेरिकेसारख्या पाश्चात्य देशांशी व्यापार करताना भारताला परदेशीय चलनाचा विचार करावा लागतो. कारण औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या ह्या देशांकडून भारताला अनेक प्रकारच्या मालाची आयात करावी लागते, आणि त्यासाठी परदेशीय चलनात किंमत चुकती करावी लागते. परदेशीय चलनाचा तुटवडा नेहमीच असल्याने अशा व्यापारावर बंधने पडतात. म्हणून आयातीच्या किंमती रुपयाच्या चलनात घेणाऱ्या अगर वस्तूंच्या ऐनजिनसी बदलाच्या मार्गाने व्यापार करणाऱ्या पूर्व युरोपीय देशांशी भारताने व्यापार सुरू केला. पूर्व युरोपीय देश रशिआच्या कक्षेत असल्याने पश्चिम युरोपीय देशांशी त्याचा व्यापार मोठ्या प्रमाणावर होत नसे. आता मात्र परिस्थिती बदलत चालली आहे. रशिआने अमेरिकेशी व पश्चिम युरोपशी जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे उभयतात पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात व्यापार होऊ लागला आहे. ह्याचा परिणाम भारताच्या पूर्व युरोपीय देशांशी होणाऱ्या व्यापारावर होणे अपरिहार्यच होते. रशिआच्या धोरणात झालेल्या बदलापूर्वीही पूर्व युरोप पश्चिम युरोपशी अधिक प्रमाणात व्यापार करू लागला होताच. पूर्व युरोपीय देशांशी भारताबरोबर जोडलेले व्यापारी संबंध त्या त्या वेळच्या राजकीय परिस्थितीतून उद्भवलेले होते असा याचा अर्थ आहे. भारताच्या काही मालांची पूर्व युरोपीय देशांना खरोखरीच गरज होती असे मानता येणार नाही. भारतामधील मध्यम प्रतीच्या एंजिनिअरिंगच्या मालाची मागणी पूर्व युरोपातील देश करीत असत. आता हाच माल ते देश पश्चिम युरोपातील देशांकडून घेऊ लागले आहेत. पश्चिम युरोपीय देश नजीक असल्यामुळे त्यांना असे करणे सोयीचे आहे.


---

## चीन-पाकिस्तान-इराणची युती धोकादायक

चीन-पाकिस्तान आणि इराण ह्यांची अलीकडे युती झाली आहे. त्यामुळे आशिआतील शांततेला आणि स्थैर्याला धोका उत्पन्न झाला आहे असे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. भारतीय उपखंडात शांततेचे वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नासही त्यामुळे अडथळे निर्माण होणार आहेत. पाकिस्तान व इराण ह्या देशांना भेट देऊन चीनचे परराष्ट्रमंत्री नुकतेच स्वदेशी परतले आहेत. त्यांच्या भेटीसंबंधीचा तपशील जाहीर होणे शक्य नसले तरी वारा कोणत्या दिशेने वाहात आहे त्याची कल्पना येऊ लागली आहे. इराणला अमेरिकेने शस्त्रास्त्राची जी प्रचंड मदत देऊ केली आहे तिला चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पाठिंबा दिला आहे. वास्तविक ही घटना पश्चिम आशिआतील शांततेला सुरुंग लावणारी आहे. परंतु चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी रशिआच्या हिंदी महासागरातील प्रवेशाला पायबंद घालण्याच्या दृष्टीने तिचे समर्थन केले आहे. याच चालीवर त्यांनी पाकिस्तानच्या अध्यक्षांनाही पाठिंबा दिला आहे. भारतीय उपखंडांतील सर्व देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याची चीनची तयारी आहे असे विधान त्यांनी केले असले तरी त्या विधानाला व्यवहारात फारसा अर्थ दिला जात नाही. कारण, त्यांनी चीन-हिंदसंबंधाविषयी चकार शब्दही काढलेला नाही. अशा परिस्थितीत भारतीय उपखंडातील लष्करी सत्तासमतोल बिघडण्याचा आणि परिस्थिती धुमसत राहून स्फोट होण्याची शक्यता नजरेआड करता येत नाही. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे भारताला स्वरक्षणासाठी तयारीत राहिले पाहिजे आणि प्रसंगी विकासकार्याला मुरड घालून संरक्षणविषयक खर्चाला प्राधान्य दिले पाहिजे.

---

**सर्वात जास्त उत्पन्न देणारे रेल्वे स्टेशन**—हिंदी रेल्वे मार्गावरील सर्वात जास्त उत्पन्न देणारे स्टेशन म्हणून बडोद्याजवळील बाजवा स्टेशन प्रसिद्धी पावले आहे. कोयाली तेलशुद्धी कारखान्यातून बाहेर पाठविण्यात येणाऱ्या पेट्रोलजन्य पदार्थांमुळे हे उत्पन्न मिळते. स्टेशनचे वार्षिक उत्पन्न १२ कोटी रुपयांचे आहे.




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष १९ | पुणे, बुधवार, १८ जुलै, १९७३ | अंक १४

**तुमच्या मुलीचे लग्न ही काही भातुकलीच्या लग्नाइतकी सोपी गोष्ट नाही...**



**पण आमच्या आवर्तक ठेव योजनेमुळे ती सोपी होते...**

तुमच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तेवढा पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळं खात्रीनं उपलब्ध होतो. दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढतच जाईल आणि ज्या वेळी तो मंगल दिवस उगवेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल ... आपण किती सुखी आहोत ... पैशाची तर चिंताच नाही.

दर महिन्याला बँकेत ठेवायची रक्कम रु. ५ किंवा त्याच्या पटीत
मुदत : १ ते १० वर्षे
व्याज : ७ टक्क्यांपर्यंत

अधिक तपशीलासाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

**राजधानी एक्सप्रेस**—मुंबई ते दिल्ली जाणाऱ्या ह्या एक्सप्रेसला हा प्रवास पुरा करण्यास सध्या फक्त १९ तास लागतात. वाटेतील इंजिनिअरिंगची काही कामे पुरी झाल्यावर हा प्रवास १४ तासांत पुरा होऊ शकेल. गेल्या वर्षी ह्या आगगाडीने ४१,३८,६२३ रु. उत्पन्न दिले. तिने जाता-येता मिळून २०४ खेपा पुऱ्या केल्या.

**पिकासोच्या पेंटिंगला ४९ लक्ष रु.**—पिकासोने १९०१ साली काढलेले ले मार्ट हे पेंटिंग लंडन येथील लिलावात ४९ लक्ष रुपयांस विकले गेले.

**तांब्याच्या पत्र्यांवर "रामचरितमानस"**—इंदूर येथील भांड्यांवर नावे घालण्याचा धंदा करणाऱ्या गजानन मिश्रा ह्या ३१ वर्षांच्या माणसाने संबंध 'रामचरितमानस' तांब्याच्या पत्र्यावर कोरून लिहिले आहे. त्यात चित्रेही कोरली आहेत. ह्या पत्र्यांची संख्या १९६ असून त्यांचे वजन ९६ किलोग्रॅम आहे. ह्या कामास त्याला साडेपाच महिने लागले.

**संशोधनासाठी उद्योगधंद्यांवर सेस**—संशोधन व विकास ह्या कामासाठी उद्योगधंद्यांवर 'सेस' बसविण्याचा विचार औद्योगिक विकास खाते करीत आहे. तो बसविण्यात आला तर दरसाल ३०० ते ४०० कोटी रुपये जमा होतील असा अंदाज करण्यात आला आहे. ह्या रकमेचा उपयोग उद्योगधंद्यांना संशोधनासाठी मदत करण्यासाठी होईल.

**अवर्षणाचा मधनिर्मितीवर परिणाम**— अवर्षणामुळे महाबळेश्वर येथील मधनिर्मितीत ८०% घट झाली. दरसाल ३,००० किलोग्रॅम मधाची निर्मिती होते; चालू वर्षी ती फक्त ५०० किलोग्रॅम झाली. महाबळेश्वरला गेल्या वर्षी तेथील सरासरीच्या (६२५ सें. मी.) निम्म्यापेक्षाही फार कमी पाऊस पडला.

**वैद्यकीय शिक्षणाचे भवितव्य**—मुंबई येथील म्युनिसिपल वैद्यकीय कॉलेजातील जागांपैकी ३४ टक्के जागा वर्गीकृत जातींतील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्याचा निर्णय जर अमलात आणण्यात आला तर वैद्यकीय व्यवसायाची झपाट्याने अधोगती होण्याची भीती ख्यातनाम डॉक्टरांनी व्यक्त केली आहे. वर्गीकृत जातींतील विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी इंटर सायन्स परीक्षेत ४० टक्के मार्क पुरेत अशी तरतूद आहे; इतरांना मात्र ६४ टक्के गुण मिळूनही प्रवेशाची खात्री नाही.

**गायकांची बतावणी करून ब्रिटनमध्ये प्रवेश**—मुंबईचे १२ हिंदी लोक गायकांची बतावणी करून, आपण ग्रेट ब्रिटनमध्ये कार्यक्रम करणार आहोत असे सांगून, खोट्या नावाखाली, खोट्या पासपोर्टवर तेथे गेले. बतावणी पुरी करण्यासाठी त्यांनी वाद्येही बरोबर घेतली होती. तेथे पोचल्यावर स्वतःच्या खऱ्या नावावर त्यांनी नोकऱ्या मिळविल्या. त्यांच्यावर लंडन येथे खटला चालू आहे.




# ☆ अर्थ ☆

बुधवार, १८ जुलै, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.


## चलनवाढीला उत्तेजन सरकारनेच दिले

### वाढत्या किमतींचे कारण तुटीचा अर्थभरणा

देशातील सतत वाढत जाणाऱ्या किमतींविषयी चार प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञांनी भारत सरकारच्या तुटीचा अर्थभरणा करण्याच्या धोरणाला दोष दिला आहे. त्यात पुणे येथील गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्थेचे डॉ. व्ही. एम. दांडेकर, भारत सरकारचे मुख्य माजी आर्थिक सल्लागार डॉ. अशोक मिश्र ह्यांचा समावेश आहे. सध्या होत असलेल्या किमतीच्या वाढीविषयी मत व्यक्त करताना डॉ. दांडेकर म्हणाले की, गेल्या काही वर्षांत सरकारने अंदाजपत्रकातील तूट उत्तरोत्तर वाढत्या प्रमाणात, नव्या चलनी नोटा छापून केली आहे. त्यामुळेच मुख्यतः किमती वाढत चालल्या आहेत. म्हणून विरुद्ध दिशेची उपाययोजना आता करण्यात आली पाहिजे. बँक रेटमध्ये वाढ करून चलनवाढीला आळा बसणार नाही. गेल्या वर्षात व्यापार-धंद्याला मिळणाऱ्या कर्जात फारशी वाढ झालेली नाही. मध्यवर्ती सरकार व राज्य-सरकारे ह्यांनीच चलनवाढीला सर्वतोपरी उत्तेजन दिलेले आहे. कारण, त्यांचे सर्व उद्योग मूलतः अनुत्पादन स्वरूपाचे होते. त्यांचा बँक रेटशी काहीच संबंध नाही. उलट बँक रेट वाढविल्या-मुळे अर्थव्यवस्थेतील उत्पादक कामावरच विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. अर्थातच चलनवृद्धीची परिस्थिती अधिकच तीव्र होण्याचा संभव नाकारता येणार नाही. सध्या जी चलनवृद्धी झाली आहे तिचे खरे कारण असे आहे की श्रीमंत वर्गांना हात न लावता गरिबी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचबरोबर सरकारच्या उधळपट्टीला आणि काही थोड्या लोकांच्या वैभवाला तात्पुरती बंदी न घालता गरिबी दूर करण्याचे प्रयत्न होत आहेत.

समाजवादी घोषणाच फक्त करण्यात येतात; त्यांना समाज-वादी शिस्तीची जोड देण्यात येत नाही; त्याचा हा परिणाम आहे. कोणावर तरी अपयशाचे खापर फोडण्यास आता कोणी शिल्लक राहिलेले नाही. आता कोणतीही सबब सांगता येण्या-सारखी नाही. आपणाला कोण फसवीत आहे ते लोकांना आता कळू लागले आहे. गुजरात राज्याचे नियोजन मंत्री श्री. चिमणभाई पटेल म्हणाले की पैशाच्या पुरवठ्यात कधीही नव्हती इतकी वाढ झाली. परंतु गरजेच्या वस्तूंचे उत्पादन मात्र त्या प्रमाणात झाले नाही. एका वर्षात लोकांजवळील पैशाचा पुरवठा १,२०८ कोटी रुपयांनी वाढला. २८ एप्रिल १९७२ ह्या दिवशी हा पुरवठा ८,२४७ कोटी रुपयांचा होता, तो २८ एप्रिल १९७३ ह्या दिवशी ९,५४५ कोटी रुपयापर्यंत फुगला. तामीळनाडू राज्याचे नियोजनमंत्री डॉ. बांइटसिंग म्हणाले की समाजातील काही वर्गांची खरेदीची शक्ती वाढत गेली आणि रोजखपाच्या वस्तूंचा पुरवठा अपुरा पडला. म्हणून किमती वाढत गेल्या. लोकांच्या उत्पन्नापैकी मोठा भाग अन्नावर खर्च होत असल्याने अन्नपदार्थांचा पुरवठा वाढविला की किमतींची पातळी खाली येईल अशी समजूत प्रचलित आहे. पण गेल्या काही वर्षांत शहरीकरण वाढत चालले आहे. त्यामुळे अन्नाखेरीज इतर उपभोग्य वस्तूंची मागणीही बरीच वाढत चाललेली आहे. अशा इतर वस्तूंचा पुरवठा जर अपुरा झाला तरीही किमतीची वाढ होण्याला उत्तेजन मिळत असते. डॉ. मित्र म्हणाले की ज्या लोकांना किमतीच्या वाढीचा फायदा मिळाला त्यांची सरकारवर जबर पकड आहे. किमती वाढल्यामुळे गरीब व ठराविक उत्पन्न असणाऱ्या लोकांचे नुकसान झाले आहे. उत्पन्नाच्या विषम वाटणीचा हा परिणाम आहे.

---

### वाढती महागाई

| | | जून १९७३ | जानेवारी १९७३ | जानेवारी १९७१ |
|---|---|---|---|---|
| मटण | किलो | ११·०० | ६·५० | ६·०० |
| बटाटे | ,, | १·७५ | १·०० | १·०० |
| कांदे | ,, | १·०० | ०·६० | ०·५० |
| अंडी | १ डझन | ६·०० | ४·२० | ३·१० |
| साखर | किलो | ४·९० | ३·५० | २·०० |
| डालडा | ,, | ११·०० | ७·०५ | ६·०० |
| पोस्टमन तेल | ,, | १०·१० | ५·८० | ४·५० |
| तूर डाळ | ,, | ३·०० | २·६० | २·०० |
| मूग डाळ | ,, | ३·७० | ३·४० | २·०० |
| हरबरा डाळ | ,, | २·९० | २·१० | १·७० |
| उडदाची डाळ | ,, | ३·१५ | ३·४० | १·८० |
| गूळ | ,, | ४·०० | २·६० | १·६० |
| खोबरेल | ,, | ११·०० | ६·६० | ६·०० |
| तीळ तेल | ,, | ११·०० | ७·७० | ५·८० |

## बँकांतील ओव्हरटाईम भत्त्यात प्रचंड वाढ ह्या भत्त्याच्या खर्चात २,००० नवे कर्मचारी नेमता येतील !

राष्ट्रीयीकृत बँकांनी १९६७ ते १९७२ अखेर दिलेल्या ओव्हरटाईम भत्त्यांचे आकडे लोकसभेत सादर केले, ते उद्बोधक आहेत. १९६७ मध्ये राष्ट्रीयीकृत बँकांनी ३१३·३ लक्ष रु. ओव्हरटाईम भत्ता दिला; १९७२ मध्ये ही रक्कम ६१७ लक्ष रु. वर गेली ! ह्या बाबतीत सेंट्रल बँक आणि बँक ऑफ बरोडा ह्या बँका आघाडीवर आहेत. (१९७२ साली अनुक्रमे ९४·५० लक्ष रु. आणि ८९ लक्ष रु.) १९६७ ते १९७२ ह्या काळातील ओव्हरटाईम भत्ता सर्वच बँकांच्या बाबतीत वाढला आहे. एकूण खर्चाशी ओव्हरटाईम भत्त्याचे प्रमाण अलाहाबाद बँक आणि बँक ऑफ बरोडा ह्यांच्या बाबतीत सर्वांत अधिक आहे.

कर्मचाऱ्यांवरील खर्चाशी ओव्हरटाईम भत्त्याचे सरासरी प्रमाण ५·४% पडले. सिंडिकेट बँकेचे प्रमाण सर्वात कमी म्हणजे १·२% आहे. कॅनरा बँक ३·५%, सेंट्रल बँक ३·५%, देना बँक आणि इंडियन बँक ५·३%, बँक ऑफ महाराष्ट्र ५·४%, इंडियन ओव्हरसीज आणि युनायटेड बँक ५·६%, युनियन बँक आणि बँक ऑफ इंडिया ५·७%, युनायटेड कमर्शिअल बँक आणि पंजाब नॅशनल बँक ५·९%, अशी इतर बँकांतील प्रमाणे आहेत.

१९७२ मध्ये एकूण ६१७ लक्ष रु. ओव्हरटाईम भत्ता दिला. तेवढ्याच खर्चात २,००० नवे कर्मचारी नेमता येतील आणि त्या प्रमाणात बेकारी निवारणास मदत होईल, असा हिशेब करण्यात आला आहे.

बँकांतील कर्मचाऱ्यांना इतर क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांपेक्षा किती जास्त पगार मिळतो आणि तो कितीतरी जास्त प्रमाणात वाढत जातो, हे खालील एका तक्त्यात दाखविलेले आहे. उदाहरणार्थ, बँकेतील कर्मचाऱ्याचा (कारकुनाचा) पगार ५५० रु. पर्यंत वाढू शकतो, तर मध्यवर्ती सरकारच्या नोकरीतील त्याचा भाऊबंद १८० रु. च्या वर जाऊ शकत नाही. रिझर्व्ह बँकेतला कर्मचारी ५९० रु. पर्यंत पोचतो. बँकेतील पट्टेवाला २०० रु. पर्यंत जातो, तर मध्यवर्ती सरकारच्या नोकरीतील त्याचा भाऊबंद ८५ रु. च्या वर जाऊ शकत नाही. (हे सर्व बेसिक पगाराचे आकडे आहेत).

### तुलनात्मक बेसिक पगार

| संस्था | किमान बेसिक कारकून रु. | किमान बेसिक पट्टेवाला रु. | कमाल बेसिक कारकून रु. | कमाल बेसिक पट्टेवाला रु. |
|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती सरकार | ११० | ७० | १८० | ८५ |
| राष्ट्रीयीकृत 'अ' वर्ग बँका | १७० | ११६ | ५५० | २०० |
| रिझर्व्ह बँक | २१० | १३५ | ५९० | २३५ |
| इंजिनिअरिंग कंपनी | १९३ | १५० | ३०५ | १७९ |
| ऑइल मिल | ९५ | ५० | ३७१ | १३१ |
| विद्युत् उपकरणे | ९८ | ४७ | ३१३ | ११९ |
| पेट्रोलिअम | १४५ | ८५ | ३७५ | १२५ |
| औषधी | १२५ | ५५ | ३६५ | १३३ |

### राष्ट्रीयीकृत बँकांनी दिलेला ओव्हरटाईम भत्ता (लक्ष रुपये)

| बँकेचे नाव | | १९६७ | १९६८ | १९६९ | १९७० | १९७१ | १९७२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ... | ५७·२७ | ६९·५५ | ५८·७९ | ६६·१० | ७९·६६ | ९४·५० |
| २. बँक ऑफ इंडिया | ... | ३४·१५ | ३९·५७ | ४७·३९ | ५७·८४ | ७२·६९ | ८३·८२ |
| ३. पंजाब नॅशनल बँक | ... | ५६·०० | ५५·०५ | ५७·५४ | ६७·६२ | ८६·७० | ४५·२७+ |
| ४. बँक ऑफ बरोडा | ... | ३१·२७ | ३७·६२ | ५३·६० | ६५·४६ | ८५·०४ | ८८·६९ |
| ५. युनायटेड कमर्शिअल बँक | ... | २६·८२ | ३३·३१ | ३६·११ | ४५·२२ | ५५·६४ | ६३·०५ |
| ६. कॅनरा बँक | ... | १०·६७ | १३·२२ | १९·९० | २३·०१ | ३०·०२ | ३६·९८ |
| ७. युनायटेड बँक ऑफ इंडिया | ... | १७·९३ | १८·२९ | २३·०१ | २९·४१ | ३९·२१ | ४८·८८ |
| ८. देना बँक | ... | १६·३१ | १९·२५ | १९·१० | २१·७० | ३०·१२ | * |
| ९. सिंडिकेट बँक | ... | १·३० | १·६६ | २·६५ | ४·३६ | ७·६८ | १२·४० |
| १०. युनियन बँक ऑफ इंडिया | ... | १५·३७ | १९·२६ | २५·७२ | ३६·२४ | ३८·९८ | ४०·९९ |
| ११. अलाहाबाद बँक | ... | १८·५८ | २१·३७ | २३·६० | २६·९५ | ३३·०६ | ३५·९० |
| १२. इंडियन बँक | ... | १४·८२ | १४·५३ | १६·४३ | १६·४३ | १९·९६ | २२·७३ |
| १३. बँक ऑफ महाराष्ट्र | ... | ६·५५ | ८·४३ | ९·२६ | १२·०२ | १५·६३ | १९·०८ |
| १४. इंडियन ओव्हरसीज बँक | ... | ६·७५ | १०·०२ | १२·५५ | १६·०७ | २०·२४ | २४·६९ |
| | ... | ३१३·२९ | ३६१·६३ | ४०५·६५ | ४८८·४३ | ६०४·६३ | ६१६·९८ |

+ जून, १९७२ पर्यंत  * उपलब्ध नाही.

### " रेंट ॲक्ट जेथे लागू आहे, तेथे सहकारी कायदा लागू नाही "

" अर्जदार हा पुष्प भुवन को. सोसायटीच्या कुलाबा येथील इमारतीचा भाडेकरू आहे " असा कोर्टाचा अभिप्राय मागणारा अर्ज मुंबईच्या स्मॉल कॉजेस कोर्टात करण्यात आला. त्या प्रकरणी कोर्टाने सोसायटीवर आर्बिट्रेशनचे काम तहकूब करण्याचा हुकूम काढला.

" मी भाड्याने जागा घेतली परंतु लीव्ह अँड लायसेन्सच्या करारावर सही करण्यास मला भाग पाडण्यात आले. मी भाडेवाढीस नकार दिला तेव्हा मला बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर माझ्याविरुद्ध आर्बिट्रेशनची कारवाई करण्यात आली. ह्या प्रकरणी रजिस्ट्रारला किंवा त्याच्या नॉमिनीला अधिकारच नाही; फक्त स्मॉल कॉजेस कोर्टालाच अधिकार आहे " असे अर्जदाराने आपल्या अर्जात म्हटले आहे.

अर्जदाराने कोर्टात २,८०० रु. अनामत ठेवावेत, ह्या अटीवर कोर्टाने तहकुबीचा हुकूम दिला. " रेंट ॲक्ट जेथे लागू आहे त्या बाबतीत सहकारी सोसायट्यांचा कायदा लागू राहणार नाही " ह्या सुप्रीम कोर्टाच्या मतप्रदर्शनाचा जज्जांनी आधार घेतला. ह्या प्रकरणी स्मॉल कॉजेस कोर्टालाच अधिकार आहे, असेही त्यांनी नमूद केले.

---

### परदेशी बँकांनी भारतातून स्वदेशी पाठविलेले नफे

| ( १९७१–७२ ) | रु. |
|---|---|
| अमेरिकन एक्सप्रेस ( अमेरिका ) | ३६,५६,५५५ |
| बँक ऑफ अमेरिका ( अमेरिका ) | ३५,२४,१६५ |
| फर्स्ट नॅशनल सिटी बँक ( अमेरिका ) | ९०,४७,७८१ |
| ब्रिटिश बँक ऑफ दि मिडल ईस्ट ( ब्रिटन ) | ५,०७,७६२ |
| दि चार्टर्ड बँक ( ब्रिटन ) | ४,९०,८४९ |
| मर्कंटाइल बँक ( ब्रिटन ) | ३९,१५४ |
| नॅशनल अँड ग्रिंडलेज बँक ( ब्रिटन ) | ९०,८८,४९३ |
| हाँगकाँग अँड शाँघाय बँकिंग कॉर्पोरेशन ( हाँगकाँग ) | ३,८२,६०८ |
| मर्कंटाइल बँक ( हाँगकाँग ) | १२,४४,८४४ |
| अलगेमेन बँक लेदरलंड ( हॉलंड ) | ६,६९,७०८ |
| मिटसुई बँक ( जपान ) | ३,५१,४६७ |
| बँक ऑफ टोकियो ( जपान ) | ११,७७,७९४ |

---

### तुरुंगातील कैदी आणि आरोपी

महाराष्ट्रातील ४०% गुन्हेगार दंड देऊ न शकल्यामुळे तुरुंगवास पत्करतात. जामीन देता न आल्यामुळे खटला संपेपर्यंत बहुतेक आरोपींना पोलीस कस्टडीत राहावे लागते. त्यांपैकी ८०% निरपराधी ठरून बाहेर पडतात. महाराष्ट्रातील तुरुंगात एका वेळी साधारणपणे १२,००० कैदी आणि ६,००० आरोपी राहात असतात. २८% कैदी २१ वर्षांखालचे, ४५% कैदी २२ ते ३० वर्षांचे आणि बाकीचे २७%, ३० वर्षांवरचे असतात.

### युनिट ट्रस्टच्या नफ्याच्या दरात वाढ

युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाने आपल्या नफ्याच्या दरात गेल्या वर्षापेक्षा एक चतुर्थांश टक्क्याने वाढ करून ८·५ टक्के नफा देण्याचे जाहीर केले आहे. १९७३ च्या जुलैअखेर संपलेल्या वर्षात ट्रस्टच्या रोख्यांची विक्री २३·०३ कोटी रु. इतकी झाली. आतापर्यंतच्या वार्षिक विक्रीचा हा उच्चांक आहे. ह्या विक्रीत विमा योजनेशी संबंध असलेल्या रोख्यांच्या विक्रीचा समावेश नाही. १९६९–७० साली २२·६३ कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री झाली होती. म्हणजे गेल्या वर्षी झालेली विक्री २० लाखांनी अधिक आहे. युनिट ट्रस्टच्या रोख्यांची विक्री लोकप्रिय करण्यासाठी तीन उपाय योजण्यात आले होते. गुंतवणुकीवरील नफ्यात तर वाढ करण्यात आलीच; पण त्याचबरोबर जुलै महिनाअखेर होणाऱ्या विक्रीसाठी रोख्यांची किंमत कमी करण्यात आली होती. शिवाय ट्रस्टच्या रोख्यांची खरेदी आणि विक्री ह्यांमधील फरक कमी करण्यात आला होता. ह्या उपायांचा चांगला उपयोग झाल्याचे दिसून आले. १९७२–७३ साली ट्रस्टचे एकूण उत्पन्न ११·८२ कोटी रुपये झाले. त्यापूर्वीच्या वर्षी ते ९·६३ कोटी रुपये होते. गेल्या वर्षी झालेल्या उत्पन्नातून १०·८० कोटी रुपये रोखेधारकांना वाटण्यासाठी उपलब्ध करण्यात आले. गेल्या वर्षी ८·७३ कोटी रुपये उत्पन्न वाटपाकडे देण्यात आले होते. ट्रस्टचे अध्यक्ष म्हणतात की ट्रस्टच्या पैशासंबंधीचे गुंतवणुकीचे धोरण बदलण्यात आल्यामुळे उत्पन्नात सुधारणा झाली. १९७३ जूनच्या अखेरीस ट्रस्टने रोख्यात एकूण १५२·४२ कोटी रुपये गुंतविलेले होते. त्यापूर्वीच्या वर्षात ९८·३६ कोटी रुपये गुंतविलेले होते.

---

### रासायनिक खतांचा वापर बेताने करा

शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी सर्व जगात रासायनिक खतांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यात येऊ लागला आहे. वाढती लोकसंख्या आणि शेतीचे अपुरे उत्पादन ह्यांच्या कात्रीत सापडलेल्या अविकसित देशांना तर शेतीचे उत्पादन त्वरित वाढविण्याची फार गरज आहे. तथापि, हे साध्य गाठण्यासाठी रासायनिक खतांचा बेसुमार वापर करण्यात येऊ नये असा इशारा तीन जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांनी दिला आहे. 'हरित क्रांतीतील पुढचे पाऊल' ह्या रेडिओवरील परिसंवादात त्यांनी आपले विचार व्यक्त केले. रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी शेतीविषयक संशोधनात विविधता आणली पाहिजे असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी धोक्याचा इशाराही दिला. रासायनिक खताच्या अतिरिक्त वापरामुळे निसर्गाचे दूषितीकरण वाढण्याच्या परिणामाकडे लक्ष वेधून भविष्यकाळात अमाप पीक देणाऱ्या धान्याच्या जातींसाठी पुरेसे रासायनिक खत मिळणे शक्य नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

---

### जादूगार गोगिआ पाशा

आपल्या जादूच्या खेळांनी प्रेक्षकांना थक्क करणारे गोगिआ पाशा आता व्यवसायातून जवळजवळ निवृत्त झाले आहेत. त्यांचे वय आता ६७ आहे. डेहराडून येथील आपल्या छोट्या घरात ते कालक्रमणा करीत असतात. त्यांच्या वडिलांची इच्छा त्यांनी कुशल शस्त्रक्रियाविशारद व्हावे अशी होती. एका ज्योतिषाने त्यांची निमुळती सडसडीत बोटे शल्यकर्माला अत्यंत अनुकूल आहेत असा अभिप्राय त्यांच्या लहानपणीच व्यक्त केला होता. वैद्यकाची पद्विका घेऊन ते पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तेथे त्यांची प्रसिद्ध ब्रिटिश जादूगार ओवेन क्लार्क ह्यांच्याशी गाठ पडली व ते त्यांचे शिष्य झाले. १९२८ साली ते आपल्या गुरूबरोबर न्यूयॉर्कला गेले. तेथे एक प्रयोग चालू असताना ओवेन क्लार्क रंगमंचावरच निधन पावले. पण, गोगिआ पाशांनी न डगमगता खेळ पुरा करून दाखविला. तेव्हापासून ते जगभर प्रथम श्रेणीचे जादूगार म्हणून प्रसिद्ध पावले. त्यांचे नाव दलपतराय गोगिआ असून त्यांना पाशा ही पदवी इजिप्तचे माजी राजे फारूक ह्यांनी दिलेली आहे. आपल्या ऐन उमेदीत त्यांनी ८ आंतरराष्ट्रीय पदके मिळविलेली आहेत. १९३७ मध्ये त्यांनी म्युनिकमधील एका हॉटेलमध्ये हिटलरसमोर बघताबघता हवेतून नाणी काढून दाखविण्याचा प्रयोग करून दाखविला होता. आजही ते ही जादू करून दाखवितात. पण, व्यवहारातील खराखुरा पैसा मिळविण्यासाठी मात्र ते २० खोल्यांचे एक हॉटेल चालवीत आहेत. ते पत्रकारांशी बोलताना म्हणाले, "बहुतेक सर्व जादूगार आयुष्याच्या अखेरीस दारिद्र्यात मरण पावले आहे. मला मात्र तशी भीती वाटत नाही. कारण मी स्त्रियांच्या नादी लागत नाही आणि बाटलाबाईच्याही अधीन होत नाही."

---

### छोट्या नाण्यांची टंचाई चालू राहण्याचा संभव

टांकसाळीतून छोटी नाणी पाडण्याच्या कामात बरीच प्रगती होऊन आता दररोज ७५ लाख छोटी नाणी पाडण्यात येऊ लागली आहेत. तरीहि आणखी काही काळ ह्या नाण्यांची टंचाई चालू राहण्याची शक्यता आहे. १९७३–७४ सालात २१६·५ कोटी नाणी पाडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. त्यांची दर्शनी किंमत ३१·४८ कोटी रुपये होईल. पण ह्या वर्षात २२३ कोटी नाण्यांची आवश्यकता लागेल असा अंदाज करण्यात आलेला आहे. छोटी नाणी पाडण्याच्या बाबतीत मोठा पल्ला गाठण्यात आला असला तरी देशाच्या अनेक भागांत १० पैशांच्या व २५ पैशांच्या नाण्यांचा तुटवडा भासत आहे. ह्या नाण्यांची टंचाई भासण्याचे एक कारण असे आहे की वस्तूंच्या किंमतीत झालेल्या भरमसाट वाढीमुळे छोट्या नाण्यांना काही किंमतच राहिलेली नाही. १९७०–७१ मध्ये छोट्या नाण्यांची टंचाई प्रथम जाणवू लागली.

---


"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."
—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. ११ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.**

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | | |
|---|---|---|
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूरध्वनी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स) |
| | | कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन) |
| | | उपकार्यालय नं.१ : २६०३०६ नं.२ : २९०००६ |

राज्य सहकारी भूविकास बँक व राज्यातील तिच्या २५ जिल्हा शाखा यांच्यामार्फत तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच ट्रॅक्टर व जमीन-सुधारणेकरिता कर्ज-वाटप करण्यात येते. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

डी. एस. जोशी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

## व्यवस्थापनातील समस्या (११)

### बँकेचा शिपाई आणि साहेबाच्या घरचे काम

( शाम रघुनाथ खाखरे, बँक ऑफ महाराष्ट्र, तासगाव )

अदृश्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील श्री उत्कर्ष हे नाठेठोम तालुक्याच्या ठिकाणी बँक इन्स्पेक्टर म्हणून काम करीत होते. शाखा मोठी होती व जास्त सोसायट्या त्यांच्याकडे होत्या, त्यामुळे त्यांना कामही भरपूर होते. स्वतः उत्कर्ष उमेदीचे, उत्साही असल्यामुळे काम मनापासून करीत व हाताखालील लोकांकडून काम कौशल्याने करून घेत. त्यांच्या या गुणामुळे ते तालुक्यात लवकरच लोकप्रिय बनले.

राजा नावाचा शिपाई, रोज सकाळी साहेबांचे घरी जात असे, घरचे पाणी भरणे, अंथरूण काढणे, भाजीपाला, दळण आणणे वगैरे कामे तो करीत असे. साहेबही तसे उदार होते. रोज शिपायाला चहा देणे, वेळप्रसंगी उसने पैसे देणे, अडीअडचणी समजावून घेऊन रजाही देणे, अधेमधे घरी सोडणे यामुळे दोघांचेही बरे चालले होते. हाताखालच्या लोकांत याबद्दल चर्चा चाले; मात्र ती साहेबांच्या माघारी. कधी शिपायालाही घरी काम करण्याबद्दल इतर लोक शालजोडीतून मारीत असत, ते त्यालाही कळे. त्याला असेही वाटे आज आपण काम केले नाही व मग साहेबांनी दुसरा शिपाई त्यांच्याकडे घेतला व आपली बदली केली तर भत्ता, दौराही बुडणार.

थोड्याच दिवसांत राष्ट्रीयीकृत बँकेतील कर्मचारी युनियनच्या मिटिंगला हजर राहण्याचा राजाला प्रसंग आला. मिटिंगमध्ये ऑफिसर लोक कसा त्रास देतात, आपण कसे वागायचे व आपले हक्क काय याची जाणीव देणारी भाषणे झाली. यांचा परिणाम राजाच्या मनावर झाला, त्याला आपल्या हक्कांची जाणीव झाली व त्याने फक्त बँकेतील काम करायचे, साहेबाच्या घरी काम करायचे नाही असे पक्के मनाशी ठरविले.

दुसरे दिवशी सकाळी तो साहेबाच्या घरी गेलाच नाही. राजा आजारी असेल अगर घरी काही अडचणी असतील असे समजून उत्कर्ष व त्यांच्या घरातील लोकांनी आपली कामे आवरून घेतली.

बँक घराजवळच असल्यामुळे घरी आंघोळ, देवपूजा आवरून उत्कर्ष बँकेत आले. दुसरा शिपाई गोपाळ बँकेत होताच आणि त्याने पहिलीच बातमी साहेबांना सांगितली की, "साहेब काल मिटिंग होती, राजा गेला होता आणि तो आता तुमच्या घरचे काम करणार नाही असे म्हणाला." गोपाळ पुढे असेही म्हणाला, "साहेब, मला हे पसंत नाही. मी तुमच्या घरी काम करतो." उत्कर्ष वस्ताद होते. त्यांनी गोपाळला नको म्हणूनच सांगितले.

अकरा वाजता राजा बँकेत आला. साहेब त्याला काहीच बोलले नाही. टपाल वगैरे पाहून झाल्यावर अगदी सहजतेने साहेबांनी विचारले, सकाळी घरी आला नाहीस काही अडचण होती का? तेव्हा राजा म्हणाला नाही थोडे काम होते. स्पष्ट बोलण्याचा धीर त्याला झाला नाही. ते पाहून साहेब त्याला म्हणाले बरे मग आता घरी जा व काही कामे असतील तर करून ये. मग मात्र राजा स्पष्ट म्हणाला "साहेब मी घरची कामे करणार नाही. मला फक्त बँकेतीलच कामे सांगा."

साहेबांनी त्याला सर्व परीने समजावून सांगितले. युनियन, राष्ट्रीयीकृत बँका व सहकारी बँका यांतील फरकही सांगितला. तथापि राजाच्या मनावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. मग मात्र साहेबांना बरे वाटले नाही.

दुसरे दिवशी साहेबांनी राजास दौऱ्यावर जायचे म्हणून सांगितले व सकाळी ९ वाजता येण्यास सांगितले. दौरा म्हणजे सोसायटीच्या ठिकाणी कोंबडीचे जेवण, मजेत राहणे, शिवाय बँकेचा भत्ता, मोटारभाडे हे आलेच. हा नेहमीचा अनुभव. मात्र दुसरे दिवशी साहेबांनी मोठी पत्र्याची बॅग बरोबर घेतली. त्यात सर्व जेवणाचे सामान म्हणजे तांदूळ, गव्हाचे पीठ वगैरे घेतले. बॅगेतच पाटा, वरवंटा व उखळ घेतले व बॅगेला कुलूप लावले. तोवर राजा आलाच. साहेब त्याला म्हणाले, राजा आपणाला बँक भत्ता देते. त्यामुळे सोसायटीत कोणाला त्रास द्यायचा नाही. मी माझे जेवण हातांनी करणार आहे. तू पण तुझी व्यवस्था कर. असे सांगून त्याला ती बॅग उचलून स्टँडवर जाण्यास सांगितले. ते जड ओझे घेऊन राजा स्टँडवर आला व साहेबांबरोबर एस. टी. त बसला. सोसायटीचे गाव पाटीपासून १–१॥ मैल आत होते. सोसायटीचे सेक्रेटरी गाडी घेऊन पाटीवर आले होतेच. साहेब व राजा आपल्या "पसाऱ्यासह" खाली उतरले, तेव्हा सेक्रेटरी यांना आश्चर्य वाटले व ते बॅग उचलून गाडीत ठेवू लागले. तेव्हा साहेब म्हणाले, सेक्रेटरीसाहेब बँक आम्हाला भत्ता देते, शिवाय मदतीला शिपाई आहे. मी तुमच्या गाडीत बसणार नाही. आम्ही पायीच येऊ. व राजाला बॅग उचल म्हणून सांगितले. सोसायटीतील लोकांना हे नवीनच होते. मात्र राजाला त्याचा पूर्ण बोध झाला. दीड मैल ओझे घेऊन जाईपर्यंत राजाला घाम फुटला.

साहेब सोसायटीच्या लोकांना म्हणाले, आम्हाला भत्ता मिळतो मग आम्ही तुम्हाला का त्रास द्यायचा? राजा मात्र साहेबांच्या मात्रेने थंड झाला व सायंकाळी बॅग घेऊन परत आला.

श्री. उत्कर्ष साहेबांनी राजावर सूड घेतला का राजाला धडा शिकविला?

राजाने सर्व गोष्टींचा विचार करून साहेबाच्या घरी काम करावे का न करावे? वाचकांनी आपले मत द्यावे.

---

**भाक्रा धरणात जादा पाणी**— १९७२ साली भाक्रा धरणात पाण्याची साठवण पुरेशी झाली नाही. कारण अवर्षणाचा तडाखा त्या धरणाच्या पाणलोटाच्या क्षेत्रालाही बसला होता. पाण्याचा साठा अपुरा झाल्यामुळे पाण्याची व विजेची जबर टंचाई निर्माण झाली होती. चालू पावसाळ्यात मात्र भरपूर पाऊस पडल्याने पाण्याचा सुकाळ झाला आहे. गेल्या वर्षीची पाण्याची पातळी आताच गाठली गेली आहे. पावसाळ्याचे तीन महिने अजून जावयाचे आहेत.

**मक्याच्या उत्पन्नात क्रांती** — १९६० ला सुरू झालेल्या दशकाच्या मध्यावर गव्हाच्या उत्पादनात क्रांती झाली. मेक्सिकोतून आणलेल्या बेण्यामुळे ह्या क्रांतीचा पाया घातला गेला. आता संकरित मक्याचे बेणे अमेरिकेकडून आणले आहे. पंजाबात नव्या बेण्याची लागवड करण्यात येत आहे.

**मध्यवर्ती सरकारचा नोकरवर्ग**—३१ मार्च, १९७१ रोजी मध्यवर्ती सरकारच्या नोकरीत २९·२ लक्ष नोकर होते; ३१ मार्च, १९७० रोजी त्यांची संख्या २८·५ लक्ष होती. नोकरांपैकी रेल्वेज्मध्ये ५०·९%, संरक्षणखात्यात (मुलकी) १७·६%, दळणवळणखात्यात १४·३%, अर्थखात्यात ४·४% होते. नोकरांपैकी ६७,४०० (२·५%) स्त्रिया होत्या. १९७० साली स्त्री नोकरांची संख्या ६३,९०० होती. एकूण कायम नोकरांपैकी म्हणजे २७ लक्ष नोकरांपैकी निम्म्यापेक्षा अधिक नोकरांचा पगार अधिक महागाई भत्ता मिळून दरमहा १५० रु. पेक्षा कमी प्राप्ती होती; एक-तृतीयांश नोकरांची प्राप्ती १५० रु. ते २९९ रु. होती. ५०० रु. पेक्षा जास्त प्राप्ती असणारे शंभरात तीन होते.

**कंपनीला नविन ठेवी स्वीकारण्यास बंदी**— रिझर्व्ह बँकेने के. टी. डोंगरे आणि कं. प्रा. लि. ला पब्लिककडून नव्या ठेवी स्वीकारण्यास बंदी केली आहे. बिगर-बँकिंग, बिगर-फिनॅन्शिअल कंपन्यांच्या ठेवी घेण्यासंबंधीच्या रिझर्व्ह बँकेच्या काही सूचना न पाळल्या गेल्याचा हा परिणाम आहे.

**सहा बँकांचे डायरेक्टर निवृत्त होणार**—राष्ट्रीयीकृत ६ बँकांचे मॅनेजिंग डायरेक्टर येत्या ऑगस्ट–सप्टेंबर मध्ये निवृत्त व्हावयाचे आहेत– श्री. प्रभु (कॅनरा बँक), श्री. गुल महंमद (देना बँक), श्री. मुकर्जी (अलाहाबाद बँक), श्री. चेत्तूर (इंडियन ओव्हरसीज बँक), श्री. सक्सेना (बँक ऑफ इंडिया) आणि श्री. दत्ता (युनायटेड बँक ऑफ इंडिया). बाहेरील लोकांना ह्या जागी नेमावयाचे की खालच्या लोकांना बढती द्यावयाची, असा प्रश्न अर्थखात्यापुढे आहे.

**करमणूक कराचे उत्पन्न**— १९७२–७३ मध्ये बृहन्मुंबईमधील ११२ सिनेमागृहांपासून ९,५४,९३,२६२ रु. करमणुकीचा कर वसूल झाला. १९७१–७२ मधील १०१ सिनेमागृहांपासून झालेली वसुली ८,५६,७९,८०४ रु. होती.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :- ३८३३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



With over
a thousand branches

CENTRAL BANK OF INDIA

extends to you these facitities

- Open today a Saving Account with only Rs. 5/- and earn interest at 4%
- Save for future. Join our Recurring Deposit Scheme. Minimum monthly interest upto 7%
- Centrals Services are available to you through more than one thousand branches

Contact nearer Branch for further information

DEVELOP
SAVINGS HABIT
THE BEST HABIT

PADMA ADVTS.

## श्रीमंत व गरीब देशांतील आर्थिक अंतर

पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी कॅनडामधील आपल्या दौऱ्यात ओटावा येथे तेथील उद्योगपतींपुढे भाषण करून श्रीमंत देशांतील नागरिक अविकसित देशांतील नागरिकांपेक्षा २० पट अधिक संपत्तिसाधनाचा उपभोग घेतात असे म्हटले होते. गरीब व श्रीमंत देशातील आर्थिक तफावत फार मोठी आहे ह्याबद्दल आता वाद राहिलेला नाही. परंतु ह्या तफावतीचे मोजमाप करण्याच्या पद्धती आणि ती दूर करण्याचे उपाय ह्यांबद्दल मात्र अर्थशास्त्रज्ञात मतामतांचा गलबला दिसून येतो. तीन वर्षांपूर्वी युगोस्लाव्हिआमध्ये ह्या तफावतीसंबंधी एक परिषद भरविण्यात आली होती. ह्या परिषदेत भाग घेतलेल्या अर्थशास्त्रज्ञांनी ह्या विषयासंबंधी जे विचार व्यक्त केले त्यांचे आता एका पुस्तकात संकलन करण्यात आले आहे. विषयाचा अनेक अंगांनी विचार त्यात झालेला दिसून येतो. गरीब व श्रीमंत देशांतील आर्थिक विषमतेसंबंधी परिषदेत बोलताना नैरोबीच्या प्रतिनिधींनी मूलभूत प्रश्नाला हात घातलेला दिसून येतो. आर्थिक विषमतेच्या प्रश्नाविषयी बोलताना ते म्हणतात की श्रीमंत देशांकडून गरीब देशांकडे माल, तंत्र-विज्ञान, आर्थिक संस्था आणि मनोवृत्ती ह्यांचा ओघ सतत व वाढत्या प्रमाणावर येत आहे. पण हा ओघ गरीब देशांना उपकारक होतो असे म्हणता येणार नाही. प्राथमिक गरज भागविणाऱ्या अन्नधान्याची आयात सोडली तर गरीब देशांत कोणत्या प्रकारचा व कोणत्या दर्जाचा माल पाठवावा ह्याची किल्ली श्रीमंत देशांच्याच हातांत आहे. अशा परिस्थितीत अविकसित देशांत जो माल निर्माण करण्यात येतो, उत्पादनाचे जे तंत्र ते वापरतात, आणि जे शिक्षण तेथे देण्यात येते त्यांचा त्या देशांतील गरजांशी फारसा संबंध राहात नाही, ह्यात नवल नाही.

अविकसित देशांना आपल्या अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग पुरेसा वाढवून नजीकच्या भविष्यकाळात दारिद्र्यावर मात करता येईल असे दिसत नाही. त्यांच्या विकासाचा वेग मंद का असावा असा प्रश्न उपस्थित करून परिषदेत भाग घेणारे दुसरे एक अर्थशास्त्रज्ञ म्हणतात की संमिश्र अर्थव्यवस्थेचा प्रयोग करण्यात येत असल्यामुळे असे होत आहे. ह्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेत पुष्कळदा भांडवलदारी संस्था-संघटना आणि समाजवादी हेतू ह्यांचे साहचर्य आढळून येते. त्यामुळे त्यांच्यात सुसंवाद राहात नाही. अशा प्रयोगांबद्दल आता वाढती निराशा वाटू लागली आहे. परंतु त्याचे कारण असे सांगता येईल की समाजवादाबद्दलची आस्था आतापर्यंत फक्त बौद्धिक पातळीवरच राहिली आहे. अविकसित देशात देशांतर्गत गरजांचा उपलब्ध साधनांवर वाढता दाब पडत आहे. अशा परिस्थितीत अविकसित देशांतील भांडवलदारीची वाढ व्हावयाची असेल तर पाश्चिमात्य देशांनी त्यांना भरपूर मदत दिली पाहिजे. नाहीतर भांडवलदारी पद्धतीची वाढ होताना उत्पन्नात सहजच होणारी विषमता स्फोटक बनण्याची शक्यता आहे आणि मग अविकसित देश उत्पन्नाच्या वाटणीची विपरीत पद्धत स्वीकारण्यापेक्षा आर्थिक वाढीच्या वेतबाताचा वेग पत्करण्यास उद्युक्त होतील. ह्याच संदर्भात अविकसित देशांतर्गत बुद्धिमंतांचा मोठ्या कंपन्यांकडे जाणारा ओघही महत्त्वाचा ठरतो. हिंदुस्थान–पाकिस्तानसारख्या देशांतून अनेक परदेशी कंपन्या धंदा करीत असतात. त्यांना तेथील कायद्याप्रमाणे तद्देशीयांना व परकीयांना सारखे वेतन द्यावे लागते. पण त्या देशांतील अंतर्गत वेतनश्रेणींचा आणि कंपन्यांकडून देण्यात येणाऱ्या वेतनश्रेणींचा पुष्कळदा कसलाच संबंध राहिलेला नसतो. उच्च शिक्षितांना देण्यात येणारे पगार बडे असल्यामुळे बुद्धिमंतांचा ओघ कंपन्याकडे वाहात असतो. हा ओघ परदेशात जाणाऱ्या ओघापेक्षाही वाईट असतो. कारण त्यामुळे विलासी जीवनाला उत्तेजन मिळत राहते.

---

## पाकिस्तानची शंभर वर्षे १९६५ मध्येच भरली होती

१९६५ मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धाच्या वार्ता त्या वेळी अनेक परदेशीय वार्ताहर बाहेर धाडीत असत. युद्ध सुरू होऊन सुमारे १५ दिवसांचा अवधी झाल्यावर डी. एन. ए. ह्या जर्मन वृत्तसंस्थेने पाकिस्तानच्या लष्कराचा दारूगोळा संपत आल्याची बातमी दिली होती. त्या बातमीप्रमाणे पाकिस्तानच्या लष्कराजवळ अवघा ८–१० दिवसांचा दारूगोळा शिल्लक राहिला होता. ह्या वृत्ताचा खरेपणा आता खुद्द 'पाकिस्तान इकॉनॉमिस्ट' ह्या साप्ताहिकानेच कबूल केला आहे. आपल्या लेखात साप्ताहिकाने असे म्हटले आहे की १९६५ च्या युद्धात पाकिस्तानच्या तिन्ही दलांनी त्यांच्याजवळील दारूगोळा २२ दिवसांच्या युद्धात जवळजवळ गमावला होता. इतकेच नव्हे तर पाकिस्तानी लष्कराजवळील युद्धाच्या साधनांचीही खूप हानी झाली होती. साधनांपैकी बरीच युद्धात नष्ट झाली होती अगर नाकाम झाली होती किंवा शत्रूच्या हाती पडली होती. १९६५ साली युद्ध सुरू झाल्याबरोबर अमेरिकेची लष्करी मदत थांबली आणि युद्धबंदी होईपर्यंतच्या काळात तिन्ही दलांनी आपला सर्व दारूगोळा उधळून टाकला होता. साप्ताहिक पुढे म्हणते की, तिन्ही लष्करी दलांत लष्करी अंदाजपत्रकातील मंजूर खर्चाचा जास्तीत जास्त वाटा मिळविण्याची स्पर्धा वर्षानुवर्ष चालू होती. १९६५ पर्यंत ह्या स्पर्धेला फारशी धार आलेली नव्हती. कारण, पाकिस्तानचे संरक्षणविषयक धोरण अमेरिकेची पेंटागॉन ही संघटना ठरवीत असे. शिवाय, अमेरिकेकडून मिळणाऱ्या लष्करी साहित्यांच्या प्रमाणातच शिलकी दारूगोळ्याचा पुरवठा करण्यात येत असे. अमेरिकेची मदत थांबल्यानंतर मात्र लष्करी आरमार आणि हवाई दल ह्यांच्यावरील निर्बंध अप्रत्यक्ष रीत्या दूर झाले.

अमेरिकेची लष्करी मदत थांबल्यावर पहिल्याच वर्षी पाकिस्तानला संरक्षक दलाच्या खर्चाचा भार स्वतःच पेलावा लागला. परिणाम असा झाला की शस्त्रसज्ज दलांच्या प्रमुखांनी

आपल्या गरजांचे अंदाज अवास्तव फुगवून सांगण्यास प्रारंभ केला. भारताजवळ असलेल्या युद्धसामग्रीपेक्षाही वरचढ अद्ययावत सामग्री आणि तीही प्रचंड प्रमाणावर मागण्यात येऊ लागली. काही महिन्यांपूर्वी ह्या प्रमुखांच्या डोक्यात हे वारे शिरलेले नव्हते. अर्थातच असे युद्धसाहित्य घाईगर्दीने विकत घेण्यात येऊ लागले. त्यासाठी काळ्या बाजारातील किमती मोजाव्या लागल्या. ज्या देशांनी असे साहित्य विकले त्यांना त्याची गरज नव्हती किंवा ह्या साहित्याचा प्रत्यक्ष रणांगणावर काय उपयोग होतो तो त्यांना अजमावयाचा होता. शिवाय हे साहित्य तिसऱ्या एखाद्या देशामार्फत घ्यावे लागले आणि त्याची किंमत अधिकच फुगली. पाकिस्तानची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचा पुकारा करण्यात येत असला तरी सरकारी तिजोरीला एवढा भार पेलण्यासारखा नव्हता. पाकिस्तानातील आर्थिक विकासाची सर्व कामे थांबविण्यात आली असती तरीसुद्धा लष्करी साहित्याला लागणारा पैसा पुरा पडणे शक्य नव्हते. संरक्षणदलांच्या प्रमुखांच्या मागण्यांनी पाकिस्तान सरकारला पेचात पाडले. अखेर १९६६-६७ साली अंदाजपत्रकाचे दोन भाग करण्यात आले, व त्यांपैकी संरक्षणखात्याची रक्कम तिन्ही दलप्रमुखांनी आपसात वाटून घेण्यासाठी देण्यात आली. ही पद्धत त्यानंतरही तशीच चालू राहिली आणि दलप्रमुखांची स्पर्धा जोराने चालू राहिली. १९६६ साली संरक्षणखर्चाच्या वाट्याची जी पद्धत स्वीकारण्यात आली तिनेच तिन्ही दलांतील विग्रहाचे बीज रोवले गेले. त्याचा वृक्ष वाढीला लागून पाच वर्षांनंतर पाकिस्तानवर राष्ट्रीय आपत्ती कोसळली.

---

**नटीचे 'केशाकर्षण'**—राकेल वेल्च ह्या आकर्षक नटीने केस रंगविणाऱ्या उत्पादनाच्या जाहिरातीच्या टेलिव्हिजन कार्यक्रमात भाग घेतला. त्यासाठी तिला ८,००,००० रु. मिळाले. तिने घातलेल्या ब्लाऊजची किंमत ३,००० रु. होती. तिच्या अटीप्रमाणे ठरलेल्या फॅशन फोटोग्राफरने टेलिव्हिजन फिल्मचे दिग्दर्शन आणि चित्रीकरण केले. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या अभिनेत्रीने घातलेल्या अटी अशा पत्करल्या जातात.

**टेलिव्हिजन सेट्सचा विनपरवाना वापर** — गेल्या ऑक्टोबरमध्ये मुंबईत टेलिव्हिजनला प्रारंभ झाला, तेव्हापासून आतापर्यंत ५०,००० सेट्सची विक्री झाली आहे. परंतु, मार्च १९७२ अखेर फक्त १९,२०० सेट्सना लायसेन्स देण्यात आलेले आहे. टेलिव्हिजन सेट्सचा चोरून वापर फार मोठ्या प्रमाणावर होत आहे, कारण त्यासाठी लागणारा अँटीना घरातच बसविता येतो.

**वीजकपातीमुळे नुकसान** — महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकसिटी बोर्डाचे वीजकपातीमुळे ६ कोटी रु. चे नुकसान झाले. वीजनिर्मितीसाठी कोयनेचे पाणी वापरण्यासाठी बोर्ड महाराष्ट्र सरकारला दरसाल ९.५ कोटी रु. देते. वीजकपातीच्या काळात कोयना धरणाच्या पाण्याची पातळी नेहमीच्या पातळीच्या दोन तृतीयांशाइतकी होती, तेव्हा तेवढी तरी सूट मिळावी अशी बोर्डाने सरकारकडे मागणी केली आहे.

## महाराष्ट्र बँकेचे निवृत्त होणारे ज्येष्ठ अधिकारी

### निरोपसमारंभ

"बँकेच्या अधिकाऱ्याची नोकरी म्हणजे सुळावरची पोळी असते. त्या दृष्टीने महाराष्ट्र बँकेची प्रदीर्घ काल सेवा करून धवल यशाने निवृत्त होण्याची घटना जॉईंट जनरल मॅनेजर श्री. एस्. व्ही. धर्माधिकारी व श्री. पी. व्ही. आगाशे यांचे बाबतीत घडली असल्यामुळे त्यांचा निरोप गौरव समारंभ स्पृहणीय होतो. रिझर्व्ह बँकेने नेमलेले ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी श्री. एस्. टी. कर्णिक हेही आता निवृत्त होत आहेत. या तिघांची कामगिरी आदर्श अशीच झाली असून बँकेतील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कारकीर्दीतून पुष्कळच घेण्यासारखे आहे" असे उद्गार महाराष्ट्र बँकेच्या मध्यवर्ती कचेरीतील व बाजीराव रोड शाखेतील बँकेच्या सेवक वर्गातर्फे वरील तिघांना निरोप देण्याच्या प्रसंगी समारंभाचे अध्यक्ष बँकेचे चेअरमन श्री. अप्पासाहेब जोग यांनी काढले.

डॉ. एम्. व्ही. पटवर्धन यांनी प्रास्तविक भाषणात बँकेच्या इमारतीखाली पाण्याचे जिवंत झरे निघाले होते, त्या धर्तीवर बँकेच्या प्रगतीसाठी सन्मानित होत असलेल्या अधिकाऱ्यांनी जीवन दिले ही गौरवास्पद परंपरा होय, असे सांगितले. यानंतर या तीनही अधिकाऱ्यांना श्रीगजाननाची रजतमूर्ती, चांदीचे कलशपात्र व महावस्त्र भेट देऊन सत्कार करण्यात आला.

सत्कारास उत्तर देताना श्री. धर्माधिकारी म्हणाले, "संस्थेच्या हिताकडे आपण पहिले लक्ष दिले तर वैयक्तिक प्रगती होते. पूज्य साने गुरुजींच्या शालेय जीवनातील उद्देशांनी माझे मन प्रभावित झाले व तीच शिदोरी मला जन्मभर पुरली." श्री. आगाशे म्हणाले, "कै. प्रा. वा. गो. काळे प्रभृती अर्थशास्त्रज्ञांच्या सल्ल्यानुसार मी बँकेत सामील झालो आणि तिची सातत्याने व निरलसपणे सेवा केली. यामुळे मी समाधानी आहे."

श्री. एस्. टी. कर्णिक यांनी सांगितले की आपल्यावर रिझर्व्ह बँकेने सोपविलेली कामगिरी थोडीशी अवघड असूनही ती सर्वांच्या सहकार्याने चांगल्या रीतीने पार पाडता आली याबद्दल त्यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना धन्यवाद दिले. शेवटी जॉईंट जनरल मॅनेजर श्री. पाडगावकर यांनी सर्वांचे आभार मानल्यावर हा हृद्य समारंभ संपला.

---

**गिरण्या सातही दिवस चालणार**—मुंबईची मिल ओनर्स असोसिएशन आणि राष्ट्रीय मिल्स मजदूर संघ ह्यामध्ये झालेल्या कराराप्रमाणे मुंबईतील कापड गिरण्या सातही दिवस चालू राहतील. त्यामुळे उत्पादनात १६% वाढ होईल. सध्या ह्या गिरण्यात २,२५,००० कामगारांना रोजगार मिळतो. सर्व गिरण्यांनी सात दिवस काम करण्याचे ठरविले तर २०,००० ते २५,००० आणखी कामगारांना काम मिळेल. संबंधित गिरण्यांतील विद्यमान कामगारांच्या नातेवाइकांना प्राधान्य दिले जाईल.




सोल सेलींग अेजन्टस्

**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

१७७ जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.



बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना

**निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना**

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.


# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

| स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेडयुल्ड बँक |
|---|---|---|

**महाराष्ट्रात सर्वत्र शाखा**

## ★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★


**विजय पंपस्** कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,

त्यांस "विजय" पंपाची

आवश्यकता आहेच.




# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

कारखानदार—
फोन : २३१
तार : Vijayplow

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

SCO-1 MIN

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायाक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: ३७८१०२

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)


ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, १ ऑगस्ट, १९७३ | अंक १५

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. गाऊन्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सुटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राउन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई—१.

Madison/TGM/7 Mar

# आदर्श समाजसेवकाच्या कामाची पद्धत

## कै. श्री. वैकुंठभाई मेहतांचा आदर्श

राधाबाईंनी एका अनाथ महिला सेवाश्रमाच्या समाजसेविका कार्यकर्त्या बाईंची सस्थेमध्ये निर्देशित वेळी भेट घेण्याचा प्रयत्न केला पण त्यांची भेट होऊ शकली नाही. "भेटायला केव्हा येऊ ?" असे पत्रांनी विचारले, त्यांची उत्तरेही आली नाहीत. असेर राधाबाई समाजसेविकेच्या बंगल्यावर त्यांना भेटायला गेल्या, तेव्हा त्या विदुषीला राग आला. "संस्थेच्या कामासाठी संस्थेत भेटायला या" असे त्या म्हणाल्या. "मी तेथे आपणांस भेटण्याचा अनेक वेळा प्रयत्न केला, पत्रेही धाडली; नाइलाज म्हणून येथे आले" असे राधाबाईंनी काकुळतीने सांगितले. तेव्हा या विदुषी उसळल्या, "मी काय तुमची नोकर आहे का ? थोडे हेलपाटे पडले म्हणून एवढी तक्रार करायचे काय कारण ? आम्ही स्वतःचे पैसे आणि वेळ खर्चून समाजकार्य करतो ते काय तुमच्या शिव्या खाण्यासाठी ? आम्ही तुमचे काय चोवीस तास बांधील आहोत ? आत्ता मला वेळ नाही; संस्थेमध्ये या." राधाबाईंचे काम एका मिनिटात संपले असते, पण ह्या समाजसेविकेने दहा मिनिटे अशा अप्रस्तुत बोलण्यात खर्च करून टाकली. बिचाऱ्या राधाबाई हिरमुसल्या होऊन परत गेल्या. समाजसेविका विदुषीच्या ह्या कुप्रदर्शनाला जरी काही तात्कालिक कारण घडलेले असेलही, पण त्यापूर्वीच्या अनास्थेचे समर्थन करता येणे कठीण आहे.

'स्वेच्छेने पत्करलेले काम यशस्वी व्हावयाचे असेल, तर पगारी कामापेक्षा ते अधिक चांगले करण्यात आले पाहिजे' असे लेडी स्टेला रीडिंग ह्या इंग्रज समाजसेविकेचे म्हणणे आहे. गेल्या महायुद्धाच्या वेळी ब्रिटनमध्ये त्यांनी 'वुइमन्स व्हॉलंटरी सर्व्हिस' ही स्त्रियांची संघटना उभारली. पंगू मुलांच्या मातांचा भार हलका करण्यासाठी काही तास ती सांभाळणे, अंधाच्यासाठी पत्रे लिहिणे, आपद्ग्रस्तांच्या साहाय्यार्थ सैंपाक करून त्यांच्या जेवणाची व्यवस्था करणे, ब्रिटनमध्ये आश्रयार्थ आलेल्या निर्वासितांना मदत करणे, इत्यादी कामे ह्या १२ लक्ष कार्यकर्त्यांच्या प्रचंड संघटनेने केली. फायटर विमानांच्या निर्मितीसाठी ॲल्युमिनियम कमी पडले, तेव्हा ह्या संघटनेने घरोघर हिंडून ॲल्युमिनियमची भांडीकुंडी गोळा केली, ती १,००० टन भरली ! हवाई हल्ल्यानंतर कित्येकजण बेपत्ता होतात, त्यांची माहिती देणारी केंद्रे स्थापन केली, बेघर झालेल्यांच्या खाण्यापिण्याची आणि निवाऱ्याची व्यवस्था केली. आजही ह्या संघटनेच्या पटावर पाच लक्ष कार्यकर्त्या स्त्रिया आहेत, त्या आपले काम निरपेक्ष, कर्तव्यनिष्ठेने बजावतात. ते काम कोणते ? म्हाताऱ्या, घराबाहेर पडू न शकणाऱ्या पेन्शनरांना आणि पंगू लोकांना दररोज घरी जाऊन गरम अन्न पोचविणे आणि त्यांची वक्तशीर भेट घेऊन त्यांच्या अडीअडचणींचे निवारण करणे, हे ते काम.

समाजकार्य करू इच्छिणारांनी स्वतःवर शिस्तीचे बंधन घालून घेतले पाहिजे, असा लेडी स्टेला रीडिंग ह्यांचा आग्रह आहे. एकदा काम पसंत केले, वेळ ठरवून घेतली, म्हणजे आपण जणू काही करारपत्रावरच सही केलेली आहे असे समजून कार्यकर्त्यांनी स्वतःस कामास वाहून घ्यावे, असे त्या म्हणतात. "स्वतःचा वेळ, उत्साह आणि सुजनता ह्यांची जाणकाराने स्वेच्छेने दिलेली देणगी म्हणजे समाजसेवा" असे त्यांचे समीकरण आहे.

कै. वैकुंठभाई मेहता हे निष्ठावंत सहकार-महर्षी होते. त्यांची प्रकृती तोळामासा होती. तरी त्यांची कर्तव्यनिष्ठा दांडगी होती. त्यामुळे ग्रामीण भागांतील प्रवासाचा, थंडीवाऱ्याचा त्रास त्यांना कधीच वाटायचा नाही. एकदा ते असेच एका रेल्वे स्टेशनवर रात्री गाडीची वाट पाहात गारठ्यात बसले होते. त्यांना तेथे भेटलेले त्यांचे एक आस्थेवाईक स्नेही म्हणाले, "वैकुंठभाई, आपण एवढा त्रास ह्या वयात कशाला घेता ? एवढी गैरसोय कशाला सोसता ? त्यावर ते म्हणाले, "काम पत्करले म्हणजे त्रास, गैरसोय हे सर्व विसरायचे. जे पत्करायचे ते मनोभावे, कार्यक्षमतेने पार पाडायचे. मी अगदी आनंदात आहे. सुखात आहे. आपल्या विचारण्याबद्दल धन्यवाद."

---

### ४० टक्के अपघात विमान उतरताना होतात

१९६२ ते १९७२ ह्या दहा वर्षांतील विमानअपघातांची पाहणी एका आंतरराष्ट्रीय संघटनेने केली आहे. पाहणीसाठी जमा करण्यात आलेल्या माहितीवरून असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की विमान अपघातांपैकी ४० टक्के अपघात विमान उतरताना अगर उतरण्यासाठी ते विमानतळानजीक येत असताना होतात. अपघातात काही अपघात विमानतळाजवळ विमानांच्या टकरीचेही झालेले दिसतात. पाहणीसाठी विमानवाहतूक मोठ्या प्रमाणावर करणाऱ्या १५ देशांच्या विमानतळांवरील अपघातांची माहिती जमविण्यात आली होती. त्यांत भारताचा समावेश नव्हता. पाहणीचा एक निष्कर्ष असा की, जगातील विमानवाहतुकीची सुरक्षितता एकंदरीने चांगली व लक्षात भरण्यासारखी आहे.

---

### बड्या कारखानदारांना सिमेंट कारखान्याचे परवाने ?

भारत सरकारचे उद्योगविकास खाते बड्या कारखानदारांकडून सिमेंटचे कारखाने काढण्यासाठी आलेल्या अर्जांचा नव्याने विचार करीत आहे. मक्तेदारी चालू न देण्याच्या धोरणानुसार त्यांचा विचार लांबणीवर पडलेला होता. सिमेंटच्या कारखान्यासाठी खात्याकडे पाचसहा अर्ज पडून आहेत. त्यात बिर्ला, साहू जैन व ए. सी. सी. ह्या उद्योगगटांकडून आलेल्या अर्जांचा समावेश आहे. देशात सध्या सिमेंटचा तुटवडा फार भासत आहे. सिमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया अगर नवे कारखानदार सिमेंटचे कारखाने लवकर काढू शकत नाहीत. सिमेंटची टंचाई दूर करण्यासाठी बड्या उद्योगपतींच्या नामंजूर झालेल्या अर्जांचा पुन्हा विचार करावा लागत आहे.

☆ अर्थ ☆

बुधवार, १ ऑगस्ट, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## राष्ट्रीयीकृत बँकांच्या कामाची प्रशंसा

मध्यवर्ती सरकारच्या डेप्युटी मिनिस्टर फॉर फायनॅन्स श्री. सुशीला रोहटगी दिल्ली येथे एका प्रसंगी बोलताना म्हणाल्या की राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांनी चांगली कामगिरी केली आहे. परंतु त्यांनी अधिक चांगले काम केले पाहिजे. त्यांना तसे काम करताही येईल. राष्ट्रीयीकरणाच्या चौथ्या वर्षदिनानिमित्त त्या बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या की बँकांच्या ठेवींत ९२ टक्के वाढ झाली आहे. त्यांनी आपल्या शाखांचा विस्तारही झपाट्याने केला आहे. ज्या उद्योगधंद्यांना मदत करण्याबद्दल अग्रहक्क आहे त्यांनाही बँकांनी चांगले साहाय्य केले आहे. तथापि, काही बाबतींत त्यांनी म्हणावी तशी प्रगती केलेली नाही. समाजातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांना इतरांपेक्षा कमी दराने कर्ज देण्याचे धोरण नीट अमलात आणले गेलेले नाही. हे काम अधिक त्वरेने करण्याची गरज आहे. बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा उद्देश सफल व्हावयाचा असेल तर बँकांनी ह्या बाबीकडे अधिक लक्ष देणे अगत्याचे आहे. 'लीड' बँकांनी आपापल्या जिल्ह्यातील बँकिंगच्या व्यवहारात अधिक सुसंगतपणा आणण्यासाठी सध्यापेक्षा अधिक लक्ष पुरविले पाहिजे. बँकांनी आपल्या कार्याचा पसारा मुख्यतः जिल्हापातळीवर वाढविण्याकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. कारण त्यांच्या धोरणाचे यशापयश तेथे ठरणार आहे. आता भारतातील ग्रामीण भागांत बँकांचे व्यवहार होऊ लागले आहेत. त्याचा एक परिणाम असा झाला की खेडेगावांतील लोकांना बँका त्यांच्यासाठी करू शकणाऱ्या सेवेची अधिक जाण होऊ लागली आहे. ह्या जाणिवेचा फायदा घेऊन बँकांनी छोट्या माणसांना सोयीसवलती मिळवून देण्यात पुढाकार घेतला पाहिजे. असे केले तर ग्रामीण भागांत बँकांची पाळेमुळे खोलवर रुजण्यास चांगली मदत होईल.

---

## "वेतनवृद्धीने चलनवाढ होणार नाही"

भारत सरकारच्या भारी उद्योगधंदे खात्याचे मंत्री श्री. टी. ए. प ह्यांनी चलनवृद्धीच्या कारणांसंबंधी प्रचलित असलेल्या विचारांविरुद्ध अभिप्राय व्यक्त केला आहे. अखिल भारतीय कारखानदार संघटनेपुढे बोलतांना ते म्हणाले की कामगारांचे वेतन वाढविण्यामुळे चलनवृद्धी होते अशी समजूत आहे. पण ही समजूत अगदी चुकीची आहे. आपण जेव्हा दुसऱ्यांना पैसे देण्याबद्दल बोलतो तेव्हा आपणास चलनवृद्धीची आठवण येते. पण, अधिक नफ्याच्या रूपाने स्वतःच स्वतःला पैसे देण्याच्या वेळी मात्र ह्या समजुतीची आठवण नाहीशी होते. नफ्यांत वाढ केल्यामुळे चलनवृद्धी होत नाही काय? कामगारांना त्यांनी केलेल्या चांगल्या व कार्यक्षम कामाबद्दल पैसे दिले तर त्यामुळे नफाही कमी होत नाही आणि चलनवृद्धीही होत नाही. शिवाय अमेरिका, जपान आणि कोरिआ ह्या देशांशी तुलना करता आपल्या देशातील कामगारांच्या वेतनाचा खर्च खूपच कमी आहे. आपल्या कामगारांचे कामही तेथील कामगारांइतकेच उत्पादक आहे. आपण कामगारांचा कसा उपयोग करून घेतो ह्यावर बरेच काही अवलंबून आहे. उद्योगपतींना वाढत्या दराने महागाईभत्ता देण्याचे टाळता येण्यासारखे आहे. पण त्यासाठी त्यांनी उपलब्ध असलेली यंत्रसामग्री, श्रम करणारी माणसे आणि हाती असलेली साधनसंपत्ती ह्यांचा जास्तीत जास्त कार्यक्षम वापर केला पाहिजे, तरच उत्पादन वाढू शकेल आणि किंमती प्रमाणाबाहेर वाढणार नाहीत. चलनवृद्धीचे मूळ कारण असे सांगता येईल की वाढत्या किंमतीचा बाजार असूनही त्यामुळे उत्पादनात वाढ होऊ शकलेली नाही.

---

## वृत्तपत्रांच्या कागदाच्या कोट्यात ३०% कपात

सध्या अस्तित्वात असलेल्या वृत्तपत्रांना, त्यांनी १९७२–७३ मध्ये वापरलेल्या वृत्तपत्रीय कागदाच्या आधारावर एकूण २,३०,००० टन एवढा वृत्तपत्रीय कागद लागतो. तथापि, सरकारजवळ वितरणासाठी आतापर्यंत १,६३,१०० टन इतका कागद उपलब्ध आहे. याचाच अर्थ प्रत्यक्ष तूट ३० टक्क्यांपेक्षाही जास्त आहे.

सर्वोच्च न्यायालयाने वृत्तपत्र कागद प्रकरणी दिलेल्या निवाड्यानुसार ३० टक्के कपात ही सर्व वृत्तपत्रांना समप्रमाणात लागू करण्यात येईल. गेल्या सालच्या हिशोबाने यंदा वृत्तपत्रांना आवश्यक तेवढा कागदही उपलब्ध नसल्याने त्यात वाढ करण्याचा प्रश्नच येत नाही.

---

## दिल्लीतील भिकाऱ्यांत गोऱ्या भिकाऱ्यांची भर

दिल्लीत आलेल्या हिप्पी अगर तत्सम गोऱ्या तरुणांची दैना उडालेली आहे. त्यांतील काही जण तरी अध्यात्माच्या नादाने भारतात आलेले आहेत. पण आता त्यांना पोटासाठी भीक मागावी लागत आहे आणि कसे तरी शरीरपोषण करावे लागत आहे. दिल्लीत देशोदेशींच्या वकिलाती आहेत. पण त्या ह्या गोऱ्या भिकाऱ्यांना मदत करीत नाहीत. ह्या भिकाऱ्यांत अमेरिकन भिकारी क्वचितच आढळतात; इतर देशांतील भिकारी मात्र अधिक आढळतात. फ्रेंच वकिलातीच्या एका प्रवक्त्याने असे सरळ सांगितले आहे की वकिलाती म्हणजे सावकार नव्हेत अगर बँकांही नव्हेत. शिवाय अशा लोकांना आर्थिक मदत करण्यासाठी लागणारा निधीही वकिलातीजवळ नसतो. त्यांना मदत केली तर ते पैशाचा दुरुपयोग करतील अशी भीतीही वकिलातींना वाटत असते. म्हणून काही वकिलाती ह्या भिकाऱ्यांच्या नातेवाइकांना तारा करून पैसे मागविण्याचे साह्य मात्र करतात. पैसे आले तर ते ज्याचे त्याला देतात एखादा भिकारी असे सांगतो की त्याच्याजवळील पैशांची चोरी झाली आहे, म्हणून त्याला भीक मागावी लागत आहे. अशा प्रकरणात फ्रेंच वकिलातीचे अधिकारी भिकाऱ्यातर्फे पैसे मागविण्यापूर्वी स्थानिक पोलिसांचा दाखला मागतात. तो मिळाला तर ठीक; नाहीतर भिकाऱ्यांना आपली सोय जमेल तशी करावी लागते. मग काही हिप्पी आपल्या अंगी काही गुण असेल तर त्याचा उपयोग करू लागतात. एका फ्रेंच हिप्पीने आपल्या चित्रकलेचा उपयोग जगण्यासाठी केला. हिंदी लोकांना परदेशीय, त्यातही गोऱ्या कातडीचा भिकारी पाहाण्याची सवय नाही. भरपूर पैसे उडविणारे गोरे लोकच त्यांच्या परिचयाचे असतात; निदान आजवर होते. भारतात भिकाऱ्यांची आधीच कमतरता नाही. त्यातच दिल्लीसारख्या मोठ्या शहरात गोऱ्या भिकाऱ्यांची भर पडली आहे.

---

## बांगला देशाच्या चित्रपटाला रशिआत बंदी ?

मॉस्को येथे भरविण्यात येणाऱ्या चित्रपट प्रदर्शनात दाखविण्यासाठी बांगला देशाने पाठविलेल्या एका चित्रपटाला प्रदर्शनाची परवानगी नाकारण्यात आल्याची बातमी आहे. १९७१ साली बांगला देशाच्या जनतेने पाकिस्तानच्या लष्कराविरुद्ध केलेला उठाव आणि तो दडपण्यासाठी पाकिस्तानच्या सैनिकांनी केलेले भीषण अत्याचार ह्यासंबंधीची दृश्ये चित्रपटात आहेत. प्रदर्शनाला पाकिस्तानच्या प्रतिनिधींनाही आमंत्रण देण्यात आले आहे. तेव्हा सदर चित्रपटाच्या प्रदर्शनाने ते दुखावतील अशी रशिआची भावना असण्याचा संभव आहे. दुसऱ्या महायुद्धात नाझी लष्कराने रशिआत केलेल्या अत्याचारांचे चित्रपट रशिआत दाखविण्यात आलेले असताना लोकस्वातंत्र्ययुद्धाच्या बांगला देशाच्या चित्रपटाला मात्र हरकत घेण्यात आली आहे.

---

## मंत्र्यांविरुद्ध पुरावा मिळणे कठीणच जाते

भ्रष्टाचार आणि लाचलुचपतीच्या तक्रारींची दाद घेण्यासाठी मुंबई हायकोर्टाचे माजी मुख्य न्यायाधीश श्री. कोतवाल ह्यांची १० महिन्यांपूर्वी लोकआयुक्त म्हणून नेमणूक झाली. मुंबई येथील लायन्स क्लबपुढे भाषण करताना त्यांनी आपल्याला या अवधीत आलेले अनुभव सांगितले ते म्हणाले की, काम सुरू केल्यापासून ५४३ तक्रारींचा निकाल लावण्यात आला. परंतु त्यांपैकी ६५ टक्के तक्रारी लोकआयुक्त कायद्याप्रमाणे विचारात घेण्यासारख्या नव्हत्या. अर्थातच त्या नामंजूर करण्यात आल्या. ह्या बाबतीत नागरिकांना अधिक मदत द्यावयाची असेल तर कायदा थोडा सैल करण्यात आला पाहिजे. आतापर्यंत ७४५ तक्रार-अर्ज आलेले आहेत. त्यांपैकी १२ अर्ज महाराष्ट्र राज्याच्या मंत्र्यांविरुद्ध होते मंत्र्यांविरुद्ध करण्यात आलेल्या तक्रार-अर्जांची चौकशी करताना, असे आढळले की तक्रारीसंबंधीचा पुरावा मिळणे कठीण जाते. वरिष्ठ सरकारी अधिकारी सामान्यतः पुरावा देण्यास मागेपुढे पाहात नाहीत. परंतु मंत्र्यांविरुद्ध असलेल्या तक्रार-अर्ज-प्रकरणी पुरावा देण्याच्या बाबतीत त्यांची स्मृती नीट काम देत नाही. मंत्र्यांविरुद्ध पुरावा देण्याची वेळ आली की अधिकारी नीट आठवत नाही असे सांगतात. लोकआयुक्ताच्या अधिकारकक्षेत म्युनिसिपल कॉर्पोरेशन्सचा समावेश करण्यात येणार असल्याची बोलवा आहे. तसे करण्यात आले तर तक्रार अर्जांच्या संख्येत खूपच वाढ होईल अशी अपेक्षा आहे. अर्थातच मग एका लोकआयुक्ताला सर्व भार सोसावा लागेल. ही गोष्ट अशक्यच आहे. तक्रार-अर्जांच्या ढिगाऱ्याखाली एकुलता एक लोकआयुक्त बुडून गेल्यासेरीज राहाणार नाही. त्याला मदत करण्यासाठी दुय्यम लोकआयुक्त नेमण्याची अतिशय आवश्यकता भासेल.

---

## धंदा वाढविण्यासाठी साधनांचा विवेक कशाला ?

सौंदर्यशाली स्त्रियांच्या स्पर्धा जगभर होत असतात. ह्या स्पर्धांचे संघटक काही नियमानुसार आपले काम करीत असतात. स्पर्धेनंतर विजेत्या सुंदरीला आर्थिक लाभाच्या संधी मिळू शकतात. पण स्त्रियांचे पोषाख विकणाऱ्या रोममधील एका बहाद्दराने एक आगळीच सौंदर्यस्पर्धा ठेवण्याचा विचार केला. त्यात भाग घेणाऱ्या सुंदरींनी आपले वक्ष अनाच्छादित ठेवावयाचे होते. स्पर्धा जाहीर झाल्याबरोबर २०० स्त्रियांनी त्याच्या दुकानाला गराडा घातला. इतकी गर्दी झाल्यावर स्पर्धा भरविणे कठीण होऊ लागले. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून ही स्पर्धा बंद पाडली. आलेल्या स्पर्धकांनी स्पर्धा झालीच पाहिजे असा हट्ट धरला होता. स्पर्धकांत १५ पासून ५० पर्यंत वयांच्या स्त्रिया होत्या. त्यांतील बहुतेकांनी पारदर्शक उत्तरीय वस्त्र परिधान केले होते.

---

## बँक ऑफ महाराष्ट्राची राष्ट्रीयीकरणानंतरची चार वर्षे

खरे पाहता, राष्ट्रीयीकरणाची तत्त्वे महाराष्ट्र बँकेला कधीही नवी नव्हती. कारण स्थापनेपासूनच लहान (सामान्य) माणसाला आणि लहान उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी ही बँक पुढे होती. ज्या वेळी इतर बँका प्रमुख शहरांतून आणि शहरी विभागात त्यांच्या शाखा उघडीत होत्या त्याच वेळी ही बँक, निमशहरी आणि ग्रामीण विभागांत शाखा उघडीत होती. महाराष्ट्र बँकेच्या एकूण ३३८ शाखांपैकी ३१४ शाखा महाराष्ट्रातच आहेत. राष्ट्रीयीकरणानंतरच्या चार वर्षात १८५ शाखा उघडल्या. त्यांपैकी १३३ शाखा किंवा जवळजवळ ७२% शाखा ग्रामीण आणि निमशहरी विभागांत, १७% शहरी विभागांत आणि ११% प्रमुख शहरांतून उघडल्या गेल्या. महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांसाठी अग्रेसर बँक म्हणून जबाबदारी महाराष्ट्र बँकेवर टाकली गेली. ते जिल्हे म्हणजे पुणे, सातारा, नासिक, ठाणे आणि औरंगाबाद हे होत. या जिल्ह्यांतून १५५ शाखांचे जाळे आहे. आज बँकेच्या शाखांची विभागणी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | राज्याचे नाव | ग्रामीण | निम-शहरी | शहरी | प्रमुख शहरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र | १२६ | ८४ | ६३ | ४१ | ३१४ |
| २. | मध्य प्रदेश | १ | ४ | ४ | ... | ९ |
| ३. | म्हैसूर | १ | २ | ५ | ... | ८ |
| ४. | गुजरात | ... | ... | १ | १ | २ |
| ५. | गोवा | ... | २ | ... | ... | २ |
| ६. | दिल्ली | ... | ... | ... | १ | १ |
| ७. | आंध्र प्रदेश | ... | ... | ... | १ | १ |
| ८. | तामीळनाडू | ... | ... | ... | १ | १ |
| | एकूण | १२८ | ९२ | ७३ | ४५ | ३३८ |

राष्ट्रीयीकरणापासून बँकेच्या ठेवी रु. ७९·२० कोटींनी वाढल्या आणि २९ जून १९७३ रोजी एकूण ठेवी रु. १५८·०४ कोटी होत्या. ठेवी-खात्यांच्या संख्येतही उल्लेखनीय वाढ झाली असून आता बँकेकडे ९ लाखांवर ठेवी-खाती आहेत.

बँक राष्ट्रीयीकरणाचा प्रमुख उद्देश आर्थिक दृष्ट्या दुर्लक्षित विभागाकडे कर्जपुरवठ्याची साखळी तयार करणे हा आहे. बँकेच्या रु. १०७ कोटी इतक्या एकूण कर्जापैकी जवळ जवळ ४१·५% भाग आर्थिकदृष्ट्या दुर्लक्षित विभागांना कर्जपुरवठ्याचा आहे. अग्रक्रमप्राप्त विभागांना दिलेल्या कर्ज-खात्यांची संख्या जुलै १९६९ मध्ये ८,८१४ होती ती ३६,४६१ इतकी वाढली. त्याचप्रमाणे मंजूर केलेली रक्कम रु. ११·२३ कोटींवरून रु. ५३·७७ कोटी इतकी वाढली.

## साधुसंतांनी केलेला बँकिंग तत्त्वांचा प्रचार

### (महाराष्ट्र बँकेच्या बार्शी शाखेचा अभिनव उपक्रम)

"कर्ज देताना आम्ही इतर गोष्टींबरोबरच कर्जदाराजवळ कष्ट करण्याची तयारी हे भांडवल, सचोटी हे तारण आणि उत्पादननिर्मितीने देशसेवा हे कारण, या गोष्टी आहेत की नाहीत हे पाहात असतो. राष्ट्रीयीकरणानंतरचे सरकारचे धोरण आमच्या बँकेने तिच्या स्थापनेपासूनच अवलंबलेले आहे." असे उद्गार येथील महाराष्ट्र बँकेचे एजंट श्री. आर. आर. मेंगजी यांनी बँक राष्ट्रीयीकरण वर्धापनानिमित्त काढले.

नंतर बँकेचे कर्मचारी श्री. अ. ज. जोशी यांनी धर्मभूषण प्रा. सु. ग. शेवडे एम्. ए., मुंबई, यांचा परिचय करून दिला व ते आपल्या भाषणात म्हणाले, "बँकेचे यश तिने दिलेल्या कर्जाच्या परतफेडीवर अवलंबून असते आणि ते देताना बँक प्रामुख्याने तीन गोष्टी पाहात असते. त्या म्हणजे कॅरॅक्टर, क्रेडिट आणि कपॅसिटी. प्रथम कर्जदाराचे कॅरॅक्टर पाहिले जाते. कर्जदाराची वृत्ती–नीतिमत्ता चांगली असली पाहिजे आणि ही नैतिक सुधारणा करण्याचे महान कार्य प्रवचनकार, कीर्तनकार, नीति–अनीतीच्या गोष्टी सांगून करीत असतात. म्हणून राष्ट्रीयीकरण वर्धापनानिमित्त एखाद्या अर्थशास्त्रज्ञाला न बोलावता या वेळेस आम्ही सुप्रसिद्ध प्रवचनकार प्रा. शेवडेंना बोलावले."

हा कार्यक्रम बँकेच्या बार्शी शाखेतील कर्मचाऱ्यांनी स्वखर्चाने घडवून आणला. प्रमुख वक्ते प्रा. शेवडे आपल्या भाषणात म्हणाले, "आपल्या साधु-संतांनी व धर्माने बँकेच्या तत्त्वांचा प्रचार फार पूर्वीपासूनच केलेला आहे. संत रामदास म्हणतात.

"मेळविती तितुके भक्षिती,
ते कठीण काळी मरोन जाती".

हा श्लोक अत्यंत मार्मिक असून माणसाला उधळपट्टीपासून परावृत्त करणारा आहे. जगातील प्रत्येक गोष्ट ही धर्माधिष्ठित आहे. आपला धर्म पापापासून परावृत्त करून सत्कर्म करायला लावतो आणि बँक ही कस्टमर्सची नीतिमत्ता पाहात असते.

श्रीमंतांजवळील अधिक असलेला पैसा व्याजाने घेऊन त्यांचे ऐश्वर्य वाढवून गरिबांना श्रीमंत करण्याचे देशकार्य बँक करीत असते आणि बँक ऑफ महाराष्ट्रने आजपर्यंत अशीच महाराष्ट्राची सेवा केलेली आहे व आता ती महा-राष्ट्राची–भारताची–सेवा करीत आहे. मला या बँकेचा अभिमान वाटतो."

श्री. चंद्रकांत सोनिग्रा यांनी श्री. दादाशास्त्री जोशी यांच्या शुभ हस्ते प्रा. शेवडेंना श्रीफळ व मानधन अर्पण केले. या कार्यक्रमास बार्शीतील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. शेवटी श्री. श्री. एम. के. भोसेकर यांनी आभार प्रदर्शन केल्यावर हा अभिनव उपक्रम संपला.

## बँकेतील शिपाई आणि साहेबांच्या घरचे काम

### (१)

'अर्थ' पाक्षिकाच्या दि. १८ जुलै १९७३ चे अंकातील 'व्यवस्थापकीय समस्या (११)' या शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आलेला, श्री. शाम रघुनाथ साखरे यांनी लिहिलेला, 'बँकेचा शिपाई आणि साहेबांच्या घरचे काम' हा लेख वाचला. लेख खरोखरच आजच्या व्यवस्थापनातील ज्वलंत समस्या मार्मिकपणे विशद करणारा असा आहे. त्याबद्दल लेखकास धन्यवाद!

अदृश्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नाठेठोम तालुक्याचे बँक इन्स्पेक्टर, श्री. उत्कर्षे, हे लेखात निर्दिष्ट केल्याप्रमाणे बँकेचे उमेदीचे, उत्साही, कुशल व कार्यक्षम अधिकारी असल्याने, ते तालुक्यात लोकप्रिय झाले होते. सहकारी बँकांतील इन्स्पेक्टरांचे कामामध्ये त्यांना बरीचशी फिरती करावी लागत असलेने त्यांच्या शिपायांना, श्री. उत्कर्षे यांनी त्यांचा शिपाई जो राजा, त्यास दिलेली कामेच मुख्यत्वे फिरतीच्या वेळी करावी लागतात हे खरे; परंतु याचा अर्थ असा नव्हे की, बँकेच्या इन्स्पेक्टरांनी शाखेच्या कचेरीत काम करीत असताना, त्याच्या शिपायांकडून सर्वस्वी घरची कामे करवून घ्यावीत. मुख्यत्वे, त्यांनी शिपायांकडून ऑफिसचे काम करवून घ्यावे व काही प्रमाणात त्यांना ऑफिसच्या फिरतीचे कामात मदत होण्याच्या दृष्टीने शिपायांना घरचे काम सांगण्यास हरकत नसावी असे वाटते. शिपायांनी सुद्धा त्यांच्या अधिकाऱ्यांच्या घरची कामे, मूळ त्यांची ऑफिसची कामे सांभाळून, काही प्रमाणात, वरील धोरणास अनुसरून करणे हे त्यांचे अंतिम हिताचेच ठरावे.

वरील लेखामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या परिस्थितीत, श्री. उत्कर्षेसाहेबांनी त्यांचा शिपाई राजा यास मोठ्या कौशल्याने चांगला धडा शिकविला; त्यांनी त्याच्यावर सूड घेतला असे म्हणता येणार नाही; कारण सूड हा बरोबरीचे व्यक्तीवर घेतला जातो, हाताखालच्या व्यक्तीवर नाही, असा संकेत आहे.

अक्कलकोट — आर. डी. कुलकर्णी

### (२)

शिपाई हा मग तो कोणत्याही खात्यातील असो, तो थर्ड क्लास समजला जातो. त्यालाही पुष्कळशा भावना असतात. साहेबांच्या घरी काम करावे किंवा नाही हे ज्याचे त्याने ठरवावे, त्यातून अनुकूल म्हणजे साहेब व त्यांच्या घरातील मंडळी यांच्या वागणुकीवर अवलंबून असते. ते म्हणजे असे :— जरी तो शिपाई असला तरी त्याला कोणत्या प्रकारची वागणूक दिली पाहिजे याचा विचार साहेबांच्या घरातील मंडळींनी समजावून घेतला पाहिजे. जर त्याला घरातील सर्व लहान मंडळींपासून 'अरे', 'कारे' ची भाषा वापरली तर त्याच्या मनातून त्याला अपमान वाटतो. तो आपल्या घरचाच एक घटक आहे या प्रकारे जर त्यांनी वागणूक दिली तर शिपाई हा स्वतः होऊन त्यांच्या घरातील काम करील. त्यात त्याला कसलाच कमीपणा वाटणार नाही. शाम साखरे यांच्या लेखातील 'राजा' हा शिपाई त्याला जर साहेबांकडून इतकी चांगली वागणूक मिळत असेल तर त्यांनी कोणाचेच न एकता युनियनकडे लक्ष न देता साहेबांच्या घरातील काम करण्यास काहीच हरकत नाही. या गोष्टी त्यास सांगावयास नको. मात्र काही साहेब लोक त्याला घरच्या गड्याप्रमाणे वागणूक देऊन त्याच्या नोकरीबाबत सुद्धा अहितकारक गोष्टी करतात त्यावेळेस ते त्या शिपायाच्या मनाच्या स्थितीचा विचार करीत नाहीत. याउलट म्हणजे अशा निर्दयी साहेबांच्या घरचे काम न करणे हे राजा शिपायाप्रमाणे अधिक चांगले. श्री. उत्कर्षे यांनी सूड घेतला हे स्पष्ट दिसते. कारण त्यानंतरच लगेच त्यांनी त्याला कोणत्या प्रकारची वागणूक दिली हे दिसतेच आहे.

बँक ऑफ महाराष्ट्र, पुणतांबा शाखा — अशोक दत्तात्रय कुलकर्णी

### (३)

बँकेच्या शिपायाने साहेबांच्या घरचे काम मुळीच करू नये. बँकेच्या शिपायाचे म्हणून काम असेल तेच निमूटपणे व चोख करावे. भत्ता जो मिळतो त्यातच त्याने भागविले पाहिजे. भत्ता हा दौऱ्यात खर्च होतो म्हणूनच दिला जातो. सोसायटीच्या खर्चाने कोंबडी, मटण, मजा टाळली पाहिजे व साहेबांच्या वजनाने किंवा अन्य काही कारणाने ही मजा मिळते म्हणून त्या परस्पर मिळणाऱ्या मजेत, त्याच्या मोबदल्यात शिपायाला घरचे काम सांगणे गैर आहे व शिपायाकडून त्याला अगतिकतेत पकडून अल्पशा उपकारांच्या बदल्यात घरचे काम सांगू नये व ते केले नाही म्हणजे सूडही घेऊ नये.

शिपाई झाला तरी तो प्रथम माणूस आहे हेही शिपायाने पण लक्षात ठेवले पाहिजे. त्याने लाचार होऊ नये. साहेबांकडून मिळणारा अल्पसा मोबदला व सोसायटीकडून मिळणारी मजा ही गैर आहे व त्या बदल्यात स्वतःला विकून घेणे बरे नव्हे. साहेबाने पण शिपायावर किरकोळ उपकार करून स्वाभिमानापासून वंचित करू नये. त्याचा खाजगी वेळ त्याच्या मुलाबाळांसाठी ठेवावा. अन्यथा हे असे परस्पर–उपकार संस्थेला मारक ठरतात.

C/o बँक ऑफ महाराष्ट्र, धुळे — रा. गं. मुक्तीकर

---

**रूरकेला, भिलई कारखान्यांना नफा**—रूरकेला येथील सरकारी मालकीच्या पोलादकारखान्याला सहा वर्षे सतत मोठा तोटा येत असे. १९७२–७३ साली मात्र कारखान्याने १·१२ कोटी रुपयांचा नफा मिळविला आहे. भिलई येथील पोलाद-कारखान्याने ६·८ कोटी रुपयांचा नफा मिळविला आहे. दुर्गापूर येथील कारखान्याला मात्र २२·२ कोटी रुपयांचा तोटा आला आहे. रूरकेला कारखान्याला नफा झाल्यामुळे त्याचा विस्तार करण्यात यावा अशी मागणी करण्यात येत आहे. तथापि, ह्या कारखान्याचा विस्तार करण्यात यावयाची शक्यता नाही.

## भारतीय उंट छाप विडी अमेरिकेत लोकप्रिय

### सारडा बंधूंच्या परिश्रमाचे फळ

नासिक येथील नामवंत विडी-कारखानदार श्री. देवकिसन सारडा आणि त्यांचे बंधू श्री. किसनलाल सारडा यांनी अमेरिकेत विडी निर्यात करण्यास सुरुवात केली असून ती अमेरिकेत लोकप्रियतेच्या मार्गावर आहे. सारडा बंधूंची उंट छाप विडी आता अमेरिकेत न्यूयॉर्क, शिकागो, बफैलो, वॉशिंग्टन, लॉस-एंजेलिस, डेन्व्हर, लॉस व्हेगस, सॅनफ्रॅन्सिस्को, इत्यादी प्रमुख शहरांतील तंबाखूच्या स्टोअर्समध्ये मिळते. शिवाय मॉंट्रील व टोरंटो या कॅनडातील शहरांतही ही विडी लोकप्रिय होत आहे. निरनिराळ्या छापांच्या त्यांच्या विड्या अमेरिकेत चांगल्या खपत आहेत.

५० वर्षांपूर्वी बस्तीराम सारडा यांनी फक्त तीन माणसे घेऊन हा विडीकारखाना सुरू केला. आता सारडा बंधूंच्या महाराष्ट्र, आंध्र प्रदेश व म्हैसूर या तीन राज्यांतील शंभरांवर विडी केन्द्रांत १५,००० कामगार काम करतात. भारतात तंबाखूचे एकंदर उत्पादन ६०० कोटी रुपयांचे होते. त्यापैकी ३०० कोटी रुपयांचा तंबाखू विडीसाठी, २५० कोटी रुपयांचा तंबाखू सिगरेटसाठी व उरलेला ५० कोटींचा खाण्यासाठी व तपकिरीसाठी वापरला जातो. विडीव्यवसायाने भारतातील वीस लक्ष लोकांना रोजगार दिला आहे. अ. भा. विडी उद्योग संघटनेचे कार्य श्री. देवकिसन सारडा गेली अनेक वर्षे करीत असून ते सध्या त्या संघटनेचे अध्यक्ष आहेत. श्री. देवकिसन सारडा म्हणाले, " विडी व्यवसायासाठी मध्य प्रदेश, बिहार, ओरिसा वगैरे भागांतून टेंभुर्णीची ऊर्फ तेंदू पाने आणण्यात येतात व गुजरात आणि म्हैसूर राज्यातील तंबाखू वापरण्यात येतो. म्हैसूर राज्यातील तंबाखूचा खुषबू चांगला असतो. १९६७ साली न्यूयॉर्कमध्ये भरलेल्या एका जागतिक प्रदर्शनात आम्ही आमच्या कारखान्याच्या विड्या ठेवल्या होत्या. त्या विड्यांविषयी अमेरिकनांनी खूपच उत्सुकता दाखविली. विशेषत: विड्या ओढल्यामुळे तंबाखू ओढल्याचा आनंद तर मिळतोच पण सिगरेटीच्या मानाने विडीमुळे कॅन्सरचे भय फारच अल्प असते याची अमेरिकनांच्या वर विशेष छाप पडली. "

अमेरिकेत विडीचा अधिक प्रसार करावयाचा तर दूरचित्रवाणी व वृत्तपत्रे यांत मोठ्या प्रमाणावर जाहिराता केली पाहिजे व हे काम खर्चाचे आणि परकीय चलनाचे आहे, असेही श्री. सारडा म्हणाले.

१९६७ सालच्या जागतिक प्रदर्शनात आलेला उत्साहजनक अनुभव लक्षात घेऊन सारडा बंधूंनी अमरिकेत विडीचा अधिक प्रसार करावयाचा असे ठरविले. १९६८ साली श्री. किसनलाल सारडा यांनी त्यासाठी अमेरिका व कॅनडा या देशांचा दौरा केला. न्यूयॉर्क व इतर अनेक ठिकाणी त्यांनी लोकांना नमुना म्हणून मोफत विड्या दिल्या. तसेच वॉशिंग्टन, डेन्व्हर, न्यूयॉर्क, लॉस एंजेलिस इत्यादी-अमेरिकेतील सर्व प्रमुख शहरांना भेटी देऊन श्री. किसनलाल सारडा यांनी तेथील दुकानांत-ठळक दुकानांत-विक्रीसाठी विड्या ठेवल्या. त्यांच्या परिश्रमांना फळ येऊन आता सारडा बंधूंची सुमारे एक लाख रुपयांची विडी अमेरिकेत खपते. अमेरिकेशिवाय कॅनडा, स्वित्झर्लंड, बेल्जियम, मध्यपूर्व, कुवेत, दुबई या भागांतही त्यांच्या विडीची निर्यात होते.

" विडीचा दर्जा वाढविणे हे या व्यवसायाचे एक अगत्याचे कार्य आहे, " असे श्री. किसनलाल सारडा म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले, "कामगार व शेतकरी यांच्यात विडी अतिशय लोकप्रिय आहे. पण वरिष्ठ वर्गातील लोकांनीही विडींची सवय ठेवली तर विडी अधिक प्रमाणावर ओढली जाईल व आजचा सिगरेटचा दर्जा तिला प्राप्त होईल. भारतातील फक्त कमी उत्पन्नाचे लोक विडी ओढतात हा परदेशांतील समज दूर झाला तर तेथेही विडीला उच्च स्थान मिळेल व तेथील खप वाढून आपल्या देशाला अधिक परकीय चलन मिळेल. "

---

## किमतीमधील वाढीचे जागतिक स्वरूप

### एप्रिल १९७२ ते एप्रिल १९७३

| | | | |
|---|---|---|---|
| आइसलंड | १६.६ | नॉर्वे | ७.७ |
| भारत | १५.७ | ऑस्ट्रिया | ७.७ |
| टर्की | १२.२ | डेन्मार्क | ७.७ |
| आयर्लंड | १०.० | नेदरलंड्स | ७.६ |
| स्पेन | ९.७ | जर्मनी | ७.५ |
| इटली | ९.६ | बेल्जम | ७.१ |
| जपान | ९.४ | फ्रान्स | ६.८ |
| ब्रिटन | ९.२ | कॅनडा | ६.६ |
| पोर्तुगाल | ९.१ | स्वीडन | ६.१ |
| फिनलंड | ९.६ | ऑस्ट्रेलिया | ५.१ |
| स्वित्झर्लंड | ८.४ | अमेरिका | ५.१ |
| ग्रीस | ७.५ | | |

---

## मुलीच्या विवाहाला आईची, राज्यकर्ती राणी ह्या नात्याने, मान्यता

ब्रिटनची राणी एलिझाबेथ हिने तिची कन्या ॲन हिच्या कॅप्टन मार्क फिलिप्सशी ठरलेल्या विवाहास मान्यता दिली. अॅन-मार्क फिलिप्स हा विवाह १४ नोव्हेंबर रोजी होणार आहे. १७७२ च्या रॉयल मॅरेजेस ॲक्टप्रमाणे अशी परवानगी आवश्यक असते. तिसऱ्या जॉर्जचा भाऊ, ड्यूक ऑफ ग्लुसेस्टर, ह्याने एका कोट्याधीशाच्या अनौरस मुलीशी विवाह केला, त्यानंतर हा कायदा करण्यात आला.

---

### बँकांच्या ठेवीत २०·७ % आणि कर्जात १०·६ % वाढ. नफा मात्र ७·१ % ने घटला.

सरकारी क्षेत्रांतील बँकांना १९७२ मध्ये ११·८८ कोटी रु. नफा झाला; १९७१ मध्ये १२·७९ कोटी रु. नफा झाला होता.

स्टेट बँक आणि तिच्या उपबँका ह्यांना ४·२९ कोटी रु. नफा झाला; १९७१ मध्ये ४·३६ कोटी रु. नफा झाला होता.

१४ राष्ट्रीयीकृत बँकांचा नफा ८·५० कोटी रु. वरून ७·५२ कोटी रु. आला, म्हणजे तो ९८ लक्ष रु. नी घटला.

१४ राष्ट्रीयीकृत बँकांनी १९७२ च्या नफ्यातून ३·२४ कोटी रु. रिझर्व्हज्कडे वर्ग केले; १९७१ मध्ये ३·९४ कोटी रु. वर्ग केले होते.

त्या सर्वांनी मिळून सरकारला ४·१८ कोटी रु दिले; म्हणजे बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यासाठी सरकारने दिलेल्या भरपाईच्या ४·८% एवढी ही रक्कम होते. गेल्या वर्षीचे तत्सम आकडे ४·४३ कोटी रु. आणि ५·१ % असे आहेत.

१९७१ अखेरच्या मानाने १९७२ अखेर ठेवीत १३५३ कोटी रु. ची (२०·७%) वाढ झाली. १९७१ मध्ये ठेवीत १९·३% वाढ झाली होती.

दिलेली कर्जे ४,३४२ कोटी रु. वरून ४,८०३ कोटी रु. वर गेली. म्हणजे, ती १०·६% ने वाढली. १९७१ मधील वाढ ९·७% होती.

---

### लोकसंख्येच्या वाढीपेक्षाही गुन्हेगारीची वाढ अधिक

इन्स्टिट्यूट ऑफ क्रिमिनॉलॉजीचे डायरेक्टर श्री. वेणु गोपाळ दिल्ली येथे एका प्रसंगी बोलताना म्हणाले की भारतामधील सर्व विद्यापीठांतून गुन्हेगारशास्त्राचा अभ्यासक्रम ठेवण्यात आला पाहिजे. ह्या शास्त्राकडे भारतात आतापर्यंत दुर्लक्ष झालेले आहे. १९५७ साली विद्यापीठ अनुदान मंडळाने ह्या शास्त्राच्या अभ्यासाची गरज ओळखून विद्यापीठांनी अशा अभ्यासाची सोय करावी असे सुचविले होते. परंतु विद्यापीठांनी त्याचा उपयोग नाही आणि शिवाय रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही त्याला मर्यादा पडतात अशी भूमिका घेतली. तथापि नंतर प्रथम सागर विद्यापीठाने व नंतर इतर काही विद्यापीठांनी ह्या शास्त्राचे अभ्यासक्रम चालू केले. तरीसुद्धा ह्या ज्ञानशाखेला स्वतंत्र शास्त्राचे स्थान अद्याप मिळालेले नाही. १९६० ते १९७० ह्या दशकात भारतामधील गुन्ह्यांची वाढ लोकसंख्येच्या वाढीपेक्षा अधिक वेगाने झाली. गेल्या वर्षी १५ हजार खुनाचे गुन्हे, ९,००० अपहरणाचे गुन्हे आणि १० हजार दरोड्याचे गुन्हे घडले. त्याशिवाय चोऱ्या आणि इतर गुन्ह्यांच्या संख्येतही वाढ झाली. लहान मुलांनी केलेल्या गुन्ह्यांत तर ह्या दहा वर्षांत १०० टक्के वाढ झाली. त्यातही विशेष ध्यानात घेण्यासारखी गोष्ट अशी की दरसाल जे गुन्हेगार सापडतात त्यात ८० टक्के नव्याने गुन्हे केलेले लोक असतात. गेल्या वर्षी इंडिअन पीनल कोडमधील गुन्ह्यांबद्दल ११ लाख लोकांना अटक करण्यात आली. त्याशिवाय इतर कायद्यांन्वये पकडण्यात आलेल्या गुन्हेगारांची संख्या ३३ लाख आहे. गुन्हेगारशास्त्र हे एक स्वतंत्र शास्त्र आहे. गुन्ह्यांबद्दल माहिती गोळा करणे आणि गुन्हेगारांच्या वागणुकीचा अभ्यास करणे एवढेच त्याचे स्वरूप नाही.

---

### रशियाचा शस्त्रास्त्रावरील खर्च कमी होणार नाही

अमेरिकन काँग्रेसच्या संयुक्त आर्थिक कमिटीला अशी माहिती देण्यात आली आहे की रशिया आपल्याजवळील साधनसंपत्तीचा उपयोग लष्करी सामर्थ्य वाढविण्याऐवजी मुलकी उत्पादन वाढविण्यासाठी करील असा फारसा संभव नाही. असा प्रयत्न रशियाचे दिवंगत पंतप्रधान मि. कुच्चॉव्ह ह्यांनी थोडाबहुत केला होता. पण त्यांची लवकरच इतिश्री झाली. मि. कुच्चॉव्ह ह्यांच्या पदच्युतीलाही तो कारणीभूत झाला असावा. रशियाचे पुढारी लष्करी सामर्थ्याला फार मानतात. तरीही अमेरिकेच्या मानाने आपले सामर्थ्य कमी पडत नाही अशी खात्री वाटत आहे तोपर्यंत रशियन पुढारी लष्करी खर्चात कपात करण्यास हरकत घेणार नाहीत. लष्करी मनोवृत्तीचे पुढारी मात्र ह्याला अपवाद आहेत.

---

**आजारी गिरण्यांचे आधुनिकीकरण —** नॅशनल टेक्स्टाइल कॉर्पोरेशनच्या कामाचा अहवाल लोकसभेला सादर करण्यात आला. अहवालातील माहितीप्रमाणे मध्यवर्ती सरकारने ४७ आजारी कापडगिरण्यांचे आधुनिकीकरण करण्याचे ठरविले आहे. ह्या कामासाठी १८·६८ कोटी रुपये खर्च करण्यात यावयाचे आहेत. त्याशिवाय आणखी १० गिरण्यांच्या आधुनिकीकरणाचा कार्यक्रम आखण्यात येत आहे. कॉर्पोरेशनच्या विकासशाखेने १९७१–७२ साली, ३२·९४ लाख रुपये नफा मिळविला. त्यातून कर वजा जावयाचा आहे.

**दुष्काळनिवारणासाठी १९१ कोटी रुपये—**गेल्या वर्षी भारतामधील अनेक राज्यांत अवर्षणामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. ह्या परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने राज्य सरकारांना १९१·३६५ कोटी रुपयांची मदत दिली अशी माहिती राज्यसभेत देण्यात आली चालू वर्षी ९७·८५ कोटी रुपये आतापर्यंत वाटण्यात आले आहेत. दुष्काळी मदतीसाठी देण्यात येणाऱ्या मोठ्या रकमा लक्षात घेऊन त्या कायमच्या उपयुक्त कामासाठीच खर्च करण्यात येतील अशी दक्षता घेण्यात येत आहे. भारत सरकारने राज्यांना खरीप पिकांच्या धडक कार्यक्रमासाठी १४८ कोटी रुपयांची वेगळी रक्कम गेल्या वर्षी दिली.

## पाकिस्तानी कैद्यांच्या स्त्रियांची कुचंबणा

१९७१ च्या भारत–पाकिस्तान युद्धांत भारत व बांगला देश ह्यांच्या संयुक्त लष्कराने ९३ हजार पाकिस्तानी कैदी पकडले, त्यांच्या सुटकेच्या प्रयत्नांना अद्याप यश आलेले नाही. दरम्यान, पकडलेल्या सैनिकांच्या स्त्रियांची खूपच कुचंबणा होत आहे. पाकिस्तानात पाश्चिमात्य स्त्रियांप्रमाणे स्त्रियांची मुक्ती चळवळ सुरू होणे जवळ जवळ अशक्य आहे. समाज फार मागासलेला असल्यानें पतीच्या आधाराशिवाय जीवन कंठणे त्यांना फार कठीण जात आहे. तथापि, परिस्थितीच्या रेट्याने आता त्या अंगावर पडलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी हालचाल करू लागल्या आहेत. सामाजिक दडपणाला न जुमानता त्यांनी निर्धाराने पावले उचलली आहेत. स्त्रियांच्या बाबतीत पाकिस्तानातील समाज रूढीप्रिय आहे. कैदी असलेल्या पाकिस्तानी जवानांच्या बायकांचे जवळचे स्नेही-सोबतीही पतीशिवाय जगणाऱ्या स्त्रियांकडे सहानुभूतीने पाहात नाहीत. तरीही रावळपिंडी, कराची आणि लाहोरसारख्या मोठ्या शहरांतून त्या आता एकट्याने बाजारहाट करताना दिसतात. बँकांत अगर इतर मोठ्या दुकानांतून व्यवहार करताना दिसतात. शिवाय नातलगांच्या सहलीची व्यवस्था करणे, प्रसंगी मोटार चालविणे, डॉक्टर्स, वकील, विमा एजंट इत्यादींबरोबर असणारी कामे करणे ह्याही गोष्टी करीत आहेत. पतीशिवाय मुसलमान समाजात स्त्रीला काहीच किंमत नसते. काही स्त्रिया तर कैद्यांची सुटका करण्याविषयी काढलेल्या मोर्च्यातही भाग घेतात. अनेकांना ह्या परिस्थितीशी नीट जुळवून घेता आलेले नाही. त्यांचा मानसिक तोल ढळला आहे. काही औषधे घेऊन जगत आहेत, तर काही डॉक्टरांच्या नजरेखाली उपचार घेत आहेत.

---

## ताम्रपत्रे स्वीकारण्यासाठी अपुरे स्वातंत्र्यसैनिक

स्वातंत्र्ययुद्धात भाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना ताम्रपत्रे देण्यासाठी भारत सरकारने गोव्याच्या सरकारकडे ५०० ताम्रपत्रे पाठविली आहेत. परंतु ती वाटण्याच्या बाबतीत गोव्याच्या सरकारपुढे अडचण उभी राहिली आहे. कारण, ती घेण्यासाठी सरकारने ठरविलेल्या पात्रतेचे पुरेसे स्वातंत्र्यसैनिक पुढे येत नाहीत. गोव्याच्या गृहखात्याने आतापर्यंत ४०० स्वातंत्र्यवीरांची यादी तयार केली आहे. त्यांना ताम्रपत्रे देण्यात येतील. राजकीय चळवळीसाठी निदान सहा महिने कारावासाची शिक्षा भोगली असेल अशा स्वातंत्र्यवीरांनाच ताम्रपत्रे देण्यात यावयाची आहेत. गोवा सरकारने स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतलेल्या राजकीय चळवळ्यांपैकी १,४०० लोकांची नोंद केलेली आहे. परंतु त्यांपैकी सर्वच ६ महिने कारावास भोगलेले नाहीत. ताम्रपत्रांचे वितरण १५ ऑगस्ट ह्या दिवशी होणार आहे.

---


Swastik FOAM

cosy sitting pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003



BANK TO BANK...

THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth, BELGAUM

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*

" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

| | |
|---|---|
| मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१ | प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५ |

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक.....**

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

| | | |
|---|---|---|
| तारेचा पत्ता : "मॉर्गेज" | दूर ध्व नी | मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)<br>कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)<br>उपकार्यालय नं.१ : २६०३०६ नं.२ : २९०००६ |


राज्य सहकारी भूविकास बँक व राज्यातील तिच्या २५ जिल्हा शाखा यांच्यामार्फत तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच ट्रॅक्टर व जमीन-सुधारणेकरिता कर्ज-वाटप करण्यात येते. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

डी. एस. जोशी
अध्यक्ष

| | |
|---|---|
| रा. गो. गोखले<br>व्यवस्थापक | जी. पी. भावे<br>कार्यकारी संचालक |

# दर्जेदार किर्लोस्कर एंजिनांना भारतीय मानक संस्थेचे प्रमाण पत्र

५ ते ८ हॉर्स पॉवर




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर

किर्लोस्कर एंजिन–शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315m M

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, १५ ऑगस्ट, १९७३ | अंक १६

## रौप्य महोत्सव

### आज २५ वर्षे पूर्ण होत आहेत


### दत्तात्रय इंडस्ट्रीज प्रा. लि.

आमचा कारखाना तारुण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे. नवी नवी आव्हाने स्वीकारून पुरी करण्याची जिद्द आमच्यांत आली आहे. सध्याच पहाना — संरक्षण विभागासाठीं लागणारे विविध प्रकारचे

**इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक काम्पोनन्टस्**



आम्ही संशोधन पूर्वक तयार केले. आयात होणाऱ्या किती तरी सुट्या भागांची गरज आम्ही भागविली. परकीय चलनाची बचत केली व करीत आहोत. राष्ट्राच्या संरक्षण यंत्रणेत आमचा हातभार लागतो याचा रास्त अभिमान या प्रसंगी व्यक्त करतांना आम्हांला आनंद वाटतो.







**गार्डन लॉन स्प्रिंक्लर्स** (पेटंटेड)

आणि अ‍ॅग्रि हॉर्टीकल्चरल टूल्स व इम्प्लीमेंटस्

कारखान्या भोवतालचा अथवा बंगल्याचा बाग-बगीचा सदा हिरवागार राहण्यासाठीं नाना प्रकारचें स्प्रिंक्लर्स आम्ही तयार करतो. भारतात सर्व प्रथम स्प्रिंक्लर निर्मितीचा मान आमचा आहे. शेतीसाठी पाण्याची बचत करणारे स्प्रिंक्लरहि आतां तयार करीत आहोत.

DI

दत्तात्रय इंडस्ट्रीज् प्रा. लि. पुणें–सातारा रोड, पुणें ९


731

## जमखंडी अर्बन को-बँक लि. चे मॅनेजर

# श्री. म. द. खाडिलकर,

एम्. ए., जी. डी. सी. अँड ए.

श्री. खाडिलकर ह्यांचा जन्म २५-४-१९१६ रोजी वडिलांच्या



मृत्यूनंतर सहा महिन्यांनी झाला. त्यांचे मामा कै. हरीभाऊ पटवर्धन हे जमखंडी संस्थानात बरीच वर्षे मामलेदार आणि सेवानिवृत्तीचे अखेरीस रेव्हेन्यू ऑफिसर व डि. मॅजिस्ट्रेट होते. त्यांच्याकडेच श्री. खाडिलकर हे १९३४ साली मॅट्रिक होईपावेतो होते. त्यांच्या मातोश्री प्रथम काही वर्षे जमखंडी संस्थानात नर्स म्हणून व पुढे बरीच वर्षे प्राथमिक शाळाशिक्षिका म्हणून काम करीत होत्या. १९५४ मध्ये त्या सेवानिवृत्त झाल्या आणि १९७० मध्ये निधन पावल्या.

श्री. खाडिलकरांनी मॅट्रिकनंतर घरीच अभ्यास करून १९४० मध्ये मुंबई बार कौन्सिलची ॲडव्होकेटची परीक्षा दिली. त्यांनी एक-दोन वर्षे वकिली केली आणि १-६-१९४३ रोजी जमखंडी अर्बन बँकेत (तेव्हाच्या जमखंडी स्टेट सेंट्रल को-बँकेत) त्यांनी कारकुनाची नोकरी धरली. १३-११-४४ रोजी त्यांना बँकेचे मॅनेजर करण्यात आले. तेव्हापासून नुकताच राजीनामा देईपर्यंत त्यांनी मॅनेजरचे काम केले.

ह्या नोकरीच्या काळात श्री. खाडिलकर हे १९५३ साली जी. डी. सी. अँड ए. झाले. त्यानंतर १९६५ मध्ये त्यांनी कर्नाटक विद्यापीठाची बी. ए. ही पदवी आणि १९६८ मध्ये एम्. ए. ही पदवी मिळविली. बी. ए. ला त्यांचा विषय अर्थशास्त्र हा होता आणि एम्. ए. ला मराठी हा होता.

हायस्कुलात शिक्षण घेत असतानाच श्री. खाडिलकर ह्यांना त्यांचे स्काऊट-मास्तर श्री. बर्वे ह्यांच्यामुळे सामाजिक कार्याची गोडी लागली आणि लेखनकलेकडेही ओढ लागली. त्यांनी अनेक निबंधस्पर्धांत प्रथम क्रमांकाची बक्षिसे मिळविली आहेत; अनेक वृत्तपत्रांतून लिखाण केले आहे. बाँबे को-ऑपरेटिव्ह इन्स्टिटयूटने सहकारी चळवळीच्या सुवर्ण महोत्सवप्रसंगी 'को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ हे ध्येय भारतास योग्य आहे काय?' ह्या विषयावर मागविलेल्या निबंधांपैकी मराठी भाषेतील निबंधांत श्री. खाडिलकर ह्यांना पहिले बक्षीस मिळाले. दक्षिण महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे कार्यवाह, नगर वाचनालयाचे सेक्रेटरी व उपाध्यक्ष, ११ वर्षे नगरपालिकेचे सभासद, तिच्या मॅनेजिंग व सॅनिटरी कमिटीचे चेअरमन, हायस्कूल डायमंड ज्युबिली कमिटी व गुरुदेव रानडे सत्कार समितीचे खजिनदार, इत्यादी कामांवरून त्यांच्या सार्वजनिक कार्याची कल्पना येईल सध्या ते कै. विठ्ठल रामजी शिंदे शतसांवत्सरिक उत्सवाच्या स्थानिक कमिटीचे सेक्रेटरी आहेत. अनेक थोर व्यक्तींच्या प्रेरणेमुळे आणि उत्तेजनामुळे आपण हे कार्य करू शकलो, ह्याबद्दल त्यांची त्या सर्वांबद्दल कृतज्ञतेची भावना आहे.

"अर्था" शी त्यांचा अत्यंत आपुलकीचा संबंध होता. "अर्था" मध्ये १९५४ साली त्यांचा सहकारावरील पोवाडा व सहकारी ध्वजगीत प्रसिद्ध झाले होते.

श्री. खाडिलकरांचा हा परिचय त्यांच्या आजच्या दुःखी अवस्थेचा उल्लेख केल्याशिवाय पुरा होणार नाही. त्यांच्या पत्नीचे १४-७-१९७३ रोजी फुफ्फुसाच्या कॅन्सरने निधन झाले. कॅन्सरचे निदान झाल्यानंतर अवघ्या दीड महिन्यातच त्या मृत्युमुखी पडल्या. श्री. खाडिलकर हे नाट्याचार्य खाडिलकरांच्या चुलत घराण्यातून नातू, तर त्यांची पत्नी नाट्याचार्य देवलांची नात. नाट्याचार्यांची दोन घराणी त्यांच्या विवाहामुळे एकत्र आली, ह्याचा केवढा तरी अभिमान खाडिलकरांना वाटत असे. १८ मे, १९४४ रोजी त्यांचा विवाह झाला आणि त्यांचा संसार अत्यंत सुखाचा झाला. त्यांना एकच अपत्य झाले. २८-९-१९५० रोजी झालेला त्यांचा मुलगा बी. एस्सी. होऊन त्याच बँकेत नोकरी करीत आहे. सध्या तो बंगलोर येथे हायर डिप्लोमा इन को-ऑपरेशनचा कोर्स करीत आहे. पत्नीवियोगानंतर बँकेची नोकरी करणे अशक्य आहे असे वाटून श्री. खाडिलकरांनी पत्नीच्या मृत्यूच्या दिवशीच राजीनामा दिला!

श्री. खाडिलकरांसारख्या स्वतःच्या कष्टाने पुढे आलेल्या उमद्या कार्यकर्त्याला अखेरचे दिवस अशा दुःखात जावेत ही अतिशय शोकजनक घटना आहे.

---

## धान्याच्या घाऊक व्यापाऱ्यांना मोठे कर्ज

राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांनी अशी माहिती सांगितली की जानेवारी १९७१ पासून मार्च १९७३ पर्यंत राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांनी व इतर बँकांनी मिळून अन्नधान्याचा घाऊक व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांना ३७१ कोटी रुपयांची कर्जे दिली. ह्याविषयी प्रश्न विचारताना काँग्रेसच्या एका खासदारांनी असे विधान केले की ह्या मोठ्या कर्जांमुळेच धान्याची साठवण करून कोंडी निर्माण करण्यास प्रारंभ झाला आणि धान्याच्या किंमती चढत गेल्या. त्यावर बोलताना श्री. चव्हाण म्हणाले की जून १९७२ पासून घाऊक व्यापाऱ्यांना दिलेल्या कर्जात घट झालेली आहे. शिवाय वरील कर्जाच्या आकड्यांत अन्नपदार्थांवर संस्करण करणाऱ्यांना दिलेल्या कर्जांचाही समावेश आहे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १५ ऑगस्ट, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## आर्थिक नियोजनात धोरणाचे दारिद्र्य

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या पुरस्काराने शेठ वालचंद हिराचंद ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित केलेल्या व्याख्यान-सत्रात डॉ. एच. के. परांजपे ह्यांनी भारतामधील आर्थिक नियोजनाविषयी मोलाचे विचार प्रगट केले आहेत. डॉ. परांजपे हे मक्तेदारी मंडळाचे सभासद आहेत. ते म्हणाले की, देशातील दारिद्र्य जर आपणास दूर करावयाचे असेल तर नियोजन समर्थपणे करण्यात आले पाहिजे. आपल्यापुढे जे प्रश्न उभे आहेत त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण एकसंध असला पाहिजे. तसा तो नसल्याने नियोजनविषयक धोरण गोधडीवजा झाले आहे. भारतात एका प्रौढाला एक मत ह्या तत्त्वावर आधारलेली लोकशाही अंगीकृत करण्यात आली आहे. त्यामुळे बहुजनांच्या आकांक्षांना आणि गरजांना प्राधान्य देणारे आर्थिक धोरण उघडपणे सोडून देणे अवघड झालेले आहे. त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक धोरणात दुतोंडीपणा उत्पन्न होण्यात झाला आहे. लोकांच्या मनाला पटेल अशा प्रकारची घोषणाबाजी एका बाजूला करण्यात येत असते, तर दुसऱ्या बाजूला अनेकविध हितसंबंधीयांच्या हितांना धक्का न देणारे अर्धवट उपाय योजण्यात येत असतात. त्यामुळे भारताच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असणाऱ्या निवडक लोकांच्या वागणुकीत ढोंगबाजी जुनाट सवयीसारखी रुजलेली आहे. सध्या देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याची अतिशय गरज आहे आणि ही वाढ स्वतःच्या बळावरच घडवून आणली पाहिजे. स्वतःच्या बुटाचे बंद ओढून स्वतःच उभे राहण्यासारखी ही गोष्ट आहे. ती साध्य करण्यासाठी देशाच्या आर्थिक साधनसंपत्तीची जास्तीत जास्त वाढ करून आज सुप्तावस्थेत असलेला आर्थिक विकास प्रत्यक्षात उतरविला पाहिजे.

---

## निर्बंध म्हणजे जकातीची नाकी !

हे साधण्यासाठी शिलकी आर्थिक साधनांच्या वापराची दिशा आणि पद्धत बदलण्यात आली पाहिजेत. खरे तर अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र ह्यांची विभागणी करताच येत नाही. केवळ तात्त्विक विचार करताना अशी विभागणी संभवते आणि तीही तर्कदुष्ट असते. वास्तव जीवनात आर्थिक विचार व राजकीय विचार एकमेकांवर सतत आघात करीत असतात. भारताने पार्लमेंटरी पद्धतीच्या लोकशाहीचा अंगीकार केला आहे. ह्या पद्धतीत निवडणुकांना साहजिकच महत्त्व आलेले आहे. निवडणुका पार पाडण्यासाठी खूप खर्च करावा लागतो. पण, हा खर्च सरळ व उघड मार्गाने भागविता यावा म्हणून पैसा जमविण्याची निरोगी व्यवस्था मात्र उभारण्यात आली नाही. कंपन्यांनी राजकीय पक्षांना देणग्या देण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे. त्यामुळे त्यांच्या राजकीय मताचा सुगावा लागत नाही. परिणाम असा झाला आहे की निवडणुकांसाठी लागणाऱ्या पैशाचा फार मोठा पुरवठा गुप्तपणाने करण्यात येऊ लागला आहे. अर्थातच ह्याचा तर्कशुद्ध आणि अपरिहार्य परिणाम म्हणून भ्रष्टाचार व लांचलुचपत जीवनाचा एक अविभाज्य भाग बनून राहिला आहे. आता अशी अवस्था झाली आहे की आर्थिक व्यवहारावर घालण्यात आलेले निर्बंध म्हणजे जकातीची नाकी झाली आहेत. ह्या नाक्यावर असणाऱ्या छोट्या अगर बड्या लोकांना आपला वाटा सहज मिळविता येतो. भ्रष्टाचार आणि लांचलुचपत ह्यांचे एक दुष्ट वर्तुळच निर्माण झालेले आहे आणि त्याच्या कक्षेत समाजातील फार मोठ्या संख्येचा समावेश झालेला आहे. प्रत्येकाला असे वाटत आहे की दुसरा प्रत्येक माणस हा लबाड आहे; अशा परिस्थितीत त्याने एकट्यानेच प्रामाणिकपणे वागणे शक्य कोटीतील नाही. बड्या उद्योगगटांना नवे उद्योगधंदे वाढण्यात फार अडचणी निर्माण झाल्या आहेत.

---

## सूर्यफुलाच्या लागवडीचा मोठा कार्यक्रम

देशात खाद्यतेलाच्या टंचाईने उग्र स्वरूप धारण केले आहे. गेल्या वर्षाच्या अवर्षणामुळे ही टंचाई विशेष जाणवत असली तरी तेलबियांच्या उत्पादनाच्या बाबतीत भारत स्वयंपूर्ण नाही. ह्या परिस्थितीवर उपाय शोधण्याचे प्रयत्न सरकारी पातळीवर चालू आहेत. त्यांपैकी एक म्हणजे सूर्यफुलाच्या लागवडीचा कार्यक्रम. पाचव्या पंचवार्षिक योजनेत सूर्यफुलाच्या लागवडीखाली १० लाख हेक्टर जमीन आणण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. भारतामधील उत्तरेकडील व पूर्वेकडील राज्यांतून सूर्यफुलाची लागवड करण्याच्या दृष्टीने योग्य जमिनीची पाहणी करण्यात येत आहे. दक्षिण भारतात तामीळनाडू, म्हैसूर ( आता कर्नाटक ) आणि आंध्र प्रदेशात १९७२-७३ साली सूर्यफुलाच्या लागवडीचा धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. हा कार्यक्रम बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाल्याचे आढळून आले आहे.

अलीकडे महाराष्ट्र आणि गुजरात राज्यांतून ७० हजार हेक्टर जमिनीत सूर्यफुलाची लागवड करण्यात आली आहे. इतर तेल-बियांच्या लागवडीपेक्षा सूर्यफुलाच्या लागवडीला प्राधान्य देण्यात येत आहे. कारण, त्याच्या लागवडीपासून अधिक फायदा होण्याची शक्यता आहे. सूर्यफुलाचे पीक हाती येण्यास ८६ ते १०० दिवस लागतात आणि त्यात तेलाचा अंशही ५० टक्के असतो. वर्षाच्या कोठल्याही ऋतूत त्याची लागवड करता येते. रेताड जमीन आणि कठीण काळी जमीन ह्या दोन्ही प्रकारची जमीन सूर्यफुलाला चालते. त्याला पावसाळ्याची आवश्यकता नसते. शिवाय पाण्याच्या अभावी ते पुष्कळ दिवस तग धरू शकते. हृदयविकाराच्या रोग्यांना सूर्यफुलाचे तेल बाधक होत नाही.

## उद्योगधंदे आणि तांत्रिक शिक्षणसंस्था ह्यात दुवा पाहिजे

उद्योगधंदे आणि तांत्रिक शिक्षणसंस्था ह्यांच्यातील सहकार्या-संबंधी विचार करण्यासाठी वारंगळ येथे दोन दिवसांचा एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादाचे उद्घाटन मध्यवर्ती सरकारचे शास्त्र व तांत्रिक खात्याचे मंत्री श्री. सी. सुब्रह्मण्यम् ह्यांनी केले. ह्या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की देशातील उत्पादनाला जास्तीत जास्त चालना देऊन औद्योगिक विकास साधण्यासाठी शिक्षण आणि संशोधन ह्यांच्यात निकटची सांगड घालण्यात आली पाहिजे. त्यासाठी तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था आणि उद्योगधंदे ह्यांच्यात सहकार्य साधण्यात आले पाहिजे. असे सहकार्य झाले तर शिक्षणाच्या ज्ञानशाखा आणि विद्यार्थी ह्यांना उद्योगधंद्यांपुढे असणाऱ्या प्रश्नांची जाणीव होईल आणि अशा जाणिवेच्या अभावी निर्माण होणाऱ्या अडचणी दूर करता येणे शक्य होईल. शिवाय सहकार्यामुळे उद्योगधंद्यांना आपल्या मालाचे प्रकार सुधारता येतील आणि त्यांचा दर्जा व कार्यक्षमता सुधारणेही शक्य होईल. उलट, सहकार्याच्या अभावी तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था व्यवहारात उद्भूत होणाऱ्या रोजच्या प्रश्नापासून दुरावल्या जातात. शिवाय, संशोधनकार्यात कशाला प्राधान्य द्यावे हेही यांना नीट आकलन होत नाही. अर्थातच सामान्य माणसाचे हित साधण्यासाठी उद्योगधंद्यांनी काय करावयास पाहिजे ह्याची कल्पना शिक्षणसंस्थांना येत नाही. शिक्षणसंस्था आणि उद्योगधंदे ह्यांनी एकमेकांशी सतत संपर्क ठेवला तर भारताचे उद्योगधंदे आधुनिक पायावर उभे करण्यास मदत होऊ शकेल. त्याचबरोबर शिक्षणसंस्थांना व्यावहारिक वळण देता येऊन त्या अधिक उपयुक्त काम करू शकतील.

## हवामान वर्तविण्यासाठी गणकयंत्राचा वापर

भारतासारख्या शेतीप्रधान देशांना हवामानाची माहिती जितक्या जलद आणि तपशीलवार मिळेल तितकी हवी असते. अलीकडे हवामानासंबंधी माहिती जमविण्याची शास्त्रीय साधने खूप सुधारली आहेत. परंतु तिचा उपयोग करून योग्य ते निष्कर्ष काढण्याचे काम हवामानखात्यातील तज्ज्ञांना जुन्याच पद्धतीने करावे लागते. ह्या पद्धतीत कालापव्यय फार होतो. आता जमलेल्या माहितीचा उपयोग करून घेण्यासाठी गणक-यंत्राची मदत घेण्यात येऊ लागली आहे. अशा प्रकारच्या गणकयंत्राच्या केंद्राची अतिशय जरूर वाटत होती. प्रवास आणि नागरी विमानवाहतूक खात्याचे मंत्री डॉ. करणसिंग ह्यांनी अशा केंद्राचे उद्घाटन नुकतेच केले आहे. ह्या प्रसंगी बोलताना हवामान-निरीक्षण प्रयोगशाळांचे सरसंचालक डॉ. पी. कोटेश्वरम् म्हणाले की, गेल्या काही वर्षांत आकाशात जेटवर चालणारी विमाने भ्रमण करू लागली आहेत. परंतु हवामानशास्त्राचे काम मात्र जुन्या पद्धतीने चालले आहे. हवामानाविषयी मिळालेल्या माहितीचा आलेख तयार करण्याचे काम अजून माणसाकरवीच करून घ्यावे लागते. त्यामुळे योग्य प्रकारचा आलेख तयार करण्याचे काम करण्यास १० तासांचा अवधी लागतो. गणकयंत्राचा वापर केला तर हेच काम ५ तासात होऊ शकते. पृथ्वीभोवती भ्रमण करणाऱ्या उपग्रहासारख्या अद्ययावत् साधनांनी निरीक्षणावर आधारलेली माहिती खूप लवकर जमा होऊ शकते. तिचा उपयोग करून शेती, विमानवाहतूक, इत्यादी क्षेत्रांना लागणारी माहिती त्वरित पोचविण्याचे काम गणकयंत्रेच प्रभावीपणे करू शकतील.

## अमेरिकेची मदत मिळण्याची आशा बेताची

अमेरिकेतील एक प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ डॉ. बर स्मिथ ह्यांनी भारताला अमेरिकेकडून मदत मिळण्याची आशा बेताची आहे, असे मत व्यक्त केले आहे. नवी दिल्ली येथे एका प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, भविष्यकाळात सध्याइतकी मदत चालू राहण्याची शक्यताही फारशी दिसत नाही. अविकसित देशांना अमेरिकेकडून देण्यात येणाऱ्या मदतीचा ओघ सतत आटत चालला आहे. विकसित देशांनी आपल्या ठोक राष्ट्रीय उत्पन्नापैकी १ टक्का उत्पन्न मदत म्हणून मागासलेल्या देशांना द्यावे अशी शिफारस पिअर्सन कमिशनने केली आहे. परंतु ती अमलात येणे नजीकच्या भविष्यकालात तरी शक्य होईल असे दिसत नाही. गेल्या काही वर्षांत अमेरिकेच्या परदेशांशी होणाऱ्या देण्याघेण्याच्या व्यवहारात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे मदत देण्यास अमेरिका नाखूष होत चालली आहे. शिवाय, परदेशांना देण्यात येणाऱ्या मदतीला अमेरिकन जनतेचा पहिल्यासारखा पाठिंबा मिळत नाही. करदाता अमेरिकन नागरिक अशा मदतीच्या उपयोगासंबंधी साशंक झालेला आहे. भारताशी होणाऱ्या व्यापारातही अमेरिकेला उदार भूमिका घेणे जमणार नाही. भारताकडून निर्यात करण्यात येणाऱ्या मालाला सवलती देणे अगर अमेरिकेकडून भारताला निर्यात होणाऱ्या मालाबाबत सवलती देणे आता अमेरिकेला शक्य होणार नाही. मदत देण्याबाबत अमेरिकेचे धोरण आता बदलले आहे. शक्य तितकी मदत जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संघटनां-मार्फत देण्याकडे आता अमेरिकेचा कल होऊ लागला आहे. अशी मदत मुक्त असल्यामुळे तिचा अविकसित देशांनी फायदा घ्यावा. कारण, ती राजकीय बंधनाच्या पलीकडे असते.

## बेकारांना फसवून पैसे मिळविण्याचा धंदा

बेकारांना नौकरी देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पैसे उकळण्याचे प्रकार कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरात घडत असतात. असा उद्योग करणारे लोक आता उत्तर प्रदेशात हालचाली करीत असल्याचे राज्याच्या पोलीस खात्याला आढळून आले आहे. पोलीस खात्याचा एक विभाग आर्थिक गुन्ह्यांचा तपास लावण्यासाठी काम करीत असतो. फसवणूक करणारे लोक वृत्तपत्रांत जाहिराती देऊन आपले खिसे भरत असतात. वृत्तपत्रांनाही जाहिरातींचे उत्पन्न मिळत असते. वृत्तपत्रांतून अनेक प्रकारच्या नौकऱ्यांच्या जाहिराती देण्यात येतात. त्यात कारकून, टंकलेखक, एजंट, कंपन्यांतील वरिष्ठ अधिकारी, इत्यादी प्रकारच्या नौकऱ्यांसाठी अर्ज मागविलेले असतात. पगाराच्या श्रेणी मासिक १५० रुपयांपासून ५०० रुपयांपर्यंत असतात. शिवाय, अनेकविध भत्त्यांचेही आकर्षण ठेवण्यात आलेले असते. निरनिराळ्या राज्यांतील ३० वृत्तपत्रांतून खोट्या कंपन्यांच्या व औद्योगिक संघटनांच्या नावे जाहिराती देण्यात येतात. नाकरीचे अर्ज मागवून घेण्यासाठी उमेदवाराने २ ते ५ रुपये व टपालहशील पाठवावयाचे असते. उमेदवारांकडून अर्ज भरून आल्यावर त्यांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येते. त्यातून निवड करण्यात येते. आणि निवड झालेल्यांकडून ५०० रुपयांपर्यंत रोख रक्कम मागण्यात येते. शिवाय, ५,००० रुपयांचा सिक्युरिटी बाँडही भरून द्यावा लागतो. मग निवड झालेल्या उमेदवारांना नेमणूकपत्रेही देण्यात येतात; आणि नंतर अल्प काळातच त्यांना नाकरीवरून काढून टाकण्यात येते. बडतर्फीच्या नोटीसा मिळाल्यानंतर ह्या खोट्या मालकाची नावनिशाणीही दिसत नाही. कारण, त्यांनी आपली जागा, नावाची पाटी, फर्निचर, सर्व काही केव्हाच हलविलेले असते.

---

## साखरकारखान्यांच्या यंत्रसामग्रीला नवी बाजारपेठ

इंडोनेशिआतील साखरकारखान्यांत नवीन यंत्रसामग्री बसविण्याचा मोठा कार्यक्रम आखण्यात आलेला आहे. त्यासाठी १० कोटी डॉलर्स खर्च करण्यात यावयाचे आहेत. साखरकारखान्यांची यंत्रसामग्री तयार करणाऱ्या हिंदमधील कारखान्यांना इंडोनेशिआत धंदा करण्याची ही चांगली संधी लाभली आहे. तिचा फायदा घेण्यासाठी कारखानदारीतील तज्ज्ञांचे एक मंडळ इंडोनेशिआला गेले आहे. इंडोनेशिआतील साखरेच्या कारखानदारीचे आधुनिकीकरण करण्यासाठी जागतिक बँक व एशिअन डेव्हलपमेंट बँक ह्यांनी कर्जे देण्याचे ठरविले आहे. तथापि, हिंदी कारखानदारांना इंडोनेशिआत धंदा मिळविण्यासाठी ब्रिटन, अमेरिका, पश्चिम युरोप, इत्यादींच्या कारखानदारांबरोबर स्पर्धा करावी लागणार आहे. भारतात आता उत्कृष्ट दर्जाची यंत्रसामग्री तयार होते.

---

## इंदिरा सहकारी बँकेची चांगली प्रगती

मुंबईमध्ये दोन महिन्यांपूर्वी स्थापन झालेल्या इंदिरा सहकारी बँकेने चांगली प्रगती केली आहे. ही बँक सर्वार्थाने महिलांनी आणि महिलांसाठी चालविलेली आहे. दादर येथे बँकेची कचेरी असून तिचे सर्व भागधारक स्त्रिया आहेत. त्याचप्रमाणे नौकरवर्गही महिलाच आहेत. इतकेच नव्हे तर बँक फक्त स्त्रियांनाच कर्ज देते. पुरुषांना फक्त खाते उघडता येते. नौकरी करणाऱ्या स्त्रिया आणि मध्यम व छोट्या उद्योगधंद्यात काम करणाऱ्या महिला ह्यांच्या गरजा भागविण्यासाठी बँक मुख्यत: काढण्यात आली. बँकेच्या सभासदांची संख्या ४,५०० आहे. बँकेचे भागभांडवल ४·५० लाख रुपये असून आता तिला ९ लाखांच्या ठेवी गोळा करण्यात यश मिळाले आहे. आतापर्यंत बँकेने ७·५ लाख रुपयांची कर्जे दिली आहेत. सर्वात मोठे कर्ज परळ भागात एक मेडिकल स्टोअर चालविणाऱ्या महिलेला देण्यात आले आहे. ह्या कर्जदाराला ५० हजार रुपयांचे कर्ज दिलेले आहे. दुसऱ्या दोन स्त्रियांना प्रत्येकी १० हजार रुपयांचे कर्ज देण्यात आलेले आह. त्यांची दोघींचीही सवसाधारण वस्तूंची विक्री करण्याची दुकाने आहेत. त्याशिवाय धारावी येथे कातडी कमविण्याचा कारखाना चालविणारी एक महिलाही बँकेची कर्जदार आहे. अंधेरी येथे शिशुगृह चालविणाऱ्या एका महिलेला त्याचा विस्तार करावयाचा होता. ह्या कामासाठी लागणारे कर्ज बँकेने पुरविले आहे. श्रीमती शालिनीबाई पाटील ह्यांनी बँक काढण्यात पुढाकार घेतला होता. अशीच एक बँक त्यांनी सांगली येथे ग्रामीण स्त्रियांसाठी काढलेली आहे. पहिल्याच वर्षात बँकेला नफा झाला आहे. आता बँक सहा शाखा काढणार आहे.

---

## बड्या कंपन्यांकडे ९० कोटींची थकबाकी

राज्यसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना अर्थखात्याचे राज्यमंत्री श्री. के. आर. गणेश ह्यांनी अशी माहिती दिली की १९७१-७२ साली देशातील ७३ बड्या मक्तेदार कंपन्यांकडून एकूण ९० कोटी रुपयांची कराची थकबाकी यावयाची होती. गेल्या दहा वर्षात कंपन्यांकडून वसूल करण्यात आलेल्या कराच्या दोन टक्के एवढी ही रक्कम आहे. कराच्या थकबाकीबद्दल नेमण्यात आलेल्या खास चौकशी विभागाने जमा केलेल्या माहितीप्रमाणे प्राप्तिकराची ९ प्रकरणे, संपत्तिकराची १२५ प्रकरणे आणि एक देणगी-कराचे प्रकरण ह्यांची पुन्हा नव्याने चौकशी सुरू झालेली आहे. खास चौकशी विभागाकडे फक्त बिर्ला उद्योगगट आणि बाजोरीआ-जालन उद्योगगट ह्यांची चौकशी सोपविण्यात आली होती. आणखी काही उद्योगगटांची चौकशी करण्याचे काम ह्या विभागाकडे सोपविण्याचा सरकारचा विचार आह.

---

## नौदलाला नवीन विमाने मिळण्यात अडचणी

हिंदच्या नाविक दलाला अद्ययावत् करण्याचे प्रयत्न करण्यात आले आहेत. हिंदी महासागरात वावरणारी बड्या राष्ट्रांची नौदले आणि इराणच्या नाविक दलाचे वाढते सामर्थ्य ह्यांच्या संदर्भात ह्या प्रयत्नांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. नाविक दलात काम करणाऱ्या विमानांना फार महत्त्वाची कामगिरी बजवावी लागते. म्हणून ती अद्ययावत् असणे अर्थातच अतिशय जरूर असते. सध्या भारताच्या "विक्रांत" ह्या एकुलत्या एक विमानवाहू बोटीवर 'सी हॉक' जातीची विमाने आहेत. ती आता जुनी तर झालीच आहेत. पण, शिवाय तांत्रिक दृष्ट्या मागासलेली आहेत. त्यांच्या जागी 'हॅरिअर' जातीची ब्रिटिश विमाने घेण्याचा विचार चालू होता. परंतु खुद्द ब्रिटनमध्येच त्यांचे उत्पादन होईल किंवा नाही अशी शंका निर्माण झाली आहे. ब्रिटनच्या नौदलाची ही विमाने वापरण्याची तयारी १९८० पर्यंत होऊ शकत नाही. त्यामुळे ब्रिटिश विमान-निर्माते त्यांच्या उत्पादनासाठी लागणारे खूप मोठे भांडवल गुंतविण्यास तयार नाहीत. नवीन जातीच्या 'हॅरिअर' विमानांना हवेत उड्डाण करण्यास फारशी लांब धावपट्टी लागत नाही. ती जवळ जवळ एकदमच हवेत तरंगू लागतात. अशा प्रकारची २५ विमाने घेण्याचा भारताचा विचार होता. त्यासाठी ९६ कोटी रुपये खर्च करण्यात येणार होते. पण तूर्त हे सर्वच बारगळले आहे. अशाच जातीची विमाने रशिअन विमानवाहू बोटींवर ठेवण्यात येणार आहेत. पण रशिआ आपले अत्याधुनिक युद्धसाहित्य दुसऱ्या देशांना सहसा देत नाही. हिंदी नाविक दलाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी भारताला कदाचित् रशिआकडे पाहावे लागेल.

---

## अफगाण क्रांतीत रशियाचा हात

अफगाणिस्तानातील राजेशाही उलथून टाकून तेथे आता प्रजासत्ताक राज्याची स्थापना करण्यात आली आहे. ह्या राजकीय क्रांतीला अनेक बड्या व छोट्या राष्ट्रांनी आपला पाठिंबा व्यक्त केला आहे. परंतु चीनचा ह्या बाबतीतील पवित्रा अजून उघड झालेला नव्हता. पेकिंगहून परदेशीय वार्ताहरांनी पाठविलेल्या बातमीपत्राने चीनची भूमिका उघड करण्यात आली आहे. चीनच्या मताने अफगाणिस्तानामधील क्रांतीत रशियाचा हात आहे. त्याचप्रमाणे क्रांतीमागे पाकिस्तानचे विघटन घडवून आणण्याचा रशियाचा इरादा असून त्या कामी भारताचेही सहकार्य आहे. रशियाला पश्चिम युरोपात आणि पूर्वेकडे चीन-मध्ये हातपाय पसरण्यास वाव राहिलेला नाही. म्हणून रशिया दक्षिणेकडे आपले प्रभावक्षेत्र वाढवीत आहे. हिंदी महासागरात उतरण्यासाठी तो मार्ग खुला करून घेत आहे,असेही सुचविण्यात येत आहे.

---

## प्रे. निक्सन ह्यांना मिळणाऱ्या पाठिंब्याला ओहोटी

अमेरिकेच्या गेल्या अध्यक्षीय निवडणुकीच्या वेळी तेथील डेमोक्रॅटिक पक्षाच्या कचेरीत हेरगिरी करविण्याच्या वॉटरगेट प्रकरणी प्रे. निक्सन ह्यांचे नाव निगडित आहे. ह्या हेरगिरीची चौकशी सुरू झाल्यापासून अमेरिकेतील उद्योगधंद्यांच्या पुढाऱ्यांत प्रे. निक्सन ह्यांची पत ढासळत चालली आहे. अलीकडे ह्याविषयी चाचणी करणारी मत-नोंदणी करण्यात आली आहे. अमेरिकेतील १,४५३ कंपन्यांच्या अध्यक्षांकडे एक प्रश्नपत्रिका पाठविण्यात आली होती. ह्या कंपन्यांचे शेअर्स न्यूयॉर्क स्टॉक एक्स्चेंजवर नोंदलेले आहेत. प्रश्नपत्रिकेला ५२ टक्के उत्तरे आली. त्यांपैकी ६७ टक्क्यांत पुन्हा निवडणूक झाली तर निक्सन ह्यांनाच मत देऊ असे निर्दिष्ट केले होते. गेल्या पावसाळ्यात झालेल्या अशा मतनोंदणीत ९१ टक्के उत्तरे पाठिंबा देणारी होती.

---

## सफरचंदाच्या अमाप पिकाची अडचण

हिमाचल प्रदेशात सफरचंदाचे अमाप पीक आल्यामुळे तेथील सरकारी फळबाग खात्याची फार पंचाइत झाली आहे. फळबागांच्या विकासात फार मोठी आघाडी मारल्याचे खात्याला जगजाहीर करावेसे वाटते. पण, फळबागांच्या मालकांना तसे करणे इष्ट वाटत नाही. सफरचंदाच्या भरपूर पिकाची वार्ता फैलावली तर त्यांच्या किमती घटतील आणि बागायतदारांना तोटा सोसावा लागेल असा संभव आहे. सरकारी खात्याच्या अंदाजाप्रमाणे ह्या वर्षी सफरचंदाच्या ४० ते ५० लाख पेट्या भरतील इतके चांगले पीक आले आहे. किमती घटून नुकसान होऊ नये म्हणून त्याच्या किंमती ठराविक पातळीखाली जाऊ नयेत असे बागायतदारांचे म्हणणे आहे. त्यांच्या मताने मुळातच २५ ते ३० लाख पेट्या भरतील एवढेच उत्पादन झाले आहे.

---

**बांगला देशाला वैद्यकीय मदत** — बांगला देशाने पाकिस्तानशी केलेल्या स्वातंत्र्ययुद्धात हजारो वीर व सैनिक जायबंदी झाले. कित्येकांना हातापायांना मुकावे लागले. अशा जायबंदींना कृत्रिम हातपाय बसविण्यासाठी मिरज मेडिकल सेंटरतर्फे एक वैद्यकीय तुकडी बांगला देशात गेली आहे. युद्धात अपंग झालेल्या ८०० जवानांना आणि २५ हजार नागरिकांना कृत्रिम अवयवांची जरुरी आहे.

**छोट्या मोटारींचा कारखाना** — मध्यप्रदेशातील खरगोण हा जिल्हा फार मागासलेला आहे. तेथील वस्ती मुख्यतः आदिवासींची आहे. त्यांना रोजगार उपलब्ध करून देता यावा म्हणून तिचाकी आणि छोट्या मोटारी ह्यांचा एक कारखाना काढण्यात येणार आहे. खाजगी मालकीच्या ह्या कारखान्यात १,५०० मोटारी तयार करण्यात येतील.

## व्यवस्थापनातील समस्या (१२)

### बाजाराच्या दूरदर्शी पद्धतशीर अभ्यासाची आवश्यकता

[ सु. वि. मेहेंदळे (बी. ई., एम. बी. ए.) ]

यू. एस. ए. रेडिओ कंपनीचे डायरेक्टर मि. संगीतानी हे १९७१ च्या जानेवारीत मोठ्या काळजीच्या सुरात त्यांचे नवीन उद्योगविषयक सल्लागार श्री. मार्केटकर यांना आपल्या कंपनीच्या अडचणींविषयी माहिती देत होते.

"मी १९६२ साली जेव्हा रेडिओ सेट उत्पादन सुरू केले तेव्हा भारतात परदेशी सहकार्याने स्थापन झालेल्या व जगप्रसिद्ध ब्रँडच्या रेडिओचे उत्पादन होत होते. मीही अशाच एका कंपनीत कामाचा अनुभव घेऊन स्वतःचे उत्पादन सुरू करण्याचा निर्णय घेतला. मोठ्या कंपन्या रेडिओला लागणारे पार्टस् कोठून आणीत हे मला माहीत होते. अशाच कंपन्यांकडे मी माझ्या पार्टस्ची ऑर्डर दिली. माझी स्वतःची अशी सर्किटस् डिझाईन केली. एका चांगल्या आर्टिस्टकडून कॅबिनेटचे डिझाईन आणि यू. एस. ए. छापाचे चिह्न करवून घेतले. कल्याणजवळ एका छोट्या शेडमध्ये हा कारखाना सुरू केला. सुरुवातीला मी ३ बँडचे दरमहा ३० सेटस् करणे सुरू केले. देशात छोट्या शहरांतून नुकतीच वीज आली होती आणि लहान गावातही विजेचा प्रसार करण्याच्या सरकारी योजना होत्या. त्यामुळे भारतात रेडिओला खूप मागणी असणार या भरवशाने मी उत्पादन सुरू केले. कारखाना लहान प्रमाणावर असल्याने मला स्वतःला प्रॉडक्शन, फायनान्स, खरेदी वगैरे कामातच वेळ पुरा पडेना. त्यात नवीन नवीन प्रॉब्लेम येत होते व मला डोके वर काढायला मिळत नसे. झालेले उत्पादन वेळेवर विकले तरच मला धंदा करायला पैसे उभे राहणार व अधिक उत्पादन करण्यास संधी मिळणार हे ध्यानात घेऊन मी विक्रीची व्यवस्था पाहण्यास माझे एक दूरचे नातलग श्री. सेलवाणी यांस नेमले. श्री. सेलवाणी हे एका मोठ्या कंपनीत फिरते विक्रेते होते. त्यांनी अनेक गावे पाहिली होती. त्यांच्या बाजारात ओळखी चांगल्या होत्या. गावोगाव हिंडण्यास योग्य अशी त्यांची प्रकृतीही होती. माझ्या या निवडीचा मला अपेक्षित फायदा झाला. महिन्याला ५० ते १०० सेटसची ऑर्डर श्री. सेलवाणी यांनी सुरुवातीच्या वर्षातच आणली. त्यांच्या शिफारशीवर काही दुकानदारांनी आमचे सेट विकण्याचे कबूल केले. काही लोकांनी स्वतःसाठी हे सेट घेतले. आमची किंमत ही प्रसिद्ध कंपन्यांच्या रेडिओपेक्षा अर्थातच ५० रु. तरी कमी होती.

"श्री. सेलवाणी यांच्या मदतीला मग आम्ही आणखी फिरते विक्रेते नेमले. गावोगावी जमली तेवढी जाहिरात केली. आमची जाहिरात लहान असे. फारशी आकर्षक नसे. पण ग्रामीण भागातील लोक तेव्हा एवढे चिकित्सक नव्हते. तालुक्याच्या सरपंचाकडे आमचा रेडिओ असला की तो पाहून व ऐकून त्या गावातले आणखी ४-५ लोक तरी आमचा रेडिओ घेत. मोठ्या कंपन्यांच्या जाहिरातीही या भागात पोहोचत नसत. १९६७ अखेर आमचा सेल रु. १० लाखांवर गेला होता. आम्ही कंपनीच्या विस्ताराची योजना आखली. नवीन मॉडेल्स निश्चित केली. त्याच्या कॅबिनेटस् व पार्टस्च्या सप्लायर्सबरोबर मोठे करार केले. श्री. सेलवाणी यांचे विक्रीचे बजेट वाढवून दिले. १० लाख रु. वरून ५० लाख रु. वर विक्री नेण्याचा चंग बांधला. पण आमचे नशिबच फिरले !

"प्रसिद्ध कंपन्यांनी लहान कंपन्यांना बाजारांतून उठवण्याचा विडाच उचलला. त्यांनी १०० रु. चा १ बँडचा रेडिओ बाजारात आणला. त्याची खेडोपाडी जाहिरात केली. ठिकठिकाणचे विक्रेते वाढविले. त्यांचे कमिशन वाढविले. आम्हांला त्यांच्यापेक्षा स्वस्त आणि सुबक दिसणारा रेडिओ देणे जड झाले. श्री. सेलवाणींनी ज्या विक्रेत्यांना भरपूर कमिशनवर विकायला सेट दिले ते सर्व विकले गेले नाहीत. नव्या ऑर्डरींचा ओघ थांबला. अडाणी, खेडवळ लोकही प्रसिद्ध ब्रँडचे सेट घेऊ लागले. आणि त्याहून चमत्कार म्हणजे एकीकडे विजेचा प्रसार होत असताना विजेवर चालणाऱ्या रेडिओपेक्षा गळ्यात अडक-विण्याच्या ट्रान्झिस्टर सेटस्ना मागणी वाढली. घरातसुद्धा लोक ट्रान्झिस्टर ठेवू लागले. आमची टेबलाची शोभा वाढविणारी मॉडेल्स लोकांना बोजड वाटतात असे रिपोर्ट यायला लागले. ट्रान्झिस्टर सेटस्मध्ये जाण्याची आमची इच्छा नव्हती. आम्ही त्या दृष्टीने यंत्रसामग्रीही जमविलेली नव्हती. विक्री अपेक्षेप्रमाणे वाढत नसेल तर उत्पादन वाढवून काय फायदा ? श्री. सेलवाणी हे मला वेळोवेळी त्यांच्या अडचणी सांगून सावध करीत होते. मी मोठ्या पेचात पडलो आहे. काय करावे समजत नाही !"

त्यांना असे गोंधळात पडलेले पाहून श्री. मार्केटकर म्हणाले, "हे पहा, मि. संगीतानी, दोष तुमचा नाही की श्री. सेलवाणींचा नाही. आज आपल्या येथे बऱ्याच कंपन्यांची अशी कोंडी झाली आहे. कोणत्याही प्राण्याप्रमाणे उद्योगाच्या किंवा संस्थेच्या वाढीला मर्यादा आहेत. सायकलवरून जाणारा माणूस कितीही जोरात पाय चालवू लागला तरी मोटारीची स्पर्धा करू शकत नाही. त्याला मोटारीतच बसायला पाहिजे. तसे ज्या गोष्टींचा फायदा उठवून तुम्ही धंदा चालू केलात, वाढविलात, त्यांच्या उपयुक्ततेची मर्यादा गाठली गेली असेल. आता तुम्हाला नव्या तंत्रांचा, यंत्रांचा अवलंब करणे काळाच्या गतीमुळे अपरिहार्य आहे.

"विक्री विभागाचेच उदाहरण घ्या. उत्साही व धडाडीचे प्रतिनिधी नेमून सगळ्याच वस्तूंची विक्री होत नाही. आजपर्यंत तुम्ही विक्री कशी होईल, वाढेल याचाच विचार करून चांगले प्रतिनिधी नेमणे, जाहिरात करणे, कमिशन वाढविणे, हे उपाय योजलेत. पण मुख्य गोष्ट म्हणजे बाजाराचा अंदाज, बदलत्या आवडीनिवडींचे निरीक्षण करण्यात

तुम्ही मागे पडलात. गिऱ्हाइकाची नेमकी गरज काय आहे हेच तुम्ही मोजू शकला नाहीत. टेबलावर किंवा भिंतीला लावलेली शोभेची वस्तू म्हणून त्याला रेडिओ हवा आहे की केव्हाही, कोठेही कार्यक्रम, गाणी ऐकविणारी एक वस्तू म्हणून त्याला काहीही चालेल हे तुम्ही पाहिले नाहीत. तुमचे स्पर्धक मोठ्या कंपन्या तुमच्यासारख्यांचे यश पाहून गावच्या बाजारात उतरले व झपाट्यासरशी त्यांनी तुमच्या हातचा धंदा पळविला. यामागे त्यांनी आखलेल्या योजना, त्यांची कार्यपद्धती, पैशाचे पाठबळ यांसारख्या गोष्टी आहेत. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे तुम्ही तुम्हाला करता येईल असा माल खपविण्यासाठी नुसती जबर सेल्समनची फौज उभी केलीत पण मार्केटिंगशास्त्रात अभिप्रेत असलेला सर्वंकष कार्यक्रम न आखल्याने तुमची ही फौज बदलत्या परिस्थितीत निष्प्रभ ठरली. गिऱ्हाइके, त्यांच्या गरजा, आवडीनिवडी, सोयीसुविधा, येथपासून विचार करून कोणता माल करावा, केव्हा विकावा, केवढ्यात विकावा, अशा तऱ्हेची संपूर्ण योजना विचारपूर्वक आखली असतीत तर अशी फसगत झाली नसती. मोठ्या प्रमाणावर धंदा करायचा तर या गोष्टीतही वेळ व पैसा गुंतविणे आवश्यक आहे. अजून तुम्हाला या परिस्थितीतून मार्ग कसा काढावा याची योजना मी महिनाभरात देऊ शकेन पण त्यासाठी सेल्वार्गीसारख्या माणसालाही दूर ठेवण्याचा कटु निर्णय घेणे तुम्हाला कदाचित भाग पडेल. योजनाबद्ध विक्रीचा कार्यक्रम आव्हान स्वीकारून पार पाडणारा मार्केटिंग मॅनेजर घेणे तुम्हाला जरूरीचे आहे. मी स्वत: सेलवार्गीशी यासंबंधी बोलतो व त्यांच्यांत अजूनही नवीन काही शिकण्याची हौस असेल व मला ते योग्य वाटले तर त्यांना एखादा छोटासा ट्रेनिंग कोर्स देऊनही आपण आपल्या अपेक्षेला ते उतरतील का हे पाहू. पण त्यांनी याबाबतीत सर्वांत अधिक बदल स्वीकारण्याची तयारी दाखवायला हवी.

"तुम्हालाही प्रॉडक्शन काय करायचे हे मार्केटिंग खात्याचा रिपोर्ट आल्यावरच ठरवावे लागेल. अन्यथा तुम्ही जे उत्पादन कराल ते नुकसानीत जाण्याची दाट शक्यता आहे."

वरील उदाहरणाप्रमाणेच आपल्या देशात उत्पादनासाठी जी प्रचंड गुंतवणूक अडगळीत पडली तिचा उपयोग करून देशातील तसेच विदेशातील ग्राहकांच्या मागणीप्रमाणे गरजा भागवणारे उत्पादन बाजाराचा नीट अभ्यास करून करता येणे अशक्य आहे का ? यासाठी आवश्यक तेथे थोडीफार नवीन यंत्रे, अवजारे, कच्चा माल वापरात आणणे भाग पडेल. पण ही जादा गुंतवणूक निश्चितच नव्या कारखान्यांच्या उभारणीपेक्षा स्वस्त असेल.

---

## पावसाच्या व्यत्ययाचा विमा

सुटीचे दिवशी बाहेर पडणारांचा पावसामुळे विरस होतो. प्रत्येक दिवसाला ८ रु. विम्याचा हप्ता दिला, तर पाऊस आल्यास ३५० रु. भरपाई देणारे विमे अमेरिकेत लोकप्रिय झाले आहेत.

## लोहमिश्रित मिठाचा कारखाना

आहारात मिठाला किती महत्त्व आहे ते सर्वांना माहीत आहे. मिठाबरोबरच इतर अनेक क्षारांची व खनिजांची चांगले पोषण होण्यासाठी जरूर असते. मीठ हा पदार्थ रोजच्या वापरात असल्यामुळे त्याच्याबरोबर दुसरे एखादे पोषणमूल्य असणारे द्रव्य देता आले तर ते हिताचे ठरणारे आहे. मद्रासमधील एका मिठाच्या कारखानदाराने मिठात लोह मिसळण्याची एक पद्धत शोधून काढली आहे. हिंदमधील लोकांच्या आहाराच्या ज्या पद्धती आहेत त्यांचा विचार करता अशा प्रकारचे मीठ लोकांना फार उपकारक ठरेल असा अभिप्राय युनायटेड एजन्सी फॉर इंटरनॅशनल डेव्हलपमेंट ह्या संघटनेने व्यक्त केला आहे. ह्या संघटनेने मद्रासच्या मीठ-कारखानदाराला संशोधन करण्यास मदत केली होती. पुष्कळशा देशांत आहारात लोहाचे प्रमाण कमी पडल्यामुळे रक्तक्षयासारख्या विकृती उत्पन्न होतात. भारतात लोहमिश्रित मिठाचा कारखाना व्यापारी पद्धतीवर लवकरच सुरू करण्यात येणार आहे. त्यानंतर इतर देशांतही असेच कारखाने निघण्याची शक्यता आहे. लोहमिश्रित नव्या प्रकारचे मीठ डोळ्याने अगर चवीने ओळखता येत नाही; शरीराला मात्र त्याचा उपयोग होतो असा दावा करण्यात आला आहे. मिठात लोह मिसळण्याचे प्रयोग शास्त्रज्ञांनी ह्या पूर्वीही केले होते. परंतु ते यशस्वी झाले नाहीत. कारण मिसळण्यात आलेले लोह मानवी शरीरात मुरण्यासारखे नाही असे आढळून आले. आता तयार करण्यात आलेले लोहमिश्रित मीठ शरीरात सहज मुरते. शिवाय, ह्या मिठाचा रंगही बदलत नाही. रंग बदलला असता तर ते मीठ लोकांनी वापरण्यास हरकत घेतली असती. तसे आता होणार नाही.

---

## आरोग्याच्या मार्गात राजकारणाचा अडसर

जागतिक आरोग्य संघटना स्थापन होऊन २५ वर्षांवर काळ लोटला आहे. परंतु ह्या अवधीत अनेक देशांतील आरोग्यविषयक प्रश्न अधिकच अवघड झाले आहेत अशी माहिती संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ह्या उपसंघटनेने दिली आहे. आपल्या २५ वर्षांच्या कामगिरीच्या अहवालात संघटना म्हणते की १९५० मध्ये जगातील देशांत गुप्तरोगांचे प्रमाण बरेच कमी होते. पण आता अनेक देशांत ह्या रोगांची वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे पुष्कळ देशांत अजूनही हिवतापाचा बंदोबस्त झालेला नाही. जागतिक आरोग्य संघटना ही केवळ तांत्रिक सल्ला देणारी संघटना म्हणून स्थापन झाली. परंतु तरीही संघटनेच्या सभासदांकडून राजकीय कारणांमुळे कामात अडथळे आणण्यात आले. पटकीच्या रोगांविषयी संघटना माहिती देऊ शकली नाही. काही सभासद राष्ट्रांनी आपल्याच देशांतील ह्या रोगाची माहिती पुरविली नाही.

---

## नासिक मर्चंट्स् को-बँकेची अभिमानास्पद प्रगती

नासिक मर्चंट्स् को-बँकेने नागपंचमीच्या शुभ मुहुर्तावर १५ व्या वर्षांत पदार्पण केले.

| | ३०-६-७२ रु. | ३०-६-७३ रु. |
|---|---|---|
| १. भाग भांडवल | २,९६,२०० | ५,४५,००० |
| २. ठेवी | ६४,०६,५०० | १०७,६६,६०० |
| ३. बाहेरून घेतलेली कर्जे | १०,०३,००० | ४,७६,५०० |
| ४. गुंतवणूक | १६,५९,५०० | २१,०२,५०० |
| ५. दिलेली कर्जे | ५४,४१,९०० | ८०,२६,००० |
| ६. खेळते भांडवल | ८३,७४,६०० | १,३२,७५,५०० |

बँकेचा कारणवार कर्जपुरवठा पुढीलप्रमाणे आहे :—

| | |
|---|---|
| १. आद्योगिक कारण | १८,८८,७०० |
| २. आटोरिक्षा | २,११,९०० |
| ३. मोटर सायकल व मोटर | २,६९,००० |
| ४. घरगुती कारण | ४,४७,००० |
| ५. व्यापार | ५२,०९,४०० |
| एकूण | रु. ८०,२६,००० |

बँकेच्या नासिक शहरात पाच शाखा असून गेल्या ८ फेब्रुवारीस सायखेडा येथे बँकेने आपली ६ वी शाखा उघडून ग्रामीण भागांतील नागरिकांची सोय केली आहे. या शाखेनेही अल्पावधीतच रु. ६ लाखांहून अधिक ठेवी मिळवून दिल्या आहेत. सायखेडा शाखेने चांदोरी, शिंगवे, चाटोरी वगैरे आसपासच्या ग्रामीण भागांतील शेतकरीबंधूंना मोटारसायकल्स व त्यांना उपयुक्त अशा कारणांसाठी कर्जपुरवठा करून त्यांचाही विश्वास संपादन केला आहे.

बँकेचा कारभार नाशकातील मान्यवर व्यक्तींच्या हाती असून दैनंदिन व्यवहाराची जबाबदारी नागरी सहकारी बँकांचे अभ्यासक, कुशल संघटक श्री. अण्णासाहेब कुलकर्णी यांनी स्वीकारली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेची वाढ होत आहे. बँकेचे चेअरमन श्री. मामासाहेब शुक्ल व व्हा. चेअरमन श्री. गो. ना. पाठक हे आहेत.

---

## छोट्या शेतकऱ्यांना खतासाठी रोखच मोजावी लागली

देशाच्या निरनिराळ्या राज्यांत रासायनिक खताची मागणी किती आहे आणि त्याचे बाजारपेठांद्वारा वाटप कसे होते ह्या संबंधी भारताच्या रासायनिक खत महामंडळाने एक पाहणी केली आहे. हिमाचल प्रदेश राज्याविषयीच्या पाहणीच्या अहवालाचा भाग प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यावरून असे दिसून आले की तेथील शेतकऱ्यांना खत विकत घेण्यास पुरेसे कर्ज मिळण्याची व्यवस्था नसल्याने खताच्या खपाच्या वाढीला पायबंद बसला. मोठ्या सधन शेतकऱ्यांना मात्र खताचा पुरवठा होऊ शकला.


With over
a thousand branches
CENTRAL BANK OF INDIA
extends to you these facitities
- Open today a Saving Account with only Rs. 5/- and earn interest at 4%
- Save for future. Join our Recurring Deposit Scheme. Minimum monthly interest upto 7%
- Centrals Services are available to you through more than one thousand branches

Contact nearer Branch for further information

DEVELOP
SAVINGS HABIT
THE BEST HABIT

PADMA ADVTS.





बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना
निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना
डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेड्युल्ड बँक
महाराष्ट्रात सर्वत्र शाखा

# तुमच्या मुलीचे लग्न ही काही बाहुला बाहुलीच्या लग्नाइतकी सोपी गोष्ट नाही...



# पण आमच्या आवर्तक ठेव योजनेमुळे ती सोपी होते...

तुमच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तेवढा पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळं खात्रीनं उपलब्ध होतो. दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढतच जाईल. आणि ज्या वेळी तो मंगल दिवस उगवेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल ... आपण किती सुखी आहोत ... पैशाची तर चिंताच नाही.

दर महिन्याला बँकेत ठेवायची रक्कम रु. ५ किंवा त्याच्या पटीत
मुदत : १ ते १० वर्षे
व्याज : ७ टक्क्यांपर्यंत

अधिक तपशीलासाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेट द्या.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

7216 Mar




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, ५ सप्टेंबर, १९७३ | अंक १७




माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

## आईजीच्या जिवावर बाईजी उदार !

### स्टेट बँकेच्या चेअरमनचे बँकेच्या खर्चाने अध्यात्म

स्टेट बँक ऑफ इंडियाचे चेअरमन बँकेच्या कामाच्या आवरणाखाली पाँडिचरीच्या अरविंद आश्रमाच्या वाऱ्या वरचेवर करीत असत, त्याबद्दल त्यांना मी स्वत: खुलासा विचारीन असे आश्वासन अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांना लोकसभेस द्येणे भाग पडले.

स्टेट बँकेने तिच्या चेअरमनच्या अध्यात्मिक वाऱ्यांचा खर्च का सोसावा, ह्या प्रश्नाला अर्थमंत्र्यांनी दिलेली उत्तरे सभासदांना पटली नाहीत. १ ऑगस्ट, १९७० पासून आतापर्यंत चेअरमननी पाँडिचरीच्या आश्रमाकडे अशा रीतीने २४ वाऱ्या केल्या ! मद्रासला दौऱ्यावर जावयाचे आणि तेथून पाँडिचरीची वारी करावयाची, अशी त्यांची पद्धत होती. श्री. चव्हाण म्हणाले, " आश्रमासाठी फंड गोळा करण्यासाठी ह्या वाऱ्या केल्या जात असत, हा आरोप खोटा आहे. चेअरमननी फंड गोळा करण्यासाठी बँकेच्या नोकरवर्गाचा उपयोग केला असल्याचे मला माहीत नाही, परंतु आश्रमाच्या फंडाची काही विनंतिपत्रके चेअरमनकडे वाटण्यासाठी आलेली होती, कारण ते अरविंदांचे आणि माताजींचे भक्त होते. स्टेट बँकेच्या मुंबई येथील नव्या इमारतीच्या इंटीरिअर डेकोरेशनच्या आर्किटेक्ट्सच्या फर्मशी अरविंद आश्रमात राहणाऱ्या एकाचा संबंध होता, हे खरे आहे. नव्या इमारतीमधील फर्निचरवर ३१·३६ लक्ष रु. खर्च झाले, त्यापैकी २·१५ लक्ष रु. चे काम पाँडिचरीच्या आश्रमातील लोकांना देण्यात आले होते. त्यांचे टेंडर सर्वांत कमी रकमेचे होते. 'स्टेट बँकेच्या दिल्ली शाखेतील ६० लक्ष रुपये अनधिकारे काढण्याच्या नगरवाला प्रकरणाची इत्थंभूत माहिती चेअरमनला होती म्हणून त्यांच्या गैरवर्तनाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे' हे श्री. मधु दंडवते ह्यांचे म्हणणे कपोलकल्पित आहे. चेअरमन मद्रासला गेले असताना तेथील ग्रामीण शाखांच्या कारभाराची चौकशी करण्याकडे त्यांनी वेळेचा उपयोग करू नये, असे म्हणता येणार नाही. त्यांच्या कृत्याचे मी समर्थन करू इच्छीत नाही. बँकेच्या कामात त्यांनी इतर गोष्टी मिसळावयास नको होत्या. "


---

**आगगाडीतील दिवे ११० व्होल्टचे करा**--सध्या आगगाडीतले विजेचे दिवे २४ व्होल्टचे आहेत, ते ११० व्होल्टचे करावेत म्हणजे आगीच्या अपघाताचा धोका कमी होईल, असे कमिशनर ऑफ रेल्वे सेफ्टी श्री. सी. आर. सुळे ह्यांनी एका अपघात चौकशीच्या अहवालात सुचविले आहे.

**साखरेच्या उत्पादनात वाढ**--ऑक्टोबर, १९७३ अखेर संपणाऱ्या 'साखर वर्षा'मध्ये साखरेचे उत्पादन ३९ लक्ष टनांवर जाईल अशी अपेक्षा आहे. १९७३-७४ च्या मोसमात ते ४५ लक्ष टन होईल, असा अंदाज आहे.


या कामी बँक ऑफ महाराष्ट्र तुम्हाला जरूर साहाय्य करू शकते. छोटया माणसाच्या साहाय्यासाठी बँक ऑफ महाराष्ट्राच्या अनेकविध योजना आहेत. उच्च शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य ही त्यापैकीच एक योजना आहे. साहाय्य वेळेवर मिळणारे आहे आणि त्याच्या शर्ती सोप्या आहेत. मग त्याचा लाभ का न घ्यावा?

उच्च शिक्षणासाठी पैसा हवाच!



बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ५ सप्टेंबर, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## शेतीच्या संशोधनाची तातडीची गरज

ब्राझिल देशातील स्पॅन पालो ह्या ठिकाणी शेतीविषयक अर्थशास्त्रज्ञांची १५ वी आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्यात आली होती. परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून भाषण करताना जागतिक बँकेचे कार्यकारी संचालक डॉ. एस. आर. सेन ह्यांनी शेती आणि लोकसंख्या नियंत्रण ह्या दोन क्षेत्रांत प्रचंड प्रमाणावर संशोधन करण्याची आणि त्यांचा विकास घडवून आणण्याची तातडीची जरूरी आहे असे सांगितले. ते म्हणाले की गव्हाच्या दर एकरी पिकात आश्चर्यकारक वाढ घडवून आणण्यात यश आलेले आहे. अशीच वाढ इतर बऱ्याच पिकांच्या बाबतीतही साधता येणे शक्य आहे. पण जगातील बहुसंख्य लोक, विशेषतः विकसनशील देशांतील लोक, ह्या बाबतीत स्वतः काही पावले टाकण्याच्या बाबतीत उदासीन दिसून येतात. ही परिस्थिती आहे तोपर्यंत जगातील शेतीचे व अर्थव्यवस्थेचे दीर्घकालीन भवितव्य फारसे आशादायक आहे असे म्हणता येणार नाही. दरम्यान विकसित व श्रीमंत देश जगात ज्या वस्तू व साधने दुर्मिळ आहेत आणि ज्या एकदा वापरल्या की पुन्हा मिळत नाहीत अशा वस्तूंचा व साधनांचा स्वतःसाठी बेसुमार वापर करीत राहतील. त्यामुळे जगाच्या भौतिक परिस्थितीतील समतोल बिघडून जाईल आणि प्रदूषणामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांचे प्रमाण वाढेल. उलट, जे देश अविकसित आणि गरीब आहेत त्यांना मात्र पुन्हा निर्माण होऊ शकणाऱ्या व न होऊ शकणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या संपत्ती-साधनांच्या तुटवड्याला तोंड द्यावे लागेल. ह्या टंचाईत अन्न-पदार्थांचा समावेश असेलच. कारण, अन्नाची त्यांची गरज सतत वाढत जाणारी आहे.

---

## शत्रूची सांकेतिक लिपी : रहस्य फोडण्याचे महत्त्व

युद्धमान देश युद्ध चालविताना आपआपल्या सांकेतिक लिपीचा वापर करीत असतात. दळणवळणाची साधने जुनी होती तेव्हा शत्रुपक्षाच्या एखाद्या जासुदाला पकडून बातम्या मिळविण्यात येत. पण आताच्या शास्त्रीय युगात एकमेकांचे बिनतारी दळणवळण, त्यात वापरण्यात येणारे सांकेतिक संदेश पकडून कामी लावण्यात येते. १९७१ साली झालेल्या भारत-पाक युद्धात भारताच्या सांकेतिक लिपीतज्ज्ञांनी पाकिस्तानच्या सांकेतिक लिपीची माहिती बिनचूक मिळविली. त्यामुळे भारतीय लष्कराला आपले डावपेच आखण्याला खूपच मदत झाली. ढाक्याच्या परिसरात पाकिस्तानच्या लष्कराची कोंडी झाली होती त्या वेळी तेथील पाकिस्तानी सेनापती जन. निआझी आणि त्यावेळचा पाकिस्तानचा अध्यक्ष याह्याखान ह्यांच्यांत बिनतारी संदेशांची देवाणघेवाण चालली होती. भारतीय लष्करप्रमुखांना ह्या दळणवळणाची माहिती मिळत असे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मनीच्या गुप्तहेर संघटनेतर्फे जे संदेश पाठविण्यात येत त्यांपैकी बरेच ब्रिटनच्या सांकेतिक लिपीतज्ज्ञांनी पकडले व महत्त्वाची माहिती मिळविली. महायुद्धात जपानने पर्ल हार्बरवर अचानक हल्ला करून अमेरिकेच्या आरमाराची जबरदस्त हानी केली. पण हा हल्ला तसा अचानक म्हणता येणार नाही. कारण, अमेरिकेच्या सांकेतिक लिपीतज्ज्ञांनी जपानच्या संदेशांचा अर्थ लावून हल्ला होण्याचा संभव स्पष्टपणे वर्तविला होता. परंतु काय असेल ते असो, अमेरिकेच्या संरक्षणखात्याने सदर इशाऱ्याची दखलच घेतली नाही.

---

## परदेशी प्रवासी भारतात कशासाठी येतात ?

परदेशी हौशी प्रवासी भारतात आल्यामुळे देशाला परदेशी चलनाची प्राप्ती होते. उत्पन्नाची एक बाब म्हणून इतर देशां-प्रमाणे भारतही त्यांच्या सुखसोयींकडे प्रवासी खात्यातर्फे लक्ष पुरवितो. पण, प्रवाशांच्या दृष्टीने भारत कसा दिसतो आणि ते येथे का येतात, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. परदेशी प्रवाशांच्या मुलाखती घेऊन त्यांना कोणत्या गोष्टी आकर्षित करतात ते एका पाहणीच्या द्वारे अजमावण्यात आले आहे. त्यावरून असे दिसून आले आहे की प्रवाशांना आकर्षित करणारी अनेक कारणे असली तरी त्यात दोन विशेष प्रधान आहेत. १९७२ साली सुमारे पावणेचार हजार परदेशी प्रवाशांना त्यांच्या आग-मनाच्या कारणाविषयी प्रश्न विचारण्यात आले. प्रश्नांना उत्तरे देताना निम्म्या प्रवाशांनी भारतामधील चांगली हवा आणि नैसर्गिक सौंदर्य ह्यांनी आपण आकृष्ट झाल्याचे सांगितले. काही प्रवाशांनी देशातील सुंदर इमारती, देवळे आणि चर्चे पाहाण्या-साठी आल्याचे सांगितले. काही प्रवाशांनी येथील अतिथ्यशील व स्नेहपूर्ण लोकांनी आपणास येथे आणले असल्याचे सांगितले. त्याशिवाय कित्येकांनी येथील बाजारपेठा, त्यांतील योग्य किमती, चांगले अन्न आणि राहाण्याची सुखपूर्ण व्यवस्था ह्याबद्दल पसंती दर्शविली.

### जगभर अन्नाच्या किमती भडकत चालल्या

जगातील सर्वच देशात अन्नाच्या किमती भयावह रीतीने भडकत चालल्या आहेत. पूर्वेकडील सिंगापूरपासून ते उत्तर अमेरिकेतील सर्वच दुकानदार चढत्या किमती मुकाट्याने पाहात बसले आहेत. इटालीत पाव मिळविण्यापायी दंग्यांनी उसळी घेतली आहे. तेथे मद्याच्या किमती एकाच वर्षात ३२ टक्क्यांनी वाढल्या आहेत. फ्रान्समध्ये मांसाच्या किमती १० टक्क्यांनी वाढल्या असून फळे आणि भाजीपाल्याच्या किमती गेल्या उन्हाळ्यापेक्षा १८ टक्क्यांनी चढल्या आहेत. अमेरिका हा देश धनधान्यसमृद्ध नेहमीच असतो. पण तेथेही अन्नपदार्थांच्या किमती १३·७ टक्क्यांनी वाढल्या. अमेरिकेत ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या ९ दिवसांतच किमती ४·५ टक्क्यांनी वाढल्या. रशिआ, भारत व चीन ह्या देशांत गेल्या दोनतीन वर्षांत पिके मोठ्या प्रमाणावर बुडाली. त्या देशांनी धान्याच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खरेदी केली, त्याचाही परिणाम किमतीवर झाला.

---

### रोमन लोकांच्या विलासी जीवनाची माहिती

रोमन साम्राज्याचा नाश होण्यास जी अनेक कारणे सांगितली जातात, त्यात त्यांच्या स्त्रीविषयक विलासी जीवनाला इतिहासकारांनी मोठे महत्त्व दिले आहे. तथापि त्यांच्या ह्या जीवनाची फारशी माहिती आजपर्यंत जगाला नव्हती. कारण, ह्याविषयीचे प्राचीन ग्रंथ व शिल्पादी साधने वस्तुसंग्रहालयाच्या तळघरात मोठ्या बंदोबस्तात ठेवण्यात आलेली आहेत. आतापर्यंत ह्या साधनांचा उपयोग फक्त कलाकारांनाच करू देण्यात येत असे. परंतु ह्या वर्षी ही सर्व साधने सरळ वस्तुसंग्रहालयात उघड्यावर ठेवण्यात येणार आहेत. नेपल्समधील वस्तुसंग्रहालय ह्या बाबतीत पुढाकार घेणार आहे. गेल्या काही वर्षांत स्त्री-प्रेमविषयक दृष्टिकोनात अभूतपूर्व बदल झाला असताना रोमन लोकांचे एतद्विषयक जीवन बंदिस्त ठेवण्यात अर्थ राहिलेला नाही. मात्र त्याचे दर्शन वयात आलेल्यांनाच घडू शकेल.

---

### मद्याची निर्यात वाढली, आयात घटली

गेल्या काही वर्षांत भारतातून निर्यात होणाऱ्या मद्यात वाढ झाली असून आयातीत मात्र बरीच घट झाली आहे. १९७१-७२ साली भारतामधून १ लाख, ६९ हजार रुपये किमतीचे मद्य निर्यात करण्यात आले होते. १९७२–७३ सालच्या पहिल्या ९ महिन्यांतच १४·३ लाख रुपयांच्या मद्याची निर्यात करण्यात आली. परदेशी आयातीचे आकडे असे आहेत :– १९६९–७० ची मद्याची आयात रु. ४८ लाख, १९७०–७१ ची आयात २९ लाख, १९७१-७२ ची आयात २७ लाख. निर्यात होणाऱ्या मद्यात अधिक हिस्सा बिअर ह्या मद्य प्रकाराचा आहे. बिअरशिवाय इतर प्रकारच्या मद्याचे उत्पादनही भारतात वाढले आहे. त्यामुळे इतर प्रकारच्या दारूची निर्यातही होऊ लागली आहे.





प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर एंजिन- शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**
१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315a

# अनाथ व अपंग ह्यांची गरज भागवून भ. महावीरांच्या संदेशाचा प्रसार

## पांघरावयाच्या १ लक्ष चादरी वाटण्याची योजना

(सौ. कुमुदिनीबाई गोविंदजी दोशी, संपादिका, 'जैनबोधक')

पुणे जिल्ह्यातील घोडनदी येथील स्थानकवासी, वयाने सत्तरी-जवळ आलेले एक दिगंबर जैन धर्मबंधू समाजसेवक श्री. सुखलालजी खाबिया यांनी भ. महावीर २५०० व्या निर्वाण महोत्सवा-निमित्त १० लाख रुपये जैन समाजातून जमवून त्या निधीतून १ लाख पांघरावयाच्या चादरी घ्यावयाच्या, या चादरीवर भ. महावीरांचा संदेश छापावयाचा व या चादरी निधी जमविलेल्या भागातच असलेल्या अनाथ व अपंग लोकांना वाटावयाच्या अशी योजना आखली. आपली ही योजना त्यांनी अनेक आचार्य-मुनींना, मान्यवर मंडळी-नेत्यांना सांगितली, मांडली. यावर विचारविनिमय होऊन ही योजना कार्यप्रवण करण्याचे ठरले. मुंबई येथील "श्री घाटकोपर स्थानकवासी जैन स्वयं-सेवक मंडळ" ने याबाबत पुढाकार घेतला असून परवाच्या भ. महावीरांच्या निर्वाणदिनापासून या मंडळाच्या कार्यकर्त्यांनी या योजनेच्या प्रत्यक्ष कार्यास सुरवातही केलेली आहे. हे कार्यकर्ते छोट्यामोठ्या गावागावांत जातात. त्यांना आपली योजना सांगतात व मिळतील तेवढ्या चादरीचे पैसे घेऊन दुसऱ्या गावी जातात. या योजनेने घराघरातून भ. महावीरांची २५ शे वी शताब्दी असल्याची माहिती होते. त्यानिमित्त घराघरांतून ज्ञान मिळते नी भ. महावीरांच्या संदेशाचा प्रचार, प्रसार होऊन अनाथ-अपंगाची गरज भागते. त्यांना समाजाची सहानुभूती लाभते व चादरीरूपाने ८–१० वर्षेतरी हा संदेश त्या घरात टिकतो. या दृष्टीने श्री. सुखलालजींच्या कल्पकतेचे मला कौतुक वाटले. श्री. सुख-लालजींनी फार मोठा संकल्प सोडला आहे. समाजाच्या दातृत्वा-वर या योजनेची भिस्त असल्यामुळे ही पूर्णपणे यशस्वी होईल का, अशी मनात शंका येते. ती पूर्णपणे यशस्वी होवो अथवा न होवो, जेवढ्या प्रमाणात ती यशस्वी होईल तेवढ्या प्रमाणात ती आपले संदेश-प्रचाराचे काम करणार आहे हे मात्र निश्चित. मला या योजनेप्रमाणेच ही योजना कार्यान्वित करणाऱ्या कार्यकर्त्यांचे व त्यांच्या परिश्रमांचेही कौतुक वाटते आणि या कार्यासाठी ती मंडळी छोट्यामोठ्या गावांतून-शहरांतून जात आहेत, त्यांनी कार्यासाठी हे जे क्षेत्र निवडले त्याचे पण कौतुक वाटते.

'जैनबोधक' २०–८–७३

## व्यापारी बँकांची गेल्या २१ वर्षांतील प्रगती

| | डिसेंबर १९५१ | डिसेंबर १९६८ | जून १९६९ | जून १९७० | जून १९७१ | डिसेंबर १९७१ | जून १९७२ | डिसेंबर १९७२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. व्यापारी बँकांची संख्या | ५६६ | ८६ | ८९ | ८५ | ८० | ८३ | ८३ | ८३ |
| (अ) शेड्यूल्ड | ९२ | ७० | ७३ | ७२ | ७३ | ७४ | ७४ | ७४ |
| (ब) बिगरशेड्यूल्ड | ४७४* | १६ | १६ | १३ | ७ | ९ | ९ | ९ |
| २. भारतातील कचेऱ्या | ४,१५१ | ७,६४८ | ८,२६२ | १०,१३१ | १२,०१३ | १३,९८५ | १३,६२० | १४,७३९ |
| ३. किती हजार लोकसंख्येस एक कचेरी | ८७ ह. | ६९ ह. | ६५ ह. | ५४ ह. | ४६ ह. | ४३ ह. | ४२ ह. | ३७ ह. |
| ४. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी (कोटी रु.) | ९०८·४७ | ४,४७७·९५ | ४,६४६ | ५,२७५ | ६,२१६ | ६,९३८ | ७,५९६ | ८,१४६ |
| ५. दिलेली कर्जे (कोटी रु.) | ६२६·९० | ३,१५८·६७ | ३,५९९ | ४,२१३ | ४,७६३ | ५,०५२ | ५,४६६ | ५,३९८ |
| ६. प्रत्येक कचेरीकडील सरासरी ठेवी (लक्ष रु.) | २२ | ५९ | ५८ | ५३ | ५२ | ५४ | ५६ | ५६ |
| ७. दरमाणशी ठेवी (रु.) | २५ | ८५ | ८८ | ९८ | ११३ | १२५ | १३५ | १४३ |
| ८. दरमाणशी कर्ज (रु.) | १७ | ६० | ६८ | ७८ | ८७ | ९१ | ९७ | ९५ |
| ९. चालू किमतीने राष्ट्रीय उत्पन्नाशी ठेवींचे प्रमाण (%) | ९ | १६ | १५·३ | १५·९ | १७·२ | १९·६ | १९·६ | १९·९ |
| १०. ठेवींशी कर्जाचे प्रमाण (%) | ६९·२ | ७१ | ७७·५ | ७९·९ | ७६·६ | ७२·८ | ७०·८ | ६६·३ |

*रिझर्व्ह बँकेने कमकुवत बँकांचे सुव्यवस्थित बँकांत सक्तीने विलीनीकरण केल्यामुळे अशा बँकांची संख्या झपाट्याने कमी झाली.

# मोठ्या शहरातील व इतर ठिकाणचे बँकांतील शिपाई

( म. ज. राजमाचीकर, बी. कॉम., मुंबई )

"अर्थ" पाक्षिकाच्या दि. १८–७–७३ च्या अंकातील व्यवस्थापकीय समस्या ( ११ ) या शीर्षकाखाली प्रसिद्ध करण्यात आलेला श्री. साखरे यांनी लिहिलेला "बँकेचा शिपाई आणि साहेबाच्या घरचे काम" हा लेख व आर. डी. कुलकर्णी, अ. द. कुलकर्णी व मुक्तीकर यांनी त्यावर मांडलेले विचार ता. १–८–७३ च्या अंकात वाचले. हा ज्वलंत प्रश्न आहे. त्याबद्दल लेखकांचे अभिनंदन.

शिपायाकडून ऑफिसचे काम करवून घ्यावे हे म्हणणे बरोबर आहे. पण माझ्या मते शिपायाचे काम काय, हे प्रथम ठरविण्याची वेळ आली आहे. काही मोठ्या शाखांतून शिपाई बंधूंची लेजर या टेबलावरून त्या टेबलावर नेणे, ऑफिसरने मागितल्यावर ते देणे, दुपारी सबसिडियरी पोस्टिंगकरता टेबलावर काढून ठेवणे, वेळेप्रसंगी फाऊंटनपेनमध्ये शाई नसल्यास ती भरून देणे, टायपिंगकरता टाईपिस्टकडे कागद देणे किंवा टाईप झालेले आणणे, ही कामेसुद्धा अलीकडे न करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. कॅशची छोटी बॉक्स मोठ्या सेफमधून काढून दिल्यावर, कॅश केबीनमध्ये नेणे, हे सुद्धा ऑफीसचे काम असून, ते काम माझे नाही हे म्हणण्यापर्यंत त्यांची तयारी झाली आहे, असो. तेव्हा ही कामे त्यांची आहेत का नाहीत ?

माझ्या मते चांगल्या मनाची माणसे कधीही शिपायांना "अरे–तुरे" म्हणून हाक मारत नाहीत. तर "अहो–जाहो" असे म्हणूनच त्यांना पुकारले जाते. "लेजर रिकामे असले तर आणता का ?" असे विचारले जाते. काही चांगले शिपाई योग्यपणे वागतात. परंतु काही मात्र..........

एका लेखकाने असे लिहिले आहे की, बँकेच्या शिपायाचे म्हणून काम असेल तेच त्याने निमूटपणे व चोख करावे. त्याबद्दल खालीलप्रमाणे अनुभव येत आहे. बँकेत किंवा सेक्शनमध्ये सांगितलेल्या स्टूलावर ते बसत नाहीत. घंटा ऐकली तरी येत नाहीत. लेजर आणावयास सांगितले तर "मी माडीवर जात आहे, खाली जात नाही" म्हणून सरळ सांगून निघून जातात व "वर माडीवर जाणार असल्यास हे कागद घेऊन जा", म्हटले, तर "मी वर जात नाही, खाली जात आहे", असे उत्तर मिळते. पुष्कळ वेळा दुपारी, ऑफिसच्या वेळात, खुशाल ज्युनिअर किंवा सिनीयर ऑफिसरच्या समोर खुर्चीवर बसून गप्पा मारल्या जातात. हे योग्य आहे का ? एखादा ज्युनिअर किंवा सिनीयर साहेब जर जे. जी. एम. किंवा कस्टोडियन साहेबांकडे गेला व त्याला बसण्यास सांगितले नसताना, तो जर बसला, तर ते योग्य दिसेल का ? काही शिपाई तर ऑफिसच्या वेळात खुशाल तंबाखू खात बसलेले असतात. कधीकधी ऑफिसच्या व्हरांड्यात त्यांनी सिगारेट-विडी ओढल्याचे पण पाहण्यात येते. या योग्य गोष्टी आहेत असे वाटत नाही.

याउलट, मोठ्या शहरातले सोडून बाकीचे शिपाई आदबीने, प्रेमाने वागतात. अधिकाऱ्यांकडून नेहमी योग्यतेने वागवले जाते, त्यामुळे काही वेळा ते पण समजुतीने वागतात. एस. टी. चे तिकिट काढून आणून देणे हे काम काही कमी प्रतीचे व हलके समजणे चूक आहे. आपणही आपल्या पाहुण्यासाठी एवढी कामे करतो. पुष्कळ ठिकाणी तेथे राहात असलेले स्थानिक रहिवासी ओळखीचे असतात, माहिती असते व त्यामुळे काम लवकर होते. कार्डे, पाकिटे आणा किंवा टाका, एखाद्या वेळेस काही ठिकाणी लॉन्ड्रीतून कपडे आणा म्हणणे चूक आहे असे वाटत नाही. या साध्या गोष्टी करण्यास शिपायांची काही हरकत असू नये.

घरची वेडीवाकडी कामे कोणी सांगू नयेत. परंतु थोडक्यात म्हणजे जर दोघांची रिलेशन्स चांगली असतील तर घरातील कामे करण्यास हरकत नाही. मुलांना शाळेत पोचवणे, कपडे आणणे, चहा घरातून बाहेरील खोलीत आणणे, वगैरे कामे कमी दर्जाची नाहीत, हे निश्चित आहे.

---

## काटकसरीचा नौकऱ्यांवर परिणाम

भारतामधील बेकारांना वाईट दिवसांना तोंड द्यावे लागणार असे दिसते. चालू वर्षात ५ लाख बेकारांना रोजगार पुरविण्याची मोठी योजना मध्यवर्ती सरकारने आखली होती. परंतु देशातील भडकत्या किमती लक्षात घेऊन सरकारने आपल्या खर्चात काटकसर करण्याचा निर्णय घेतला आहे. ह्या काटकसरीचा परिणाम रोजगार पुरविण्याच्या योजनेवर होण्याचा चांगलाच संभव आहे. राज्यांना खास मदत देण्याच्या योजनाही हाती घेण्यात आल्या होत्या. ह्या योजनांवरही काटकसरीची कुऱ्हाड चालविली जाण्याची शक्यता आहे. म्हणजे, भडकलेल्या किमती आणि बेकारी ह्यांचा एकच डोंब उसळणार असे दिसते.

---

## आयात कापडाचा चोरटा बाजार

मुंबईमधील मुळजी जेठा आणि मंगळदास ह्या घाऊक कापड मार्केटांशेजारी 'फॉरेन' कापडाचा बाजारच निर्माण झाला आहे. तेथे जपान, जर्मनी, इंग्लंड, हॉंगकॉंग व चीन येथून चोरट्या मार्गे आलेले कापड उघडपणे विकले जाते. तेथील मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापाऱ्यांनी स्वतःचा धंदा बंद करून सहा चौरस फुटी छोटी दुकाने अशा व्यापारासाठी उघडली आहे. त्याचे दरमहा भाडे ९०० रु. असते. दुकानाबाहेर हा चोरीचा माल टांगून गिऱ्हाइके आकर्षिली जातात; दुकानांच्या 'खऱ्या' मालकांनी अधिकाऱ्यांचा 'बंदोबस्त' केलेला असतो.

---

# स्वातंत्र्यसैनिकांसाठी शासनाच्या मदत योजना

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात ज्यांनी पराकाष्ठेचा स्वार्थत्याग केला व अपरंपार कष्ट सोसले अशा स्वातंत्र्यसैनिकांचे अपार ऋण आपणा सर्वांवर असून ते कधीच फिटण्यासारखे नाही. तथापि त्यांनी केलेला त्याग व सेवा यासंबंधी आदर व्यक्त करण्यासाठी व त्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाकडून सन्मान-पत्रे, आर्थिक अनुदाने, नोकरीविषयक सवलती, जमीनविषयक सवलती, शैक्षणिक सवलती, वैद्यकीय व इतर सवलती व केंद्र शासनाकडून निवृत्तिवेतन व ताम्र-पत्रे दिली जात आहेत.

याप्रमाणे महाराष्ट्रातील ८,४४० स्वातंत्र्यसैनिकांना राज्य शासनाकडून सन्मान-पत्रे देण्यात आली असून, एकरकमी आर्थिक साहाय्य म्हणून ११,४५० स्वातंत्र्यसैनिकांना राज्य सरकारने विविध रकमा दिल्या आहेत. तसेच २,३०७ स्वातंत्र्यसैनिकांना ५० रुपयांप्रमाणे मासिक निवृत्तिवेतन मंजूर करण्यात आले आहे.

१९६५ पूर्वी शासनातर्फे स्वातंत्र्यसैनिकांना बहुधा एकरकमी अनुदान देण्यात येत होते. काही प्रकरणात ठराविक मुदतीसाठी मासिक वेतनाच्या स्वरूपातही आर्थिक अनुदान देण्यात येत होते. १९–११–१९६५ च्या शासन निर्णयानुसार गरजू स्वातंत्र्यसैनिकांना दरमहा ५० रुपयांप्रमाणे आजन्म मासिक वित्तीय साहाय्य देण्याचे ठरले. शासकीय सेवेत तृतीय व चतुर्थ श्रेणीत भरती करताना स्वातंत्र्यसैनिकांकडून आलेले अर्ज विचारात घेतले जातात. त्यांच्या भरतीच्या बाबतीत अनेक अटी शिथिल केल्या आहेत. स्वातंत्र्यसैनिकांना महसूल व वनविभागातर्फे शेतीकरिता, घर बांधण्याकरिता किंवा उद्योगधंद्याकरिता सरकारी जमिनी दिल्या जातात.

स्वातंत्र्यसैनिक, त्याची पत्नी, मुले व नातवंडे यांना प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी सवलती दिल्या जातात. सवलतींमध्ये शिष्यवृत्त्या, पुस्तकासाठी अनुदान, फी माफी, सरकारी वसतिगृहात विनामूल्य प्रवेश, मान्यताप्राप्त शाळांतून प्रवेश, यांचा समावेश होतो. मासिक उत्पन्न रु. ३०० पेक्षा कमी असणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकानांच ह्या सवलती दिल्या जातात. गृहनिर्माण मंडळाने बांधलेल्या घरांच्या वाटपामध्ये स्वातंत्र्यसैनिकांकरिता अडीच टक्के गाळे राखून ठेवले जातात. रु. ३०० पेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना शासकीय इस्पितळामध्ये मोफत वैद्यकीय तपासणीची व मोफत औषधोपचाराची सोय केली जाते. स्वातंत्र्यसैनिकांना, भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना व दिवंगत स्वातंत्र्यसैनिकांच्या वारसांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सन्मान-पत्रे देण्यात येतात.

### केंद्र शासनाची योजना

ऑगस्ट १५, १९७२ म्हणजे स्वातंत्र्याच्या २५ व्या वर्धापनदिनापासून केंद्र शासनाने स्वातंत्र्यसैनिकांसाठी आपली योजना अमलात आणली. या योजनेनुसार स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी कमत कमी सहा महिने कारावास भोगला त्यांना, तसेच जे स्वातंत्र्यसैनिक हयात नाहीत अशांच्या गरजू कुटुंबीयांना निवृत्तिवेतन देण्यात येते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवन बलिदान करून जे हुतात्मा बनले आहेत अशा स्वातंत्र्यसैनिकांची कुटुंबेदेखील निवृत्तिवेतनासाठी पात्र आहेत. स्वातंत्र्यसैनिकांची आर्थिक परिस्थिती तसेच राज्य सरकारकडून काही आर्थिक मदत मिळत असल्यास ती लक्षात घेऊन केंद्रशासन स्वातंत्र्यसैनिकांचे निवृत्तिवेतन ठरविते. हे मासिक निवृत्तिवेतन स्वातंत्र्यसैनिकांच्या बाबतीत रु. २०० व त्यांच्या कुटुंबाच्या बाबतीत १०० ते २०० रुपये इतके दिले जाते.

ज्यांनी सहा महिने कारावास भोगला आहे अशा सर्व स्वातंत्र्यसैनिकांना, मग ते निवृत्तिवेतनास पात्र असोत किंवा नसोत, केंद्र शासनाची ताम्र-पत्रे दिली जातात. ऑगस्ट १५, १९७३ रोजी भारताच्या राजधानीत पंतप्रधानांच्या हस्ते राज्यातील ९२ स्वातंत्र्यसैनिकांना ताम्र-पत्रे देण्यात आली. त्याच दिवशी मुंबईमध्ये राज्यातील २५० स्वातंत्र्यसैनिकांना मुख्य मंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या हस्ते ताम्र-पत्रे देण्यात आली.

राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्याच्या ठिकाणी ताम्र-पत्रे देण्याचा कार्यक्रम २५ व्या वर्धापन वर्षाच्या काळात अयोजित करण्यात येऊन त्या त्या जिल्ह्यातील स्वातंत्र्यसैनिकांना भारत सरकारची ताम्र-पत्रे देण्यात आली आहेत.

---

### अमेरिकेतील राहणीचा दर्जा अत्युच्च


अमेरिकेच्या डॉलरचे अवमूल्यन झाले, तेथील महागाई वाढत आहे,तरी अमेरिकन नागरिक इतर कोणत्याही देशाच्या नागरिकापेक्षा सुस्थितीत आहे. मोटारी, टेलिव्हिजन, टेलिफोन ह्यांच्या मालकीच्या बाबतीत तोच अग्रेसर आहे. दर हजारी डॉक्टरांची संख्या ऑस्ट्रिया व इटली वगळता, अमेरिकेतच जास्त आहे. दर माणशी उत्पन्न अमेरिकेत सर्वांत जास्त म्हणजे ३,२३० डॉलर्स आहे; कॅनडात ते २,४५० डॉलर्स, प. जर्मनीत १,९१० डॉलर्स, फ्रान्समध्ये १,८७० डॉलर्स आणि जपानमध्ये १,२३० डॉलर्स आहे. (हे आकडे १९७१ चे आहेत)

अमेरिकेत प्रत्येक १,००० नागरिकांगणिक ५८७ टेलिफोन्स आहेत; कॅनडात ४५२, ग्रेटब्रिटनमध्ये २६७ आणि जपानमध्ये २५१ आहेत. अमेरिकेत प्रत्येक १,००० नागरिकांगणिक ४३२ मोटारी आहेत. कॅनडात ३१२, फ्रान्समध्ये २४५, ग्रेटब्रिटनमध्ये २१३ आणि जपानमध्ये ८५ आहेत.

अमेरिकेत प्रत्येक १,००० नागरिकांगणिक ४१२ टेलिव्हिजन सेट्स् आहेत. स्वीडनमध्ये ३१२, कॅनडात २९४, ग्रेटब्रिटनमध्ये २९३, व जपानमध्ये २१५ आहेत.

---





"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.**

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" 
दूरध्वनी : मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं. १:-२६०३०६, नं. २: २९०००६

राज्य सहकारी भूविकास बँक व राज्यातील तिच्या २५ जिल्हा शाखा यांच्यामार्फत तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच ट्रॅक्टर व जमीन-सुधारणेकरिता कर्ज-वाटप करण्यात येते. जून १९७२ अखेर बँकेचे भागभांडवल ९ कोटी ३० लाख, गंगाजळी ८३ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ५७ कोटी व येणे कर्ज १२१·२२ कोटी आहे.

डी. एस. जोशी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

# आले, आले, चिकित्सक आले !

लेखक : विजय गोखले

एका कंपनीची अधिकारी मंडळी सहलीला गेली होती. थंडीचे दिवस होते. शेकोट्या पेटवण्यासाठी लागणारी लाकडे जमवली, पालापाचोळाहि गोळा केला आणि दिली एक काडी लावून–झोंबणारी थंडी, वाजणारे दांत व निबर अंधाराचा पडदा जरा बाजूला झाला. अन् प्रत्येकजण आपापले नगारे शेकू लागला. त्या वेळी एकाने किस्सा सुनावला :–

"एक राजा होता. राजा आला की संस्थान आले, प्रजा आली, राणी आली, हत्ती, अंबारी, घोडागाडी, राजवाडा वगैरे सर्व गोष्टी ह्या ओघाने आल्याच. शिवाय प्रधानमंडळ असायलाच पाहिजे. सल्लागार मंडळांत मामासाहेबही येणारच, खुषमस्करे आहेतच—असे हे सर्व आहे – धरूनच गोष्टीला प्रारंभ करतो. राजाचे राज्य चालू ( ? ) होते. राज्यांत सर्वत्र आबादीआबाद होती. राजाचा लौकिक मोठा होता, त्यामुळे पाहुणे मंडळींची वर्दळहि बरीच होती. इन् फॅक्ट त्यामुळेच राजाला राज्य चालवण्यास फारसा वेळ मिळत नसे. अर्थात् राजाला थोडाच राज्यकारभार बघावयाचा असतो. प्रधानमंडळ ते कशासाठी ?

"राज्याची मिळकतहि चांगली होती अन् खर्चालाही भरपूर वाटा होत्या, म्हणजेच सढळ हाताने कारभार चालू होता. ( आयजीच्या जीवावर बायजी ...). राज्याचा विस्तारही वाढत होता ( प्रजा हो ! ) आणि राजाचे सरदार लोकही वाढत होते. प्रत्येकाला राजाने निरनिराळी गावे इनाम म्हणून दिली होती, आणि ते सरदारही आपापल्या इनामगावी खुशीत होते व राजाला खजिना भरावयाला ( की रिकामा करावयाला ) मदत करत होते.

"पुढे एकदा राजाच्या स्वप्नांत आले की आपले राज्य ( अशा कारभारापायी ) खालसा होणार ! अन् त्याचा धसका जो राजाने घेतला तो त्यातच आजारी झाला. राजा काही खाईना, पिईना. राजाचे कशातच लक्ष लागेना, राजा कृश व्हावयास लागला व अंथरुणाला खिळला. बरे, राजपुत्रांना राज्यावर आणावे तर ते लहानच होते, मोठी पंचाईत आली. तेव्हा राजाच्या नात्यातील तरुणाला तात्पुरते सर्वाधिकार देऊन राज्याची देखभाल प्रधानमंडळाच्या सल्ल्याने बघण्यास सांगितले, आणि राज्यातील धन्वंतऱ्यांना बोलावले, पण काही उपाय चालेना अन् कोणाला राजा कशामुळे आजारी झाला हेही कळेना. हा–हा म्हणता ही बातमी शेजारच्या राज्यात पसरली, अन् मग त्यातील एका राजाने आपल्या राज्यातील खास चिकित्सकांचे ( Consultants ) पथक पाठवले. अर्थात् ही बातमी कोणालाच माहिती नसावी.

शाही पाहुणे येणार ! शाही पाहुणे येणार !!

शाही पाहुण्यांना आणण्यासाठी गणपतराव हे खास राजदूत विमानतळावर पाठवण्यात आले होते अन् त्यांचे भव्य स्वागत करून त्यांना राजवाड्यावर आणले होते. राज्यातील सारी सरकारदरबारी मंडळी, सरदारलोक, प्रधानमंडळ हे आपल्या ठेवणीतील दरबारी पोषाखासह हजर होते. ह्या दरबार मंडळींशी ओळखीचा वगैरे कार्यक्रम होऊन खान्यानंतर पाहुणेमंडळी खास विश्रांतिगृहात परतली होती. राजेसाहेबांचा खास हुजऱ्या भाऊराव त्यांच्या दिमतीला दिला होता.

... इकडे संस्थानचे अमात्य – सत्यव्रतराव हिशोबनीस बरेच बेचैन झाले होते. हे शाही पाहुणे कोण व कशासाठी आले आहेत ? मुलाखतीत तर त्यांनी ' राज्याचा सारा काय ? सरदार लोक किती ? खर्चाचे अंदाजपत्रक काय ? ' वगैरे प्रश्न विचारले, म्हणजे काय ? – आम्ही मोबदला देऊ शकणार नाही अशी त्यांची समजूत आहे की काय ? – अन् त्यातून मामासाहेब गायब – काय प्रकार आहे हा ?

स्वयंभू सेनापती – रामराव तर मुठी आवळून – कोणत्या भाषेत बोलावे ह्याच संभ्रमात होते – अहो ! हे राजाला तंदुरुस्त करावयास आले का आमचे सैन्य किती ? का – त्यावर खर्च किती ? – का–शस्त्रागारावर खर्च काय ? अन् तो राज्यकारभारासाठी आणलेला का – आलेला – नवतरुण तर त्या शाही पाहुण्यांना आकड्याची महिती सांगत होता – ही काय फंद-फितुरी आहे ? आम्ही तलवारीशी तलवार लावणारे – संगिनीशी संगिनी भिडवणारे – आम्हाला – आम्हाला ह्यातलं काय कळणार ! कमाल आहे झालं !!

कोठीत माल किती ? मालाचे वाटप कसे होते ? – हे काय प्रश्न झाले ? मी नारायणराव कोठीवाले जिवंत असेपर्यंत ह्या उपऱ्यांना येथे बिलकुल थारा देणार नाही. म्हणे मुलाखती स्वतंत्र घेण्यात येतील – त्या कशापायी ? अहो ! कोठीत आली ती आवक आणि बाहेर गेली ती जावक – राजेसाहेबसुद्धा आम्हाला असले प्रश्न विचारत नाहीत, त्यांना आम्ही जन्मापासून पाहातो आहे. बालपणापासून तर आम्ही एकत्रच वाढलेलो ! – काय हेच का आमच्या सेवेचे फळ !

कधीहि न संतापणारे राजवैद्य – आनंदराव ढोले तर ह्या मुलाखतीनंतर ज्वालामुखीसारखे तप्त झाले होते. ह्यांना जरी धन्वंतरी विद्या येत नव्हती तरी हातचलाखीवर ते वेळ मारून नेत असत अन् त्यामुळेच राजमर्जीतील खास ! ह्यांची ख्याती अशी की रोगी जगला तर ह्यांच्याच औषधाने – पण चुकून मेला ( हेच नेहमी व्हावयाचे ) तर त्याच्या कर्माने ! अर्थात् लोकांची नाडी –( अप्रत्यक्ष ह्यांच्याच हातात ) परीक्षा करण्यांत तरबेज असल्यामुळे वैद्यकीय कामाबरोबरच त्यांना राज्यातील हेरगिरीचे काम ( चोराची पावले चोरालाच ओळखणार – ह्या तत्त्वावर ) सोपवले होते. परंतु नव्या पाहुण्यांच्यामुळे त्यांच्यावर गदाच आली होती, अर्थात् एका बाजूने बातमीवर बातमी काढून ते राज्यात प्रसृत करत होतेच, अन् ती राजाच्या कानापर्यंत जाईल हेही पाहाण्यास विसरत नव्हते – पण छे ! हे अरिष्टच !! ...

वरील स्वगते चालू होती तरी सुद्धा राजाज्ञेपुढे मान तुकवणे हे सर्वांचे आद्य कर्तव्यच नाही का ? आणि म्हणूनच ही मंडळी इमानेइतबारे ह्या चिकित्सकांच्या कामात मोठ्या उत्साहाने मदत करत होती. राज्यातील सर्व भागांतून हे शाही पाहुणे जाऊन प्रत्येक सरदाराकडून काहीतरी माहिती गोळा करून आणीत होते. म्हणता म्हणता माहितीचा हा ढीग झाला, कागदाची उंची तर मोजता न येण्यासारखी झाली. भाऊरावाला तर ती नीट व व्यवस्थित लावून देण्यापुढे फुरसतच मिळत नव्हती. एक मात्र निश्चित ती माहिती वाचून, नीट लावल्यामुळे व शिवाय चिकित्सकांच्या दिमतीला राहिल्यामुळे भाऊरावाला ती माहिती इतकी मुखोद्गत झाली होती की ते भर दरबारात पोपटपंची केल्याप्रमाणे सर्वांना ऐकवत होते.

—असो. शेवटी त्यांनी ती माहिती पेटाऱ्यात भरून ठेवली अर्थात् हे सर्व कशासाठी ह्याची जिज्ञासा तशीच राहिली, कारण एक दिवस ते बांधलेले पेटाऱ्यासुद्धा शाही पाहुणे पसार झाले. पुढे काय ?—

मित्र हो ! आपण सर्व सुज्ञ आहात, कालचाच गोंधळ आजच्यापेक्षा बरा म्हणण्याची पाळी येऊं नये ही इच्छा ! राहून राहून वाटते की सर्चाला आणखी एक तोंड फुटले...... पण कुणाच्या खिशातून थोडेच सर्च होणार आहेत! तेव्हा तापलेल्या भट्टीत सारा दोन लाकडे, तेवढीच थंडी कमी भासेल......

---

## बाटा कंपनीच्या शेअर्सना प्रचंड मागणी

बाटा इंडिया लिमिटेडने प्रत्येकी १० रुपयाचे ६,००,००० शेअर्स प्रत्येकी २० रु. वाढाव्याने (म्हणजे प्रत्येक १० रु. च्या शेअरला ३० रु. ह्या दराने) विक्रीस काढले होते. कंपनीकडे १,०७,४८,४९० शेअर्सची मागणी करणारे ८१,११४ अर्ज आले, म्हणजे विक्रीस काढलेल्या शेअर्सच्या १८ पट शेअर्ससाठी मागणी आली.

---

**वीजकपातीमुळे ६५ कोटी रु. चे उत्पादन कमी झाले**— महाराष्ट्रातील गेल्या सहा महिन्यातील वीजकपातीमुळे सुमारे ६५ कोटी रु. चे उत्पादन कमी झाले.

**औद्यौगिक उत्पादनात सुधारणा नाही**— १९७३ सालातील औद्योगिक उत्पादनाचे चिन्ह फारसे आशादायक नाही. १९७१ च्या मानाने १९७२ साली उत्पादन ७·१% अधिक झाले होते. पण चालू वर्षीचे उत्पादन फारसे वाढणार नाही.

**निर्गतीचा उच्चांक**—१९७२–७३ मध्ये भारताने १,९६२ कोटी रु. किमतीच्या मालाची निर्गत केली. १९७१–७२ मधील निर्गतीपेक्षा ही निर्गत २२% ने अधिक आहे. कातडी, कपास-कापड, तयार कपडे, इंजिनिअरिंग कारखान्यांचे उत्पादन, ह्यांच्या निर्गतीत विशेष वाढ झाली.

## हिंदच्या अर्थव्यवस्थेविषयी ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांची चिकित्सा

हिंदच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीबद्दल ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांची मते लंडनमधील वृत्तपत्रांतून आणि ब्रिटिश नभोवाणीवरून व्यक्त करण्यात आली. ते म्हणतात की, पाकिस्तानशी १९७१ साली झालेल्या युद्धात जय मिळाल्यानंतर भारतात सर्वत्र उत्साहाचे वातावरण पसरले होते ते जितके कृत्रिम होते तितकीच सध्याची निराशाही अतिरंजित आहे. तथापि भारत सध्या आर्थिक संकटात सापडला आहे ह्यात शंका नाही. शेतीच्या उत्पादनात घट झाली आहे. औद्योगिक उत्पादन थबकलेले आहे. सर्वत्र टंचाई भासत आहे आणि गेल्या वर्षात किमती २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. गेल्या दोन वर्षांत भारताच्या शेतीच्या उत्पादनात त्यामागील काळाप्रमाणे सुधारणा झाली नाही. बांगला देशात झालेल्या युद्धानंतर सरकारी खर्चात फार वेगाने वाढ झालेली आहे. त्यामुळे उपलब्ध साधनांवरील ताण एकदम खूप वाढला. हरित क्रांतीमुळे जितका फायदा झाला असे सांगण्यात येते तितका तो झालेला नाही. ह्या क्रांतीचा फायदा घेण्याची संधी नीट साधून घेण्यात आली नाही. हरित क्रांती यशस्वी होण्यासाठी रासायनिक खते, कीडनिवारक औषधे आणि योग्य वेळी पाण्याचा पुरवठा ह्यांची आवश्यकता असते. पण ह्या बाबतीत योग्य ते प्रयत्न करण्यात आले नाहीत. शिवाय शेतीत गुंतविण्यात येणारे भांडवल पूर्वीप्रमाणेच थोडे होते. त्याच वेळी ज्या कारखान्यांपासून दीर्घ कालावधीत दृश्य फळ दिसू लागेल अशा प्रकल्पात मात्र मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतवणूक करण्यात आली. जमीनधारणेच्या व्यवस्थेत सुधारणा करण्याची वचने वेळोवेळी देण्यात आली. त्यांच्या सद्हेतुबद्दल शंका घेण्याचे मुळीच कारण नाही. परंतु सुधारणांची अमलबजावणी चांगली झाली नाही. बऱ्याच जमीनधारणेच्या सुधारणा स्थानिक हितसंबंधीयांच्या विरोधामुळे प्रत्यक्षात केल्या गेल्या नाहीत. ह्याचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर झाला.

---

## जागतिक बाजारातील भारताचा वाटा कमी झाला

जागतिक बाजारातील भारताचा वाटा १९६२ मध्ये १·१२% होता, तो १९७२ मध्ये ०·६७% वर आला. विकसित देशांचा वाटा १८·६% ने वाढला, तर अविकसित देशांचा वाटा ५·१% ने वाढला. भारताच्या निर्गतीत अद्यापही चहा, तंबाखू, पेंड, काजू, खनिजे, कापड, ताग, इत्यादींचाच मुख्यतः समावेश आहे. ह्या सर्वांच्या मागणीत आणि किमतीत नेहमी चढउतार होतो. औद्योगिक उत्पादनाची निर्गत वाढविणे महत्त्वाचे झाले आहे. परंतु, देशातल्या देशातच मागणीच्या मानाने पुरवठा कमी आहे. निर्गतीची किंमत वाढत आहे, एवढ्यावर समाधान मानण्याजोगी परिस्थिती नाही.

---

## गिरण्यांची रोजची १० कोटी रु. काळ्या पैशाची कमाई

"कापसापासून स्वतःच सूत काढून कापड बनविणाऱ्या गिरण्या दररोज १० कोटी रु. ची काळ्या पैशाची कमाई करतात. देशातील ७०० 'कॉंपोझिट' गिरण्यांचे रोजचे उत्पादन ५०,००० किलोग्रॅम एवढे आहे. गिरण्यांच्या विक्रीत प्रत्येक किलोग्रॅमवर बिलात न दाखविलेले ४ ते ५ रु. घेतले जातात. म्हणजे, प्रत्येक गिरणी काळ्या पैशाची २ लक्ष रु. ची. कमाई दररोज करते." ऑल इंडिया पॉवरलूम्स फेडरेशनने वरील प्रकारची तक्रार पंतप्रधानांकडे एका लेखी निवेदनात केली आहे. नॅशनल टेक्स्टाइल्स कॉर्पोरेशन किंवा राज्यांच्या टेक्स्टाइल्स कॉर्पोरेशन्सच्या नियंत्रणाखालील गिरण्याही ह्या कमाईला अपवाद नाहीत, त्याही वाढव्याची रकम गुप्तपणे घेतात, असा फेडरेशनचा आरोप आहे.

---

## ४१ लक्ष लोकसंख्येला ५६ लक्ष माणसांचे रेशन!

दिल्लीची लोकसंख्या ४१ लक्ष आहे, पण तेथील रेशन युनिट्सची संख्या ५६ लक्ष आहे! 'अर्ज द्या आणि रेशनकार्ड घेऊन जा' ह्या अर्जाची छाननी न करताच रेशनकार्डे देण्याच्या नव्या योजनेचा हा परिणाम आहे.

---

**सहकारी सोसायट्यांच्या निवडणुका** — महाराष्ट्र राज्यातील सहकारी सोसायट्यांच्या ज्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या होत्या, त्या ३० नोव्हेंबर पूर्वी करण्यात आल्या पाहिजेत असे महाराष्ट्र सरकारने ठरविले आहे.

## परवाने न घेणारे टेलिव्हिजनचे मालक

रेडिओ व टेलिव्हिजन सेट्स जवळ बाळगणाऱ्यांना पोस्ट खात्याकडून परवाने घ्यावे लागतात आणि ते सालोसाल चालू ठेवावे लागतात. परवाने न घेता त्यांचा वापर करणे गुन्हा आहे. तरीही शेकडो लोक असे गुन्हे करीत असतात. रेडिओचा परवाना नसताना रेडिओ वापरल्याबद्दल कधी कधी दंड झाल्याचे वृत्त येते. टेलिव्हिजनच्या बाबतीत अशीच परिस्थिती आहे. टेलिव्हिजन पडदे तयार करणाऱ्या कारखानदारांच्या माहिती-प्रमाणे १९७२ च्या आक्टोबरपासून १९७३ च्या मार्चपर्यंत मुंबईत ५० हजार टेलिव्हिजन सेट्स विकण्यात आले. ह्या सर्वांना परवाने आवश्यक होते. पण पोस्टमास्तर जनरलने दिलेल्या माहितीप्रमाणे ह्या काळात फक्त १९ हजार टेलिव्हिजनचे परवाने देण्यात आले. समाजातील सधन लोक सरकारी देणे कसे चुकवितात ह्याचा हा एक अलीकडील नमुना आहे. वास्तविक टेलिव्हिजनच्या किमतीच्या मानाने परवाना फी अल्प आहे.

---

**पेट्रोलचे रेशनिंग होणार** — पेट्रोलचे रेशनिंग लवकरच केले जाईल, असे समजते. सर्व खासगी वाहनांच्या पेट्रोलमध्ये ४०% कपात केली जाईल; टॅक्सींना १६% कपात लागू होईल आणि स्कूटर्स व मोटरसायकली ह्यांना रेशनिंग लागू केले जाणार नाही असा अंदाज आहे. पेट्रोलची किंमत दर लिटरला १० पैसे ह्यापूर्वीच वाढविण्यात आली आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे 30

म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं
या कारणे मी साउली । न संडीं तुझी ॥ — श्री ज्ञानेश्वरी

**स्वातंत्र्यदिनाच्या मंगल प्रसंगी**

**आमचे भागधारक, ठेवीदार व हितचिंतकांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा !**

शुभ्र दाणेदार साखरेचे, रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरीटचे व उच्च प्रतीच्या
देशी व विदेशी (IMFL) मद्याचे उत्पादक

**भारतीय स्वातंत्र्याचा जयजयकार असो !**

फोन : ५८०९५ — पुणे
ग्रॅम : श्री — पुणे

ज. चं. आगाशे,
ज्ञा. चं. आगाशे,
जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सेनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और सावालय आदि में से कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायऑक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन: कार्यालय: २५२३७१ कारखाना: ८७६१०६


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, १९ सप्टेंबर, १९७३ | अंक १८

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड






स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

TF

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

# यथा राजा, तथा प्रजा

'यथा राजा, तथा प्रजा', अशी एक म्हण आहे. राजा जसा बरा वाईट असेल, तशी त्याची प्रजा बनते, असा ह्या म्हणीचा अर्थ आहे. भारत हा प्रजासत्ताक देश आहे, राजेरजवाड्यांना आपण नष्ट केले आहे. परंतु, नवे राजे निर्माण झाले आहेत, ते म्हणजे राज्यकारभार करणारे मंत्री आणि उद्योगधंद्यातील उच्च अधिकारी – मग ते उद्योगधंदे प्रायव्हेट सेक्टरमधील असोत की पब्लिक सेक्टरमधील असोत. अशा श्रेष्ठींचे वर्तन संशयातीत असले तरच त्यांच्या वक्तव्यांची इतरांवर छाप पडणार; तरच ते इतरांना सुधारणार. परंतु ह्या बाबतीत अत्यंत शोचनीय स्थिती आहे. श्रेष्ठींना उधळपट्टी आणि चैन ह्यांवरील खर्च अधिकृत रीत्या खर्ची टाकता येतो, ह्यामुळे ते कायद्यातून सुटू शकतात. लहान असामींना असा अधिकार नसल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष अफरातफर करूनच गैरमार्गाचा अवलंब करावा लागतो. श्रेष्ठी लोकांपैकी काहीजण अफरातफरही पचवितात.

ह्या बाबतीत दोन अखिल भारतीय प्रचंड आर्थिक संस्थांच्या चेअरमननी संस्थांतील आपल्या स्थानाचा कसा दुरुपयोग केला, ह्याची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. त्यांचे वर्तन किती निरंकुश झाले आहे, हे त्यावरून दिसून येते. गेल्या अंकात एका चेअरमनची तर ह्या अंकात दुसऱ्या चेअरमनची हकीकत दिली आहे. सरकारी आणि निमसरकारी, त्याचप्रमाणे खासगी संस्थांतही असेच वारे वाहू लागले आहे. काही नैतिक बंधने पाळायला हवीत, असे श्रेष्ठींनाच वाटत नसले, तर कर्मचाऱ्यांना तरी नैतिक बंधने पाळण्याचा उपदेश कितपत परिणामकारक होणार ? सामान्य माणसांनीच मोठ्यांना धडे शिकविण्याची पाळी आता येऊ लागली आहे पण त्यातून अराजक निर्माण होण्याची भीती आहे.

दोन आठवड्यांपूर्वी मुंबईतील एका बड्या बँकेच्या अत्युच्च अधिकाऱ्यांच्या केबिनसमोर बँकेच्या कर्मचाऱ्यांनी टाळ आणि ड्रम वाजून एक तासभर खूपच आवाज उठवला. मॅनेजमेंट एका बाजूला काटकसरीचा उपदेश करते आणि स्वतःच्या केबिन्सच्या आधुनिकीकरणावर लक्षावधी रुपये उधळते, ह्याबद्दल संताप व्यक्त करण्यासाठी हे आवाजी निदर्शन करण्यात आले. "स्टेशनरी कमी वापरा, ओव्हरटाइम कमी करा" अशी सर्क्युलरे काढणारे श्रेष्ठी स्वतःच्या केबिन्सचे स्वतःच्या इच्छेप्रमाणे आधुनिकीकरण करण्यासाठी भरमसाट खर्च करतात, ह्याचा राग कर्मचाऱ्यांना व्यक्त करावयाचा होता.

ह्या दृष्टीने विचार करता, पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या मंत्र्यांना काटकसरीच्या केलेल्या सूचना महत्त्वाच्या आहेत अशा सूचना करण्याची पाळी पंतप्रधानांवर येते, ह्यावरूनच परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येईल. ह्या सूचना आर्थिक आणि औद्योगिक संस्थांच्या प्रमुखांनीही पाळल्या पाहिजेत हे उघड आहे.

### पंतप्रधान इंदिरा गांधींनी मंत्र्यांना केलेल्या काटकसरीच्या सूचना

(१) परदेशांचे मंत्री किंवा त्यावरच्या दर्जाच्या लोकांवरच पाहुणचाराचा खर्च करा; तोही कमीत कमी करा.

(२) सरकारी मोटारींचा उपयोग फक्त सरकारी कामापुरताच करा; पेट्रोलच्या वापराची कमाल मर्यादा ठरवा.

(३) स्वतःच्या वापरातील टेलिफोनखेरीज इतर टेलिफोनवरून एस. टी. डी. टेलिफोन्सना बंदी घाला. (काही प्रमुख शहरांशी एस. टी. डी. नंबर फिरवून कितीही वेळ बोलता येते; ह्या सोईचा दुरुपयोग फार मोठ्या प्रमाणावर होतो. कारण त्याची कुठेही नोंद राहात नाही; स्थानिक कॉल्सप्रमाणेच तो नोंदला जातो पण त्याचा मीटर मात्र फार जलद फिरतो आणि कॉल्सचा आकडा त्याप्रमाणे वाढून बिल फार मोठे होते.)

(४) आवश्यक, न टाळता येणाऱ्या प्रवासाखेरीज कोणताही प्रवास करू नका.

(५) परदेशांचे दौरे कटाक्षाने कमी करा.

(६) इमारती आणि फर्निचर ह्यांचे नूतनीकरण आणि दुरुस्ती ह्यांवरील खर्चात जास्तीत जास्त काटकसर करा.

(७) किरकोळ खर्चावर नजर ठेवून खरेद्या शक्यतो टाळा.

(८) नेहमीच्या वीजवापरावर नियंत्रण राखा; खास प्रसंगीही वीज बेताने वापरा.

"काटकसरीच्या बाबतीत मंत्र्यांनी आदर्श घालून द्यावा" असे पंतप्रधानांनी आवाहन केले आहे.

---

### औषधी कारखान्याला ४० कोटी रु. भुर्दंड

इंग्लंडमधील 'डिस्टिलरी कंपनी' नावाच्या एका औषधी कंपनीने लहान मुलांना झोप (गुंगी) येण्यासाठी तयार केलेल्या औषधाचा वापर केल्यामुळे काही मुले जन्माची अपंग झाली. अशा ४३३ मुलांच्या वतीने त्यांच्या पालकांनी ब्रिटिश हायकोर्टात दावा दाखल केला होता. हा दावा अनेक वर्षे अनेक स्तरांवरून लढविला गेला. शेवटी गेल्या ३० जुलै रोजी ब्रिटिश हायकोर्टाने या दाव्यातील कंपनी आणि मुलांचे पालक यांच्या दरम्यान कोर्टाबाहेर ठरलेल्या करारावर शिक्कामोर्तब केला. या करारान्वये 'डिस्टिलरी कंपनीने' ६० लक्ष पौंड म्हणजे सुमारे १२ कोटी रुपये या मुलांना किंवा त्यांच्या पालकांना द्यावयाचे आहेत आणि १४० लक्ष पौंड म्हणजे सुमारे २८ कोटी रुपयांचा एक विश्वस्त निधी स्थापन करावयाचा असून या निधीतून या मुलांच्या भविष्यकालीन हिताची तरतूद करावयाची आहे.

---

**टेलिव्हिजन सेट्सना मागणी कमी** – टेलिव्हिजन सेट्सना अपेक्षेप्रमाणे मागणी येत नाही. हिंदी सेट्सच्या बनावटीचा निकृष्ट दर्जा आणि कार्यक्रमांचाही निकृष्ट दर्जा, ह्यामुळे टेलिव्हिजन सेट्सचा खप मंदावला आहे, असे म्हटले जाते.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १९ सप्टेंबर, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## कुटुंबनियोजनावरील खर्चातील कपात हानिकारक

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंबनियोजन खात्याला सल्ला देणाऱ्या लोकसभेच्या कमिटीची बैठक दिल्ली येथे झाली. कमिटीने असे मत व्यक्त केले की कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या रकमेत जी कपात करण्यात आली आहे ती हानिकारक आहे. चालू कार्यक्रमाच्या अखेरीस जननाची वाढ दर हजारी ३२ पर्यंत खाली आणण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. वास्तविक हे उद्दिष्ट मुळातच बेताचे होते. पण आता तेही गाठणे खर्चातील कपातीमुळे शक्य होणार नाही अशी लक्षणे दिसू लागली आहेत. गेल्या काही वर्षात कुटुंबनियोजनाच्या कार्याची प्राथमिक तयारी पूर्ण होत आली होती. ह्या कामावर व्हावयाच्या खर्चात कपात करण्यात आल्यामुळे ही तयारी वाया जाईल. ह्या वर्षीच्या अंदाजपत्रकात कुटुंबनियोजनासाठी ५४·८५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु आता त्यातही १६·८ कोटी रुपयांची कपात करण्यात येणार असल्याचे अर्थखात्याने सूचित केले आहे. गेल्या वर्षी कुटुंबनियोजनावर ७६·२ कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. पंचवार्षिक कार्यक्रमाचा फेरविचार करताना नियोजन मंडळाने अर्थखात्याच्या सल्ल्याने किमान ११२·५८ कोटी रुपये खर्च करण्यास अनुमती दिली होती. परंतु देशात पडलेल्या दुष्काळामुळे खर्चात कपात करणे आवश्यक झाले. कुटुंबनियोजनाचे काम ८ वर्षांपूर्वी राष्ट्रीय पातळीवर सुरू करण्यात आले होते. आता ह्या कामाला गती येऊ लागली होती. कुटुंबनियोजनासाठी लागणाऱ्या रकमेत कपात करण्यात आल्यामुळे आता कामाची गती पुन्हा मंदावण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. सल्लागार कमिटीच्या मताने सामाजिक विकास साधण्यासाठी कपात रद्द करण्यात येऊन कुटुंबनियोजनाला प्राधान्य देण्यात यावे.

---

## अन्नधान्यासाठी अमेरिकेवर भिस्त ठेवणे धोक्याचे

गेल्या पंचवीस वर्षातील शेतीच्या क्षेत्रांतील जागतिक घडामोडींचा आढावा घेतला तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. ह्या अवधीत सर्व जग कमी-अधिक प्रमाणात अमेरिकेत पिकणाऱ्या अन्नधान्यावर अवलंबून असलेले दिसते. रशियासारखा मोठा देशही ह्याला अपवाद नाही. निसर्ग आणि मानवी प्रयत्न ह्यांचा मिलाफ झाल्यामुळे उत्तर अमेरिकेत सुबत्ता दिसून येते. पण, निसर्गाची लहर फिरून तेथेच जर दीर्घकालीन अवर्षण पडले तर अमेरिकेचीच नव्हे तर सर्व जगाची पंचाइत होण्याचा संभव आहे. एका तज्ज्ञाच्या मताने १८६० पासून दर २० वर्षांनी अमेरिकेवर अशी आपत्ती कोसळलेली आहे. तेव्हा ती पुन्हा कोसळणार नाही अशी ग्वाही देता येणार नाही. सध्या जगासमोर असलेला अन्नविषयक प्रश्न माणसाच्या करणीतूनच उत्पन्न झालेला असला तरी त्याला निदान निसर्गाची तरी साथ मिळालेली नाही. ती मिळाल्यास सर्वच जगावर अरिष्ट ओढवेल. दरम्यान चालू वर्षी जगभर अनेक देशांतून पावसाने दगा दिला. त्यामुळे भीतीपोटी अनेक देशांनी अमेरिकेत धान्य-खरेदी सुरू केली आणि तीही मोठ्या प्रमाणावर. खरेदीच्या ह्या स्पर्धेत रशियाने फार जोर केला. अमेरिकेतील वरकड धान्य खरेदी करण्याचा सपाटा त्याने चालविला. वास्तविक रशियाची लोकसंख्या भारताच्या दोन पंचमांश आहे. तरीही १९६६–६७ च्या दुष्काळात भारताने जितके धान्य खरेदी केले त्याच्या तिप्पट धान्य रशियाने खरेदी केले आहे. त्यामुळे अमेरिकेतील किमती तर वाढल्याच आहेत. पण दुष्काळाच्या तडाख्यात सापडलेल्या अविकसित देशांना अत्यंत चढभाव देऊन अन्नधान्य-खरेदी करावी लागत आहे.

---

## पुरामुळे झालेले पाकिस्तानचे नुकसान

सिंधू नदीला आलेल्या अभूतपूर्व पुराच्या तडाख्याने पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला आहे. सरकारी अधिकाऱ्यांनी केलेल्या अंदाजाप्रमाणे सुमारे ५० हजार घरे नष्ट झालेली असून शेकडो खेड्यांची वाताहत झाली आहे. ८० लाख लोक जलप्रलयाच्या आपत्तीत सापडले आहेत. पंजाबमधील उभ्या पिकांचे फार मोठे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजाप्रमाणे २५ कोटी डॉलर्सची पिके हातची गेली आहेत. पाकिस्तानच्या पंजाबमध्ये ३·५ कोटी हेक्टर्स जमीन पिकाखाली होती. त्यापैकी ४० लाख हेक्टर जमिनीतील पिके पुराच्या पाण्याने वाहून गेली. कापूस, मका आणि ऊस ह्यांचे खूप नुकसान झाले. त्याचप्रमाणे पश्चिम पंजाबमधील कालव्यांची मोठ्या प्रमाणावर मोडतोड झाली आहे. राज्यातील वाहतुकीची व्यवस्थाही मोडकळीस आली. ती चालू करण्यास आणि कालव्यांची दुरुस्ती करण्यास ६० लाख डॉलर्स खर्च येईल असा अंदाज करण्यात आला आहे.

# निर्गतवाढीच्या आकड्यांनी भुलून जाऊ नका

### चालू वर्षी ५०० कोटींची तूट अपेक्षित

मार्च, १९७३ अखेर संपलेल्या वर्षी भारताच्या परराष्ट्रीय व्यापारात १८५ कोटी रुपयांचा वाढावा अपेक्षित आहे. म्हणजे आयातीपेक्षा निर्गत तेवढ्या रकमेने जास्त झाली. १९६८–६९ मध्ये परराष्ट्रीय व्यापारात ५५४ कोटी रु. ची, १९६९–७० मध्ये १६९ कोटी रु. ची, १९७०–७१ मध्ये ९९ कोटी रु ची आणि १९७१–७२ मध्ये २१८ कोटी रु. ची तूट आली होती. सरकारी आकड्यांप्रमाणे १९७२–७३ साली १९६२ कोटी रु. ची, म्हणजे १९७१–७२ पेक्षा २२% अधिक निर्गत झाली. १९७२–७३ साली १७७७ कोटी रु. ची, म्हणजे १९७१–७२ पेक्षा ३% कमी आयात झाली.

निर्गतीचा आकडा जरा फुगलेला आहे; त्याची तीन कारणे आहेत –(१) मार्च, १९७३ मधील निर्गतीचा अंदाजी आकडा २६९ कोटी रु. आहे. त्यापूर्वीच्या ११ महिन्यांची मासिक सरासरी निर्गत १५५ कोटी रु. आहे; फेब्रुवारी १९७३ मधील निर्गत १४६ कोटी रु. ची आहे आणि एप्रिल १९७३ मधील निर्गत १४५ कोटी रु. ची आहे. मग, मार्चमध्येच एवढी मोठी निर्गत कशी झाली असेल? (२) निर्गतीच्या आकड्यात बांगला देश आणि नेपाळ ह्या देशांकडील अनुक्रमे १२५ कोटी रु. च्या आणि ३५ कोटी रु. च्या निर्गतीही समाविष्ट आहेत. त्यापासून परराष्ट्रीय हुंडणावळीचा लाभ होऊ शकत नाही. (३) हे आकडे रुपयांच्या चलनातले आहेत. रुपयांचे ब्रिटिश पौंडाशी स्थिर नाते आहे, पण पौंडाची किंमत इतर देशांच्या चलनांच्या संबंधात हेलकावे खाते, त्याचा परिणाम रुपयावरही होतो. त्यामुळे निर्गतीची रुपयातील किंमत ३% ने फुगली आहे.

हे सर्व लक्षात घेता, निर्गतीमधील वाढ १२% पेक्षा जास्त झालेली नाही. तरी सुद्धा, निर्गतीचा आकडा समाधानकारकच मानला पाहिजे. परंतु १९७३–७४ मध्ये आयातीची गरज खूपच वाढली असून अन्नधान्य, खते आणि पेट्रोल व त्याचे पदार्थ ह्यांच्या वाढलेल्या आयातीची किंमत ५०० कोटी रु.च्या घरात जाईल! अन्नधान्यांची आयात अपरिहार्य आहे, पण पेट्रोल व पेट्रोलचे पदार्थ ह्यांची आयात कमी करणे अपरिहार्य झाले आहे तरी सुद्धा, १९७३–७४ मध्ये परराष्ट्रीय व्यापारात ५०० ते ६०० कोटी रु. ची तूट पडण्याचा संभव दिसत आहे. त्यामुळे भारताच्या परराष्ट्रीय चलननिधीला ओहोटी लागण्यास अवधी लागणार नाही. खरीप पिके उत्तम येण्यावरच आता आपली सर्व मदार आहे.

---

**'स्वस्तिक'ची आगकूच**

### उत्तर अमेरिकेकडून स्वस्तिकच्या सहा लक्ष गमबुटांना मागणी

उत्तर अमेरिकेकडून 'स्वस्तिक'च्या ६,००,००० गमबुटांना मागणी आली आहे. त्यांची किंमत ५४,००,००० रुपये भरेल. तीव्र आंतरराष्ट्रीय स्पर्धेला तोंड देऊन 'स्वस्तिक'ने ही मोठी ऑर्डर मिळविली आहे. जगातील पहिल्या प्रतीच्या गमबुटांत स्वस्तिकच्या उत्पादनाची गणना खरेदीदारांनी केली आहे. गमबूट, स्किडो बूट, ओव्हर शूज, इत्यादींची निर्गत 'स्वस्तिक' गेली २० वर्षे करीत आहे.

**श्री. बी. जी. वैद्य ह्यांचा परदेशदौरा**

'स्वस्तिक'चे तांत्रिक सल्लागार श्री. बी. जी. वैद्य हे पॅरीस येथील 'शूफेअर'मध्ये भाग घेण्यासाठी तिकडे गेले आहेत. तेथे रबर हँडग्लोव्हज्, फुटवेअर आणि एअर मॅट्रेसेसच्या ऑर्डरी मिळविण्याचे काम ते करणार आहेत. इंग्लंड, जर्मनी, इटली, ह्या देशांनाही ते भेट देतील. त्यांचा दौरा एकूण १५ दिवसांचा आहे.

---

### लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचा संशयास्पद व्यवहार

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या मालकीच्या, दिल्ली येथील सदर बाजारात सुमारे ९,००० चौ. फूट जमीन आणि काही जुन्या इमारती आहेत. आयुर्विमा कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण केल्यानंतर त्या कॉर्पोरेशकडे आल्या. ह्या विभागाला स्वदेशी मार्केट असे म्हणतात आणि दिल्लीचे सेल्स टॅक्सचे एकूण उत्पन्न आहे त्यापैकी निम्मे उत्पन्न ह्या विभागाकडून मिळते. कॉर्पोरेशनने ह्या मार्केटाचा ६·५ लक्ष रु. चा विमा उतरला होता. हे मार्केट नुकत्याच एका आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. एल आय. सी. चे चेअरमन दिल्लीला गेले (ह्या भेटीची तेथील वरिष्ठ अधिकाऱ्यांना काहीच कल्पना नसावी) आणि ला. इ. कॉर्पोरेशनने स्वदेशी मार्केट व्यापाऱ्यांना विकण्याचे ठरविले. स्वदेशी मार्केटच्या व्यापाऱ्यांनी आपली एक असोसिएशन बनविली आणि ला. इ. कॉर्पोरेशनने ह्या असोसिएशनबरोबर करार केला. प्रत्येक चौरस वाराला म्हणजे नऊ चौ. फुटांना ४०० रु. असा सौदा ठरला. म्हणजे, एकूण किंमत ४ लक्ष रु. झाली. असोसिएशनने ला. इ. कॉर्पोरेशनकडे ६०,००० रु. भरले सुद्धा. ला. इ. कॉर्पोरेशनच्या चेअरमननी कॉर्पोरेशनच्या उत्तर विभागाच्या तीन अधिकाऱ्यांच्या समितीकडे व्यवहार पुरा करण्याचे काम सोपविले, तेव्हा हे सर्व प्रकरण बाहेर आले. स्वदेशी मार्केटच्या जमिनीला प्रत्येक चौरस वारास ३,००० रु. सहज येतील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे, पण ला. इ. कॉर्पोरेशनने प्रत्येक वारास ४०० रु. दराने जमीन विकली आहे. तेथील दुकानांच्या पागडीचा भाव दर चौरस फुटाला ११० रु. आहे!

## चार हजार हिंदी शास्त्रज्ञ अमेरिकेत स्थायिक

पवई येथील तांत्रिक शिक्षण संस्थेतील एक अधिकारी डॉ. रोमेश शहा ह्यांनी अमेरिकेत जाणाऱ्या हिंदी शास्त्रज्ञांबद्दल उद्बोधक माहिती सांगितली. ह्या विषयासंबंधी तेथे भरविण्यात आलेल्या एका परिषदेत त्यांनी एक निबंध वाचला. निबंधात अशी माहिती दिली आहे कीभारतातून परदेशात गेलेले ४० हजार हिंदी लोक निरनिराळ्या देशांत स्थायिक झाले आहेत. त्यापैकी ४ हजार शास्त्रज्ञ असून ते सर्व अत्युच्च दर्जाचे आहेत. ब्रिटनमधून अगर इतर देशांतून अमेरिकेला जाणाऱ्यांपेक्षा तिकडे जाणाऱ्या हिंदी नागरिकांची संख्या जास्त आहे. १९७२ साली अमेरिकेतील हिंदी डॉक्टरांची संख्या १,५०० होती. भारतातून परदेशात जाणाऱ्या बुद्धिमंताचा प्रश्न हा सोपा नाही. ह्या प्रश्नात अनेक प्रकारची गुंतागुंत दिसून येते. केवळ आर्थिक लाभासाठी बुद्धिमान लोक अमेरिकेत जातात असे म्हणता यावयाचे नाही. गेल्या महायुद्धानंतर युरोपीय देशांतून अमेरिकेकडे जाणाऱ्या लोकांचा ओघ सुरू झाला. पण आता तो मंदावला आहे. आता विकसनशील देशांतून अमेरिकेला जाणाऱ्यांची संख्या वाढत चाललेली आहे. बुद्धिमंत परदेशात जाऊन तेथे स्थायिक का होऊ पाहातात ह्याची काही कारणे अशी आहेत. भारतामधील सामाजिक परिस्थिती हे प्रमुख कारण आहे. सामाजिक परिस्थिती अशी आहे की व्यक्तीच्या विकासाला पुरेसे स्वातन्त्र्य मिळत नाही. शिक्षणाचे नियोजन नीट झालेले नाही; किंवा मुळीच झालेले नाही. आर्थिक विकासाचा वेग फार मंद आहे. त्यामुळे उच्च शिक्षण घेतलेल्या लोकांना वाव मिळत नाही. जे उच्च शिक्षित लोक भारतात परत येतात त्यांच्याकडे साशंकतेने पाहाण्यात येते. त्यांना भारतामधील परिस्थितीशी जमवून घेणे अवघड जाते.

---

## अटक चुकविण्यासाठी अपत्यांचा तोडगा

इटलीच्या फौजदारी कायद्याप्रमाणे किरकोळ गुन्ह्यांसाठी गर्भार स्त्रीला अटक करता येत नाही. ३९ वर्षांच्या एका इटालिअन स्त्रीने ह्याचा फायदा घेण्याचे ठरवून १९६९ पासून अटक चुकविली आहे. जप्त करण्यात आलेली मालमत्ता विकण्याचा आरोप तिच्यावर होता. १९६९ पासून दरसाल ती एका अपत्याला जन्म देत होती. तिला पूर्वीची ५ मुले आहेत. आता ती १० व्या मुलाला जन्म देणार आहे. तिच्या वकिलाने इटलीच्या अध्यक्षाकडे आता दयेचा अर्ज केला असून तो मंजूर करण्यात आला आहे. अटक चुकविण्याची ही युक्ती तिने अशाच एका प्रकरणातून उचलली होती. सुप्रसिद्ध नटी सोफिआ लॉरेन हिने काम केलेला एक चित्रपट ह्या प्रकरणावर काढण्यात आला होता आणि तो इटलीत खूप गाजला होता.

---

## उंटांच्या निर्यातीने परदेशीय चलन मिळविणार

केनियाच्या उत्तर भागात गरजेपेक्षा ७ लाख उंट अधिक झाले आहेत. हा प्रदेश ओसाड, वालुकामय असल्यामुळे तेथील बरीच वाहतूक उंटांच्या साह्याने केली जाते. तरीही त्यांची संख्या फार असल्याने उंटांची निर्यात सौदी अरबस्थानला करण्याचे घाटत आहे. पुढील वर्षी सुमारे १ हजार उंटांची अरबस्तानाला पाठवणी करण्यात येईल. केनियाचे शेतीखाते अशी निर्यात करण्याची एक योजनाच तयार करीत आहे. सौदी अरबस्थानात उंटांची टंचाई भासत असल्याने तेथे उंटांची निर्यात अधिक प्रमाणात करण्यात येईल. अरबस्थानात उंटांच्या निर्यातीला कितपत वाव आहे ह्याची पाहणी करण्याकरिता एक मंडळ अलीकडेच तेथे पाठविण्यात आले होते. पाहणीचा अहवाल केनियाच्या सरकारला अनुकूल वाटला. तथापि उंटांच्या निर्याती-विषयी बरेच प्रश्न सोडवावे लागणार आहेत. उंटांचे तांडे कोठल्या मार्गाने पाठवावयाचे, त्यांचे तळ वाटेत कोठेकोठे ठेवावयाचे, त्यांच्या खाण्यापिण्याची व रोगराईची व्यवस्था काय करावयाची ह्याची काळजीपूर्वक आखणी करावी लागेल. उंटांचे तांडे बोटीतून पाठविण्यात यावयाचे आहेत. पण हा प्रवास त्यांना कसा काय झेपेल ह्याचाही विचार करावा लागणार आहे. पहिल्या १,००० उंटांची निर्यात यशस्वी झाली तर हळूहळू निर्यातीत वाढ करण्यात यावयाची आहे. १९७७ पर्यंत दरसाल ५ ते ७ हजार उंट केनिया निर्यात करू लागेल. परदेशीय हुंडावळीच्या रूपांत केनियाला दरसाल ५ लाख पौंड मिळू शकतील. वालुकामय प्रदेशांत उंटांचा उपयोग अनेक प्रकारांनी होतो. उंटांतच तेथील संपत्ती मोजली जाते. शिवाय उंटांचे मांस आणि दूधही कामी येते. सध्या सौदी अरबस्थान आपली उंटांची गरज सूदान, इथिओपिया व सोमालियाकडून भागवितो.

---

## इराणकडून तेलाचा पुरवठा

१९७४ व १९७५ साली भारताला अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्याचे इराणने मान्य केले आहे. चालू वर्षातच तेल पुरविण्याची तयारी इराणने दाखविली होती. परंतु सौदी अरबस्तान आणि इराक ह्या देशांकडून तेल घेण्याची व्यवस्था पूर्वीच झाली असल्यामुळे भारताला ह्या वर्षी आणखी तेलाची गरज नव्हती. इराक भारताला १९७६ पासून ११·२ कोटी टन तेल दरसाल पुरविणार आहे. तसा करारही उभयता देशांत झालेला आहे. तरी १९७४ व १९७५ साली भारताला लागणाऱ्या तेलाची गरज भागलेली नाही. इराणकडून भारताला त्या सालासाठी दरसाल ३० लाख टन तेल मिळण्याची अपेक्षा आहे. त्याशिवाय इराण-मधील एखाद्या कारखान्यात भारताचे सहकार्य घेण्याची अगर भारतामधील कारखान्यात सहकार्य करण्याची तयारी इराणने दाखविली आहे.

---

**रेल्वेज तुटीचा उच्चांक गाठणार** — रेल्वेजना १९७३–७४ मध्ये १०० कोटी रु. नुकसान येईल असा आजचा अधिकृत अंदाज आहे. पे कमिशनच्या शिफारसींच्या अंमलबजावणीमुळे ४६ कोटी रु. चा आणि किमान वेतनामुळे ६ कोटी रु. चा नवा बोजा पडणार आहे. लोको कर्मचाऱ्यांना १२ कोटी रु. जास्त द्यावे लागणार आहेत. ह्याउलट, वाहतुकीच्या उत्पन्नात ३० कोटी रु. घट अपेक्षित आहे. यामुळे रेल्वेजच्या विस्ताराचा कार्यक्रम मंदावेल आणि त्याचा इंजिनिअरिंग उद्योगांवर विपरीत परिणाम होईल.

**विमान कंपन्या अरब गनिमांना पैसे देतात** — आपल्या विमानांकडे दहशतवादी अरब गनिमांनी वक्रदृष्टी ठेवू नये ह्यासाठी कित्येक युरोपियन विमान कंपन्या अरब गनिमांच्या बँक खात्यात पैसे भरीत आहेत. अशा कंपन्यांच्या विमानांची वाहतूक सुरक्षित होते.

**ग्रामीण विद्युतीकरणाला मदत** — ग्रामीण विद्युतीकरण मंडळाने काही नव्या योजना आखल्या आहेत. त्या पूर्ण करण्यासाठी अमेरिकेकडून भारताला मदत मिळाली आहे. अमेरिकेचे भारतामधील वकील मि. मॉनिहान ह्यांनी ह्या कामासाठी १५ कोटी रुपयांचा चेक अध्यक्षांना दिला. अमेरिकेकडून ह्या कामासाठी १०५ कोटी रुपये मिळावयाचे होते. त्यातील हा चवथा व शेवटचा हप्ता आहे.


**पाकिस्तानी सैनिकांची परतपाठवणी** — पाकिस्तानी युद्धकैद्यांच्या सुमारे १२ छावण्या उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि बिहार ह्या राज्यांत आहेत. मीरत, सागर आणि रांची येथील छावण्या सर्वात मोठ्या आहेत. त्यांना भारत-पाकिस्तान सीमेपर्यंत खास आगगाड्यांनी पोचविले जाईल. प्रत्येक आगगाडीला लष्करी संरक्षक असतील, मोठे सैपाकघर असेल आणि दिमतीला डॉक्टर असेल. वाहतुकीसाठी रेल्वेजना खूपच डबे उपलब्ध करून द्यावे लागतील.

**दारूबंदीमुळे बेकारी**—तामीळनाडू सरकारने दारूबंदी पुन्हा अमलात आणण्याची तयारी म्हणून ताडीची दुकाने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बेकारांच्या संख्येत वाढ होणार आहे. झाडावरून ताडी गाळण्याच्या कामात सुमारे २० हजार कामगार गुंतलेले आहेत. शिवाय दुकानातील कामगार वेगळे.


**वैद्यकीय कॉलेजांना शवे मिळत नाहीत**—नागपूर येथील दोन वैद्यकीय कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मनुष्याच्या शरीराचा अभ्यास करण्यासाठी लागणारी शवे मिळत नाहीशी झाली आहेत. ह्या कॉलेजांना दरसाल ३० शवांची जरुरी असते. बेवारशी प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या नियमात पोलिसखात्याने काही बदल केले आहेत. त्यामुळे प्रेतांची टंचाई भासत आहे.


★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

**विजय पंपस्** कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क ★ दर्जेदार पंप निर्मितीची हमी·



इंजिन असो अगर इले· मोटार असो,
त्यांस "विजय" पंपाची
आवश्यकता आहेच.




कारखानदार—
फोन : २३२
तार : Vijayplow

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग–सांगली (महाराष्ट्र)

## मोहेंन-जो-दारो अवशेष बचावले

पूर्वी अखंड भारतात असलेले मोहेंजोदारो ह्या प्राचीन संस्कृतीचे अवशेष फाळणीनंतर पाकिस्तानात समाविष्ट झाले. पाकिस्तानांतून वाहणाऱ्या सिंधू नदीला चालू पावसाळ्यात प्रचंड पूर आल्यामुळे हे अवशेष वाहून जातील किंवा काय अशी भीती निर्माण झाली होती. ह्या अवशेषाभोंवती पुरापासून संरक्षण करण्यासाठी बंधाऱ्यांची साखळी उभारण्यात आलेली आहे. ह्या वर्षाच्या पुरात ह्या बंधाऱ्यांना काही छोटी भगदाडे पडली होती. पण ती वेळेवर त्वरित बुजविण्यात आली. येथील प्राचीन संस्कृतीचे दर्शन घडविणारे एक वस्तुसंग्रहालय बांधण्यात आलेले आहे. पुरातत्त्वशास्त्रज्ञ व सामान्य लोक ह्या संग्रहालयाला भेट देत असतात. तथापि हजारो वर्षांपूर्वीच्या ह्या शहराला सिंधू नदीच्या पुराला तोंड देण्याचे प्रसंग अनेकदा आलेले आहेत. असे म्हणतात की मूळचे शहर सिंधूच्या पुरामुळेच प्रथम उद्ध्वस्त झाले. अनेक इमारती तर वाहून गेल्या. पाणी ओसरल्यावर उरल्यासुरल्या शहरावर बारीक रेतीचा दाट थर बसला. पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी मातीच्या ह्या थरावरूनच शहराच्या प्राचीनतेचा काही हिशेब बसविलेला आहे. मूळचे शहर सिंधू नदीच्या पुराने नेमके वाहून केव्हा गेले ते निश्चितपणे सांगता येण्यासारखे नाही. परंतु ह्या विषयांतील तज्ज्ञांच्या मताने सुमारे २,५०० वर्षांपूर्वी झालेल्या जलप्रलयाचा तो परिणाम असावा. त्यानंतर शहराचे पुनर्वसन पुन्हा झालेले दिसते. तेव्हा पुरापासून रक्षण होण्यासाठी काही बांधकाम केले असेल तर ते अजून उपलब्ध झालेले नाही. सुमारे ५०० वर्षांनंतर ह्या शहराला पुन्हा एकदा जलप्रलयाचा जबर तडाखा बसलेला दिसतो. शहराची ही झुंज दीर्घ काळ चालत आलेली आहे.

---

## लैंगिक संबंधाबद्दल जपानमधील पहाणी

स्त्री-पुरुषांमधील लैंगिक संबंधाचा विषय आता भारतातसुद्धा नाजूक राहिलेला नाही किंवा तसा मानला जात नाही. नीति-विषयक पुस्तकांतून त्याने आता वाङ्मयीन क्षेत्रात प्रवेश केला आहे आणि मूळचा नाजूक गणला गेलेला विषय स्फोटक बनला आहे. तथापि ह्या विषयावर लोकमताची नमुना पाहणी करण्याचे धारिष्ट अद्याप कोणी दाखविलेले नाही. जपानमध्ये असा प्रयत्न करण्यात आला आहे आणि तोही सरकारकडून. जपानच्या सार्वजनिक संबंध खात्याने ह्या विषयासंबंधी लोकमताची पाहणी करण्यासाठी २० वर्षांवरील ३ हजार स्त्री-पुरुषांची निवड केली होती. निवडीला काही निकष नव्हता. म्हणजे निवड मुद्दाम वेचकपणे करण्यात आली होती असे नव्हे. खात्याने पाठविलेल्या प्रश्नावलीला ८४ टक्के लोकांनी उत्तरे पाठविली. त्यावरून असे दिसून आले की बहुतेक जपानी नागरिकांना लैंगिक संबंधाबाबत अनिर्बंध स्वातंत्र्य मान्य नाही. फक्त ५ टक्के लोकांनी विवाहपूर्व, विवाहबाह्य अगर संपूर्णपणे मुक्त लैंगिक संबंध असावे असे मत व्यक्त केले. ३६ टक्क्यांनी विवाह ठरलेल्या जोडप्यांनी विवाहपूर्वसंबंध ठेवण्यास हरकत घेतली नाही. ५२ टक्क्यांनी असे भाकित केले की दिवसगतीबरोबर मुक्त लैंगिक संबंध अधिकाधिक वाढत जातील. ६९ टक्क्यांनी अशा संबंधांबद्दल प्रतिकूल अभिप्राय व्यक्त केला. १९ टक्क्यांनी लैंगिक विषयावरील प्रकाशनावर कोठल्याही तऱ्हेचे बंधन असू नये असे मत व्यक्त केले. ७२ टक्क्यांनी अशा प्रकारच्या वाङ्मयाला विरोध व्यक्त केला. ७० टक्क्यांनी जनता संपर्काच्या साधनांच्या अशा प्रकारच्या मुक्त अभिव्यक्ती अनिष्ट असल्याचे सांगितले. एकंदरीने जपानी लोक ह्या बाबतीत मोकळेपणाने वागल्याचे दिसून आले.

---

## अन्नधान्याच्या उत्पादनात चीनची प्रगती

महाराष्ट्र विधानसभेच्या एस्टिमेटस् कमिटीचे अध्यक्ष श्री. प्रभाकर कुंटे ह्यांचे लायन्स क्लबतर्फे मुंबईत वांद्रा येथे व्याख्यान झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की नजीकच्या भविष्यकाळात देशातील अन्नधान्याचे उत्पादन लक्षात भरण्याइतके वाढविले नाही तर देशात सर्वत्र पुन्हा पुन्हा दुष्काळ पडण्याची भीती आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात चीनने उल्लेखनीय प्रगती केली आहे. गेल्या पंचवीस वर्षात चीनने आपले अन्नधान्याचे उत्पादन ८·२ कोटी टनापासून २० कोटी टनापर्यंत वाढविले आहे. ह्याच कालावधीत भारतामधील उत्पादन मात्र ६·६ कोटी टनापासून १० कोटी टनापर्यंतच वाढलेले दिसते. भारताच्या एकूण गरजेच्या मानाने अन्नधान्याचे उत्पादन कमी पडत आहे. त्यामुळे धान्याच्या किंमती सतत वाढत आहेत.

---

## दारूपानात दिल्लीचा उच्चांक

दारू पिण्याचे प्रमाण दिल्ली या भारताच्या राजधानीत एवढ्या विद्युत्वेगाने वाढले आहे की त्या बाबतीत जगातील सर्व राजधान्यात पहिला क्रमांक मिळविण्याचा मान दिल्लीने संपादन केला आहे. १९७०–७१ साली दिल्लीत २२ लक्ष, ७० हजार लिटर दारू खपली तर १९७२–७३ साली विक्री ६० लाख लिटरवर गेली. याचा अर्थ भारताच्या राजधानीत अवघ्या दोन वर्षात दारूच्या खपात तिप्पट वाढ झाली.


### "अर्था"चा दिवाळी अंक

"अर्था"चा ३९ व्या वर्षाचा दिवाळी अंक नेहेमीप्रमाणे वैशिष्ट्यपूर्ण आणि मोठ्या आकारात बुधवार, दि. २४ ऑक्टोबर १९७३ रोजी प्रसिद्ध होईल.

*आमच्या हितचिंतक व्यापारी–कारखानदारांनी आपल्या जाहिराती कृपया सत्वर पाठवाव्या.*

**द. रा. कुलकर्णी**
व्यवस्थापक, "अर्थ"

### राज्यवार साखर उत्पादन ( लक्ष टन )

| | | १९६०–६१ | १९६४–६५ | १९६८–६९ | १९७०–७१ | १९७१–७२ |
|---|---|---|---|---|---|---|
| बिहार | ... | ३·८५<br>(१२·८) | ३·९२<br>(१२·१) | २·६०<br>(७·३) | २·९३<br>(७·८) | १·५०<br>(४·८) |
| महाराष्ट्र | ... | ५·२३<br>(१७·४) | ६·३६<br>(१९·७) | ९·८१<br>(२७·६) | १०·५५<br>(२८·२) | १०·०२<br>(३२·२) |
| पंजाब | ... | १·२२<br>(४·०) | ०·९८<br>(३·०) | ०·३८<br>(१·१) | ०·४८<br>(१·३) | ०·३१<br>(१·०) |
| तामीलनाडू | ... | १·३१<br>(४·३) | २·१०<br>(६·५) | ३·३०<br>(९·३) | २·९९<br>(८·०) | २·९९<br>(९·६) |
| आंध्र प्रदेश | ... | १·८२<br>(६·०) | ३·०६<br>(९·५) | ३·३९<br>(९·५) | २·६७<br>(७·२) | ३·०२<br>(९·७) |
| म्हैसूर | ... | १·२०<br>(४·०) | १·८०<br>(५·६) | २·०६<br>(५·८) | २·०५<br>(५·५) | २·४२<br>(७·८) |
| मध्य प्रदेश | ... | ०·३५<br>(१·२) | ०·३७<br>(१·२) | ०·१५<br>(०·४) | ०·३८<br>(१·०) | ०·२१<br>(०·७) |
| उत्तर प्रदेश | ... | १४·२७<br>(४७·४) | १२·९२<br>(४०·०) | ११·७५<br>(३३·०) | १२·९९<br>(३४·७) | ८·३१<br>(२६·७) |
| इतर | ... | ०·८८<br>(२·९) | ०·७८<br>(२·४) | २·१५<br>(६·०) | २·३६<br>(६·३) | २·३४<br>(७·५) |
| एकूण | ... | ३०·१३<br>(१००·०) | ३२·२९<br>(१००·०) | ३५·५९<br>(१००·०) | ३७·४०<br>(१००·०) | ३१·१२<br>(१००·०) |

कंसांतील आकडे एकूण उत्पादनाशी प्रमाण % दर्शवितात.


BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )


*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth, **BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*

"भिडे" ओव्हर पिक
पॉवर लूम्स ५६,"६०"व ६४"




**भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;**

—सांगली—

फोन नं. २०६९

रघुनाथराव भिडे
कार्यकारी संचालक

### आहार आणि वजनात संबंध असतोच काय ?

आरोग्यरक्षणासाठी युक्ताहाराचे तत्त्व सर्वांच्या परिचयाचे आहे. व्यक्तिपरत्वे अशा आहाराचा तपशील निरनिराळा असू शकतो ह्याबद्दलही वाद नाही. आहाराबद्दल बरीच शास्त्रीय माहिती आता उपलब्ध असली तरी काही माणसे भरपूर व चांगले खाऊनही सडसडीत राहिलेली दिसतात, उलट काही लठ्ठ माणसांना वजन वाढण्यास कसेही अन्न पुरते. असे का, ह्याचे उत्तर कॅलिफोर्निआ विद्यापीठातील एका आहारसंशोधकाला सापडलेले दिसते. आतापर्यंत अशी समजूत होती की घेतलेल्या आहारातील उष्णता निर्माण करण्याची शक्ती शरीराचे व्यापार चालण्यासाठी लागणाऱ्या शक्तीपेक्षा कमी असली की वजनात घट होते; आणि काही प्रमाणांत हा नियम खराही आहे. म्हणूनच वाजवीपेक्षा अधिक मेद अंगावर असणाऱ्यांना आहार-नियंत्रणाचा अवलंब करावा लागतो. तथापि, उपरोक्त संशोधकाला असे आढळून आले आहे की एखाद्या व्यक्तीने कितीही व्यायाम केला, आहारनियंत्रण केले, अगर शस्त्रक्रियेच्या साहाय्याने अनावश्यक मेद कमी केला, तरी त्याचे वजन काही ठराविक सरासरी वजनापेक्षा कमी होत नाही. ह्यावरून त्याने असा निष्कर्ष काढला आहे की माणसाचे योग्य वजन किती असावे ह्याचा निर्णय त्याचा मेंदू घेत असतो. घेतलेल्या आहाराचे शरीरात सामिलीकरण करण्याची क्रिया ह्या निर्णयावर अवलंबून असते. म्हणजे असे की माणसाने कितीही आहार घेतला अगर कसाही सत्त्वयुक्त आहार घेतला तरी त्याच्या शरीराला उपयोगी असणाऱ्या रसात रूपांतर करण्याची क्रिया त्याच्या हातात नसते. मेदोवृद्धीने पिडलेल्या लोकांना ह्या शोधामुळे काहीसे समाधान मिळेल.


---

### लाकडाच्या निर्यातीने उच्चांक गाठला

१९७२–७३ सालाच्या पहिल्या नऊ महिन्यांत भारताने लाकडाची निर्यात करण्यात उच्चांक गाठला आहे. ह्या मुदतीत ८·०७ कोटी रुपये किमतीचे लाकूड निर्यात करण्यात आले. १९७१–७२ च्या पूर्ण वर्षात ६·९१ कोटी रुपयांचे लाकूड निर्यात करण्यात आले होते. 'रोझवुड' जातीच्या लाकडाची निर्यात सर्वांत अधिक झाली. एकूण निर्यातीपैकी ८७ टक्के निर्यात ह्या प्रकारच्या लाकडाची झाली. केवळ ह्याच लाकडाच्या निर्यातीने ७·०३ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळवून दिले. त्यापूर्वीच्या वर्षात 'रोझवुड' लाकडाच्या निर्यातीने ५·७ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळाले होते. आकारमानाच्या विचार करता लाकडाची निर्यात २०,३०० घनमीटरपासून २४,१०२ घनमीटरपर्यंत वाढली.

---



तुमच्या मुलीचे लग्न ही काही
बाहुला बाहुलीच्या लग्नाइतकी सोपी गोष्ट
नाही...



पण आमच्या आवर्तक ठेव
योजनेमुळे ती सोपी होते...

तुमच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तेवढा पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळं खात्रीनं उपलब्ध होतो. दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढतच जाईल. आणि ज्या वेळी तो मंगल दिवस उगवेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल ... आपण किती सुखी आहोत ... पैशाची तर चिंताच नाही.

दर महिन्याला बँकेत ठेवायची रक्कम रु. ५ किंवा त्याच्या पटीत
मुदत : १ ते १० वर्षे
व्याज : ७ टक्क्यांपर्यंत

अधिक तपशीलासाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेट द्या.

बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

7216 Mar



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)


ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, ३ ऑक्टोबर, १९७३ | अंक १९

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**TF ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar

# उद्योगधंद्यांचे कंबरडे मोडणारी करवाढ

( सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए. )

रेडिमेड गारमेंटस् प्रा. लि. ह्या कंपनीचे डायरेक्टर श्री. हरीश कापडिया हे मार्चच्या पहिल्या आठवड्यात आपल्या युरोप-अमेरिकेच्या दौऱ्यावरून परत आले. आपल्या ऑफिसात हजर होताच त्यांनी प्रथम आपले सेल्स मॅनेजर श्री. वेचाणी यांना बोलावून घेतले. श्री. वेचाणी यांनी साहेबांची तातडीने भेट मागितली होती. श्री. वेचाणी हे थोडेसे भयग्रस्त होऊनच केबिनमध्ये आलेले श्री. कापडियांना दिसले. त्यांनी तावडतोब त्यांना काय अडचण आह ते सांगण्यास सुचविले. श्री. वेचाणी थोडेसे कापऱ्या स्वरातच सांगू लागले,

"आपल्या रेडिमेडला टाळे लावण्याची वेळ आली आहे. तुम्ही मोठ्या उत्साहाने ही कंपनी सुरू केलीत. तुमच्या परदेशी बाजारपेठेच्या अभ्यासावरून तसेच भारतातही राहणीमान वाढते आहे, छानछोकीच्या कपड्यांची आवड स्त्री-पुरुषांत, विशेषतः तरुणांत, वाढत आहे या समजुतीने तुम्ही नव्या नव्या फॅशनचे तयार कपडे शिवणारी कंपनी सुरू केलीत. गेली २।३ वर्षे आपला सेल चांगला वाढत होता. निर्यातही थोडी-फार चांगली झाली. यामुळे उत्तेजित होऊन यंदा आपण पाचपट उत्पादन वाढविण्याचे ठरविले. नवीन कापडांचे नमुने निवडले. नव्या फॅशनचे प्रकार बाजारात आणण्यासाठी सर्व उपाय अमलात आणायचे ठरविले. मलाही खूप हुरूप वाटला. मी लोकप्रियतेच्या आघाडीवरील सर्व सिनेनट-नट्यांना, निर्मात्यांना गाठून आपली नवीन फॅशनची वस्त्रे आणण्याचे निश्चित केले. पॅकिंग, जाहिरात यांच्या योजना व त्याप्रमाणे काम सुरू केले. यंदा आपण एकदम बाजार हलवून सोडणार या स्वप्नात मी होतो, पण परवाचे अर्थमंत्र्यांचे अंदाजपत्रक वाचले आणि मला कड्यावरून कोसळल्यासारखे झाले.

"तुम्ही ह्या बजेटची बातमी परदेशात वाचली असेलच. आपल्या तयार कपड्यांच्या धंद्यावर १५% एक्साईझ कर आला आहे. शिवाय कापडाच्या व नित्योपयोगी वस्तूंच्या किंमतीही वाढणार आहेत. वेगवेगळ्या राज्यांतून तयार कपड्यांवरील विक्रीकर १२% पर्यंत वाढला आहे. या सर्वांचा परिणाम आपल्या उत्पादन-खर्चावर व विक्रीच्या किमतीवर होणार आहे. आपल्या कॉस्ट अकौंटंटच्या म्हणण्याप्रमाणे आपला उत्पादन-खर्च २०% जास्त होईल व विक्रीकर आणि एक्साईझ करामुळे गिऱ्हाइकाने माल १५% ते २०% जास्त किमतीत घेतला तरच्या आपल्याला अपेक्षित नफा राहील. मी यावरून जेव्हा माझ्या विक्रीचा अंदाज घेतला तेव्हा मला असे आढळते की आपली वस्त्रे अगोदरच सर्वांत महाग समजली जातात. त्यात किमतीत आणखी वाढ झाली तर वरच्या वर्गातील अपेक्षित गिऱ्हाईकही कमी होईल आणि जर आपण उत्पादन चौपट वाढविणार असलो तर आपल्याला गिऱ्हाईक वाढायला हवे आहे. लोकांच्या गरजेच्या वस्तूंवरील खर्च वाढणार आहे, तेव्हा साहजिकच चैनीच्या व महाग वस्तूंवरील त्यांचा खर्च त्यांना कमी करावा लागेल. तेव्हा मला थोडक्यात असे सांगायचे आहे की वाढत्या विक्रीची हमी देणे मला केवळ अशक्य आहे. पूर्वी स्वीकारलेल्या ऑर्डरीसुद्धा माझे डीलर्स कमी करण्याची भीती आहे. तेव्हा आपण आपला उत्पादन कार्यक्रम आखडता घ्यावा हेच बरे. मी पुन्हा महिन्या-भरात माझा बाजारातील घडामोडींचा अंदाज आपल्याला देतो. त्यानंतर योग्य वाटल्यास विस्ताराचा कार्यक्रम घेऊ."

यावर श्री. कापडिया थोडे बुचकळ्यात पडले. अशा तऱ्हेची आपत्ती त्यांना अपेक्षित नव्हती. दर्जेदार, आकर्षक माल करावा व जोमाने विक्रीचा कार्यक्रम आखावा; भारताच्या अफाट बाजार-पेठेत २ ते ३ टक्के लोक जरी गिऱ्हाईक म्हणून मिळाले तरी खूप मार्केट आहे हा त्यांचा ठोकळ अंदाज होता. पण श्री. वेचाणींच्या सूचनेप्रमाणे हा अंदाज पोकळ ठरण्याचीच भीती जास्त होती.

त्यांनी श्री. वेचाणींनाच पुन्हा विचारले, "या करवाढीने होणाऱ्या भाववाढीमुळे लोकांची क्रयशक्ती कमी होईल पण चांगले कपडे वापरण्याची आवड कमी होईल का ?"

"नाही, मला नाही वाटत तसे होईल. उलट, या भाववाढीमुळे कापडाचे व शिलाईचे दरही वाढणार आहेत. लोकांचे नवे कपडे शिवणेही कमी होण्याची शक्यता आहे." श्री. वेचाणी म्हणाले.

"ठीक आहे. पण वस्त्र ही एक प्राथमिक गरजच आहे ना माणसांची ? वस्त्राशिवाय फिरणे समाजास मान्य होणार नाही. आपण असे केले तर ? जी नवीन डिझाईन्स आपण योजली आहेत ती टेरीन, वुलन यांसारख्या महाग कापडांत आणण्या-ऐवजी चांगल्या सुती कापडांत, हातमागाच्या कापडांत आणल्या. फॅशन्सनी प्रभावित झालेले गिऱ्हाईक या वस्त्रांची किंमतही बेतात असल्याने घेतील की नाही ? शिलाईपेक्षा ही तयार वस्त्रे लोकांना परवडतील का ?"

"पण शेठ ! यात आपली बाजारातील 'इमेज' खराब होईल. आपली वस्त्रे घेणारे खास गिऱ्हाईक आपणही 'चीप' झालो असे म्हणू लागतील. शिवाय थोड्या हलक्या दर्जाच्या वस्त्रांत आपल्याला कोणाकोणाशी व कशी स्पर्धा करावी लागेल याची आपणांला तितकी कल्पनाही नाही. आपण केवळ दर्जेदार उच्च वस्त्रांचे निर्माते आहोत हे विसरून चालणार नाही."

"काही हरकत नाही. तुम्ही थोड्या कमी किमतीच्या पण चांगल्या वस्त्रांना कशी बाजारपेठ मिळवता येईल, ह्याचा अभ्यास करून मला १५ दिवसांत भेटा. आपण वेगळ्या ब्रँडची वस्त्रे त्या विभागातही लोकप्रिय करू शकू असे मला वाटते. अशी स्वस्त पण आकर्षक वस्त्रे निर्यातीलाही चांगली होतील. कारण तेथे करांचा भार तितका नसेल व इन्सेंटिव्हही चांगले मिळतील."

रेडिमेड कंपनीने एक पायरी खाली उतरून स्वस्त वस्त्रे बाजारात आणावी काय ? त्याही बाजारपेठेत असलेल्या प्रचंड स्पर्धेला ते उतरू शकतील का ?

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ३ ऑक्टोबर, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## भारताला मिळालेल्या मदतीचा उच्चांक

जागतिक बँक आणि तिच्याशी संबद्ध असणारा आंतरराष्ट्रीय विकास संघ ह्यांचा वार्षिक अहवाल प्रसिद्ध झाला आह. अहवालात दिलेल्या आकडेबद्ध माहितीप्रमाणे ३० जून १९७३ ह्या दिवशी संपलेल्या वर्षात मदत घेणाऱ्या देशांपैकी सर्वात अधिक मदत भारताला मिळालेली आहे. अहवालाच्या वर्षी भारताला ५६·४ कोटी डॉलर्सच्या रकमेची मदत देण्यात आली. भारताला देण्यात आलेल्या मदतीचा हा उच्चांक आहे. १९७२ साली भारताला ४७·२२ कोटी डॉलर्स मदतीदाखल मिळाले होते. त्यापूर्वीच्या वर्षांचे आकडे असे आहेत : १९७१ साली २४·३४ कोटी डॉलर्स, १९७० साली २६·७५ कोटी डॉलर्स आणि १९६९ साली १९·३० कोटी डॉलर्स. १९६९ ते १९७३ ह्या पाच वर्षांच्या काळात भारताला बक आणि विकासंघ ह्यांच्याकडून १७३·९६ कोटी डॉलर्सची मदत मिळाली आह. त्यापूर्वीच्या पाच वर्षांच्या काळात ७८ कोटी डॉलर्सची रक्कम मिळालेली आहे. गेल्या पाच वर्षांत आंतरराष्ट्रीय विकास संघाकडून भारताला १५२·९ कोटी डॉलर्स मिळाले. उरलेली २१·०५ कोटी डॉलर्सची मदत जागतिक बँकेकडून मिळाली. अहवालाच्या वर्षी भारताला मिळालेल्या एकूण मदतीपकी ४९·०४ कोटी डॉलर्सची मदत विकास संघाकडन मिळालेली आहे. संघाकडून मिळालेल्या कर्जाऊ रकमांची मुदत ५० वर्षांची आहे. त्यावर व्याज आकारण्यात येत नाही. परंतु कारभार पाहण्यासाठी अल्पसे सेवामूल्य घेण्यात येते. जागतिक बँक व संघ ह्यांनी मिळून एकूण ३५५·५ कोटी डॉलर्सची मदत विकसनशील देशांना दिलेली आह. जागतिक बँकेने ४२ देशांना ७३ कर्जे मंजूर केली.

---

## अमेरिकेने दिलेल्या कर्जाचा विनियोग

अमेरिकेने भारताला गेली कित्येक वर्षे गव्हाच्या खरेदीसाठी मदत दिलेली आहे. हा गहू भारतात विकून आलेल्या रकमेचा उपयोग कसा करावा ह्याबद्दल उभयता राष्ट्रांच्या सरकारांत अलीकडे विचारविनिमय चालू होता. अमेरिकेकडून घेतलेल्या गव्हाची किंमत जवळपास ३०० कोटी डॉलर्स इतकी आहे. ह्या कर्जाची फेड डॉलरच्या चलनात करावयाची नव्हती; रुपयाच्या चलनात करावयाची होती. कर्जाची फेड कशी करावयाची ह्यासंबंधी उभयता देशांत वाटाघाटी चालू होत्या. ह्या कर्जापैकी १० कोटी डॉलर्स रोखीने देण्यात यावेत आणि ९० कोटी डॉलर्स अमेरिकेच्या भारतामधील कामकाजासाठी खर्च करण्यात यावेत असे भारताने सुचविले होते. ही सूचना अमेरिकेने मान्य केली असल्याचे समजते. तरीही कर्जापोटी २०० डॉलर्सची रक्कम शिल्लक राहते. ह्या रकमेचा उपयोग भारतातील उपयुक्त कामासाठी करण्यात यावा असे सुचविण्यात आले आहे. २०० कोटी डॉलर्सच्या रुपयातील चलनाचा उपयोग भारतामधील शेतीचा विकास साधण्याचे काम, ग्रामीण भागातील विद्युत्–पुरवठा योजनेची कामे, घरबांधणी व इतर विकासकार्ये ह्यांच्यासाठी करण्यात यावा असे भारतातर्फे सुचविण्यात आले आहे. अमेरिकेने भारताला पुरविलेल्या अन्नधान्याच्या कर्जाची फेड कशी करावी ह्याबद्दल अलीकडे वाटाघाटी चालू होत्या. ह्या कर्जाला पी. एल. ४८० कर्ज असे म्हणण्यात येत असे. गव्हाच्या खरेदीसाठी अमेरिकेने दिलेल्या ह्या कर्जाचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर बराच दाब पडत असल्याचे निदान करण्यात येत असे. कर्जाची परतफेड कोणत्याही प्रकारे झाल्यास भारताची अर्थव्यवस्था काहीशी मार्गी लागेल.

---

## हिशेबतपासनिसांनी आपली जबाबदारी ओळखावी

इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ह्या संघटनेची २४ वी वार्षिक सभा दिल्ली येथे भरली होती. सभेत भाषण करताना मध्यवर्ती सरकारचे कायदेमंत्री श्री. एच. आर. गोखले म्हणाले की हिशेबतपासनिसाचा व्यवसाय करणाऱ्या लोकांनी करचुकवेपणा आणि काळा पैसा ह्या अनिष्ट गोष्टींना आळा घालण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना मदत केली पाहिजे. त्यांनी केवळ कंपन्यांच्या भागधारकांच्या हिताचाच विचार करण्याचे थांबविले पाहिजे. भागधारकांच्या मर्यादित हितसंबंधांच्या पलीकडे नजर टाकून सार्वजनिक हिताकडे त्यांनी लक्ष दिले पाहिजे. तरच समाजाने त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासास ते पात्र ठरतील. सार्वजनिक कंपन्या आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना सामाजिक हिताकडे दुर्लक्ष करणार नाहीत हे पाहण्याच्या कामी त्यांना चांगले कार्य करता येईल. कंपनी कायदाविषयक जे नवीन विधेयक तयार करण्यात येत आहे त्यात करचुकवेपणा टाळण्यासाठी, त्यांच्यावर अधिक भार टाकण्यात येणार आहे. ह्या व्यवसायात नव्याने पडलेल्या तरुण लोकांना कंपन्यांच्या

ऑडिटची कामे मिळण्यात अडचणींना तोंड द्यावे लागत आहे हा प्रश्न सोडविण्याचा विचार सरकार करीत आहे. १९७२ चे कंपनी कायदा दुरुस्ती बिल मंजूर झाले म्हणजे ऑडिटर्सच्या नेमणुकीसंबंधी काही उपाय योजण्यात येतील. करचुकवेपणा व काळा पैसा ह्यांनी हिंदी अर्थव्यवस्था पोखरली गेली आहे ह्याबद्दल आता दुमत राहिलेले नाही. सरकार ह्या गोष्टींना आळा घालण्यासाठी प्रयत्न करीत आहे. ह्या प्रयत्नांत हिशेबतपासनिसांची मदत घेण्याचा कायदेमंत्र्यांचा विचार स्वागतार्हच आहे.

---

## शिक्षिकांच्या पोषाखाबद्दल चाललेला वाद

दक्षिण फिलिपाइन्समधील एका शहरात सार्वजनिक शाळांचे अधिकारी आणि शाळांतून काम करणाऱ्या शिक्षिका ह्यांच्यात पोषाखाबद्दल वाद उत्पन्न झाला आहे. शाळांच्या अधिकाऱ्यांनी असा हुकूम काढला आहे की शिक्षिकांनी शाळेत काम करताना गुडघ्याच्या फार वर असलेला स्कर्ट वापरू नये. हुकमाची कारणमीमांसा देताना असा युक्तिवाद करण्यात आला आहे की अशा प्रकारचा पोषाख करणे शिक्षिकांना शोभणारे नाही. म्हणून त्यांनी आपल्या स्कर्टची लांबी गुडघ्याच्या वर पांच सेंटिमीटरपर्यंत तरी खाली येईल इतकी ठेवली पाहिजे. शाळाधिकाऱ्यांच्या मताने स्कर्टची ही लांबी शिक्षिकांच्या पेशाला योग्य अशी आहे. शाळाधिकाऱ्यांनी ह्या बाबतीत पालकांची मते अजमावण्याचा प्रयत्न केला. काही पालकांनी अधिकाऱ्यांच्या मताला पाठिंबा दिला. त्यांच्या मताने वाजवीपेक्षा अधिक आखूड स्कर्ट वापरणाऱ्या शिक्षिकांमुळे अल्प वयाच्या मुलामुलींवर चांगले संस्कार तर होत नाहीतच; पण झाले तर वाईटच होतात. त्यांच्या मताने सुडौल पायांच्या दर्शनाने मुलांचे चित्त त्यांच्याकडे आकृष्ट होते. ह्या उलट शिक्षिकांनी अगदी ठाम नकाराचा पवित्रा घेतला आहे. त्यांचे म्हणणे असे की आखूड स्कर्ट घालणे हा स्त्रियांच्या फॅशनचाच एक भाग असल्याने त्याच्याबद्दल वाद घालीत बसणे योग्य नाही. शिवाय ज्या मुलामुलींच्या समोर त्यांना शिकवावे लागते त्यांची वये लहान असतात. त्यांना आखूड स्कर्टचा अर्थ कळण्यासारखा नसतो. तेव्हा शाळाधिकाऱ्यांनी काढलेला फतवा त्यांच्या नागरिक हक्कावर गदा आणणारा आहे. म्हणून तो ताबडतोब मागे घेण्यात यावा.

---

## विमाने कमी वेगाने चालवून जळणाची बचत

विमानांना लागणाऱ्या विशेष प्रकारच्या तेलाचा देशात तुटवडा आहे. त्याची आयात करावयाची झाल्यास परदेशीय चलन बरेच द्यावे लागेल. ह्यावर उपाय म्हणून पेट्रोल व रसायन खात्याने एक उपाय सुचविला आहे. खात्याने संरक्षणखात्याला आणि नागरी विमान वाहतूक खात्याला असे सुचविले आहे की विमाने कमी वेगाने चालवून जळणात बचत होण्यासारखी आहे काय, ह्याची तपासणी करण्यात यावी. अमेरिकेतल्या पॅन अमेरिकन विमान कंपनीने आपल्या विमानांच्या वेगात कपात करून एका वर्षात सुमारे १ कोटी गॅलन तेलाची बचत केलेली आहे. कंपनी आणखीही काही उपाय योजून तेलाची अधिक बचत करण्याचे उपाय योजणार आहे.

## दीर्घायुष्य आणि आरोग्याचे रहस्य

तरुणांनी वृद्धांना अभिवादन केले की आशीर्वाद देण्याची पद्धत आपल्याकडे आहे. ह्या पद्धतीत अर्थात सदिच्छेचाच भाग अधिक असतो. कारण, निरोगी दीर्घायुष्याची प्राप्ती अखेर प्रत्येक व्यक्तीच्या प्रयत्नावर आणि तिला मिळालेल्या सामाजिक व नैसर्गिक वारशावर अवलंबून असते. जपानमध्ये दीर्घायुष्यासंबंधी अलीकडे एक पाहणी करण्यात आली. १०० वर्षांपेक्षा अधिक जगलेल्या ११७ स्त्री-पुरुषांचा पाहणीत समावेश करण्यात आला होता. त्यांच्या जीवनाचा ७ महिनेपर्यंत कसून अभ्यास केल्यावर काही निष्कर्ष काढण्यात आले. अभ्यासकांनी असा सल्ला दिला आहे की दीर्घायुष्य प्राप्त होण्यासाठी चांगली झोप घ्यावी, ग्रामीण भागात वसती करावी, शारीरिक कष्टाची कामे करावी; मेंदू ताजातवाना ठेवावा, भेदबुद्धी होऊ देऊ नये आणि प्रथिनयुक्त सकस आहार घ्यावा. पाहणीतील व्यक्तींपैकी १७ टक्के पुरुष आणि ४६ टक्के स्त्रिया ह्यांनी आपल्या तारुण्यात शारीरिक श्रमांची कामे केलेली होती आणि आजही त्यांच्यापैकी बहुतेक जण घराशेजारील बागकाम करीत असतात. काही थोड्या व्यक्तींना रात्री झोप येण्यास अडचण पडते असे आढळून आले; ८० टक्के व्यक्ती दररोज दिवसा थोडीशी झोप घेतात. पाहणीतील एकूण लोकांपैकी निम्म्यापेक्षा अधिक जण रोज निदान एक तरी अंडे खातात. शिवाय मांस व मासे ह्यांचाही त्यांच्या आहारात समावेश होता. दीर्घायुषी होणे ही गोष्ट व्यक्तीच्या दृष्टीने आकर्षक असली तरी कोठल्याही देशाच्या लोकसंख्येत दीर्घायुषी म्हणजेच म्हातारी माणसे प्रमाणाबाहेर झाली तर त्यांच्या अर्थोत्पादनाच्या पात्रतेवर विपरीत परिणाम झाल्याशिवाय राहात नाही.

---

## सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांना नफा

सार्वजनिक मालकीचे कारखाने आता नुकसानीच्या सावटांतून बाहेर पडू लागले आहेत. मध्यवर्ती सरकारच्या मालकीच्या १०१ पेक्षा अधिक कारखान्यांनी मिळून १९७२–७३ साली ९० कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविला आहे. आतापर्यंत सार्वजनिक मालकीच्या कारखान्यांना वर्षानुवर्ष सतत तोटा येत असे. १९७१–७२ साली त्यांना १४·४२ कोटी रुपयांचा तोटा झाला होता. चालू असलेल्या ६० पेक्षा अधिक कारखान्यांनी प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला आहे. १९७२–७३ साली हिंदुस्थान स्टील लि. ह्या प्रचंड कारखान्याला होणाऱ्या तोट्यातही घट झाली आहे. १९७१–७२ साली कारखान्याला ४४·८१ कोटी रुपये तोटा सोसावा लागला होता. तो आता २७·७६ कोटी रुपयांपर्यंत खाली आला आहे. त्याशिवाय इतर काही कारखान्यांनीही आपला तोटा कमी करण्यात यश मिळविले आहे.

---

## उद्‌बोधक उद्‌गार

### बड्या कर्जदारांनी सहकारी चळवळीचा केलेला विश्वासघात

"सहकारी चळवळीतील कर्जे परिणामकारक रीत्या वसूल करण्यासाठी पुढील वर्षी सरकार कायदा करणार असून तो कर्जदारांना गोत्यात आणण्यासाठी नसून सहकारी चळचळ बळकट करण्यासाठी आहे. सहकारी चळवळीतील थकबाकीची छाननी केली तर लहान शेतकऱ्यांनी कर्जफेड केलेली दिसते. पण वशिला असणारांनी बायकोच्या, भावांच्या, नातेवाइकांच्या, इतकेच काय, त्रयस्थांच्या नावांवर कर्जे घेतली अशांची थकबाकी प्रचंड आहे. त्यांनी सहकारी चळवळीचा विश्वासघात केला आहे. हेच लोक "कर्जे थकेनात का! सरकार काय करणार आहे?" ही भावना पसरवीत आहेत. पण, सरकार कर्जाची सूट देणार नाही. नैसर्गिक आपत्ति-काळात याबाबत सहानुभूतीने विचार करणे सरकारचे कर्तव्य आहे. पण ह्याचा अर्थ अशी कर्जे बुडविता मात्र येणार नाहीत. कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्थांची आर्थिक ताकद घटली तर सर्वच अर्थव्यवस्था धोक्यात येणार. हे रहाटगाडगे बंद पडेल. पूर्वीच्या काळातील सावकारी कर्जे आणि आज सहकारी चळवळीमार्फत वाटली जाणारी कर्जे यांत मूलभूत फरक आहे. सहकारी चळवळीतला पैसा सरकारी आहे. तो पैसा सामान्य माणसाने निढळाच्या घामाने मिळविलेल्या पैशातून भरलेल्या करातून निर्माण झालेला आहे. त्यांनी घाम गाळावयाचा आणि मूठभर लोकांनी कर्जे माफ करा म्हणावयाचे हे कोणीही ऐकून घेणार नाही."

—सहकारमंत्री यशवंतराव मोहिते

---

### सहकारी साखरकारखान्यांची उसासाठी अनिष्ट स्पर्धा

सहकारी साखरकारखाने गेटकेन उसासाठी सहकारी क्षेत्रातच स्पर्धा करून एकमेकांचे कार्यक्षेत्रात अतिक्रमण करून ऊस मिळविण्याचा प्रयत्न करतील व या प्रकारे सहकारी साखर उद्योग धोक्यात आणतील तर अशा कारखान्यांविरुद्ध योग्य ते इलाज योजण्यासाठी शासनाला कडक धोरण स्वीकारावे लागेल. सहकारी कारखाने एकमेकांच्या कार्यक्षेत्रात अतिक्रमण करून व अधिक भाव देण्याचे आकर्षण दाखवून ऊस गळितासाठी नेत असतात. यामुळे ह्या सहकारी उद्योगाला गैर वळण लागण्याचा धोका आहे. अधिक भावाच्या आकर्षणाने सभासद—ऊस उत्पादकही असा ऊस कागदोपत्री हालचाली करून देतो. सहकारी कारखानदारांस विधायक वळण लावण्यास जे लोक सहकार्य न देता अतिक्रमण चालू ठेवतील, त्यांचेविरुद्ध कडक उपाय योजण्यासाठी जरूर विचार करावा लागेल.

—गृहखात्याचे राज्यमंत्री शरद पवार

### फर्म्सचा खेळावरील खर्च उत्कृष्ट गुंतवणूक ठरते

क्रीडापटूंना संस्थानिकांचा आश्रय मिळत असे; आता त्यांना इतरांच्या मदतीकडे बघावे लागते. व्यापारी फर्म्स क्रीडापटूंना मदत करू लागल्या आहेत, हे योग्यच आहे. परंतु, खऱ्या अर्थाने क्रीडापटूंना उत्तेजन देणाऱ्या फर्म्स फारच थोड्या आहेत. टाटा आणि एसीसी सारख्यांचा खेळाकडे बघण्याचा दृष्टिकोन लक्षणीय आहे. त्यांचे अनुकरण आमची बँक, त्याचप्रमाणे मफतलाल आणि महिंद्र फर्म्स करीत आहेत. माझ्या खेळाचे—क्रिकेटचे—उदाहरण घेतले तर दररोज काही तास सराव केल्याखेरीज उत्कृष्ट फॉर्मात खेळाडू येणारच नाही. भारतातील खेळाडूला—त्याला नोकरी असेल तर—१० मिनिटे नेट प्रॅक्टिस मिळाली तरी तो अगदी नशीबवानच समजला पाहिजे, अशी परिस्थिती आहे. इतर देशांत धंदेवाईक खेळाडूंच्या प्रथेने हा प्रश्न सोडविलेला आहे. त्यामुळे तेथे मोसमाबाहेरही खेळाडू दररोज दोन-तीन तास सराव करू शकतो. सरकारचीही खेळाडूंना भरपूर मदत असते. ऑस्ट्रेलियाने टेनिसच्या खेळात काही काळ एवढे वर्चस्व गाजविले, त्याचे कारण टेनिसपटूंना सिगारेट्स आणि क्रीडासाहित्य फर्म्सनी आपल्या पटावर ठेवले होते. आजचा भारतीय टेनिसपटू विजय अमृतराज ह्याला असा कुणी हरीचा लाल भेटेल तर तो आणखी कितीतरी विक्रम करू शकेल. खेळांवर केलेला खर्च फर्म्सच्या प्रसिद्धीस चांगला हातभार लावतो हे परदेशांनी ओळखले आहे.

अजित वाडेकर

(स्टेट बँक ऑफ इंडियाचे पब्लिक रिलेशन्स मॅनेजर)

---

### उपासमारीचा इशारा

"धान्याचे उत्पादन खूपच वाढविले नाही, तर १९८० चे सुमारास जगाच्या लोकसंख्येपैकी किमान दोन तृतीयांश लोकांच्या वाट्याला उपासमार येईल. काही देशांनी धान्योत्पादन वाढविले असले, तरी वाढत्या लोकसंख्येमुळे त्याचा सुपरिणाम दिसून येऊ शकत नाही. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका ह्यांतील २०० कोटी लोकसंख्या म्हणजे जागतिक लोकसंख्येच्या दोन तृतीयांशाइतकी भरते, पण त्यांच्याजवळ पीक काढता येण्याजोग्या जमिनीपैकी फक्त ५५% जमीन आहे आणि ती उत्तर अमेरिका, युरोप, रशिया, जपान, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड येथील विकसित प्रदेशातील जमिनीइतकी सुपीकही नाही. आतापासून १९८० पर्यंतच्या काळात म्हणजे येत्या सात वर्षांत जगाच्या अविकसित प्रदेशांच्या लोकसंख्येत विकसित देशांच्या एकूण लोकसंख्येच्या पाच पटीइतकी वाढ होईल."

—आय. एम. सी. चे शेतीतज्ज्ञ मि. एरिक एकेडाही, ह्यांनी जकार्ता येथील पत्रकार परिषदेत केलेले निवेदन.

---

# बढती कशावर? वरिष्ठांच्या रीपोर्टवर की कामाच्या गुणावर?

( शाम रघुनाथ साखरे, C/o बँक ऑफ महाराष्ट्र, तासगाव )

अदृश्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नाटेठोम तालुक्याच्या ठिकाणी श्री. रंगराव हे बँक सिनियर इन्स्पेक्टर म्हणून काम करीत होते. त्यांच्या अधिकारक्षेत्रात सात-आठ शाखा होत्या. शाखांना भेटी देणे, तेथील तपासणी करणे, शाखांकडून वेळोवेळी स्टेटमेंट मागवणे, वसुलीच्या काळात शाखाधिकाऱ्यांच्या कक्षेतील ग्रामीण सोसायट्यांचा वसूल करणे, नवीन कर्जाचे वाटप करणे व हेड ऑफिसच्या धोरणानुसार इतर शाखांना आदेश देणे व कार्यवाही करणे हे त्यांचे मुख्य काम.

मंगलपूर गावी अदृश्य जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा होती व ती नाटेठोम तालुक्यात असल्यामुळे व्यवस्थापनाच्या दृष्टीने रंगराव सिनियर इन्स्पेक्टर यांचेकडे होती. मंगलपूर शाखेचे शाखाधिकारी सतगुणे खरोखर नावाप्रमाणे गुणी होते. सोसायटीच्या खऱ्या अडचणी लक्षात घेऊन ते काम करीत असत. कामात कुचराई व ढिलाई त्यांना चालत नसे. त्याचप्रमाणे निष्कारण सोसायटीच्या कर्जवाटपाच्या वेळी व वसुलीच्या वेळी अडचण करणेही त्यांना पसंत नव्हते. कायदा व व्यवहार यांची सांगड घालून ते सतत वागत. स्वत: कामात तरबेज व कुणाच्याही पै-पैशाला मिंधे नसल्यामुळे ते स्वाभिमानाने काम करीत असत.

हे सर्व गुण रामराव सिनियर इन्स्पेक्टर यांच्या दृष्टीने चांगले नव्हते. रामराव यांना हे वागणे पसंत नव्हते. त्यामुळे सिनियर इन्स्पेक्टर व मंगलपूरचे शाखाधिकारी यांच्यात वारंवार खटके होत असत व याचा परिणाम म्हणूनच बेतावेताने रामराव आपले तोंडी तसेच लेखी रिपोर्ट हेड ऑफिसला पाठवू लागले. रिपोर्ट कसे जात असतील याची वाचकांना कल्पना आली असेलच. मात्र चांगल्या अगर वाईट रिपोर्टची फिकीर सतगुणे यांना नव्हती. कारण, प्रामाणिकपणे व सदसद्विवेकबुद्धीला स्मरून काम करण्याचे बाळकडू ते प्यालेले होते.

मह्राड सेवा सहकारी सोसायटीचे गोडाऊन मंगलपूर येथे होते व सोसायटीचे पदाधिकारी सर्व दृष्टीने "बडे" होते. त्यामुळे जवळजवळ ७–८ वर्षांपासून सोसायटी ४–५ हजार रुपयांनी थकबाकीत होती.

वसुलीच्या सिझनमध्ये वसुली लवकर व्हावी, सर्वांना मार्गदर्शन व्हावे या दृष्टीने बँकेचे जनरल मॅनेजर यांनी नाटेठोम तालुक्याच्या ठिकाणी सिनियर इन्स्पेक्टर यांच्या अधिकारातील सर्व शाखाधिकाऱ्यांची मिटिंग बोलाविली. मिटिंगचा विषय वसुली व इतर अडचणी, असा होता.

एकेक शाखाधिकारी यांनी वसुलीचे अंदाज व आपल्या अडचणी कथन केल्या. नंतर मंगलपूर शाखाधिकारी यांनी आपल्या शाखेचा अहवाल वसुलीचे अंदाज सांगितले. ओघानेच मह्राड सेवा सहकारी सोसायटीचा विषय निघाला. सिनियर इन्स्पेक्टर यांनी सांगितले वसूल होणार नाही, थोडे अवघड आहे, तेव्हा सध्या त्या सोसायटीकडे लक्ष देऊ नये. तेव्हा मात्र सतगुणे उभे राहिले व म्हणाले, मी दोन–अडीच महिन्यांत वसूल करण्याची व्यवस्था करतो. मात्र इतरांनी त्यात ढवळाढवळ करू नये. तसे त्यांनी आव्हानच स्वीकारले.

मंगलपूरला आल्यावर सतगुणे आपल्या कामाला लागले. सोसायटीचे चेअरमन व सेक्रेटरी यांना त्यांनी बोलावले पण नेहमीच्या सवयीप्रमाणे ते आले नाहीत. तेव्हा स्वत: सतगुणे त्यांना भेटले. सोसायटीच्या दप्तराची पाहणी केली. त्यात गोडाऊनचे भाडे येणे होते ते साधारणपणे ३–३॥ हजार रुपये होते. हातावर शिल्लक १–१॥ हजार होती. प्रथम सतगुणे हे ज्यांनी गोडाऊन भाड्याने घेतले होते त्या व्यापाऱ्याला भेटले व भाड्याचे पैसे बँकेत सोसायटीच्या कर्जखाती चार दिवसात भरण्याबद्दल सांगितले. जर भाडे भरले गेले नाही तर गोडाऊनला बँकेचे कुलूप घातले जाईल असेही सांगण्यात आले. सतगुणे यांचे गुण व धमक व्यापाऱ्याला परिचित होती. त्यांनी चार दिवसांतच पैशाचा भरणा केला. इतर थकबाकीदार यांना भेटून गोडीने, प्रसंगी धाकाने, रकमा वसूल करून थकबाकी सर्व वसूल केली. तसेच चेअरमन, सेक्रेटरी यांना वसूल झाल्याच्या सूचना दिल्या. तसेच हेड ऑफिस व सिनियर इन्स्पेक्टर यांनाही तारा करून वसूल झाल्याचे कळविले व स्वतंत्र पत्राने सोसायटीस नवीन कर्ज देण्याबद्दल शिफारस केली.

ज्या वेळी श्री. सतगुणे यांच्या प्रमोशनचा प्रश्न आला त्या वेळी सिनियर इन्स्पेक्टर यांचे प्रतिकूल रिपोर्ट मॅनेजमेंटच्या समोर होतेच. तथापि त्यांचे काम व तडफही मॅनेजमेंटला माहीत होती. तेव्हा मॅनेजमेंटने काय निर्णय घ्यावा याचे मत-वाचकांनी सांगावे.

सतगुणे यांचे मत असे आहे की सिनियर इन्स्पेक्टर व हेड ऑफिसचे अधिकारी यांच्या गाठीभेटी वारंवार होतात. त्यामुळे आमच्याबद्दलचे बरे-वाईट मत ते बनवू शकतात. आम्ही म्हणजे हाताखालचे लोक फारच क्वचित वरिष्ठ लोकांना भेटू शकतो. त्या वेळी आम्ही आमचे मत स्पष्ट व मोकळेपणाने मांडू शकत नाही. मांडल्यास ती चहाडी अगर वशिला असे संबोधले जाते. खरोखर वाचक सतगुणे यांच्या मताशी सहमत होतील काय? तसेच मॅनेजमेंटला सतगुणे यांच्या कामाची तडफ दिसते पण त्याचेबद्दल रिपोर्ट बरे नाहीत, तर मॅनेजमेंटने सतगुणे यांच्या प्रमोशनबद्दल काय निर्णय घ्यावा? हे वाचक सांगू शकतील काय?

---

# राष्ट्रीयीकृत बँकांचा ओव्हरटाईम

## कामासाठी ओव्हरटाईम, का पैशाची चटक?

( म. ज. राजमाचीकर, बी. कॉम, मुंबई )

राष्ट्रीयीकृत बँकांनी दिलेला ओव्हरटाईम–भत्ता यासाली आलेली माहिती ता. १८–७–७३ च्या 'अर्थ' च्या अंकात वाचली. राष्ट्रीयीकरण ( नॅशनलायझेशन ) झाल्यापासून म्हणजे १९६९ पासून ४०५ लक्ष रुपयांवरून तो १९७२ मध्ये ६१६ लक्ष रुपयांवर गेला आहे. वाचून जरा विचित्र वाटले. इतर कुठल्याही क्षेत्रापेक्षा बँकिंग क्षेत्रात हा ओव्हरटाईम–भत्ता भयंकरच आहे. तेवढ्या खर्चात २,००० नवे कर्मचारी नेमता येतील व त्यामुळे थोड्या-फार प्रमाणात तरी बेकारी निवारण्यास मदत होईल, असा हिशोब करण्यात आला आहे, हे म्हणणे मात्र अजिबात पटत नाही. कारण, नव्या कर्मचाऱ्यांची आवश्यकताच नाही! १९६८–६९ साली बँकेत असलेला नोकरवर्ग व १९७२-७३ मध्ये असलेला नोकरवर्ग यात खूपच वाढ झालेली दिसून येईल. खरे पाहता जास्त माणसे घेतल्यानंतर ओव्हरटाईम कमी होण्यास हवा होता. पण येथील परिस्थिती उलटी. यासंबंधी साधारणपणे असे म्हणता येईल की, पूर्वीच्या कामापेक्षा प्रत्येकागणिक काम कमी झाले आहे. बऱ्याचशा सेक्शनमधील मंडळी (आफिसची वेळ साधारणपणे १०॥ ते ५॥ ) ४॥ वाजताच काम संपले म्हणून निघून जातात. काही 'आम्ही सकाळी लवकर येतो' म्हणून निघून जातात. तेव्हा जर ही माणसे रोज काम लवकर आटोपते म्हणून लवकर जातात, तर मग ओव्हरटाईम का व्हावा, हेच समजत नाही. जर ही मंडळी त्यांचे ठरलेले काम संपल्यावर, जादा असलेले काम त्या वेळात करतील, तर ओव्हरटाईम कमी व्हावयास पाहिजे. म्हणजे ऑफिसची वेळ संपेपर्यंत कोणी जाऊ नये. अर्थात असे ठरल्यानंतर ही मंडळी आपले काम सावकाश करू लागतील व व ५॥ ची वेळ होईपर्यंत काम करतील.

प्रथम या बाबतीत दोन भाग पडतील. (१) 'हेड ऑफिस' व तेथे काम करणारी मंडळी व (२) 'शाखेतून' काम करणारी मंडळी.

हेड ऑफिसमध्ये काम करणारी मंडळी साधारणपणे आपला बराच वेळ गप्पात, १२॥, २॥, ४॥ अशा वेळांना हॉटेलमध्ये जाऊन चहा पिण्यात घालवतात. १२॥ व ४॥ वाजता १५।१५ मिनिटे आणि २॥ वाजता अर्धा तास ( जो ठरला आहे तो ) म्हणजे मिळून १ तास हॉटेलमध्ये किंवा कॅन्टीनमध्ये जातो. सिनेमाच्या गप्पा, राजकारणाच्या गप्पा, खेळाच्या गप्पा, क्रिकेट मॅच, एकमेकांची टिंगल, ह्यातच तो १ तास जातो. तेव्हा ७ तासांपैकी एक-दोन तास गेल्यावर ५ तास राहतात. त्यात जेवढे काम होईल तेवढेच. सध्या, रिझर्व बँकेची स्टेटमेंटस् खूपच वाढली आहेत. शाखेतुन आलेल्या स्टेटमेंटवरून त्याचे "एकत्रीकरण" करणे यातच खूप वेळ जातो, हे खरे आहे. हे काम रोजच थोडे थोडे करावे लागते. तेव्हा या कामाकरिता ओव्हरटाईमची जरुरी लागू नये. पण आता ही एक चटक लागली असल्यामुळे ती जाणे अवघड आहे.

तसेच एखाद्या अधिकाऱ्याने प्रत्येक सेक्शनमध्ये शांतपणे बसून तारीख १ ते ७ पर्यंतच्या काही दिवसांत व जेव्हा वर्दळ, गर्दी किंवा टपाल कमी असते त्या वेळेला, खरेच एका माणसाला, सबंध दिवसात संपूर्ण ५ तास काम असते का? या संबंधी नीट वॉच ठेवला पाहिजे. सेक्शन हेडला काम तरी किती असते, सध्या किती करतो, किती केसेस ड्राफ्ट करतो, स्वस्थ किती वेळ बसतो, याचे पण अवलोकन केले पाहिजे. ( यात १ दिवसाची रजा, अर्धी रजा, याचा सुद्धा विचार करणे जरूर आहे. ) सर्वांचा निःपक्षपातीपणे अभ्यास झाल्यावर मग त्या सेक्शनला ५ माणसे पाहिजेत का ४ पाहिजेत, ते ठरविणे. त्यामुळे असे वाटते की एक-एक किंवा दोन-दोन माणसे सेक्शनला जास्त निघतील

त्यानंतर नेमलेला शिपाईवर्ग. किती लोक सेक्शनमध्ये सर्वांचे काम व्यवस्थित करतात, किती लोक स्टूलवर बसून काम करतात, किती हिंडत असतात, बँकेत मोकळ्या जागेत उभे राहतात, याचा सुद्धा अभ्यास करणे जरूर आहे.

नंतर बँकेच्या प्रतिष्ठेकरिता नवीन घेतलेले निरनिराळे खेळाडू, यांचा पण विचार होणे जरूर आहे. ते किती वेळ काम करतात; प्रॅक्टिससाठी बँकेचे काम किती लवकर सोडून निघून जातात, त्यांचे उरलेले काम ते मॅच खेळायला गेल्यावर कोणी करायचे? सारख्या मॅचेस् म्हणून किती वेळ रजेवर राहायचे? त्यांना सवलती किती द्यावयाच्या? त्यांना खेळण्याकरिता व कामाकरिता किती वेळ द्यावयाचा? का ते बँकेचे जावई म्हणून त्यांना सर्व गुन्हे माफ? यांचा सुद्धा विचार होणे जरूर आहे.

आता शाखेमध्ये काम करणाऱ्यांचा विचार करू. हल्ली बऱ्याच मोठ्या शाखांतून माणसे बरीच नेमली गेली आहेत. कॅशबुक सेक्शन, लोन सेक्शन, कॅश क्रेडिट सेक्शन, स्टेटमेंट सेक्शन, हे विभाग स्वतंत्र झाले आहेत. याकरिता माणसे आहेत त्यांना तेच काम फक्त दिवसभर करावयाचे असते. उदा. कॅशबुक जुळवणाऱ्यांना फक्त रोज कॅशबुक जुळवावयाचे असते. पुष्कळ वेळा ते लवकर जुळते. १०॥ ला आलेले लोक २॥ ते ३ पर्यंत निघून जातात. ज्या दिवशी जुळणार नाही, त्या दिवशी फक्त जरा जास्त वेळ बसावे लागते. आता या व्यतिरिक्त काम करणारा वर्ग म्हणजे, ज्यांना काऊंटरवर काम करावे लागते तो. त्यांना सकाळ-संध्याकाळ काऊंटरवर ठराविकच वेळ काम करावे लागते. ते फक्त महिन्याला द्याव्या लागणाऱ्या बॅलन्सेसच्या वेळेला, ओव्हरटाईमची धडपड करतात. किती वेळात बॅलन्स बुक उतरवणार व किती वेळात ते जुळवून देणार याच्यासंबंधी प्रथम ऑफिसरशी चर्चा होते व मग ते ठरविले जाते. ते ४ तास

ओव्हर टाईम मागतात. ऑफिसर ३ तास म्हणतात. मग कोठे तरी रागावून चिडून सेटलमेन्ट होते. ऑफिसरने जास्त वेळ दिला नाही तर मुद्दाम माहीत असून फरक लावून ठेवायचा व अशारीतीने जास्त ओव्हर टाईम देत नाहीत म्हणून वेळ लावायचा व जेवढा काढता येईल तेवढा तो काढायचाच. ठरलेला ओव्हरटाईम झालाच पाहिजे. त्यात तुला किती, मला किती याची जणू स्पर्धाच लागते. यानंतर कॅश क्रेडिटची स्टेटमेंट करण्याचे काम. याही कामाकरिता काही शाखांतून पार्ट-टाईम माणसे नेमलेली आहेत. ही माणसे फक्त 'स्टेटमेंट'च करीत असतात. हे काम जर स्वतंत्रपणे होते, तर काऊंटरवर काम करणाऱ्याचा ओव्हरटाईम का व्हावा? व तो होणे जरूर आहे का? याचा सुद्धा विचार होणे जरूर आहे. थोडक्यात म्हणजे ओव्हरटाईम मिळालाच पाहिजे, म्हणून त्या दृष्टीने काम करणारे लोक व जणू हा आमचा अधिकार आहे, अशा तऱ्हेने हल्ली लोक वागत आहेत.

सर्व दृष्टीने नीट विचार केल्यास यातील कितीतरी रुपये वाचतील, असे मला वाटते.

---

### अमेरिकेच्या मालकीच्या इमारतीत होटेल

दिल्लीत मेहरुली विभागात अमेरिकेने स्वतःच्या उपयोगासाठी काही इमारती बांधल्या होत्या. ह्या इमारती आता अमेरिकेने भारत सरकारला देऊन टाकल्या आहेत. ह्या इमारतींचा उपयोग लवकरच त्या परिसरात प्रवाशांसाठी एक होटेल काढण्यासाठी करण्यात येणार आहे. भारताचे प्रवास विकास-मंडळ संकल्पित होटेलसंबंधी तपशीलवार योजना तयार करीत आहे. ह्या वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारतात येणाऱ्या परदेशीय प्रवाशांत २५ टक्के वाढ झालेली आहे. परदेशी प्रवाशांना साहाय्य करणाऱ्या सेवकांना शिक्षण देण्यासाठी बंगलोर येथे एक प्रशिक्षण केंद्र काढण्यात येणार आहे.

---

### २० हजार वनस्पतींना धोका

जगातील वनसंपत्तीचे रक्षण करणाऱ्या जागतिक संघटनेने अशी माहिती दिली आहे की पृथ्वीवरील २० हजार प्रकारच्या वनस्पती नाहीशा होण्याच्या मार्गावर आहेत. नामशेष होऊ पाहणाऱ्या जंगलांतील प्राण्यांपेक्षा ही संख्या २० पटीने अधिक आहे. सुमारे १,००० प्रकारचे वन्यप्राणीही हळूहळू नष्ट होत आहेत. भारत आणि आफ्रिका ह्या खंडांतून शेळ्या-मेंढ्या आणि गुरे सापडेल त्या जमिनीवर सतत चरत असतात. कोठलीही हिरवी वनस्पती हे कळप टिकू देत नाहीत. वनस्पती-जीवनाला ह्या कळपांपासून सर्वात अधिक धोका उत्पन्न झालेला आहे. एके-काळी हिरवीगार असणारी राने त्यांनी ओसाड करून टाकली आहेत.

---

Swastik FOAM

cosy
sitting
pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

"नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे."
—पं. जवाहरलाल नेहरू

महाराष्ट्रातील सहकारी चळवळींची प्रेरक शक्ती

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह
बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

सामुदायिक हितासाठी झटणारी
आगळी बँक

## मानवाच्या भवितव्याबद्दल शास्त्रज्ञांचा इशारा

धार्मिक वृत्तीचे लोक जगातील सध्याच्या परिस्थितीविषयी निराश झालेले आहेत. सुखाची अपार साधने उपलब्ध झालेली असतानाही माणूस आपल्या नैतिक अध:पाताने सर्वनाश लवकरच ओढवून घेईल असे त्यांचे भाकित आहे. त्यांच्या ह्या भाकितात नवीन असे काही नाही. पण भौतिक सृष्टीचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ जेव्हा ही भाषा बोलू लागतात तेव्हा तिकडे अधिक लक्ष जाते. ब्रिटिश असोसिएशन फॉर दि अॅडव्हान्समेंट ऑफ सायन्स ह्या संघटनेची वार्षिक परिषद नुकतीच झाली त्यात अनेक शास्त्रांतील पारंगतांनी आपआपल्या शास्त्राच्या दृष्टिकोनातून माणसाच्या भवितव्याबद्दल धोक्याचा इशारा दिला आहे. ते म्हणतात की, माणसाला निसर्गाच्या शक्तीपासून जसे भय आहे तसेच माणूस आपल्या राहणीचे मान वाढविण्यासाठी निसर्गात जे बदल घडवून आणत आहे त्यापासूनही आहे. पृथ्वीच्या कवचात निरनिराळे थर असून त्यांच्या हालचालींमुळे भूकंप होत असतात. ज्वालामुखींचे स्फोट होत असतात. अशा प्रचंड उत्पातांवर माणसाने अजून नियंत्रण मिळविलेले नाही. त्यानंतर पृथ्वीवरील हवा व पाणी ह्यांचा विचार करता असे दिसते की काही प्रमाणात त्यांचे नियंत्रण करता येते. हवा व पाणी ह्यांच्या वलयात फार मोठे बदल झाले तर माणसावर फार भयंकर आघात होईल. मध्य व पश्चिम आफ्रिकेतील देशात गेली कित्येक वर्षे पर्जन्याचा अभाव आहे. पृथ्वीवरील हवामान बदलत चालल्याची ही खूण असावी. उत्तर व दक्षिण ध्रुवप्रदेशांतून समुद्रात येणाऱ्या हिमखंडांचाही विपरीत परिणाम होतो.

माणसाने आपल्या कर्तृत्वशक्तीने निसर्गात बदल घडविण्याचे सामर्थ्य मिळविलेले आहे. शास्त्रीय ज्ञानाचा तांत्रिक साधनात विकास करून अधिकाधिक सुखी होण्याचा प्रयत्न माणूस करीत आहे. ह्या प्रयत्नांतूनच नवनवे प्रश्न उभे राहात आहेत; आणि सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचे होत आहेत. त्यांपैकी एक तातडीचा प्रश्न म्हणजे शक्ति-साधनांचा. पृथ्वीच्या पोटातील ज्वालाग्रही इंधनांचा वापर सारखा वाढत चालला आहे. स्वीडनमधील संशोधनात असे आढळून आले आहे की ह्या इंधनांचा वापर असाच वाढत गेला तर इ. स. २,००० च्या सुमारास पृथ्वीवरील हवेतील कर्बवायूचे प्रमाण १८ टक्क्यांनी वाढेल. सध्या अमेरिकेत जे राहणीचे मान आहे ते जर जगातील सर्व देशांना प्राप्त झाले तर पृथ्वीवरील हवेचे व सागरांचे उष्णतामान फार मोठ्या प्रमाणावर वाढेल. त्यामुळे दोन्ही ध्रुवांवरील बर्फाचे हिमखंड विरघळून भूपृष्ठाचा बराचसा भाग जलमय होईल. ज्या नैसर्गिक संपत्तीचे पुन्हा उत्पादन होऊ शकत नाही अशी संपत्ती सध्या उधळण्यात येत आहे. खनिज तेलाचा वापर करून आज मोटारी, विमाने, आगगाड्या, आगबोटी, इत्यादी चालविण्यात येत आहेत. ही वाहतुकीची साधने वापरण्यासाठी दुसऱ्या कोठल्या तरी शक्ति-साधनाचा शोध लागला नाही तर सुमारे ६० ते ८० वर्षांनंतर ती सर्व निरुपयोगी होतील. अणुशक्तीचा वापर करता येणे अवघड आहे. जगातील खनिज तेलाचे साठे २२ ते १०० वर्षांच्या आत संपतील. त्याचबरोबर वाढत्या लोकसंख्येमुळे अधिक अन्नाची पैदास करावी लागेल. अन्नाच्या उत्पादनासही मर्यादा आहेत. सर्वांवर ताण म्हणजे दूषितीकरणाचा शाप. त्याने मनुष्याची संस्कृतीच नष्ट होण्याचा धोका आहे.

---

## चांगदेव कारखाना : जप्तीची नोटीस

चांगदेव साखरकारखान्याने १ कोटी, ९ लाख रुपये प्राप्तिकर भरला नाही म्हणून कारखान्यावर जप्ती आणण्यात आली आहे, असे विश्वसनीयरीत्या समजते, अशा आशयाची बातमी "जन्मभूमी" या गुजराती वृत्तपत्राने प्रसिद्ध केली आहे. ह्या कारखाना नगर जिल्ह्यातील पुणतांबे या गावी आहे. ही रक्कम १९६६-६७ ते १९७३-७४ या वर्षासाठी आहे, अशी माहिती देऊन ते वृत्तपत्र म्हणते की, कारखान्याने थोडी थोडी रक्कम भरली तरीही १ कोटी आणि ९ लक्ष रुपये थकबाकी शिल्लक राहिलीच आहे. गेल्या सहा वर्षांत कारखान्यावर निरनिराळ्या वेळी वसुलीसाठी नोटिसा बजाविण्यात आल्या होत्या.

---

## किमती व खरेदी-शक्तीची सांगड

सतत वाढत जाणाऱ्या किमतीची समस्या सोडविण्याचे प्रयत्न होत असले तरी त्यांना अद्याप यश मिळालेले नाही. अर्थव्यवस्थेच्या मूल प्रेरणात क्रांतिकारी बदल घडून आला तरच ह्या बाबतीत यश येण्याची शक्यता आहे असे काही तज्ज्ञांचे मत आहे. भारी किमतीच्या नोटा रद्द करण्याचा उपाय कितपत उपयुक्त ठरेल ह्याविषयी शंका व्यक्त करण्यात येत आहेत. दरम्यान, व्यक्तींची खरेदीशक्ती व किमती ह्यांची सांगड घालण्याचा विचार सरकार करीत आहे. अन्नधान्याच्या किमती सर्वांना सारख्याच बाध्या लागतात. आता जीवनावश्यक वस्तूंचे दर श्रीमंतासाठी वेगळे व भारी ठेवावे अशी कल्पना पुढे येत आहे. उत्पन्नाच्या बाबतीत जर विषमता आहे तर भरपूर उत्पन्न असणाऱ्यांनाही गरिबांइतक्याच दराने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा का करावा, असा सवाल विचारण्यात येत आहे.


### "अर्था"चा दिवाळी अंक

"अर्था"चा ३९ व्या वर्षाचा दिवाळी अंक नेहेमीप्रमाणे वैशिष्ट्यपूर्ण आणि मोठ्या आकारात बुधवार, दि. २४ ऑक्टोबर १९७३ रोजी प्रसिद्ध होईल.

*आमच्या हितचिंतक व्यापारी—कारखानदारांनी आपल्या जाहिराती कृपया सत्वर पाठवाव्या.*

द. रा. कुलकर्णी
व्यवस्थापक, "अर्थ"

### गुजरात राज्यात साखरेचे सहकारी कारखाने

पाचव्या व सहाव्या पंचवार्षिक कार्यक्रमात गुजरात राज्यात साखरेचे १८ सहकारी कारखाने काढण्यात येणार आहेत अशी माहिती साखरकारखान्याविषयीच्या कमिटीने जाहीर केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री श्री. घिया उद्योगखात्याचेही मंत्री आहेत. ह्यासंबंधी माहिती देताना ते म्हणाले ५ व्या कार्यक्रमात १० सहकारी कारखाने आणि सहाव्या कार्यक्रमात बाकीचे कारखाने उभारण्यात येणार आहेत. सध्या राज्यात साखरेचे ८ सहकारी कारखाने आहेत. येत्या १० वर्षांत देशात साखरेचे ८० कारखाने काढण्यात येणार आहेत, त्यांपैकी १९ गुजरात राज्यात निघावयाचे आहेत. कारखान्यांसाठी जागा निवडण्याचे काम अद्याप व्हावयाचे आहे. प्रत्येक साखरकारखान्याची उभारणी करण्यासाठी ४ कोटी रुपयांच्या जवळपास भांडवल लागणार आहे.

---

### लक्षाधीशाच्या प्रेमहीन जीवनाचा शेवट

पाश्चात्य देशांतील अर्थप्रधान जीवनपद्धतीचा परिणाम आता झपाट्याने भारतासारख्या प्राचीन संस्कृतीचा वारसा असणाऱ्या देशांवर होऊ लागला आहे. पैसा हे जीवनाचे सर्वस्व मानणाची वृत्ती पसरत आहे. पण पैसा भरपूर असूनही प्रेमहीन जीवनाला कंटाळलेल्या एका लक्षाधीशाची कहाणी लक्षात ठेवण्यासारखी आहे. स्पेनमध्ये चिंध्यांचा व्यापार करणारा एक ६८ वर्षांचा लक्षाधीश होता. विजेच्या भारी दाबाच्या मनोऱ्यावर चढून त्याने स्वतःला गळफास लावून आत्महत्या केली. आत्मघात करण्यापूर्वी त्याने आपला सर्व पैसा म्हणजे नोटा जाळून टाकल्या. सर्व पैसा तो आपल्या घरातच ठेवीत असे. आपल्या कुटुंबातील माणसांचे आपल्यावर प्रेम नाही, अशी त्याची खरी-खोटी समजूत झालेली होती. मरणापूर्वी सर्व नोटा त्याने एका डबड्यात ठेवल्या व त्यांना आग लावून दिली. त्याचबरोबर खुलाशाची एक चिठ्ठीही लिहून ठेवली.

---

### समाजसेवेचा नवा मार्ग

उपकारांच्या फेडीचा अल्पसा प्रयत्न ह्या दृष्टीने समाजाच्या नैतिक अभिवृद्धीसाठी श्री. गो. ह. ( काका ) पुराणिक, सेवाधाम, रुईकर मार्ग, नागपूर हे नीतिप्रद, धार्मिक पुस्तिका विनामुल्य वाटीत असतात. गेली २० वर्षे त्यांचा हा उपक्रम चालू आहे. रामरक्षास्तोत्र, पसायदान, नारायगस्तोत्र, गीता, इत्यादी पुस्तकांच्या सहस्रावधी प्रतींचे त्यांनी वितरण केले. आता त्यांनी श्रीगणपत्यथर्वशीर्ष छापून वाटण्यास प्रारंभ केला आहे. हे पुस्तक तीस पानांचे, चांगल्या कागदावर आकर्षक रीतीने छापलेले आहे. श्री. पुराणिक ह्यांचा उपक्रम स्फूर्तिदायक असून ऋण फेडण्याचा नवा मार्ग दाखविणारा आहे. त्यांचे सातत्य अभिनंदनीय आहे.

---


BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : **659–60, Raviwar Peth, BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*





बँकेच्या 'धनवर्धिनी' ठेव योजनेतील एक योजना

**निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना**

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेडयुल्ड बँक

**महाराष्ट्रात सर्वत्र शाखा**




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )

ऑक्टोबर १९७३

# अर्थ

दिवाळी अंक

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र




स्वस्तिक फोम
-किती आरामदायी ...
आरामदायी: दिवसभराचा शीण स्वस्तिक फोमच्या आरामदायी, मृदु शय्येवर अंग टाकले की चुटकीसरसा नाहीसा होतो. सुरक्षित: स्वस्तिक फोममध्ये ढेकूण किंवा तत्सम जीवजंतू प्रवेश करू शकत नसल्यामुळे झोप मोडण्याची धास्ती नाही. त्याच्या असंख्य छिद्रांतून हवा खेळती राहात असल्यामुळे तो सदैव शीतल राहतो आणि तुम्हाला आराम देण्यास सदैव सिद्ध असतो. त्यात धूळही साचत नाही. टिकाऊ: स्वस्तिक फोमच्या गाद्या, उशा, तक्ये वगैरे वस्तू अनेक वर्षे सतत वापर करूनही त्यांचा आकार बिघडत नाही नि त्या खूप खूप टिकतात. त्यामुळे त्यावर खर्च केलेल्या पैशांचा पुरेपूर मोबदला तर मिळतोच पण पुन्हा पुन्हा खर्च करावा लागत नसल्यामुळे बचतही होते. स्वस्तिक फोमच्या गाद्या, उशा, लोड, तक्ये, मऊ बैठकी त्वरित तयार करता येतात व त्या हव्या त्या आकाराच्या बनविता याव्यात म्हणून तो मीटरच्या मापाने मिळतो. दिवाण, आरामखुर्च्या, कार सीटस् वगैरेंसाठी वापरण्यास अत्यंत उपयुक्त.
स्वस्तिक फोम - म्हणजेच आजीवन आराम.
स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.
स्वस्तिक गृह, खडकी, पुणे ३.
FOAM
FOAM
Dattaram-SRP-8MR

# तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड



स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स—कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

**ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइझ्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.**



**TF ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**

क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई—१.

Madison/TGM/7 Mar

TEL : 88 Teleg : Address ' DICENTBANK '.

## The Belgaum District Central Co-operative Bank Ltd.,

**BELGAUM**

* * * *

HEAD OFFICE : Poona-Bangalore Road, ( N. H. 4 ), Belgaum.

BRANCHES : 41 BRANCHES throughout the District.

* * * *

**FINANCIAL POSITION AT A GLANCE AS ON 1-9-1973.**

| | | | |
|---|---|---|---|
| Authorised Share Capital | : Rs. 1,75,00,000. | Working Capital | Rs. 11,78,07,078. |
| Paid-up Share Capital | : Rs. 1,20,14,850. | Loans out-standing | Rs. 8,08,47,703. |
| Reserve & Other Funds | : Rs. 55,72,815. | | |
| Deposits | : Rs. 6,09,88,519. | Net Profit for 1972-73 | Rs 13,59,675. |

* * * *

All types of Deposits are accepted in every office of the Bank.

Safe Vault System is available at :

**BAILHONGAL, SAUNDATTI AND BELGAUM BAZAR BRANCHES.**

* * * *

For further particulars contact the Bank's office.

**R. V. Mulimani**
Manager

**G. V. Ghodgeri**
President

भारताची औद्योगिक व सांस्कृतिक प्रगति व्हावी
ही किर्लोस्करांची मूळ प्रेरणा आहे.
शेती, मच्छीमारी, कारखानदारी व संरक्षण
अशा विविध क्षेत्रांत दर्जेदार किर्लोस्कर एंजिने
उत्तम कामगिरी करीत आहेत.
किर्लोस्कर फौंडेशन, वेरूळचा कैलास ट्रस्ट,
ज्ञानप्रबोधिनीचा खेडशिवापूरचा प्रकल्प,
महिला उद्योग पुणे व ग्रामीण कारागीरांचे प्रशिक्षण
अशा अनेक उपक्रमांद्वारे उद्योगधंद्यांच्या वाढीस
किर्लोस्करांनी चालना दिली आहे.
'सुंदर पुणे' योजनेखाली मुलांवर स्वच्छतेचे
संस्कार घडविणाऱ्या चढाओढी, शाळा कॉलेजांना
सहाय्य व क्रीडासंस्थांना सक्रिय प्रोत्साहन
किर्लोस्करांनी दिले आहे.
लक्ष्मणराव किर्लोस्करांनी सत्तर वर्षांपूर्वी
प्रज्वलित केलेल्या व अखंड तेवत असलेल्या
या उद्योगज्योतीच्या प्रकाशात अनेक
भारतवासीयांचे जीवन उजळण्यासाठी
किर्लोस्कर अविरत यत्न करीत रहातील.

**ही ज्योत अखंड तेवत आहे.**



किर्लोस्कर

**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि.**
१३ लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, पुणें ४११ ००३

STUSA

वर्ष ३१ ☆ **अर्थ** ☆ अंक २०

**दिवाळी अंक**

बुधवार, २४ ऑक्टोबर, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## संपादकीय

### ह्या समरप्रसंगी तुमचे—आमचे स्थान कोणते ?

*महागाई भयानक झाली आहे, जीवनावश्यक जिनसांचा तुटवडा वाढत आहे, नीट जगणेही कठीण होऊन बसले आहे, भविष्य-कालाचा विचारही करायला मन धजत नाही, काही सुचेनासे झाले आहे, परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडतच चालली आहे, अशी कित्येकांच्या मनाची अवस्था झालेली दिसते. रोजच्या कटकटींमुळे, शांतपणे विचार करून स्वत:चे धोरण आखायला फुरसतच मिळत नाही.*

*दिवाळीचा सण वास्तविक कितीतरी आनंदाचा. पण, बहुसंख्य लोकांना तो सण आता अडचणीत टाकणारा ठरत आहे. कारण, दिवाळी साजरी करण्याजोगी बहुतेकांची आर्थिक स्थिती नाही; मन:स्थितीही नाही; आजूबाजूची परिस्थितीही नाही; पाऊसपाणी उत्तम होऊनही यातनांची तीव्रता वाढतच आहे !*

*भारताच्या विकासासाठी, लोकांचे राहाणीमान वाढविण्यासाठी, सरकार योजना आखीत आहे, परंतु अपेक्षेच्या मानाने प्रगती झालेली अनुभवास येत नाही. सरकारी योजनांच्या अम्मल-बजावणीत कित्येक उणीवा आहेत; उपलब्ध सर्व पैसा कारणी लागत नाही, हे खरे आहे. परंतु, सामान्य नागरिकांनीही स्वत:ची जबाबदारी उचललेली नाही, असेच आत्मपरीक्षण त्यांना सांगेल.*

*प्रत्येक मनुष्य सरासरीने जे उत्पादन करतो (ते प्रत्यक्ष जिनसा तयार करण्यास लावलेल्या हातभाराच्या स्वरूपात असो वा विविध सेवांच्या स्वरूपात असो,) ते उत्पादन पुरेसे अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या त्याच्या किमान गरजा भागविण्यासही पुरेसे नाही, हे स्पष्ट आहे.*

*वास्तविक, ते उत्पादन त्याच्या किमान गरजा भागवून वाढावा निर्माण करणारे हवे. म्हणजे ह्या वाढाव्यातून अधिक चांगली राहणी शक्य कोटीत येते, बचतीला वाव राहतो, भांडवलसंचय होऊन नव्या संपत्तीच्या उत्पादनाकडे त्याचा विनियोग करता येतो.*

*प्रत्येक यंत्राची, कारखान्याची, काही ठराविक उत्पादनक्षमता असते, म्हणजे ठराविक उत्पादन करण्याची सिद्धता असते. ह्या सिद्धतेइतके उत्पादन झाले, तरच संपत्तीत समाधानकारक वाढ होत जाते. परंतु, त्या सिद्धतेच्या पाऊणपट किंवा अर्धापटच उत्पादन झाले तर संपत्तीत पुरेशी भर तर पडत नाहीच; उलट ते नुकसान-कारकच ठरते.*

*उत्पादनक्षमतेपेक्षा कमी उत्पादन झाले, तर प्रत्येकाच्या वाट्या-वरही प्रतिकूल परिणाम होतो, म्हणजे प्रत्येकाला कमी प्रमाणात हिस्सा मिळू लागतो. म्हणजेच, त्याच्या गरजा भागू शकत नाहीत.*

*उत्पादन हा शब्द नेहमी जिनसांच्या उत्पादनाचे संबंधात वापरला जातो. कधी कधी सेवांचे स्वरूपही उत्पादनाच्या व्याख्येत*

**ही दिवाळी व नवे वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांना व वाचकांना सुखाचे जावो !**

**अनुक्रमणिका**

१. संपादकीय ... ७
२. पाचवी पंचवार्षिक योजना : संकल्प आणि विकल्प ... ९
( मा. प. वि. पटवर्धन )
३. बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने काय साधले ? ( चिं. बि. जोग ) ... २१
४. उद्योगमहर्षी लक्ष्मणराव किर्लोस्कर ( शं. ज. जोशी ) ... २९
५. अभ्युदयाच्या आड येणारे जातिधर्माचे भेदभाव ... ३५
( शं. वा. किर्लोस्कर )
६. तुटीची अर्थव्यवस्था अर्थअव्यवस्था होत आहे काय ? ... ३७
( श्री. वा. काळे )
७. ओव्हरटाईममुळे उद्योगांचे गणित चुकणार आहे ! ... ४३
( स. वि. मेहेंदळे )
८. उद्योगधंद्यांतील उधारीचे व्यवहार ... ४५
( विजय गोखले )
९. रोमारोमात भिनलेला भ्रष्टाचाराचा रोग ... ५३
१०. साखरेच्या उद्योगाची वाढ ... ५८
११. चलनी नोटा आणि त्यांचे तारण ... ६०
१२. रिझर्व्ह बँकेचा प्रचंड नफा ... ६०

मोडणारे असते. अशा प्रकारचे उत्पादन शक्यतेच्या जास्तीत जास्त प्रमाणात होण्यासाठी यंत्रांप्रमाणे व्यवहारसंघटना आवश्यक असते, त्याचप्रमाणे प्रत्येक माणसाची प्रेरणा आणि कार्यक्षमता ह्यासही महत्त्व असते.

आपण आपल्या स्वतःच्या क्षमतेच्या मानाने उत्पादनास पुरेसा हातभार लावतो का हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. आपण त्या दृष्टीने विचार तरी करता का? आपल्या कृतीमुळे उत्पादन-वाढीस मदत होते ना, हे आपण तपासून पाहतो का? आपल्या कृतीमुळे उत्पादनात थोडीशीही घट होऊ नये, ह्याची आपण दक्षता घेतो का?

नुकतीच घडलेली ही गोष्ट आहे. बँकेतील आपल्या खात्यात काही डिव्हिडंड वॉरंट्स् भरण्यासाठी एक खातेदार गेले. डिव्हिडंड वॉरंट्स्च्या पाठीमागे पैसे घेणाराची सही आवश्यक होती, पण खातेदाराने सही केलेली नव्हती. बँकेच्या काउंटरवरील कारकुनाच्या लक्षात ही गोष्ट आली. तो म्हणाला, "साहेब, इथं सही करायची राहिली आहे." खातेदार म्हणाला, "मी सही करून देतो." तथापि कारकुनाने उत्तर दिले, "मी ही डिव्हिडंड वॉरंट्स् कलेक्शनसाठी पाठवतो, ती कॅश न होता परत आलीच, तर तुमच्याकडे पोस्टाने धाडू. मग सही करून पुनः भरा."

अगदी साधी गोष्ट आहे. परंतु, थोडक्या कारणासाठी कारकुनान किती काम वाढवून ठेवले पाहा! अशा रीतिने, असंख्य लोक विनाकारण स्वतःच्या संस्थेची, संघटनेची, कचेरीची, कारखान्याची, कार्यक्षमता कमी करण्यास कारणीभूत होत असतात. प्रत्येकाने थोडासा विचार करून कामाच्या गतीला व्यत्यय आणण्याचे टाळले, तरीसुद्धा उत्पादनाला कितीतरी मदत केल्यासारखे होणार आहे. उत्पादनात खंड पडेल किंवा त्याची गती मंदावेल, असे कोणतही कृत्य करणे म्हणजे दुष्ट प्रवृत्तींचे बळ वाढविणे होय.

आपल्या बुद्धीच्या आणि शरीराच्या क्षमतेच्या मानाने आपण पुष्कळच कमी काम करतो, करतो तेही काम अर्धवट करतो, असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. काही अपवाद निश्चित असतात. अशांची संख्या इतकी वाढली पाहिजे की, अपवादांचा नियम बनून कमी काम करणारेच अपवादात्मक व्हायला हवेत.

आपण समाजाला, राष्ट्राला जे देतो त्यापेक्षा अधिक घेतो, हे आपल्या सर्व दुखण्याचे मूळ आहे. तेव्हा, आपल्या कुवतीप्रमाणे जास्तात जास्त देण्याचे प्रत्येकाने ठरविले तर उत्पादनात पडणारी भर आश्चर्यकारक ठरेल. सरकारचे, संस्थेचे, कारखान्याचे काम म्हणजे प्रत्येकाच्या कामाची एकूण बेरीज होय आणि ती बेरीज पुरेशी होत नाही म्हणून तर त्यातून मिळणारा वाटा अपुरा पडत आहे. म्हणजेच, टंचाई, महागाई वाढत आहे.

सरकारने योग्य पुढाकार घेऊन आणि स्वतःच्या कारभाराच्या चोखपणाचा आदर्श जनतेपुढे ठेवून मार्गदर्शन करावयास हवे. ते तसे घडत नसेल, तर जनतेनेही स्वस्थ बसून चालणार नाही. सरकारजवळ उत्पादनवाढीची किमया नाही; फक्त चलनवाढीची किमया आहे आणि ती महागाई वाढविणारी आहे. ह्याउलट मानवी ध्येयनिष्ठा आणि कार्यक्षमता ह्यावरच उत्पादनवाढ मूलतः अवलंबून आहे आणि ही उत्पादनवाढ महागाई रोखणारी आणि तुटवडा दूर करणारी आहे.

तेव्हा, सरकारवर रास्त टीका करताना आपण आपली स्वतःची जबाबदारीही ओळखलेली बरी. इतरांच्या चालढकलीने नाउमेद न होता स्वतःच्या कुवतीप्रमाणे आपण उत्पादनात भर घालूया, म्हणजेच आपआपले प्रत्येक काम चोख बजावूया. शेती असो, नाहीतर कारखानदारी असो, नाहीतर कचेरीतील काम असो, इतकेच नव्हे तर अगदी साधे घरगुती काम असो, ते काम शंभर टक्के कार्यक्षमतेने पार पाडायचे, अशी जास्तीत जास्त कामे करायची आणि आपल्या उदाहरणाने इतरांना कार्यप्रवण करायचे, हे प्रत्येकाला शक्य आहे. "मी एकट्याने तसे करून काय उपयोग? माझेच हसे होईल." ह्या अनिष्ट वृत्तीचे निर्मूलन करण्याचा संकल्प सोडूनच आपण लक्ष्मीपूजन करू या. परमेश्वर जर न्यायी आहे, तर कामचुकारांच्या पूजेला आणि भजनाला त्याने दाद का द्यावी?

आपल्यापैकी ज्यांना ज्यांना स्वाभिमानाने जगायचे आहे त्या सर्वांनी पुढाकार घेऊन कार्यास लागले पाहिजे. ह्या दिवाळीला अशा रीतीने प्रारंभ केला, तर पुढची दिवाळी अधिक सतेज होईल आणि आगामी काळ अधिक फलदायी ठरेल. उत्पादनाचा आनंद उपभोगाच्या आनंदापेक्षा सात्त्विक आणि टिकाऊ असते, एवढेच नव्हे तर पहिला दुसऱ्याचा पाया असतो. तुटवडा आणि महागाई ह्यांच्या विरोधी अनेक चळवळी केल्या जात आहेत, परंतु त्यांना उत्पादनवाढीचे अधिष्ठान नसेल, तर काय उपयोग? अशा दृष्टीने विचार आणि आचार करणाऱ्या सर्वांस, त्याचप्रमाणे आमच्या सर्व हितचिंतकांस ही दिवाळी उत्साहवर्धक जावो. ●


Greetings For A Happy Diwali
And A Prosperous New Year

**UNITED COMMERCIAL BANK**

**Head Office : 10, Brabourne Road, Calcutta—1.**

**Branches in Poona** } POONA CAMP, POONA CITY, SHIVAJINAGAR, YERAVDA and PIMPRI

# पाचवी पंचवार्षिक योजना : संकल्प आणि विकल्प

## इच्छिले पुष्कळ, पण ते शक्यकोटीत कसे येणार ?

( प्रा. प. वि. पटवर्धन, एम. ए., एलएल. बी., उपप्राचार्य, बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे. )

### प्रास्ताविक

१९५१ पासून आपले आर्थिक नियोजन सुरू झाले. ह्या नियोजनाचा प्रधान हेतू भारताचा आर्थिक विकास घडवून भारतीय लोकांच्या राहाणीमानामध्ये भरीव स्वरूपाची वाढ करणे हा होता. ह्याच हेतूला पूरक आणि पोषक म्हणून भारतातील आर्थिक विषमता व प्रादेशिक विषमता नष्ट अगर कमी करणे हेही हेतू आपल्या नियोजनाचे होते. प्रत्यक्ष आकड्यांत सांगावयाचे तर, एकामागून एक येणाऱ्या पंचवार्षिक योजनांमुळे भारताचे वास्तव राष्ट्रीय उत्पन्न व वास्तव दरडोई उत्पन्न अनुक्रमे १९७०-७१ आणि १९७७-७८ मध्ये दुप्पट करणे, हे आपल्या नियोजनाचे दीर्घ मुदतीचे आर्थिक ध्येय होते. ह्या उत्पन्नवाढीमुळे राहणीमान वाढून आपली सुप्रसिद्ध गरिबी कमी करावी हाच उद्देश नियोजनाच्या स्वीकारामागे होता. आज वीस वर्षांनंतर १९७१-७२ मध्ये आपले वास्तव राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट झाले आहे. परन्तु वैयक्तिक वास्तव उत्पन्न मात्र अवघ्या शेकडा ३२ नेच वाढले आहे. शिवाय आर्थिक व प्रादेशिक विषमताही विशेष कमी झालेली दिसत नाही आणि भारताचे भयंकर दारिद्र्यही फारसे कमी झालेले दिसत नाही. आजही भारतातील लोकसंख्येपैकी सुमारे ४० टक्के लोक दारिद्र्याच्या पातळीच्या रेषेच्या खाली राहात आहेत ही कबुली नियोजनमंडळानेच दिली आहे.

अर्थात सर्व नियोजनच फुकट गेले असे म्हणता येणार नाही. आज भारत सर्व जगात ८ वे किंवा ९ वे औद्योगिक राष्ट्र म्हणून गणले जात आहे आणि आपली औद्योगिक सायुज्जता व तंत्रविज्ञान इतके प्रगतावस्थेस गेले आहे की, योग्य साधनसामग्री उपलब्ध झाल्यास आपण वाटेल ती वस्तू उत्पादन करू शकतो. त्याचप्रमाणे, ह्या वीस वर्षांच्या काळात आपली लोकसंख्या दीडपटीने वाढली; पण अन्नधान्यांचे उत्पादन दुपटीने वाढले आणि आपण अन्नधान्याच्या बाबतीत प्रायः स्वयंपूर्ण झालो आहोत. आपले औद्योगिक उत्पादनही अडीचपटीने वाढले आहे आणि काही कच्च्या मालाच्या बाबतीत–कापूस, ज्यूट–किंवा काही महत्त्वाच्या उत्पादनाच्या बाबतीत – सिमेंट, रेल्वे-सामान, शस्त्रास्त्रे, कापड – इत्यादीत आपण स्वयंपूर्णही झालो आहोत. इतके असूनही आपण राष्ट्र म्हणून गरीबच आहोत. आणि नुकतीच जागतिक बँकेने १२२ देशांची आर्थिक पाहणी केली त्यात वैयक्तिक सरासरी उत्पन्नाच्या मानाने भारताचा क्रमांक १०२ लागला व आपले दरडोई वार्षिक उत्पन्न हे चालू किंमतीत सुमारे ८२५ रुपये ( ९० डॉलर्स ) भरले. अमेरिकेतील दरडोई वार्षिक उत्पन्नाच्या मानाने ( सुमारे ३५,७०० रुपये ) हे उत्पन्न अगदीच कमी आहे आणि ते 'सरासरी' आहे. म्हणून धनिक लोक वगळले तर ही सरासरी आणखीच कमी होईल. भारतातील काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, वर उल्लेख केलेल्या ४० टक्के लोकांना १९६१–६२ च्या किंमतीत दरमहा २० रुपये ( म्हणजे आजच्या किंमतीत सुमारे ४० रुपये ) सुद्धा उत्पन्न मिळू शकत नाही. अर्थात हीच आपली आजची भीषण समस्या आहे. मात्र ह्याचा अर्थ सर्वच नियोजन फसले असा नाही. आपल्या जमेच्या काही बाजू वर दिल्या आहेत. मात्र दारिद्र्य उच्चाटनाच्या बाबतीत आपले नियोजन पूर्णपणे अयशस्वी ठरले आहे. लोकसंख्येची अतीव वाढ, दुष्काळ, अंतर्गत व आंतरराष्ट्रीय अस्थिर परिस्थिती व त्यातून निघालेली युद्धे व त्यामुळे संरक्षणावर होणारा बेसुमार खर्च-इत्यादी कारणे ह्या अपयशाची आहेत. पण नियोजनातील चुका व दोष ह्या अपयशाला कारण नाहीत असे म्हणता येणार नाही. आर्थिक विषमता कमी करण्याच्या कामीही आपले नियोजन अपेशी झाले आहे. ह्या अपयशाची जाणीव होऊनच की काय आगामी ५ व्या योजनेच्या वाटचालीसंबंधी दस्तऐवज प्रसिद्ध करण्यात आले आहेत, त्यामध्ये गरिबी आणि विषमता निर्मूलन व ह्या दोन्ही उद्देशांना पूरक म्हणून स्वावलंबन ह्या उद्दिष्टांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. ह्यांपैकी मे १९७२ च्या सुमारास जो दस्तऐवज प्रसिद्ध झाला होता त्यामध्ये नुसत्या विकासदराच्या वाढीवरच भर देऊन उपयोगी नाही–त्यामुळे दारिद्र्य आणि बेकारी नाहिशी करण्याइतपत साधने व कामे निर्माण होणार नाहीत. दारिद्र्य व बेकारीवर प्रत्यक्षच हल्ला करावयास पाहिजे असे म्हणण्यात आले होते व त्याकरता सुमारे १० हजार कोटी रुपयांची पूर्तता करण्यात आली होती. हा दस्त तत्कालीन नियोजनमंत्री श्री. सी. सुब्रह्मण्यम यांच्या अधिकारात प्रसिद्ध झाला होता. गेल्या ऑक्टोबर १९७२ च्या सुमारास सदर दस्ताची दुसरी आवृत्ती जी प्रसिद्ध झाली त्यामध्ये दृष्टिकोनात फरक दिसून आला. दारिद्र्याची दोन कारणे आहेत. निम्नविकास आणि विषमता म्हणून ह्या दोन्ही कारणांच्या निराकरणाला सारखेच महत्त्व देण्यात आले आहे. विकासदर हा वाढता ठेवलाच पाहिजे–आणि विषमताही कमी केली पाहिजे म्हणजे दारिद्र्य हटेल अशी भूमिका दुसऱ्या दस्तात स्वीकारली आहे. हा दस्त सध्याचे नियोजनमंत्री श्री. दुर्गाप्रसाद धार यांच्या अधिकारात प्रसिद्ध झाला आहे. "सामाजिक न्यायासह विकास" हे सूत्र ह्या नव्या दस्तात अभिप्रेत आहे. आपल्या नियोजनात परकीय मदतीचा बराच भाग आला आहे. त्यापासूनही मुक्त होऊन आपण

स्वावलंबन स्वीकारले पाहिजे हाही आदेश नवीन "वाटचाल दस्तऐवजात" जनतेला दिला आहे. ह्या दुसऱ्या दस्तऐवजाची फक्त संक्षिप्त आवृत्तीच आज मितीला उपलब्ध आहे. हा दस्तऐवज काँग्रेसने स्वीकृत केला असल्याने तोच ५ व्या योजनेचा अधिकृत तर्जुमा मानला पाहिजे. प्रस्तुत लेखात ह्या तर्जुम्यामध्ये दिलेल्या माहितीनुसार दारिद्र्य निर्मूलन ( गरिबी हटाव ) विषमता निर्मूलन व स्वावलंबन इत्यादी प्रधान उद्दिष्टे कितपत साध्य होणे शक्य आहे त्याचा स्थूल रीतीने विचार करण्याचे योजिले आहे. सदर तर्जुमा फारच संक्षिप्त व अपुरा आहे व काही आकडे राहून गेलेले वाटतात. तथापि जी माहिती उपलब्ध आहे त्यावरूनही ही उद्दिष्टे कितपत सिद्ध होतील हे अजमावणे अवघड जाणार नाही.

## पाचव्या योजनेची स्थूल रूपरेषा

पाचवी योजना १९७४-७५ ते १९७८–७९ ह्या कालासाठी आहे. या मुदतीत १९७१-७२ च्या किमतीत भारतीय अर्थव्यवस्थेत रु. ५१,१६६ कोटी गुंतवणूक होणार असून, त्यांपैकी सुमारे रु. ६,००० कोटी "चालू विकासासाठी" असून रु.४५,१६६ नव्या विकासासाठी उपलब्ध आहेत. एकूण गुंतवणुकीपैकी रु. ३५,५९५ कोटी सार्वजनिक क्षेत्रात व रु. १५,७७१ कोटी खाजगी क्षेत्रात गुंतविले जाणार आहेत. वर उल्लेखिलेली तिन्ही प्रमुख उद्दिष्टे साधण्यासाठी नियोजन-मंडळाने राष्ट्रीय उत्पन्नाच्या सरासरी वाढीचा दर, दरसाल दर शेकडा ५·५ अपेक्षिला आहे. व तो द. द. ८ ते ९ औद्योगिक उत्पादन वाढीने आणि द. द. ७ निर्यात वाढीने नियोजन कालात साध्य होईल असे कल्पिले आहे. मात्र ह्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी काही गृहीत कृत्ये स्वीकारली आहेत. ती सिद्ध झाली तरच दारिद्र्य व विषमता-निर्मूलन ( किंवा कमी होणे ) व स्वावलंबन ही ध्येये साध्य होतील अशी नियोजनमंडळाची धारणा आहे. ती गृहीत कृत्ये कोणती ते आता पाहू.

## गृहीत कृत्ये

एक म्हणजे, नियोजन कालात तुटीचा अर्थभरणा भरमसाठ होऊ न देता भाववाढ होणार नाही इतपत खालच्या पातळीवर ठेवावयाचा योजनाकारांचा निर्धार आहे व हे शक्य होईल असे ते गृहीतच धरून चालले आहेत. दुसरे म्हणजे परदेशी मदत कमी मिळेल किंबहुना ती मुद्दलाचे हप्ते व व्याज देण्याइतपतच मिळावी असे त्यांनी अपेक्षिले आहे. यालाच ते नक्त मदत शून्य म्हणत आहेत. तिसरे कर, कर्जे इत्यादी मार्गांनी जादा पैसा मिळविण्यासाठी कसून प्रयत्न केला जाईल असे ते धरून चालतात. या सर्व मार्गांनी जरूर तेवढा भांडवल संचय होऊन अपेक्षित विकासाचा दर गाठला जाईल अशी नियोजनकारांची धारणा आहे. कडक अमलबजावणी, काटकसर व जनतेचा सहभाग ह्यांवरही नियोजनकारांची मदार आहे. आता यांतून दारिद्र्य निर्मूलन, विषमता उच्चाटण आणि स्वावलंबन इत्यादी स्वीकृत उद्दिष्टे कितपत साध्य होतात हे आपण बघावयाचे.

## पाचव्या योजनेतील पैशाची वाटणी

आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार सार्वजनिक क्षेत्रात विविध कार्यक्रमावर खालीलप्रमाणे खर्च होणार आहे. ह्या खर्चाची चौथ्या योजनेतील वाटणीशी तुलना करण्यात आली आहे. ( कंसातील आकडे खर्चाचे एकूण सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीचे प्रमाण दाखवितात. )

आकडे कोटी रुपयांतील.

| कार्यक्रम | चौथी योजना | | पाचवी योजना | |
|---|---|---|---|---|
| शेती | ३४६६ | (२१) | ७००० | (२०) |
| खाणी व उद्योग | ३७२९ | (२३) | ७७०० | (२२) |
| वाहतूक व दळणवळण | ३८८७ | (२४) | ६८५० | (२०) |
| विद्युत | २४४८ | (१५) | ५७०० | (१६) |
| घरबांधणी | २५१ | | ९२५ | |
| व्यापार व साठे | ३४९ | | ५५० | |
| शिक्षण | ८५३ | | २२५० | |
| वैज्ञानिक संशोधन | १४० | | ३०० | |
| आरोग्य | ४३४ | | ५६० | |
| पोषण | — | | ५०० | |
| नगरविकास व पुरवठा | ५२९ | | ११०० | |
| कल्याण | १९३ | | ५२० | |
| विविध | १४९ | | ३०० | |
| एकूण | १६७७४ | | ३५५९५ | |

[ वरील आकड्यांची बेरीज जुळत नाही. त्याचाच अर्थ, त्यातून काही आकडे वगळलेले आहेत. परन्तु त्यामुळे एकूण दृष्टिकोनात फरक पडत नाही. ]

वरील आकड्यांवरून व टक्केवारींवरून एक गोष्ट स्पष्ट होते की सार्वजनिक गुंतवणुकीचे विविध कार्यक्रमांवरील शेकडा प्रमाण सर्वसाधारणपणे चौथ्या योजनेप्रमाणेच ठेवण्यात आले आहे. मात्र सार्वजनिक क्षेत्रातील एकूण गुंतवणूक चौथ्या योजनेपेक्षा दुपटीहूनही अधिक असल्याने प्रत्येक कार्यक्रमावर प्रत्यक्ष खर्च होणारी रक्कम खूपच जास्त आहे. पाचव्या योजनेत शिक्षण, घरबांधणी यांवर बरीच मोठी रक्कम खर्च होणार असून पोषणावर प्रथमच वेगळा खर्च करण्यात येणार आहे.

नव्या योजनेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र यांतील गुंतवणुकीचे सापेक्ष प्रमाण ६५·६ : ३४·४ असे राहील. चौथ्या योजनेत ते ६० : ४० असे होते. याचाच अर्थ, सार्वजनिक क्षेत्रात खर्च होणारा पैसा अधिक काळजीने वापरण्याची वाढती जबाबदारी नियोजन-संबंधितांवर पडली आहे.

खाजगी क्षेत्रात एकूण १५५६१ कोटी रु. गुंतविले जातील अशी अपेक्षा असून, त्यातील काही विशिष्ट बाबींवर पुढीलप्रमाणे रक्कम खर्च होणार आहे. शेती – रु. १५०० कोटी, खाणी व औद्योगिक उत्पादन रु. ५७०५ कोटी, विद्युतनिर्मिती रु. ५०

कोटी, वाहतूक व दळणवळण रु. १७७० कोटी, घरबांधणी रु. ३४४० कोटी आणि व्यापार व साठे रु. ११०० कोटी इत्यादी.

### वित्तपुरवठा योजना

प्रसिद्ध झालेल्या दस्तऐवजात वेगवेगळ्या मार्गांनी मिळणाऱ्या पैशांविषयी तपशीलवार माहिती देण्यात आलेली नाही. परंतु अन्तर्गत अर्थव्यवस्थेतून, निर्यातवाढीतून व परकीय मदतीतून भरपूर वित्तप्रबंध होऊ शकेल अशी आशा व्यक्त करण्यात आलेली आहे.

प्रकाशित दस्तऐवजात पुढील स्थूल माहिती, योजनेसाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या पैशांसंबंधी, देण्यात आलेली आहे.

अन्तर्गत बचत : रु. ४३९६३ कोटी.

सार्वजनिक क्षेत्र : रु. १४९६५ कोटी.

(अ) केंद्र आणि राज्य सरकारांच्या अंदाजपत्रकातून रु. ९३४७ कोटी.

(ब) केंद्र आणि राज्यसरकारांचे विविध उद्योग (वित्त-पुरवठा करणाऱ्या संस्था वगळून) : रु. ५६१ कोटी.

(क) वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था: रु. ६८८ कोटी (त्यांपैकी रिझर्व बँक रु. ४६५ कोटी आणि इतर रु. २२३ कोटी).

खाजगी क्षेत्र : रु. २८३१० कोटी.

(अ) मोठे संघटित उद्योग (वित्तपुरवठा संस्था वगळून) : रु. ४०११ कोटी.

(ब) सहकारी बिगरपतपुरवठा संस्था : रु. २२९ कोटी.

(क) कौटुंबिक क्षेत्र (Household sector) : रु. २४०७० कोटी.

परकीय चलनातील बचतीतून : रु. १२०३ कोटी.

(अ) चालू परकीय व्यवहारातील तूट भरून काढण्यासाठी येणारा नवा वित्तपुरवठा : रु. १००३ कोटी. (परकीय मदत).

(ब) पी. एल. ४८० कर्जावरील आणि ठेवीवरील दिलेल्या व्याजापोटी रुपयांत परत मिळणारी रक्कम : रु. २२३ कोटी.

याखेरीज "चालू" विकासकार्यासाठी अंदाजपत्रकात चालू वसुलातील रु. ६००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

[ वरील माहिती अपुरी आहे; तरी सर्वसाधारण कल्पना येण्यास पुरशी आहे. वरील वित्तप्रबंधातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे योजनेत होणाऱ्या गुंतवणुकीचा बहुतेक भाग अंतर्गत अर्थव्यवस्थेतूनच-बचतीतूनच-मिळविला जाणार आहे. ]

या दस्तऐवजात केंद्र सरकारचे कराचे उत्पन्न (१९७२-७३ च्या दरात) रु. २९१७२ कोटी धरण्यात आले आहे. (त्यांपैकी राज्य सरकारचा हिस्सा रु. ६५२७ कोटींचा आहे.) कराखेरीज इतर मार्गांनी मिळणारे उत्पन्न रु. ६३४९ कोटी; नफारूपाने रु. १५५ कोटी; विविध मार्गांनी रु. २०१ कोटी;

पाचव्या योजनेत कौटुंबिक क्षेत्रातील वित्तजिंदगीत रु. १९१०५ कोटींची वाढ अपेक्षित आहे.

### योजनाबाह्य खर्च

नव्या योजनेत विकासेतर कार्यक्रमांवर एकूण रु. २२४३४ कोटी खर्च होणार आहे. विकासकार्य चालू राहण्यासाठी हा खर्च आवश्यक असतो. ह्यातील महत्त्वाचे आकडे म्हणजे — (१) शासकीय व्यवस्थापन : रु. २१२४ कोटी, (२) कर्ज-फेड व व्याज देणे : रु. ४९५५ कोटी, (३) संरक्षण व सरहद्द रस्ते : रु. ९२६० कोटी, (४) राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांना अनुदान : रु. १३३० कोटी, (५) अन्नधान्य अनुदान रु. ७५० कोटी, (६) योजनेतर विकासखर्च : रु. १९४८ कोटी, (७) निर्यात अनुदान : रु. ४४० कोटी इत्यादी.

### दारिद्र्यनिर्मूलन

निम्नविकास आणि विषमता ही गरिबीची कारणे आहेत. म्हणून विकास वाढविणे आणि विषमता दूर करणे ह्याच दोन मार्गांनी गरिबी नष्ट होईल. ह्या दुहेरी उद्दिष्टांसाठी उत्पादक रोज-गारी वाढविणे हाच प्रभावी उपाय आहे. नोकरीस्वरूप आणि व्यावसायिक—अशी दोन्ही प्रकारची रोजगारी वाढवली पाहिजे. अशी रोजगारी वाढविण्याच्या धोरणाची सांगड सुशिक्षित बेकारांना उत्पादक कार्यक्रमात प्रविष्ट करून घेण्याच्या धोरणाशी घातली पाहिजे....यासाठी विद्यापीठीय शिक्षणक्रमातही अनुरूप फेरफार करावयास पाहिजेत.

### सामाजिक उपभोग

वरील प्रकारच्या रोजगारी आणि उत्पन्ने वाढविण्याच्या कार्य-क्रमांना काही किमान प्रमाणात शिक्षण, आरोग्य, पोषण, पिण्याचे पाणी, घरबांधणी, दळणवळणाची साधने व वीज-पुरवठा—इत्यादी सोयींच्या मार्गाने सामाजिक उपभोग व गुंतवणूक यांची जोड दिली पाहिजे. (किमान गरजा ओळखून त्यांच्या पूर्तीचा कार्यक्रम आखला पाहिजे.)

### स्वावलंबन

स्वावलंबनाचे ध्येय साधण्यासाठी अन्नधान्यातील स्वयंपूर्णता पक्की केली पाहिजे, कापूस आणि तेलबियांचे उत्पादन वाढविले पाहिजे, आणि पोलाद, बिगर लोखंडी धातू, खते, क्रूड ऑईल, पेट्रोल पदार्थ, यंत्रसामान आणि मूलभूत रसायने यांचे उत्पादन वाढविले पाहिजे. निर्यातवाढीची मोहीम प्रखर केली पाहिजे... विषमता कमी करणे हे परदेशी व्यवहारसंतुलनाला इष्ट असते असे सिद्ध झाले आहे—अधिक क्षमता आणि वाढते स्वावलंबन हे परस्परपूरक असावेत.

### विकासाचा दर आणि प्रकार

अनेक वैकल्पिक दरांचा विचार करून द. सा. द. शे. ५ हा विकासाचा दर स्वीकारला आहे...(त्यामुळे)...सर्वांत खालच्या

शेकडा ३० लोकांना अधिक समाधानकारक राहणीमानाचा लाभ होईल.

आणि म्हणून (स्वीकृत) विकासप्रकारात शेती, कळीचे आणि मूलभूत उद्योग आणि सामान्य जनतेला लागणाऱ्या वस्तू उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांवर भर देण्यात आला आहे……

ह्यासाठी तावडतोब कृती व्हावयास पाहिजे. तपशीलवार विभागनिष्ठ कार्यक्रम—विशेषत: महत्त्वाच्या विभागांसाठी—तयार केले पाहिजेत. तज्ज्ञ मनुष्यबळाबाबतच्या निकडीच्या गरजा भागवल्या पाहिजेत.

ह्या शिफारशींना मूर्तस्वरूप देण्यासाठी धोरणाबाबत तपशीलवार सूचना करणे आवश्यक आहे ह्याची नियोजनमंडळाला जाणीव आहे. आणि पुढील काही महिन्यांत, दस्तऐवजाच्या पार्श्वभूमीवर योग्य त्या तपशीलवार सूचना तयार करण्याचे काम मंडळ करील.

### काही विशिष्ट बाबी : मागासलेले प्रदेश

मागासलेले आणि डोंगराळ प्रदेश यांच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविण्यात येईल. किमान गरजपूर्तीच्या राष्ट्रीय कार्यक्रमाशी ह्या कार्यक्रमाची सांगड घालून देण्यात येईल. ह्या बाबतीतील जबाबदारी प्रामुख्याने राज्यसरकारची आहे. राष्ट्रीय कार्यक्रमाची अम्मलबजावणी करताना या भागातील मागासलेल्या जमातींना अग्रहक्क देण्यात येईल. अर्भकांचे संगोपन, हुषार विद्यार्थ्यांची स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी प्रयत्न, अस्वच्छ उद्योगात असणाऱ्यांच्या कामाच्या आणि राहण्याच्या परिस्थितीत सुधारणा करण्याचे प्रयत्न यांना प्राधान्य देण्यात येईल.


### वेतने, किमती आणि उत्पन्ने

वेतने, किमती आणि उत्पन्ने ह्यांत समतोल राखणे आवश्यक आहे. म्हणून योजनेच्या वित्तप्रबंध व्यवस्थेत अतिरेकी मागणी वाढू नये अशी दक्षता घेण्यात आली आहे. वेतन-वस्तूंचे (wage goods—सामान्यांचे उपभोग पदार्थ) उत्पादन वाढविण्याची तरतूद करण्यात आली आहे. निदान गरिबांकरता तरी आवश्यक वस्तू संपादन करून त्या जवळ जवळ स्थिर किमतीत त्यांना वाटल्या जाव्या अशी अपेक्षा आहे.

उत्पादकता न वाढल्यास वेतने वाढू नयेत यावर भर देण्यात आला आहे. सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांसाठी योग्य असे राष्ट्रीय वेतन धोरण आखणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, मालमत्ता आणि उद्योगधंदे यांच्यातून ज्यांना उत्पन्न मिळते, त्याबाबतही शिस्तबद्ध योजना करणे आवश्यक आहे. वेतने, किमती व उत्पन्ने यासंबंधी एकच सुसंगत धोरण असले पाहिजे आणि ते समाजवादी विकासाच्या कल्पनेत अन्तर्भूत असलेले स्थैर्य आणि सामाजिक न्याय यांना पोषक असले पाहिजे.

### अम्मलबजावणी

शासकीय यंत्रणेचे कार्य सुधारले पाहिजे, विलंब टाळला



पाहिजे. नासधूस कमी केली पाहिजे, आणि गळती बंद केली पाहिजे. (उत्पादन) क्षमतेचा अधिक उपयोग केला पाहिजे. व्यवस्थापनातील उणिवा आणि औद्योगिक संबंधात सहकार्याचा अभाव यामुळे विलंब आणि अकार्यक्षमता उद्भवतात.

सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्रांतील प्रकल्पांच्या कारभारात सुधारणा करणे निकडीचे आहे. आपल्या सध्याच्या जुनाट शासकीय यंत्रणेकडून योजनेतील कार्यक्रम तडीस जाणार नाहीत.

### जनतेची योजना

"योजनेतील उद्दिष्टे तडीस जाण्यासाठी सर्व जनतेकडून शिस्त, काबाडकष्ट आणि स्वार्थत्याग ह्यांची अपेक्षा आहे. त्यासाठी, योजनेची आखणी आणि अम्मलबजावणी यात जनतेला सहभागी करण्याच्या प्रक्रियेस अग्रहक मिळाला पाहिजे तरच ही १९७४-७९ योजना खरीखुरी जनतेची योजना म्हटली जाईल."

### परामर्श

येथपर्यंत आपण आगामी पाचव्या योजनेच्या दृष्टिकोणाचा जो सारांश आपणांपुढे आला आहे त्याची ओळख करून घेतली. त्यातील गृहीत कृत्ये, उद्दिष्टे व वित्तपुरवठ्याची तरतूद ह्यांचीही माहिती करून घेतली. आता हे सर्व सिद्धीस जाऊ शकेल का हे बघावयाचे.

हा सारांश प्रसिद्ध झाल्यानंतर अर्थविषयक नियतकालिकांतून ज्या विशेषणांनी त्याची संभावना झाली त्यावरून ह्या आगामी योजनेबद्दल फारसे चांगले मत होऊ नये. यांपैकी काही विशेषणे अशी : "शब्द! शब्द! शब्द!," "घोषणाबाजी!" "संदिग्ध," "अवास्तव," इत्यादी. एकाने तर म्हटले की बूर्बान घराण्यातील राजाप्रमाणे आपले नियोजनमंडळही काही नवीन शिकले नाही आणि जुने काही विसरलेले नाही! या सर्व वर्णनात थोडेफार तथ्य आहे हे खास. नेहमीप्रमाणे याही कागदात मोघम घोषणांची पखरण आहे. विषमता कमी केली पाहिजे, भाववाढ होऊ देता कामा नये, तुटीचा अर्थभरणा टाळला पाहिजे, नासधूस, विलंब, गळती थांबविली पाहिजे, कार्यक्षमता वाढली पाहिजे—अम्मलबजावणी कडक करू, जनतेचे सहकार्य मिळवू—ही सर्व आशावादी गुळगुळीत झालेली विधाने ह्याही कागदात आहेत. त्यामुळे भीती वाटते की मागच्या योजनांची जी गत झाली ती ह्याही योजनेची होईल की काय! दुर्दैवाने, ह्या योजनेतील उद्दिष्टे आणि उपाय ह्यांची वास्तववादी दृष्टिकोनातून छाननी केल्यास निराशाच पदरी येते!

### विकासाचा दर

पाचव्या योजनेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर दरवर्षी सरासरी शेकडा ५·५ धरण्यात आला आहे. निदान एवढ्या प्रमाणात तरी अर्थव्यवस्थेची वाढ झाल्याशिवाय रोजगारी व उत्पन्ने भरपूर प्रमाणात वाढणार नाहीत असे नियोजनमंत्री धार यानी स्पष्ट केले आहे. त्यासाठी अर्थव्यवस्थेत एकूण सुमारे रु. ५१,००० कोटींची गुंतवणूक होणार आहे. मात्र पाचव्या योजनेत हा दर लाभावयाचा असेल तर चौथ्या योजनेत द. द. ६ हा दर गाठावयास पाहिजे होता पण ते शक्य नाही. १९५१ ते १९६५ या कालात वाढीचा दर ४·१% होता; तो १९६५ ते १९७२ या कालात तर ३% इतका कमी झाला. ह्या परिस्थितीत, चौथ्या योजनेच्या उरलेल्या दोन वर्षांत तो ७ ते ८ टक्के झाला तरच चालू सर्व योजनेत तो ५% ते ६% राहील. पण सद्यःस्थितीत हे अशक्यच आहे. कारण हा दर औद्योगिक आणि शेती उत्पादनाच्या अपेक्षित वाढीवर असतो—आणि तेथेच अपयश आलेले आहे. (पुढील परिच्छेद पाहा) तेव्हा उरलेल्या दोन वर्षांत वाढीचा दर २% ते ३% च्या आसपासपाच रेंगाळेल असे वाटते. दुसरे असे की चौथ्या योजनेच्या अखेरपर्यंत सार्वजनिक क्षेत्रात रु. १५,९०० कोटींची गुंतवणूक व्हावयास पाहिजे होती. परन्तु ती सुमारें रु. १४,५०० कोटींपर्यंतच जाईल असा अंदाज आहे. म्हणजे ती जवळजवळ १५% कमीच पडणार आहे. आणि त्यामुळे ह्या गुंतवणुकीवर अवलंबून असलेला ६% चा वाढीचा दर गाठणे अशक्यच आहे!

### औद्योगिक वाढ

नव्या योजनेतील ५·५% दर साधण्यासाठी औद्योगिक उत्पादन वाढीचा दर ८ ते ९ टक्के व्हावयास पाहिजे. गेल्या-वर्षापर्यंत तो २ ते ३ टक्यांपर्यंत उतरला होता. सध्या तो ४ ते ५ टक्यांपर्यंत आहे. औद्योगिक वाढ ही भरपूर गुंतवणूक, कच्च्या मालाची भरपूर उपलब्धता, औद्योगिक संबंधातील सहकार्य, वाहतुकीचे सौकर्य, राजकीय स्थैर्य आणि आपल्या समाजवादी मिश्र अर्थव्यवस्थेच्या संदर्भातील सरकारी धोरणाची निश्चिती—अशा प्रकारच्या घटकांवर अवलंबून असते. ह्यातील प्रत्येक गोष्ट औद्योगिक वाढीला प्रतिकूल आहे. गेल्या काही वर्षांत बचत आणि गुंतवणूक ह्यात घट होत आहे. १९६५-६६ साली बचतीचे राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण शेकडा ११ होते ते १९७१-७२ साली ९% पर्यंत घसरले आहे. त्यामुळे गुंतवणूकही ह्याच काळात १३% पासून ९% उतरली आहे, ती आता तावडतोब १४ पर्यंत चढेल असे अपेक्षिणे अतिरेकी आशावादीपणाचे ठरेल. कच्च्या मालाच्या उपलब्धतेसंबंधीही परिस्थिती अनुकूल नाही. पोलाद, दगडी कोळसा, याची टंचाई आहे. सिमेंट, नवी यंत्रसामग्री, रेल्वे वॅगन्स ह्यांचा पुरवठा भरपूर नाही. विद्युत्-शक्तीची भयंकर तूट आहे आणि त्यामुळे उत्पादनावर परिणाम होत आहे. औद्योगिक क्षेत्रात शांतताही दीर्घकाल टिकत नाही. त्यातच राजकीय व विद्यार्थ्यांच्या चळवळी आणि दुष्काळ ह्यांमुळे मागणीवर विपरीत परिणाम होत आहे. पण सर्वात दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सरकारचे औद्योगिक धोरण स्थिर व स्पष्ट नाही. त्यामुळे गुंतवणूक करणाऱ्यांना निर्धोकपणा वाटत

*With Best Compliments From*

## M/S OGALE GLASS WORKS LTD.

**Pimpri, Poona 18 ( Maharashtra State )**

**Manufacturers of Tumblers and Jars**
**Durable and most-convenient for every use.**

शुभ दीपावली

दीपावली व नूतन वर्ष आमच्या भागीदारांस, ग्राहकांस व हितचिंतकांस सुखाचे व समृद्धीचे जावो.

## दि उगार शुगर वर्क्स लि., उगार-खुर्द

जिल्हा बेळगाव ] ❋ [ म्हैसूर स्टेट

रजिस्टर्ड ऑफिस :
वखार भाग, सांगली

फॅक्टरी :
उगार-खुर्द

★ शुभ्र दाणेदार साखर, ★ इंडस्ट्रियल अल्कोहोल ★ व आय. एस. आय. मार्क मिळालेले इंडियन मेड फॉरीन लिकर्सचे एकमेव अग्रेसर उत्पादक

नाही.-अद्यापही १९५६ च्या ठरावातील मिश्र अर्थव्यवस्थेचेच धोरण कायम आहे असे उद्घोष मधून मधून होत असले तरी औद्योगिक खात्याच्या मंत्र्यात बदल झाला की धोरणाबद्दल वेगवेगळी वक्तव्ये बाहेर पडतात. हल्ली 'संयुक्त क्षेत्रा'बाबत सरकारचे नक्की धोरण काय आहे हे अशा बदलणाऱ्या वक्तव्यांमुळेच समजेनासे झाले आहे. पूर्वीचे नियोजनमंत्री सी. सुब्रह्मण्यम यांनी संयुक्त क्षेत्राची थोरवी गाऊन उद्योगपतींना त्यात सामील होऊन राष्ट्रविकासात सहभागी होण्याचे आवाहन केले. त्याला उत्तम प्रतिसाद देण्याची तयारी खासगी क्षेत्रातील उद्योगपतींनी दाखविली. परंतु त्यामुळेच की काय 'संयुक्त क्षेत्रा'च्या कल्पनेला आता सरकारने सोडून दिल्यासारखे दिसत आहे. "संयुक्त क्षेत्रात सामील होऊन मागच्या दरवाज्याने सरकारवर दडपण आणण्याचा हा प्रयत्न आहे" असा छुपा व उघडही प्रचार काँग्रेसमधील तरुण तुर्कांच्याकडून चालतो—आणि त्याच्याविरुद्ध कोणी ब्रही काढीत नाही. ह्यावरून सरकारला खासगी क्षेत्राचे सहकार्यच नको असावे असे उद्योगपतींना वाटू लागल्यास काय नवल ! सार्वजनिक क्षेत्रातील अकार्यक्षमता, दप्तरदिरंगाई, सम्मीलित नियोजनाचा अभाव, नासधूस, मजूर-संघर्ष, उधळपट्टी, इत्यादी बाबी नित्याच्याच आहेत. अद्याप वीस प्रमुख सरकारी उद्योगांना कार्यकारी प्रमुखच मिळाला नाही हे ह्या बाबतीतील सरकारची बेपर्वाई दाखविते. ह्या सर्व गोष्टी लक्षात घेतल्या तर सार्वजनिक क्षेत्रातील घटकांकडून जी सुमारे रु. २०० कोटींची मदत अपेक्षिली आहे ती अशक्यप्रायच वाटते. ह्या सर्व न्यूनांमुळे औद्योगिक उत्पादन द. द. ८ ते ९ पर्यंत चढेल हे अशक्य वाटते.

## शेती विकास

शेती विकासाच्या बाबतीतही दोन वर्षापूर्वीची आशादायक परिस्थिती आज राहिलेली नाही. यंदाच्या अवर्षणामुळे आपल्या अन्नधान्याच्या उत्पादनात जवळ जवळ ७० ते ८० लाख टन धान्याची तूट पडली आहे. त्यामुळे आपला मध्यवर्ती साठा संपत आला असून त्यात भर म्हणून निदान दोन दशलक्ष टन धान्य सुमारे २०० कोटी रुपये खर्च करून आयात करावे लागणार आहे. यावरून आपले पर्जन्यावरील दयनीय परावलंबित्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे ! हरित क्रांती फक्त गव्हातच झाली आहे—तांदूळ, ज्वारी, बाजरी, डाळी, भुईमूग ह्यांमध्ये झालेली नाही. त्याचप्रमाणे ती ऊस, तंबाखू यातही झालेली नाही. तसेच पाणीपुरवठ्याच्या योजनाही अजून पूर्ण झाल्या नाहीत. महाराष्ट्रासारख्या डोंगराळ प्रदेश व बऱ्याच भागांत अपुरा पाऊस पडणाऱ्या राज्यात अवघ्या सेकडा ७ जमिनींना पाणीपुरवठा उपलब्ध आहे. इतर देशांत कृत्रिम पावसाचे प्रयोग सुरू झाले असताना, आमच्याकडे मात्र आमचे शेतीचे राज्यमंत्री आमच्या शास्त्रज्ञांना "कृत्रिम पावसाच्या प्रयोगाबाबत 'सबुरीने पुढे जाण्यास" सांगतात.

त्याचप्रमाणे खताचीही परिस्थिती निराशाजनक आहे. चौथ्या योजनेच्या अखेरीस भारताला नायट्रोजन (३·७ दशलक्ष टन) व फॉस्फेट्स, पोटॅश मिळून सुमारे ६·५ दशलक्ष टन खते लागणार आहेत. सध्या आपण नायट्रोजन खते फक्त ९ लाख टन व इतर ४ लाख टन उत्पादन करतो. बाकी सुमारे १$\frac{3}{4}$ ते २ दशलक्ष टन खते आजही परदेशांतून आणावी लागतात. सध्या खताचे १३ कारखाने बांधले जात आहेत. ते लवकर पूर्ण झाल्यास आपण खतात स्वयंपूर्ण होऊ. परन्तु ह्या कारखान्यांना सुमारे रु. १,४०० कोटी भांडवल लागणार असून त्यांपैकी रु. ३०० कोटी परकीय चलनातील आहे. हे भांडवल उपलब्ध झाले तरी हे कारखाने पूर्ण होऊन १९७३-७४ पर्यंत ते आपली नड भागविण्याइतपत उत्पादन करू लागतील असे समजणे म्हणजे मागच्या अनुभवांकडे दुर्लक्ष करण्यासारखेच आहे. खाजगी क्षेत्रातील श्री. टाटा ह्यांच्या खताच्या कारखान्यास परवाना देण्यास सरकारने ६ वर्षे लावली. तेवढ्यात त्याचा खर्च तिप्पट वाढला. खताच्या आयातीसाठी दरवर्षी सुमारे रु. १५० ते रु. २०० कोटी रुपये खर्च करावे लागतात. खते जर भरपूर आणि स्वस्तात मिळाली नाहीत तर शेतीचा अपेक्षित ५ ते ६ टक्के दर कसा गाठता येणार ?

## भूसुधारणा

सर्वांत अक्षम्य दिरंगाई भूसुधारणांच्या बाबत झाली आहे. आपल्या पहिल्या योजनेपासून पाचव्या योजनेपर्यंत "भूसुधारणा लवकर झाल्या पाहिजेत" हे पालुपद आपणांस आढळते. यावरूनच याबाबतीतील चालढकल समजून येते. काही सुधारणा जरूर झाल्या आहेत. उदाहरणार्थ, अनुपस्थितांची जमीनदारी नष्ट झाली आहे; कुळे मालक झाली आहेत—परंतु हे दिरंगाईने झाले व अनेक पळवाटा ठेवून झाले आहे. त्यामुळे, फारच थोड्या शेतकऱ्यांना अगर कुळांना मालकी हक्क मिळू शकले आहेत. तसेच कमाल जमीनधारण-मर्यादा कायदे झाले आहेत—होत आहेत—पण त्यामुळे प्रत्यक्षात फेरवाटपाकरिता वरकड जमीन फारच थोडी मिळण्याची शक्यता आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की काँग्रेसने घालून दिलेली १० ते १८ एकरांची मर्यादा कोठेच पाळली गेली नाही व जमिनीतील कसाच्या फेरफाराच्या निमित्ताने जमीनधारण-मर्यादा बरीच वाढविली गेली आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रात निरनिराळ्या प्रतींच्या जमिनींना १८, २७, ३६ व ५४ एकरांची मर्यादा लागू करण्यात आली आहे. राजस्थानात ती १८ व २०० एकरांच्या दरम्यान आहे. आता काँग्रेसने मंत्र्यांना हे कायदे डिसेंबर १९७३ च्या आत अमलात आणण्याचा आदेश दिला आहे. परंतु बहुतेक राज्यांतील काँग्रेसची सत्ता बड्या शेतकऱ्यांच्या हातात आहे. त्यामुळे ह्या आदेश कितपत पाळला जातो हे बघावे लागेल. आजपर्यंतचा अनुभव आशादायक नाही. उलट जपान व तैवानमध्ये, समाजवादाचे नारे न लावताच अवघ्या दोन

नवनवीन फॅन्सी माल !          योग्य किंमत ! !

बनारसी शालू, कांजीवरम, कोईमतूर, बंगलोर साड्या व अनेक
फॅन्सी साड्यांचा भरपूर स्टॉक ! तसेच इतर सर्व प्रकारच्या मालासाठी

# शाहाडे आठवले [प्रा. लि.] दादर

टेलि. : ४५४५५४)

आणि

# शाहाडे आणि कंपनी, गिरगाव

टेलि. : ३५६१३१)

मुंबई ४.

सामान्य जनतेच्या आर्थिक विकासासाठी
सातत्याने झटत असलेली

# जनता सहकारी बँक लि., सांगली

सतत ११ वर्षे ऑडिट वर्ग "अ"

अल्पावधीतील प्रगतीपर वाटचाल

| | | |
|---|---|---|
| (ज) शेअर-भांडवल | ... | ५·०० लाखाचे वर |
| (न) रिझर्व व इतर फंडस् | ... | ५ लाखाचे वर |
| (ता) ठेवी | ... | ९० लाखाचे वर |
| (बँक) खेळते भांडवल | ... | एक कोटीचे वर |

वा. आ. कबाडे
मॅनेजर

म. गो. बर्गे
व्हा. चेअरमन

म. सा. कराळे
चेअरमन

वर्षात कुळांना जमीन तडकाफडकी वाटून देण्यात आली आणि तेथे उत्पादनात प्रचंड वाढ झाली. मालकी मिळाल्याशिवाय प्रेरणा नाही, आणि प्रेरणेशिवाय प्रयत्न नाही–तंत्रात, व्यवस्थेत, उत्पादनात वाढ नाही–हा इतिहासाचा अनुभव आहे.

### परदेशी व्यापार

नव्या योजनेत परदेशी व्यवहारातील तूट सुमारे ३,००० कोटी रुपये येईल, असे कल्पिले आहे व ती सर्व निर्यातवाढ व आयातबदली माल निर्माण करून भरून काढावयाची आहे. आपले खताचे कारखाने पूर्ण न झाल्यास व चालू वर्षाप्रमाणेच अन्नधान्याची आयात करावी लागल्यास, ही तूट आणखीही वाढण्याचाच संभव आहे. ह्याच कारणामुळे परदेशी नक्त मदत ( net aid ) शून्य करण्याचे आपले स्वप्नही भंगण्याचाच संभव आहे. चौथ्या योजनेप्रमाणे नव्या योजनेतही निर्यात-वाढीचा दर दरसाल दर शेकडा सरासरी ७ अपेक्षिला आहे. परंतु चौथ्या योजनेतील १९७०-७१ व १९७१-७२ ह्या सालात तो ३% ते ४% पर्यंत उतरला आहे व चालू व पुढल्या वर्षी जरी वाढला तरी सर्व योजनेत ६% च्या वर जाणार नाही. आपल्या निर्यातवाढीची मदार अपारंपरिक निर्यातीवर – यंत्रसामग्री, कच्चे लोखंड – याच्यावर आहे. आणि त्यांची निर्यातच अपेक्षे-प्रमाणे वाढत नाही. युगोस्लाव्हियाला आपण रेल्वे वॅगन्स वेळेवर पुरवू शकत नसल्यामुळे त्या देशात नाराजी निर्माण झाली आहे. आपले परंपरागत निर्यातीचे पदार्थ – चहा, ज्यूट, काथ्या, हस्त-व्यावसायिक पदार्थ, कागद इत्यादींची निर्यात गेल्या वर्षी भरपूर झाल्याने निर्यातीत घट पडली नाही. परंतु ही परंपरागत निर्यात परिस्थिती सध्यातरी चांगली आहे. परन्तु इंग्लंडने युरोपीय सामाईक बाजारपेठेत आता प्रवेश केल्यानंतर पुढील वर्षापासून इंग्लंडमध्ये सध्या आपल्या मालाला मिळणाऱ्या सवलती नष्ट होणार व युरोपीय सामाईक बाजारपेठेने जर आपल्याबरोबर आपल्याला अनुकूल तह तावडतोब केला नाही तर आपले जवळ-जवळ दर वर्षी रु. ७० कोटीचे नुकसान होण्याचा संभव आहे. १४ विशेषतः आफ्रिकेतील विकसनशील देशांना यु. सा. बा. चे सहसदस्यत्व मिळाले असल्याने त्यांचे आपल्या पदार्थाशी स्पर्धक पदार्थ विनाजकात यु. सा. बा. त जाणार. अर्थात यु. सा बा. बरोबर लवकरच तह होण्याची शक्यता आहे. तथापि तो सर्वस्वी अनुकूल होईलच असे नाही. त्यामुळे यु. सा. बा. च्या सहसदस्यां-कडून आपल्या परंपरागत व अपरंपरागत पदार्थांशी घातुक स्पर्धा होण्याचा संभव आहे. आपली अपरंपरागत निर्यात वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी यंत्रे, कच्चे लोखंड इत्यादींच्या उत्पादनातील अडचणी दूर केल्या पाहिजेत. यंत्रोत्पादनाचा खर्च–त्यातील सर्व प्रकारची अकार्यक्षमता– ( आपले तंत्र व यंत्र-सामग्री जुनाट आहे ) – नाहीशी करून कमी केली पाहिजे व त्यांची स्पर्धाक्षमता वाढविली पाहिजे.

परदेशी व्यापारातील स्वावलंबनाचा दुसरा भाग आयातबदली उत्पादन वाढविण्याचा आहे. भारताची अर्थव्यवस्था जसजशी प्रगल्भ होत जाणार, तसतशी आपली आयातही वाढणारच. परन्तु, स्वदेशी उत्पादन वाढवून ही आयात शक्यतो कमी ठेवली पाहिजे. या बाबतीत एक गोष्ट आग्रहाने सांगितली पाहिजे. अनेक अनावश्यक बाबतीत–चैनीच्या वस्तू–सौंदर्यप्रसाधने-इत्यादींत परदेशांशी सहकार्य होत असून, त्यासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर परकीय चलनाचा अपव्यय होत आहे. यात आणखी एक आक्षेपार्ह गोष्ट म्हणजे हे सर्व उत्पादन अगदी अल्पसंख्य अतिश्रीमंत वर्गाच्या उपभोगासाठी होत आहे अतिबहुसंख्य लोकांच्या किमान गरजा भागविण्याच्या आधी अत्यल्प धनिकांच्या चैनी पुरविणे हे सरकारच्या समाजवादी धोरणाशी तरी खासच विसंगत आहे !

तेव्हा काही विशेष बदल घडून आल्याशिवाय परदेशी व्यापारातून स्वावलंबन संपादण्याचे आपले उद्दिष्ट अप्राप्यच वाटते.

### वित्तपुरवठा

या बाबतीत वर सांगितल्याप्रमाणे रु. ५१००० कोटी गुंतवणुकीपैकी बहुतेक सर्व पैसा बचतीतून–कर आणि कर्जरूपाने उभारावयाचा आहे. यामध्ये जादा करांपासून रु. ६००० कोटी जमतील असे गृहीत धरण्यात आले असून, त्यांपैकी सुमारे २५०० कोटी राज्यसरकारांनी मिळवावयाचे आहेत. भारतातील कर राष्ट्रीय उत्पन्नाच्या सुमारे १४% आहेत. ते पाचव्या योजनेत १८% होतील. शेकडेवारीच्या दृष्टीने हे प्रमाण मोठे नाही. तथापि भारतातील सार्वत्रिक गरिबीच्या संदर्भात ते जास्त वाटते. भारतात प्रत्यक्ष करांचा सीमान्त दर शेकडा ९७·५ म्हणजे सर्व जगात अत्युच्च आहे. आणि काहींना संपत्तिकर व उत्पन्नावरील सर्व कर मिळून १००% पेक्षाही जास्त कर भरावा लागतो. परन्तु ह्या करात कपात होण्याची शक्यता नाही. परन्तु यांतील बराच भार श्रीमंतांवर असल्याने विषमता निर्मूलनाच्या संदर्भात तो समर्थनीय वाटावा. तथापि गेल्या वीस वर्षात अप्रत्यक्ष करांची प्रचंड (वीस-पट ) वाढ झाली आहे. १९५१–५२ च्या अंदाजपत्रकात त्यांचे उत्पन्न रु २०० कोटींच्या आसपास होते ते १९७१–७२ मध्ये २००० कोटींच्याही वर गेले आहे. ह्या करांचे उत्पन्न वाढवावयाचे असेल तर सामान्य माणसांच्या दैनंदिन उपभोगातील वस्तूंवर कर लादावा लागतो आणि त्यामुळे हे कर प्रतिगामी असतात. केंद्र सरकारचे उत्पादन कर ( साखर, काड्यापेट्या, तंबाखू इ. ) व राज्यांचा विक्रीकर ही ह्यांची उदाहरणे आहेत. अशामुळे सामान्य जनांना फार झळ पोचते व किमती वाढतात. गेल्या दहा वर्षातच भारतातील घाऊक किमती दुप्पट झाल्या आहेत. ( १९६१–६२=१००; नोव्हेंबर ७२=२१० ) अतिरेकी करांमुळे किमती वाढून ठराविक रकमेत कमी काम होऊन नियोजनाची फलश्रुती घटते. तसेच बचतही कमी होते आणि सरकारला कर व कर्जेही कमी मिळतात. परन्तु सद्यःस्थितीत करवाढ अटळ आहे.

गेल्या वर्षी बांगला देश युद्ध व निर्वासित यांमुळे झाली, चालू वर्षी अवर्षण–व गेल्या वर्षीचा ताण–यांमुळे होणार! परन्तु यातून भाववाढीचे संकट कोसळणार हे निश्चित. राज्य सरकारांचा विक्री-कर हा प्रमुख उत्पन्नाचा मार्ग आहे. १९७१–७२ च्या दरात त्यामुळे त्यांना एकूण करांच्या निम्म्याहूनही अधिक उत्पन्न आले. पण हा ग्राहकांना त्रासदायक व भाववाढीला पोषक आहे. राज्य सरकारांना शेती उत्पन्नावरील कर वाढविणे शक्य आहे. १९७१–७२ मध्ये राज्यांच्या एकूण करांच्या उत्पन्नापैकी तो अवघा ०·७% आहे! परन्तु तो राजकीय कारणांसाठी वाढविला जात नाही. महाराष्ट्राच्या एकूण ४१२१·७ कोटी करांच्या उत्पन्नापैकी तो अवघा रु. ३८ लाख होता.

## कर्जे

पाचव्या योजनेत कर्जापोटी रु. १०,००० कोटी पाच वर्षांत मिळावेत अशी कल्पना आहे. बाजारातील पैसा, वाढलेली उत्पन्ने व किफायतशीर गुंतवणुकीच्या वैकल्पिक सोयींचा अभाव–ह्यामुळे हे उद्दिष्ट सिद्धीला जाईलही.

## तुटीचा अर्थभरणा

विकसनशील देशांच्या विकसन प्रक्रियेत तुटीचा अर्थभरणा हा एक वित्तप्रबंधाचा महत्त्वाचा मार्ग असतो. ह्याच्यामुळे भाववाढ होते, परन्तु आळशी यंत्रसामग्री व क्षमता जर उपयोगात आली तर उत्पादनवाढ होऊन ही आपत्ती टळते. पहिल्या योजनेत शेतीउत्पादन चांगले झाल्याने उत्पन्नवाढ झाली. त्यामुळे तुटीचा अर्थभरणा अगदी थोडा–सुमारे रु. ३०० कोटींचा झाला. दुसऱ्या योजनेत आपली स्टर्लिंग गंगाजळी संपली व प्रज्जड औद्योगीकरण व धान्य आयात सुरू झाल्याने तो वाढून रु. ९०० कोटींच्या आसपास झाला. तिसरीत युद्धे, दुष्काळ यांमुळे तो आणखीच वाढला व सुमारे ११५० कोटींच्या जवळ गेला व चौथ्या योजनेत तो रु. १२०० कोटींच्याही वर जाणार आहे. पाचव्या योजनेत तो रु. १५०० कोटींपर्यंत जाईल. अपेक्षेप्रमाणे औद्योगिक व शेतीउत्पादनवाढ झाल्यास (!) हा आकडा भयप्रद ठरू नये.

## सार्वजनिक उद्योगधंदे

रेल्वे, रिझर्व बँक व इतर राष्ट्रीय उद्योगधंदे यांच्याकडून पाच वर्षांत सुमारे रु. २२०० कोटी यावेत असा नियोजन-कारांचा कयास आहे. रेल्वे कारभार, पोलाद कारखाने व अवजड विद्युत प्रकल्पातील तोटे लक्षात घेता ही अपेक्षा फलद्रूप होणे अवघड वाटते. तथापि व्यवस्थापनात आता सुधारणा होत आहे. तसेच सरकारने या उत्पादक घटकांना वाजवी नफा मिळणाऱ्या किमतीही दिल्या पाहिजेत. सरकारने उच्च श्रेणीतील अधिकाऱ्यांचे पगार भारतीय परिस्थितीला अनुरूप ठेवल्यास पैशाची बचत होईल व विषमता-निर्मूलनाच्या दिशेने ते योग्य पाऊल पडेल.

एकंदरीने अपेक्षित पैसा कसाबसा गोळा होईल असे धरून चालण्यास हरकत नाही. परन्तु त्यामुळे भाववाढ होणेही अटळ आहे.

## खाजगी क्षेत्र

खाजगी क्षेत्राने आपल्या वाढीस लागणारा पैसा प्राय: आपल्या स्वत:च्याच नफ्यातून, भागभांडवल व कर्जभांडवल उभारून जमवावयाचा आहे. ह्याबाबत सरकारने आपले धोरण स्पष्ट करणे आवश्यक आहे. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रे स्पष्ट करणे, मक्तेदारी आयोगाकडून सत्वर निर्णय मिळणे, स्थापनेनंतर जकाती व कर यांबाबत सवलती चालू ठेवणे, कच्च्या मालाची व वाहतुकीची व जरूर त्या परकीय चलनाची पूर्तता करणे ह्याबाबतीत सरकारने निर्णायक पाऊल उचलणे आवश्यक आहे. तसेच खाजगी उद्योगपतींनीही जनतेच्या डोळ्यांवर येणारे बेफाट विलासी जीवन टाळले पाहिजे. ते त्यांनी खुशीने न केल्यास सरकारनेही वरिष्ठ श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या पगारावर व इतर चैनींवर अंकुश घातलाच पाहिजे. त्यामुळे थोडीफार बचत होईलच. पण औद्योगिक क्षेत्राबाबतच्या दृष्टिकोनात इष्ट तो बदल झाल्याचे दिसेल.

## भाववाढ

पाचव्या योजनेत भाववाढ होऊ न देण्याची नियोजन-कारांची अपेक्षा आहे आणि ही भाबडी अपेक्षा प्रत्येक योजनेतच करण्यात आली होती. पण फक्त पहिल्या योजनेतच किमती सुमारे १२%नी उतरल्या. पुढे प्रत्येक योजनेत त्या चढल्या आहेत. दुसऱ्यात ३०%, तिसऱ्यात ४५% मधल्या तीन वर्षांत १५% आणि चौथ्यात आतापर्यंतच जवळ जवळ २५%नी किमती वाढल्या आहेत. १९६१-६२ = १०० ह्या निर्देशांकाच्या संदर्भातच त्यांनी नोव्हेंबर १९७२ महिन्यात २१० हा निर्देशांक ओलांडला आहे. भाववाढीची कारणे स्पष्ट आहेत. अन्नधान्ये, कच्चा माल याची टंचाई, जनतेजवळचा काळा आणि गोरा पैसा, आणि उत्पादनक्षमतेपेक्षा कमी शक्तीत उद्योगधंदे चालणे व उत्पादन कमी होणे इत्यादी कारणे संभवतात. चालू वर्षीच्या काही राज्यांतील अवर्षणामुळे अन्नधान्यात तूट आली आहे हे वर पाहिलेच. त्यामुळे अन्नधान्ये, कच्चा माल यांचे निर्देशांक वाढू लागले. त्यामुळे औद्योगिक उत्पादनाच्या किमतीही वाढल्या. त्याचप्रमाणे आज जनतेजवळ खेळता पैसाही जास्त आहे. गेल्या वर्षीच्या निर्वासितांवरील, युद्धतयारीवरील व वाढत्या महागाई-भत्त्यामुळे खूप पैसा प्रसरणात राहिला आणि त्याचे दडपण किमतींवर आले. एप्रिल १९७१ ते एप्रिल १९७२ मध्ये किमती १२%नी वाढल्या आणि गेल्या सहा महिन्यातही आणखी ८%नी वाढल्या आहेत. तसेच सुमारे रु. ३००० कोटी इतका काळा पैसा प्रसारात आहे. त्यामुळे मागणी व किमती भरमसाट वाढतात. सरकारी नियंत्रणे, भरमसाट कर, गुंतवणुकीला वाव नसणे व घोडदौड करणाऱ्या किमती यांमुळे हा पैसा प्रसारात

राहातो व त्यामुळे किमती वर चढतात. याखेरीज विकासाच्या वाढत्या वेगामुळे जो कायदेशीर पैसा असतो तोही वाढत असतो. गेल्या ११ वर्षांत (१९६०-६१ ते १९७१-७२) लोकांच्या जवळचा पैसा रु. २०९८ कोटींपासून रु. ४८०७ कोटींपर्यंत वाढला आहे आणि प्रसारातला एकूण पैसा तर रु. २८६८ कोटींपासून रु. ८०६५ कोटींपर्यंत वाढला आहे. चालू साली टंचाई व कोट्यावधी लोकांना पैशाचे वाटप होणार असल्याने किमती कोठपर्यंत वाढतील हे सांगता येत नाही! ह्या भाववाढीमुळे वेतनवाढीची रास्त मागणी येते व ती पुरी केल्यास पैसा वाढतो व वस्तूंना मागणी व त्यांच्या किमती वाढतात. ह्याच परिस्थितीत तुटीच्या अर्थभरण्याची सुमारे रु. २२०० कोटींची भर पडली म्हणजे किमतींचा पतंग गगन भेदूनच जाईल यात संशय नाही!

### किमती, वेतने व उत्पन्ने

सुरुवातीला पाचव्या योजनेवरील दस्तऐवजाचा जो तर्जुमा दिला आहे, त्यावरून नियोजन मंडळ (व सरकार) वेतने उत्पादकतेशी जोडण्यास तयार आहे असे दिसते. परन्तु नुकत्याच घेतलेल्या शेकडा ८·३३ बोनस देण्याच्या निर्णयावरून सरकारची भूमिका घट्ट व तर्कशुद्ध नाही असे दिसते. त्यामुळे नुसतीच वेतने वाढतात पण उत्पादन वाढत नाही—आणि त्यामुळे किमती वाढतात— आणि वेतनवाढीची मागणी पुढे येते. ह्यावर उपाय म्हणजे काही एक कालपर्यंत सरकारने सक्तीने वेतने व उत्पन्ने यांतील वाढ स्थगित करणे व उत्पादन वाढल्यावर मग वेतने वाढू देणे. इंग्लंड, अमेरिका ह्या खुल्या अर्थव्यवस्थेतही हे प्रयोग अलीकडे केले गेले आहेत. आणि त्यामुळे त्याचा तात्पुरता तरी फायदा झालेला आहे. पण येथे तसे काही करू पाहाणे म्हणजे संप आणि संघर्षांना आमंत्रण देण्यासारखेच आहे. तेव्हा आज तरी भाववाढ-वेतन-उत्पन्न-वाढ ह्या दुष्ट चक्रातून सुटका होणे अवघड दिसते.

### विषमता-उच्चाटन

आर्थिक विषमता-उच्चाटनाचे ध्येय दुसऱ्या योजनेत समाजवादी समाजरचनेचे ध्येय निश्चित झाल्यानंतर, प्रत्येक योजनेचे पालुपद होऊन बसले आहे. आणि आजही ते 'ध्येय'च आहे आणि न दिसण्याइतके दूर आहे! जबरदस्त कर, करसंपत्तीचा दलित वर्गासाठी उपयोग, संपत्तिकर, शेतजमीनधारण-मर्यादा, मोफत शिक्षणादी सवलती, इत्यादी समताप्रवर्तक उपाय अवलंबिण्यात आले आहेत. तरीही विषमतेचे चित्र हे असे आहे. नॅशनल सँपल सर्व्हेच्या पाहणीवरून असे आढळून आले आहे की, सर्वांत वरचे १०% लोक राष्ट्रीय उपभोगापैकी ३०% उपभोग भोगतात; तर तळातील ४०% लोकांना २०% पेक्षाही कमी उपभोगात वाटा मिळतो! सुमारे ५० टक्के लोकसंख्येला राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त २०% उत्पन्न मिळते; पण ५% ना मात्र २०% पेक्षा अधिक मिळते! एकूण शेतकरी कुटुंबांपैकी १५% ना जमीनच नाही. मात्र १०% जवळ ५०% पेक्षाही जास्त आहे! हे सर्व १९६१-६२ चे कमाल जमीनधारणा कायदे होऊन अमलात आल्यावरचे चित्र आहे! आता १९७१-७२ चे सीलिंग कायदे झाले आहेत. त्यातही मर्यादा कमी केली आहे; पण तेथेही ती वाढविण्याचे (यशस्वी) प्रयत्न राज्यपातळीवर होत आहेत. शिवाय हरितक्रांती ही बी-बियाणे, खते, मुबलक पाणीपुरवठा इत्यादींवर अवलंबून असल्याने तिचे लाभही सधन शेतकऱ्यांनाच मिळाले आहेत.

याहीपेक्षा शरमेची गोष्ट म्हणजे शहरी आणि ग्रामीण भागात एक उपऱ्या श्रीमंतांचा नवाच वर्ग उदयाला आला आहे आणि सध्याच्या आर्थिक परिस्थितीतील अभावांचा फायदा उपटून तो आपली तुंबडी भरत आहे! त्याचप्रमाणे ज्या सुधारणा गरिबांसाठी व दलितांसाठी आहेत, त्या सर्व चातुर्याने-साम, दाम, दंड नीतीचा उपयोग करून आपल्याकडेच वळवून घेत आहे. शेतीची कर्जे, अनुदाने बहुतांशी सधन शेतकऱ्यांच्याच हातात जात आहेत.

### दारिद्र्यनिर्मूलन व रोजगारी

भारतात आजही ४०% लोक (२२ कोटी) गरिबीच्या रेषेच्या खाली—म्हणजे आजच्या किमतीत दरमहा ४० रु. ही न मिळविणारे (किमान अन्नवस्त्रनिवाराही नसणारे) असे आहेत. त्यांच्या किमान गरजा भागविण्याचा कार्यक्रम हातात घेण्यात येऊन त्यांचे राहणीमान (!) "अधिक बरे" करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, घरजागा, रस्ते, इत्यादी कामे हाती घेऊन हे कार्य करण्यात येणार आहे हे कार्यक्रम सर्व विकासकार्यक्रमाशी संलग्न करण्यात येणार आहेत व त्यावर सुमारे रु. १०,००० कोटी खर्च करण्यात येतील. तसेच सामान्य जनासाठी लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करण्यात येणार असून श्रीमंतांच्या उपभोगावर नियंत्रण घालण्यात येणार आहे!

ह्याच कार्यक्रमाबरोबर कुटुंब नियोजनाचाही कार्यक्रम आणखी धडाडीने चालविण्यात येणार आहे व पुढील योजनेत लोकसंख्या-वाढीचा दर दरसाल दर शेकडा १·५ पर्यंत उतरविण्यात येण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे सुशिक्षितांची बेकारी हटविण्याकरिता पाच लाख नोकऱ्या निर्माण करण्यात येणार आहेत.

हे सर्व वाचले की आपण नेहमीचेच सरकारी पत्रक वाचत आहोत असे वाटते, ह्याकरिता १० नाही १२ हजार कोटी रुपये खर्च झाले तरी, व ते व्यवस्थित खर्च झाले तरी, ते आभाळाला ठिगळ लावल्यासारखेच होणार आहे. आणि हा पैसा "नेहमीप्रमाणेच" खर्च होणार नाही अशी काय खात्री आहे?

मात्र चालू अवर्षणाने जनता-सहभागाची उत्तम संधी मिळाली आहे. हल्ली सुरू असलेली व तशाच प्रकारची शेतीची कामे

सरकारने सतत पाच वर्षे चालू ठेवावी-बंधारे, तलाव, रस्ते बांधावे रेल्वे बांधाव्या, घरे बांधावी, लहान लहान उद्योग वसवावे-युद्धाच्या निकडीने सध्याप्रमाणेच कामच लावावे, त्यात खंड पडू देऊ नये.

चालू दस्तऐवजात सरकारने गरिबी हटाव व रोजगारी निर्मितीच्या योजनांचा तपशील दिलेला नाही. तो तपशील सगळीकडच्या गरजा लक्षात घेऊन साकल्याने मांडता आला पाहिजे. मात्र उत्पादन वाढल्याशिवाय रोजगारी व उत्पन्ने वाढणार नाहीत, व ती वाढविल्याशिवाय गरिबी जाणार नाही. म्हणून नियोजनमंडळाने सरकारला हरप्रयत्नाने उत्पादन-विशेषत: सामान्य लोकांच्या गरजा भागविण्याचे-निर्यातवाढीचे-आयात वसुलीचे-उत्पादनवाढीचा सल्ला दिला पाहिजे. सैद्धान्तिक समाजवाद अगर एकाधिकार व्यापार थोडा बाजूस ठेवला तरी चालेल. तरच गरिबीचा प्रश्न थोडक्यात सुटू शकेल.

### अंमलबजावणी

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तपशीलवार केलेल्या नियोजनाची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे. आणि आजपर्यंतचा अनुभव येथेच आपणाला निराश करतो. विलंब, बेपर्वाई, नासधूस, लाचलुचपत हे दोष तर नेहमीचेच आहेत. पण नियोजनाची माहितीसुद्धा सामान्य जनतेला नसते. तर मग तिचा सहभाग कसा मिळणार ? नियोजन म्हणजे सरकारी कामाप्रमाणे चालते आणि नेहमीप्रमाणे त्यात काही लोक आपले हात धुऊन घेतात. नियोजनाची पूर्ण जाणीव जनतेला करून देणे आवश्यक आहे.

सरकारने आपल्या खात्यातून काटकसरीचा आदर्श घालून दिला पाहिजे. आज सरकारी वरिष्ठ अधिकारी 'गरिबी हटाव'च्या सत्रात भाग घ्यावयास जातात आणि रोजी १०० रु. च्या हॉटेलात सरकारी खर्चाने राहातात-विमानांखेरीज त्यांना प्रवासही चालत नाही-हे पालटले पाहिजे. अधिकाऱ्यांनी सेवावृत्ती व काटकसरीचा आदर्श घालून दिला पाहिजे.

### उपसंहार

"नियोजन म्हणजे जे शक्य असते ते संपादण्याची कला" असे म्हणतात. भारतीय नियोजन ह्या व्याख्येत कधीच बसले नाही. आपण नेहमीच शक्यतेच्या पलीकडे दृष्टी ठेवली पण आपल्या मर्यादित साधनसामग्रीकडे, गुणवत्तेकडे, कुवतीकडे दुर्लक्ष केले, किंवा जाणूनबुजून मोठी झेप घेत असता, पाळावयाची पथ्ये पाळली नाहीत, आवश्यक तितके कठोर झालो नाही. समाजवादाचा उद्घोष केला-पण तो तातडीने आणला नाही. आणि भांडवलशाहीच्या फायद्यांनाही आपण मुकलो. गरिबांना सुधारू शकलो नाही-पण श्रीमंतांच्या संपत्तीलाही समाजोपयोगी होण्यास वाव ठेवला नाही. पाचव्या योजनेच्या दृष्टिकोनाचा दस्तऐवजही ह्याच पद्धतीतला आहे. त्यात खूप इच्छिले आहे पण ते सर्व अतर्क्य, अशक्य वाटते. निव्वळ शब्द !

●


नागरी सहकारी बँकेतील अग्रणी बँक

# सांगली अर्बन

## को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना १९३५ )

नूतन दीपावली वर्ष सर्वांना सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... रु. | १५,००,००० |
| वसूल भांडवल | ... रु. | ९,०२,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... रु. | १७,१८,३२७ |
| ठेवी | ... रु. | ३,४७,४८,००० |
| कर्जे | ... रु. | २,५०,३१,००० |

शाखाविस्तार—

माधवनगर, खणभाग (सांगली), बुधगाव, गावभाग (सांगली), विश्रामबाग, कसबेडिग्रज, भिलवडी, मार्केट यार्ड (सांगली), म्हैसाळ व मराठवाड्यातील बीड व परभणी या जिल्ह्यांचे ठिकाणी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मा. न. कार्लेकर
वकील
कार्याध्यक्ष

ल. य. लागू
बी. ए., एलएल. बी.
व्यवस्थापक



हेड ऑफिस टे. नं. २२ मिश्रखत विभाग टे. नं. ५६
माल खत वि. विभाग टे. नं. ५८ ऑईल मिल टे. नं. ५०

शेकडो शेतकऱ्यांनी वापरून अत्युत्कृष्ट अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच बहुसंख्य शेतकरी श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी निर्मित

# पैसाफंड मिश्रखत

| | |
|---|---|
| १५ : ५ : ५ | १२ : ६ : ० |
| १० : ५ : ५ | ६ : १२ : ० |
| ९ : ९ : ५ | ९ : ९ : ० |

सर्व पिकांना वापरणे पसंत करतात. आपण एकवेळ अनुभव घेतलेस कमी पैशांत भरपूर मोबदला मिळण्याचे समाधान आपणासही लाभेल. एकवेळ वापरून खात्री करा.

आ. बा. नाईक
मॅनेजिंग डायरेक्टर

एस. बी. गार
शेती अधिकारी

एल. वाय. पाटील
चेअरमन

श्री पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि.,
हुपरी, जिल्हा-कोल्हापूर.

# बँकांच्या राष्ट्रीयीकरणाने काय साधले?

## आत्मसंशोधन आणि त्वरित उपाययोजना आवश्यक

( त्र्यं. वि. जोग, बँक ऑफ महाराष्ट्राचे भूतपूर्व कस्टोडिअन, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर )

**लोकांमध्ये बँकांच्या कार्याबद्दल वैफल्याची, नैराश्याची, अविश्वासाची भावना का फैलावत, बळावत आहे, बँकांची जनमानसातील प्रतिमा का डागळत चाललेली आहे, ह्याचा कसून शोध घेण्याची वेळ आली आहे. अकार्यक्षमतेकडे व नुकसानीच्या रोखाने बँकांची अशीच वाटचाल चालू राहिली तर बँकिंग धंद्याचे भवितव्य धोक्यात आहे हे सांगण्यास ज्योतिषाची गरज नाही. बँकांची व्यवस्थापन यंत्रणा शाखाधिकारी व त्यांच्या हाताखालील सेवकवर्ग ह्यांच्या मनात व विचारात नवीन प्रेरणा, उत्साह व आवेश योग्य त्या प्रमाणात निर्माण करू शकल्या नाहीत, हे कटु सत्य आहे. या अपयशाची वस्तुनिष्ठ कारणे कोणती याचा सखोल अभ्यास करून त्यांचे त्वरित निवारण कसे करता येईल, इकडे बँकांनी प्रथम लक्ष पुरविणे आवश्यक आहे.**

देशातील १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यास चार वर्षे लोटून गेली. राष्ट्रीयीकरणाचे वेळी सर्वसामान्य लोकांच्या बँकांच्या कार्य व धोरणाबद्दलच्या आशा उंचावल्या होत्या, अपेक्षा वाढल्या होत्या. राष्ट्रीयीकरण म्हणजे एका क्रांतिकारी व सामाजिक-आर्थिक स्थित्यंतराची, एका नव्या पर्वाची नांदीच होय अशी सर्वसाधारण समजूत होती. सामाजिक न्यायाच्या प्रतिष्ठापनेचे, समाजातील सर्व थरातील लोकांना आर्थिक उन्नतीचे आश्वासन देणारे, अर्थव्यवस्थेचा योजनाबद्ध संतुलित विकास व अभ्युदय घडवून सर्वांना आर्थिक संपत्तीचे द्वार खुले करण्याचे एक अमोघ साधन म्हणून बँकांकडे लोक मोठ्या आशेने पाहात होते. पण प्रत्यक्षात मात्र बँकांनी या अपेक्षा धुळीस मिळविल्या आहेत, वचनभंग केला आहे, त्यांची उक्ती व कृती यातील तफावत वाढतच आहे असा समज जनमानसात दृढमूल होऊ पाहात आहे, हे कटु सत्य आहे. लोकांमध्ये बँकांच्या कार्याबद्दल अशी विफलत्वाची, नैराश्याची, अविश्वासाची भावना का फैलावत, बळावत आहे, बँकांची जनमानसातील प्रतिमा का डागळत चाललेली आहे याचा कसून शोध घेण्याची वेळ आली आहे. खरेखुरे आत्मसंशोधन करून लोकांच्या भ्रमनिरासाची कारणे दूर करण्याचे प्रयत्न न करता, केलेल्या कामगिरीवरच बँका जर आत्मसंतुष्ट राहातील तर त्या लोकक्षोभास पात्र ठरतील व परिणामी राष्ट्रीयीकरणाच्या प्रयोगाच्या अपयशाचे खापर त्यांच्या माथी मारले जाण्याची शक्यता नजरेआड करता येणार नाही.

बचतसंचय वाढ, शाखाविस्तार, ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पदार्पण आणि अर्थव्यवस्थेचा अग्रक्रम दिल्या गेलेल्या व समाजाच्या मागासलेल्या, उपेक्षित व दुर्बल घटकांना कर्जरूपाने आर्थिक साहाय्य व प्रोत्साहन या बाबतीत गेल्या चार वर्षांत बँकांनी केलेले कार्य, गाठलेला प्रगतीचा टप्पा यांची आकडेवारी व अहवाल रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी प्रसिद्ध केले आहेत. तरीसुद्धा बँकांच्या एकंदर कारभाराबाबत व कर्तृत्वाबाबत लोकांच्या मनांतील आशंकांचे निवारण होत नाही ही निश्चित चिंतेची बाब आहे.

बँकांच्या एकूण शाखांची संख्या जून १९६९ मध्ये ८,२६२ होती. ती एप्रिल १९७३ अखेरीस १५,१२४ पर्यंत वाढली. याशिवाय बँकांना आणखी २,३८५ केंद्रांत शाखा उघडण्याचे परवाने दिले होते ते वेगळेच. या शाखाविस्ताराचे नागरी-ग्रामीण प्रदेशानुरूप तुलनात्मक वर्गीकरण खाली दिले आहे.

| | शाखांची एकूण संख्या | |
|---|---|---|
| | जून १९६९ | एप्रिल १९७३ |
| १. ग्रामीण | १,८३२ | ५,४७४ |
| | [२२·४%] | [३६·२%] |
| २. अर्धवट नागरी | ३,३२२ | ४,६६२ |
| | [४०·१%] | [३०·८%] |
| ३. नागरी | १,४४७ | २,५२५ |
| | [१७·५%] | [१६·७%] |
| ४. फार मोठी शहरे व बंदर विभाग | १,६६१ | २,४६३ |
| | [२०·२%] | [१६·३%] |
| एकूण | ८,२६२ | १५,१४० |
| | [१००%] | [१००%] |

[ टीप :—कंसातील आकडे एकूण संख्येशी शेकडा प्रमाण दर्शवितात. ]

या नवीन शाखांपैकी शेकडा ५८% पेक्षा अधिक शाखा एकही बँक नसलेल्या ठिकाणी उघडल्या गेल्या असून ग्रामीण भागातील एकूण शाखांची संख्या दुपटीपेक्षाही अधिक वाढून ५,४७४ पर्यंत येऊन ठेपली आहे. ग्रामीण भागातील शाखांच्या संख्येचे एकूण शाखांच्या संख्येशी शेकडा प्रमाण एप्रिल १९७३ असेर ३६·२ टक्के होते. या अभूतपूर्व शाखाविस्तारामुळे चार वर्षापूर्वी शाखेगणिक सरासरी लोकसंख्येचे मान ६५,००० होते ते आता ३६,००० पर्यंत खाली आले आहे. जलद

शाखाविस्ताराबरोबर अनुसूचित व्यापारी बँकांकडील ठेवीतही लक्षणीय वाढ झाली आहे. जून १९६९ रोजी एकूण ठेवींची रक्कम-रु. ४,६४६ कोटी होती ती ३० जून १९७३ अखेर रु. ९,०१८ कोटींपर्यंत वाढत गेली. पण ग्रामीण भागांतील शाखांची ठेवी जमा करण्याबाबतची व कर्ज वितरणाबाबतची कामगिरी अपुरी, तोकडी व असमाधानकारक आहे. जून १९७२ अखेर या ग्रामीण शाखांनी जमा केलेल्या ठेवी व दिलेली कर्जे यांचे बँकांकडील एकूण ठेवी व कर्जे यांशी शेकडा प्रमाण अनुक्रमे फक्त ६ व ४ एवढेच होते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिन एप्रिल १९७३ च्या पुरवणीमध्ये उद्धृत केलेल्या आकडेवारीवरूनही असाच निराशाजनक निष्कर्ष निघतो.

जून १९७२ च्या शेवटच्या शुक्रवारी ४,७७८ ग्रामीण शाखांपैकी ४,१२० ग्रामीण शाखांकडील एकंदर ठेवी रु. ४८५·५५ कोटी होत्या तर त्यांनी दिलेली कर्जे केवळ रु. १९०·९३ कोटी होती. तसेच त्याच दिवशी ४,३६४ अर्धनागरी शाखापैकी ४,०२५ शाखांकडील एकूण ठेवी रु. १६६९·१० कोटी होत्या व त्यांनी दिलेली कर्जे रु. ६८३ कोटी होती. या दोन्हीही प्रदेशांतील बँकांच्या शाखांकडील कर्जव्यवहाराचे ठेवीशी शेकडा प्रमाण अनुक्रमे ३९·३२ व ४०·९२ होते. २,४८२ नागरी शाखांपैकी २,२४७ नागरी शाखांकडील ठेवी व कर्जे अनुक्रमे रु. १,७९८·२८ कोटी व रु. १,१३६·९४ कोटी होती तर १,८९१ महानगरांतील शाखांपैकी १,८१२ महानगरांतील शाखांकडील ठेवी व कर्जे अनुक्रमे रु. ३,६०६·२४ कोटी व रु. ३,३५६·४६ कोटी होती. नागरी भागांतील शाखांकडील कर्जव्यवहाराचे ठेवीशी शेकडा प्रमाण ६३·२२ होते तर महानगरांतील शाखांचे बाबतीत तेच प्रमाण ९३·६ होते. तसेच वर नमूद केलेल्या दिवशी बँकांकडे ज्या एकूण ठेवी होत्या त्यांपैकी शेकडा ५० पेक्षा अधिक ठेवी महानगरांतील शाखांकडील होत्या आणि बँकांच्या एकूण कर्जव्यवहारांपैकी शेकडा ६२ टक्के कर्जव्यवहारही याच महानगरांतील शाखांनी केलेला होता.

यावरून हाच स्वच्छ निष्कर्ष निघतो की ग्रामीण व अर्धवट नागरी प्रदेशांतील बचत संचयरूपी साधनसामग्रीचा ओघ व विनियोग बँका महानगराकडे व महानगरासाठी करीत आहेत व त्यामुळे प्रादेशिक विषमता अगर असमतोल दूर करण्याच्या राष्ट्रीयीकरणाच्या एका प्रमुख उद्दिष्टास प्रत्यक्षात बँका हरताळ फासत आहेत. मागासलेल्या विभागांतून विकसित विभागांकडे अशा रीतीने साधनसामग्रीचा ओघ वळविल्यामुळे विषमता कमी होण्याऐवजी वाढतच आहे व त्यामुळे बँकांच्या कारभाराबद्दल अधिकच नाराजी व्यक्त केली जात आहे.

बँकिंगच्या विविध सेवा व सुविधा जास्तीतजास्त प्रदेशांत व समप्रमाणात उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने शाखाविस्ताराचा अभूतपूर्व कार्यक्रम बँकांनी पुरा केला आहे व १९७५ अखेर अजून ५,००० नवीन शाखा उघडण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे


दीपावली शुभचिंतन

आमचे सभासद, खातेदार व हितचिंतक यांस
नूतन वर्ष आनंदाचे व भरभराटीचे जावो.

— आमच्यावरील विश्वासाचे प्रतीक —

(१) ठेवी ............... १ कोटीचे वर
(२) कर्जे ............... ७५ लाखाचे वर
(३) खेळते भांडवल... १ कोटीचे वर

आपल्या बँकिंगविषयक सर्व गरजा भागविण्यासाठी
आम्हांस सहकार्य करा.

— आजच समक्ष भेट द्या —

दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह
अर्बन बँक लि., पुणे

मुख्य ऑफिस : लक्ष्मी रोड, पुणे ३०
फोन नं. ५६२८३

शाखा :
४८९/२, अ, पर्वती,
पुणे ९.
फोन नं. २७३८६

शाखा :
सि. स. नं. ६२ ब/घ. नं. ३३
बोपोडी,
पुणे ३.

व. गं. वर्वे, बी. कॉम., व्यवस्थापक
भा. ग. खडे, बी. ए., उप-कार्याध्यक्ष
म. ना. परांजपे, बी. ए., बी. कॉम., एलएल. बी., कार्याध्यक्ष



दि बँक ऑफ कराड लि., कराड

(शेड्युल्ड बँक)

रजि. ऑफिस :—१५, रविवार पेठ, कराड

शाखा :

मुंबई, पुणे, सातारा, इस्लामपूर, तासगाव, विटा, कोल्हापूर, मलकापूर, भोर, ताकारी, संगमेश्वर व कसबा तारळे, (जि. कोल्हापूर)

माहिम शाखा लौकरच सुरू होत आहे.

: ठेवींवरील व्याजाचे दर :

सेव्हिंग्ज ठेव ४½ टक्के.
मुदत ठेव १ वर्ष ते ५ वर्षापेक्षा जास्त. ६½ ते ७½ टक्के.

१ वर्ष मुदतीची ठेवीची दीडपट योजना व ९ वर्षे ४ महिने मुदतीची ठेवीची दामदुप्पट योजना व इतर आकर्षक योजनांसंबंधीची माहिती बँकेच्या ऑफिसात मिळू शकेल.

म. न. आठवले
चेअरमन

तथापि या बाबतीतही प्रादेशिक विषमतेचे प्रमाण नजरेत भरण्यासारखे आहे. कारण १९७२ अखेर भारताच्या पश्चिम व दक्षिण भूप्रदेशात ८,१८८ शाखा होत्या तर पूर्व व ईशान्य भूप्रदेशात केवळ १,७८० शाखा होत्या. ३०-६-७२ अखेर राष्ट्रीय पातळीवर सरासरी दर ४०,००० लोकसंख्येस एक शाखा असे प्रमाण आहे तर मणिपूर, आसाम, त्रिपुरा, नागालँड, अरुणाचल प्रदेश, मिझोराम, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश व मध्य प्रदेश या राज्यांतील दर शाखेगणिक लोकसंख्या बरीच जास्त आहे.

अर्थव्यवस्थेतील प्राधान्य दिलेल्या क्षेत्रांना आणि समाजातील दुर्बळ व दुर्लक्षित घटकांना अधिकाधिक पतपुरवठा करून कर्ज वितरणाच्या धोरणात व एकंदर साच्यात अधिकाधिक विविधता, नाविन्य, बहुरंगीपणा आणण्याच्या दृष्टीने बँकांनी टाकलेली पावले व प्रगती असमाधानकारक असून प्रगतीचा वेगही ओसरू लागला आहे असे दिसून येते.

जून १९६९ ते जून १९७२ या काळात बँकांची एकंदर खडी कर्जे रु. ३,५९९ कोटीवरून रु. ६,२९९ कोटीपर्यंत वाढली. तथापि वर उल्लेखिलेल्या अग्रक्रम दिल्या गेलेल्या क्षेत्रांना सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांनी दिलेली कर्जे मात्र जून १,९६९ मध्ये रु. ४४१ कोटी होती ती सप्टेंबर १९७२ अखेर रु. १०८० कोटीपर्यंत व डिसेंबर १९७२ अखेर रु. ११६१ कोटीपर्यंत वाढली. या क्षेत्रातील कर्जदारांच्या खात्यांची एकूण संख्या जून १९६९ ला २,६०,१४२ होती ती डिसेंबर १९७२ अखेर १७,२९,००० पर्यंत वाढली. पण या क्षेत्राशी असलेल्या कर्जव्यवहाराचे सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांच्या एकूण कर्जव्यवहाराशी शेकडा प्रमाण जून १९६९ मध्ये १४·९ होते ते जून १९७२ मध्ये २३ पर्यंत चढले व सप्टेंबर १९७२ अखेर २५·१ पर्यंत वाढले. तथापि सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांच्या कर्जव्यवहाराच्या वाढीतील प्राधान्य दिल्या गेलेल्या क्षेत्राकडे जाणारा वाढीचा हिस्सा उत्तरोत्तर कमी होत आहे. १९७० मध्ये एकूण कर्जवाढीच्या ५६ टक्के वाढ प्राधान्य दिलेल्या क्षेत्रांतील कर्जात झाली तर हेच प्रमाण १९७१ मार्च अखेर ३६ वर आले तर १९७२ मार्च अखेर ते आणखी खाली म्हणजे २३ वर घसरले. कृषी व्यवसायास दिलेली कर्जे जून १९६९ अखेर रु. १६२ कोटी व एकूण कर्जदार खातेदार १,६४,००० होते तर डिसेंबर १९७२ अखेर सदर कर्जे रु. ४३० कोटीपर्यंत वाढली व कर्जखातेदारांची संख्या १२,४५,००० पर्यंत गेली. याच काळांत लघु उद्योगांना केलेले आर्थिक साहाय्य रु. २५१ कोटीवरून रु. ५७० कोटींपर्यंत वाढले तर कर्जदार खातेदारांची संख्या ५०,८५० वरून १,७९,१९० पर्यंत गेली. तथापि बँकांच्या एकूण कर्जव्यवहारात प्राधान्य दिलेल्या विविध क्षेत्रांतील कर्ज व्यवहारांचे प्रमाण फारसे उत्साहजनक नाही हे खालील कोष्टकांवरून दिसून येईल.

एकूण कर्जाचा शेकडा हिस्सा

| | जून १९६९ | जून १९७२ |
|---|---|---|
| प्लँटेशन्स खेरीज शेतीसाठी दिलेली खडी कर्जे | ५·८ | ८·४ |
| [अ] प्रत्यक्षपणे | १·४ | ५·० |
| [ब] अप्रत्यक्षपणे | ४·४ | ३·४ |
| लघु उद्योग | ८·१ | ११·४ |
| खुश्कीच्या व जलमार्गाने वाहतूक करणारे | ०·२ | १·१ |
| किरकोळ व्यापार व लहान धंदे | ०·७ | १·७ |
| व्यावसायिक आणि स्वतःच्या रोजगार असलेले | ०·१ | ०·२ |
| शिक्षण | — | ०·१ |
| एकूण | १४·९ | २२·९ |

राष्ट्रीयीकरणानंतर सर्वांगीण प्रादेशिक विकासाचे तत्त्व ग्राह्य धरण्यात व अंगीकारण्यातही आले. त्यास अनुसरून जिल्हा हा घटक समजून त्याचा विकास व उत्कर्ष यांस चालना देण्याचे उद्दिष्टाने जिल्हा विकास मार्गदर्शक बँक योजना (Lead bank scheme) हा एक अभिनव, क्रांतिकारक उपक्रम सुरू करण्यात आला. जिल्हा हा या योजनेचा केंद्रबिंदू व कार्यक्षेत्र. त्याच्या अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण समतोल विकास घडवून आणण्याची अंतिम जबाबदारी विशिष्ट बँकेवर सोपविण्यात आली आहे. या कामी ज्या बँकेस जो जिल्हा नेमून दिला असेल त्या बँकेने पुढाकार घेऊन त्या जिल्ह्याच्या विकासाच्या योजना आखावयाच्या आहेत, कार्यवाही करावयाच्या आहेत व पुऱ्या करावयाच्या आहेत आणि त्यासाठी त्या जिल्ह्यातील सर्व संस्थांचे,—बँका, सरकारी कचेऱ्या, वित्तीय संस्था, वगैरेंचे—साहाय्य व पाठबळ मिळविण्याबाबतची,—नेतृत्वाची जबाबदारी त्या बँकेवर टाकण्यात आली आहे. सदर योजनेचा मुख्य भर आहे स्थानिक ग्रामीण विकासावर आणि या विकासाचे कार्यात तेथील सर्व थरांतील, सर्व भागातील, अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेण्यावर. पण गेल्या चार वर्षांत या योजनेची प्रत्यक्ष कार्यवाहीच्या रोखाने होत असलेली वाटचाल कूर्मगतीनेच चालू असल्याचे दिसते. जिल्ह्यांच्या अर्थव्यवस्थेच्या पाहणीचे अहवाल जवळजवळ पूर्ण होत आलेले आहेत त्या त्या जिल्ह्यात जरूर त्या शाखा उघडण्याचा कार्यक्रमही बहुतेक पुरा झाला आहे. वेगवेगळ्या जिल्ह्यांना अनुरूप अशा प्रत्यक्ष कृतिप्रधान कार्यक्रमाची योजनाबद्ध आखणी करण्याचे दृष्टीने जिल्हानिहाय विचार-विनिमय समित्याही (consultative committees) स्थापन झाल्या आहेत. तथापि दुःखाची गोष्ट ही आहे की प्रत्यक्षात या समित्या अकरणात्मक, अकार्यक्षम ठरल्या आहेत. त्यांच्या विचारमंथनातून वस्तुतः काहीच भरीव फलनिष्पत्ती होत नाही, आजपर्यंत झालेली नाही.

स्थानिक अर्थव्यवस्थेशी निकटचे संबंध प्रस्थापित करून तिचा विकास साधण्याचे कामात बँकांनी स्वतःला फारसे गोवून अगर गुंतवून घेतलेले दिसत नाही. विशेषतः अग्रक्रम दिल्या गेलेल्या क्षेत्रांना कर्जरूपाने वाढते साहाय्य देण्यात केलेली प्रगती असमाधानकारक आहे. या क्षेत्रांना खरोखर किती कर्जपुरवठा पाहिजे आहे हे निश्चित करण्यात बँकांना अद्याप यश आलेले नाही. बँकिंग संघटना खऱ्या अर्थाने योजनाबद्ध रीतीने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा उत्कर्ष घडवून आणण्याचे एक प्रभावी साधन बनविण्याचे सुप्त सामर्थ्य या योजनेत निश्चित आहे. पण वाण आहे ती तडफदार नेतृत्वाची, उपक्रमशीलतेची, विधायक कल्पक योजकतेची व परिस्थितीस इष्ट दिशेनेच वळण देण्याची उमेद बाळगणाऱ्या संघटना चातुर्याची.

मार्च १९७२ मध्ये सामाजिक समतेच्या तत्त्वास अनुसरून आणखी एक नवीन प्रयोग व अभिनव उपक्रम सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांनी सुरू केला होता. ती म्हणजे समाजातील दुर्बल व मागासलेल्या घटकांना कमी व्याजाचे दराने मर्यादित पतपुरवठा करून देऊन आर्थिक उत्कर्षाची सुसंधी प्राप्त करून देण्याची योजना. [ Differential Interest Rates Scheme ] या योजनेखाली अल्पप्राप्ती असलेल्या निवडक, होतकरू व लायक आणि समाजातील मागासलेल्या व दुर्बळ घटकांना काही विशिष्ट शर्तींवर पात्रता पारखून द. सा. द. शे. ४ व्याजाचे दराने आर्थिक साहाय्य करण्याचे आदेश बँकांना देण्यात आले असून प्रत्येक बँकेने गतवर्षातील एकूण कर्जपुरवठ्याच्या निदान ½ टक्का [ सर्व बँकांनी मिळून सुमारे रु. २० कोटी ] एवढी रकम कर्जाऊ द्यावी अशी अपेक्षा होती. सदर योजना देशातील २६५ म्हणजे जवळजवळ २/३ जिल्ह्यांना लागू केली आहे. या जिल्ह्यांतील औद्योगिक दृष्ट्या मागास विभागांना व ज्या विभागांना लहान शेतकरी उत्कर्ष-साहाय्यभूत-योजना [ Small Farmers Development Agencies Scheme ] व ज्या विभागांना जेमतेम खर्च भागेल न भागेल एवढी जमीन कसणारे शेतकरी आणि शेतमजूर यांना साहाय्यभूत योजना [ Marginal Farmers & Agricultural Labourers Scheme ] लागू होत्या, ह्या विभागांनाही ही योजना लागू करण्यात येऊन तिची व्याप्तीही वाढविण्यात आली आहे. तथापि मार्च १९७३ अखेर या योजनेखाली [ Differential Interest Rates Scheme ] बँकांनी केलेल्या एकूण ५६,५३६ कर्जदार खात्यांत रु. २,०७,००,००० एवढेच म्हणजे ठरलेल्या उद्दिष्टाच्या जेमतेम १० टक्केच आर्थिक साहाय्य दिलेले होते. यावरून सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रत्यक्ष कर्ज व्यवहारात लागू करण्यात बँकांची प्रगती किती मंदगतीने चालली आहे हे दिसून येते.

राष्ट्रीयीकरणाच्या सामाजिक, आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी बँकांनी केलेल्या कामगिरीचा अहवाल हा असा निकस, नकारा-


*With Best Compliments From*

BRITE ELECTROPLATERS

Telephone No.
8990
(Pimpri)

Telephone No.
54515
(Shivajinagar)

त्मक, निरुत्साही असल्यामुळे जागृत जनमताच्या दृष्टीने बँका अपेक्षाभंगाच्या साक्षात प्रतीक होऊन बसल्यास नवल नाही.

या दुर्लौकिकात आणि चिंतेत आणखी भर टाकणारी महत्त्वाची घटना म्हणजे दिवसेंदिवस घटत चाललेली बँकांची नफा कमविण्याची क्षमता ( Declining profitability ).

'इकॉनॉमिक टाईम्स' या दैनिकाच्या ५ सप्टेंबर १९७३ च्या अंकात बँकिंग व्यवसायाच्या १९७२ मधील कार्याचे जे अभ्यासपूर्वक समालोचन केले आहे त्यात या बाबीचा सविस्तर परामर्श घेतला गेला आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया व तिच्याशी संलग्न असलेल्या बँका, १४ राष्ट्रीयीकृत बँका व १६ खासगी क्षेत्रांतील बँका अशा एकूण ३८ बँकांचा एकंदर नफा १९७१ अखेर रु. १५·२ कोटी होता तो १९७२ अखेर जवळजवळ शे. २० ने घटून रु. १२·९ कोटीपर्यंत येऊन ठेपला. १४ राष्ट्रीयीकृत बँकांचे बाबतीत नोकरांना बोनस दिल्यानंतरचा नक्त नफा रु. ९·७१ कोटीवरून एकदम रु. ७·६२ कोटीपर्यंत गडगडला. नक्त नफ्याचे एकंदर उत्पन्नाशी शेकडा प्रमाण ३८ बँकांच्या बाबतीत २·८ वरून २·०० पर्यंत घसरले. १४ राष्ट्रीयीकृत बँकांचे बाबतीत हे प्रमाण २·९ वरून २·०० पर्यंत खाली आले. बँकांच्या एकूण व्यावहारिक खर्चाचे एकूण व्यावहारिक उत्पन्नाशी प्रमाण ( Ratio of Operating Expenses to Operating Income ) शेकडा ९७·२ वरून शेकडा ९८ पर्यंत वाढले. सरकारने या बँकांच्या भांडवलात जी एकूण रक्कम गुंतविली आहे. (रु. ८७·४० कोटी ) तिच्यावर सरकारला निदान प्रतिवर्षी द. सा. द. शे. ५·५० प्रमाणे व्याज मिळाले पाहिजे व या गुंतवणुकीची ३० वर्षांत परतफेड ( Redemption ) करण्याच्या दृष्टीने याशिवाय प्रतिवर्षी द. सा. द. शे. ३ प्रमाणे जादा व्याजही मिळाले पाहिजे. म्हणजे सरकारला या गुंतवणुकीवर कमीतकमी प्रतिवर्षी द. सा. द. शे. ८·५० प्रमाणे प्राप्ती व्हावयास पाहिजे. पण प्रत्यक्षात सरकारला या गुंतवणुकीवर १९७०, १९७१ व १९७२ या वर्षांत अनुक्रमे दर शेकडा ४·८, ५·१ व ४·८ प्रमाणेच उत्पन्न मिळाले. या तफावतीवरून सरकारला या व्यवहारात किती वाढती खोट बसत आहे याची यथार्थ कल्पना येते.

नक्त नफा व प्रत्यक्ष खेळते भांडवल ( Working Funds ) यांचे परस्पर प्रमाणही प्रत्यक्षात घटत चालल्याचे दिसते. स्टेट बँक व तिच्याशी संलग्न असलेल्या बँका यांच्या बाबतीत हे प्रमाण १९७१ अखेर शे. ०·१८ होते ते १९७२ अखेर शे. ०·१५ पर्यंत घसरले तर राष्ट्रीयीकृत बँकांच्या बाबतीत ते याच काळात शेकडा ०·१७ वरून शेकडा ०·१३ पर्यंत घटले. पण नफा कमविण्याची क्षमता अशी कमी होत असता आणि सामाजिक उद्दिष्टपूर्तीचे काम कूर्मगतीनेच चालू असता बँकांच्या व्यवस्थापकीय खर्चात मात्र वाढ होत आहे असे आढळून येते. याच संदर्भात नुकतेच केंद्रीय वित्त मंत्र्यांनी लोकसभेला १४ राष्ट्रीयीकृत बँकांतील नोकरांना १९६७ पासून प्रतिवर्षी १९७२ पर्यंत एकूण किती जादा कामाचा भत्ता ( Overtime Allowance ) दिला गेला याबद्दल एक निवेदन सादर केले होते. यावरून सदर भत्त्याबाबत बँक नोकरांना देण्यात येणारी एकूण रक्कम १९६७ मध्ये रु. ३·१३ कोटी होती ती ६ वर्षांनी म्हणजे १९७२ अखेर रु. ६·१७ कोटी पर्यंत वाढली म्हणजे जवळजवळ दुप्पट झाली असे आढळून येते. या रकमेचे एकूण नोकरवर्गावर होणाऱ्या खर्चाशी शेकडा-प्रमाण ५·४ होते. या संदर्भात बँक नोकरवर्गाची वेतनश्रेणी आणि अर्थव्यवस्थेच्या इतर विभागांतील नोकरवर्गाची वेतनश्रेणी या दोहोंतील तफावत चटकन नजरेत भरण्यासारखी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. राष्ट्रीयीकृत 'अ' वर्गातील बँकेच्या कारकुनाचा कमीत कमी व जास्तीत जास्त दरमहाचा मूळ पगार रु. १७० व रु. ५५० आहे तर मध्यवर्ती सरकारच्या कारकुनाच्या बाबतीत हे आकडे रु. ११० व रु. १८० असे आहेत. भत्त्यासकट मिळणारे एकूण जास्तीत जास्त मासिक वेतन लक्षात घेतले तर राष्ट्रीयीकृत बँकेतल्या कारकुनास रु. ९४६ मिळतात तर मध्यवर्ती सरकारी कारकुनास रु. ३४३ मिळतात. यावरून बँक कर्मचाऱ्यांची प्राप्ती समाजातील इतर विभागांतील कर्मचाऱ्यांपेक्षा कितीतरी चांगली आहे हे दिसून येते. पेट्रोलिअम उद्योगातील कर्मचाऱ्यांचे देखील मासिक मूळ वेतन कमीत कमी रु. १४५ व जास्तीतजास्त रु. ३७५ आहे आणि या धंद्यातील वेतनश्रेणी चांगल्या असल्याचे मानले जाते. वेतनश्रेणीतील ही एकदम ध्यानात येणारी तफावत बँकांच्या नोकरांना मिळणारा सतत वाढत जाणारा महागाईभत्ता लक्षात घेतला तर आणखी अधिकच वाढून दिसते. प्रश्न असा पडतो की बँक नोकरांची सांपत्तिक स्थिती इतकी चांगली असताना देखील कोणताही निकष, कसोटी अगर माप लावून पाहिले तर बँकांची आजवरची कामगिरी, कार्य व कारभार असा निकस, गलथान, अदूरदर्शीपणाचा का? आणि मग राष्ट्रीयीकरणाने काय साधले?

नफा कमविण्याची क्षमता ( Profitability ) कमी होऊन जर प्रमुख सामाजिक उद्दिष्ट पूर्ततेत इष्ट व स्पृहणीय प्रगती दाखविली असती तर बँकांना दोष दिला गेला नसता. पण तसे झाले नाही. बरे सेवा व सुविधा यांचा दर्जा उंचावला आहे असेही नाही. उलट वस्तुस्थिती अशी आहे की तो दिवसेंदिवस खालावत चालला आहे. वेळी अवेळी संप, मोर्चे, घेराव, युनियनमधील स्पर्धा आणि व्यवस्थापक वर्गातील आपापसांतील हेवेदावे, सुप्त अंतःकलह, फुटीरपणा, औदासिन्य यांचा भुर्दंड बँकग्राहकांना व सरकारलाही पडत आहे आणि अकार्यक्षमतेकडे व नुकसानीच्या रोखाने बँकांची अशीच वाटचाल चालू राहिली तर बँकिंग धंद्याचे भवितव्य धोक्यात आहे हे सांगण्यास ज्योतिषाची गरज नाही. नफा कमविण्याची क्षमता म्हणजे बँकांजवळील साधनसामग्रीचा-यात सेवकवर्ग, संघटनेचे स्वरूप, कामकाज पद्धती, व्यवस्थापन

## दि वाई अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

### वाई (सातारा)

स्थापना – ३-६-२१ दूरध्वनी क्र. ७

शाखा : १ पाचगणी ऑडिट वर्ग "अ"

| | | रु. |
|---|---|---|
| भागभांडवल | ... | ९८,९०० |
| गंगाजळी व इतर निधी | ... | २,१८,००० |
| ठेवी | ... | १८,५१,८०० |
| कर्जे | ... | १७,०६,४०० |
| खेळते भांडवल | ... | ३२,३३,८०० |

ठेवीदारांसाठी विविध आकर्षक योजना !

**सुरक्षित कप्प्यांची तालुक्यातील एकमेव सोय !!**

बँकिंगची सर्व कामे केली जातात.

| प. कृ. अभ्यंकर | पां. रा. देशपांडे | अ. स. भट |
|---|---|---|
| B. Com. LL. B. | B. A. B. T. & Dp. Ed. | B. A. LL. B. |
| मॅनेजर | ऑ. सेक्रेटरी | चेअरमन |



## सोलापूर जनता सहकारी बँक लि., सोलापूर

[इन्श्युअर्ड अंडर डिपॉझिट इन्श्युअरन्स स्कीम]

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | : | रु. ५·३१ लाख |
| ठेवी | : | रु. ५४·६४ लाख |
| कर्जे | : | रु. ४७·८२ लाख |
| खेळते भांडवल | : | रु. ७८·१५ लाख |

शाखा विस्तार : (१) मुख्य कार्यालय ७६ अ, गोल्डफिंच पेठ, सोलापूर १. (२) मंगळवार पेठ, सोलापूर २. (३) वार्शी शाखा, वार्शी.

संकल्पित शाखा : (१) सदर बझार, सोलापूर, (२) कसबे तडवळे (ता. वार्शी. जि. सोलापूर.)

खास आकर्षणे आणि वैशिष्ट्ये :

(१) ठेवींच्या विविध व आकर्षक योजना,
(२) ठेवींवर व्याजाचे आकर्षक दर,
(३) बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात,
(४) सौजन्यशील, कार्यक्षम व तत्पर सेवा,
(५) लघुउद्योग धंद्यासाठी कर्जपुरवठा.

जवळच्या शाखेस भेटा अगर लिहा.

| उद्धवराव कुलकर्णी | डॉ. प. गो. वळसंगकर |
|---|---|
| व्यवस्थापक | कार्याध्यक्ष |



॥ ॐ ॥

ही दिवाळी आमचे ठेवीदारांस व हितचिंतकांस समृद्धीची जावो.

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जमखंडी

शाखा-बन्हट्टी ] स्थापना १९४० [ फोन नं. १७

चौतीसाव्या वर्षात यशस्वी पदार्पण

(३० जून १९७३ अखेरचे बोलके आकडे)

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भागभांडवल | ... | रु. | २,८४,२६० |
| गंगाजळी व इतर निधी | ... | रु. | ६,३५,९५८ |
| सर्व प्रकारच्या ठेवी | ... | रु. | ५४,५९,९८३ |
| कर्जव्यवहारातील गुंतवणूक | | रु. | ३५,४८,७९६ |
| रोख वगैरेतील गुंतवणूक | | रु. | ८,९९,११५ |
| ठेवींवरील व्याजाचे दर | ... | रु. | १ ते ८ टक्के |
| डिव्हिडंड (नियोजित) | ... | रु. | १०½ % |
| ऑडिट वर्ग | ... | | "अ" |

स्वतःच्या मालकीची कार्यालयाची इमारत ! मार्केट यार्डात स्वतःची नऊ गोडाऊन्स ! शाखेचे कार्यालयही मालकीचे इमारतीत ! सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय ! बँकेचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

| सि. शि. गवी | मा. आ. शहा |
|---|---|
| असि. मॅनेजर | चेअरमन |



ही दीपावली आपणांस सुखाची

व

नवीन वर्ष भरभराटीचे जावो !

## हार्डीकर्स

### न्यू शॉर्टहॅन्ड अॅण्ड टाईपरायटिंग इन्स्टिट्यूट

(सरकारमान्य संस्था)

(१) वैयक्तिक लक्ष

(२) सोयीस्कर बॅचेस

(३) माफक फी

१२२५/१ फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४.

(फोन नं. ५६७८६)

कौशल्य, भांडवल, ठेवी आणि मालमत्ता काटकसरीने व कार्यक्षम वापर. नफ्याच्या पातळीशी उतरती कमान वेळीच थांबवली नाही तर बँकिंगचे धंद्यात अपरिहार्य असणाऱ्या संशयित व बुडित कर्जाबाबत तरतूद कशी करता येणार ? वाढत्या धंद्याबरोबर या धोक्याचे मानही वाढत जाणार हे उघड आहे. आणि त्यासाठी व सरकारला कमीतकमी द. सा. द. शे. ८·५० प्रमाणे गुंतवलेल्या भांडवलावर व्याज देण्यासाठी बँकांनी जरूर तो नफा मिळविलाच पाहिजे. अन्यथा त्यांच्या अस्तित्वालाच नव्हे तर पर्यायाने देशाच्या सर्व अर्थ व वित्त संस्थेलाच जबर हादरा बसल्याशिवाय राहणार नाही.

या अपयशाची वस्तुनिष्ठ कारणे कोणती याचा सखोल अभ्यास करून त्यांचे त्वरित निराकरण कसे करता येईल इकडे बँकांनी प्रथम लक्ष पुरविणे अत्यावश्यक आहे.

माझ्या प्रदीर्घ अनुभवावरून मला असे वाटते की या दुर्दशेचे मूळ व अंतिम जबाबदारी मी वर ओझरता उल्लेख केल्याप्रमाणे बँकांचे व्यवस्थापक, अधिकारी व सेवकवर्गात बँकिंग व्यवसायाच्या नवीन क्रांतिकारी ध्येय-धोरणावरील व कार्यावरील श्रद्धेचा व निष्ठेचा अभाव आणि त्यांचा यथायोग्य पाठपुरावा व पूर्तता करण्याच्या दृष्टीने आपल्या आचार विचारात, मनोधारणेत इष्ट तो व इष्ट त्या दिशेने बदल घडवून आणण्याच्या कामी कुचराई, टाळाटाळ व इच्छाशक्तीचा अभाव. सर्वांना विकासाची समान संधी प्राप्त करून देण्याच्या तत्त्वावर अधिष्ठित अशा नवसमाज निर्मितीचे बँकिंग व्यवसाय हे एक प्रभावी साधन आहे. या विचाराची छाप बँकांच्या सध्याच्या ध्येयधोरणात व कारभारात प्रकर्षाने दिसून येत नाही. सामाजिक-आर्थिक स्थित्यंतर घडवून आणण्यासाठी बँकिंग व्यवसायाची एकंदर घटनात्मक चौकट, कार्यपद्धती, व्यवस्थापन तंत्र, कामाची दिशा आणि व्यवसायाकडे बघण्याचा एकंदर दृष्टिकोन यात आमूलाग्र परिवर्तन होणे अत्यावश्यक होते व आहे. ही बँकिंग व्यवसायाची अशी पुनर्घटना करून ती अधिकाधिक लोकाभिमुख, लोकहितैषी, लोकमताचा आदर राखणारी, नित्यनवीन मार्ग, नवीन क्षितिजे, नवीन कार्यक्षेत्रे यांचा शोध घेणारी, सामाजिक उद्दिष्ट व जबाबदाऱ्या पार पाडण्याबद्दल सदैव उत्सुक, जागरूक व तत्पर, गतिमान, उपक्रमशील, सेवारत आणि कार्यक्षम बनविण्याकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही व त्या अनुरोधाने बँकांनी टाकलेली पावले व केलेले प्रयत्न फारच अपुरे व तोकडे पडले यातच बँकांच्या कामगिरीच्या अपयशाचे रहस्य सामावलेले आहे असे माझे मत आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की, उच्च स्तरावरील चालक व व्यवस्थापकवर्गाला नवीन ध्येयधोरणे व उद्दिष्टे यांचा पाठपुरावा करून व्यवसाय अधिकाधिक जनहितोन्मुख व दक्ष करण्याच्या आवश्यकतेची जाणीव असली तरी ती प्रेरणा संघटनेच्या शेवटच्या थरापर्यंत पोचलेली नाही. त्यामुळे काही अपवाद वगळल्यास, शाखाधिकारी व सर्वसाधारण सेवकवर्ग यांना या नव्या पद्धतीच्या व्यवसायाचे महत्त्व आणि काळाची गरज पुरेपूरपणे उमगलेली नाही व ते अजून या व्यवसायांतील जुन्या परंपरागत कामकाज पद्धतीस व विचारसरणीस चिकटून आहेत. आणि या जुन्या परंपरा, अनेक दशकांपूर्वी जेव्हा बँकांच्या कारभारावर नागरी व्यापार व उद्योगधंदे व नागरी संस्कृती यांचीच पकड होती त्यावेळच्या त्यावेळी साहजिकच कारभाराचा रोख बचावात्मक, साचेबंद आणि सुरक्षिततेस प्राधान्य देणारा असा होता. तथापि केवळ कार्यपद्धती व रूढ प्रथा यांच्याबाबतीत नवीन पायंडे पाडून कार्यभाग साधणार नाही तर ज्यायोगे सर्व स्तरांवरील सेवकवर्ग नवीन उद्दिष्टे साध्य व साकार करण्यासाठी जास्तीत जास्त उत्तेजित व व उद्युक्त होईल अशा पद्धतीने कार्याची मांडणी व सेवकवर्गाची नियुक्ती, बढती, प्रशिक्षण याबाबतची धोरणे आखावी व अमलात आणावी लागतील. व्यावसायिक व्यवस्थापन कौशल्याचा अधिकाधिक वापर केल्यास प्रत्येक बँक-नोकरास नेमून दिलेल्या कामात गोडी वाटेल व त्याच वेळी त्याचा उत्साह, सृजनशीलता व ज्ञान यांचाही पुरेपूर उपयोग करून घेता येईल असे वातावरण निर्माण करता येईल.

हल्लीच्या अनिर्बंध, स्वच्छंदी वातावरणात व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनोभूमिकेत व आचरणात परिवर्तन घडवून आणून, त्यांच्या मनावर बँकिंग व्यवसाय हा प्रामुख्याने समाजसेवेचे एक पवित्र व्रत आहे व प्रत्येक बँक-कर्मचारी हा खऱ्या अर्थाने सच्चा समाजसेवक आहे हे तत्त्व बिंबविणे अतिशय कठीण होऊन बसले आहे. तथापि, त्यादृष्टीने चालू पडखाऊ, भयग्रस्त, बचावात्मक व्यवस्थापकीय धोरणास प्रथम सोडचिठ्ठी दिली पाहिजे आणि बेशिस्त वर्तनाकडे दुर्लक्ष करणे, अपराध्यांची गय करणे, कामचुकारांना क्षमा करणे, आणि नालायकांकडे काणाडोळा करणे बंद केले पाहिजे. त्याचबरोबर बँक सेवकवर्गाला अधिकाधिक प्रशिक्षणाच्या सोयी व सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांची व्यावसायिक पात्रता, ज्ञान, कार्यक्षमता व कौशल्य वाढविणे हेही तितकेच आवश्यक आहे. तसेच निरनिराळ्या सर्व उभ्या व आडव्या स्तरावरील सेवकवर्गाच्या ध्येयधोरणात एकवाक्यता आणण्याच्या दृष्टीने परस्पर वैचारिक व भावनात्मक देवघेव मुक्तपणे कशी होईल इकडे कटाक्षाने लक्ष पुरविले पाहिजे व या दळणवळणाच्या आड येणारे अडथळे सत्वर दूर केले गेले पाहिजेत. तथापि याबाबतीत अधूनमधून जरी प्रादेशिक परिषदा घेतल्या जातात तरी सर्वसाधारणपणे बँकांची व्यवस्थापन यंत्रणा शाखाधिकारी व त्यांच्या हाताखालील सेवकवर्ग यांच्या मनात व विचारात नवीन प्रेरणा, उत्साह व आवेश योग्य त्या प्रमाणात निर्माण करू शकल्या नाहीत हे कटुसत्य आहे.

●

# दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, जळगांव

—: विना सहकार नही उद्धार :—

मुख्य कचेरी : नवी पेठ, महात्मा गांधी रोड, जळगाव

टेलिफोन नं. ४४९, १५४, १३४

स्थापना : १९१६ ] [ तारेचा पत्ता :- " इकोबँक "

चेअरमन-श्री. बापुसाहेब के. एम्. पाटील, (एम्. एल्. ए.) एल्.एल्. बी.

व्हाइस चेअरमन-श्री. प्रल्हादराव एकनाथराव पाटील,

व्यवस्थापक-श्री. गो. म. शहाणे, बी. कॉम., एच. डी. सी., जी. डी. सी. अँड ए.

एकूण शाखा-७३

ता. ३०-८-७३ अखेर (आकडे लाखांत)

| | | |
|---|---|---|
| (१) | अधिकृत भाग भांडवल | २००·०० |
| (२) | खपलेले भाग भांडवल | १००·३५ |
| (३) | गंगाजळी व इतर फंडस् | ९२·३४ |
| (४) | एकूण ठेवी | १२८२·९७ |
| (५) | एकूण खेळते भांडवल | १६५२·९५ |
| (६) | सहकारी संस्थांना दिलेले कर्ज | १०५८·६८ |

— प्रमुख वैशिष्ट्ये —

* भारतातील प्रमुख शहरी हुंड्या, बिले, वगैरे वसुलीची व्यवस्था केला जाते.
* सर्व प्रकारच्या ठेवी आकर्षक दराने स्वीकारल्या जातात.
* आवर्तक ठेवी स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
* जळगाव, चोपडा, चाळीसगाव, यावल, पारोळा, जामनेर व पाचोरा येथे सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्ची व्यवस्था आहे.
* बँकेत ठेवलेला पैसा जिल्ह्यातील शेती उत्पादनासाठी व शेतकऱ्यांचे समृद्धीसाठी उपयोगात आणला जातो.

सेवा—सहकार—सचोटी

करवीर नगरीतील " रौप्यमहोत्सवी " अग्रेसर नागरी सहकारी बँक

# श्री वीरशैव को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

( स्थापना १९४२ )

मुख्य कार्यालय : कोल्हापूर १५१७ सी वॉर्ड, कोल्हापूर फोन नं. ५०३

शाखा—(१) गडहिंग्लज फोन नं. १८ (२) इचलकरंजी फोन नं. २१२९ (३) श्री शाहु मार्केट यार्ड. फोन नं. २८३० (४) रेंदाळ.

— ऑडिट वर्ग " अ " —

बँकेची आर्थिक परिस्थितीः—

| | | |
|---|---|---|
| * अधिकृत शेअर भांडवल | रुपये | ३,२५,००० |
| * रिझर्व व इतर फंडस् | रुपये | ६,४०,००० |
| * ठेवी ... ... | रुपये | १,५४,००,००० |
| * कर्जे ... ... | रुपये | १,०५,००,००० |
| * खेळते भांडवल ... | रुपये | १,७२,००,००० |
| * नफा ... ... | रुपये | २,५०,००० |

आमची ठळक वैशिष्ट्ये :—(१) व्यापार, शेती व लघुउद्योगासाठी कर्जपुरवठा केला जातो. (२) निरनिराळ्या प्रकारच्या ठेव योजना चालु असून त्यावर आकर्षक व्याज दिले जाते. (३) अल्प हप्त्याने, इलेक्ट्रिक मोटारपंप, रिक्षा, सायकल, घरगुती उपयोगासाठी निरनिराळ्या वस्तु खरेदी करण्यासाठी कर्जाचा पुरवठा. (४) महाराष्ट्र, गुजरात व कर्नाटक मधील प्रमुख शहरांवरील ड्राफ्ट मिळणेची सोय. (५) सभासदांच्या सर्वांगीण प्रगतीस हातभार. (६) सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

तेव्हा आपण आमच्या कार्यालयास एक वेळ अवश्य भेट द्यावी अगर फोनद्वारे संपर्क साधावा.

आपले नम्र

बाबुराव बळवंत पाटील, बुधिहाळकर, उपाध्यक्ष — शंकरराव आप्पाजी पाटील, चंदूरकर, अध्यक्ष

एस. डी. घाळी, B.A.,LL.B.,B. Com. (व्यवस्थापक)

# दलाल अँड कंपनी

सोन्यामारुती चौक, लक्ष्मी रोड, पुणे २, टे. २४९९४

शाखा : २९६ महात्मा गांधी रोड, पुणे १. टे. २६२३७

खालील मालाचे विक्रेते

अँकर ब्रँड : * टीक प्लाय * कमर्शिअल प्लायवुड * फ्लश डोअर्स * कमर्शिअल ब्लॅकबोर्डस् * टीक ब्लॅकबोर्डस्
* स्ट्रिप्स * काँक्रीट शटरिंग प्लायवुड पार्टिकल बोर्डस् * नोव्हा माउंट ओफल बोर्डस

फॉरमायका डेकोरेटिव्ह लॅमिनेटेड शीटस् : * हार्ड बोर्डस् * इन्सुलेशनरी बोर्डस् * इन्सुलेशन टाइल्स * फेनॉलिकॉल अॅडेझिव्हज्.

# उद्योगमहर्षी लक्ष्मणराव किर्लोस्कर

**( शंकर ज. जोशी )**

"गुणी व महत्त्वाकांक्षी तरुणांना लक्ष्मणरावांच्या चरित्रावून उपयुक्त धडे घेता येतील. आपल्या देशात यंत्रनिर्मिती आणि यांत्रिक उत्पादन बाल्यावस्थेत असल्याच्या काळात, या क्षेत्रात लक्ष्मणरावांनी औद्योगिक साहस यशस्वी करून आपल्या भारताची मोठीच सेवा केली आहे."– सर मोक्षगुंडम विश्वेश्वर अय्या.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात आपला पराभव होऊन इंग्रजांची भारतावरील पकड घट्ट झालेली होती. औद्योगिक क्रांतीनंतर प्रगत झालेल्या आर्थिक व लष्करी शक्तींचा तो विजय होता. शस्त्रबळ, उत्पादनबळ, संघटनाबळ व शासन यांच्या जोरावर स्वतःच्या देशापासून हजारो मैल दूर असलेल्या भारतावर इंग्रज राज्य करीत होते.

भारत थंड गोळा होऊन पडला होता. आपला समाज उदासीन आणि रूढ मार्गाने परंपरेच्या चाकोरीतून जगणारा. नव्यानेच इंग्रजी शिक्षण घेतलेले इंग्रजांच्या कपड्यांचे, खाण्यापिण्याचे व बाह्य स्वरूपाचे अनुकरण करीत होते. आर्थिक स्वास्थ्यात सुस्तावले होते.

इंग्रजी समाज गतिमान होता. त्यांच्या कारखान्यांत विविध प्रकारचा माल बनत होता. कारखान्यांना लागणारी यंत्रसामग्री बनत होती. नवनवीन कारखाने निघत होते. जगभर पसरलेल्या साम्राज्यातून कच्च्या मालाचा पुरवठा होत होता आणि ब्रिटिशांच्या पक्क्या मालाने जगाच्या बाजारपेठा भरून जात होत्या.

या कालखंडात धारवाडजवळच्या गुर्लहोसूर गावी २० जून १८६९ रोजी लक्ष्मणराव किर्लोस्कर यांचा जन्म झाला. बटुआका, रामुअण्णा, वासुदेवराव व दुर्गाताई ही त्यांची चार भावंडे.

लक्ष्मणराव अवघे तीन वर्षांचे असताना त्यांच्या मातोश्रींचे निधन झाले. त्यानंतर त्यांचा सांभाळ बटुआक्का यांनी केला.

वयाच्या सहाव्या वर्षी लक्ष्मणराव धारवाडला मारुतीच्या देवळातील भाऊपंत मास्तरांच्या शाळेत जाऊ लागले. पण शाळेतल्या अभ्यासापेक्षा चित्रे काढणे, हाताने लहान लहान वस्तू तयार करणे यातच ते जास्त रमत असत.

पंधराव्या वर्षी शाळा सोडून मुंबईला चित्रकला शिकण्यासाठी जाण्याचे त्यांनी ठरविले. त्या वेळी वडील बंधू वासुदेवराव मुंबईला ग्रँट मेडिकल कॉलेजात शिकत होते. लक्ष्मणरावही मुंबईला गेले तर दोघांचा खर्च वडिलांना झेपणारा नव्हता. परंतु सर्वात वडील बंधू रामुअण्णा बेळगावला शिक्षक होते; त्यांनी उत्तेजन दिले व १८८५ सप्टेंबरमध्ये लक्ष्मणराव मुंबईला गेले व जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये दाखल होऊन चित्रकलेच्या अभ्यासास सुरुवात केली. घराकडून महिना दहा-बारा रुपये येत, त्यात ते आपला खर्च भागवीत.

आर्ट्स स्कूलमध्ये असताना लक्ष्मणरावांचा भवानी शंकर यांच्याशी परिचय झाला. त्यांचा भांड्यांचा कारखाना होता. त्यांत तांबे, पितळ, बीड यांच्या ओतकामाच्या भट्ट्या होत्या. भांडी तयार करण्याची यंत्रे होती. लक्ष्मणराव आपला फुरसतीचा वेळ या कारखान्यात घालवू लागले व हळूहळू तिथली निरनिराळी कामे करू लागले.

त्याच वर्षी सुरू झालेल्या व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये दरमहा पस्तीस रुपये पगारावर नोकरी लागली. इन्स्टिट्यूटमध्ये सकाळी प्रिन्सिपाल पिथिअन यांच्या मार्गदर्शनाखाली टेक्निकल ड्राफ्ट्स्मनशिपचा अभ्यास करून दुपारी तेथेच तो विषय विद्यार्थ्यांना शिकवीत. त्याबरोबरच आपण वाचलेल्या अमेरिकन मासिकांतील यंत्रविषयक माहितीही ते विद्यार्थ्यांना करून देत, हे प्रिन्सिपॉल पिथियन यांना समजताच त्यांनी लक्ष्मणरावांना दम भरून फक्त अभ्यासक्रमातील विषय तेवढेच शिकवीत जा, असा इशारा दिला.

इन्स्टिट्यूटच्या वर्कशॉपमध्ये लेथ्स्, ड्रिलिंग, शेपिंग, स्लॉटिंग इत्यादी यंत्रे होती. वेलजी मिस्त्रीची मैत्री संपादन करून शिकविण्याचे काम झाल्यावर लक्ष्मणराव वर्कशॉपमध्ये जाऊन तेथील यंत्रांची माहिती करून घेत.

मुंबईत असताना एक पारशी गृहस्थ सायकलवरून जाताना त्यांनी पाहिला. यंत्राबद्दल कुतूहल असल्याने सायकलबाबत अधिक माहिती इंग्लंड-अमेरिकेतून गोळा केली. इंग्लंडहून एक सायकल मागवली. त्यावर ते स्वतः बसावयास शिकले. आणखी दोन सायकली मागवून त्या बेळगावला रामुअण्णांकडे पाठवून दिल्या. हा सारा पत्रव्यवहार 'किर्लोस्कर ब्रदर्स' या नावाने केला.

याच नावाखाली बेळगावच्या सायकल दुकानाची सुरुवात किर्लोस्कर ब्रदर्सनी १८८८ मध्ये केली. कोलंबिया हार्डफोर्ड या अमेरिकन सायकलींची एजन्सी मिळविली. दुकानात सायकलविक्रीबरोबरच सायकली जोडण्याचे व दुरुस्तीचे काम चालत असे. रामुअण्णांनी सायकलवर बसण्याचा वर्गही सुरू केला. त्या वर्गात गावातील प्रतिष्ठित नागरिक तसेच लष्करातील लहान-मोठे अधिकारी येत.

मुंबईत इन्स्टिटयूटचे काम करून फुरसतीच्या वेळात लक्ष्मणराव "सायंटिफिक अमेरिकन" व "अमेरिकन मशिनिस्ट" ही मासिके आस्थेने वाचून आपले यांत्रिक ज्ञान वाढवीत होते. याच सुमारास इन्स्टिटयूटमधील "स्टीम" विषय शिकवणारे प्रोफेसर विलायतेला गेले. म्हणून प्रिन्सिपॉलनी त्यांच्या जागी काम करण्यास लक्ष्मणरावांना विनंती केली. लक्ष्मणराव "मास्तर" म्हणून ड्रॉइंगचा क्लास घेतल्यावर "प्रोफेसर" म्हणून "स्टीम" विषय शिकवू लागले. ही कामगिरी त्यांनी उत्तम तऱ्हेने पार पाडली.

मुंबईतील बस्तान बरे बसलेले पाहून रामुअण्णांनी लक्ष्मणरावांचे लग्न ठरविले. बेळगावनजीक असोगा येथे लग्न थाटात झाले नागूताई पळसुले ही दहा वर्षांची मुलगी राधाबाई किर्लोस्कर झाली. त्यांनी लक्ष्मणरावांबरोबर पंचेचाळीस वर्षे संसार केला. शंतनुराव, राजारामपंत, प्रभाकरपंत, रवींद्र व प्रभावती ही त्यांची अपत्ये.

इन्स्टिटयूटच्या नोकरीशिवाय अवांतर उद्योग करून लक्ष्मणराव आपल्या प्राप्तीत भर घालत होते. नूरखान इब्राहिम टिनमेकरच्या ओळखीने मुंबईतील युरोपियन कंपन्यांना लागणारी ड्रॉइंग्ज काढण्याचे काम त्यांनी मिळविले. तसेच करीमा मोहल्यात अद्ययावत छापखाना उभारण्याचे काम मिळविले. त्यासाठी छपाई यंत्रांचा अभ्यास केला. जर्मनीहून छापण्याचे यंत्र व दहा हॉर्स-पॉवरचे एंजिन आणवून छापखाना यशस्वीपणे उभा करून दिला.

लक्ष्मणरावांच्या मनात स्वतः काही वस्तूंचे उत्पादन करावे हा विचार घोळत होताच. कोटाला लावण्याची बटणे तयार करावयाचा निर्णय घेतला. यंत्रे व कच्चा माल आणला. बटने तयार झाली; पण भांडवलाचे अभावी तो नाद सोडावा लागला.

मग केमिस्टांना लागणाऱ्या कागदी डब्या करण्यास घतल्या. मालाचा उठाव होत होता. हळूहळू सर्व कर्जाऊ रकमेची फेड झाली. कारखाना व्यवस्थित चालला होता.

१८९६ च्या प्लेगमुळे शाळा–कॉलेजे बंद झाली. उद्योगधंद्यांवरही परिणाम झाला. शहरात शुकशुकाट पसरला. कागदी डब्या करण्याचा कारखाना बंद पडला.

इन्स्टिटयूटमधील प्रोफेसर गुड यांनी राजीनामा दिल्यावर त्यांच्या जागी लक्ष्मणरावांची बढती व्हावयाची; पण काळ्यागोऱ्यांचा भेद आडवा आला व ती जागा एका अँग्लो इंडियनला देण्यात आली. बढतीचा न्याय्य हक्क डावलला गेला. अन्याय सहन न होऊन लक्ष्मणरावांनी राजीनामा दिला.

रामुअण्णांनी पत्र पाठवून त्यांना बेळगावला बोलावून घेतले. "इथला सायकलचा धंदा वाढत आहे. तुम्ही इकडे आल्यास तो आणखी वाढविता येईल. तुम्हाला हवे तेवढे क्षेत्र येथे सहज मिळण्यासारखे आहे."

आपल्याला उपयुक्त असलेली हत्यारे व सामान बेळगावला पुढे पाठवून देऊन १८९७ मध्ये लक्ष्मणरावांनी पत्नीसह मुंबई सोडली. बेळगावला आल्यावर रामुअण्णांचे घरीच बिऱ्हाड थाटले.

लक्ष्मणरावांनी बेळगावला आल्यावर सायकली व त्यांचे स्टोअर्स यांची माहिती देणारा "किर्लोस्कर बंधूंचा" कॅटलॉग काढला. विहिरीतून पाणी काढण्यासाठी गडगड्याऐवजी पवनचक्कीचा वापर करावा ही कल्पना सुचून अमेरिकन सॅम्पसन युनाइटेड मिल्सची एजन्सी घेतली. नदीच्या पात्रात मोठी पवनचक्की उभारून इचलकरंजी संस्थानात गावासाठी व राजवाड्यासाठी पाणीपुरवठ्याची योजना यशस्वीपणे पुरी केली. याच सुमारास बेळगावलाही प्लेग आला. सर्व मंडळी गावाशेजारी माळावर राहू लागली. इतर मंडळीही ठळक माळावर राहावयास येऊन या वस्तीला कॉलनीचे स्वरूप आले.

लक्ष्मणरावांच्या मनातून स्वतः उत्पादन करण्याचा विचार सुटलेला नव्हता.

सायकलच्या दुकानात २½ हॉर्स पॉवरचे एंजिन, छोटा लेथ, ड्रिलिंग मशिन व एमरी ग्राइंडर अशी यंत्रे होती. पिछाडीस एक भट्टी होती. कमी भांडवलात तयार होणारे म्हणून नमुन्यादाखल अमेरिकेहून एक चाफ कटर यंत्र आणवून किर्लोस्कर कडबा कापण्याचे यंत्र १९०१ मध्ये तयार केले.

औंधचे राजकुमार श्रीमंत बाळासाहेब पंत यांची लक्ष्मणरावांची ओळख होती. १९०१ मध्ये औंधाला यमाईच्या देवळाच्या शिखरांना चांदीचा मुलामा देण्याचे काम लक्ष्मणरावांवर सोपविण्यात आले. पाठोपाठ यमाईचा मोठा मंडप बांधावयाचा होता. चौसष्ट हजार रुपयांचे काम होते. अगाऊ रकम दिलीत तर काम घेतो असे लक्ष्मणरावांनी सांगितल्यावर त्याकरिता औंधचे अधिपती श्रीमंत श्रीनिवासराव पंत यांनी भेट घेण्याचे ठरविले. रामुअण्णा, डॉ. वासुदेवराव व लक्ष्मणराव औंधला गेले. त्यांचेकडे अगदी निरखून काही क्षण महाराजांनी पाहिले. तीच त्यांची परीक्षा. काहीही प्रश्न विचारले नाही. "माणसे विश्वासू आहेत. त्यांना अंगावर सोळा हजार रुपये द्या," असे दिवाणांना सांगितले. काम हाती घेतल्यावर श्रीमंत श्रीनिवासरावांचे निधन झाले. नवीन राजवट येऊन त्यांच्या संमतीशिवाय काही न करणे बरे असे ठरल्यावर लक्ष्मणराव बेळगावला परत गेले. पुढे श्रीमंत बाळासाहेब गादीवर आल्यावर कामास पुन्हा सुरुवात करून सर्वांच्या मनपसंत काम पुरे करण्यात आले. या कामासाठी लक्ष्मणरावांना सुमारे तीन वर्षे औंधात राहावे लागले. या कामामुळे श्रीमंत बाळासाहेबांचा लक्ष्मणरावांवरील विश्वास व पूर्वीपासूनचा स्नेह अधिक दृढ झाला. पुढील उद्योगाकरिता पाच-सहा हजार रुपयांचे भांडवलही मिळाले.

१९०३ पर्यंत हळूहळू कडबा कापण्याच्या यंत्रांना चांगली मागणी येऊ लागली. तेव्हा उत्पादनावर लक्ष केंद्रित करण्यासाठी

लक्ष्मणरावांनी सायकलचे दुकान तीन हजार रुपयांना विकून टाकले. कडबा कापण्याच्या यंत्राच्या जोडीला लोखंडी नांगरांचे उत्पादन करण्याचे ठरविले. याच सुमारास शेतकी खात्याने काही विलायती नांगर आणवून ते इकडे कितपत यशस्वी ठरतात याबद्दल प्रयोग चालविले होते. लक्ष्मणरावांनी विचार-विनिमय करून एक विलायती नांगर खरेदी केला. आपल्या माळावरील झोपडीशेजारी एक छोटी भट्टी उभारली. अनेक प्रयोग करून बिडाचे फाळ तयार केले. पहिले सहा नांगर जोडून, रंगवून तयार होताच जाहिरात दिली. पण गिऱ्हाईक भेटेना. लाकडी नांगराऐवजी लोखंडी नांगर वापरणार कोण? प्रयोगादाखल वापरण्यासही कोणी पुढे येईना.

याच सुमारास बेळगाव शेजारी देवीची लस तयार करण्यासाठी नवीन इन्स्टिट्यूट स्थापन झाली होती. त्याचे व्यवस्थापक मि. हचिन्सन यांनी इन्स्टिट्यूटकरिता वासरे निजविण्याची लोखंडी टेबले, लस काढण्यासाठी व टोचण्यासाठी हत्यारे, इमारतीसाठी शटर्स, इत्यादी वस्तू तयार करण्याचे काम दिल्याने कारखान्याची तात्पुरती सोय झाली.

आणि एक दिवस शहापुरातील घरंदाज व प्रतिष्ठित रामभाऊ गिंडे अचानक आले व लक्ष्मणरावांच्या हातांत दोन हजार रुपये देत म्हणाले, "या रस्त्यावरून जाताना तुमचे काम चालू असलेले रोज पाहतो. तुमच्याबद्दल माझे चांगले मत झाले आहे. तुम्हाला सध्या पैशांची थोडी नड आहे असे कळले म्हणून ही रक्कम आणली आहे ती घ्या. सवडीने परत करा." ही अनाहूत मदत लक्ष्मणरावांना फार उपयोगी पडली. पुढेही चिठ्ठी पाठविण्याचा अवकाश, रामभाऊ गिंडे पैशांची अडचण दूर करीत असत.

अशी दोन वर्षे गेली आणि एक दिवस मिरजेचे सुशिक्षित जमीनदार जोशी बेळगावला येऊन सहाच्या सहा नांगर विकत घेऊन गेले. पाठोपाठ पलुसचे वंदू पाटील बेळगावला आले व त्यांनी पस्तीस नांगरांची मागणी केली.

इकडे शेतकी खात्याचा अभिप्राय आला की नांगरांची रचना ठीक असली तरी ते लवकर झिजतात. लगेच विलायती नांगरांचे निरनिराळे फाळ मागवण्यात आले. ते ओतीव बिडाचेच होते; पण टणक असल्याने झिजत नव्हते. हे दणकट कवच कसे करायचे याबाबत रामुअण्णांशी चर्चा झाली. परदेशी यंत्रविषयक मासिकांची उलथापालथ सुरू झाली आणि रामुअण्णांच्या वाचनात "चिल" पद्धत आली. ही माहिती मिळाल्यावर किर्लोस्करांचे नांगरांचे फाळही तंतोतंत विलायती फाळांसारखे दिसू लागले. थोड्याच दिवसात फाळात एवढी सुधारणा करण्यात आली की टिकाऊपणात ते विलायती फाळापेक्षाही सरस ठरले. शेतकी खात्याने किर्लोस्कर नांगरांची शिफारस करण्याचे मान्य केले. लक्ष्मणरावांची कल्पना यशदायी ठरली. पुढील काळात भारतभर प्रचार होऊन लाखो नांगर खपले.

नांगरटीच्या दिवसांत नांगरांना खप. बाकीचे सहा-एक महिने कारखान्यात काय काम करायचे याचा विचार चालू असता बिडाचे तवे करण्याचे ठरले. आकर्षक विनोदी जाहिरातीमुळे बिडाच्या तव्यांचा घरोघर प्रसार झाला.

१९०५ साली टळकवाडी येथे लोखंडी नांगर करण्याचे काम सुरू झाले.

१९०९ साली बेळगाव नगरपालिकेच्या सर्व सभासदांनी शहराची वाढ करण्याकरिता किर्लोस्करांचा कारखाना असलेली टळकवाडीची जागा पसंत केली. "बेळगाव म्युनिसिपालिटीने 'यू आर ए डर्टी मॅन—तू घिसाड्याचा घाणेरडा धंदा करतोस—' असे म्हणून मला कारखाना हलवावयास सांगितले." आजूबाजूला जागेसाठी शोध सुरू झाला; पण जागा मिळेना. त्याच सुमारास औंधचे अधिपती श्रीमंत बाळासाहेब पंत बेळगावला आले असता त्यांना कारखाना दाखवून लक्ष्मणराव म्हणाले, "म्युनिसि-पालिटी आमची जागा घेत आहे. आता आम्हाला दुसरी जागा नाही." त्यावर महाराज म्हणाले, "मास्तर, तुम्ही औंध संस्थानात येता का? या वेळी तुमचा मित्र-बाळासाहेब म्हणून तुमच्याशी बोलत नाही तर औंधचा पंतप्रतिनिधि म्हणून बोलत आहे हे लक्षात घ्या. तुम्हाला कारखान्याला जागा स्टेशनपाशी फुकट देतो. प्रथम पाच-सहा हजारांचे भांडवल कमी व्याजाने देतो. सावकाश फेडून घेतो. पहा तुमचा निकाल. सहा घंट्यात आम्हाला सांगा. उद्या आम्ही कुंडलला जाणार आहोत." लक्ष्मणराव विचारात पडलेले पाहून जेकब बापूजी म्हणाले, "मास्तर, हे बाळासाहेब बोलत नाहीत. हे देव बोलतोय. औंध संस्थानात तुमचे कल्याण होईल. आम्ही तुम्हांला लागेल ती मदत करू" हा संवाद धमणीतून जात असताना झाला. लक्ष्मणराव खाली उतरून घरी गेले. रामूअण्णांना हकीगत सांगितली. कृष्णाजी कल्लो कुलकर्णी यांना सांगितली. तिघांनी कागद-पेन्सिली घेतल्या. औंधाला जाण्यात फायदे व तोटे कोणते याचा तिघांनी तीन दिशांना तोंड करून बसून स्वतंत्र-पणे विचार करून लिहून काढले. तिघे एकत्र बसले. फायदे अधिक असल्याचे आढळले. तेव्हा संध्याकाळी श्रीमंतांकडे जाऊन "औंध संस्थानांत येतो" असे लक्ष्मणरावांनी सांगितले. श्रीमंतांनी नकाशे पुढे टाकले. त्यावर रेघ मारली. कुंडलस्टेशन-जवळची बत्तीस एकर जागा भरली. श्रीमंतांजवळ दहा हजार रुपयांची रक्कम नव्हती. ती त्यांनी साताऱ्याच्या सावकाराकडून सहा टक्के व्याजाने कर्जाऊ आणून दोन टक्क्यांनी लक्ष्मणरावांना दिली, वचनचिठ्ठीसुद्धा घेतली नाही. पुढे एका वर्षातच ही रक्कम लक्ष्मणरावांनी परत केली.

कुंडल स्टेशनजवळच्या निर्जन व निर्जल माळावर कारखाना वसवावयाचा म्हणजे प्रतिसृष्टी निर्माण करण्याचेच काम होते. १९१० मार्च धुलवडीच्या दिवशी दुपारच्या भर उन्हात लक्ष्मणराव, अंतोबा फळणीकर, टोपण्णा सुतार व धन्या गडी

*With Deepawali Greetings to All..:*

## THE BELGAUM BANK LIMITED

Regd. Office : 659-60, Raviwar Peth,
**BELGAUM**

Invest in our "Family Benefit Deposit Scheme" and also "One Year Deposit Special Scheme" and earn Monthly Interest. Enquire at any of our 42 Branches - Bombay office at Mandvi, Bombay-9. and Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore-2.

**S. Y. KAMAT**
General Manager.

ऑफिस फोन २२२६ — तार : TEATRADE
रेसिडन्स ,, २१७८ — पो. बॉ. नं. १८८

सर्वोत्कृष्ट असा आसामचा हायग्रोन डस्ट चहा
व सर्व प्रकारच्या चहाचे
व लाल छत्री छाप चहाचे

घाऊक व्यापारी

## मे. दामोदर शिवराम आणि कं.

शाहुपुरी—कोल्हापूर

—ब्रँचेस—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कराड, | चिपळुण, | संगमनेर, | मुंबई, | पुणे, | सांगली |
| फो. नं. ५६४ | ६ | २ | ३१०२४५ | २२३१० | |

## इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., इचलकरंजी

( स्थापना : ७ फेब्रुवारी, १९६३ )

शाखा : (१) कोल्हापूर (२) शिरोळ (३) जयसिंगपूर

फोन नं. २१९१, २१९२ ] — [ तार : जनता बँक

केवळ अकरा वर्षांच्या वाटचालीतील नेत्रदीपक प्रगती

"सेवा हेच आमचे ब्रीद"

( आकर्षक व्याजाच्या दराने ठेवी स्वीकारल्या जातात. )

### "लघु उद्योगधंद्यांना भांडवल पुरवठा करणे हेच आमचे ध्येय.

(१) खपलेले भाग भांडवल ... ... रु. पाच लाख
(२) गंगाजळी व इतर निधी ... ... रु. सहा लाख
(३) ठेवी ... ... रु. एक कोटी बेचाळीस लाख ब्याऐंशी हजारावर
(४) खेळते भांडवल ... ... रु. एक कोटी अडुसष्ट लाखावर

आर. पी. कुलकर्णी
मॅनेजर

के. बी. आवाडे
चेअरमन

मंडळी कुंडल स्टेशनवर उतरली. बरोबर आणलेल्या बांबू–तट्ट्यांच्या साहाय्याने स्टेशनजवळच्या धर्मशाळेसमोर मांडव तयार केला.

या फोंड्या माळावर सगळीकडे निवडुंग, त्या निवडुंगांत असंख्य नागसाप. ते मारून जागा मोकळी करावी लागली. पिण्याला पाणी नाही. दिवसभर काम करावे व पाणी पिण्यासाठी स्टेशनवर जावे असे सुरुवातीचे काही दिवस काढावे लागले. पुढे अर्ध्या मैलावर असलेल्या मुसाऱ्याच्या विहिरीतून हौद भरून आणून वाटप सुरू झाले. नंतर विहिरीपासून नळ टाकले. जागा तयार झाल्यावर एक झोपडी बांधली व पहिले ऑफिस थाटले.

खड्डे खणून झाडे लावली. कुंडलच्या बाजाराला गाडी पाठवून सर्वांना लागणाऱ्या धान्य, मीठमिरचीची व्यवस्था केली. शेजारच्या मायाप्पाच्या देवळात जरंडीकर मास्तरांनी पहिली शाळा भरवली. पहिला पावसाळा आला व मातीच्या काळ्या विटांच्या भिंती कोसळून पुरता चिखल झाला. पुन्हा सर्व घरे नव्या विटा घालून बांधावी लागली. बेळगांवच्या रामभाऊ गिंडयांकडून दहा हजार रुपये आणले व कामास पुन्हा जोराने सुरुवात झाली.

बेळगावहून ३०–३५ कामगार आले. आजूबाजूची खेड्यांतील मंडळी रोजगारासाठी येऊ लागली. तीन महिन्यांत कारखाना उभा राहिला. नांगरांच्या उत्पादनाला जोरात सुरुवात झाली. दिवाळीपासून नांगराचा हंगाम सुरू झाला. पीकपाणी उत्तम आल्याने शेतकरी खुषीत होता. नांगर खरेदीसाठी वाडीत शेतकऱ्यांची जत्राच भरू लागली. पहिल्याच वर्षात वाडीने चांगले बाळसे धरले. वाडीच्या स्थापनेनंतर एक वर्षाने रामुअण्णा कारखान्याच्या कामातून निवृत्त होऊन औंधास घर बांधून राहू लागले.

१९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. कारखान्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा तुटवडा भासू लागला. रेल्वेचा स्क्रॅप व इतर मोड विकत घेऊनही गरज भागेना. त्यावेळी कोल्हापूर संस्थानात कैक तोफा गंजत पडल्या होत्या. श्रीछत्रपती शाहु महाराजांनी त्या कारखान्याला दिल्या व त्या वितळवून नांगर बनविण्यात आले. युद्ध काळांत तऱ्हतऱ्हेच्या लहानमोठ्या वस्तूंचे उत्पादन करून लक्ष्मणरावांनी कारखाना वाचवला, एवढेच नव्हे तर वाढवला.

लक्ष्मणरावांच्या नोटबुकांत २ ऑक्टोबर १९१४ रोजी केलेली नोंद अशी :– "आज श्रीमंत बाळासाहेब पंत, औंधचे अधिपती, याजकडून २½ हॉर्स पॉवरच्या एंजिनची ऑर्डर आली. हे एंजिन आमच्या कारखान्यात पहिल्यापासून शेवटपर्यंत तयार करणेचे. हे आमचे इथे तयार केलेले तिसरे एंजिन. शिवाय त्यांनी या एंजिनवर डायन्यामो लावून विजेचे दिवे लावून चाल काय म्हणून विचारले आहे. हे काम करण्याचे आम्ही पत्करणार असा निश्चय आहे." पुढे तीस वर्षांनी शंतनुरावांनी पुण्याला स्वतंत्र किर्लोस्कर ऑईल एंजिन कंपनीच काढली.

गुरुनाथ प्रभाकर ऊर्फ नागुदादा ओगले किर्लोस्कर कारखान्यात इंजिनिअर होते. त्यांचे पाठचे बंधू श्रीपाद प्रभाकर ऊर्फ आत्मारामपंत ओगले पैसा फंड काच-शाळेतून शिक्षण घेऊन, २–२½ वर्षे बडोद्याच्या काच कारखान्यात काम करून स्वतःचा काच कारखाना काढण्याचे इरादाने किर्लोस्करवाडीस आले असताना वडील बंधूंच्या सल्ल्याने लक्ष्मणरावांना भेटले. लक्ष्मणरावांनी त्यांची श्रीमंत बाळासाहेब यांचेशी भेट करवली. श्रीमंतांची आपले संस्थानात आणखी कारखाने निघावे अशी इच्छा होती. कसलेही आढेवेढे न घेता त्यांनी सहा हजार रुपयांचे भांडवल दिले. १९१३ सप्टेंबरमध्ये काचेची पहिली चिमणी फुंकली ती औंधाचे संग्रहालयात ठेवण्यात आली. किर्लोस्करानी ओगल्यांना कारखान्याकरिता जागा दिली. दोघांचे हिशेब एकत्रच असत. पैशांची तिजोरी एकच होती. युद्धकाळात दोघांचे कारखाने वाढू लागले. तेव्हा एकत्र कारखाने चालविणे सोईचे नव्हते. मोठ्या झाडाच्या छायेत लहान झाड वाढत नाही हे लक्षात घेऊन १९१६ मध्ये श्रीमंतांचे संमतीने व साहाय्याने काच कारखाना कराड स्टेशनजवळ ओगलेवाडी येथे नेण्यात आला.

वाडीत कारखानदारीबाबत अनेक गोष्टी घडत असतात. त्यांची दखल वृत्तपत्रे–नियतकालिके घेत नाहीत. तरी आपली प्रसिद्धी आपणच करावी या शंकरराव किर्लोस्करांच्या विचाराला लक्ष्मणरावांनी संमती दिल्यावर कारखान्यासाठी विकत घेतलेल्या स्क्रॅपमध्ये एक हात छपाई यंत्र आले होते त्याची दुरुस्ती करून "किर्लोस्कर-खबर" नावाची पत्रिका १९१६ पासून निघू लागली. पुढे १ जानेवारी १९२० पासून ते मासिक नियमितपणे निघू लागले. १९३० पासून 'स्त्री' व १९३४ मध्ये 'मनोहर' मासिकांची भर पडली.

१९२० पर्यंत किर्लोस्कर कारखान्याचे मालक लक्ष्मणराव होते. त्यांची पन्नाशी उलटली होती. कारखाना त्यांचे पश्चातही सुरळीत चालावा व वाढावा या हेतूने वैयक्तिक कारखान्याचे रूपांतर लिमिटेड कंपनीत करण्यात आले.

आपण पैसा कमवावा व तो कारखान्याचे कामी लावावा. कारखान्याच्या वाढीसाठी कर्जाऊ रकमा आणणे त्यांना कमीपणाचे वाटे. प्रसंगी अतिशय टीका होऊनही फायद्याचा शक्य तो जास्त हिस्सा डिव्हिडंड म्हणून वाटून न टाकता कारखान्यात गुंतविण्याचे त्यांचे धोरण असे.

धंद्यातील उच्च नीती व पत यांना लक्ष्मणराव डोळ्यांत तेल घालून जपत. किर्लोस्कर कारखान्याचा व्यवहार अत्यंत सरळ व चोख असतो हा लौकिक व्यापारातील त्यांच्या धोरणाची फलनिष्पत्ती म्हणावी लागेल.

सुरवातीचे वसूल भागभांडवल ४,५०,००० रुपयांचे होते. जुलै १९४५ अखेर संपणाऱ्या वर्षात लक्ष्मणराव कंपनीतून

सेवानिवृत्त झाले तेव्हा वसूल भाग भांडवल १२,९५,००० रुपये व रिझर्व्ह फंड १६,२७,००० रुपये होता. त्यावेळी कंपनीची जिंदगी रोकड व येणी मिळून ६७,५२,००० रुपयांची भरली. १९२० ते १९४४ या २५ वर्षांत एकूण १४६३/४ टक्के डिव्हिडंड वाटण्यांत आले. डिव्हिडंड देता आले नाही अशी पाचच वर्षे १९२४, २५, २६ ३३ व ३६. दिवस सतत तेजीचे नसतात. कधी तेजी तर कधी मंदी असे धंद्यात चालते. म्हणून तेजीत झालेला फायदा उधळू नये. कारखान्यात जेवढी शिल्लक अधिक पडेल तेवढा तो भरभक्कम पायावर उभा राहतो. मंदीतूनहि सही-सलामत पुढे जातो. तो जसजसा प्रौढ होतो तसतसा फायदा अधिक वाटता येतो. हे तत्त्व लक्ष्मणरावांनी कटाक्षाने पाळले म्हणूनच मंदीच्या काळातही नवनवीन यंत्रे काढून कारखान्याने आगेकूच केल्याचे दिसून येते.

सप्टेंबर-ऑक्टोबर १९४५ मध्ये कामगार संपावर गेले. वाडीला येणारा भाजीपाला, दूध, पाणीपुरवठा तोडणे, मोडतोड, धाकद-पटशा प्रकार सुरू झाले. कामगार सभा व त्यात भडक भाषणे होत होती. एका वक्त्याने भर सभेत लक्ष्मणरावांच्या तोंडावर उपमर्दक उद्गार काढले. त्याचे प्रलाप ऐकून कामगार चकित झाले; लक्ष्मणरावांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. दुसरे दिवशी त्यांनी आपला निश्चय कळवला— " आजपर्यंत माझ्या हातून कारखान्यातील लहान थोर सर्वांचे जेवढे हित करता येण्यासारखे होते तेवढे मी केले. तथापि एकंदरीत पाहता माझी वाडीला अथवा कारखान्याला आता गरज उरली आहे असे दिसत नाही. मी परत किर्लोस्करवाडीला येणार नाही हेहि सांगून ठेवतो ". त्याप्रमाणे संध्याकाळचे गाडीने ते हरिहराला निघाले.

किर्लोस्करवाडीहून निघून हरिहरला आल्याबरोबर एक दिवसही स्वस्थ न बसता ते शेतीच्या उद्योगाला लागले. मका, जोंधळा, तोंडली, वांगी, टोमॅटोची नमुनेदार लागवड करून दाखविली. तिथून बंगलोरला गेले. शेती शहरापासून सात-आठ मैलांवर होती. फार्मवरील दूधदुभते, अंडी, भाजीपाला शहरात पाठविण्याचे काम घड्याळाप्रमाणे रोज नियमित सुरू झाले. पुढे १९४६ साली किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनीची सुरुवात झाली.

इकडे शंतनुराव १९४७ मध्ये किर्लोस्कर ऑईल एंजिन्स कारखाना काढण्याकरिता पुण्याला आले होते. १९४८ च्या डिसेंबरमध्ये पहिले एंजिन तयार झाल्याचे वर्तमान लक्ष्मणरावांना तारेने बंगलोरला कळविण्यात आले व पाठोपाठ शंतनुराव व यमुताई बंगलोरला जाऊन लक्ष्मणरावांना विमानाने पुण्याला घेऊन आले. दुसऱ्या दिवशी कारखान्यात जाऊन किर्लोस्कर एंजिन पाहून समाधान व्यक्त केले. पुण्याला आल्यावर रोज सकाळी थोडा वेळ कारखान्यात जाऊ लागले व उरलेला सारा वेळ शेतीत जाई. रताळी, भात यांचे पीक काढले. डेअरी सुरू केली. मधमाशा पाळण्याचा उद्योगही. बंगल्याभोवती व शेतात पेट्या ठेवून मध गोळा करण्याचे काम चालविले. किर्लोस्करवाडीच्या ४० व्या वाढदिवसाला हजर राहण्याचे आग्रहाचे आमंत्रण आले. शंतनुराव व यमुताई लक्ष्मणरावांना घेऊन किर्लोस्करवाडीस गेले. वाढदिवसाचा समारंभ पार पडल्यावर कारखान्यातील प्रत्येक खात्यातून फेरफटका केला व कामगारांची प्रेमाने पाठ थोपटली.

लक्ष्मणरावांना पुण्याच्या मराठा चेंबरचे सन्मान्य सभासदत्व अर्पण करण्याच्या ऑगस्ट १९५३ मध्ये झालेल्या समारंभास सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या अध्यक्ष होते. आपल्या भाषणात ते म्हणाले : " गुणी व महत्त्वाकांक्षी तरुणांना लक्ष्मणरावांच्या चरित्रातून उपयुक्त धडे घेता येतील. आपल्या देशात अद्यापि यंत्रनिर्मिति व यांत्रिक उत्पादन बाल्यावस्थेत असल्याने या क्षेत्रात लक्ष्मणरावांनी औद्योगिक साहस यशस्वी करून देशाची मोठीच सेवा केली आहे. "

व्यवसायातून निवृत्त झाल्यानंतरचा काळ त्यांनी शेतीमध्ये घालविला. सभा-संमेलनाला ते जात नसत. वानप्रस्थ जीवनात स्वतःच्या वागणुकीबाबत त्यांनी दंडक घातले व ते कटाक्षाने पाळले. २५ सप्टेंबर, १९५६ रोजी त्यांचे निधन झाले. २० जून, १९६९ रोजी त्यांची जन्मशताब्दी सर्वत्र साजरी झाली. त्यावेळी त्यांचे छायाचित्र असलेले पोस्टाचे खास तिकीट काढण्यात आले होते.


With Compliments of

# The Deccan Paper Mills, Co. Ltd.

**Commonwealth Building, Laxmi Road,**

**POONA 30**

**(Tel. : 56314)**

# अभ्युदयाच्या आड येणारे जातिधर्मांचे भेदभाव

( शं. वा. किर्लोस्कर )

( लक्ष्मणराव किर्लोस्करांनी किर्लोस्करवाडी येथे सुरू केलेले औद्योगिक साहस किती फलदायी झाले आहे, हे सर्वांच्या अनुभवाचे आहे. किर्लोस्कर उद्योगसमूहाचे वार्षिक उत्पादन ८० कोटी रु. चे असून ४०,००० कामगारांना त्यात रोजगार मिळतो; अप्रत्यक्ष रोजगार मिळणारे आणि आर्थिक उत्पन्न मिळणारे कितीतरी आहेत. किर्लोस्करवाडीमधील सामाजिक परिवर्तनाचेही तसेच व्यापक अनुकरण होणे राष्ट्रीय हिताचे आहे. ह्या बाबतीत लक्ष्मणरावांचे सुपुत्र शंतनुराव यांचे समाजाला विचारी बनविण्याचे प्रयत्न सतत चालू आहेत. )

सकाळ उजाडताच मी दरवाजा उघडला. बाहेर सर्वत्र धुके पसरलेले, सगळीकडे पांढरे फटफटीत, त्या धुक्यातून हळूहळू सूर्याचे बिंब वर आले. तीच माझी बेळगावातली पहिली सकाळ.

उजाडल्यावर व धुके निवळल्यावर मला आजूबाजूला आणखी दहा-बारा झोपड्या दिसल्या. प्लेगच्या दिवसात गावातले लोक तिथे राहायला यायचे. एरव्ही तिथे आमच्या तीन चार झोपड्यात तेवढी वस्ती. माझे वय तेव्हा १० वर्षांचे होते.

संध्याकाळी मी बाहेर पडलो. काही अंतरावर झोपड्या दिसल्या. आमच्यासारखीच गावातली न्हावी मंडळी तिथं रहात होती. मुले बाहेर विटीदांडू खेळत होती.

मी पुढे होऊन विचारले ' मला घेता का खेळायला ? '

एक मुलगा म्हणाला, ' आमची शिवाशिव चालेल का तुम्हाला ?'

मी अशा तऱ्हेने शिवाशिव न मानायला शिकलो.

दादू, बाळू, विठू, अशी ७–८ न्हाव्याची मुले माझी मित्र झाली. मी सायकलवरून घरी येण्याची ती वाटच पाहात असायची... नंतर ती मुले, आमचा कुत्रा व माझी एअरगन खांद्यावर टाकून मी शेजारच्या डोंगराकडे निघायचे. तिथे एखाद्या प्रस्तरावर बसून मी आमच्या सैनिकांना शिवाजी महाराजांचे पराक्रम सांगायचे.

पण पुढे प्लेग पसरू लागला, झोपड्या भरू लागल्या. मुले जमली... त्यांत स्पृश्य व अस्पृश्य मुले असे दोन गट झाले. अस्पृश्य मुलांचा मी पुढारी... स्थिती गंभीर झाली. परंतु आम्ही शिवाजी महाराजांचे सैनिक... युद्धशास्त्रात पटाईत. आम्ही त्यांच्या पुढाऱ्याला चांगलाच धडा शिकविला व आमचे जीवन सुरळीत चालू झाले.

—येथून सोलापूरला परत आलो. पारशी, मुसलमान, मराठे असे मित्र मिळाले. आमचे फिरून दौरे निघू लागले. हिप्परगा, चौदा कमान, किल्ला व काळजापूरच्या मारुतीपलीकडील जंगल या आमच्या शिकारीच्या जागा.

डेक्कन कॉलेजमध्ये गेल्यावर सर्व भारतात पेशावरपासून कोचीनपर्यंत प्रवास केला. चित्रकलेचा अभ्यास केला व १९१४ साली किर्लोस्करवाडीला आलो.

कारखान्यात लोखंडाचे नांगर करायचे पण त्याबरोबरच मागासलेल्या माणसांचा विचारी समाज बनवायचा हे साथीने करायचे काम. त्यासाठी कामगारांना साक्षर करायचे... उद्योग प्रथम हाती घ्यावा लागला. दारूला आळा घालावा लागला व अस्पृश्यतेची हकालपट्टी करावी लागली. एकाच विहिरीतून सर्वांना पाणी काढावे लागले. समाजमंदिरामध्ये सर्वांनी एकत्र बसायचे, तिथेही कोणी शिवाशिव मानायची नाही.

आम्ही दरसाल श्रावणी साजरी करायची. तिथेही अर्थात स्पृश्य व अस्पृश्य जमूनच ही नवी जानवी घालायचे. एवढे सांगितल्यावर तालीमखान्यात कुस्ती खेळताना स्पृश्यास्पृश्या-सारखा भेद कुठला टिकायला ?

क्रिकेटसारख्या खेळात अस्पृश्यतेला वाव कोठून मिळणार ? आमच्यातले काही उत्तमोत्तम खेळाडू अस्पृश्य असत. ते आपल्या टीममधून खेळत व आमच्याच मांडीला मांडी लावून टिफीनला बसत. आम्ही अशा तऱ्हेने किर्लोस्करवाडीतून अस्पृश्यतेची हकालपट्टी केली.

पिऱ्या मांगाचा मुलगा मार्तंडा याचे लग्न निघालं. कुंडलच्या पुरोहितानं लग्नाला हजर रहायचं टाळलं. ते काम देऊळकरला व मला सांगण्यात आलं, आयुष्यात मी केलेलं तेच भटाचे काम. काकी सौ. राधाबाई किर्लोस्कर यांनीच सर्व बायकांना हळदी-कुंकू लावले. पुढे जेरे शास्त्र्यांना कारखान्यातच नेमून त्यांच्या-कडेच ही सर्व धार्मिक कार्ये करून घेत होतो.

परंतु या सर्व सामाजिक सुधारणा मुकाट्याने पार पडत होत्या असे म्हणता काय ? तो कुठला संभव ! आम्हाला या समाज-सुधारणा करीत असता कितीतरी विरोधाला तोंड द्यावे लागले, बहिष्कार सोसावे लागले.

आमच्या या व असल्या धर्मविरोधी गोष्टींची त्या वेळेचे शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांच्यापर्यंत कागाळी करण्यात आली. त्यांनी आमच्या धोरणाला नावे ठेवली म्हणजे मोठीच आपत्ती ओढवायची, अशा द्विधा मनःस्थितीत आम्ही श्रींचे स्वागत केले.

परंतु डॉ. कुर्तकोटी नव्या विचाराचे, त्यांनी कारखान्याची नव्या काळाला किती जरूर आहे हे बरोबर ओळखले. पूर्वीचा पळीपंचपात्रीचा धर्म बदलून आता आपण नव्या युगाचा धर्म स्वीकारला पाहिजे. नव्या जगात आपण पुढे पाऊल टाकले,

सुधारणा केली पाहिजे. किर्लोस्कर येथे करीत आहेत ते हेच. एवढ्यासाठी मी त्यांना माझा पूर्ण आशीर्वाद देत आहे. एवढे भाषण आटोपल्यावर श्रींनी एका ठिकाणी बसून स्वतःच्या पळीने सर्व कामगारांना तीर्थ दिले. त्या वेळी आम्हांला झालेला आनंद कोणत्या शब्दाने वर्णन करावा ?

मात्र एवढ्या खटपटीवरून आमचे काम आटोपले नाही. आमच्या कारखान्यात बरेच मुसलमान होते. खुतब्याचा सण आला म्हणजे ते सर्व कामगार नवे कपडे घालून आम्हांला भेटायला येत आम्ही जिथे श्रावणी साजरी करायची, त्याच जागी त्यांनीही खुतबा पढायचा. इस्लामपूरहून मिशनरी येऊन याच-प्रकारे आमच्या ख्रिस्ती कामगारांना उपदेश करायचे. आमच्या समाजमंदिरात कीर्तन, पुराण, नाटक, व्याख्यान, सिनेमा, प्रदर्शन, हॉस्पिटल असे निरनिराळे कार्यक्रम एकाच ठिकाणी भरत.

आपला देश आता स्वतंत्र झाला तरी त्याला निरनिराळ्या धर्मांनी असे पोखरून टाकले आहे की हे भेदभाव दूर झाल्या-खेरीज स्वातंत्र्याची गोड फळे आपल्यास समाधानाने चाखता येणार नाहीत. आपण स्वातंत्र्याचा कितीही उदोउदो केला तरी निव्वळ स्वातंत्र्याचा माणसाला काडीइतकाही उपयोग नाही. कारण स्वातंत्र्य म्हणजे यक्षिणीची कांडी थोडीच आहे, की जी फिरवताच आपल्या देशाचे क्षणात नंदनवन बनून जाईल ? आपला देशावर स्वतंत्र भारताचा झेंडा फडकला खरा, पण चोहोकडे धान्याच्या राशी थोड्याच पडणार ? कापडाच्या गाठींचे डोंगर थोडेच उभे राहणार ? अथवा आपल्या घरासाठी लागणाऱ्या विटांचा पाऊस थोडाच पडणार ?


स्वातंत्र्य मिळताच आपण आपले कायदे करू. पण ते आपली सुधारणा घडवून आणतील हे थोडेच. अस्पृश्यतेसारख्या अमानुष चाली आपण होऊन पळ काढतील असे थोडेच. थोडक्यात सांगायचे म्हणजे नव्या युगात पाऊल टाकल्यावर आपण स्वतः जितकी बुद्धी वापरू, घाम गाळू, पुढे सरू, तेवढीच आपली प्रगती होणार हे आपण विसरता कामा नये. आपण स्वातंत्र्य मिळूनही, दुबळे राहू. ब्रिटिशांना आपण हद्दपार केले, पण त्याहून बलाढ्य शत्रू अद्याप आपल्या मानेवर कराटाळून बसला आहे. तो आपल्यास सुखाची तिळमात्र तरी झोप घेऊ देईल काय ? इंग्रज आपल्यास परके होते. त्यांची भाषा निराळी, वेष निराळा, देश निराळा, त्यांना त्यांच्या देशात घालवून देणे हे काम त्यामानाने सोपे होते. आपल्या हाडीमाशी वर्षानुवर्षे खिळून राहिलेल्या शत्रूंना नेस्तनाबूद करायचे कसे ?

पण याबाबत आपण निराश व्हायला नको. जग प्रगतीच्या मार्गाने वाट चालत आहे. असंख्य नवे शोध लागत आहेत. आज जे नवे आहे ते उद्या टाकाऊ ठरत आहेत. अशा वेळी दोन हजार वर्षांपूर्वीचे विचार व कल्पना काय कामाच्या, आपणही भरभर पावले उचलू या...अशानेच मनुष्यजन्माचे आपण सार्थक करू शकू.

—आकाशवाणी, पुणे केंद्राच्या सौजन्याने




KWALITY/WHP/72-9



# तुटीची अर्थव्यवस्था अर्थअव्यवस्था होत आहे काय?

( श्री. वा. काळे )

१९७२–७३ मध्ये तुटीच्या अर्थव्यवस्थेसाठी मध्यवर्ती सरकारने ८८२ कोटी रु. च्या चलनी नोटा प्रसृत केल्या. १९७२–७३ च्या अंदाजपत्रकात २५२ कोटी रु. पेक्षा जास्त चलनी नोटा सरकारी उत्पन्नखर्चातील तूट भरून काढण्यासाठी प्रसृत केल्या जाणार नाहीत, असे अर्थमंत्र्यांनी आश्वासन दिले होते. उपलब्ध जिनसांचा पुरवठा न वाढता, उलट काही जिनसांचा पुरवठा कमीच झाला म्हणजे महागाई वाढत जाणार हे उघड आहे.

आपल्या सरकारी योजनांसाठी तुटीच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब करणे आवश्यकच मानले गेलेले आहे. तूट भरून काढण्याचे हे शस्त्र अत्यंत प्रभावी असून ते वापरण्याचे तंत्र अगदी सोपे आहे, त्यामुळेच ते शस्त्र धोकादायक ठरते. विकास साधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवली खर्च करून चालू खर्चातही वाढ करावी लागते. कराच्या रूपाने हा पैसा जमा करणे कठीण जाते; अशक्यही ठरते. युद्धविषयक आणि संरक्षण-विषयक खर्च, निर्वासितांवरील खर्च, दुष्काळ निवारणावरील खर्च ह्यांचीही व्यवस्था करणे अनिवार्य होते. तेव्हा पैसा उपलब्ध करण्याचा सर्वात सोपा मार्ग, नोटा छापवून घेऊन त्यांचा देण्यासाठी उपयोग करण्याचा मार्ग अवलंबिला जातो.

सरकारला चालू उत्पन्नातून खर्च भागविता येईनासा झाला म्हणजे सरकार करवाढ करते. सरकारी कारखान्यांचा नफा वाढविण्याचा प्रयत्न करते. रिझर्व्ह बँकेचा नफाही सरकारला मिळतो. कर्जउभारणीच्या द्वाराही पैसा जमा केला जातो. जनतेला कर्जरोख्यांची विक्री, स्मॉल सेव्हिंग्ज, ॲन्युइटी डिपॉझिट्स, सक्तीची बचत, इत्यादी ह्या कर्जउभारणीचे प्रकार आहेत. राज्य सरकारांचे प्राव्हिडंट फंड आणि इतर फंड ह्यांचाही वापर करता येतो. पैशांचा हा अंतर्गत पुरवठा झाला. परदेशी कर्जे, ग्रँट्स, मदती, ह्या मार्गांनेही सरकारला पैसा मिळतो. हा सर्व पैसा मिळूनही, एकूण उत्पन्न आणि एकूण खर्च ह्यांत तफावत राहते, ती भरून काढण्यासाठी केलेली व्यवस्था म्हणजे तुटीची अर्थव्यवस्था.

जो सरकारी खर्च रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेऊन भागविला जातो, त्याला म्हणायचे डेफिसिट फायनॅन्सिंग किंवा तुटीची अर्थव्यवस्था. सरकार स्वतःच चलनी नोटा काढू शकत नाही. रिझर्व्ह बँक कायद्याच्या २२ व्या कलमाप्रमाणे चलनी नोटा काढण्याचा अधिकार फक्त रिझर्व्ह बँकेला आहे; दुसऱ्या कोणालाही नाही. सरकारची बँकेतील शिल्लक कमी होऊ लागली आणि सरकारला खर्चासाठी पैसा कमी पडू लागला की सरकार रिझर्व्ह बँकेचा आश्रय घेते. सरकार ॲड हॉक ट्रेझरी बिले रिझर्व्ह बँकेच्या नावे काढते, म्हणजे तेवढ्या रकमेचे कर्ज-रोखेच लिहून देते; सरकारकडे पैसे जमा न होता निर्माण केलेले हे कृत्रिम कर्जरोखे असतात. हे कृत्रिम कर्जरोखे रिझर्व्ह बँकेकडे पाठविले, म्हणजे रिझर्व्ह बँक ते कर्जरोखे आपल्या जिंदगीच्या बाजूस जमा करते आणि त्याच्या इतक्याच रकमेच्या चलनी नोटा बँकिंग खात्याकडे धाडते. म्हणजे, सरकारच्या बँकेकडील खात्यात ह्या रकमेची भर पडून त्यावर सरकार चेक काढू शकते. ह्याचा अर्थ, केवळ कृत्रिम कर्जरोखे तयार करून सरकार आपल्यास हवा तेवढा पैसा मिळवू शकते. सरकारच्या तुटीच्या अर्थव्यवस्थेला रिझर्व्ह बँक मुळीच जबाबदार नाही. इतकेच नव्हे तर त्यावर बंधन घालण्याचा सुद्धा रिझर्व्ह बकेला अधिकार नाही. सरकारने असे कृत्रिम कर्जरोखे दाखल केले, की रिझर्व्ह बँकेने त्या रकमेच्या चलनी नोटा सरकारच्या खात्यात जमा केल्याच पाहिजेत, असाच कायदा आहे.

ह्या तुटीच्या अर्थव्यवस्थेचा तात्काळ होणारा परिणाम म्हणजे लोकांच्या जवळील चलनी नोटात होणारी वाढ. पगार, वेतन, मजुरी, व्याज, भाडी, नफे, इत्यादींच्या वाढीत त्याचे स्वरूप प्रकट होते. जनतेची जिनसा विकत घेण्याची क्रयशक्ती वाढते परंतु त्यामुळे राष्ट्रीय उत्पादन वाढलेले नसते; उपभोग्य जिनसा पूर्वीइतक्याच असतात. किमती भडकणे मग अपरिहार्यच होते. हे दुष्परिणाम टाळावयाचे असतील, तर सरकारी आर्थिक धोरण गंभीर हवे आणि कारभारही कार्यक्षम हवा. म्हणूनच, रिझर्व्ह बँकेने आपल्या जून १९७३ अखेरच्या वर्षाच्या अहवालात, खर्च बेसुमार वाढविल्याबद्दल सरकारवर कडक टीका केली आहे. आपल्या सरकारचे आर्थिक धोरण चलनवाढीचे दुष्परिणाम काबूत ठेवण्यास असमर्थ ठरले आहे.

रिझर्व्ह बँकेचा १९७२-७३ चा अहवाल म्हणतो, "१९७२-७३ च्या अंदाजपत्रकात २५२ कोटी रु. ची तूट धरली होती; दुरुस्त अंदाजात ती ५५० कोटी रु. झाली आणि प्रत्यक्षात ती ८८२ कोटी रु. ठरली. ह्या ८८२ कोटी रु. च्या तुटीच्या अर्थव्यवस्थेत, राज्यांचे ओव्हरड्राफ्ट देऊन टाकण्या-साठी राज्यांना दिलेल्या ४२१ कोटी रु. चा समावेश नाही. १९७२-७३ मधील महागाईला सरकारी खर्चातील मोठी वाढ काही अंशी कारणीभूत आहे. बांगला देशातील युद्धाची सरकारने सांगितलेली सबब बरोबर नाही, कारण पैशांची गरज मुख्यतः सरकारने खुशीने स्वतःच्या खर्चात केलेल्या वाढीमुळे निर्माण झाली. अर्थात, दुष्काळी आणि तातडीचे शेतीचे कार्यक्रम ह्यांचा चलनवाढीला मोठाच हातभार लागला. परंतु ह्या जादा खर्चाच्या वेळी इतर खर्चांत छाटाछाट करण्याचा सरकारने प्रयत्न केला

# नहीं –
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत ३० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



[illegible] सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: १७६१०१

नाही. त्यामुळे टाळता येण्याजोग्या खर्चात अटळ खर्चाची भर पडली. शेतीचे उत्पादन दुसऱ्यांदा घटले, त्यामुळे अन्नधान्य व इतर माल ह्यांत खूपच घट झाली. १९७१–७२ मध्ये अगोदरच खूपच चलनवाढ झाली होती, त्यात १९७२–७३ मध्ये आणखी मोठी भर पडली. सरकारने कोळशाच्या खाणी आणि जनरल इन्शुअरन्स ह्यांचे राष्ट्रीयकरण केले, त्यामुळे भरपाईदाखल मोठ्या रकमा द्याव्या लागल्या, त्यासाठी अर्थातच कृत्रिम रोखे रिझर्व्ह बँकेला देऊन त्याच्या बदली घेतलेल्या नोटांत वाढ करावी लागली. परंतु त्यामुळे उत्पादक भांडवलात भर पडली नाही."

आपल्या रोजच्या संसारात आपण आपला खर्च आपल्या उत्पन्नातूनच भागविण्याचा नेहमी प्रयत्न करीत असतो. परंतु लग्नकार्य किंवा आजारीपण ह्यावर कधीकधी एकाएकी खर्च करण्याची पाळी येते. अशा प्रसंगी आपण बँकेत काही पैसे असले तर ते काढतो, कॅश सर्टिफिकिटे आणि जरूर तर दागिनेही मोडतो. मिळाले तर कर्जही काढतो. मुलाला शिक्षणासाठी मुंबईला किंवा परदेशात पाठवावयाचे असले म्हणजे अशाच पद्धतीने पैसे उभारावे लागतात. मासिक प्राप्तीतून हे मोठाले खर्च भागूच शकत नाहीत, परंतु तेवढ्याने पुरेसे पैसे जमले नाहीत, तर आपण हताश होऊन बसतो. सरकारची परिस्थिती त्यापेक्षा अगदी वेगळी असते. सामान्य खर्च सामान्य उत्पन्नातून भागविण्याचे सरकारचेही धोरण असते आणि जरुरीप्रमाणे शिलकी रकमांचा व येण्यांचा उपयोग करून सरकार खासगी व्यक्तीप्रमाणेच वेळ मारून नेते हे खरे आहे; पण सरकारजवळ जादा पैसे उभे करण्याचे एक मोठे साधन असते ते म्हणजे नवे कर बसविणे व चालू कर वाढविणे हे होय. हे कर भरणे जनतेला सक्तीचेच असल्याकारणाने सरकारला आपला खजिना वाढविता येतो. परंतु, करवाढ किती करावयाची ह्यालाही मर्यादा असते. तथापि, सरकारच्या उत्पन्न-खर्चातील तूट तर भरून काढलीच पाहिजे. म्हणून सरकार लोकांच्या जवळून कर्जाऊ रकमा घेते. सरकारची आर्थिक पत ज्या मानाने असेल, त्या मानाने कमी-जास्त व्याजाने सरकारला कमी-अधिक कर्ज मिळते. परंतु त्यासही पुनः मर्यादा आहे आणि तेवढ्यानेही भागले नाही तर सरकारला नोटा छापून चलन निर्माण करण्याचा अखेरचा उपाय योजावा लागतो.

## विकासाच्या योजनांची तरतूद

सरकारचा खर्च हळूहळू वाढत जात असतो आणि लोकांच्या राहणीचे मानही सुधारत असते त्यामुळे हळूहळू कर वाढवीत गेले व मर्यादित रकमांची कर्जे उभारली तर सरकारला नेहमीचा खर्च भागविण्यास व काही भांडवली स्वरूपाची कामे पार पाडण्यास अडचण पडत नाही. पण काही काही वेळा सरकारला उत्पन्नापेक्षा पुष्कळच जास्त खर्च करावा लागतो व हा खर्च भागविण्यास वर सांगितलेले हे दोन मार्ग अपुरे पडतात. अशा प्रसंगी खर्चात काटकसर करता येत नाही आणि मामुली मार्गांनी उत्पन्नही वाढविता येत नाही; सरकार मग नाइलाजाने नोटा छापून व त्यांचा उपयोग करून तूट भरून काढण्याचा प्रयत्न करते. तूट भरून काढण्यासाठी अवलंबिलेल्या ह्या मार्गासच 'तुटीची अर्थव्यवस्था' असे म्हणतात. भारताचा आर्थिक विकास तातडीने घडवून आणण्यासाठी सरकारने आपल्या उत्पन्नापेक्षा बराच मोठा खर्च करण्याचे ठरविले आहे, विकासाच्या योजना आखल्या आहेत. त्या सर्वांना लागणारा खर्च मामुली उत्पन्नातून भागणे शक्यच नव्हते. म्हणून शक्य तेवढ्या मार्गांनी पैसा उभा करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

## प्रयोग नवीन नाही

पण, ह्या प्रयोगात काही तरी अपूर्व आहे, असे मात्र मानण्याचे कारण नाही. तुटीच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब ह्या आधी किती तरी देशांनी किती तरी वेळा केलेला आहे. मुख्यतः तीन प्रसंगी तुटीच्या अर्थव्यवस्थेचा आधार घेतला जातो. तात्कालिक मंदीचा प्रतिकार करण्यासाठी व जेव्हा खाजगी भांडवलदार पैसा गुंतविण्यास पुढे येत नाहीत अशा वेळी, सरकार तुटीच्या अर्थव्यवस्थेचे हत्यार वापरते. उत्पादनक्षमता शिल्लक आहे, कामगार बेकार आहेत आणि मालाला मागणी वाढण्याचा संभव आहे, अशा वेळी सरकारच पुढाकार घेते. तिसरा प्रसंग युद्धकाळाचा होय; त्या वेळी तातडीची गरज भागविणे व राष्ट्राचा बचाव करण्याची शिकस्त करणे एवढेच ध्येय सरकारपुढे असते; आणि अशा प्रसंगी संरक्षणासाठी आवश्यक तो खर्च सारासार विचार न करता केला जातो. खर्च करीत राहावयाचे व पडेल ती तूट नोटा छापून भरून काढावयाची, असे चालू राहते. अशा परिस्थितीत जी अर्थव्यवस्था केली जाते म्हणण्यापेक्षा जी व्यवस्था होते, तिलाही तुटीची अर्थव्यवस्थाच म्हणता येईल. युद्धोपयोगी जिनसांच्या पुरवठ्यास प्राधान्य देऊन अप्रत्यक्ष रीतीने म्हणजे फाजील चलनविस्तारामुळे आणि महागाईमुळे जनतेला सक्तीची बचत करणे भागच पडते. आताच सांगितलेल्या या तीनही प्रसंगी तुटीच्या अर्थव्यवस्थेचा अवलंब करण्यात आला, तरी त्याचा उद्देश राष्ट्राचा दीर्घकालीन आर्थिक विकास हा नसतोच, हे आपल्या लक्षात आलेच असेल.


## भारतातील प्रयोगाचे वैशिष्ट्य

भारताने तुटीची अर्थव्यवस्था आता पत्करली आहे, त्याचा उद्देश मात्र दीर्घकालीन आर्थिक उद्धार, हाच आहे. शेती व समाजविकास, पाटबंधारे, वीजनिर्मितीच्या योजना, वाहतूक व दळणवळण, उद्योगधंदे, सामाजिक सुखसोयी, पुनर्वस्ती, ह्या सर्व आर्थिक विकासास आवश्यक अशाच बाबी आहेत आणि त्यांवरील खर्चाचे फळ तात्काळ हाती येणारे नाही. खर्च मात्र थोड्याच काळात केला पाहिजे. म्हणून जरूर व शक्यते पैशाचे मार्ग संपल्यावर आणखी लागणारी रक्कम तुटीच्या अर्थव्यवस्थेच्या

मार्गाने सरकार उभी करीत आहे. सरकारने ह्या मार्गाचा विचारपूर्वक, जाणूनबुजून अवलंब केलेला आहे.

### भांडवल-निर्मितीची वैशिष्ट्ये

अगदी प्राथमिक अवस्थेत बचत प्रथम करावयाची व नंतर तिचा भांडवल म्हणून उपयोग करावयाचा, असेच घडणे स्वाभाविक असते. आता बँकांसारख्या संस्था पत निर्माण करून भांडवल वाढवू शकतात आणि औद्योगिक क्रांतीमुळे त्या भांडवलाचा उत्पादक रीतीने उपयोगही करता येतो. अशा रीतीने, काही अंशी बचतीची वाट न पाहताही, अगोदरच भांडवलाची गुंतवणूक करण्याची सोय उपलब्ध झाली आहे. गुंतविलेल्या भांडवलाने अपेक्षेप्रमाणे फळ दिले नाही तर नव्या बचतीस चालना मिळणार नाही, हे उघड आहे. साहजिकच, व्यक्ति आणि समाज व राष्ट्र ह्या सर्वांनाच ठोकर बसेल; उलट, गुंतवणूक उत्पादक ठरली तर बचतीस व भांडवलाच्या निर्मितीस चालना मिळून सर्वांचाच फायदा होईल.

भांडवलदारी अर्थव्यवस्थेत बँका जे भांडवल निर्माण करू शकतात ते बंधनांच्या पलीकडे जाऊच शकत नाही. लोक बँकांकडून कर्ज काढतात, ते त्यांच्या आर्थिक व्यवहारासाठीच असते. त्या उपक्रमात फायदा उरेल अशा विश्वासानेच धंदेवाले कर्ज घेतात. दिलेले तारण विकण्याची त्यांच्यावर सहसा पाळी येत नाही. म्हणजे परत-फेड होऊ शकेल या बेतानेच कर्ज काढले जाते किंवा दिले जाते. सरकार जेव्हा स्वतःच्या तारणावर मध्यवर्ती बँकेकडून कर्ज काढते, म्हणजे रोखे देऊन त्यांच्याबदला नोटा घेते म्हणजेच सामान्य अर्थाने नोटा छापून पैसा मिळविते, त्या वेळी सरकारवर परतफेडीचे निश्चित बंधन नसते. सरकारी खर्चावर कडक नियंत्रण नसेल, तर सरकारी योजना अवास्तव खर्चिक होण्याचा संभव असतो. रस्ते, कालवे, पुरापासून संरक्षण, इत्यादींवर होणाऱ्या खर्चाचा फायदा जनतेला अप्रत्यक्ष रीतीने मिळत असतो व लोकांच्या उत्पन्नात त्यामुळे वाढ होण्यास मदत होत असते. अशा रीतीने त्यांच्या उत्पन्नात जी भर पडते तिचा मोठा हिस्सा कर आणि कर्जे ह्या मार्गांनी सरकारने परत खेचून घेतला पाहिजे. म्हणजे, तुटीच्या अर्थव्यवस्थेचे सुपरिणाम टिकून राहतील व दुष्परिणाम टळतील.

भारतासारख्या अविकसित देशात लोकांची प्राप्ती बेताची, त्या मानाने अतृप्त गरजा फार आणि थक्कि बचतीला वाव अतिशय थोडा. आर्थिक विकासाची गरज तातडीची स्वेच्छेने बचत होऊ शकत नाही, म्हणून अर्थव्यवस्थेच्या मार्गाने तोच परिणाम घडवून आणण्याचा सरकारचा हा प्रयत्न आहे. आर्थिक विकासाच्या योजनांना जोराची चालना मिळाली, त्यातील भांडवल फलदायी होऊ लागले, जनतेचे हाल कमी झाले, त्यांना अधिक जिनसांचा पुरवठा होऊ लागला म्हणजे उत्पन्न व खर्च ह्यांतील प्रतिकूल तफावत कमी होत जाईल व एकीकडे राहणीचे मान सुधारत जात असताना, बचत, भांडवलनिर्मिती व त्याची गुंतवणूक हीही चालू राहतील. असे होण्यास प्रारंभ झाला, म्हणजे यशोमंदिराच्या जवळ येऊ लागलो आहोत, असे मानण्यास हरकत नाही.

### औषध जालीम : पथ्य कडक

तुटीची अर्थव्यवस्था हे अशा रीतीने एक गुणकारी पण जालीम औषध आहे. त्याचे पथ्यही अतिशय कडक आहे. रिझर्व्ह बँकेकडून नोटा मिळविणे सोपे आहे परंतु, त्या नोटांच्या खर्चावर अतिशय परिणामकारक बंधन हवे; सरकारी कारभार कार्यक्षम व काटकसरीचा हवा आणि होणारा खर्च उत्पादक व फलदायी ठरला पाहिजे. त्याचप्रमाणे, किमतीमध्ये वाढ होत जाता कामा नये. सरकारी नोकरांनी त्यांच्यावरील जबाबदारी ओळखली पाहिजे व लोकांनाही सहकार्य केले पाहिजे. हे साधले नाही, तर पैसा निर्माण करण्यातील धोकेच अधिक प्रभावी ठरण्याची भीती राहते. तुटीच्या अर्थव्यवस्थेचा व नियंत्रणाचा अत्यंत घनिष्ठ संबंध असतो. एकूण खर्चाच्या मानाने नोटा छापून किती तरतूद करणार, हा प्रश्न जसा महत्त्वाचा आहे, तसाच जनतेच्या त्यागाच्या मानाने तुटीच्या अर्थव्यवस्थेचा आकार केवढा आहे, हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. विकास म्हटला की प्रथम त्याग हा आलाच; आणि ह्या त्यागाचा बोजा योग्य प्रमाणात सर्वांवर बसावा आणि तो तत्परेने व खुशीने उचलला जावा, हे लोकशाही योजनांचे मर्म आहे. भांडवलवाढ साध्य होण्यासाठी चालू खर्च मर्यादित राखला पाहिजे आणि उत्पादनात वाढ करीत गेले पाहिजे. तुटीच्या अर्थव्यवस्थेचे यश त्यावरच अवलंबून आहे.

●


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे ३०

जो सर्वत्र सदा सरिसा । परिपूर्ण चंद्र कां जैसा ।
अधमोत्तम प्रकाशा । मार्जी न म्हणे ॥ —श्री ज्ञानेश्वरी.

साखरेचा नवीन हंगाम दिवाळीनंतर सुरू होईल.

देशी व विदेशी मद्याचे उत्पादन व्यवस्थित चालू आहे.

आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना
दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

ज. चं. आगाशे
ज्ञा. चं. आगाशे
जॉईंट मॅनेजिंग डायरेक्टर्स

दीपावली शुभ चिंतन

# दि सांगली बँक लिमिटेड

रजिस्टर्ड ऑफिस : राजवाडा चौक, सांगली

- ठेवींवरील आकर्षक व्याजाचे दर !
- ठेवींची सुरक्षितता !
- ठेवींचे विविध प्रकार !
- विनम्र तत्पर सेवा !

या सर्वांसाठी आपली निवड सांगली बँक. शेतीविकास, लघुउद्योग, व्यापार, वैयक्तिक व्यवसाय, आदी कर्जांना प्राधान्य.

आपल्या सर्व प्रकारच्या बँकिंगच्या गरजांसाठी आमच्या कोणत्याही शाखेशी संपर्क साधा.

वा. त्रिं. कोरके
चेअरमन

खानापूर तालुक्यातील सर्वांगीण विकासासाठी व सामान्य जनतेचे जीवनमान उंचविण्यासाठी अहोरात्र प्रयत्नशील असणारी तसेच सर्वांच्या अविरत सेवेसाठी तत्परतेने तयार असलेली एकमेव नागरी सहकारी बँक.

# दि विटा मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. विटा

(जिल्हा — सांगली)

आमच्या सर्व सभासदांना, ठेवीदारांना, ग्राहकांना व हितचिंतकांना हे नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

जनतेच्या विश्वासाचे प्रतिक

| | |
|---|---|
| (१) भाग भांडवल | रु. १,८३,०००।- |
| (२) निधी | रु. ४,११,०००।- |
| (३) एकूण ठेवी | रु. ४३,४३,०००।- |
| (४) एकूण कर्जे | रु. ३५,२८,०००।- |
| (५) खेळते भांडवल | रु. ५४,३८,०००।- |

ऑडिट वर्ग "अ"

अधिक माहितीसाठी एकवेळ समक्ष भेटा.

नि. वि. डोंबे
व्हा. चेअरमन

तु. कृ. लोटके
अध्यक्ष

श. गो. मराठे एम्.ए.एम्.कॉम. (ऑनर्स)
व्यवस्थापक

म. ना. भंडारे
चेअरमन

ही दीपावली व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे जावो.

# श्री सिन्नर व्यापारी सहकारी बँक लि., सिन्नर, जि. नासिक

| | |
|---|---|
| शेअर्स भांडवल | सर्व प्रकारच्या ठेवी |
| रु. १,२४,७०० | रु. १२,१२,६५८ |
| दिलेली कर्जे | गुंतवणूक |
| रु. १५,६८,५४३ | रु. १,३८,००० |

सर्व प्रकारचे निधी रु. १,१२,९६१

## सेव्हिंग्ज, चालू व मुदत ठेवींवर आकर्षक व्याज

मध्यम व सर्वसामान्य नागरिकांसाठी दोन वर्षे मुदतीची आकर्षक व्याजाची अल्पठेव योजना. त्याजबरोबर सोने, चांदी दागिन्यांवर कर्जाची सुविधा.

पी. सी. लोणकर
मॅनेजर

मधुकर शांताराम गुजराथी
चेअरमन

भानुदास भिकुसा क्षत्रिय
उपाध्यक्ष

# पूना मर्चंटस् को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

सरस्वती विलास बिल्डिंग, लक्ष्मी रोड, पुणे ३०

## नूतन संवत्सरानिमित्त सर्व सभासदांस आणि ठेवीदारांस हार्दिक शुभेच्छा

सतत ४९ वर्षे पुणे परिसरातील व्यापारी, लघुउद्योग आणि ठेकेदार वगैरे व्यावसायिकांस सहकार्य देणारी सहकारी बँक, सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे.

कृपया समक्ष वा दूरध्वनी ५३६०३ वर संपर्क साधावा.

म. ग. सावणे
कार्यप्रमुख

खं. आ. काकडे,
कार्याध्यक्ष

# ओव्हरटाईममुळे उद्योगांचे गणित चुकणार आहे !

( श्रु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए. )

आजच्या वाढत्या महागाईत कारखाने व कचेऱ्यांतील नोकर-वर्गास 'ओव्हरटाईम भत्ता' व 'महागाई भत्ता' हे दोन उपकारकर्ते भेटले आहेत. कामाचे स्वरूप तेच राहून मूळ पगारात वाढ न झाली तरी बऱ्याच मोठ्या प्रमाणावर या दोन भत्त्यांनी अनेकांच्या वाढत्या राहणीमानास व खर्चास हातभार लावलेला आढळतो. राष्ट्रीयीकृत बँकांतील ओव्हरटाईमवर तर सर्वत्र चर्चा चालू झाल्याचे आढळून येते. कर्मचाऱ्यांची संख्या वाढली आहे. महिन्याचे सर्व दिवस सर्वांना पुरेसे काम नाही तरीही-ओव्हरटाईमचा खर्च मात्र कोट्यवधी रुपये होत आहे व त्यात लक्षणीय वाढ होत आहे. देशात अजूनही हजारो सुशिक्षित बेकार आहेत. त्यांच्यात नव्याने शाळा-कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्यांची भर पडत आहे. अशा वेळी ज्यांना नोकरी आहे त्यांनाच ओव्हरटाईम देण्यापेक्षा तात्पुरत्या स्वरूपाची कामे या बेकारांकडून करून घेता येणार नाहीत असे नाही. पण ओव्हरटाईम हा अनेकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न झालेला असल्याने त्यात खंबीर धोरण आखून सध्याच्या पद्धतीला बाध आणण्याचे धाडस करण्यास कोणी धजत नाही. बँक-कर्मचारी हा संघटित वर्ग आहे. त्यांचा प्रतिनिधी हा बोर्डाचा डायरेक्टर झाला आहे तेव्हा त्या वर्गास दुखविण्याचे धाडस करणे कोणालाच जमत नाही असे दिसते. अन्यथा आज बँकेच्या कारभार विषयक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जी यंत्रणा उभारलेली आहे तिच्यातर्फे तसेच बँकिंग क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींच्या सल्ल्याने ओव्हरटाईमवर चालणारी उधळपट्टी थांबविणे मुळीच अशक्य नाही. सध्या तरी मध्यमवर्गीय बँक-कर्मचाऱ्यांचा ओव्हरटाईम हा मोठा उपकारकर्ता ठरला आहे. आज या वर्गातील अनेकांच्या कुटुंबांत आढळणारी सुबत्ता बरीचशी या ओव्हरटाईमच्या आधारावर टिकली आहे.

बँकांप्रमाणेच ओव्हरटाईम ही उद्योगक्षेत्रातही डोकेदुखी होऊन बसली आहे. वास्तविक ८ तास श्रमाचे काम केल्यानंतर कामगाराच्या अंगात अधिक काळ श्रमाचे काम करण्यास उत्साह राहू नये याच कल्पनेने सरकारने 'फॅक्टरी ॲक्ट' सारखे कामगारविषयक कायदेही केले आहेत. पण प्रत्यक्षात आहे त्याच कामगारांत कमी दिवसांत अधिक काम संपवण्याच्या आग्रहात कामगारांना ओव्हरटाईम काम करायला सांगितले जाते. हेतू हा की उत्पादन जलद उरकून माल लवकर विकला जाईल व त्याचे पैसे उद्योग चालविण्यास लवकर हाती येतील. उत्पादनाच्या किमतीशी वेतनाचे प्रमाण जर १०% ते १५% च असेल तर त्यात या ओव्हरटाईममुळे ½% भर पडली तरी ती फारशी नुकसानकारक नाही, या विचाराने उद्योगचालकांनी किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या पद्धतीला संमती दिली व त्याच्या दुष्परिणामांविषयी तितकी जागरूकता दाखविली नाही. आज या ओव्हरटाईम काम करण्याच्या पद्धतीमुळे ज्या काही अनिष्ट व उद्योगाच्या दृष्टीने अहितकारक प्रथा पडत आहेत त्यांपैकी काही येथे दिल्या आहेत. याहूनही बरेच प्रकार ठिकठिकाणी प्रचारात आढळतील.

**१. सुटीच्या दिवशी कामाचा भत्ता**— श्री. थॉमस हे एक कुशल मशीन ऑपरेटर आहेत. सोमवार ते शनिवार हे उत्पादनाचे काम करतात पण रविवारी मशीनच्या साफसुफीसाठी व किरकोळ दुरुस्तीसाठी त्यांनाच त्यांचे अधिकारी बोलावतात व त्या दिवसासाठी त्यांना दुप्पट पगाराने वेतन मिळते. त्यांचे सातही दिवस कामावर हजर राहणे कायदेशीर नसल्याने त्यांना अन्य रूपाने हे वेतन दिले जाते. कंपनीच्या खर्चकपातीच्या योजनेत या तऱ्हेचे खर्च कमी करण्याचे ठरले व त्याप्रमाणे श्री. थॉमसनना यापुढे तुम्ही रविवारी ओव्हरटाईम म्हणून न येता नेहमीसारखे यायचे आहे व सोमवार ते शनिवार केव्हाही आठवड्याची साप्ताहिक सुटी घ्यायची आहे असे सांगण्यात आले. त्याबरोबर त्यांनी पहिल्याच रविवारी मला चर्चला जायचे आहे म्हणून रजा मागितली व आम्हांला धार्मिक कृत्यात सवलत देत नाहीत म्हणून वरिष्ठांकडे तक्रार केली. ओव्हरटाईमच्या लोभाने वेळेवर येणाऱ्या थॉमसना तो बंद होताच चर्चला जाण्याचे कर्तव्य महत्त्वाचे वाटले. शिवाय ज्या दिवशी थॉमस कामावर नसतील त्या दिवशी उत्पादनातही अडचणी येतील असे त्यांच्या सुपरवायझरने सांगितले. थॉमस एरव्ही रजेवर असताना उत्पादन बंद पडत नसे तसेच दुसऱ्या वा तिसऱ्या पाळीत थॉमसशिवाय उत्पादन होतच होते ना? पण काही ठिकाणी अशा अडवणुकीच्या कारवाया मुद्दाम होतात व त्याला तोंड देण्यास कनिष्ठ अधिकारीवर्ग असमर्थ ठरतो.

**२. आळीपाळीने गैरहजर राहणे**— संघटित कामगार व कर्मचाऱ्यांची ओव्हरटाईम पदरात पाडून घेण्याची ही प्रसिद्ध युक्ती आहे आणि यावर योग्य ती उपाययोजना व्यवस्थापनास इच्छा असूनही अमलात आणता येत नाही. एकच मशीन २ किंवा ३ पाळ्या चालायचे असेल तर पूर्वयोजनेने पुढच्या पाळीतील कामगार गैरहजर राहतो व आधीच्या पाळीतील कामगारास पूर्ण ८ तासांच्या पाळीचा ओव्हरटाईम मिळतो. गैरहजर राहणाऱ्याच्या सर्व रजा संपल्या असतील तर त्याचे १ दिवसाच्या वेतनाइतकेच नुकसान होते पण ओव्हरटाईम करणाऱ्यास दुप्पट पगार मिळतो. ही योजना आळीपाळीने व संगनमताने चालवून परस्परांचा फायदा साधून घेतला जातो. ऑफिस कर्मचारीही याप्रमाणे एक-दुसऱ्यास ओव्हरटाईम मिळवून देताना आढळतात.

**३. नियमित वेळांत कामे करणे टाळणे**—ओव्हरटाईमचा मोह इतका जबर आहे की बहुसंख्य कर्मचारी ओव्हरटाईमसाठी काम साठवू पाहतात. नेहमीच्या वेळांत कामात टंगळमंगळ करणे, दुसऱ्याने त्याचे काम हातावेगळे केल्याशिवाय आपल्याला काहीच करता येणार नाही अशी इतरांची समजूत करून देणे, कामाला लागणारी यंत्रे, साधने फारशी बिघडली नसताही बिघडली आहेत म्हणून काम थांबवून त्यांची दुरुस्ती होण्याकडे आग्रह धरणे, इत्यादी पद्धतींचा सर्रास अवलंब केला जातो. परिणामी दिवसाअखेरी काम तुंबते व वरिष्ठांना ते काम त्याच दिवशी पुरे करून हवे असल्याने ओव्हरटाईम मान्य केला जातो. ओव्हरटाईम मान्य झाल्याचे कानावर येताच विनातक्रार काम पुरे करून दिले जाते. बहुतेक सर्व महत्त्वाची कामे ओव्हरटाईम करूनच पुरी केली जातात असा बऱ्याच ठिकाणी अनुभव येतो.

**४. पगारवाढीला पर्याय म्हणून ओव्हरटाईम देणे**—ओव्हरटाईम पद्धत पोसण्यास ज्यांना ओव्हरटाईम मिळत नाही अशा वरिष्ठांचाही हातभार लागतो. हाताखालच्या माणसांना शिफारस करूनही व्यवस्थापकांकडून पगारवाढ मिळू शकली नाही की हे अधिकारी त्यांना जमेल तेव्हा ओव्हरटाईम करण्यास उत्तेजन देतात. कामाची निकड जाणून त्यांच्या वरिष्ठांकडून हा ओव्हरटाईम मंजूर करून घेतात व हे पर्यायी वेतन हाताखालच्या मंडळीस देऊन स्वतःची पत राखतात. अशा अधिकाऱ्यांबद्दल त्यांच्या खात्यातील मंडळी प्रशंसोद्गार न काढतील तरच नवल!

वरील उदाहरणांवरून ओव्हरटाईम का व कसा प्रचारात येतो हे सहज लक्षात आले असेलच. ओव्हरटाईमचे अधिक वेतन देऊन कामे करून घेणे हे कोणत्याही व्यवस्थापकाला आवडणार नाही. यामुळे उत्पादनाचा खर्च तर वाढतोच पण नियमित वेळात अपेक्षित कामे न झाल्याने जे शैथिल्य येते त्याचा कर्मचाऱ्यांवर व उद्योगांतील वातावरणावरही अनिष्ट परिणाम होतो. लाच दिल्याशिवाय जशी काही कामे आज होऊच शकत नाहीत तशीच ओव्हरटाईम दिल्याशिवाय अपेक्षित काळात कामेच होऊ शकणार नाहीत. उद्योगातील शिस्त, प्रामाणिकपणा या आवश्यक गोष्टी दुर्मिळ होऊ लागतील. लवकर काम उरकण्यासाठी अधिक वेळ थांबूनही काम करवून घ्यायचे जे फायदे या ओव्हरटाईमने चालकास मिळत होते ते तर नष्ट होऊन ओव्हरटाईमचा हा भस्मासूर चालकांवरच उलटणार आहे. ओव्हरटाईम मंजूर करा तरच काम होईल असे दडपण त्यांच्यावर येऊ लागेल. ओव्हरटाईम ही नैमित्तिक बाब न राहता नित्याचीच बाब होणार आहे. यामुळे उद्योगांचे गणित चुकणार आहे. तरी वेळीच योग्य ती दक्षता घेऊन ही अनिष्ट प्रथा कशी आटोक्यात ठेवता येईल याचा उद्योगतज्ज्ञांनी, कामगार पुढाऱ्यांनी व राजकारण्यांनी एकत्र बसून विचार करणे जरूर आहे. यावर अनेक उपाय सुचविता येतील पण ते अमलात आणण्याचे धाडस दाखविण्याची तयारी व्हायला हवी. अन्यथा, कामाच्या वेळात शिथिलता व जादा वेळांत काम हाच नियम रूढ होईल. ●




आनंदाचे, सौख्याचे लक्षदीप उजळू द्या

दिवाळी म्हणजे केवळ दीपोत्सव नव्हे. कुटुंबाच्या आगामी वर्षातील सुखसमृद्धीसाठी काही योजना निश्चित करण्याचाहि हा शुभसमय आहे.

नियमितपणे बचत केल्यानेच सुख आणि समृद्धी यांचा लाभ होतो. तुमच्या बचतीसाठी सेंट्रल बँकेच्या विविध प्रकारच्या योजना आहेत—वैयक्तिक गरजेला अनुरूप अशी प्रत्येक योजना आहे. या दीपावलीच्या शुभप्रसंगीच सेंट्रल बँकेतील तुमच्या योजनाबद्ध बचत कार्यक्रमाचा प्रारंभ होऊ द्या.

सेंट्रल बँक ऑफ इंडिया

# उद्योगधंद्यांतील उधारीचे व्यवहार व शिस्तीची आवश्यकता

( विजय गोखले )

लहानशा वाण्याच्या दुकानापासून ते थेट मोठ्या उद्योगधंद्यांना आज भेडसावणारा प्रश्न आहे तो खेळत्या भांडवलाचा! तसे पाहिले तर पूर्वी हा प्रश्न होताच, परंतु खाजगी बँका ओव्हरड्राफ्ट वा अल्प मुदतीची कर्जे देऊन हा प्रश्न तात्पुरता का होईना सोडवत होत्या. परंतु बँकांचे राष्ट्रीयीकरणानंतर व सरकारने कर्ज देण्याचे धोरण बदल्यापासून हा अधिक तीव्रतेने जाणवू लागला आहे. विशेषत: मोठमोठ्या उद्योगधंद्यांना कर्ज मिळणे दुरापास्त होऊन बसले आहे.

पाश्चात्त्य देशांत उधारीवर देण्यात येणाऱ्या मालाचा धंदा बँकांमार्फत जास्त प्रमाणात चालतो. तयार झालेला माल ग्राहकाकडे पाठविला की त्यावर हुंडी काढून ती बँकांकडे वा डिस्काउंटिंग हाऊसेस्‌कडे सुपूर्त केली म्हणजे त्यावर लगेच पैसा मिळू शकतो. अर्थात त्यासाठी ग्राहकाची पत, उत्पादकाच्या मालाचा दर्जा, ह्यांविषयीच्या कसोट्या बँकरच परस्पर बघत असतो वा ठरवीत असतो. आपल्या देशात तशा तऱ्हेची सोय म्हणावी तितकी यशदायी ठरेल असे अद्यापि वाटत नाही. त्यालाही बरीच कारणे आहेत. मालाचा दर्जा, ग्राहकाची पत, व्यवहारातील गुंतागुंती, ही त्यांपैकी प्रमुख मानावी लागतील.

उधारीने ज्याप्रमाणे कच्चा माल खरीदला जातो, त्याचप्रमाणे ग्राहकाला पक्का माल उधारीवर दिला जातो. कच्च्या मालावर प्रक्रिया होऊन पक्का माल बनविण्यास लागणारा वेळ व पक्क्या मालाची विक्री होऊन त्याची किंमत हातात येईपर्यंत जितके दिवस जातील तितक्या प्रमाणात उधारीची वेळ वाढत राहते. अर्थात किती प्रमाणात, किती दिवसांसाठी उधारी दिली जाते वा ती प्रत्यक्षात किती वाढवून वापरली जाते ह्यावरच खेळत्या भांडवलाचा विनियोग करू शकतो. वेळीच उधारी वसूल झाली नाही तर त्याचा गैरवापर होण्याचा संभव जास्त.

असे बघा—बँकांकडून तुम्ही कर्ज मिळविता व त्यावर भरपूर व्याज देता, मग ग्राहकाला मात्र बिनव्याजी मालाच्या रूपाने तुमच्या पैशाचा वापर करण्यास देता. तुम्ही म्हणाल, ग्राहक टिकवावयाचा असेल वा तो दुसरीकडे जाऊन द्यावयाचा नसेल तर उधारीवर धंदा करणे आवश्यकच आहे, त्याशिवाय ग्राहकाला किंमत सांगताना व्याजाचा विचार केलेला असतोच. खरे आहे आपले म्हणणे. पण समजा तुम्ही जर ३० दिवसांची मुदत धरून किंमत काढली असेल व ग्राहकाने ९० दिवसांचे वर पैसे दिले नाहीत तर? बँकेला तुम्हीच व्याज देत राहणार ना?

उधारी ही आकाशात उडविलेल्या पतंगासारखी आहे. पतंग उंच उडावा म्हणून आपण धागा सैल सोडत राहतो, वाऱ्याची दिशा वरवर बदलू लागली अन् पतंग गोता खाऊ लागला की आपण धागा गुंडाळावयास घेतो—पतंग लवकर आपल्या हाता येईल ह्या अपेक्षेने! धंद्याचेही तसेच आहे. धंदा वाढावा म्हणू उधारीची संवय आपण ग्राहकांना लावतो, आपण गोत्या आलो की उधारी आवरती घ्यायला लागतो, अन मग ज्य सवयी लावल्या गेलेल्या असतात त्या आवरणे कठीण होऊ बसते.

मर्यादित उधारी म्हटली की धंद्याला मर्यादा आली असा काह लोकांचा समज आहे. 'देते रहो, घेते रहो' ह्या तत्त्वाने एकीक उधारी करून ठेवतात तर दुसरीकडे उधारीवर माल देऊन बसतात मग वेळेला हातात पैसा लागतो तो न राहिल्यास घेणेकऱ्याल वसुली झाली नाही म्हणून थोपवून धरावे लागते, अन् असे बरे वेळेला थोपवून धरले की बाजारात त्या धंदेवाल्यांची पत कम होते वा कदाचित राहातही नाही, म्हणजेच धंद्याला खीळ बसते मग तो धंदा उत्पादनाचा असो नाहीतर वाणसामानाचा असो!

आमच्या बंडोपंतांचेच उदाहरण घ्याना! ऐन उमेदीत बरकतीत—लढाईच्या काळात त्यांचे दुकान उत्तम चालले होते पैसा खेळत होता, आणखी धंदा वाढावा म्हणून लक्ष्मी बँकेकडू कर्ज काढून त्यांनी दुकानाचा विस्तारही केला होता. पुढे लढा संपली—बाजारपेठ उतरणीला लागली. पैसा आलेला चैनीत ई उधारीवर अडकून पडला. उधारी इतकी बेहिशेबी होती क सांगता सुमार नाही. वाहत्या गंगेत ती उधारी लपून जात असे पण धंदा जसा कमी झाला अन् घेणेकरी तगादा लावून बसले तेव्हा हे उघडकीला आले. देतो, देतो, करत एक दिवस दिवाः काढले.

सांगण्याचे तात्पर्य काय, तर मर्यादित उधारी ठेवूनही धंद उत्तम करता येतो, परंतु त्यासाठी बरीच पथ्ये पाळावी लागतात

ग्राहकाकडून ऑर्डर्स मिळविणे, नेमल्या वेळी माल पुरविणे दिलेल्या मालाचे पैसे वसूल करणे हे विक्री खात्याचे काम. रोख व उधारीवर माल देणे हे त्याच्या अखत्यारीत असते असे आप मानू या. सर्वसाधारणपणे महिन्याची उधारी ठेवावी हे तर लक्षात घेऊन उधारीवर माल द्यावा. समजा, एखाद्या संस्थेच महिन्याची विक्री ४०।५० लाख रुपये आहे, तर कोणत्याही क्षण उधारी त्यावर जाऊ नये हे चांगले. असे हे उधारीचक्र फिर राहण्यासाठी विक्री विभागाने खालील गोष्टींचा विचार करावा

( १ ) ग्राहकाची पत व त्याचा आपल्या धंद्याशी संबंध किर वरचेवर येणार आहे हे अजमावून घ्यावे.

ग्राहकाची पत त्याच्या वार्षिक ताळेबंदावरून वा त्याच्या बँकेकडे विचारणा करून ठरविता येते. नवीन ग्राहक असेल

## चित्रकलेच्या आधुनिक कॅमेऱ्यांचे व साहित्यांचे आद्य उत्पादक

उत्पादने

(१) प्रोसेस कॅमेरे

(२) ऑफसेट कॅमेरे

(३) फोटोग्राफीचे कॅमेरे

व

(४) त्यांचे सर्व तऱ्हेचे साहित्य

(५) डुप्लिकेटर्स, इत्यादी.

आजच आपल्या गरजेसाठी लिहा.

# दि शेवडेज कॅमेरा वर्क्स लि. टिळकवाडी, बेळगाव

( फोन नं. १३०६ )



जय सहकार !

कर्मण्ये वाधिकारस्ते मा फलेषु कदाचन

—श्रीमद् भगवद्‌गीता

शुभ्र दाणेदार साखरउत्पादनाबरोबरच कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व जनतेचा सर्वांगीण विकास करून या भागातील तरुण सुसंस्कृत, सुविद्य व आदर्श असा बनवून 'नवा माणूस' घडविण्यासाठी अविरत प्रयत्न करणारा...

# श्री वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर

तहशील पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर. [ महाराष्ट्र ]

तार : 'वारणासाकर' वारणानगर

दूरध्वनि : कोल्हापूर २२४६

बाळासाहेब जगौंडा पाटील
व्हाईस चेअरमन

विश्वनाथ आण्णा ऊर्फ तात्यासाहेब कोरे
चेअरमन

नंदकुमार काशिनाथ नाईक
कार्यकारी संचालक



## दीपावली अभिष्टचिंतन !

समाजाचे आर्थिक जीवनचक्र गतिमान राखण्यास आम्ही सदैव सिद्ध आहोत.

# दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगाव

स्थापना १९४२ ] [ फोन नं ५३५

म्हैसूर राज्यातील सहकारी क्षेत्रातील अग्रेसर बँक.

आर्थिक परिस्थिती—

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ३,७२,५२५ |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. ९,७२,२७१ |
| ठेवी | रु. ३७,५३,३८० |
| खेळते भांडवल | रु. १ कोटीचे वर |
| इ. स. १९७२-७३ डिव्हिडंड वाटप | शे. १२% |
| इ. स. १९७२-७३ चा निव्वळ नफा | रु. ३,२०,२४५ |

निरनिराळ्या धंद्यांच्या सुरुवातीसाठी व उर्जितावस्थेसाठी बँकेच्या निरनिराळ्या कर्जाच्या योजना.

बचतीसाठी निरनिराळ्या प्रकारच्या ठेवींच्या योजना.

या योजनांचा फायदा घेण्यासाठी आजच बँकेत चौकशी करा व आपल्या उत्कर्षाचा मुहूर्त साधा.

अर्जुनराव गोविंदराव घोरपडे, चेअरमन.



*Good Wishes For Divali*

# The Poona Urban Co-Operative Bank Ltd.

**25 Shukrawar Peth, Poona 2**
**Registration-1924, Phone : 55701**

Previous Service of 49 Years; and will celebrate the Golden Jubilee next year.

* Services for Customers aud members. Collection of Pension-Bills, Out-door Services.

Cheques, bills, Insurances and more. Take The Benefit of our "Deposit Insurance Scheme."

**Audit Class : A**

* Further information on request, please do contact.

**Attractive Rates of Interest**

Our motto is Co-operation and we really give Co-operation

**P. S. Kabule** H. D. C.
Asstt. Manager

**S. L. Shirole**
Vice Chairman

**H. M. Thorat**
Chairman

त्याचा आपल्या धंद्याशी वारंवार संबंध येणार असेल तर माल देण्यापूर्वी त्याचेशी मालाचे पैसे तो केव्हा देऊ शकेल ह्याविषयी चर्चा करून पैसे देण्याची वेळ दोघांच्या संमतीने ठरवून घेतलेली असावी. बरेच वेळा असे दिसून येते की धंद्याचे संबंध नीट राहावेत म्हणून प्रथम वरचेवर ग्राहक माल घेईल व पैसेही वेळेवर देईल, पण जसजसा संबंध वाढेल तसतसा माल जास्त घेऊन उधारी वाढवून ठेवेल, व पैसे देण्यासंबंधी स्मरणपत्रे पाठविल्यावर निरनिराळ्या अडचणी पुढे सांगेल. अशा वेळी पुढे पाठवला जाणारा माल रोखून ठेवावा. ग्राहकाला त्याचे पतमर्यादे ( credit limit ) पर्यंतचे पैसे पाठविण्यास सांगावे व ते आल्यानंतरच माल पाठवावा, म्हणजे वेळीच उधारी काबूत ठेवता येईल.

( २ ) ग्राहकाचे बँकेकडे चौकशी केल्यास व अन्यत्र चौकशी केल्यास व ते ग्राहकाला समजल्यास तो ते कदाचित अविश्वास-दर्शक मानेल. सुरुवातीसच ग्राहकाला दुखवू नये असे म्हणणारे अनेक आहेत, तेव्हा त्याच्यासाठी दुसरा मार्ग म्हणजे आपल्या धंद्याशी त्याची वार्षिक उलाढाल.

नवीन ग्राहक आपल्या धंद्याशी संबंध जोडले जावेत म्हणून प्रथम व्यवस्थितपणे माल घेऊन वेळेवर पैसे देईल, त्या वेळी त्यांनी जो धंदा केला असेल तो प्रमाण मानून व त्याची सरासरी काढून त्या ग्राहकाची पत ठरवावी व त्यापुढे उधारी जाऊ देऊ नये. ग्राहकाची विक्रीविभागात घसट वाढली की तो मालासाठी ऑर्डरी पाठवत राहील, मात्र पैसे पाठविण्यास विलंब लावेल व कारणे देत बसेल. आपली ओळख जास्त जवळची झाल्याने आपण ढिलाई करू, त्याचा फायदा ग्राहक निश्चितच घेईल व उधारी अनियंत्रित होऊ लागेल. तेव्हा ओळखीपेक्षा धंदा वा व्यवहाराला प्राधान्य द्यावे.

( ३ ) मोठमोठ्या उद्योगधंद्यांत पत-व्यवहारासाठी वसुली खाते असते.

उद्योगधंदा मोठा असेल तर त्याप्रमाणात उधारीही मोठी असते, ती वेळच्यावेळी वसूल करण्यासाठी दक्ष उद्योगधंदेवाईक वसुली विभाग तयार करतात. त्याचेकडे वसुलीविषयक कारभार सोपवतात, त्यामुळे विक्री विभागावर कामाचा ताणही कमी पडतो व विक्री करणाऱ्याची ह्या कटू व कटकटीच्या कामापासून सुटका होते. ग्राहकाची पत ठरविणे, माल रोखणे, वसुली करणे व वेळप्रसंगी कायद्याचा आधार घेऊन वसुली करणे, इत्यादी कामे ह्या विभागाकडे असतात.

सर्वसाधारण मुदत जर ३० दिवसांची ठरली असेल तर त्या सुमारास ग्राहकाकडे मुदतीत ठरलेली बिले घेऊन वसुली कार-कुनाला पाठवले जाते. बिले न घेऊन जाता मोघम पैसे मागावयास गेल्यास काहीही काम न होता त्याला परत यावे लागते. परत करावयाचा खराब माल, कमीजास्त पाठविलेला माल वा इतर बिलासंबंधी काही दुरुस्त्या प्रत्यक्ष गेल्याने कळतात व त्या वेळच्यावेळी दुरुस्त केल्या तर उधारी लवकर वसूल होतेच, शिवाय उधारी खरोखरीच किती आहे ह्याची शहानिशा होते. ग्राहकांची संख्या मोठी असल्यास दरमहा प्रत्येक ग्राहकाला त्याचे हिशोब-स्मरणपत्र पाठविणे हिशोब खात्याला कठीण होते व अशा स्मरणपत्रांना दादही मिळत नाही. म्हणून प्रत्यक्ष वसुलीला जाणे हे जास्त संयुक्तिक व फायदेशीर ठरते काही संस्था वसुली लवकर होण्यासाठी ग्राहकाला व वसुली कारकुनाला सूट व बक्षिशी देतात. बक्षिसाच्या आशेने वसुली कारकून वारंवार जाऊन वसुली करतो तर मिळणारी सूट हिशोबात धरून ग्राहकही लवकर पैसे देतो.

( ४ ) सर्वच माल उद्योगधंद्याजवळील भागात पुरविला जात नाही तर तो सर्व देशभर जातो. अशा वेळी वसुलीचे हे शास्त्र कितपत उपयोगी वा खर्चाचे पडेल.

प्रत्यक्ष वसुलीला जाणे हे उद्योगधंद्याच्या जवळील भागात वा ज्या भागात उधारी जास्त आहे तेथे निश्चितच फायद्याचे ठरेल. परंतु, जेव्हा देशातील कानाकोपऱ्यांत माल जातो तेव्हा लांबच्या ठिकाणी व एखाद्‌दुसऱ्या ग्राहकाकडे जाणे तोट्याचे ठरेल. पुण्या-मुंबईकडील संस्थेने आसाममध्ये समजा रु. २,००० चा माल पाठविला आहे व बरेच महिने पैसे आले नाहीत तर प्रत्यक्ष वसुलीला मनुष्य पाठविणे मालाच्या किमतीएवढेच खर्चाचे होईल, शिवाय वसुली झाली नाही तर तोट्याचे होईल.

देशातील कानाकोपऱ्यांत जेव्हा माल पाठविला जातो तो एखाद्या वाहतूक करणाऱ्या संस्थेमार्फत पाठविला जातो व अशी संस्था माल पाठविण्यासंबंधी रसीद देते. अशी रसीद-बील चलनासोबत ग्राहकाचे बँकेमार्फत पाठविल्यास आपणांस मालाचे पैसे मिळतात. सर्वसाधारणपणे वाहतूक संस्था जी रसीद देते ती आपले नावे ( self ) करून घ्यावी म्हणजे ती रसीद सोडवून घेतल्याशिवाय ग्राहकास मालच मिळत नाही. बँकेमार्फत बिल पाठविण्याचे दोन प्रकार आहेत. ग्राहक माहितीचा असेल व त्याला ३० दिवसांच्या उधारीने माल द्यावयाचा असेल तर ३० दिवसांच्या हुंडीने रसीद बँकेकडे पाठवावी, म्हणजे ग्राहक रसिदीचा माल सोडवून घेतो व ठरल्या वेळी बँकेत पैसे भरतो. नवा ग्राहक असेल तर त्याला रसीद सोडविण्यासाठी पैसे भरूनच परवानगी द्यावी ( on presentation ) म्हणजे मालाचे पैसे तावडतोब मिळतात. अर्थात बँकांमार्फत पाठवलेली बिले ग्राहकाने वेळच्या वेळी सोडवून घेतली किंवा नाही ह्याकडे लक्ष असावे लागते. वेळीच स्मरणपत्र पाठवावे किंवा वेळप्रसंगी मालही परत मागवावा लागतो. काही उद्योगसंस्था लांबच्या ग्राहकाकडून काही आगाऊ रक्कम घेतात. ग्राहकाने बँकेमार्फत पाठवलेली रसीद सोडवून घेतली नाही तर तो परत मागविण्यासाठी येणारा खर्च व बँकेच्या सेवेसाठी होणारा खर्च, त्यापोटी हे पैसे आगाऊ घेतलेले असतात व ही पद्धत अत्यंत उपयुक्त ठरते.

आतापर्यंत आपण ग्राहकाला उधारीपासून कसे व कोठे रोखावे ह्याचा विचार केला. पण ह्या सर्व क्रिया सुसंघटित व सातत्याने

ग्राम — डिप्रो

फोन नं. ९७११६

## दत्तात्रय इंडस्ट्रीज प्रा. लि.

नवीन फॅक्टरी व ऑफिस : पुणे सातारा रोड, पुणे ९.

जुनी फॅक्टरी : १४८ कसबा पेठ, पुणे २२.

ही दिवाळी आमच्या ग्राहकांस व हितचिंतकांस,

आनंदाची आणि सुखसमृद्धीची जावो.

विविध प्रकारच्या कापडाच्या ' क्वालिटी ' व ' गॅरेंटी ' मुळे,

सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेले पुण्यातील अग्रेसर कापड दुकान

## ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स

' होम ऑफ क्वालिटी ॲण्ड व्हरायटी '

पेरुगेट रोड, पुणे ३०. (फोन नं. ५७३१८)

[ स्थापना १९२१ ]

## गरगट्टी अँड सन्स

फोन नं. ३१६ ] शहापूर–बेळगाव [ तार : ग्रास इस्त्री

धोबी, फॅमिली व शिंपी पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे देशबांधवांस हे वर्ष सुखाचे जावो !

होण्यासाठी औद्योगिक संस्थेने आपली अंतर्गत व्यवस्था निरनिराळ्या विभागांमार्फत परस्पर साहाय्याने कशी ठेवावी हे पाहू या :

( अ ) विक्री विभागाने ग्राहकाशी पत्रोत्तर करून वा प्रत्यक्ष जाऊन आर्डरी आणाव्यात व आलेल्या ऑर्डरला लेखी पोच पाठवावी ( Order Acceptance ). त्यावेळी त्यांनी खालील मुद्द्यांचा विचार केलेला असावा—

( १ ) ग्राहकाचे नांव, पत्ता व ऑर्डर क्रमांक

( २ ) ग्राहकाच्या बँकेचा संपूर्ण पत्ता

( ३ ) माल पाठविण्यासंबंधीच्या सूचना

( ४ ) पैसे पाठविण्यासंबंधीच्या सूचना व मुदत

( ५ ) मालाचे मूल्य, विक्री व इतर कर

( ६ ) वितरक दुसऱ्याला माल पाठवत असेल तर त्याचे नाव, पत्ता व वितरकाचे कमिशन, इत्यादीविषयी सूचना.

( ७ ) विशेष सूचना

वरील सर्व माहिती संपूर्ण संदर्भासह असावी. ग्राहकास, पत व्यवहार विभागास, भांडार विभागास, हिशोब विभागास कोणत्याही गैरसमजुतीस त्यामुळे वाव ठेवू नये. नीट माहिती न मिळाल्याने निरनिराळ्या प्रकारच्या चुका होतात व त्यामुळे पैसे मिळण्यास विलंब लागतो. त्रास व पैसेवसुलीस जादा खटपटी कराव्या लागतात त्या वेगळ्याच !

ग्राहकाचा पत्ता व नाव नीट नसेल तर बिल व माल दुसरीकडेच जातो. एखाद्या वितरकाचे बिल दुसऱ्या वितरकास जाऊन, कमिशन वेगवेगळे असल्यास त्याबद्दल तक्रारी होतात. नाव व पत्ता नीट न लिहिल्याचे एक उदाहरण म्हणजे एकाच गावात भारत स्टेशनरी मार्ट व न्यू भारत स्टेशनरी मार्ट अशी दोन दुकाने होती. माल न्यू भारत स्टेशनरी मार्टला पाठवावयाचा होता. भारत स्टेशनरी मार्टने वेळेवर पैसे न दिल्याने त्याचे वितरकत्व रद्द झालेले होते. पण ऑर्डरपोच पाठविताना ' न्यू ' हा शब्द घातलाच नाही, माल व बिल भारत स्टेशनरी मार्टकडे गेले.

मालाचे मूल्य व करविषयक पूर्ण माहिती पोच पाठविताना दिलेली असावी. ग्राहकाने जर मूल्य निश्चित केलेले नसेल तर मालच पाठवू नये हे उत्तम, नाही तर मग ग्राहक देईल ते पैसे घेऊन नुकसान स्वीकारावे लागते. करामध्ये दरवर्षी सरकार फेरबदल करते, त्यामुळे कर हे नेहमी प्रत्यक्ष मालाची पाठवणी होईल त्या वेळी जे प्रचलित असतील ते आकारण्याची प्रथा ठेवावी व तसे पोचपावतीमध्ये नमूद केलेले असावे. ऑर्डरमध्ये कर जर पक्के लिहिले असतील तर तेवढेच ग्राहक देईल व त्यामुळे करापायीही तोटा होईल. ग्राहक जेव्हा सरकारी संस्था असतात तेव्हा अशा तऱ्हेचे तोटे हमखास अनुभवास येतात.


बँकेचा पूर्ण पत्ता व नाव दिलेले असावे. उदाहरणादाखल प्रत्यक्ष अनुभवच देतो. पोच पावतीवर ग्राहकाच्या बँकेचा पत्ता बँक ऑफ इंडिया, नांदेड असे लिहिले होते, त्याप्रमाणे चलन व बिल पाठवण्यात आले. काही दिवसांनी ते कोणी घेत नाही म्हणून परत आले. चौकशी करता बँकेचा पत्ता स्टेट बँक ऑफ इंडिया, नांदेड आहे असे समजले म्हणून पुन्हा पाठविले. पुन्हा काही दिवसांनी ते परत आले. मग कसून चौकशी केली तेव्हा समजले की स्टेट बँक ऑफ हैदराबाद असे पाहिजे होते. एवढ्या सर्व गोंधळात बरेच दिवस निघून गेल्याने ग्राहकाचे बँकेवर माल पाठवूनही त्याने सोडवून घेतला नाही कारण डिमरेज बरेच झाले होते. सांगा, नुकसान कोणाचे झाले ?

बारीकसारीक गोष्टींकडे दुर्लक्ष होते, परंतु त्याचा फटका काही वेळा मोठा बसतो. म्हणून ऑर्डरची पोच देताना विक्री विभागाने ग्राहकाची ऑर्डर नीट, चिकित्सेने तपासून पोच द्यावी.

( ब ) भांडार विभाग—उत्पादन होऊन आलेला माल ताब्यात घेणे व पाठविण्यालायक पॅकिंग करून तो सत्वर वाहतूक संस्थेच्या ताब्यात देणे व त्याची पोच-रसीद चलनासह विक्री हिशोब खात्यास देणे, ही ह्या विभागाची कामे होत. पक्का माल ग्राहकापरत्वे एकत्र ठेवावा किंवा तयार माल ऑर्डरप्रमाणे काढावा. कोणत्याही बाबतीत कमीजास्त माल काढू नये-किंवा तसा पाठवावयाचा असल्यास विक्री विभागाची परवानगी घेतलेली असावी. निरनिराळ्या ग्राहकांकडे पाठवावयाचा माल योजना करून वा वार ठरवून पाठविल्यास एकदम जाऊ शकतो व त्यामुळे वाहतूक खर्च, चलन, बिल व माणसाचा वेळही वाचतो महिन्याचा कोटा ठरला असेल तर तो शक्यतो एकदम पाठवावा. दररोज थोडाथोडा माल पाठविला तर देणाऱ्या-घेणाऱ्याला त्रास होतो व चलनांची संख्या विनाकारण वाढत राहते. प्रत्येक चलनास बिल करावयाचे असल्यास बिलांची संख्याही वाढते. काही उद्योगसंस्थांना दररोज विक्री किती झाली हे उच्च अधिकाऱ्यांना कळवावे लागते. म्हणून दररोज आलेला माल ते सत्वर पाठविण्याच्या मागे असतात. पण ह्या पद्धतीमुळे अशा औद्योगिक संस्था आपलेच नाना प्रकारे नुकसान करून घेत असतात. ऑर्डरप्रमाणे पक्का माल एका वेळेत उत्पादन करता येणार नसेल तर अशा औद्योगिक संस्थांनी रोजच्या रोज विक्री हिशोबाची पद्धत बदलून आठवड्याची विक्री हिशोबाची पद्धत ठेवावी. त्यामुळे चलनांची, बिलांची तर संख्या कमी होईलच त्याशिवाय वाहतूक संस्थेला नियोजन करून बोलविल्यास माल एकदम व भरपूर पाठविता येईल व ग्राहकापरत्वे माल काढण्यास भांडार विभागास सवडही मिळू शकेल.

अबक कंपनीने १०,००० नगांची ऑर्डर पाठवली व दरमहा १,००० नग पाठविण्यास सांगितले. प्रत्येक नगाची किंमत ५० पैसे होती. भांडार विभागात माल आला की पाठवा ह्या सूचने-

"भिडे" ओव्हर पिक
पॉवर लूम्स ५६, "६०" व ६४"



भिडे ॲन्ड सन्स प्रा. लि;
—सांगली—

फोन नं. २०६९

रघुनाथराव भिडे
कार्यकारी संचालक



बँकेच्या धनवर्धिनी ठेव योजनेतील एक योजना
निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना
डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर
असे आपण कोणतेही व्यवसायीक असा
निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.


दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय चिरमुले निकेतन, राजपथ सातारा. | शेड्युल्ड बँक


महाराष्ट्रात सर्वत्र शाखा

★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★

विजय पंपस् कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,
त्यांस "विजय" पंपाची
आवश्यकता आहेच.



कारखानदार—
फोन : २३२
तार : Vijayplow

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग—सांगली ( महाराष्ट्र )

मुळे, कधी १० नग तर कधी ५० नग असे करीत महिन्यात १,००० नग पाठवले गेले. वरील ग्राहकाला प्रत्येक चलनामागे बिल हवे होते. त्यामुळे चलनांची व बिलांची संख्या वाढली. मोठ्या उद्योगसंस्थेत हिशोब-खात्याचा पगार, स्टेशनरीवरील खर्च व इतर खर्चाचा बोजा विचारात घेता बिल बनविण्याची किंमत ५/७ रु. होते. १० नग पाठविलेल्या चलनाच्या बिलाची किंमत ५ रु. + कर व बिल बनविण्याची किंमत ५/७ रु. तेव्हा तोटा कोणाचा झाला ? ग्राहकाने महिन्याला हजार नग मागितले होते, दररोज काहीतरी पाठवा असे कळविले नव्हते; मग एकत्र हजार नग पाठविता आले नसते का ?

मालाचे वर्णन ऑर्डरबरहुकूम असावे. नग, त्याचे वजन, वाहतूक संस्थेचे नाव, ग्राहकाचा संपूर्ण पत्ता व नाव, वाहतूक खर्च हे चलनावर व्यवस्थित लिहिलेले असावे, की ज्या योगे बिलविभागास पुढील काम करणे सोपे जाईल.

(क) हिशेब विभाग — विक्री विभागाकडून आलेली ऑर्डर-पोच-प्रत व भांडाराकडून आलेले चलन व वाहतूक रसीद ह्यांच्या साहाय्याने विक्री-हिशोब विभाग बिल बनविते. बिल बनवणे, ग्राहकाचा हिशोब लिहिणे, दरमहा ग्राहकास हिशेब कळविणे व त्यानंतर आलेले पैसे योग्य खाती जमा करणे व त्याची पोच-पावती ग्राहकास पाठविणे, क्रेडिट/डेबिट नोट देणे, ही विक्री-हिशोब खात्याची कामे होत.

विक्री-हिशोब खाते हे विक्री विभागाचे एक उपांग आहे. हिशोबाची सांगता करण्यापुरता त्याचा कंपनी-हिशोब खात्याशी संबंध असतो वा असावा. विक्री विभागाने आखून दिलेल्या तत्त्वांनुसार विक्री-हिशोब खात्याचे काम असल्यामुळे, हे खाते कोणत्याही प्रकारे स्वयंभू काम करू शकत नाही. आकडेमोडीत ज्या चुका होतील वा विक्री विभागाने दिलेल्या सूचनांचे बरोबर पालन न झाल्यामुळे चुका होतील त्याचाच विचार ह्या खात्या-पुरता होऊ शकेल. रोजच्यारोज हिशोब लिहिणे, दरमहा ठराविक वेळी ग्राहकाला हिशोब पाठविणे व वसुलीच्या कामात विक्री-विभागाला किंवा पत-व्यवहार विभागाला साहाय्य करणे ही कामे वेळेवर होऊ शकत नाहीत अशी सदैव तक्रार ऐकू येते.

पत-व्यवहार नियंत्रण व त्या अनुषंगाने उद्योग संस्थेतील निरनिराळ्या विभागांचा समन्वय साधण्याचा वर प्रयत्न केला आहे. कदाचित उद्योगधंद्याच्या स्वरूपानुसार निरनिराळ्या पद्धती असू शकतील, काही ठिकाणी अंतर्गत विभाग एकत्र केलेले असतील, तर काही ठिकाणी त्याचा विस्तार मोठा असेल. प्रस्तुत लेखाचा उद्देश ग्राहकाकडून निरनिराळ्या माध्यमाचा उपयोग करून वेळच्या वेळी वसुली कशी होईल की ज्यामुळे आपल्या उद्योगसंस्थांना स्वनिर्मित पैशांवर (self-generated) सहज सुलभतेने जगता यावे हा आहे. ●

### रशिअन हॉटेलमधील वेटर्स चलाख झाले:

रशिआत जाऊन आलेल्या परदेशीय प्रवाशांचा अनुभव असा आहे की तेथील वेटर्स अगदी संथपणे काम करीत असतात. त्यामुळे परदेशी प्रवासी अगदी कंटाळून जातात. ह्या मंदगतीवर काही उपाय आजपर्यंत सापडलेला नव्हता. आता मात्र मॉस्कोतील एका बड्या हॉटेलमध्ये नवा अनुभव येऊ लागल्याचे प्रवासी सांगतात. ही किमया कशी घडून आली ? रशिआत वेटर्सना बक्षीस देण्याची पद्धत नव्हती. पण ह्या हॉटेलच्या मॅनेजरने ती सुरू केली आहे. खाद्यपदार्थांच्या बिलापोटी ५ टक्के बक्षिसीची आकारणी करण्यात येते. ह्या रकमेपैकी काही पैसे वेटर्सना देण्यात येतात आणि काही आचाऱ्यांना देण्यात येतात. हॉटेल मॅनेजरचे म्हणणे असे की ग्राहकांना सेवा त्वरित मिळाली पाहिजे आणि रोज जवळजवळ ३० मैल चालणाऱ्या व ३ टन अन्नपदार्थ वाहणाऱ्या वेटर्सनाही पैशाच्या रूपाने उत्तेजन मिळाले पाहिजे.

### वारसाहक्काने लक्षाधीश झालेले कुत्रे

अमेरिकेतील एका श्रीमंत बाईने मृत्युपत्राने आपली ४० लाख किमतीची मालमत्ता पाळलेल्या कुत्र्याच्या मालकीची केली होती. मृत्युपत्राबाबत वाद माजून तो कोर्टात गेला. कोर्टाने मृत्युपत्राने कुत्र्यांना वारस ठरविण्याचा बाईचा हक्क मान्य केला. फक्त २० लाख डॉलर्सची मालमत्ता बाईच्या नातेवाईकांना दिली. आता हे लक्षाधीश कुत्रे मजेत आहे.


"अर्थ"च्या दीपावली अंकास आमच्या शुभेच्छा

सुकडो इंडस्ट्रिअल

सुकडो एजन्सी

सुकडो अँड कंपनी

सुकडो दिवाला अँड कंपनी

सुकडो बिल्डिंग, मडगाव—गोवा



**"अर्थ"चा पुढील अंक दि. २१ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होईल**

दिवाळीनिमित्त नेहमीप्रमाणे दिवाळीनंतरचा, ७ नोव्हेंबरचा अंक बंद राहील, ह्याची कृपया नोंद घ्यावी.

व्यवस्थापक

**IMPORT SUBSTITUTE**

**GADRE KEYS**



ALL TYPES AS PER SPECIFICATION

**GADRE BROTHERS** MADHAVNAGAR (MAHARASHTRA)
PHONE NO. 2318 GRAM: "SEWA"




सोल सेलींग अेजन्टस्

**नोगी सेल्स् कॉर्पोरेशन**

१७० जगन्नाथ शंकरशेठ रोड, मुंबई ४. बी आर.

MARATHI

दीपावली अभिष्टचिंतन

# दि कोल्हापूर केन शुगर वर्क्स लिमिटेड

कसबा बावडा, कोल्हापूर ६

**प्रत्येक कुटुंबाच्या आवडीची शुभ्र दाणेदार, गोड साखर निर्माण करणारा भारतातील एक प्रमुख अद्ययावत कारखाना.**

# सरदारगृह

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

**मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.**

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :-२८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

# रोमारोमांत भिनलेला भ्रष्टाचाराचा रोग

## सचोटी, प्रामाणिकपणा आणखी हास्यास्पद ठरण्यापूर्वी उपाययोजना हवी

'इकॉनामिक टाइम्स' ह्या वृत्तपत्रात अलीकडे एक बातमी प्रसिद्ध झाली होती. तिचे शीर्षक होते 'हात ओले करणे ही बाब अगदी मामुली झाली आहे.' छोट्या उद्योगधंदेवाल्यांची कशी दयनीय अवस्था होते त्याबद्दल लिहिताना बातमीत असे म्हटले होते की त्यांचा कारखाना उभा राहण्यापूर्वीच पैशाचे वंगण घालण्याची अनिवार्यता उत्पन्न होते आणि माल बाजारात पोचेपर्यंत व त्यानंतर कारखाना चालू ठेवण्यासाठी ही वंगणाची जरूर चालू राहते. बातमीत पुढे कोणकोणत्या टप्प्यांत कसकसे वंगण द्यावे लागते त्याची तपशीलवार माहिती देण्यात आली होती. माणसाने संघटित समाजरचना बनविली तेव्हापासूनच बहुधा भ्रष्टाचार सुरू झाला असावा. एखाद्या कालखंडातील भ्रष्टाचाराचा आलेख काढला तर तो बहुधा किमतींच्या आलेखासारखा दिसेल. आलेखातील उच्चबिंदू कधी कधी शिखरापर्यंत पोचतो तर कधी कधी तो जरा आवाक्यात आल्यासारखा दिसतो. सार्वजनिक कारभाराची गुणवत्ता आणि भ्रष्टाचार ह्यांच्यातील नाते कदाचित व्यस्त प्रमाणासारखे असावे. 'अर्थशास्त्र' हा कौटिल्याचा ग्रंथ ख्रिस्तशतकापूर्वी तिसऱ्या शतकाच्या आरंभी रचण्यात आलेला असावा असा अभ्यासकांचा कयास आहे. त्या वेळच्या प्राचीन भारतात न्यायखात्यातही भ्रष्टाचार होताच; परंतु न्यायाधीशांच्या वागणुकीची तत्त्वे फार उच्च पातळीवर राखण्यात आलेली होती. लांचलुचपतीला वाव मिळू नये म्हणून फिर्यादीचा निकाल लागेपर्यंत न्यायाधीश आणि वादी-प्रतिवादी ह्यांनी एकमेकांची खाजगी भेट घेऊ नये असा दंडक घालण्यात आला होता. अर्थशास्त्रात असा सल्ला देण्यात आलेला आहे की न्यायाधीशांच्या प्रामाणिकपणाची कसोटी पारखण्यासाठी त्यांच्याकडे मधून मधून बनावट वादीप्रतिवादी पाठविण्यात यावे. विष्णुस्मृतीत असे सुचविण्यात आले आहे की ज्या न्यायाधीशावर लाच खाण्याचा अगर अन्यायाचा आरोप सिद्ध झाला असेल त्याची सर्व मालमत्ता हिरावून घेण्यात यावी आणि त्याला बहिष्कृत करण्यात यावे. ब्राह्मणाला देण्यात आलेली ही सर्वांत कठोर शिक्षा आहे. कौटिलीय काळानंतर लवकरच अशोकाचे धर्मराज्य सुरू झाले. ह्या राज्यात भ्रष्टाचार बहुधा अत्यल्प प्रमाणात असावा. कारण सम्राट अशोकाने आपल्या एका आज्ञेत असे म्हटले आहे, "सर्व लोकांच्या हितासाठी मला काम केले पाहिजे आणि ते साधण्यासाठी कामे झपाट्याने करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे" कामाचा उरक लवकर व्हावा म्हणून अशोकाने आपल्या अधिकाऱ्यांना दिवसा रात्री केव्हाही भेटण्याचा हुकूम देऊन ठेवलेला होता. आपल्या आज्ञेत सम्राट म्हणतात, "मी जेवत असलो, किंवा राण्यांच्या संगतीत असलो, किंवा शयनगृहात असलो, खाजगतीत असलो अगर प्रवासात असलो, बागेत असलो, तरी हा हुकूम पाळला पाहिजे" त्या काळात एखादा छोटा उद्योगधंदेवाला असता तर त्याला अगर इतर कोणालाही लाच देण्यासाठी बरोबर पैशाची थैली घेऊन फिरावे लागले नसते. हल्लीच्या राज्यात तत्परतेचा गौरव करण्यात येतो; पण वागणूक मात्र त्याविरुद्ध करण्यात येते.

### मोंगल साम्राज्यातील भ्रष्टाचार

मोगल साम्राज्य ऐन शिखरावर असताना सुद्धा भ्रष्टाचार खूप माजलेला होता. १६ व्या शतकाच्या अखेरच्या परिस्थितीबद्दल सर थॉमस रो लिहितो, "हिंदमधील लोक पाण्यातील माशासारखे जगतात. मोठे मासे लहानांना खातात. शेतकरी ग्रिगाऱ्याला नाडतो. सभ्य लोक शेतकऱ्याला नाडतात. मोठा छोट्याला नागवतो आणि अखेर राजा सर्वांनाच लुटतो." आग्रा येथील डच कारखान्याचा प्रमुख फ्रॅनसिको पेलसार्ट १६२६ मध्ये लिहितो, "गव्हर्नर, दरबारी, दिवाण, कोतवाल, बक्षी हे सर्वच सरकारी अधिकारी लोकांना छळतात. एखाद्या अधिकाऱ्याला एखादा मजूर पाहिजे असला तर मजुराला कामावर येण्याची इच्छा आहे की नाही ह्याची विचारणाही करण्यात येत नाही. त्याने कामावर येण्यासंबंधी काही खळखळ केली तर त्याला चांगला चोप देण्यात येतो. त्याला आपल्या घरातून अगर रस्त्यावरून सुद्धा पकडून नेण्यात येते. मग संध्याकाळी त्याला निमेशिमे वेतन देण्यात येते. कधीकधी तेही देण्यात येत नाही. भ्रष्टाचारापेक्षाही हे भयंकर आहे. कारण, सक्ती भोगणाऱ्याला पैशाला मुकावे लागतच असे; शिवाय वर चारदोन ठोसे मोबदल्यादाखल मिळत!

ईस्ट इंडिआ कंपनीच्या अमलाच्या सुरुवातीच्या काळात अनेक मुलकी आणि लष्करी अधिकाऱ्यांनी गैरमार्गाचा वापर करून संपत्ती मिळवली असावी आणि घरभरणी केली असावी. त्या काळात 'पॅगोडा झाड गदगदा हलविणे' असा वाक्प्रचारच रूढ झाला होता. त्याचा अर्थच भ्रष्टाचार, चोरी व बळजबरीने धन मिळविणे असा आहे. अशाच एका प्रकरणाच्या आधारावर 'साइन ऑफ दि फोर' ही शेरलॉक होम्सची गुप्तपोलिस कथा रचलेली आहे. तथापि ब्रिटिश बादशहाची राजवट सुरू झाल्यावर ह्या परिस्थितीत बरीच सुधारणा झाली असावी ब्रिटिश राजवटीने भ्रष्टाचार कमी करण्याचा प्रयत्न केला ह्यात शंका नाही. राज्यकारभारातील निदान वरिष्ठ अधिकाऱ्यांना पुरेसे पगार देऊन संपत्तीच्या मोहापासून व भ्रष्टाचारापासून दूर ठेवण्याची काळजी घेण्यात आली. इस्लिंगटन कमिशनने सरकारी अधिकाऱ्यांच्या

# दि कागल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

कागल, जिल्हा कोल्हापूर

स्थापना १९१७

दीपावली व नूतन वर्षानिमित्त आम्ही आमच्या ग्राहकांचे हार्दिक शुभ चिंतन करीत आहो.

| | | |
|---|---|---|
| वसूल भागभांडवल | रु. | १,४५,६८० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | २,५०,७५७ |
| सर्व प्रकारच्या ठेवी | रु. | २०,००,००० |
| कर्ज | रु. | १४,००,००० |
| खेळते भांडवल | रु. | २५,००,००० |

ऑडिट वर्ग 'अ'

सेफ डिपॉझिट लॉकरची सोय आहे. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एच. शिंदे, मॅनेजर — एस. डी. भरमकर, प्रेसिडेंट



# बार्शी सेंट्रल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., बार्शी

घोडे गल्ली, सोमवार पेठ, बार्शी (जि. सोलापूर)

दूरध्वनी बार्शी : २०२, वैराग : ४२ — स्थापना – १९०६ — शाखा वैराग (ता. बार्शी)

३० जून, १९७३ अखेरची स्थिती

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | २,७९,४७० |
| गंगाजळी | रु. | ४,६९,४५६ |
| ठेवी | रु. | २८,१६,११३ |
| गुंतवणूक | रु. | १०,५७,४२५ |
| खेळते भांडवल | रु. | ४१,७१,९६१ |

सर्व बँकिंगचे व्यवहार केले जातात.

ही दीपावली आमचे सभासद, खातेदार व हितचिंतकांस सुखाची व समृद्धीची जावो.

व. ह. उटगीकर, B. Com., मॅनेजर — म. पां. नारकर, व्हा. चेअरमन — म. ज. कुलकर्णी, चेअरमन



नुतन वर्ष व दीपावली आमच्या खातेदार, हितचिंतक व भागधारकांना सुखाचे व समृद्धीचे जावो.

सोलापूर जिल्ह्यातील मध्यम व कनिष्ठ वर्गाच्या समृद्धीसाठी गेल्या ४५ वर्षापासून झटणारी सोलापूरातील ज्येष्ठ व श्रेष्ठ नागरी सहकारी बँक.

# दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर

(प्रधान कार्यालय – २६९ दक्षिण कसबा, सोलापूर-२)

शाखा नं. (१) साखरपेठ, सोलापूर (२) अक्कलकोट

| | |
|---|---|
| अधिकृत व वसूल भाग भांडवल | रु. ५ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु ५ लाख, ९४ हजार |
| ठेवी | रु. ८० लाख |
| डिव्हिडंड | ९ टक्के |

* सोने, चांदी तारणावर दर तोळयास रु. २००/–कर्ज देण्याची खास सोय सोलापूर जिल्ह्यातील नगरवासियांसाठी केलेली आहे.
* बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

छ. ल. सिद्रम, मॅनेजर — गजाननराव रामचंद्र खडकीकर, चेअरमन

डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. ल. न. चिलेवरी व्हा. चे. | श्री. ग. रा. बाळी |
| श्री. पा. ह. कोत्तम | श्री. बा. द. आराध्ये |
| श्री. छ. गो. जानकर | श्री. ज. मा. शहा |
| श्री. म. सा. साळुंके | श्री. सि. आ. अच्युगटला |



दीपावली व नूतन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना, ठेवीदारांना व सभासदांना सुखाचे–समृद्धीचे जावो!

# दि बेळगाव पायोनिअर अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगाव

स्थापना : १९०६] [फोन : २१२

बेळगाव शहरातील सर्वांत जुनी सहकारी बँक

बँकेच्या सभासदांच्या, बँकेच्या ठेवीदारांच्या, बँकेच्या कर्जदारांच्या.

पसंतीची

कारण सहकारी कायद्यानुसार खास परवानगीनेच देता येणारा उच्चतम डिव्हिडंड देते म्हणून!

कारण शहरातील सर्व बँकांपेक्षा अधिक व्याज देते म्हणून!

कारण शहरातील इतर बँकांपेक्षा कमी व्याज आकारते म्हणून!

| | | |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | रु. | ६,००,०००|– |
| रिझर्व्ह फंड | रु. | ८,७०,०००|– |
| इतर फंड्स | रु. | ३,७२,३४०|– |
| इन्व्हेस्टमेंट्स | रु. | ८,२४,११४|– |
| ठेवी | रु. | ५८७१,५५०|– |

इ. स. १९७२–७३ ची उलाढाल रु. ४ कोटींचे वर

संचालक मंडळ

श्री. रामभाऊ भि. पोतदार, बी. ए. चेअरमन; श्री. राजाभाऊ शं. माने, बी. ए. (ऑ), एल. एल बी., व्हा. चेअरमन; श्री. बी. जे. देसाई, श्री. अजीत हरिभाऊ हेरवाडकर बी. कॉम. श्री. बी. टी. आनंदाचे, श्री. जी. व्ही कलघटगी श्री. पो. बी. शेरी, श्री. बी. ए. शहापुरकर, श्री. बी. बी. कग्गणगी

सुपरव्हिजन कमिटी

श्री. एस. टी. अनगोळ चेअरमन — श्री. व्ही. एस. कलघटगी — श्री. गंगाधर रामाप्पा शानभाग

पगाराबाबत तत्त्व ठरवून दिले. ते असे : "सरकारी नोकरीसाठी योग्य त्या दर्जाचे उमेदवार मिळावे म्हणून सरकारने आपल्या नोकरांना इतके वेतन दिले पाहिजे की त्यांना सुखाने व मानाने जगता येऊन मोह टाळता आला पाहिजे." सेक्रेटरी ऑफ स्टेट-कडून नेमणूक होणाऱ्या नोकरात भ्रष्टाचार जवळजवळ नव्हताच म्हटले तरी चालेल, परंतु तेथून खालच्या पातळीवरील नोकरांच्या थराकडे येऊ लागले की भ्रष्टाचार वाढत चालल्याचे दिसते. बरेच कनिष्ठ सरकारी नोकर लाचलुचपतीला बळी पडणारे होते. त्यात पोलिस सब-इन्स्पेक्टर, सब-रजिस्ट्रार, सब-मॅजिस्ट्रेट, अशासारखे अधिकारी असत. तथापि, त्यांच्यातही बरेचजण वरिष्ठ दर्जाच्या सरकारी नोकरांचे अनुकरण करून गरजवंत व गरीब असताही मोहापासून दूर राहिले त्या वेळच्या ब्रिटिश सरकारचे धोरण लोकजीवनाला स्वातंत्र्य देण्याचे असल्याने भ्रष्टाचाराची व्याप्ती कमी राखण्यास मदत झाली ह्यांत शंका नाही. सरकार फक्त शेतसारा वसूल करी, कायदा व सुव्यवस्था राखी आणि मर्यादित साधनांच्या अंदाजपत्रकाला झेपतील अशी सार्वजनिक स्वरूपाची कामे करी.

## भ्रष्टाचाराला मंदीचा तडाखा

दुसरे महायुद्ध सुरू होण्याच्या पूर्वीचा काळही स्वास्थ्याचा नव्हता कारण ह्याच काळात सर्व जग आर्थिक अरिष्टाच्या पकडीत सापडलेले होते; किमती गडगडल्या होत्या आणि पैसा दिसेनासा झाला होता. ज्यांना नोकऱ्या टिकवून धरण्याचे भाग्य लाभले त्यांनाही पगारातील कपातीला तोंड द्यावे लागत होते. लोकां-जवळ पैसा नव्हता. देण्यासाठी तर नव्हताच नव्हता. भ्रष्टाचाराच्या बाबतीत प्रांताप्रांतात कमी अधिकपणा अर्थातच होता. उत्तर भारतामधील काही प्रांतांचा ह्या बाबतीत बराच वरचा क्रमांक लागत असे. दक्षिण भारतात त्या मानाने भ्रष्टाचार कमी होता. ग्रामीण भागात फिरणारे कनिष्ठ सरकारी नोकर बहुधा त्यांना पुरविलेल्या वस्तूंची बिले देत नसत; किंवा कमी देत असत. तथापि, तक्रारी फारशा येत नसत. राजपत्रित अधिकाऱ्यांच्या बाबतीत प्रत्यक्ष लाचलुचपतीची प्रकरणे क्वचितच उघडकीस येत. उघडकीस आलेल्या प्रकरणांत वरिष्ठ अधिकाऱ्यांना कारवाई करावीच लागे. त्यामुळे खालचे अधिकारी दबून असत. त्यांना अटकेची व खटल्याची भीती वाटत असे. नबाबी डामडौलात राहणारे लोक समृद्ध राज्यात असत. ह्या प्रांतातून भ्रष्टाचाराचे प्रमाण अधिक असे. तरीसुद्धा काही देशी संस्थानांतून त्याचे जे प्रकार चालत त्या मानाने भ्रष्टाचारग्रस्त प्रांतातील प्रकार काहीच नव्हते. एकदा ब्रिटिश हद्दीतील एक साह्यक सुपरिटेंडेंट ऑफ पोलिस काही कामासाठी जवळच्या संस्थानी हद्दीतील सर्कल इन्स्पेक्टरकडे गेला. त्याची थाटामाटाची राहणी पाहून तो थक्क झाला. जवळपास २०० रुपये मासिक वेतन मिळविणाऱ्याला ही राहणी कशी परवडते ह्याचे त्याला आश्चर्य वाटून राहिले होते.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनपूर्वक विकासाचे युग सुरू झाले; आणि त्याचबरोबर भ्रष्टाचाराच्या आघाड्या चौखूर उधळल्या. भ्रष्टाचाराचे स्वरूपच असे आहे की त्याच्या व्याप्ती-बद्दल आणि प्रकाराबद्दल पद्धतशीर माहिती मिळत नाही, पण तो मोठ्या प्रमाणावर पसरला आहे ह्यात शंका नाही. मध्यवर्ती सरकार आणि राज्यसरकारे मधूनमधून भ्रष्टाचार आणि लाचलुच-पतीसाठी पकडण्यात आलेल्या, खटले भरण्यात आलेल्या अगर शिक्षा झालेल्या अधिकाऱ्यांच्या याद्या प्रसिद्ध करीत असतात. ह्या याद्यांतील नोकरांची संख्या बरीच असली तरी सरकारी नोकरांत बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचे अल्पसे प्रतिबिंबच काय ते त्यामुळे व्यक्त होते. तरीसुद्धा ह्या याद्या लक्षात भरण्यासारख्या असतात. सरकारी खात्याचे चिटणीस, कमिशनर्स, खातेप्रमुख, मुख्य एन्जिनिअर्स, असे मोठे अधिकारीही त्यात असतात. छोटे अधिकारी तर असतातच. कधीकधी मंत्री अगर माजी मंत्री ह्यांच्या विरुद्धची प्रकरणे उजेडात येतात. खास कमिशन अगर कमिट्यांनी ह्यांच्या विरुद्ध सकृद्दर्शनी पुरावा गोळा केलेला असतो. परंतु अशा चौकशीपोटी जे निष्कर्ष काढण्यात आलेले असतात त्याचा फारसा परिणाम होत नाही. कारण चौकशा लांबत जातात आणि त्यांतून काहीच निष्पन्न होत नाही. खरे तर भ्रष्टाचाराच्या राक्षसाची अनंत रूपे अजून दिसलेलीच नाहीत. समाजाला जडलेल्या ह्या रोगाची पुसटशी कल्पना येण्यापुरतीच माहिती उजेडात येते. सुयंत्र राज्यकारभार उखडून टाकून सर्वत्र अराजक निर्माण करणारा हा रोग असला तरी तो मोठा चलाख आहे, सहजासहजी तर राहोच पण जोराचे प्रयत्न करूनही तो हाती लागत नाही. म्हणून भ्रष्टाचाराची काही अनुभवसिद्ध उदाहरणे पाहाणेच उपयुक्त होईल. काही उदाहरणे मोठ्या प्रकरणाची आहेत तर काही 'बक्षिसी' स्वीकारल्या-सारखी किरकोळ आहेत. परंतु सार्वजनिक जीवनात आढळून येणाऱ्या गैरप्रकारांचे नमुनेच त्यातून दिसून येतात. आणि ह्या गैर-प्रकाराविरुद्ध सामान्य नागरिकाला काहीही उपाय करता येत नाही.

(१) एक 'क्ष' गृहस्थ परदेशातून येताना ज्या वस्तूंवर जकात द्यावी लागते अशा बऱ्याच वस्तू खरेदी करतात. काही ते बरोबर आणतात आणि काही बोटींनी पाठवितात. बरोबर आणलेल्या वस्तूंवरील ८०० रुपयांची पूर्ण जकात ते भरतात. बोटींनी येणाऱ्या मालाचा ताबा घेण्यासाठी ते आपल्या मित्राला सांगतात व त्यावरील जकात भरण्यासाठी त्याच्याकडे २ हजार रुपये धाडतात. त्यांचा मित्र हुषार असतो. तो फक्त ५०० रुपये वापरतो व बाकीचे परत करतो. 'क्ष' गृहस्थांना आश्चर्य वाटते. तेव्हा त्यांचा मित्र कळवतो की कस्टम्सच्या अधिकाऱ्याला १०० रुपये दिले व ४०० रुपये जकात भरली. बंदरातील चालू पद्धतीला धरूनच सर्व व्यवहार करण्यात आला आहे.

(२) 'क्ष' गृहस्थ एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या व उद्योग-पतीच्या विश्वासातील आहेत. उद्योगपतीचे अनेक कारखाने

आहेत. एक वजनदार मंत्री त्यांच्याकडे पक्षाच्या निधीसाठी मोठी रक्कम मागतात; आणि तीही १० रुपयांच्या नोटांत. १०० रुपयांच्या नोटा घेण्याची मंत्र्यांची तयारी नसते. कारण, त्यांचा छडा लावणे सोपे असते.

(३) पुढे ह्या 'क्ष' गृहस्थांच्या मालकाचे व त्या मंत्र्याचे बिनसते. लगेच त्याच्या धंद्यात अनेक मोठ्या अडचणी उत्पन्न होतात. मालकाला सुप्रीम कोर्टाकडे मंत्र्यांच्या कारवाईविरुद्ध रीतसर दाद मागावी लागते. कोर्टात उद्योगपतीला योग्य तो न्याय मिळतो.

(४) ह्याच उद्योगपतीचा उत्तर भारतात एक कारखाना आहे. निवडणुका आल्या की स्थानिक मंत्र्यांच्या दडपणाखाली उद्योगपतीला आपल्या सर्व मोटारगाड्या, जीप्स, मालमोटारी पक्षाच्या दिमतीला द्याव्या लागतात. इतकेच काय, त्यांचे ड्रायव्हर्स पक्षासाठी राबतात. वाटेल तेवढे पेट्रोल गाड्यांत घातले जाते.

(५) 'क्ष' गृहस्थ एका बड्या कंपनीत नौकरी धरतात. मालकाचा त्यांच्यावर विश्वास असतो. कंपनीला आपल्या कारखान्यासाठी पोलादमालाची गरज असते. मालाचा तुटवडा असतो. परंतु "क्ष" गृहस्थांना मालकाकडून आणि पूर्वीच्या कागदपत्रांवरून असे दिसते की ज्या वेळी मालाची खूप टंचाई होती आणि त्याचे नियंत्रित वाटप करण्यात येत होते त्या वेळीही टनामागे ५० रुपये जास्त देऊन पोलाद कारखान्याकडून कंपनीला भरपूर पोलादी माल मिळाला होता. पुढे मालाची टंचाई कमी झाल्यावर लाचही बंद झाली. लगेच माल मिळण्याचे प्रमाण कमी झाले.

(६) एकदा 'क्ष' गृहस्थ कंपनीने भरलेल्या टेंडर्सचे काय झाले त्याची चौकशी करीत होते. तेव्हा त्यांना डायरेक्टराकडून कळले की टेंडर्स स्वीकारणारा एक बडा अधिकारी बोर्डाच्या चेअरमनकडे आला होता. त्याने चेअरमनला असे सांगितले की दुसऱ्या एका कंपनीने त्याला मोठी रक्कम देऊ केली आहे. 'क्ष' गृहस्थांची कंपनी काही देणार आहे काय? त्याची मागणी मोठी असल्यामुळे मान्य झाली नाही. परिणामी कंपनीचे टेंडर चांगले असतानाही नाकारले गेले.

(७) एका कंपनीची अनेक ठिकाणी विश्रांतिगृहे होती. कंपनीचे डायरेक्टर्स, अधिकारी, कधीकधी पाहुणे कामासाठी येत त्या वेळी त्या अतिथिगृहात उतरत असता कंपनीशी व्यवहार करणाऱ्या एका मंत्र्याने कंपनीकडे अशी विचारणा केली की तो आणि त्याचे कुटुंब महिन्या दीड महिन्यासाठी अतिथिगृहात उतरू शकेल काय? तशी व्यवस्था होईल काय? मंत्र्यांची विनंती मान्य करण्यात आली; आणि मंत्र्यांना घरापासून दूर अशा दुसऱ्या एका घराचा लाभ झाला.

(८) एका कंपनीला आपल्या मालाचा दर्जा प्रमाणित आहे की नाही ह्याची पाहणी करण्याकरता महत्त्वाच्या सरकारी अधिकाऱ्यांना आपल्या कारखान्यात बोलवावे लागते. ह्या अधिकाऱ्यांचा राहण्याचा खर्च तर कंपनीला करावा लागतोच; पण त्यांच्या विमानप्रवासाचा, जाण्यायेण्याचा खर्चही तिकिटांच्या रूपात द्यावा लागतो. ह्यात विशेष काही आहे असे समजले जात नाही.

(९) नवीन वर्षाच्या आरंभी बड्या सरकारी अधिकाऱ्यांना सदिच्छा पाठविण्याची पद्धत आहे. सदिच्छेबरोबरच आठवण म्हणून एखादे पार्कर पेन, घड्याळ, अशासारख्या वस्तू धाडल्या जातात. एखाद्या सरकारी अधिकाऱ्याकडे लग्न असले तर संबंधित कंपनी आपला एखादा प्रतिनिधी समारंभाला पाठविते. त्याच्यामार्फत साडीसारखी देणगी देण्यात येते. देणगीची किंमत अधिकाऱ्याच्या दर्जावरून ठरते.

(१०) एखाद्या कंपनीने एखादे कंत्राटी काम पुरे केले असेल तर त्याचे मूल्यमापन करणे बाजारात खरेदी केलेल्या एखाद्या वस्तूची किंमत ठरविण्याइतके सोपे नसते. कामाचे मोजमाप, विशिष्ट परिस्थितीत द्यावयाचा जादा दर, पुरविलेल्या मालाचा हिशेब, वजावट देण्याची पद्धत इत्यादी अनेक गुंतागुंतीचा विचार करावा लागतो. अखेरचे बिल पाठविणे व त्याची रक्कम वसूल करणे तर डोकेदुखीचेच काम असते. अशा वेळी योग्य माणसाचा हात ओला करण्याने काम लवकर होते. पण एखादी कंपनी लाच देण्यास तयार नसते. त्याऐवजी संबंधित अधिकाऱ्यावर वजन असणाऱ्या एखाद्या कमिशन एजंटाकडे काम सोपविले जाते. एजंट बिलाच्या रकमेतील काही टक्के पैसे अधिकाऱ्याला देऊ करतो व बिलाचे पैसे वसूल करतो. अधिकारी व एजंट ह्यांच्यातील देवघेवीबाबत कंपनीला काही रस नसतो. मंजूर रक्कम वसुल करण्यापुरतीच कंपनीला आस्था असते.

(११) कंपनीचा बडा अधिकारी आपल्या मालकाबरोबर कायदा व सुव्यवस्थेच्या बाबीवर चर्चा करण्यासाठी डेप्युटी पोलिस कमिशनरच्या कचेरीत जातो. कचेरीत शिरताना पाहाऱ्यावरील संत्री खडी ताजीम देतात आणि सलाम ठोकतात. परत जाताना अशीच सलामी देण्यात येते. अधिकारी व मालक आपला योग्य सन्मान झाला म्हणून खूष होतात व मालक संत्र्यांना कोऱ्या नोटा देतात.

(१२) कंपनीचा एखादा बडा अधिकारी आपल्या मालकाबरोबर सचिवालयात मंत्र्याला अगर वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याला भेटण्यास जातो. त्यांना पाहताच लिफ्टवाले व पट्टेवाले अदबीने लवतात. परतताना त्याचीच पुनरावृत्ती होते. मालकाला पोचविण्यास ते बाहेर येतात. लिफ्ट थांबविले जाते, दारे उघडली जातात; राजाला मुजरे करावे तसे करण्यात येतात. त्याचा मोबदला म्हणून काही कोऱ्या नोटा हस्तांतर करतात.

(१३) कंपनीचा मालक बड्या पाहुण्याच्या स्वागतासाठी विमानतळावर जातो. तेथील सर्व पोलीस सलामी देतात. लगेच

मालकाच्या मोटारीला विमानतळाच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळच जागा करून देण्यात येते. त्याच्या गाडीवर नजरही ठेवण्यात येते. परतताना पुन्हा खडी ताजीम दिली जाते, नोटांची देवघेव होते. मालकांना एकदा त्याच्या प्रमुख अधिकाऱ्याने विचारले, ही देवघेव केली नाही तर काय होईल? मालक उत्तरतात, पुढच्या खेपेस मोटर योग्य ठिकाणी उभी केली असताही पोलीसाकडून समन्स येईल.

(१४) एका अधिकाऱ्याला आपल्या जन्मतारखेचा दाखला मिळविण्यासाठी न्यायाधीशासमोर शपथ घ्यावयाची असते. त्याचा दुय्यम कोर्टात जातो. एका वकिलाला १० रुपये देऊन संबंधित अधिकारी त्याला चांगले माहीत असल्याचे त्याच्याकडून कोर्टापुढे वदवितो. मग न्यायाधीश त्याच्या प्रतिज्ञापत्रावर सही करतो. प्रतिज्ञापत्रावर कोर्टाचा शिक्का उठविण्यासाठी पट्टेवाल्याला २ रुपये द्यावे लागतात.

(१५) 'क्ष' गृहस्थानी एका नव्या इमारतीत मालकीचा फ्लॅट घेतला. इमारतीला पाण्याचा पुरवठा अपुरा आहे. त्याचे कारण नळीच बारीक आहे असे आढळते. म्युनिसिपल अधिकाऱ्यांकडे दाद मागितली जाते. नियमाप्रमाणे इमारतीसाठी दुसरा नळ देता येत नसतो. पण मॅनेजिंग कमिटीला नियमांना अपवाद कोणते आहेत, ते बरोबर माहीत असते. इमारतीतील कुटुंबांकडून १२ हजार रुपये भरण्यात येतात. 'क्ष' गृहस्थ आपल्या हिश्शाचे १५० रुपये भरतात. परिणाम लगेच दिसतो. दोन इंची नवीन नळ शक्य तितक्या लवकर जोडण्यात येतो. इमारतीला पाणी भरपूर मिळू लागते.

(१६) एक वकील आहेत. ५ लाख रुपयांच्या एका घराच्या खरेदीपत्रासाठी त्यांचा सल्ला घेण्यात येतो. विकत घेणारा व देणारा वकिलाला खरेदीपत्र तयार करण्यास सांगतात. मात्र खरेदीच्या किंमतीची जागा मोकळी ठेवण्यास सांगतात. खरेदीखत झाल्यावर वकिलाचा मेहताना देण्यासाठी संबंधित येतात. खरेदीखतात खरेदीची किंमत ३ लाख रुपये दाखविली होती. हे कसे काय घडले? ही सगळी सब-रजिस्ट्रारची करामत. त्यांनी फक्त ५,००० रुपयांत ही कामगिरी केलेली असते.

(१६) गृहस्थाची बदली होऊन ते दुसऱ्या गावी गेले, तेथे त्यांनी जागा भाड्याने घेतली. सामानाची लावालाव करतात तोच वीजबोर्डाचा माणूस विजेचे कनेक्शन तोडण्यासाठी येतो. घरमालकाने मागील पैसे भरलेले नसतात. 'क्ष' जवळ राहणाऱ्या एका मित्राकडे जातात व आपली अडचण सांगतात. मित्र हसतो, विजेचे काम करणाऱ्या कामगाराला बोलावून घेऊन त्याला ५ रुपये देतो. अर्थात काम होते.

(१८) 'क्ष' गृहस्थांना टेलिफोन एका खोलीतून दुसऱ्या खोलीत हलवावयाचा असतो. त्यासाठी ते खात्याकडे अर्ज करतात. तब्बल ६ आठवड्यानंतर कामगारांची एक तुकडी त्यांच्या घरी येते. तुकडीचा प्रमुख त्यांना एका बाजूला बोलावून सांगतो की टेलिफोन दुसऱ्या खोलीत बसविल्याचा रिपोर्ट दिला तर तुम्हांला ५० रुपये द्यावे लागतील. खोलीतच दुसरीकडे हलविल्याचा रिपोर्ट दिला तर २५ रुपये द्यावे लागतील. ह्या सर्व प्रकाराने चिडून 'क्ष' म्हणतात कोठलाही रिपोर्ट द्या. त्यांना ५० रुपयांचा भुर्दंड बसतो.

(१९) राज्यसरकाच्या नोकरीतील एक वरिष्ठ अधिकारी घरातील एका नोकराला कमी करतो. पण नोकराला जागा सोडण्यास सांगता येत नाही. पूर्वी पोलिस अधिकाऱ्याने नोकराला समजुतीने जागा सोडण्यास लावली असती. पण, आताच्या समाजवादी राज्यात नोकराविरुद्ध दावा लावावा लागतो. बरीच वर्षे दावा चालून जागा सोडण्याचा हुकूमनामा मिळतो. पण त्याची अमलबजावणी कित्येक महिने होऊ शकत नाही. मग त्याला उमज पाडणारा सल्ला मिळतो. तो कोर्टाच्या संबंधित अधिकाऱ्याला १०० रुपये देतो; नोकराला घालविल्यावर आणखी १०० रुपयांचे वचन देतो; अखेर नोकराला जागेतून हुसकण्यात येते.

अशी असंख्य उदाहरणे लोकांच्या अनुभवातील आहेत. ज्या माणसाने भ्रष्टाचारापासून दूर राहण्याचा सतत प्रयत्न केला आहे त्याचा जर हा अनुभव, तेव्हा भ्रष्टाचारी पाळेमुळे समाजात किती दूरवर रुजलेली आहेत त्याची कल्पनाच केलेली बरी. भ्रष्टाचाराची किंमत लोकांना द्यावी लागते. त्यातही गरिबांचा अधिक छळ होतो. त्यांना भ्रष्टाचाराच्या खेळात भाग घेता येत नाही. कंत्राटदार व धंदेवाले तर भ्रष्टाचार व लाचलुचपत ह्या प्रकारांशी नेहमीच परिचित असतात. वांच्छू कमिटीने मुख्यत: काळा पैसा व करचुकवेपणा ह्यांचा विचार केला. भ्रष्टाचाराबद्दल चौकशी करणारे असेच एखादे स्वतंत्र मंडळ नेमण्याची आवश्यकता आहे. परिस्थिती आटोक्याबाहेर जाण्यापूर्वी उपाययोजना करण्यात आली पाहिजे. अगदी मंत्र्यांपासून सुरुवात करून तातडीचे कडक उपाय योजण्यात आले नाहीत, तर देशात भ्रष्टाचारी व्यवहार हेच रोजचे सामान्य व्यवहार होतील, आणि सचोटी, प्रामाणिकपणा इत्यादी गुणांची केविलवाणी व हास्यास्पद स्थिती होईल. अशी परिस्थिती भ्रष्टाचारामुळे पोखरलेल्या अनेक देशांची झालेली आहे.

●

## कमर्शिअल बँक लि, कोल्हापूर

वरील बँक रिझर्व्ह बँकेने आणि मुंबई हायकोर्टाने मंजूर केलेल्या योजनेप्रमाणे कराड बँक लि. मध्ये सामील करण्यात आली आहे. ऑगस्ट, १९७२ मध्ये ठेवीदारांनी पैसे काढून घेण्याची गर्दी केल्यामुळे बँक बंद पडली. त्या वेळी बँकेकडे १६ लक्ष रु. च्या ठेवी होत्या आणि बँकेने दिलेली कर्जे ठेवींपेक्षा जास्त होती. आताच्या योजनेप्रमाणे, १०० रुपयांपर्यंतच्या सर्व ठेवी मार्चमध्ये परत केल्या जातील.—बाकीचे ठेवीदार ठेवींच्या १०% रक्कम आपण होऊन सोडून देतील.

## साखरेच्या उद्योगाची वाढ

भारतातील उद्योगात साखर कारखान्यांना महत्त्वाचे स्थान आहे. १९७१ अखेर ह्या उद्योगात १·५ लक्ष कामगारांना रोजगार होता. १९७०–७१ मध्ये २१६ साखर कारखान्यांत ७०० कोटी रुपयांची गुंतवणूक होती आणि १९७०–७१ च्या मोसमात जकात करपूर्व ४८० कोटी रु. च्या साखरेचे उत्पादन झाले. कारखान्यांतील १८० कोटी रु. जकातीच्या स्वरूपात मध्यवर्ती सरकारला दिले.

साखरेच्या उद्योगावर सुमारे २ कोटी ऊस-शेतकऱ्यांचा निर्वाह चालतो. त्यांना कारखान्यांकडून ३०० ते ३५० कोटी रु. उसाच्या किमतीचे मिळतात. कारखान्यांच्या उपपदार्थांचा उपयोग इंडस्ट्रिअल अल्कोहल, कागदाचे जिन्नस, इ. करण्याकडे करता येतो.

१९५०–५१ मध्ये कारखान्यांची उत्पादनक्षमता १७ लक्ष टन होती, ती १९७०–७१ मध्ये ३८ लक्ष टनांवर गेली. कारखान्यांच्या वाढीत सहकारी कारखान्यांचा खूपच मोठा वाटा आहे.

**साखरकारखाने आणि त्यांची उत्पादनक्षमता**

| वर्ष | साखर कारखान्यांची संख्या | | | उत्पादन-क्षमता (लक्ष टन) |
|---|---|---|---|---|
| | सहकारी | इतर | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १९५०–५१ ... | २ | १३७ | १३९ | १६·६८ |
| १९५५–५६ ... | ३ | १४० | १४३ | १७·७७ |
| १९६०–६१ ... | ३० | १४४ | १७४ | २४·४७ |
| १९६५–६६ ... | ५२ | १४८ | २०० | २९·३१ |
| १९६८–६९ ... | ६३ | १४२ | २०५ | ३३·०३ |
| १९६९–७० ... | ६९ | १४५ | २१४ | ३५·५६ |
| १९७०–७१ ... | ७५ | १४१ | २१६ | ३७·४२* |

साखरेच्या उत्पादनात एकसारखी सतत वाढ होत न जाता, त्यात चढउतार आढळतो. १९६१–६२ मध्ये साखरेचे उत्पादन २७·३२ लक्ष टन झाले. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात (१९६१–६२ ते १९६५–६६) ते २१·५७ लक्ष आणि ३५·५५ लक्ष टन ह्यात हेलकावे खात होते. १९६९–७० मध्ये त्याने ४२·६२ लक्ष टनांचा उच्चांक गाठला. पण पुढच्या दोन वर्षी उत्पादन घसरले.

१९६०–६१ मध्ये एकूण उत्पादनात उत्तर प्रदेशचा वाटा ४७·४% होता. महाराष्ट्राचा वाटा त्या खालोखाल म्हणजे १७·४% होता. बिहारमध्ये १२·८% उत्पादन झाले. महाराष्ट्राचा वाटा झपाट्याने वाढून १९७१–७२ मध्ये तो ३२% वर होता, आणि उत्तर प्रदेशचा वाटा २७% वर उतरला. महाराष्ट्रातील उत्पादन वाढीचे प्रमुख कारण कारखान्यांची, विशेषतः सहकारी कारखान्यांची, वाढलेली उत्पादनक्षमता हे होय. उसाचा सुधारलेला दर्जाही त्याला कारणीभूत आहे. ह्या उलट, गूळ करण्याकडे आणि खांडसारी साखर करण्याकडे ऊस वळविला गेल्या कारणाने उत्तर प्रदेश आणि बिहार येथील कारखान्यांचे उत्पादन घटते.

**साखरेचे वार्षिक उत्पादन**

| वर्ष | उत्पादन (लक्ष टन) |
|---|---|
| १९६२ | २७·३२ |
| १९६३ | २१·५७ |
| १९६४ | २५·६५ |
| १९६५ | ३२·२९ |
| १९६६ | ३५·५५ |
| १९६७ | २१·६० |
| १९६८ | २२·४८ |
| १९६९ | ३५·५९ |
| १९७० | ४२·६२ |
| १९७१ | ३७·४० |
| १९७२ | ३१·१२ |


**सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक नियमित, सोलापूर**

मुख्य कचेरी : २९/३०, रविवार पेठ, सोलापूर २

— शाखा —

नाथ चौक पंढरपूर | सदर बझार सोलापूर | नीलानगर कस्तुरबा मार्केट सोलापूर | भावनाऋषी पेठ सोलापूर | सुभाष चौक बार्शी

आपल्या शाखांनिशी औद्योगिक सहकारी संस्थांचे सेवेस सदैव सिद्ध. ठेवींवरील आकर्षक दर, ड्राफ्ट बद्दलच्या सोयी. आपल्या मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्यासाठी सेफ डिपॉझिट व्हाल्टची सोय यासाठी नजीकच्या शाखेस जरूर भेटा.

रा. आ. कुलकर्णी, बी. ए., एल. एल. बी., मॅनेजर | शा. शे. ताडलिंगेकर, बी. कॉम., जनरल मॅनेजर | भा. शे. अलकुटे, बी. एमूसी., चेअरमन | रा. चि कुचन, व्हा. चेअरमन

भारतातील सर्वप्रथम स्थापित व महाराष्ट्र राज्यातील एकमेव औद्योगिक सहकारी बँक

केन्द्र कार्यालय : आग्रारोड, नासिक दूरध्वनी क्र. : २५११
तारेचा पत्ता : कृषिबँक : २३६३

जिल्ह्याच्या विकासास हातभार लावणारी
शेतकऱ्यांची जिव्हाळ्याची बँक

## नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नासिक

तुमच्या जवळची रक्कम ती कितीही लहान असो वा मोठी असो ती या बँकेत सुरक्षित ठेवणे ही आजच्या जीवनातील एक आवश्यक बाब आहे.

**केन्द्र कार्यालयाचे इमारतीत सेफ डिपॉझिट लॉकर्सची अद्ययावत व्यवस्था**

| ठेवीचा प्रकार | | व्याजाचा प्रकार |
|---|---|---|
| ( १ ) सेव्हिंग्ज | द. सा. द. शे. | ४% |
| ( २ ) मुदतीच्या ठेवी | ” | ४½% ते ७½% |
| ( ३ ) अल्प बचत | ” | ४ % |

पं. शं. ढेरे
मॅनेजर

नि. भि. गायधनी एम्. एल्. ए.
व्हा. चेअरमन

मा. का. बोरस्ते
चेअरमन

" अर्था"च्या दिवाळी अंकास आमच्या हार्दिक शुभेच्छा !

## धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

—धुळे—

स्थापना : १३-९-१९५७

मुख्य कचेरी. गरुड बाग, धुळे (पोस्ट बॉक्स नं. ३) फो. नं. ९७

**जिल्ह्यातील मुख्य कचेरी व शाखा शेतकऱ्यांचे सोयीसाठी व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी अविरत कार्य करीत आहेत.**

—आमची खास वैशिष्ट्ये—

१. ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.
२. सर्व प्रकारच्या बँक व्यवहाराच्या सोयी त्वरित आणि अल्प कमिशन घेऊन केल्या जातात.
३. बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारते.
४. बँक अल्प-ठेव योजना व रिकरिंग डिपॉझिट योजनां द्वारे बचत ठेवीवर भरपूर व्याज देते.
५. आमच्या बँकेस दि. १-७-७१ पासून डिपॉझिट इन्शुअरन्स ॲक्ट अन्वये विमा संरक्षण योजना सुरू झाल्याने रु. १०,००० पर्यन्तच्या सर्व ठेवीदारांना सुरक्षितता प्राप्त झालेली आहे.

एक वेळ आपण येऊन आम्हांस आपल्या सेवेची संधी द्यावी.

—मॅनेजर

## दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित

हेड ऑफिस :—
पं. जवाहरलाल नेहरू रोड, परभणी

तारेचा पत्ता:— शेतकी बँक
फोन नं. १४९-६४ पो. बॉ. नं. ८

जिल्ह्यातील कृषिजनांना कृषि-विकासासाठी व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निरनिराळ्या योजनांखाली सहकारी अर्थव्यवस्थेनुसार पतपुरवठा करणारी व त्यांना सावकारी पाशातून मुक्त होण्याची प्रेरणा देणारी सहकारी संस्था व सर्वांना आपलीशी वाटणारी बँक म्हणजेच –

### दि परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, परभणी

आपल्या जिल्हाभर सर्वत्र असलेल्या एकूण ३३ शाखांमार्फत ग्रामीण व नागरी जनतेच्या सेवेत रुजू असून सेवेच्या ५८ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. बँकेकडून सर्व प्रकारची बँकिंगची सोय उपलब्ध करून दिली जाते. तसेच आकर्षक व्याज दराने ठेवी, रकमा स्वीकारल्या जातात.

ग्राहकांना मौल्यवान चिजवस्तू सांभाळण्याच्या काळजीतून मुक्त करण्यास्तव बँकेने परभणी येथे आधुनिक प्रकारच्या सेफ डिपॉझिट लॉकर्सचीही सोय उपलब्ध केलेली आहे.

अधिक माहितीसाठी एकवेळ नजीकच्या शाखेस अवश्य भेट द्या.

बँक आपल्या सभासदांना, भागधारकांना, ग्राहकांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना नूतन वर्ष सुखसमृद्धीचे जावो अशी शुभेच्छा व्यक्त करते.

बा. रा. पाटील
व्यवस्थापक

रा. बा. पाटील, जामकर, एम्. एल. ए.
व्हा. चेअरमन

लिं. ना. दुधगांवकर
चेअरमन

## चलनी नोटा आणि त्यांचे तारण

( आकडे लक्ष रुपयांचे )

| शेवटचा शुक्रवार / शुक्रवार | एकूण चलनी नोटा | तारण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सोने | परदेशी रोखे | रुपये व रुपयांच्या नोटा | सरकारी कर्जरोखे |
| १९६०–६१ ... ... ... ... ... ... | १,९९२,५९ | ११७,७६ | १२३,०१ | ११९,६२ | १,६३२,२० |
| १९६५–६६ ... ... ... ... ... ... | २,८९१,२१ | ११५,८९ | ९५,०५ | ९४,०० | २,५८६,२७ |
| १९६९–७० ... ... ... ... ... ... | ३,८६५,९३ | १८२,५३ | ३३१,४२ | ६४,६३ | ३,२८७,३५ |
| १९७०–७१ ... ... ... ... ... ... | ४,२२१,३६ | १८२,५३ | २७३,४२ | ५१.६७ | ३,७१३,७३ |
| १९७१–७२ ... ... ... ... ... ... | ४,६५५,३१ | १८२,५३ | २३८,६५ | ३६,२७ | ४,१९७,८५ |
| १९७२–७३ ... ... ... ... ... ... | ५,२७२,२० | १८२,५३ | १७१,६५ | ८,६६ | ४,९०९,३५ |
| जून १९७२ ... ... ... ... ... ... | ४,९०६,०५ | १८२,५३ | २२१,६५ | २७,५७ | ४,४७४,२९ |
| जानेवारी १९७३ ... ... ... ... ... ... | ४,९३७,१९ | १८२,५३ | १७१,६५ | १८,६६ | ४,५६४,३४ |
| फेब्रुवारी ,, ... ... ... ... ... ... | ५,०८६,५० | १८२,२३ | १७१,६५ | १२,९७ | ४,७१९,३५ |
| मार्च ,, ... ... ... ... ... ... | ५,२७२,२० | १८२,५३ | १७१,६५ | ८,६६ | ४,९०९,३५ |
| एप्रिल ,, ... ... ... ... ... ... | ५,५५८,५३ | १८२,५३ | १७१,६५ | २,९९ | ५,१९९,३६ |
| मे ,, ... ... ... ... ... ... | ५,७३६,८९ | १८२,५३ | १७१,६५ | ३,३६ | ५,३७९,३५ |
| जून १–१९७३ ... ... ... ... ... ... | ५,७०३,८५ | १८२,५३ | १७१,६५ | १०,७८ | ५.३३८,८९ |
| ,, ८ ,, ... ... ... ... ... ... | ५,७९०,४७ | १८२,५३ | १७१,६५ | ८,०० | ५,४२८,२८ |
| ,, १५ ,, ... ... ... ... ... ... | ५,८२९,५४ | १८२,५३ | १७१,६५ | ७,०८ | ५,४६८,२८ |
| ,, २२ ,, ... ... ... ... ... ... | ५,७६५,९८ | १८२,५३ | १७१,६५ | ८,६० | ५,४०३,१९ |
| ,, २९ ,, ... ... ... ... ... ... | ५,७३५,४१ | १८२,५३ | १७१,६५ | ८,३८ | ५,३७२,८४ |

चलनी नोटांचे, सोने, परदेशी रोखे आणि रुपये यांचे तारण वाढत गेलेले नाही; सरकारी कर्जरोख्यांचे ( त्यात मुख्यतः कृत्रिम कर्जरोखेच आहेत. ) तारण मात्र झपाट्याने वाढत गेले आहे. हे तारण देणे अगदीच सोपे आहे; तो अगदी सहीचा मळ आहे !

### रिझर्व्ह बँकेचा प्रचंड नफा – चलनवाढीचे फळ

३० जून, १९७३ रोजी संपलेल्या वर्षी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे, कित्येक तरतुदींची व्यवस्था करून, एकूण उत्पन्न २७१·२९ कोटी रु. झाले. गेल्या वर्षी ते २२२·१७ कोटी रु. होते. म्हणजे, उत्पन्नात ४९·१२ कोटी रु. ची वाढ झाली. मध्यवर्ती सरकारने स्वतःची तूट भरून काढण्यासाठी ट्रेझरी बिले निर्माण करून रिझर्व्ह बँकेकडून ती डिस्कौंट करून घेतली; अशा ट्रेझरी बिलांत खूपच वाढ झाल्यामुळे रिझर्व्ह बँकेचे डिस्कौंटचे उत्पन्नही वाढले.

एकूण खर्चही वाढून तो ३७·१७ कोटी रु. चा ४१·२९ कोटी रु. झाला. मध्यवर्ती सरकारला एकूण १३० कोटी रु. ची प्राप्ती झाली. गेल्या वर्षी ती १२० कोटी रु. होती.

३० जून, १९७३ रोजी ५३,६७,१२,८४,४३९·४१ रुपयांचे रोखे आणि ट्रेझरी बिले रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्याच्या जिंदगीच्या बाजूस होती. त्यांची मुदत भरली की त्यांच्या फेडीसाठी नवी ट्रेझरी-बिले काढून ती पुनः रिझर्व्ह बँकेकडे डिस्कौंट करून घ्यावयाची, सरकारच्या बँकखात्यातील रकमा कमी झाल्या की त्यात भर घालण्यासाठी ट्रेझरी-बिले काढून ती डिस्कौंट करून घ्यावयाची, अशा रीतीने सरकार तूट भरून काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून कृत्रिम उपायांनी चलन मिळविते.

| | १९७२–७३ | १९७१–७२ |
|---|---|---|
| | ( कोटी रुपये ) | |
| १. राज्य सरकारांना ' वेज ॲंड ॲडव्हान्सेस ' कर्जावर व्याज | ३·१५ | १५·३२ |
| २. राज्य सरकारांना दिलेली इतर कर्जे व व्यापारी आणि सहकारी बँकांना दिलेली कर्जे यांवरील व्याज | २१·११ | २०·५६ |
| ३. रुपयांतील रोखे आणि रुपयांतील ट्रेझरी-बिले यांवरील व्याज | २१३·३९ | १५६·२५ |
| ४. विदेशी रोखे, इत्यादींवरील व्याज | २०·०७ | २२·५८ |
| ५. कमिशन, हुंडणावळ | १३·४३ | ६·४० |
| ६. इतर उत्पन्न | ०·१४ | १·०६ |
| एकूण उत्पन्न | २७१·२९ | २२२·१७ |


ही
दिवाळी
आमचे
ग्राहकांना
सुखाची
जावो
ठाकूर सावदेकर कंपनीपुणें
TRADE MARK
नं १
बिडी
लंगर
ANCHOR
छाप
BRAND
NO 1
BIDI
Nº 978
THAKUR SAVADEKAR & CO.
POONA
PARAMOUNT
धूम्रपानाचा
खरा आनंद
लंगर बिडी
ठाकूर सावदेकर कंपनी प्रा. लि. पुणें


आपली आवड
बेडेकर
उत्पादनें
MANGO
PICKLE
बेडेकर
पापड
बेडेकर मसाले
बेडेकर मसाले, लोणचीं, पापड व इतर उत्पादनें उत्तम साफ केलेले कच्चे पदार्थ व या विषयांतील ५५ वर्षांचा रोजचा अनुभव यामुळें सर्वांनांच आवडतात. आपणही अनुभव घ्या.
व्ही. पी. बेडेकर ॲन्ड सन्स
प्रायव्हेट लि.
मुगभाट, मुंबई ४
B.VASANT 165

**ARTHA**
Divali October, 1973
Price Rs. 2 = 00

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. वार्षिक वर्गणी रु. ६

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३९ पुणे, बुधवार, २१ नोव्हेंबर, १९७३ अंक २१

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड




स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. गाऊन्स, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.




**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.







BANK TO BANK...

**THE BELGAUM BANK LIMITED**

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659-60, Raviwar Peth,
**BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*

" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळींची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

☆ अर्थ ☆

बुधवार, २१ नोव्हेंबर, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## परदेशीय सहकार्याला असणारा विरोध गैरवाजवी : आत्मविश्वास हवा.

आशिआ खंडातील बहुतेक देश अविकसित देशांच्या यादीत येतात. भारतासारख्या एखाद्या देशाने थोडीफार औद्योगिक प्रगती केली असली तरी प्रगत देशांच्या मानाने तो अद्याप किती तरी मागासलेला आहे. औद्योगिक प्रगती साधण्यासाठी प्रगत देशांचे सहकार्य विकसनशील देशांना अजून कित्येक वर्षे घ्यावे लागणार आहे. पण ह्या बाबतीत मोठी अडचण म्हणजे ह्या देशांच्या राजकीय जाणिवेची. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या देशांच्या राजकीय भावना हळुवार बनलेल्या असतात. परदेशीय भांडवलाचे सहकार्य घेतले तर आपल्या देशाच्या स्वातंत्र्यावर बंधने तर पडणार नाहीत ना अशी भीती त्यांच्या मनात अधूनमधून डोकावत असते. ह्या नाजुक विषयासंबंधी भारत सरकारच्या औद्योगिक विकासखात्याचे मंत्री श्री. सुब्रम्हण्यम् ह्यांनी चिंतनीय विचार व्यक्त केले आहेत. उद्योगधंद्यांना वाटचालीचा हिरवा बावटा दाखविण्यासाठी जी नवीन संघटना सरकारने स्थापन केली आहे तीविषयी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की भारतामधील लोकांनी परदेशी भांडवलाविषयींच्या आपल्या वृत्तीविषयी नव्याने विचार करण्याचा समय आता आला आहे. एखाद्या परदेशीय कंपनीशी सहकार्य करून एखादा उद्योग काढण्याचा निर्णय सरकारने घेतला की ह्या निर्णयाविरुद्ध ओरड करण्याची प्रथाच पडली आहे. ह्या ओरडीच्या पोटात परदेशी कंपन्या भारताची पिळणूक करतील अशी भीती दडलेली असते. परंतु अशी पिळणूक होऊ न देता परदेशी सहकार्य राबविण्याचा आत्मविश्वास उत्पन्न झाला पाहिजे. तीच भारताची कसोटी आहे.

अलीकडे रशिआ आणि अमेरिका ह्या देशात औद्योगिक सहकार्य होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. रशिआत नव्याने स्थापण्यात यावयाच्या उद्योगधंद्यांत अमेरिकन भांडवलवाल्यांनी कोणत्या प्रकारचे व कितपत सहकार्य द्यावे ह्याविषयी अमेरिकन उद्योगपतींनी काही मार्गदर्शक तत्त्वे निर्दिष्ट केली आहेत. अशाच प्रकारचे मार्गदर्शन चीनविषयीही करण्यात येत आहे. अमेरिकन उद्योगपतींची रशिआत गुंतविण्याच्या भांडवलाविषयीची वृत्ती लक्षात घेण्यासारखी आहे. अमेरिकेतील बऱ्याच उद्योगटांना असे वाटत आहे की, भारतात भांडवल गुंतविण्याच्या ज्या थोड्याफार संधी आहेत, त्यांच्याशी तुलना करता रशिआतील गुंतवणुकीच्या संधी अधिक दीर्घ क्षेत्रावर विस्तार पावलेल्या आहेत. रशिआतील नैसर्गिक वायू आणि खनिज तेल ह्यांच्या उत्पादनात अमेरिका विशेष सहकार्य देऊ शकेल असे त्यांना वाटत आहे. ह्यावरून असे म्हणता येईल की रशिआला अमेरिकन उद्योग गटाकडून पिळणूक होण्याची भीती वाटत नसावी. रशिआने ह्या बाबतीत जसा आत्मविश्वास दाखविला आहे तसाच भारतालाही दाखविता आला पाहिजे. गेल्या २५ वर्षांत भारताने परदेशीय औद्योगिक सहकार्य घेतले आहे, ह्या सहकार्यात भारताची पिळणूक झाल्याचा अनुभव असला, तरीही भविष्यकाळात अशा सहकार्यात स्वतःचा अधिक फायदा करून घेण्याची पात्रता सिद्ध केली पाहिजे. भारतात भांडवल गुंतविण्याबाबत अमेरिकन उद्योगपतींची वृत्ती संमिश्र स्वरूपाची आहे. त्यांना अधिक नफा मिळविण्याची क्षेत्रे पाहिजे आहेत. तथापि भारताच्या हितसंबंधांना धोका पोचणार नाही अशा पद्धतीनेच परदेशी भांडवलाचे स्वागत करण्यात यईल. त्यासाठी घालण्यात आलेले निर्बंध व मर्यादा ह्यांच्या चौकटीत परदेशी सहकार्य होऊ शकेल.

## विमान कंपन्यांच्या जळणाच्या खर्चांत वाढ

तेलउत्पादन व निर्यात करणाऱ्या अरब देशांनी तेलाच्या उत्पादनात व निर्यातीत कपात करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे पाश्चात्य देशांप्रमाणे भारतापुढेही अडचणी निर्माण झाल्या आहेत. अर्थातच पेट्रोल व अन्य पदार्थ ह्यांच्या किंमतीत वाढ करून त्यांचा खप कमी करण्याचे प्रयत्न भारत सरकार करीत आहे. तेलाच्या वाढत्या भावामुळे इंडिअन एअरलाइन्स आणि एअर-इंडिआ ह्या कंपन्यांच्या जळणाच्या खर्चात सुमारे १७ कोटी रुपयांची वाढ दरसाल होणार आहे पहिल्या कंपनीला जळणासाठी सालीना ७·५ कोटी रुपये आणि दुसऱ्या कंपनीला ९·५ कोटी रुपये अधिक खर्च करावे लागतील असा अंदाज करण्यात आला आहे. लोकसभेच्या सल्लागार समितीच्या सभासदांना ही माहिती देताना नागरी विमानवाहतूक आणि प्रवास खात्याचे मंत्री डॉ. करणसिंग म्हणाले की असे असले तरी चालू आर्थिक वर्षात ४ लाख परदेशीय प्रवासी आकर्षित करून घेण्याचे उद्दिष्ट गाठले जाईल असा विश्वास खात्याला वाटत आहे. परदेशी प्रवाशांपासून मिळणाऱ्या परदेशीय चलनाचे उत्पन्नही ५५ कोटी रुपयांवरून ६० कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. इंडिअन एअरलाइन्स ही देशांतर्गत वाहतूक करणारी कंपनी उतारूंच्या भाड्यात लवकरच वाढ करण्याचा विचार करीत आहे. अरब-इस्राइल ह्यांच्यात भडकलेल्या चालू युद्धात भारताने अरबांना पाठिंबा दिलेला असतानाही तेल-उत्पादक अरब देशांनी भारताला तेल पुरवठ्याच्या कपातीतून वगळलेले नाही. त्यामुळे तेलाबाबत स्वयंपूर्ण होण्याच्या प्रयत्नांना जोराची चालना मिळेल.

## संरक्षक दलातील लोकांना हृदयविकाराचा अधिक धोका

हैद्राबाद येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्युट्रिशन ह्या संघटनेने आहाराच्या सवयी आणि हृदयविकार ह्यांच्यातील संबंध शोधून काढण्यासाठी समाजातील निरनिराळ्या थरातील लोकांच्या आहाराची पाहणी केली आहे. ह्या पाहणीत श्रमाचे काम करणारे लोक, संपन्न व्यावसायिक, लष्करातील अधिकारी, इत्यादींचा समावेश करण्यात आला होता. पहाणीत गोळा झालेल्या माहितीवरून एक निष्कर्ष असा काढण्यात आला आहे की संरक्षक दलातील अधिकाऱ्यांना हृदयविकार जडण्याचा अधिक संभव असतो. लष्करातील बडे अधिकारी जसा पौष्टिक आहार घेतात तसाच आहार लष्करातील कनिष्ठ श्रेणीचे लोकही घेतात. परंतु त्यांना ह्या रोगाचा धोका तितकासा नसतो. ह्याचे कारण त्यांना शारीरिक श्रमाची कामे करावी लागतात हे असावे. नवी दिल्ली, आग्रा आणि मुंबई ह्या शहरांतील संपन्न लोकांच्या आहारात पौष्टिक अन्नपदार्थांचा अधिक समावेश असल्याने त्यांनाही इतर संपन्न लोकाप्रमाणेच ह्या रोगाचा धोका अधिक संभवतो. त्या मानाने गरीब असणाऱ्या लोकांना असा आहार सतत परवडत नाही. त्यामुळे त्यांच्यात हृदयविकाराची शक्यता कमी प्रमाणात आढळून आली. जास्त उत्पन्न असलेल्या लोकांच्या आहारात मेदवृद्धीला पोषक असलेल्या पदार्थांचे प्रमाण अधिक असते तसे ते कमी उत्पन्न असलेल्या लोकात नसते. जास्त उत्पन्न असलेल्या लोकांना लागणाऱ्या शारीरिक उष्णतेपैकी ३५ ते ४० टक्के उष्णता अशा मेदवृद्धीकारक अन्नापासून मिळत असते. उलट शारीरिक श्रमाची कामे करणाऱ्या लोकांत २० टक्के उष्णताच अशा अन्नापासून मिळत असते. मेदवृद्धीकारक अन्नापासून मिळणाऱ्या उष्णतेचे प्रमाण ह्यापेक्षा अधिक असणे धोक्याचे ठरते.

---

## इचलकरंजी येथील छोट्या कारखान्याची प्रगती

इचलकरंजी येथील फ्युएल इन्स्ट्रूमेंट्स अँड एंजिनिअरिंग कंपनी आणि जपानमधील एक मोठी एंजिनिअरिंग कंपनी ह्यांच्यात एक करार करण्यात आला आहे. इचलकरंजी येथील कारखान्याचे डायरेक्टर श्री. पी. डी. कुलकर्णी हे आहेत. त्यांनी चालविलेली कंपनी जपानला एंजिनिअरिंगच्या धंद्यातील पक्का माल निर्यात करणार आहे. कंपनीने तयार केलेली टेस्टिंग मशीन्स जपानमध्ये चांगली उपयुक्त ठरली आहेत. त्यांच्या निर्यातीमुळे १० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ती होणार आहे. पुढील वर्षी निर्यातीत ५० टक्के वाढ करण्याचेही करारात ठरविण्यात आले आहे. अलीकडे जपान, कोरिआ, फॉर्मोसा इत्यादी देशांतून मजुरीत सतत वाढ होत चालली आहे. त्यामुळे काही एंजिनिअरिंगचा माल भारतातून आयात करणे कमी खर्चाचे झाले आहे.

---

## खेळांच्या स्पर्धेत औषधांचा उपयोग

आरोग्यरक्षणासाठी औषधांचा उपयोग नेहमीच करण्यात येतो. अमेरिकेसारख्या प्रगत देशातून उत्साहवर्धक औषधांचा व गोळ्यांचा उपयोग तर रोजच्या जीवनातही अनेक लोक करीत असतात. मानवी जीवनात तेथे सतत वाढत चाललेल्या ताणाचा हा परिणाम आहे असे सांगतात. वास्तविक खेळांच्या स्पर्धेत अशा प्रकारच्या उत्तेजक औषधांचा उपयोग करणे योग्य नाही. ऑलिंपिकसारख्या जागतिक खेळांच्या स्पर्धेतही अनेक स्पर्धक त्यांचा उपयोग करीत असतात अशी शंका घेतली जात असते. पण औषधांचा उपयोग सिद्ध करण्याची शास्त्रीय पद्धत उपलब्ध झालेली नाही त्यामुळे स्पर्धकाकडून त्याचा उपयोग चालूच आहे. ब्रिटिश शास्त्रज्ञांनी अशा औषधांचे सेवन स्पर्धकाने केले असेल तर ते हुडकून काढण्याची रीत शोधून काढल्याचे वृत्त आहे. आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती आणि इतर संबंधित खेळसंघटना ह्यांना ब्रिटिश शास्त्रज्ञांनी तसे कळविलेही आहे. ही औषधे घेऊन स्पर्धकांनी आपआपले प्रशिक्षण घेतले तर त्यांना अधिक बळ प्राप्त होते आणि त्याच्या जोरावर ते स्पर्धांत अटीतटीने झटापट करू शकतात. वजन उचलणे, वजनाचे गोळे फेकणे, भालाफेक करणे इत्यादींच्या स्पर्धांत तर अशा उत्तेजक औषधांचा फार उपयोग होतो. जागतिक पातळीवर भरविण्यात येणाऱ्या अनेक खेळांच्या स्पर्धांतील पहिला क्रमांक ह्याच औषधांच्या जोरावर मिळविण्यात आलेला आहे. पण विशिष्ट स्पर्धकाने उत्तेजक औषधांचे सेवन केले आहे किंवा नाही हे ठरविणे आतापर्यंत कठीण होऊन बसले होते. आता रक्ताची व मूत्राची तपासणी करून औषधांचा वापर सिद्ध करता येतो.

---

## रेल्वेची स्वतंत्र विद्युत-केंद्रे

भारताच्या उत्तर आणि पूर्व विभागासाठी रेल्वेखात्याने तीन स्वतंत्र विद्युत केंद्रे उभारण्याचे ठरविले आहे रेल्वे गाड्यांना सतत आणि खात्रीचा विजेचा पुरवठा उपलब्ध करून देऊन गाड्यांची वाहतूक सारखी चालू ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे नव्या वीज-उत्पादन केंद्रांपैकी एक उत्तर प्रदेशात, दुसरे बिहार राज्यात आणि तिसरे पश्चिम बंगाल राज्यात उभारले जाणार आहे. सध्या मध्य रेल्वेचे कल्याण येथील वीज-उत्पादन केंद्र हेच एकमेव स्वतंत्र केंद्र आहे. प्रत्येक केंद्राची उत्पादनक्षमता ११० मेगॅवॅट इतकी असेल. उत्तर प्रदेशात उभारण्यात येणाऱ्या केंद्रातून दिल्ली—कलकत्ता आणि दिल्ली—मुंबई ह्या रेल्वेरस्त्यावरील गाड्यांना विजेचा पुरवठा करण्यात येईल. प्रत्येक केंद्राच्या उभारणीसाठी सुमारे ४० कोटी रुपये खर्च येणार आहे. कल्याण येथील केंद्राचाही विस्तार करण्यात यावयाचा आहे.

# सहकारी चळवळीसमोरील आव्हाने

## ( खासदार गुलाबराव पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ )

आज सहकारी चळवळीमध्ये फार मोठा बदल झाला आहे. सहकारी चळवळीसमोर आज अनेक आव्हाने उभी आहेत. ही आव्हाने स्वीकारण्यासाठी केवळ अधिकारी वर्गच नव्हे तर इतर प्रकारचा नोकरवर्गहि तयार करावयाचा आहे. आज आपणांस ही आव्हाने स्वीकारू शकणारी आणि आपल्या विषयाचे सखोल ज्ञान असणारी माणसे हवी आहेत आणि अशी माणसे आपण मिळवू शकू याबद्दल मला खात्री आहे.

सहकारी संस्थांच्या कार्याचे बरोबर मूल्यमापन व्हावयाचे असेल तर त्यासाठी हिशेबतपासणी ही एक अत्यावश्यक बाब आहे. कारण त्याचमुळे सहकारी संस्थेचा कारभार कसा चालला आहे त्याची कल्पना येऊन तो अधिक सुधारण्यासाठी काय करावयास हवे ते आपणांस समजू शकेल. म्हणूनच महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची सातत्याने हिशेबतपासणी होते. मात्र ही हिशेबतपासणी करताना, हिशेबतपासनिसांनी संस्थेचे हिशेब कसे ठेवले जावेत त्याबाबतही मार्गदर्शन करावे.

### कारवाईचा अभाव

काही बाबतीत हिशेबतपासनीस कारभारातील चुका दाखवितात, परंतु त्याबाबत कारवाई होत नाही. ह्याचे कारण राजकीय कार्यकर्त्यांचा हस्तक्षेप. चुका करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कोणतीच कारवाई न केली गेल्याने संस्थेच्या कारभाराचा दर्जा घसरतो. गुन्हेगारांना कडक शासन करण्याची तरतूद नाही. माझ्याकडे अशा अनेक तक्रारी आल्या आहेत की, अशा गुन्हेगारांविरुद्ध कायदेशीर इलाज करण्यात आलेला नाही तर अनेकांना रान मोकळे ठेवण्यात आले आहे. हे सर्व प्रकार मानवी स्वभावाची वैगुण्ये होत. परंतु ह्यापुढे अशीच परिस्थिती राहू देऊन चालणार नाही. ज्याद्वारे अशा तऱ्हेच्या चुका आणि गैरव्यवहार दूर होतील अशा तऱ्हेची यंत्रणा आपणांस उभारावयाची आहे. यामुळेच सहकारी संस्थांचा कारभार सुधारू शकेल.

वाईट नाणे ज्याप्रमाणे चांगल्या नाण्याची बाजारांतून हकालपट्टी करते त्याप्रमाणे सहकारी चळवळीतील नवे नेतृत्व जुन्या नेतृत्वाला इतिहासजमा करू पाहात आहे. ज्याप्रमाणे युद्धात आणि प्रेमात साऱ्याच गोष्टी क्षम्य मानल्या जातात, त्याप्रमाणे सहकारी संस्थांच्या निवडणुकांतही साऱ्याच गोष्टी क्षम्य मानल्या जाण्याची प्रवृत्ती वाढत आहे. लवादाच्या निर्णयांना वारेमाप विलंब लागत आहे आणि परिणामी मूळ हेतूच पराभूत होत आहे आणि न्याय मिळण्यासाठी विलंब लागत आहे. तत्त्वे केव्हाही चांगलीच असतात. परंतु संबंधित लोकांनी त्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी केली नाही तर त्या तत्त्वांना काही अर्थ उरत नाही.

### संख्यात्मक विकास नको

निरनिराळ्या राज्यांत सहकारी संस्थांची निव्वळ संख्या वाढली म्हणजे सहकारी चळवळीचा विकास झाला नाही. वाढत्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी ज्याप्रमाणे कुटुंब-नियोजनाची आवश्यकता असते त्याचप्रमाणे सहकारी संस्थांच्या वाढीवर सुद्धा नियंत्रण असण्याची आवश्यकता आहे. बोगस सहकारी संस्थांची वाढ थोपविणे ही आज महत्त्वाची बाब आहे.

सहकारी संस्था ह्या कार्यक्षम असल्या पाहिजेत किंवा कमकुवत संस्थांचे कार्यक्षम सोसायट्यांत विलिनीकरण करणे आवश्यक आहे असे आपण नेहमी म्हणत आलो आहोत. परंतु प्रत्यक्षात मात्र काहीच घडत नाही. कमकुवत आणि ज्यांच्या विकासाची वाढ खुंटली आहे अशा संस्था अजून अस्तित्वात आहेत. अशा स्थितीत सहकारी चळवळ यशस्वी झाली आहे किंवा नाही ते ठरविण्यासाठी आपण कोणता निकष लावणार हा खरा प्रश्न आहे. शेतकी पतपुरवठा सोसायट्या किती आहेत? त्यांपैकी किती सोसायट्या अ, ब, क आणि ड वर्गांत आहेत? 'ब' वर्गातील किती सोसायट्या 'अ' वर्गात गेल्या? हे सर्व महत्त्वाचे प्रश्न आहेत. ह्या आकडेवारीवरून ह्या बाबतीतील आपले यशापयश दिसून येईल.

परंतु एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे की, अपयश हा गुन्हा नसून आकुंचित दृष्टिकोन असणे हा गुन्हा आहे.

आपण सभासदांना शिक्षण दिले पाहिजे. ही फार महत्त्वाची बाब आहे. सहकारी संस्था म्हणजे सामाजिक आणि आर्थिक बदल घडवून आणणारी साधने होत, आणि जोपर्यंत ह्या साधनांचा उपयोग आपण कमकुवत घटकांच्या गरजांसाठी करीत नाही तो पर्यंत ह्या साधनांचा काहीही उपयोग होणार नाही. आम्ही फार बोलतो अशी टीका कमकुवत घटकांमार्फत केली जाते आणि तुम्हांस आमच्यासाठी काहीही करावयाचे नसेल तर निदान बोलू तरी नका असे ह्या घटकांचे मागणे आहे. यावरूनच सहकारी संस्थांनी काय करावयास हवे आणि याबाबतीत त्यांची जबाबदारी कोणती ही गोष्ट स्पष्ट होते.

### सहकारी नेतृत्व

देशातील सहकारी नेतृत्वात काही पेचप्रसंग निर्माण झाला आहे अशी एक शंका प्रदर्शित केली जाते. आजच्या सहकारी नेतृत्वात काही कमतरता आहे ही वस्तुस्थिती आहे. सर्वच नेते हे सारखेच असतात अशी कोणी अपेक्षा करू नये. पूर्वी काही सहकारी नेते आणि विचारवंत होऊन गेले. त्यांनी सहकारी चळवळीची फार मोठी सेवा बजावली. परंतु आज मात्र अशी परिस्थिती नाही. याचे कारण आजकाल सहकारी चळवळीत मोठ्या प्रमाणावर राजकारण आणले जात आहे. मात्र ह्या म्हणण्याचा अर्थ सहकारी चळवळीपासून राजकारण वेगळे काढले जाणे शक्य आहे असे नाही. माझ्या म्हणण्याचा अर्थ सहकारी चळवळीचे राजकारणीकरण होऊ नये हा आहे.

सहकारी संस्थांनी आपल्या सभासदांच्या कल्याणासाठी अधिक प्रयत्न केले नाहीत आणि मुख्यत: त्यांच्या गरजांची त्यांनी पूर्ती केली नाही तर त्या आपल्या कर्तव्यास चुकल्या असे म्हणता येईल.

### सभासद का होऊ ?

तुम्ही जर कधी खेड्यात गेलात तर तेथील खेडूत तुम्हांस सर्वसाधारण प्रश्न विचारील की, "मी सहकारी संस्थेचा सभासद का होऊ ? सहकारी संस्थांत चाललेल्या प्रकारांची मला सर्व माहिती आहे".

सहकारी चळवळीतील दोष अल्पावधीत दुरुस्त करता येणार नाहीत याची मला जाणीव आहे. आपण जर भारताच्या नकाशाकडे दृष्टिक्षेप टाकला तर काश्मिरपासून तो कन्याकुमारीपर्यंत सहकारी चळवळीची विषम प्रगती झाल्याचे दिसून येते. या उलट महाराष्ट्रात–जेथे पाटबंधाऱ्याच्या चांगल्या सोई नाहीत, जेथील जमीन सुपीक नाही, तेथील सहकारी चळवळ मात्र भक्कम आहे, प्रगतशील आहे. इतर राज्यांशी तुलना करता महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने केलेली प्रगती स्पृहणीय आहे. हे शक्य झाले सेवाभावी सहकारी कार्यकर्त्यांमुळे ! या सहकारी कार्यकर्त्यांनी सहकारी तत्त्वांवर केवळ विश्वासच ठेवला नाही तर ह्या तत्त्वांचे प्रत्यक्ष आचरणही केले म्हणूनच महाराष्ट्राने सहकारी चळवळीच्या क्षेत्रात सबंध देशात आघाडी मारली. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, महाराष्ट्रातील सहकारी चळवळीवर कधी आपत्तीच आली नाही. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीवर अनेकदा टीका झाली आहे. टीका केव्हाही स्वागतार्हच, पण तिचे स्वरूप असे नसावे की, त्यामुळे सबंध सहकारी चळवळच कोलमडेल किंवा तिचा मूलभूत हेतूच नष्ट होईल.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीतही काही त्रुटी आहेत ह्याची आम्हांस जाणीव आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की त्या त्रुटी दूर करून आम्हांस पुढे जाताच येणार नाही.

---

### उंच इमारतींत केरकचरा टाकण्याची सोय नाही.

जगातील सर्वच मोठ्या शहरांतून गगनचुंबी टोलेजंग इमारती बांधण्यात येतात. जागेच्या अभावी व आर्थिक कारणासाठी भारतामधील मोठ्या शहरांतही अशा इमारती आता नभोमंडळात पोचू लागल्या आहेत. ह्या इमारतीत सर्वप्रकारच्या सोयी करण्याची दक्षता घेण्यात आलेली असते. मजल्यावर मजले असणाऱ्या ह्या इमारतीत राहणाऱ्यांपुढे नवीन समस्या उभी राहिली आहे. नागपूर येथील सेंट्रल पब्लिक हेल्थ एंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट संघटनेने केलेल्या पाहणीप्रमाणे बहुतेक इमारतीतून केरकचरा साठविण्याची व त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था मात्र नाही. इमारतींचे नकाशे आखणाऱ्या तंत्रज्ञांनी ह्या बाबींकडे दुर्लक्ष केल्याचे आढळून आले आहे.

---


धनवर्धिनी परंपरेतील

११ ४ नवीन योजना

**कर्जहमी ठेव योजना**

ठेव परतीचे वेळी तितकेच कर्ज मिळण्याची सुरवातीलाच हमी

**विशेष सेव्हिंग्ज खाते**

४.७५ टक्के व्याज, पैसे काढताना ९१ दिवसाची पूर्व सूचना.

**मुदतीचे सेव्हिंग्ज खाते**

७.२५ टक्के व्याज
मुदत ३ ते ६ वर्षे

**मासिक व्याज ठेव योजना**

किमान १००० रु. (नव्या स्वरूपात)
कमीत कमी १ वर्ष मुदत.

युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन

एका राज्यात शाखा असलेल्या बँकांमधील
भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.**

मुख्य कार्यालय: युनायटेड वेस्टर्न बँक इमारत, सातारा १.

## बँकेचा शिपाई आणि साहेबाच्या घरचे काम

### राष्ट्रीयीकृत बँका आणि सहकारी बँका ह्यातील फरक

तुलनात्मक दृष्ट्या राष्ट्रीयीकृत बँका व सहकारी बँका यात जमीन अस्मानाची तफावत आहे. सहकारी बँकेतील कर्मचारी हा आर्थिक बाबतीत नेहमीच उपेक्षित असतो. ह्या उलट राष्ट्रीयीकृत बँकेतील प्रत्येक कर्मचारी (शिपायापासून तो वरिष्ठांपर्यंत) आर्थिक बाबतीत स्वयंपूर्ण असतो. त्यामुळे राष्ट्रीयीकृत बँकेतील शिपायांस साहेबांसमोर पुढे पुढे करण्याची पाळी येत नाही. आणि आज जीवन जगण्याचे एकमेव माध्यम म्हणजे पैसा आहे. तो राष्ट्रीयीकृत बँकेतील कर्मचाऱ्यास भरपूर प्रमाणात मिळतो, ह्या उलट सहकारी बँकेतील साहेबाला (साहेब म्हणजे एजंट, इन्स्पेक्टर, कॅशियर, क्लार्क, इत्यादी) राष्ट्रीयीकृत बँकेतील शिपायाएवढा देखील पगार मिळत नाही, ही वस्तुस्थिती सहकारी बँकेतील. साहेबाला जर एवढा कमी पगार तर शिपायास किती पगार असेल? फारच कमी. जेमतेम १०० ते १२५ चे आत-बाहेर; आणि मिळणाऱ्या पगारात त्याला त्याचा संपूर्ण संसार चालवायचा असतो.

भाववाढीप्रमाणे इतर खात्यातील व राष्ट्रीयीकृत बँकांतील पगारही वाढतच गेलेत आणि सहकारी बँकेतील कर्मचाऱ्यांचे पगारात एक पैसाही वाढ झालेली नाही. तेव्हा जर राजासारखा एखादा शिपाई साहेबांच्या घरी काम करून त्यांच्या पुढे पुढे करून आपल्या दैनंदिन जीवनातील गरजा भागवीत असेल तर त्यात काय बिघडले? कारण मुळातच साहेब स्वभावाने चांगले आहेत. ते राजाच्या अडीअडचणीत त्याला मदत करतात व आपुलकीने वागवितात. त्याच ठिकाणी शिपायाला केवळ शिपाईच समजून वागणूक देणारा व नुसतेच काम करून घेणारा साहेब असता तर राजाच काय अन्य इतर शिपायाने देखील साहेबांचे काम केले नसते. कारण जगातील व्यवहार हा दिल्याघेतल्याचा असा आहे. शेवटी राजा हा शिपाईच व त्याची बुद्धीही शिपायापुरतीच. एक दिवस तो राष्ट्रीयीकृत बँकेतील कर्मचारी युनियनच्या अधिकाऱ्याचे भाषण ऐकून ठरवतो व "आजपासून साहेबाचे घरी काम करावयाचे नाही असा निर्णय घेतो" व आपला निर्णयही तो साहेबांना सांगतो. साहेब त्याला परोपरीने समजावून सांगतात, दोन्ही बँकातील फरकही सांगतात, परंतु राजा आपल्या निर्णया पासून परावृत्त होत नाही. साहेबाला त्याची कीव येते व त्याचे वेडेपणाचे हसूही येते कारण त्यांना माहीत असते की आज राजाचे जागी आपण गोपाळला घेतले व राजाकडे दुर्लक्ष केले तर राजाचे हाल होतील. साहेबांना राजाच्या घरच्या परिस्थितीची पूर्ण जाणीव असते. परंतु राजा स्वतःच्या परिस्थितीबाबत विचार करावयास तयार नसतो की जर मी साहेबाचे घरचे काम केले नाही तर साहेबाचे माझ्याकडे दुर्लक्ष होईल व आपले हाल होतील.

शेवटी साहेबच यावर एक तोडगा काढतात व राजाला दौऱ्यावर चलण्याबद्दल सांगतात व सोबत पाटा, वरवंटा, उखळ व अन्नधान्यांची भरलेली एक बॅग घेतात आणि राजाला सांगतात की आजपासून दौऱ्यावर मी माझे जेवण हातानेच तयार करणार आहे. त्यामुळे त्याला खूपच त्रास होतो व त्याचे साहेबाशी वरील-प्रमाणे वागल्याची चूक लक्षांत येते. साहेबही मनात काय ओळखायचे ते ओळखतात व राजाच्या ते लक्षात आणून देतात की राजा तू आहेस सहकारी बँकेतील; विनाकारण राष्ट्रीयीकृत बँकेतील कर्मचाऱ्यांशी कशाला स्पर्धा करतोस? आहे तेच व्यवस्थित सुरू ठेव; त्यातच तुझे कल्याण आहे. नंतर राजाचे व साहेबाचे संबध पूर्ववत होतात.

या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की प्रत्येक वेळेस नियम व कायदा हाती घेऊन वागणे बरे नसते. एखादेवेळेस त्यात आपलेच नुकसान होते. चुकीच्या मार्गदर्शनामुळे "तुझे आहे तुजपाशी परि तू जागा चुकलाशी," अशी राजाची अवस्था झाली व तो उपकारकर्त्या साहेबावरच उलटला. त्याच्या नशीबाने साहेब सुजाण होते म्हणून त्यांनी राजाला दौऱ्यावर नेऊन व शॉक ट्रीटमेंट देवून ताळ्यावर आणले. जेथे वरिष्ठ अधिकारी शिपायाशी चांगले वागतात; त्यांच्या अडीअडचणी समजावून घेऊन त्यांना मदत करतात; त्या ठिकाणी शिपायांनी त्याचे घरचे काम करावयास काहीच हरकत नाही. राष्ट्रीयीकृत बँकातील चांगल्या स्वभावाच्या अधिकाऱ्यांकडे बँकांतील शिपाई काम करतात ह्याची कितीतरी उदाहरणे देता येतील.

म्हणूनच मी असे निक्षून सांगेन की श्री. उत्कर्षे साहेबांनी राजावर सूड न घेता त्याला धडा शिकविला व त्याला चुकीच्या मार्गावरून जाताना वाचविले. अपेक्षा आहे, माझे स्नेही श्री. शामराव सासरे या मताशी सहमत होतील.

शरद शामराव अपराजित
अ‍ॅग्रीकल्चर एक्स्टेन्शन ऑफिसर
बीड जि. म. सह. बँक लि.
शाखा – दिंद्रूड

---

### पुस्तकांच्या धंद्यावर मोठे संकट

छापण्याच्या कागदाच्या तीव्र टंचाईमुळे पुस्तक प्रकाशनाच्या धंद्यावर फार मोठी आपत्ती कोसळू पाहात आहे. ह्या आपत्तीचा फार मोठा तडाखा विद्यार्थ्यांना बसणार आहे. पुढील वर्षी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके अगर वह्या मिळणे जवळजवळ अशक्य होणार आहे. शिवाय कागदी बांधणीच्या स्वस्त पुस्तकांच्या उत्पादनातही खूप मोठी घट होण्याची शक्यता आहे. भारताच्या पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात शिक्षणाचा विस्तार करण्याची मोठी योजना समाविष्ट करण्यात आलेली आहे. परंतु कागदाची टंचाई अशीच राहिली तर कार्यक्रमात ठरविण्यात आलेली पुस्तकांची निर्मिती करणे कठीण होऊन बसेल. आणि परिणामी शिक्षणाच्या विस्ताराची सर्व योजनाच विस्कळीत होऊन जाईल अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### बालकांसाठी मुक्या प्राण्यांचे संग्रहालय

पाश्चिमात्य देशांत मुलांच्या अंगातील गुणांचा विकास घडवून आणण्याचे प्रयत्न पद्धतशीरपणे करण्यात येतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी पशुपक्ष्यातील मित्र त्यांना असावे असा तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. असे मित्र लाभले तर प्राणिवर्गाबद्दल बालकांना अधिक ममत्व वाटू लागेल ही दृष्टी ठेवून कॅलिफोर्निआतील एका वाचनालयातील बालविभागात घरी बाळगता येण्यासारखे पशुपक्षी ठेवण्यात आले आहेत. संग्रहालयातील प्राणी मुलांना तात्पुरत्या काळापुरते घरी नेता येतात. सध्या अशा प्राण्यांची संख्या फक्त २० आहे. वाचनालयातून नेलेला प्राणी १ आठवडा ठेवून घेता येतो. त्याच्या खाण्यापिण्याची व्यवस्थाही करण्यात येते. बालविभागाच्या २०० सभासदांना एकाच वेळी मुके दोस्त अर्थातच मिळू शकत नाहींत.

---

### पुरामुळे झालेली जबर हानी

लोकसभा आणि राज्यसभा ह्या दोन्ही सभागृहांतून देशांत आलेल्या पुरामुळे झालेल्या जबर हानीची माहिती देण्यात आली. ह्या वर्षी आलेल्या मोठ्या पुरामुळे मालमत्तेची ४८५ कोटी रुपयांची हानी झाली. १९५३ ते १९७३ ह्या कालांत पुरामुळे झालेल्या हानीच्या बाबतीत ह्या आकड्याचा क्रमांक दुसरा लागतो. १९७१ साली सर्वांत अधिक नुकसान झाले होते. त्यावेळी सुमारे ६८१ कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. पुरामुळे १९५३ ते १९७२ ह्या अवधीत–दरसाल सुमारे १२६ कोटी रुपयांची सरासरी हानी झाल्याचे दिसून येते. राज्य सरकारांनी विनंती केल्यावरून मध्यवर्ती सरकारची नुकसान पाहणी मंडळे अनेक राज्यांत दौरा करून गेली आणि त्यांनी मदतीसाठी लागणाऱ्या खर्चाचे अंदाज सरकारला सादर केले.

---

### अमेरिकन आरमार सर्वांत बलाढ्य नाही

अमेरिकन आरमार आता जगातील सर्वांत बलाढ्य आरमार राहिलेले नाही. तथापि वेळप्रसंगी सामरिक हस्तक्षेप करण्याचे त्याचे सामर्थ्य दांडगे आहे. पश्चिम आशिआतील अरब-इस्राइल युद्धाच्या वेळी भूमध्य समुद्रात हस्तक्षेप करण्याच्या तयारीने ते उभे होते. भारत पाकिस्तानात १९७१ साली झालेल्या युद्धप्रसंगीही बंगालच्या उपसागरात अमेरिकेचे नाविक दल आले होते. अमेरिका व रशिआ ह्या दोन देशांपैकी कोणाचे आरमार अधिक प्रबल झाले आहे ते सांगणे कठीण आहे. रशिअन आरमारात नव्या बोटींचा समावेश अधिक आहे. त्यातील कोणतीही बोट १० वर्षांपेक्षा अधिक जुनी नाही. रशिआच्या पाणबुड्याही अधिक आहेत. परंतु अमेरिकेच्या आरमारात अणुशक्तीवर चालणाऱ्या विमानवाहू बोटी अधिक आहेत.

---





प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आतां भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर ®

किर्लोस्कर एंजिन–शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३

® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315-M

## नोकरी करणाऱ्या स्त्रिया आणि अपत्यसंभव

नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घरी बसणाऱ्या स्त्रियांपेक्षा कमी मुले हवी असतात अगर होतात काय ? १९६० साली इजिप्तच्या शिरगणतीत गोळा करण्यात आलेल्या माहितीच्या आधारे ह्या प्रश्नावर काही प्रकाश पडण्यासारखा आहे. माहितीचे पृथःकरण केल्यावर असे आढळून आले की नोकरीचा परिणाम स्त्रियांच्या जननक्षमतेवर जरूर होतो. पण ह्या बाबतीत शहरातील स्त्रिया आणि ग्रामीण- भागांतील स्त्रिया ह्यांच्यात फरक दिसून येतो. १५ ते ४५ ह्या वयाच्या गटातील शहरी नोकरदार स्त्रियांना शहरातील घरकाम करून कालक्रमणा करणाऱ्या स्त्रियांपेक्षा कमी मुले होतात. वयाचा हा गट जननक्षमतेच्या दृष्टीने कार्यक्षम असतो. ग्रामीण भागांतील चित्र मात्र अगदी उलट दिसते. ग्रामीण भागांत स्त्रियांची संख्या जितकी जास्त तितकी मुलांची संख्याही जास्त वाढते. ग्रामीण भागांतील कामधंदा नसणाऱ्या स्त्रियांची जननक्षमता शहरातील अशाच स्त्रियांपेक्षा खालच्या पातळीवर असलेली दिसते. कामधंदा न करणाऱ्या शहरी आणि ग्रामीण स्त्रियांमधील जननाचे प्रमाण दरहजारी अनुक्रमे ४९ व ४२ असे दिसून आले. कामधंदा आणि स्त्रिया ह्यांच्या बाबतीत आणखी एक गोष्ट लक्षात येते. ग्रामीण अगर शहरी भागातील १० टक्क्यांपेक्षा अधिक स्त्रिया कामधंदा करू लागल्या की शहरातील जननसंख्येचे प्रमाण कमी होते आणि ग्रामीण भागातील वाढते. ह्यावरून असा निष्कर्ष काढण्यासारखा आहे की उत्पन्नात वाढ झाली म्हणजे कुटुंबे छोटी होत जातात असा सामान्य नियम घालून देता येण्यासारखा नाही. अविकसित देशातील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. ग्रामीण भागांतील कामकरी स्त्रिया आणि त्यांना होणारी मुले अशा सामान्य नियमाला अपवाद ठरतात.

---

## रेल्वे एंजिनांच्या उत्पादनवाढीचा कार्यक्रम

पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालावधीत रेल्वे खात्याने रेल्वे एंजिनांच्या उत्पादनात वाढ करण्याची योजना आखली आहे. ह्या अवधीत मुख्य रेल्वेमार्गावर वापरण्यासाठी ११५० रेल्वे एंजिने तयार करण्यात येणार आहेत. त्यांपैकी ७५० डिझेल एंजिने असतील आणि ४०० विजेवर चालणारी असतील. चित्तरंजन रेल्वे एंजिनांच्या व वाराणसी रेल्वे एंजिनांच्या कारखान्यांत त्यांचे उत्पादन करण्यात यावयाचे आहे. वाराणसी येथील डिझेल एंजिनाच्या कारखान्यात १९७६-७७ साली सर्वांत अधिक म्हणजे १५५ एंजिने तयार करण्यात येतील. पाचव्या कार्यक्रमाच्या अवधीत हा वेग कायम ठेवण्याच्या प्रयत्न करण्यात येईल. १९७२-७३ साली ह्या कारखान्यात ९५ डिझेल एंजिने तयार करण्यात आली होती. चित्तरंजन येथील कारखान्यात आता वाफेवर चालणारी एंजिने तयार करण्यात येत नाहीत. ह्या कारखान्यात १९७४-७५ च्या सुमारास ६० विजेची एंजिने तयार करण्यात येतील. त्यानंतर त्यांच्या उत्पादनाची गती वाढून १९७८-७९ च्या सुमारास १०० विजेची एंजिने तयार करण्यात येऊ लागतील. १९७२-७३ साली कारखान्यात ५५ एंजिने तयार करण्यात आली होती. चित्तरंजन येथील कारखान्यात गाड्यांची स्थानिक वाहतूक करणारी तेलाची एंजिनेही तयार करण्यात येणार आहेत. कारखान्यात तयार होणारी सर्व एंजिने दर्जाच्या बाबतीत प्रगत देशांत तयार होणाऱ्या एंजिनांइतकी चांगली असतील. एंजिनात वापरण्यात येणाऱ्या भागांपैकी ८० टक्के भाग देशातच तयार झालेले असतात. काही खास भागच परदेशातून आयात करावे लागतात. सध्या रेल्वे जवळ १,४०० डिझेल एंजिने आणि विजेवर चालणारी ७०० एंजिने आहेत.

---

## वेगवान गाड्या अधिक किफायतशीर

हिंदुस्तानसारख्या विस्तीर्ण देशात उतारूंची व मालाची वाहतूक करण्याच्या कामी अजूनही रेल्वे गाड्यांचाच अधिक उपयोग करण्यात येतो. प्रगत देशांतील रेल्वेच्या वेगाशी तुलना करता भारतामधील गाड्यांचे वेग कमी आहेत. तथापि अलीकडेच काही मार्गांवरील उतारूंच्या गाड्यांचे वेग वाढविण्यात येऊन प्रवासाचा काळ कमी करण्यात आला आहे. वेगवान प्रवासी गाड्या केवळ उतारूंच्या दृष्टीनेच सोयीस्कर असतात असे नाही. रेल्वेचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनेही त्या उपयुक्त ठरत आहेत. हौरा-दिल्ली आणि मुंबई-दिल्ली ह्यांसारख्या महत्त्वाच्या शहरांना जोडणाऱ्या रेल्वेमार्गांवर सुरू करण्यात आलेल्या राजधानी एक्सप्रेस गाड्यांसंबंधीची माहिती हेच सांगत आहे. नवी दिल्ली ते हौरा मार्गावर आठवड्यातून दोनदा राजधानी एक्सप्रेस गाडी धावते. १९७२-७३ साली ह्या गाडीने प्रत्येक खेपेला ४० हजार रुपये मिळविले. गाडी पळण्यासाठी प्रत्यक्ष आलेला खर्च दर खेपेला सरासरी १४ हजार रुपये आला. मुंबई-दिल्ली ह्या मार्गावर धावणाऱ्या राजधानी एक्सप्रेसने दर खेपेला ३३ हजार रुपये मिळवून दिले. तिचा प्रत्येक खेपेचा सरासरी प्रत्यक्ष खर्च १८,९०० रुपये इतका होता. ह्या दोन्ही गाड्यांवर उतारूंच्या खाण्यापिण्याची सोय करण्यात आलेली असते. त्याचा खर्च मात्र वरील हिशेबात लक्षात घेतलेला नाही. मुंबई-दिल्ली राजधानी एक्सप्रेस दर तासाला सरासरी ९५ किलोमीटर वेगाने धावते; हौरा-दिल्ली राजधानी एक्सप्रेस गाडी दर तासाला सरासरी १०५ किलोमीटर वेगाने धावते. दोन्ही गाड्यांत झोपण्याच्या १८ जागा असलेला वातानुकूलित एकेक डबा असतो.

---

**जपानचे कर्ज पुरेसे नाही**—पाचव्या पंचवार्षिक कार्यक्रमात जपानच्या मदतीने ५ खतकारखाने काढण्याचे ठरविण्यात आले होते. परंतु आता फक्त ३ कारखान्यांना पुरेल इतकेच येनमधील कर्ज देण्यात येईल, असे जपानने भारत सरकारला कळविले आहे. त्यामुळे आता पाचाऐवजी तीनच खतकारखाने उभारण्याचा निर्णय भारत सरकारला घ्यावा लागला आहे.

### शेतीच्या उत्पन्नात पंजाब राज्य पहिले

आर्थिक आणि शास्त्रीय संशोधन करणाऱ्या संघटनेने केलेल्या पाहणीप्रमाणे गेल्या दहा वर्षांत देशातील अन्नधान्याचे उत्पादन ८,२४५ कोटी रुपये किंमतीने वाढले आहे. अर्थव्यवस्थेचा विकास घडवून आणण्यासाठी अधिक साधनसामग्री गोळा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. ह्या संदर्भात पुढे पडलेल्या ह्या पावलाचे महत्त्व लक्षात येते. असे असले तरी अन्नधान्याच्या बाबतीतील वाढ निरनिराळ्या राज्यांत कमी-जास्त प्रमाणात झालेली दिसते. पंजाब राज्याने सर्वांत अधिक वेगाने प्रगती केलेली आहे. त्याच्या खालोखाल हरयाणाचा व गुजरातचा क्रमांक लागतो. पाच राज्यांनी गेल्या दहा वर्षांत फारशी प्रगती केल्याचे आढळून आले नाही. प्रगतीमधील संथपणात खालच्या अनुक्रमाने असा क्रम लागतो. बिहारमध्ये फारच अल्प प्रगती झाली. त्यानंतर आंध्र प्रदेश, बंगाल, आसाम आणि मध्य प्रदेश ह्यांचे क्रमांक लागतात. प्रत्येक राज्यांतील ग्रामीण भागांतील लोकसंख्या आणि त्या राज्यांचे शेतीचे एकूण उत्पन्न ह्यांची तुलना करता असे दिसून आले आहे की पंजाबमध्ये देशातील ग्रामीण लोकसंख्येपैकी २·२३ टक्के लोकसंख्या वसलेली आहे. तरीही भारताच्या एकूण शेतीच्या उत्पन्नापैकी ४·६ टक्के उत्पन्न पंजाबने दिलेले आहे. ग्रामीण भागांतील एकूण कुटुंबांपैकी ०·७९ टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न २० हजार रुपयांपेक्षा अधिक आहे देशाच्या एकूण शेतीच्या उत्पन्नापैकी ह्या कुटुंबांच्या उत्पन्नाचा हिस्सा ९·८ टक्के इतका आढळून आला. सधन शेतकऱ्यांचा नवा वर्ग तेथे अस्तित्वात आल्याचा हा पुरावा आहे.

---

### अनिश्चित वीज-पुरवठ्याचा शिरगणतीच्या कामावर परिणाम

दिल्ली शहराला होणारा वीजपुरवठा गेल्या काही महिन्यांत अपुरा व अनिश्चित स्वरूपाचा झाला होता. त्याच्या दाबातही अचानक मोठा बदल होत असे. त्याचा परिणाम १९७१ च्या शिरगणतीत जमा केलेल्या माहितीचे संस्करण करण्याच्या कामावर झाला आहे. आता हे काम पुरे होण्यास आणखी ६ महिन्यांचा तरी अवधी लागणार आहे. संस्करणाचे काम करणाऱ्या सेवकांची संख्या २०० असून त्यांना गणकयंत्रांची मदतही देण्यात आलेली आहे. जमा केलेल्या माहितीची वर्गवारी करून तिची मांडणी पद्धतशीरपणे करण्याचे काम गणकयंत्रांच्या साहाय्याने खूप लवकर करता येते. परंतु गणकयंत्रांना त्यांचे काम सुलभतेने करणे शक्य होण्यासाठी ४०० व्होल्ट दाबाच्या वीजपुरवठ्याची आवश्यकता असते. विजेच्या दाबाची स्थिरता काही विशिष्ट पातळीवर राखण्याची व्यवस्था करण्यात आलेली असते. परंतु काही वेळेला दाबात फार चढउतार होतात आणि मग ही व्यवस्था कोलमडून जाते. त्याचा परिणाम गणकयंत्राच्या कामावर होतो. गणकयंत्रांना पुरविण्यात येणाऱ्या माहितीची नोंद ती घेईनाशी होतात; अगर ती सर्वस्वी चुकीची उत्तरे देऊ लागतात. शिरगणतीचे काम करणाऱ्यांना हा अनुभव चांगलाच जाणवला. देशात सर्व भागांत ह्या वर्षी विजेचा पुरवठा अपुरा होता. त्याचा परिणाम शिरगणतीचे काम करणाऱ्या ६ उपकेंद्रांवरही झाला आहे. जमा केलेल्या माहितीचे सर्व संस्करण चालू वर्षाअखेर कसेबसे झाले तरी शिरगणतीचा अहवाल प्रसिद्ध होण्यास वेळ लागणार आहे. तथापि, त्यातले महत्त्वाचे भाग आधी प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे.

---

### पेट्रोल तेलाचे राजकारण

जगातील नऊ देश जपान, प. जर्मनी, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, इटली इत्यादी औद्योगिक राक्षसांना वठणीवर आणू शकतात— त्यांचे शस्त्र आहे पेट्रोल-तेल !

अबुधाबी, अल्जेरिया, बेहरिन, इराण, इराक, कुवेत, लिबिया, कातार आणि सौदी अरेबिया हे ते नऊ देश होत.

पश्चिम युरोपच्या पेट्रोल-तेल पुरवठ्यापैकी ८० ते ८५% पुरवठा हे देश करतात; जपानची पेट्रोल-तेलाची ९०-९५% गरज हे देश भागवितात. अमेरिकेला लागणाऱ्या पेट्रोल-तेलापैकी २५% तेल कॅनडातून आणि वेनेझुएलातून येते; मध्यपूर्वेतील देश फक्त ३ ते ५% तेल पुरवितात. परंतु, अमेरिकेची ह्या तेलाची गरज वाढत जाण्याचा रंग दिसतो.

अशा रीतीने, पश्चिम युरोप, जपान आणि अमेरिका मध्यपूर्वेतील पेट्रोल-तेलासाठी स्पर्धेत उतरतील; रशिया अर्थातच आपली पकड वाढविण्याचा प्रयत्न करील. आंतरराष्ट्रीय तेढीचे मध्यपूर्वेतील हे पेट्रोल-तेलाचे देश केंद्रस्थान बनतील.

पेट्रोल-तेलाची जागा घेणारी एखादी नवी शक्ती उपलब्ध होईल किंवा तेलाच्या विहिरींचा नव्या जागी शोध लागेल तर गोष्ट वेगळी; आहे ह्या परिस्थितीत मध्यपूर्वेतील पेट्रोल-तेलाचे महत्त्व वाढत जाणार हे निश्चित.

अमेरिका एकीकडे इस्राएलला लष्करी साहित्याची भरपूर मदत करीत असून दुसरीकडे अरबी देशांच्या तेलावर डोळा ठेवून आहे.

---

**हिशेब ठेवण्याची पद्धत प्राचीन** — हिशेब ठेवण्याची पद्धत भारतात फार प्राचीन कालापासून नांदत आहे. शिवाय विकासही भरपूर झालेला होता. वेदकाली आणि त्याच्याही पूर्वी भारतीय उपखंडात हिशेबाच्या विकसित पद्धती रूढ होत्या. "भारतामधील हिशेब ठेवण्याच्या पद्धतीचा इतिहास" ह्या ग्रंथात, दि इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् संघटनेने ही माहिती दिली आहे.

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बर्फ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

कर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३२७१ कारखाना: ३५५१०१

## आम्ही आता आपल्या ठेवींवर दरमहा व्याज देतो.

आपल्या मासिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास आमचाही हातभार व्हावा या हेतूने आम्ही ही नवी ठेवयोजना निर्मिली आहे. आपण किमान रु. १००० अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्याकडे मासिक व्याज ठेवयोजनेखाली किमान २४ महिने पर्यंत ठेवा.

आमच्याकडून दरमहा मिळणाऱ्या व्याजातून आपण आपले भाडे, विद्युत बिल, टेलिफोन बिल, गॅस बिल, अशापैकी कोणतेही एक अथवा अनेक खर्च भागवू शकता.

**दरमहा व्याज मिळत राहून मूळ ठेव सुरक्षित राहते हे ह्या योजनेचे वैशिष्ट्य आहे.**

अधिक तपशिलाकरता नजीकच्या आमच्या शाखेस आजच भेट द्या.

# बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस – ११७७, बुधवार पेठ, पुणे – २



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. वार्षिक वर्गणी रु. ६


ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, ५ डिसेंबर, १९७३ | अंक २२


## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवे तसे मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचे मोकळे मोकळे वाटणारे सुती कापड अगदी साजेसे असते: पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स–कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चित वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही, अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्रॉक वगैरेचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

TF **ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राऊन * हिन्दुस्थान युनिट नं. १ * हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई–१.

Madison/TGM/7 Mar

**ऑस्ट्रेलियाचा स्त्री-क्रिकेट संघ**—ऑस्ट्रेलियातील स्त्रियांचा एक क्रिकेट संघ चालू हिवाळ्यात भारताचा दौरा करणार आहे. त्यांच्याशी खेळण्यासाठी भारतीय स्त्री-क्रिकेट संघाची निवड पुढील महिना अखेर होईल. भारतीय खेळाडू २५ वर्षांच्या आतील असतील.

**फराक्का धरणाच्या परिणामाचा अभ्यास**—बांगला देशाच्या कुस्तिआ जिल्ह्यात पाणी पुरवण्यासाठी धरण बांधण्यात येणार आहे. भारतात बांधण्यात येत असलेल्या फराक्का धरणामुळे बांगला देशाला पाणी कमी मिळेल असे त्या देशाचे म्हणणे आहे. भारताच्या धरणाचा काय परिणाम होईल ह्याचा अभ्यास करण्यासाठी ४ रशिअन तज्ज्ञांचे मंडळ ढाक्क्याला आले आहे.

**नोंदलेले सुशिक्षित बेकार**—उद्योग विनिमय केंद्रावर ३० जून १९७२ रोजी नोंद असलेल्या सुशिक्षित बेकारांची संख्या ३५·२२ लक्ष एवढी होती. त्यांपैकी १८·६८ लक्ष मॅट्रिक झालेले होते, ९·७७ लक्ष पदवीपूर्व परीक्षेपर्यंत आलेले होते, ६·२१ लक्ष पदवीधर होते आणि ५४,००० पदव्युत्तर परीक्षा दिलेले होते.

**धूम्रपान करणारांना इशारा**—सिगारेट्सच्या पाकिटांवर धूम्रपानातील धोक्याचा इशारा देणारा मजकूर छापण्याची सिगारेट कारखानदारांवर सक्ती करणारा कायदा मध्यवर्ती सरकार तयार करीत आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने अशा कायद्याची मागणी केली होती. आकाशवाणीवरून धूम्रपानाच्या दुष्परिणामांची माहिती वरचेवर देण्यासाठी यंत्रणा उभारली जात आहे.

**पाण्यात बुडून मरण्याचे अपघात**—भारतात दरसाल ४०,००० लोक पाण्यात बुडल्याने मरण पावतात. अशा रीतीने मृत्यू पावणाऱ्या, जगातील प्रत्येक तिनांत किंवा चौघांत एक जण भारतीय असतो. महापूर, प्रचंड समुद्रकिनारा, हजारो नद्या, कालवे, तळी, इत्यादींचा तो परिणाम आहे.

**दारूचा खप वाढला**—महाराष्ट्रात ३१ ऑक्टोबर, १९७२ रोजी संपलेल्या वर्षी विदेशी दारूचा खप १६·५५ लक्ष लिटर झाला होता; नोव्हेंबर, १९७२ ते सप्टेंबर १९७३ ह्या बारा महिन्यांत तो ४६·९५ लक्ष लिटरवर गेला. बिअरचा खप ८५·६९ लक्ष लिटरवरून १०९·३३ लक्ष लिटरवर गेला. वाइनची विक्री २५ लक्ष लिटरवरून ३४ लक्ष लिटरवर गेली. महाराष्ट्रातील दारूचे उत्पादन मागणीपेक्षा कमी असल्यामुळे त्याची बाहेरून आयात करावी लागते.

**श्रीलंका (सिलोन) मध्ये केक्सना बंदी**—श्रीलंका सरकारने बेकऱ्यांना केक्स बनविण्यास बंदी केली आहे. पावाऐवजी केक्स बनवून पाव खाणारांची गैरसोय करण्यास त्यामुळे आळा बसेल.

**'हाउसफुल' सिनेमागृहात न विकलेली २,३६९ तिकिटे**—मुंबईच्या कुलाबा विभागातील स्ट्रँड सिनेमात शुक्रवार ते रविवारचा अडव्हान्स बुकिंगचा फलक 'हाउसफुल' दर्शवीत होता. सी. आय. डी. ने छापा घातला, तेव्हा ९ खेळांच्या ५,१६६ तिकिटांपैकी फक्त २,७९७ तिकिटे विकली गेलेली होती. न विकलेल्या तिकिटांपैकी ७०० तिकिटे सिनेमागृहाच्या मालकाच्या कचेरीतच सापडली.

**ला. इं. कॉर्पोरेशनची मोठ्या उद्योगसमूहांना कर्जे**—लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनने ह्या वर्षाच्या सप्टेंबरअखेर प्रायव्हेट सेक्टरमधील उद्योगांना मंजूर केलेल्या कर्जांपैकी ४२% रक्कम मोठ्या उद्योगसमूहांना मिळाली. मंजुरीच्या प्रमुख रकमा अशा होत्या:—टाटा २५·७९ कोटी रु., बिर्ला २०·६५ कोटी रु., एसीसी ४·३३ कोटी रु., बंगूर ५·३७ कोटी रु., आय सी आय ६·२४ कोटी रु., जे. के. सिंघानिया २·६४ कोटी रु., किलिक ७·२० कोटी रु., मफतलाल ६·८७ कोटी रु., श्रीराम ४·०४ कोटी रु., वालचंद १·५० कोटी रु. अर्थात मंजूर झालेली सर्व रक्कम प्रत्यक्ष दिली गेलेली नाही.

**विदेशी ब्रँडच्या पेयांना बंदी करा**—फँन्टा, कोकोकोला, इत्यादी विदेशी ब्रँडची नावे वापरण्यास सॉफ्ट ड्रिंक्सच्या कारखानदारांना बंदी करावी, असे खासदार श्री. मधु लिमये ह्यांनी सुचविले आहे. भारतात पेयांच्या बाटल्या भरणाऱ्या १०० कंपन्यांपैकी ५० कंपन्या विदेशीयांच्या हितसंबंधाचा अनुनय करूनच पैसा कमावीत आहेत. पेयाचा दर्जा तोच असला तरी विदेशी ब्रँडच्या नावाची पेये अधिक खपतात. त्यामुळे ह्या धंद्यात अनिष्ट स्पर्धा चालते. ब्रँड नावांना बंदी केली म्हणजे पेयाच्या दर्जावरच त्याचा खप अवलंबून राहील.

**रुपयाची किंमत ३६ पैसे**—१९४९ मधील ग्राहकांच्या खरेदीच्या किंमतीचा निर्देशांक १०० धरला, तर रुपयाची क्रयशक्ती आता (जानेवारी—सप्टेंबर १९७३) ३६ पैशांवर घसरली आहे, असे सरकारतर्फे राज्यसभेत सांगण्यात आले. १९५० ते १९६२ ह्या मुदतीत रुपयाच्या किमतीत फक्त २% घट झाली, १९६३ ते १९६७ ह्या मुदतीत रुपयाची किंमत दरसाल ६% ने घसरत गेली, १९६८ ते १९६९ मध्ये रुपयाची किंमत टिकून राहिली पण १९७२-७३ मध्ये ती वेगाने घसरली.

**रेल्वे तिकिटांवर सरचार्ज**—रेल्वे अपघातांची नुकसानभरपाई जास्त देता यावी, उतारूंची सुरक्षितता वाढविता यावी आणि उतारूंना जास्त सुखसोई उपलब्ध करून देता याव्यात, ह्यासाठी रेल्वे उतारूंच्या तिकिटावर ७ पैसे ते रु. १·५० सरचार्ज बसविण्याचा सरकारचा विचार आहे.

**प्रमुख उद्योगसमूह**—१९७१ च्या माहितीप्रमाणे भारतातील सर्वांत मोठ्या जिंदगीचा उद्योगसमूह म्हणजे टाटांचा, (७०२ कोटी रु.). त्यानंतर बिर्लांचा अनुक्रम येतो. (४९७ कोटी रु.) २० कोटी रु. पेक्षा जास्त जिंदगीचे इतर प्रमुख उद्योगसमूह असे:—मफतलाल (२३५ कोटी रु.), मार्टिन बर्न (१६८ कोटी रु.), आय सी आय (१३७ कोटी रु.), थापर (१२९ कोटी रु.), एं सी सी (१२८ कोटी रु.), श्रीराम (११४ कोटी रु.), सिंघानिया (१०९ कोटी रु.).

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ५ डिसेंबर, १९७३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## अरब देशांना स्वतःच्या सामर्थ्याचा झालेला साक्षात्कार
### तेलाच्या प्रत्यक्ष चापापुढे अणुबाँबची धास्ती काहीच नाही !

उत्तर आफ्रिका आणि पश्चिम अशिया ह्यांतील अरबी देशांतच पेट्रोल-तेलाचा साठा विपुल आहे आणि त्या तेलावरच जगातील प्रमुख औद्योगिक राष्ट्रे अवलंबून आहेत. अरबी राष्ट्रांनी काही टक्क्यांनी जरी तेल-पुरवठा कमी केला, तरी औद्योगिक राष्ट्रांची नाकेबंदी होण्याची पाळी येते, ह्याचा कटू अनुभव जपान, अमेरिका, ग्रेट ब्रिटन, युरोपातील देश, ह्यांना चांगलाच आला आहे. अरब-इस्राएल लढ्यात अरब देशांनी तेलाचा राजकीय हत्यार म्हणून वापर करण्याचे ठरविताच प्रबळ देशही अरबांच्या बाजूने बोलू लागले आणि इस्राएलचे मित्र त्यांस सोडून जाऊ लागले. अरब देशांच्या पुढाऱ्यांना स्वतःजवळील ह्या अमोघ शस्त्राच्या परिणामकारकतेची आता चांगलीच प्रचीती आली आहे आणि त्यामुळे ते शस्त्र पाजळण्याचा मोह आवरणे त्यांना अशक्य झाले आहे. अरब-इस्राएल युद्ध हे त्याला निमित्त झाले आहे आणि हे निमित्त जरी संपले तरीसुद्धा जागतिक आर्थिक व राजकीय घडामोडींवरील अरबांचे दडपण वाढतच जाणार आहे. ह्यापुढील महत्त्वाच्या जागतिक चर्चांतून अरबांना वगळणे अशक्य होऊन बसेल. अणुबाँबपेक्षाही व्यावहारिक दृष्टया प्रभावी आणि इच्छेप्रमाणे कमी-अधिक प्रमाणात केव्हाही वापरता येण्याजोगे हे सामर्थ्यशाली शस्त्र त्यांच्या हाती आहे. संहार करण्याचा अणुबाँबचा धाक कितीही मोठा असला, तरी तेलपुरवठा तोडण्याचे शस्त्र छळाच्या स्वरूपाचे, अधिक तातडीने परिणामकारक ठरणारे आहे. अरबी देश त्यांना तेलविक्रीचे मिळणारे धन विदेशी बँकांतून ठेवतात; आंतरराष्ट्रीय चलन-व्यवस्था कोसळून टाकण्याचे किंवा ती सावरण्याचे सामर्थ्य ह्या प्रचंड निधींमध्ये आहे. त्याचा प्रयोग अद्याप व्हावयाचा आहे.

प्रत्येक देशाला स्वतःच्या जिंदगीचा स्वतःच्या हिताच्या दृष्टीने उपयोग करण्याचा हक्क आहे, हे कुणालाच नाकबूल करता येणार नाही. तेव्हा आता प्रत्येक देश अरबी देशांना खूष करण्याचा प्रयत्न करू लागेल, असा संभव दिसतो. ज्या प्रमाणात अरबांना पाठिंबा, त्या प्रमाणात तेलपुरवठा, असे अरबी राजकारण आहे. आफ्रिकी, कृष्णवर्णीय देशांना भरभक्कम मदत करून त्यांनाही श्वेतवर्णीयांविरुद्ध चेतविणे, हा अरबी देशांचा डाव आहे. अरबांच्या तेलावाचून औद्योगिक देशांचे चालणारच नाही; त्यांचे सर्वच व्यवहार पेट्रोलतेलाशी निगडित आहेत. कोणत्याही देशाला तेलाचे बाबतीत स्वावलंबी होण्यास दीर्घ काळ लागेल आणि त्यासाठीही खूपच मोठ्या प्रमाणावर भांडवली गुंतवणूक करावी लागेल. कित्येक देशांना कदाचित पर्याय सापडणारही नाही. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी बेचिराख होऊन त्याचे सर्व कारखाने मोडण्यात आले. त्यामुळेच जर्मनी नवी तंत्रे वापरून मातब्बर होऊ शकला, तसाच परिणाम तेलाच्या तुटवड्यामुळे घडून येईल, असे जर्मन नेते बोलून दाखवीत आहेत. अरबी देशांना स्वतःच्या सामर्थ्याचा झालेला हा साक्षात्कार आणि त्यांची अरब-इस्राएल युद्धाच्या निमित्ताने झालेली एकजूट, ही १९७३ मधील सर्वांत महत्त्वाची घटना आहे. इस्राएलने बळकाविलेला अरब प्रदेश परत मिळण्यासाठी अरबांनी केलेले सर्व प्रयत्न निष्फळ झाले, प्रबळ राष्ट्रांनी इस्राएलच्या आक्रमणालाच उत्तेजन दिले, त्यातून निर्माण झालेला हा भस्मासूर आहे. अणुशक्तीचा उपयोग विकासाकडे त्याचप्रमाणे संहाराकडेही होऊ शकतो; तेलशक्तीचेही तसेच आहे. ह्या दोन प्रकारच्या शक्तींच्या देशांच्या सामन्यातून विकसनशील आणि अविकसित देशांचे पुढे काय होणार, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. ह्या संदर्भात रशियन नेते कोसिजिन ह्यांच्या भारत-भेटीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. भारताने इस्राएलविरोधी धोरण आजवर स्वीकारण्याची कारणे काहीही असोत; आज ते धोरण फलदायी ठरले आहे.

---

### इंदिराजी दररोज १६ ते १८ तास काम कशामुळे करू शकतात ?

“ माझ्या काही चरित्रलेखकांनी वर्णिल्याप्रमाणे मी लहानपणी कधीच ‘पाप्याची पितर’, रोड आणि क्षीण नव्हते. वडिलांच्या शिस्तीखाली मी नियमित व्यायाम घेत असे, दररोज एक मैल पळत असे, थंड पाण्याने स्नान करीत असे. घोडदौड आणि गिर्यारोहण ह्यांचीही मला आवड होती. मी शेलाटी—सडपातळ—खासच होते, पण अशक्त कधीच नव्हते. माझ्या लहानपणी मी सक्त व्यायाम केला नसता, तर आताप्रमाणे दररोज १६ ते १८ तास काम करूच शकले नसते. माझे वडील आणि आजोबा, दोघेही शारीरिक तंदुरुस्तीचे महत्त्व जाणणारे होते. मोतीलाल नेहरूंनी इंग्लंडला कुस्तिगीर संघ नेला, त्यात जगप्रसिद्ध मल्ल गामा हा होता. ”—दिल्ली येथील स्पोर्ट्स स्टेडिअमच्या उद्घाटनाच्या वेळी श्री. इंदिराजींनी केलेले भाषण.

---

## सायकलीला पुन्हा चांगले दिवस

पश्चिम युरोपातील देशांत पेट्रोलची टंचाई जाणवली गेल्यामुळे अनेक देशांत रविवारची मोटारींची सहल रद्द करावी लागली आहे. भारतात अनेक मोटारवाले आता स्कूटरने अगर सार्वजनिक वाहनांनी प्रवास करण्याचा विचार करीत आहेत. युरोपातील देशांत तर सायकलींना पुन्हा चांगले दिवस येऊ लागले आहेत. अमेरिकेत सायकली वापरणाऱ्या तरुणांची संख्या वाढत होतीच, आता ती आणखी जोराने वाढू लागेल. गेल्या वर्षी भारताने अमेरिकेला निर्यात केलेल्या सायकलींची संख्या वाढलेली दिसून आली. अरब देशांनी तेलाची कृत्रिम टंचाई निर्माण केल्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. लंडनमध्ये सायकलवाल्यांबद्दल आस्था असणारी एक मध्यवर्ती संघटना आहे. तिने तर सर्वांनी सायकलीचा वापर सुरू करावा म्हणून मोहीमच सुरू केली आहे, इतकेच नव्हे तर सायकलस्वारांच्या हितासाठी वाहतुकीच्या व्यवस्थेत सुधारणा करण्याच्याही मागण्या केल्या आहेत. त्यांपैकी काही अशा : सर्व मोठ्या रस्त्यांवर सायकलींसाठी वेगळे मार्ग आखून देण्यात यावेत. सायकलींना रस्त्यांच्या वापरात अग्रहक्क देण्यात यावेत आणि त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी मोटारी प्रमाणेच दिव्यांच्या अगर इतर खुणा चालू करण्यात याव्या. ब्रिटनमध्ये आज सायकलींपेक्षा मोटारींची संख्या जास्त आहे. सायकलींची संख्या सुमारे १·२ कोटी असून त्या बहुधा १५-१६ वर्षांची मुले वापरतात पश्चिम युरोपातील देशांत सायकलींची मागणी एकदम वाढल्याने पुरवठा अपुरा पडत आहे.

---

## पाकिस्तानच्या विघटनेची सडेतोड चिकित्सा

भारत आणि पाकिस्तान ह्यांच्यात १९७१ अखेर झालेल्या युद्धात पूर्वीचा पूर्व पाकिस्तान फुटून बांगला देश उदयास आला. ह्या घडामोडीची चौकशी करण्यासाठी पाकिस्तान सरकारने एक कमिशन नेमले. ह्या कमिशनपुढे साक्ष देताना पाकिस्तानमधील पुढारी मलिक गुलाम जिलानी ह्यांनी त्या देशाच्या २४ वर्षांच्या इतिहासाची सडेतोड चिकित्सा केली आहे. जिलानी म्हणतात की, इतिहास-लेखन करताना पाकिस्तानचा उल्लेख देश म्हणून करता येणार नाही २५ वर्षे संतत करण्यात आलेला एक भयंकर गुन्हा म्हणून त्याची दखल घ्यावी लागेल ह्या गुन्ह्यातील एक कृत्य १९७१ च्या मार्चपासून डिसेंबरपर्यंत पूर्व पाकिस्तानात चालू होता आणि अखेर भारताच्या श्रेष्ठ सामर्थ्यापुढे पाकिस्तानचा पराभव झाला. भारताची शक्ती ही त्याच्या श्रेष्ठ धैर्यात आणि श्रेष्ठ नीतिमत्तेत साठविलेली होती. भारताचे नैतिक सामर्थ्य जीवनासक्त होते तर पाकिस्तानचे नीतिधैर्य मृत्यूला सामोरे जाणार होते पूर्व पाकिस्तानात भारताने प्रवेश केला तेव्हा त्याची सदसद्विवेक बुद्धी पूर्णपणे जागरूक होती. त्यापूर्वी जवळ जवळ वर्षभर भारतामधील वृत्तपत्रे पाकिस्तानमधील घटनांची चर्चा करीत होती. ह्या विषयावर पुस्तकेही लिहिली जात होती. युद्धात उडी घेण्याची हीच लोकशाही पद्धत आहे आणि तीच अखेर यशस्वी झाली. पूर्व पाकिस्तानात सनदशीर राज्य कारभार चालू असता तर युद्ध झाले नसते, शरणागती ओढवली नसती आणि पूर्व पाकिस्तानचा बांगला देशही झाला नसता. तेथे झालेला पराभव हा अर्थहीन जुलूमशाही आणि सत्तेसाठी करण्यात आलेल्या नीच कारवाया ह्यांचा परिणाम आहे.

---

## आणखी एका राजवाड्याचे प्रवासी हॉटेल

इंडिआ टुरिस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने म्हैसूरजवळील ललित पॅलेस ह्या नावाचा प्रासादतुल्य राजवाडा विकत घेतला आहे. हा भव्य राजवाडा म्हैसूरच्या महाराजांनी १९३० च्या सुमारास बांधला असून त्याचे बांधकाम मध्ययुगीन पद्धतीचे आहे. राजवाडा प्रसिद्ध चामुंडा टेकडीच्या पायथ्याशी किंचित उंच जागी बांधलेला असून तेथून आसपासचे दृश्य फारच लोभनीय दिसते. ब्रिटिश राजवटीत म्हैसूरच्या महाराजांनी हा राजवाडा व्हॉइसरॉय आणि त्याचा लवाजमा येईल त्या वेळी त्यासाठी खास राखून ठेवलेला असे. अजूनही त्यांतील सर्व सोयी व सजावटी चांगल्या स्थितीत राखलेली आहेत. तथापि हौशी प्रवाशांच्या अधिक सोयी करण्याच्या दृष्टीने राजवाड्याचे थोड्या फार प्रमाणात आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी १० लाख रुपये खर्च करण्यात येणार आहे. प्रासादांत ३० पाहुण्यांची आरामशीर राहण्याची सोय होऊ शकेल. राजवाड्याशेजारी असलेल्या आणखी एका इमारतीत ५० पाहुण्यांची सोय करता येईल. म्हैसूरच्या दक्षिणेला असलेले हे पहिलेच विलासी हॉटेल असेल. परदेशी व देशी प्रवाशांना पाहाण्यासाठी प्रसिद्ध अशी अनेक ठिकाणे म्हैसूरच्या जवळपास आहेत. भारतामधील देशी संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन झाल्यावर काही संस्थानिकांनी आपल्या मालमत्तेची विक्री करण्यास सुरुवात केली. उदयपूरजवळील सरोवरांत बांधलेल्या जलमंदिरात ह्यापूर्वीच प्रवासी हॉटेल सुरू झालेले आहे. ललित महाल राजवाड्यात बिलिअर्डचा हॉल, पोहण्याचा तलाव, इत्यादींची सोय आहे.

---

## संरक्षण कारखान्यात मालवाहू मोटारी

संरक्षणखात्याचे उत्पादनमंत्री श्री. शुक्ल नागपूर येथे बोलताना म्हणाले की, -जबलपूर येथील संरक्षणखात्याच्या कारखान्यात नागरी वाहतुकीसाठी लागणाऱ्या ४५ हजार मालवाहू मोटारींचे दरसाल उत्पादन करण्यात येईल. त्यांची माल वाहून नेण्याची क्षमता भिन्न भिन्न असेल. श्री. शुक्ल नागपूर येथे उद्योगपतींच्या एका बैठकीत भाषण करीत होते. ते पुढे म्हणाले की, नागपूरजवळील हिंगणा औद्योगिक वसाहतीत रस्ते तयार करण्यासाठी लागणारे रूळ तयार करण्याचा कारखाना काढण्यात येणार आहे. हा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागात स्थापन करण्यात येणार आहे.

---

# औद्योगिक विकासखात्याची महागाईची मीमांसा

भारत सरकारच्या औद्योगिक विकासखात्याने सध्या भरमसाट वाढलेल्या किमतीची आपल्या परीने कारणपरंपरा सांगितली आहे. खात्याच्या मीमांसेप्रमाणे भडकत्या किमती हा काही केवळ अवर्षण आणि विजेच्या उत्पादनातील घट ह्यांचा परिणाम नाही. दीर्घ कालावधीत परिणाम करणारी काही कारणेही किंमत-वाढीमागे आहेत. एक कारण असे सांगण्यात आले आहे की, १९६५–६६ ते १९६९–७० ह्या अवधीत विकासाची गती मंदावली. ह्या अवधीत विकासावर करण्यात येणाऱ्या खर्चाचे प्रमाण दरसाल ४ टक्केपर्यंत खाली आले. भारतात बहुतेक विकासाच्या कामाच्या उभारणीला बराच काळ लागतो. त्यामुळे उत्पादनक्षमतेच्या वाढीस पायबंद बसून प्रत्यक्ष उत्पादनांतही घट होते. मागील कालावधीत भांडवलगुंतवणुकीचा वेग कमी झाल्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत असा ह्याचा अर्थ आहे. तथापि, येत्या काही वर्षांत परिस्थिती सुधारण्याची बरीच आशा आहे. सुदैवाने १९७०–७१ ते १९७२–७३ ह्या काळात राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेने भांडवलगुंतवणुकीचे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे. भांडवल गुंतवणुकीची टक्केवारी आता जवळ जवळ १२ टक्क्यांपर्यंत आहे. परिणामी, उत्पादनाच्या बाबतीत जी कुचंबणा झाली होती ती काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. तरीही प्रत्यक्ष उत्पादनांत वृद्धी होण्यास अद्याप काही काळ लागणे अपरिहार्य आहे. ही झाली दीर्घ कालानंतर परिणाम करणारी कारणे. ह्या कारणांशिवाय तात्पुरत्या स्वरूपाच्या कारणांनीही किमतवाढीच्या वावटळीला मदत झाली आहे, हे उघडच आहे.

काही तात्कालिक कारणे अशी आहेत. देशातील मोठ्या भागाला अवर्षणाचा तडाखा बसला. त्याबरोबर जलविद्युत केंद्रातील वीज उत्पादनाबरोबरच औष्णिक वीजकेंद्रांनाही फटका बसला. १९७३ सालच्या पहिल्या सहामाहीत औष्णिक वीजकेंद्रांतून पुरवठा करण्यात येणाऱ्या विजेच्या वापरातही कपात करावी लागली. सध्याच्या आर्थिक परिस्थितीचा वारसा असा आहे. वाढत्या किमतीची कारणे केवळ देशांतर्गतच आहेत असे मात्र नाही. सध्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीत एक प्रकारचे अस्थैर्य उत्पन्न झालेले आहे. त्याचबरोबर सर्व जगातच चलन-वृद्धीचा दाब जागतिक अर्थव्यवस्थेवर दिसून येत आहे. ह्याचा परिणाम म्हणून औद्योगिक कच्च्या मालाची आयात करण्याच्या खर्चात अलीकडे वाढ झालेली आहे. तशीच वाढ इंधनासाठी लागणाऱ्या तेलाच्या खर्चातही झाली आहे. तरीसुद्धा भारताच्या अर्थव्यवस्थेचा विकास होत राहिला. परंतु चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात हा विकास ज्या वेगाने होईल असे वाटले होते तितक्या वेगाने मात्र तो झाला नाही. उत्पादनाच्या वाढीचा वेग बेताबाताचा असतानाच पैशाच्या पुरवठ्यात मात्र लक्षात भरण्याइतकी वाढ झालेली आहे. त्यामुळे चलनवृद्धीचा आधीच विकट झालेला प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनू पाहात आहे. विकसनशील अर्थव्यवस्थेत दृग्गोचर होणारी आणखीही काही लक्षणे दिसून येत आहेत. वस्तूंचा तुटवडा तर आहेच. पण हा तुटवडा अधिक जाचक वाटू लागला आहे. पूर्वी नव्हत्या अशा किती तरी वस्तूंची व सेवांची मागणी एकदम झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे किमती फोफावण्यास आणखीच मदत झाली आहे.

---

### मध्यप्रदेशात वीज ग्राहकांच्या सहकारी संस्था

खाजगी व्यापारातील नफेबाजीचा दोष काढून ग्राहकांची सोय व्हावी म्हणून सहकारी संघटनांचा आश्रय घेण्यात येतो. महाराष्ट्रात साखरेचे कारखाने ग्राहकांच्या व उत्पादकांच्या हितासाठीच काढण्यात आले. परंतु सहकारी चळवळीत नव्याने शिरलेल्या काही जणांनी स्वतःच्या फायद्यासाठी तिचा वापर केला असे आरोप करण्यात येत आहेत. तरीही सहकारी तत्त्वांचे योग्य पालन केल्यास सामाजिक हित साधते असेच मानण्यात येते. त्या दृष्टीने मध्यप्रदेशात स्थापन होऊ पहाणाऱ्या वीज ग्राहकांच्या सहकारी संस्थांचे स्वागत केले पाहिजे. खांडवा जिल्ह्यातील पूर्व नेमाड भागात अशा सहकारी संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. तीन विकासगटांतील ३९६ खेड्यांचा संस्थांत समावेश करण्यात येणार आहे. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी ह्या खेड्यांतील ५ हजार विहिरींना विजेचा पुरवठा करण्यात येईल. ह्या सहकारी संस्थांचे भांडवल १० लाख रुपये असेल आणि शेती करणारे ५ हजार शेतकरी त्यांचे भागधारक असतील. तथापि एवढ्या भांडवलावर संस्था उभ्या राहू शकणार नाहीत, म्हणून मध्यप्रदेश सरकार ३५ लाख रुपयांचे आणि भारत सरकारच्या मालकीचे ग्रामीण विद्युत मंडळ ९० लाख रुपयांचे कर्ज संस्थांना देणार आहे. त्याशिवाय मध्यप्रदेश वीज-पुरवठा मंडळ विजेची साधने आणि इतर संबंधित माल पुरविणार आहे. त्याची किंमत जवळ जवळ १५ लाख रुपये होईल. म्हणजे ह्या संस्था उभारण्यासाठी सुमारे १·५० कोटी रुपयांचा भांडवली खर्च करावा लागणार आहे.

---

### आयुर्वेद विद्यापीठाची स्थापना

उत्तर प्रदेश सरकार एका आयुर्वेद विद्यापीठाची स्थापना करणार आहे. ह्या विद्यापीठात युनानी वैद्यकीय पद्धतीच्या अभ्यासाचीही सोय करण्यात येईल. त्याचप्रमाणे दोन्ही प्रकारच्या उपचारपद्धतीत वापरण्यात येणारी औषधे तयार करण्यासाठी एक कॉर्पोरेशनही उभारण्यात यावयाचे आहे.

---

**सहकारी संस्थांच्या निवडणूक खर्चावर बंधन** — सहकारी संस्थांच्या उमेदवारांनी निवडणुकीसाठी करावयाची कमाल मर्यादा सरकारने ठरविली आहे. उदाहरणार्थ, साखर-कारखान्यांना उमेदवार ८,००० रु. पेक्षा जास्त खर्च करू शकणार नाही.

## युनायटेड वेस्टर्न बँक म्हणजेच धनवर्धन

### धनवर्धिनी परंपरेतील चार नवीन योजना

धनवर्धिनी ठेव योजना बँकिंग क्षेत्रात अगदी प्रथम दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.ने सुरू केली. त्यानंतर अशा स्वरूपाच्या अनेक योजना जाहीर करून अनेकांनी जणू धनवर्धिनी ठेव योजनेला बळकटी आणली आहे आणि त्यामुळेच ती सर्वमान्य झाली आहे. दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. ने धनवर्धिनी ठेव योजनेत अनेक प्रकारच्या ठेवयोजना अंतर्गत केल्या. महाराष्ट्रातील अनेक घरात या योजनांचा स्वीकार झाला लोकांची बचतीची सवय वाढली आणि आपली बचत ही आपल्या अनेक गरजा भागविण्यासाठी वेळेवर मदत देते हे या कुटुंबांना दिसून आले. महाराष्ट्रातील हजारो कुटुंबांनी धनवर्धिनीबाबत विशेष आपुलकी दाखविली.

आता बँकेने धनवर्धिनी परंपरेत आणखी चार नवीन ठेव योजना जाहीर केल्या आहेत. कर्ज हमी ठेव योजना याचे नावच मुळात गरजेला उपयुक्त होणार याची खात्री देते. ठेवीची रक्कम परत घेतेवेळी तितक्याच रकमेचे कर्ज नवीन वस्तू खरेदी करण्यासाठी मिळण्याची हमी ठेव ठेवताना या योजनेत मिळते. मध्यमवर्गीय, लघुउद्योग कारखानदार, शेतकरी, अशा अनेकांना प्रापंचिक बाबीत अगर धंद्याव्यवसायात नवीन वस्तू खरेदी करण्यासाठी आपल्या बचतीची रक्कम व्याजासह मिळते आणि त्याच दिवशी तितक्या रकमेचे कर्ज मिळू शकते. हे कर्ज मिळण्याची हमी या योजनेत बचतीला सुरुवात करतानाच बँक देते, ह या योजनेचे वैशिष्ट्य आहे. अशी कर्जाची हमी जास्तीत जास्त २५,००० रु. ची मिळू शकते.

**मुदतीचे सेव्हिंग्ज खाते**—या योजनेत सव्वासात टक्के व्याज मिळते. आपणास वाटेल त्या वेळी खात्यात रक्कम भरता येते. खात्याची मुदत ३ ते ६ वर्षे असावी लागते.

**विशेष सेव्हिंग्ज खाते**—आपल्या बचतीची रक्कम आपणास केव्हा लागणार आहे. याचा अंदाज घेऊन पूर्ण ९१ दिवसांची पूर्वसूचना देऊन आपणास रक्कम काढता येते. पावणे पाच टक्के व्याज या योजनेवर मिळते.

**मासिक व्याज ठेव योजना**—आता बँकेने नव्या स्वरूपात जाहीर केली आहे. किमान १,००० रु. ची कमीत कमी १ वर्ष मुदतीने ठेव ठेवून दरमहा आपणास व्याज मिळू शकते. यामुळे जवळजवळ सर्व मुदत ठेवींवर बँकेत आता दरमहा व्याज मिळू शकते.

धनवर्धिनी ठेव योजना जाहीर करून दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. ने लोकांच्या मनावर असे बिंबविले आहे की युनायटेड वेस्टर्न म्हणजेच धनवर्धन. ज्या बँकेच्या फक्त एकाच राज्यात जास्त शाखा आहेत, अशांमध्ये दि युनायटेड वेस्टर्न बँक ही भारतातील सर्वात मोठी व्यापारी बँक आहे. म्हणून महाराष्ट्रातील सर्वांचा जिव्हाळा या बँकेत गुंतल्यामुळे बँकेच्या या मोठेपणाबद्दल सर्वांना अभिमान वाटतो.

---

## चलनी नोटांच्या तारणाचे स्वरूप

**रिझर्व्ह बँकेने सरकारला चलनी नोटा दिल्या त्यासाठी असलेल्या तारणाचा तुलनात्मक तक्ता तेथे दिला आहे :—**

(आकडे लक्ष रु. चे)

| | एकूण देणे = एकूण चलनी नोटा | जिंदगी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सोने | विदेशी रोखे | रुपये | सरकारी रोखे |
| १९६०–६१ ... ... ... | १,८८२.०७ | ११७,७६ | १३४,९९ | १२६,८४ | १,५०२,४८ |
| १९६५–६६ ... ... ... | २,७२२,४२ | १३२,३८ | ७४,७५ | ९८,२० | २,४१७,१० |
| १९६९–७० ... ... ... | ३,६५२,३७ | १८२,५३ | २४४,५२ | ६८,८८ | ३,१५६,४४ |
| १९७०–७१ ... ... ... | ४,०४०,७८ | १८२,५३ | ३४४.४८ | ५७,१६ | ३,४५६,६१ |
| १९७१–७२ ... ... ... | ४,४५०,९६ | १८२,५३ | २३६,३९ | ४१,१७ | ३,९९०,८९ |
| १९७२–७३ ... ... ... | ४,८६४,०७ | १८२,५३ | १९८,८५ | २४,९९ | ४,४५७,७० |
| ३० जून १९७३ ... ... ... | ५,७३५,४० | १८२,५३ | १७७,३६ | ८,३८ | ५,३६७,१२ |

# अभ्युदयवादी मध्यमवर्ग व बँका

( गो. बा. गोखले, बी. ए., बी. टी. )

स्वायत्त, स्वयंपूर्ण जीवनाचे आकर्षण न मानणारा विचारी मनुष्य विरळाच ! मानवी प्रसन्नतेला आजकाल धास्ती वाटते ती सर्वास आर्थिक दुरवस्थेची. मध्यमवर्ग जितका मानी, तितकाच दुबळा व संवेदनसुलभ. सुबत्तेची स्वप्ने त्याला एकसारखी पडत असतात. अमाप पैसा हाती असल्याशिवाय आपण नेटके, लोभस जीवन जगू शकणार नाही, ह्या जगरहाटीतील 'चक्षुर्वैसत्यम्'चा त्याला नित्य साक्षात्कार होत असतो. लांड्यालबाड्या करण्याइतका तो विमनस्क नसतो, प्रचंड खटाटोप करण्याइतकी ताकदही त्याच्या ठिकाणी नसते. प्रामाणिकपणे पैसा कमवावा, काटकसरीने तो वापरावा, शिल्लक वाढवीत वाढवीत तिच्यावर सुटेल ते व्याज ही आपली विश्वसनीय कमाई, हेच त्याच्या विचार-विश्वातील वाहते वारे. क्रान्तीचे पुढारी मध्यमवर्गातून येतात हे जरी खरे असले तरी क्रान्तीचे पायिक हे मध्यमवर्गीय नसतात. चित्तशुद्धीसाठी परिसरशुद्धीचे महत्त्व त्याला पटलेले असते. संस्कृतीची कास धरून, दैवी संपत्ती जोडून, जीवनावरील गंडांतरांचा बंदोबस्त करीत निरंकुश जीवन जगावे, अशी त्याची त्याच्या जीवाभावाला पटलेली जीवनदृष्टी असते.

मध्यमवर्गाची सारी मदार असते त्याच्या बँक बॅलन्सेसवर. बडे उद्योगपती व कारखानदार दुप्पट व्याजाची लालूच त्याला दाखवीत असतात, पण त्यांच्या विश्वासार्हतेवर त्याचा विश्वास नसतो. हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे धावणे हा असमंजसपणा तो चुकूनही करणार नाही. राष्ट्रीयीकृत बँकांचे आवाहन फक्त त्याच्या हिशेबी वृत्तीप्रत जाऊन पोचते. त्यांच्या विविध योजना तो समजून घेतो व त्यातील सोयीगैरसोयींचा तो आपुलकीने पण तुलनात्मक अभ्यास करतो. मुद्दल वाढविण्याचे हयातभरचे धोरण कोणते ? मी सेवानिवृत्त झाल्यावर माझा भाचा नोकरीस लागला. त्याला पुंजी वाढविण्याचे धोरण मी अधिकारवाणीने सांगू शकलो, कारण मला ते पूर्णांशाने कधीच राबविता आले नाही. ते राबविण्याचे धोरण सुरुवातीपासून अंगीकारले तरच यशस्वी होईल. घरसोडीमुळे 'जैसे थे' परिस्थितीत फारसा फरक पडणार नाही व उशिरा जाग आल्यास त्याची मधुर फळे हयातीत चाखता येणार नाहीत. सेवानिवृत्त होताना आपला जो मासिक कुटुंबपोषणाचा किमान खर्च असेल तितके मासिक व्याज देणारा द्रव्यसंचय बँकेच्या आपल्या खात्यात त्यावेळपर्यंत झालेला असला पाहिजे, म्हणजे निवृत्तिकालात जीवनमान खाली आणण्याची मनस्तापदायक आवश्यकता प्रापंचिकाला भासणार नाही. या धोरणाने अनुप्राणित होऊन, दर महिन्यास बँकेत पैसे शिल्लक टाकले पाहिजेत. उदाहरणार्थ, कुटुंबखर्च दरमहा पाचशे रुपये असेल तर मासिक तितकेच व्याज मिळविण्यासाठी सुमारे एक लाख रुपये ठेवीच्या रूपाने बँकेत ठेवलेले हवेत. नोकरपेशा हा मध्यमवर्गीयांच्या पाचवीला पुजलेला असतो. याचा अर्थ असा की सेवकाने या धोरणानुसार दरमहिना आपली शिल्लक वाढवीत राहिले पाहिजे.

मुदतबंद ठेवीवर राष्ट्रीयीकृत बँका आजकाल ७·२५% व्याज देतात व दर महिन्यास व्याजाची आकारणी करून ते सेव्हिंग्ज खात्यात जमा करण्याची त्यांची तयारी असते; म्हणजे व्याजावर व्याज दर सहामाहीस देण्यास त्या तयार असतात. व्याजाची रकम वाढता वाढता ती मुदतबंद ठेव म्हणून ठेवता येते. 'क्युमिलेटिव्ह टाइम डिपॉझिट' किंवा 'रिकरिंग डिपॉझिट' ही खाती एक वर्षापुरती देखील उघडता येतात व तेथील संचितधन दीर्घतर मुदतबंद ठेवीचे भांडवल होऊ शकते.

अलीकडे एक नवा उपक्रम बँकांनी सुरू केला आहे. बँकेचा प्रतिनिधी खातेदाराच्या घरी आठवड्यातून एक चक्कर टाकतो व प्रतिदिनी एक रुपया याप्रमाणे सात दिवसांचे सात रुपये खात्यात जमा करून पावती देतो. अशा रीतीने पाच वर्षाअखेरचे सव्याज संचितधन, मुदतबंद ठेव म्हणून अडकवून ठेवता येते. पाच वर्षांऐवजी ही मुदत दोन वर्षांची केल्यास सातशे ते साडेसातशे रुपयांचा तोडा मुदतबंद ठेव म्हणून ठेवण्यास लवकर हाती येईल.

वस्तूंचे भडकते भाव महागाईभत्ता खाऊन टाकतात. आपल्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी करावी लागणारी खरेदी कसोशीने करणारा माझा एक मित्र नेहमी म्हणतो, 'भडकत्या भावाचे आव्हान स्वीकारण्यास मी केव्हाही तयार आहे. फक्त सरकारने महागाईभत्त्यात शास्त्रोक्त पद्धतीने वाढ केली पाहिजे व प्रत्येक कर्मचाऱ्याला बोनसचे तत्त्व अधिकृतरीत्या लागू केले पाहिजे.' या मित्राची शॉपिंगची शैली अभ्यसनीय आहे. पाहून मागितल्याशिवाय तो कंदिलाची वातहि खरीदणार नाही. वस्तूंच्या आपल्याला परवडणाऱ्या किंमती तो ठरवितो व त्या किमतीत मिळेल त्या प्रतीची मिळेल तितकी वस्तू घेऊन भागवाभागवी करण्याची त्याची नेहमीच तयारी असते. तेलाचे भाव वाढले तरी तेलावर किती खर्च करायचे हे त्याने पूर्वीपासूनच ठरविलेले असते. हल्ली मंडईकर केळीवाल्यांनी केळी विकण्याचे नवे तंत्र अवलंबिले आहे. पूर्वीप्रमाणे डझनची भाषा ते करीत नाहीत. रुपयास सहा, रुपयास आठ असे पुकारून ते केळी विकतात. पण केळ्यांवर प्रतिदिनी अधेली खर्चायची असे ठरविलेल्या माझ्या मित्रावर या नव्या तंत्राचा काहीच परिणाम होत नाही. एवंगुणविशिष्ट टणक सौदेबाजीमुळेच बँकांच्या दैनिक बचतीच्या योजनात तो सहभागी होऊ शकतो.

माझ्या मित्राची अर्थनीती तपशीलवार सांगावीशी वाटते. तकदिरची पारख करायची असेल तर तो महाराष्ट्र लॉटरीचे एकच तिकीट खरेदी करेल, जरी मालिका चार असल्या तरी. करता येतील तेवढी घरगुती कामे तो स्वतः करतो—धुलाई, दुरुस्ती, दाढी, इ. शीतपेय पानासाठी दुकानात जाऊन तो अवाच्यासवा पैसा खर्च करणार नाही. घरचे माठातील पाणी त्याला अधिक मोलाचे वाटते. अन्तर्देशीयाऐवजी तो पोस्टकार्ड वापरेल. गणेशोत्सवात तो एकाच गणपतीची वर्गणी भरेल. रिकामपणावर मात्रा

म्हणून तो कधी सिनेमा-नाटकाला जाणार नाही. खराखुरा शिणवटा घालविण्यासाठी जेव्हा दर्जेदार करमणुकीची गरज निर्माण होईल तेव्हाच तो नाटक कंपनीस आश्रय देईल. 'वेळीच टाका नवटाक टाकी' हे जीवनदर्शन तर त्याच्या प्रकृतीत सुप्रतिष्ठित झालेले आहे. 'सौ सोनारकी एक लोहार की' या न्यायाचे अंजन लाभलेले असेही काही कुटुंबप्रमुख माझ्या पाहण्यात आहेत की पे-डेच्या दिवशी सुमारे पन्नास टक्के पगार बँकेत जमा करूनच ते घरी येतात व उरलेल्या पन्नास टक्क्यात नेटकेपणाने संसार करण्याचा पवित्रा घेऊन महिनाभर जागरूक राहतात. कष्टार्जित संपत्तीशी चपळ खारेप्रमाणे 'Hide and seek' असा खेळ करणाऱ्या मध्यमवर्गीयांकडे राष्ट्रीयकृत बँकांचे जावे तसे लक्ष गेलेले दिसत नाही. लग्नकार्य, घरबांधणी, कन्याकुमारांचे परदेशीय शिक्षण इ. प्रसंगी मध्यमवर्गीयाला मोठ्या रकमेने पैशाची गरज भासते. स्वतःच्या ठेवी मोडण्यास तो नाराज असतो; पण समान दराने जर बँकांनी त्याला पैशाचा पुरवठा केला तर उचित हप्तेबंदीने निष्कर्जी होण्याची त्याची जिद्द जागृत होईल. जबाबदाऱ्या पार पाडण्याचे बाळकडू प्राशन केलेल्या मध्यमवर्गीयांना उद्योग व्यवसायासाठी बँकांनी 'निर्व्याज मनोहर' कर्जे देण्याची जोखीम पत्करावी असा सल्ला एका उद्योगपतीने उघडपणे दिला होता. 'न्यारा' नाही तरी 'एक बंगला' बनविण्याची अधुरी अस्मिता बाळगणाऱ्या मध्यमवर्गाकडे 'एल. आय. सी', 'युनिट ट्रस्ट' सारख्या स्वायत्त अर्थसंस्थांनी सहृदयतेने का पाहू नये याचे कोडेच पडते. गरजू नागरिकाला, तयार घराचा तावडतोब ताबा देऊन वीस वर्षांत भाड्याच्या दुप्पट किंवा तिप्पट हप्तेबंदीने अमेरिकेत घरमालक करतात असे तिकडचे लोक सांगतात. आम्ही प्रज्ञाहत नसू तर भारतातहि असले उपक्रम 'सर्वेषाम् अविरोधेन' सुरू करता येतील. 'योजकस्तत्र दुर्लभ' हेच खरे.

नोकरपेशा झुगारून देऊन आपणही छोटे कारखानदार व्हावे, अशी स्वप्ने मध्यमवर्गीयांना पडत असतात, पण भांडवलाच्या अभावी असले विचार त्यांना मनावेगळे करावे लागतात. कल्पकता व सचोटी हे मध्यमवर्गीयांचे गुणविशेष भरवशाचे मानून बँकांनी आपली उपक्रमशीलता अभ्युदयवादी मध्यमवर्गीयांच्या विचारांना चालना देण्याइतकी व्यापक करावी. नोकरपेशाच्या पाशातून सुटू पाहणारा मध्यमवर्गीय तरुण नुसता यशस्वी प्रापंचिक होईल एवढेच नव्हे तर पाच पंचवीस 'क्लास फोर' सेवकांच्या योगक्षेमाची व्यवस्था करून राष्ट्राच्या संपत्तीतही निःसंशय भर टाकील. अशा तरुणांची कुवत, कल्पना व विश्वासार्हता तपासून पाहण्यासाठी जाणत्यांचे एखादे त्रिकुट प्रत्येक बँकेच्या स्टाफवर असावे. 'White-Collar Job' चा उबग आलेल्या काही तरुणांना तरी अशा योजनेचा फायदा साधता येईल. सत्त्वहरण होऊ न देता, सामाजिक व राष्ट्रीय दानत वाढविणाऱ्या, कुटुंबसंस्थेला 'बहिश्चर प्राण' मानणाऱ्या निर्व्यसनी मध्यमवर्गाला शासनानेही मदतीचा हात खुल्या दिलाने पुढे करावा हीच सदिच्छा.

---

### महाराष्ट्र बँकेचे छोट्या चर्मकारांना भांडवल

सहा छोट्या चर्मकारांना बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वासुदेवराव भिडे यांच्या हस्ते ५०० ते ३,००० रु. भांडवल देण्यात आले.

बँकेच्या फोर्ट कार्यालयात हा छोटा समारंभ झाला. या वेळी बँकेचे असिस्टंट जनरल मॅनेजर के. बी. दामले, आमदार रा. अ. खैरे प्रभृतींची भाषणे झाली.

चर्मकार १९ रुपयांस पादत्राण विकतो, तेच कंपनी २९ रुपयांचा शिक्का मारून विकते, असे श्री. खैरे म्हणाले. म्हणून महाराष्ट्र चर्मकार परिषदेमार्फत भांडवल मिळवून देण्यात येत आहे. परतफेडीची नैतिक हमी परिषदेने घेतली आहे, असेही ते म्हणाले.

---

### बँकेची फसवणूक करणाराची इमानदारी

मुरादाबाद येथील सेंट्रल बँकेच्या कचेरीकडे ५,५५० रु. रोकड असलेले पोस्टल पार्सल आले. "बँकेच्या एका खातेदाराच्या खात्यातून अनधिकृत रीत्या काढलेल्या ७,००० रु. पैकी ही रक्कम आहे. उरलेले १,४५० रु. ही लवकरच परत केले जातील. अशा तऱ्हेने पैसे काढून घेतले, ह्याबद्दल दिलगिरी वाटते. बँकेने पोलिसांकडे नोंदविलेली तक्रार कृपया काढून घ्यावी." असे सोबतच्या पत्रात म्हटले आहे.

---

### भारताच्या राष्ट्राध्यक्षांचे शरीर-संरक्षक

हिंदच्या अध्यक्षांची शरीररक्षकांची तुकडी मोठ्या आकर्षक पोषाखाने नटलेली असते. त्यांची निवड करताना प्रत्यक्ष रक्षक चांगला ६ फूट उंचीचा असल्याची दक्षता घेण्यात येते. ह्या तुकडीची उभारणी प्रथम वॉरन् हेस्टिंगजने १७७३ साली केली. म्हणजे आता तुकडीच्या स्थापनेला २०० वर्षे पूर्ण झालेली आहेत. तेव्हापासून तुकडीच्या नावात अनेक वेळा बदल झाले आहेत.

---

### जपानला रशिआ अधिक तेल देणार

अरब-इस्राएल ह्यांच्यात झालेल्या युद्धात अरब देशांनी इस्राएलला पाठिंबा देणाऱ्या देशांचा तेल-पुरवठा कमी केला. अमेरिकेला तर तेल पुरविण्याचेच बंद केले. तेलकपातीच्या ह्या धोरणामुळे सर्वात अधिक तडाखा जपानला बसणार होता. इस्राएलला पाठिंबा देण्याचे जपानने सोडून द्यावे म्हणून अरब देशांनी जपानवर बरेच दडपण आणले होते. परंतु जपानने त्याला दाद दिली नाही. जपानला रशिआ सैबेरिआतील तेलाचा पुरवठा करीत आहे. परंतु तो पुरवठा अपुरा आहे. आता ह्या पुरवठ्यात ३ कोटी टनांपर्यंत वाढ करण्याचे रशिआने ठरविले आहे. अरब-इस्राएल संघर्षामुळे जपानपुढे उभ्या राहिलेल्या राष्ट्रीय अडचणीला तोंड देणे रशिआच्या नव्या धोरणाने जपानला शक्य होणार आहे.

## अणुशक्तीच्या साह्याने विद्युत्पादनाला मदत

अविकसित देशांतील अणुशक्तीच्या साह्याने वीज उत्पादन करणाऱ्या प्रकल्पांना आर्थिक मदत देणे कितपत शक्य आहे ह्याचा अभ्यास करण्यासाठी जागतिक बँकेने पुढाकार घेतला आहे. आतापर्यंत बँकेने अणुशक्तीवरील वीज उत्पादन केंद्राबद्दल लक्ष दिलेले नव्हते. फक्त इटलीत अशा प्रकारचे एक छोटे केंद्र उभारणाच्या कामी बँकेने १९५७ साली थोडीफार मदत दिलेली आहे. परंतु आता पृथ्वीच्या पोटातील खनिज इंधनाची टंचाई सर्व जगभर स्पष्टपणे दिसू लागली आहे. विशेषतः खनिज तेलाच्या किमती सतत वाढत चालल्या आहेत. ह्या संदर्भात अविकसित देशांत अणुशक्तीचा उपयोग करून वीज उत्पादन करण्याच्या योजनांना अधिक महत्त्व येऊ लागले आहे. म्हणून छोट्या व मध्यम योजना आखून देण्याचे काम बँकेने आंतरराष्ट्रीय अणुशक्तीमंडळाकडे सोपविले आहे.

---

## ६५% रेल्वे स्टेशनांना विजेचा पुरवठा

भारतामधील रेल्वेमार्गावर एकूण ७,०९३ रेल्वे स्टेशन्स आहेत. त्यांपैकी ४,५७३ स्टेशनांना आतापर्यंत विजेचा पुरवठा करण्यात आला आहे. आणखी १९२ स्टेशनांना वीजपुरवठा करण्याचे काम चालू आहे. उत्तर प्रदेशात विजेचा पुरवठा असणारी स्टेशने सर्वात अधिक म्हणजे ६०७ आहे. त्यानंतरचे अनुक्रम असे :— तामीळनाडू ५७१, आंध्र प्रदेश ४३९, बिहार ४२५, महाराष्ट्र ३८४, गुजरात ३६३, पश्चिम बंगाल ३२६, मध्यप्रदेश २७१, कर्नाटक २२४, पंजाब २२२, राजस्थान २०४, ओरिसा १३३, केरळ १२८, हरयाणा १०५, आसाम ७८ आणि हिमाचल प्रदेश २८. दिल्ली प्रदेशातील ४२ स्टेशनांना, पाँडिचेरीमधील व जम्मू काश्मीरमधील प्रत्येकी ९ स्टेशनांना आणि गोव्यातील ५ स्टेशनांना वीज पुरविण्यात आलेली आहे.

---

## बंगालमध्ये जेव्हा सिंहगर्जना ऐकू येत असे

पश्चिम बंगालमधील बंकुरा जिल्ह्यात २० हजार वर्षांपूर्वी वन्य पशुपक्ष्यांची मोठ्या प्रमाणावर वसती होती, असा पुरावा जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाने शोधून काढला आहे. त्या काळात बंगालमधील गर्द अरण्यांत आणि गवताळ विस्तीर्ण प्रदेशात सिंहांची गर्जना ऐकू येत असे. त्याचबरोबर हत्तीच्या भीमकाय पूर्वजांचा संचार चालत असे आणि तरसाचे विकट हास्यही कानी येत असे. इतिहासपूर्व काळात बंकुरा जिल्ह्यातील डोंगराळ भागात अनेक प्रकारच्या पशुपक्ष्यांचे संमेलनच भरले होते. अनेक प्रकारच्या प्राण्यांचे प्रस्तरात सापडून कठीण झालेले सांगाडे तेथे सापडले आहेत. १२ भिन्न भिन्न जातींच्या प्राण्यांचे १५० सांगाडे आतापर्यंत उपलब्ध झालेले आहेत.

---

**दरसाल ६० लक्ष गर्भपात**—भारतात दरसाल २·२ कोटी स्त्रिया गर्भवती होतात. तेव्हा दरसाल ६० लक्ष गर्भपात घडविण्याची यंत्रणा आवश्यक आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## भारत–रशिआ मैत्रीचे आर्थिक बंध दृढ होणार

इंदिरा गांधी–ब्रेझनेव्ह ह्यांचे संयुक्त निवेदन आणि इतर तीन करार, असे चार दस्तऐवज ३० नोव्हेंबर रोजी संसदेस सादर करण्यात आले. त्यात १५ वर्षांच्या भारत–रशिआ आर्थिक, तांत्रिक सहकार्याचा समावेश आहे. ह्या करार मुदत संपण्यापूर्वी रद्दबादल ठरविला नाही तर त्याची मुदत पाच-पाच वर्षांनी आपोआप वाढणार आहे. भारत–रशिआचे मैत्रीचे संबंध आता ह्यापुढे घोषणांवर, रशिआच्या राजकीय पाठिंब्यावर आणि जरूर पडेल त्या वेळी रशिआने केलेल्या आर्थिक साहाय्यावर अवलंबून राहाणार नसून, ते संबंध आर्थिक तारांनी मजबूत बांधले जाणार आहेत. दोन्ही देशांच्या उत्पादन-योजना एकमेकांशी सांधल्या जाणार आहेत. भारत–रशिआ मैत्रीमुळे आशियाच्याच नव्हे, तर जगातील इतर भागातही शांततेच्या वातावरणास हातभार लागलेला आहे; ह्या मैत्रीचे परस्परावलंबन जेवढे वाढेल, तेवढी ती अधिक प्रभावी होईल, हे उघड आहे. एक प्रबळ आणि एक गरीब मित्र ह्यांची मैत्री गरिबाच्या कृति-स्वातंत्र्यास बाधक न ठरणे भारताच्या स्वतःच्या सामर्थ्यवाढीवर अवलंबून आहे.

---

## बँकेच्या पतपुरवठ्यावर नियंत्रण – कर्जावरील व्याजाच्या दरात वाढ

१९७३-७४ च्या हंगामातील व्यापारी विभागातील बँकांची कर्जवाढ रोखण्यासाठी कर्जावरील व्याजाचा किमान दर १ डिसेंबरपासून १०% चा ११% करण्यात आला आहे. कच्चा माल, उत्पादनातील माल, तयार माल, ह्या सर्वांच्या कर्जाच्या तारणाचे मार्जिन १०% ने वाढविण्यात आले आहे. बुक डेट्सच्या तारणावरील मार्जिनही वाढविले जाईल. सरकारी आणि निमसरकारी संस्था वगळून बाकीच्यांकडील येण्यांवरील मार्जिन २०% ने वाढेल.

---

## राष्ट्रीयीकृत बँकांच्या संख्येत तूर्त तरी वाढ नाही.


१९६९ मध्ये सरकारने ५० कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असलेल्या सर्व म्हणजे १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. आता खासगी क्षेत्रातील ४ बँकांनी ५० कोटी रु. ठेवींची मर्यादा ओलांडली आहे आणि पाचवी बँक लवकरच मर्यादा ओलांडील. तथापि, त्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रश्न सरकारच्या विचाराधीन नाही, असे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

---

**हिंदी बँकांचा नफा घटला, विदेशी बँकांचा नफा वाढला** — भारतातील ३८ हिंदी बँकांचा ( १४ राष्ट्रीयीकृत बँका धरून ) नफा १९७०–७१ च्या मानाने १९७१–७२ मध्ये २०% ने कमी झाला; त्याच मुदतीत भारतातील विदेशी बँकांचा नफा ३८% ने वाढला. हिंदी बँकांचा शाखाविस्ताराचा कार्यक्रम आणि प्राधान्याच्या क्षेत्रांना कर्जपुरवठा ह्यांचा त्यांच्या नफ्यावर परिणाम झाला. विदेशी बँकांनी मोठ्या शहरांतूनच धंदा केला, परदेशी बँकिंगचाही धंदा केला; त्यामुळे त्यांचा नफा वाढला.

# दर्जेदार किर्लोस्कर एंजिनांना भारतीय मानक संस्थेचे प्रमाण पत्र

५ ते ८ हॉर्स पॉवर




प्रथम पासूनच किर्लोस्कर एंजिने त्यांच्या उत्तम दर्जाबद्दल प्रसिद्ध आहेत.
देशातील आणि परदेशातील असंख्य शेतकरी व इतर ग्राहक यांच्याकडे वापरात असलेली एंजिने हे याचे प्रतीक आहे.

आता भारतीय मानक संस्थेने (ISI) देखील प्रमाणपत्र देऊन, हे मान्य केले आहे.

किर्लोस्कर ®

किर्लोस्कर एंजिन– शेतकऱ्याची पहिली पसंती

**किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.**

१३, लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे ३


® एंजिनसाठी किर्लोस्कर ऑइल एंजिन्स् लिमिटेड यांनी या ट्रेडमार्कच्या उपयोगाचा अधिकार नोंदविलेला आहे.

Tom & Bay/KO-7315-M



## ★ कार्यक्षमतेचा शिक्कामोर्तब ★


**विजय पंपस्** कार्यक्षमतेत नेहमीच आघाडीवर—
आता—भारतीय मानक संस्थेकडून विजय पंपास I. S. I. मार्क * दर्जेदार पंप निर्मितीची हमी.



इंजिन असो अगर इले. मोटार असो,

त्यांस "विजय" पंपाची

आवश्यकता आहेच.




कारखानदार—
फोन : २३२
तार : Vijayplow

# न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )



हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर, घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. वार्षिक वर्गणी रु. ६

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३९ | पुणे, बुधवार, १९ डिसेंबर, १९७३ | अंक १३

## आम्ही आता आपल्या ठेवींवर दरमहा व्याज देतो.

आपल्या मासिक जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यास आमचाही हातभार व्हावा या हेतूने आम्ही ही नवी ठेवयोजना निर्मिली आहे. आपण किमान रु. १००० अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्याकडे मासिक व्याज ठेवयोजनेखाली किमान २४ महिने पर्यंत ठेवा.

आमच्याकडून दरमहा मिळणाऱ्या व्याजातून आपण आपले भाडे, विद्युत बिल, टेलिफोन बिल, गॅस बिल, अशापैकी कोणतेही एक अथवा अनेक खर्च भागवू शकता.

**दरमहा व्याज मिळत राहून मूळ ठेव सुरक्षित राहते हे ह्या योजनेचे वैशिष्ट्य आहे.**

अधिक तपशिलाकरता नजीकच्या आमच्या शाखेस आजच भेट द्या.

## बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिस – ११७७, बुधवार पेठ, पुणे – २

## दुष्काळामुळे उसाच्या उत्पादनात आणि साखरेच्या उताऱ्यात विलक्षण घट

या वर्षी महाराष्ट्रातील बहुतेक खाजगी व सहकारी साखरकारखान्यांच्या साखरेच्या उताऱ्यात विलक्षण घट आली असल्यामुळे साखरकारखानदारांत चिंता पसरली आहे. गतवर्षीच्या या वेळच्या साखरेच्या उताऱ्याशी तुलना करता यंदा एक टक्क्याने साखरेचा उतारा खाली आला आहे. गतवर्षी साखरेचा उतारा ९.५ टक्के होता तो या वेळी ८.५ टक्क्यांवर आहे. साखरेच्या उताऱ्यात देशात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक समजला जातो. परंतु यंदा साखरेचा उतार अपेक्षेबाहेर खाली आला आहे. गेल्या वर्षीच्या भयंकर दुष्काळामुळे शेतातील उभ्या उसाच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले. पाण्याअभावी ऊस पोकळ बनून त्यातील साखरेचा अंश कमी झाला त्यामुळेच चालू हंगामात साखरेचा उताराच मोठ्या प्रमाणात खाली आला आहे. आता थंडी पडू लागल्यामुळे साखर उताऱ्यात वाढ होईल अशी अपेक्षा साखरकारखानदार बाळगून आहेत.

दुष्काळामुळे ऊस उत्पादकांचेही मोठे नुकसान झाले आहे. दुष्काळातील पाणीटंचाईमुळे उसाचे दर एकरी सरासरी उत्पादन १५ टनांनी खाली आले आहे. या वर्षी आडसाली उसाचे दर एकरी उत्पादन ५० टनांपेक्षा कोठेच जास्त येत नाही. आडसालीचे सरासरी उत्पादन ६५ ते ७० टनांचे असते. सुरू व खोडवा ऊस ३०–३५ टनांपेक्षा जास्त भरणारच नाही असे शेतकरी सांगतात. एकंदरीत गेल्या वर्षीच्या दुष्काळामुळे ऊसवाल्या शेतकऱ्यांचेही अतोनात नुकसान झाले आहे.

साखरेचे उत्पादन आणि साठा ( लक्ष टन )

| वर्ष (ऑक्टो–सप्टें.) | प्रारंभीचा स्टॉक | उत्पादन | आयात | निर्गत | खप |
|---|---|---|---|---|---|
| १९५०–५१ | १.८० | ११.१८ | ०.५७ | — | १०.९८ |
| १९५५–५६ | ५.४० | १८.९२ | ०.६९ | — | १९.७२ |
| १९६०–६१ | १२.६० | ३०.२८ | — | २.४७ | २१.२७ |
| १९६५–६६ | १२.१६ | ३५.४१ | — | ३.९२ | २७.९२ |
| १९६८–६९ | ४.३५ | ३५.५८ | — | ०.७९ | २६.०९ |
| १९६९–७० | १३.०६ | ४२.६२ | — | २.१७ | ३२.६१ |
| १९७०–७१ | २०.९० | ३७.४० | — | ३.९५ | ४०.२५ |
| १९७१–७२ | १४.१० | ३१.१३ | — | १.४४ | ३७.८० |
| १९७२–७३ | ५.९९ | ३९.०० | — | ०.५५ | ? |

लेव्ही साखरेची किंमत क्विंटलला १३५ रु. + २६% एक्साइज ड्यूटी, अशी राहिली, तर खुल्या विक्रीची किंमत वाढत गेली; तिचेवर ३०% एक्साइज ड्यूटी घेण्यात आली.

**मंत्र्यांच्या दौऱ्याचा खर्च** — १ एप्रिल, १९७३ ते ३ ऑगस्ट, १९७३ असेर मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांच्या दौऱ्यांचा खर्च २३.५१ लक्ष रु. झाला.

साखरेची खुल्या विक्रीची किंमत
( प्रत्येक १०० किलोग्रॅमला )

| | | |
|---|---|---|
| जून | १९७२ | रु. २१० |
| सप्टेंबर | १९७२ | रु. २३५ |
| डिसेंबर | १९७२ | रु. २७५ |
| एप्रिल | १९७३ | रु. २६५ |
| मे | १९७३ | रु. २५५ |
| जून | १९७३ | रु. २६० |
| जुलै | १९७३ | रु. २७० |
| ऑगस्ट | १९७३ | रु. २७० |
| सप्टेंबर | १९७३ | रु. २७० |

## दि शेवडेज कॅमेरा वर्क्स लि., बेळगाव

वरील कंपनीला ३१–३–७३ अखेरच्या वर्षी रु. २३३.२० नफा झाला. वास्तविक, कंपनीची विक्री सालोसाल वाढत जाऊन (१९६८ : ६५ हजार रु., १९६९ : ८० हजार रु., १९७० : १.२० लक्ष रु., १९७१ : १.५० लक्ष रु. आणि १९७२ : १.६१ लक्ष रु. ) त्या मानाने नफा होत गेलेला दिसत नाही, ह्याचे कारण विद्यमान लघुउद्योगांना राष्ट्रीयीकृत बँकांकडून पुरेसा पाठिंबा मिळत नाही, असे संचालकांच्या अहवालावरून दिसते. ठोक नफा मोठा होऊनही बँकांच्या व्याजापोटीच मोठी रक्कम जाते. अहवालाच्या वर्षी कंपनीने ३९,१३१ रु. व्याज बँकांना दिले आहे. कंपनीचे वसूल भांडवल वाढविणे, हाच ह्यावर प्रभावी उपाय आहे. त्यामुळे खेळत्या भांडवलाची समस्या सुटून, बँकांची देणीही भागविता येतील. कंपनीकडे सुमारे ३,१२,००० रु. च्या ऑर्डरी नोंदलेल्या असून त्यांपैकी ८१,००० रु. च्या ऑर्डरी संरक्षण खात्याच्या आहेत. तथापि त्या ऑर्डरींची मुदत वाढवून घेणे कंपनीला भाग पडले. कॅमेऱ्यांसाठी लागणारे बरेच परदेशी सुटे भाग कंपनीच्या संग्रही आहेत आणि आणखी आयातीला लायसेन्स मिळत नसल्यामुळे उपलब्ध साठा तारतम्याने वापरायला हवा. परंतु ज्या बँकांकडे तो गहाण आहे, त्या बँका साठा विकून टाकण्याचा आग्रह करीत आहेत. त्यामुळेही नव्या भांडवलाची व्यवस्था करणे कंपनीला आवश्यक झाले आहे. किर्लोस्कर फौंडेशन ट्रस्टने सुमारे ५८ हजार रुपयांच्या कॅ. के. कर्जास जामीन राहून कंपनीवरील फौंडेशनचा विश्वास स्पष्ट केला आहे. ह्या सर्वाचा अर्थ, कंपनीला स्वतःचे आणखी भांडवल मिळाले म्हणजे तिला उज्ज्वल दिवस दिसण्यास वेळ लागणार नाही. कंपनीचा कारभार काटकसरीचा आहे, असे हिशेबावरून दिसून येते. कंपनीच्या उत्पादनवाढीतील भांडवलविषयक अडचणी दूर झाल्या, तर नफ्याचे प्रमाणही वाढून कंपनीला भरपूर तरतुदी करता येतील, हे उघड आहे.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १९ डिसेंबर, १९७३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## आजची पहिली गरज उत्पादनाची

मुंबई येथे वर्ल्ड कॉंग्रेस ऑन प्रॉडक्टिव्हिटी सायन्स भरविण्यात आली होती. ह्या परिषदेचे उद्घाटन उद्योगपती श्री. नवल टाटा ह्यांनी केले. परिषदेसाठी भारतामधील व बाहेरील ५०० प्रतिनिधी आले होते. उद्घाटनाच्या भाषणात श्री. टाटा म्हणाले की ह्या परिषदेतून विकसनशील देशांना उत्पादनाचा संदेश देण्यात आला पाहिजे. भारताच्या बाबतीत तर उत्पादनाचे' आणि त्याच्या बद्दलच्या जाणिवेचे फारच महत्त्व आहे. उत्पादनामुळेच देशाचे हित आणि जीवित सुरक्षित राहाणार आहे. 'उत्पादकता' ह्या एकाच शब्दात एखादा देश नादार होणार का कर्जबाजारी होणार ह्याचे रहस्य साठविलेले आहे. दुर्दैवाने पुष्कळ लोकांना ह्याची कल्पनाच नाही. नेहमीपेक्षा थोडेही जास्त काम केले तर देशाची भरभराट होते. जादा कामाने जे जास्त उत्पादन होईल त्याची वाटणी कामगार, चालक व ग्राहक ह्यांच्यात करण्यात यावी. भारतात रोजगारीच्या संधी फार मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नाहीत. परंतु ज्या लोकांना कामधंदा मिळालेला आहे ते तरी आपले काम चोख बजावतात किंवा नाही हा प्रश्नच आहे. काही लोक पंतप्रधान इंदिरा गांधींनी दारिद्र्य दूर करण्यासाठी काय केले आहे, असा प्रश्न करून त्यांच्यावर टीका करतात. पण त्यांनी स्वतः देशाच्या हितासाठी काय केले आहे ह्याचा मात्र ते कधी विचार करीत नाहीत. उत्पादकतेबद्दल चालक आणि कामगार ह्यांच्यात विरोध असता कामा नये. काही कामगारांचे पुढारी म्हणतात की, उत्पादकतेची भाषा बोलणारे स्वतःच्या नफ्यासाठी बोलत असतात. पण खरा प्रश्न नफ्याचा नसून देशाच्या हिताचा आणि त्यांच्या जगण्याचा आहे, हे त्यांनी समजून घेतले पाहिजे.

---

## प्राप्तिकर माफीची मर्यादा वाढविण्याची मागणी

दक्षिण भारतामधील कर-अधिकाऱ्यांचा एक मेळावा मद्रास येथे भरविण्यात आला होता. हिंदुस्थान चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ह्या मेळाव्यात इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस् ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष श्री. कृष्णन ह्यांनी उद्घाटनाचे भाषण केले. आपल्या भाषणात ते म्हणाले की सध्या प्राप्तिकरातून माफी मिळण्याच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ५ हजार रुपये आहे. ही मर्यादा वाढवून १० हजार रुपये करण्याची अतिशय आवश्यकता आहे. कारण अलीकडे पैशाच्या किंमतीत फार मोठ्या प्रमाणावर घट झालेली आहे. त्याचप्रमाणे प्राप्तिकर बसविण्याची रक्कम ठरविताना मुलांच्या शिक्षणावर होणाऱ्या खर्चापैकी काही हिस्सा वजा घालण्याचीही सवलत देण्यात आली पाहिजे एकंदरीने राहणीचा खर्च सर्व बाजूंनी वाढलेला आहे. अशा परिस्थितीत मध्यमवर्गीयच काय पण मोठ्या प्रमाणावर कर भरणाऱ्या लोकांना सुद्धा मुलांच्या शिक्षणाचा खर्च झेपेनासा झालेला आहे. जबर करामुळे त्यांना हा खर्च करणे अतिशय त्रासाचे झालेले आहे. प्राप्तिकरविषयक कायद्यात दुरुस्त करणारे विधेयक सध्या सरकारच्या विचाराधीन आहे. परंतु ह्या विधेयकामुळे काळा पैसा उघडकीस आणण्याचा आणि कर चुकविण्याच्या प्रकारांना आळा घालण्याचा हेतू कितपत सिद्धीला जाईल ह्याविषयी शंका आहे. वांच्छू कमिटीने अशी शिफारस केली आहे की कर चुकविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी प्राप्तिकराचा जास्तीत जास्त दर वाजवी म्हणजे ७५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्यात यावा. सध्याच्या कायद्याप्रमाणे हा दर ९७.५ टक्के म्हणजे करप्राप्त व्यक्तीच्या उत्पन्नाचा जवळ-जवळ सर्वच भाग करापायी काढून घेण्याइतका जबर आहे. कमिटीची ही अतिशय योग्य शिफारस सरकारने स्वीकारली नाही, हे दुर्दैव आहे.

---

**पब्लिक सेक्टरमधील बँकांची उपेक्षित विभागांना कर्जे एकूण कर्जांशी %**

| | जून १९६९ | १९७० | १९७१ | १९७२ | १९७३ |
|---|---|---|---|---|---|
| शेती (प्रत्यक्ष) | १ २६ | ४·३२ | ४·८८ | ४.७८ | ५·६८ |
| शेती (अप्रत्यक्ष) | ४·०५ | ३·९१ | ३·२८ | ३·४४ | ३·५५ |
| लघुउद्योग | ८·३४ | १०·४१ | १०·९२ | ११·६५ | १२·७३ |
| रोड ट्रॅन्सपोर्ट ऑपरेटर्स | ०·२२ | ०·७९ | ०·९९ | १·११ | १·२३ |
| किरकोळ व्यापार-धंदे | ०·६४ | १·८२ | १·७७ | १·७१ | १·९३ |
| व्यावसायिक | ०·०१ | ०·१९ | ०·२१ | ०·२८ | ०·३४ |
| शिक्षण | ०·०२ | ०·०६ | ०·०९ | ०·०६ | ०·०७ |
| एकूण | १४·५४ | २१·४१ | २२·१४ | २३·०३ | २५·५३ |

## अमेरिकेच्या पी. एल.—४८० फंडाच्या रकमेचा विनियोग

### भारत-रशिया वाढत्या मैत्रीचा अप्रत्यक्ष परिणाम

१९५६ ते १९७२ ह्या मुदतीत अमेरिकेने भारताला गहू, इतर अन्नधान्ये, तांदूळ, कपास, वनस्पती तेल, इत्यादी सुमारे ३६०० कोटी रुपयांचा ६ कोटी टन माल विकला, त्याची किंमत भारताने पूर्णतः किंवा अंशतः रुपयांमध्ये द्यावयाची असे ठरले होते. ह्या ३६०० कोटी रुपयांत त्यावरील व्याजाची भर पडली. त्यांपैकी सुमारे २५०० कोटी रुपये भारतातच अमेरिकेच्या रिझर्व्ह बँकेतील ठेवीच्या स्वरूपात राहिले. ही ठेव अमेरिकेने तशीच राखली तर त्यात व्याजाची भर पडून ठेवीची रक्कम परतफेडीच्या वेळी म्हणजे २०१९ साली ३००० कोटींवर गेली असती; त्यावरील केवळ व्याजातून अमेरिकेच्या भारतातील वकिलातीचा प्रचंड खर्च जगाच्या अंतापर्यंत चालू राहू शकला असता. एकाद्या परकीय राष्ट्राच्या ताब्यात एवढ्या हिंदी चलनाचे शस्त्र असणे अत्यंत धोक्याचे होते; हिंदी चलनव्यवस्था धोक्यात आणण्यास ते शस्त्र अमेरिकेला केव्हाही वापरता आले असते. त्या ठेवी भारतात खर्चासाठी मुक्तहस्ताने वापरणे म्हणजे नव्या चलनी नोटा छापून प्रसृत करण्याचाच प्रकार झाला असता. पी. एल.–४८० ठेवींचा प्रश्न सोडविण्याची भारताचीच गरज विशेष होती. भारत–अमेरिका संबंध गेली काही वर्षे ताणले गेलेले होते, ते सुधारण्यास अमेरिकेची उत्सुकता वाढावी अशा घटना घडल्यामुळे म्हणजे भारत-रशियाच्या वाढत्या मैत्रीच्या घोषणांमुळे ह्या ठेवींच्या विनियोगाची बोलणी सुरू होण्यास विशेष चालना मिळाली. भारताच्या पंचवार्षिक योजनेस रशिया हातभार लावणार, तेव्हा आपण मागे राहून चालणार नाही हे अमेरिकेला पटून भारताशी मैत्रीचे संबंध दृढ करण्यासाठी दोन तृतीयांश ठेवींची भारताला देणगी देण्यापर्यंत अमेरिका उदार झाली आहे.

भारत-अमेरिका कराराप्रमाणे अमेरिका भारताला १६६४ कोटी रुपयांची देणगी देऊन टाकील. उरलेली रक्कम (८३२ कोटी रु.) अमेरिकेच्या वकिलातीच्या खर्चासाठी आणि इतर आवश्यक ठरविलेल्या खर्चासाठी वकिलातीला उपलब्ध होईल. ह्याचा अर्थ, पी. एल्. ४८० फंडापैकी दोनतृतीयांश भाग राइट ऑफ करून टाकलेला आहे, आणि बाकीचा भाग येत्या १५ वर्षांत हळूहळू संपत येईल. राइट ऑफ केलेल्या रकमेतून शेती, विद्युतपुरवठा ह्यांवर खर्च करण्यास पैसा उपलब्ध होईल. येत्या १० वर्षांत अमेरिका भारताकडून १० कोटी डॉलर्सचा माल खरेदी करणार आहे. त्यांपैकी ७·५ कोटी डॉलर्स अमेरिका रोखीने देईल म्हणजे तेवढे डॉलर्सचे चलन भारताला उपलब्ध होईल. बाकीची २·५ कोटी डॉलर्सची किंमत वकिलातीच्या हिशेबातून दिली जाणार आहे. अमेरिका भारताकडून आजच जो माल खरीदते, त्यांपैकी वेगळा माल अमेरिका भारतातून आयात करील ही गोष्ट भारताला विशेष अनुकूल आहे.

भारत-रशिया संबंध दृढ होण्यामुळे अमेरिकेला शह बसण्याचा संभव होता तो अमेरिकेने ह्या दातृत्वामुळे कमी केला आहे; "झाले गेले विसरून जा" असेच अमेरिकेने अप्रत्यक्ष रीत्या पण प्रत्यक्ष कृतीने भारताला सांगितले आहे.

---

### शहरातील घरटंचाई दूर करण्याचा उपाय

सर्वच मोठ्या शहरांतून कमी अधिक प्रमाणात राहत्या घरांची टंचाई तीव्र झाली आहे. त्यामुळे अनेक सामाजिक आणि आर्थिक प्रश्न उत्पन्न झाले आहेत. ह्या विषयासंबंधी बोलताना मध्यवर्ती सरकारचे राज्यमंत्री श्री. ओम मेहता ह्यांनी शहराच्या परिसरातील बांधकामाला उपयोगी पडणाऱ्या जमिनीसंबंधी काहीतरी धोरण आखण्यात आले पाहिजे असे प्रतिपादन केले. नॅशनल बिल्डिंग्ज ऑर्गनायझेशन ह्या संघटनेतर्फे संयोजित करण्यात आलेल्या एका प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाचे ते उद्घाटन करीत होते. श्री. मेहता म्हणाले की, समाजातील सर्व थरांतील लोकांना आसऱ्याची जागा देण्यासाठी शहरांच्या परिसरातील जमीन मोठ्या प्रमाणावर ताब्यात घेण्यात आली पाहिजे आणि तिचा सर्व दृष्टीने विकास करण्यात आला पाहिजे. सामाजिक संघर्ष टाळण्यासाठी घरबांधणीचा सुसूत्र कार्यक्रम हाती घेण्यात आला पाहिजे. ताज्या शिरगणतीच्या आकड्यांप्रमाणे असे आढळून आले आहे की ग्रामीण भागातील लोक छोट्या शहरात न जाता मुख्यतः मोठ्या शहरातच जाणे पसंत करतात. त्यामुळे असे झाले आहे की मध्यम प्रतीच्या शहरांचा विकास मोठ्या शहरांशी तुलना करता फारसा झालेला नाही. ग्रामीण भागांतील लोकांना अशा मध्यम प्रतीच्या शहरांतून कामधंदा मिळवून देण्याचे प्रयत्न करण्यात आले तर मोठ्या शहरात येणारा लोकांचा लोंढाही काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात घरबांधणीच्या कामात मध्यवर्ती सरकारने १६० कोटी रुपये आणि राज्य सरकारांनी ६५ कोटी रुपये गुंतविलेले आहेत.

---

### सत्ता टिकविण्यासाठी छळाचा वाढता उपयोग

स्वतःची सत्ता टिकविण्यासाठी अधिकाधिक देशांची सरकारे छळाचा अवलंब करीत आहेत. लिंग, वय, प्रकृती, ह्यांचा विचार न करता नागरिकांचा छळ करण्याची नवी नवी साधने निर्माण केली जात आहेत. पोलिसांना जो छळ करणे जमणार नाही तो लष्कर करू लागले आहे. "ॲम्नेस्टी इंटरनॅशनल" ह्या संस्थेच्या पाहणीच्या अहवालात, राजकीय हेतूने छळ करणाऱ्या ६० देशांतील छळांच्या प्रकारांची माहिती देण्यात आली आहे.

---

**सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग** — मुंबईतील न्यू मरीन लाइन्स रोडला 'सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग' हे नाव त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्त दि. १४ रोजी देण्यात आले.

## तीन खतकारखान्यांसाठी जपानची मदत

रासायनिक खतांचे उत्पादन वाढविण्यासाठी नवे कारखाने काढण्याचे प्रयत्न होत आहेत. ह्या बाबतीत जपानकडून काही मदत मिळविण्यासाठी गेल्या वर्षी नियोजनमंडळाचा प्रतिनिधी जपानला गेला होता. खतांचे कारखाने उभारण्यासाठी लागणाऱ्या खर्चात परदेशीय चलनातील काही खर्च करावा लागतो. कारण सवच्या सर्व कारखाना देशातील सामग्रीने उभारण्याइतका भारत अद्याप स्वावलंबी झालेला नाही. नियोजनमंडळाच्या प्रतिनिधीने जपानच्या दौऱ्यात जपानकडून कर्ज मिळविण्याचा प्रयत्न केला होता. ५ खतकारखान्यांच्या उभारणीसाठी जपानकडून २० कोटी डॉलर्स मदत मिळविण्याची खटपट झाली होती. ह्याचा अर्थ असा की एकेका खतकारखान्यासाठी ४ कोटी डॉलर्सची परदेशीय यंत्रसामग्री लागणार होती. परंतु अलीकडे हाती आलेल्या माहितीवरून जपान ५ कारखान्यांच्या उभारणीसाठी लागणारे परदेशीय चलन कर्जाच्या रूपात देण्यास तयार नाही. पाचांऐवजी तीनच खतकारखान्यांची गरज भागविण्याचा निर्णय जपानने घेतला आहे. जपानकडे प्रथम मदतीची विचारणा करण्यात आली त्या वेळी यंत्रसामग्रीच्या ज्या किमती होत्या त्या आता राहिलेल्या नाहीत. खुद्द जपानमध्ये चलनवृद्धी सतत होत राहिल्याने किमती वाढल्या आहेत. परिणामी, प्रत्येक खतकारखान्याच्या उभारणीसाठी लागणाऱ्या खर्चात ३० टक्क्यांनी वाढ झालेली आहे. म्हणजे, जपान ज्या तीन कारखान्यांच्या उभारणीत सहकार्य करणार आहे त्यांच्या परदेशीय चलनाच्या खर्चात ५ कोटी डॉलर्सची वाढ झालेली आहे. हा वाढलेला खर्च भारत कसा काय करणार आहे ह्याविषयी जपानकडून पृच्छा करण्यात आली आहे. ही एक नवीनच अडचण उद्भवली आहे.

---

## निष्काम कर्म आणि निष्कर्म काम

पंतप्रधान इंदिरा गांधी एका प्रसंगी बोलताना म्हणाल्या की भारतात प्राचीन काळी कर्मफलाची अपेक्षा न ठेवता आपआपले कर्तव्य करण्याची शिकवण देण्यात आली. अलीकडे मात्र काम न करताच त्यांच्या फलाची अपेक्षा ठेवण्याची वृत्ती वाढत चालली आहे. भारतात हल्ली परदेशातील वेतनाची येथील वेतनाशी व धनप्राप्तीशी तुलना करण्याची लाट उसळली आहे. परदेशांचे अनुकरण करण्याची वृत्ती बळावत चालली आहे आणि ही अनुकरणप्रिय वृत्ती तांत्रिक ज्ञानापुरतीच मर्यादित राहिलेली नाही. उपभोगाची लालसा आणि कामगार-चळवळ ह्याही क्षेत्रात ती पसरली आहे. ह्या वृत्तीला कम्युनिझम अगर सोशालिझम म्हणता येत नाहीच. पण तिला राष्ट्रवादी वृत्तीही म्हणता येणार नाही.

---

## हिवतापाचा धोका तसाच कायम

उत्तर प्रदेश, राजस्थान आणि दिल्ली ह्या प्रदेशांतील हिवतापाचे उच्चाटन करण्यासाठी दरसाल कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येतात. परंतु तरीही ह्या भागांतील हिवतापाचा धोका तसाच कायम राहिलेला आहे. १९७२–७३ साली राजस्थान सरकारने हिवताप मोहिमेवर १·२० कोटी रुपये खर्च केले. उत्तर प्रदेशांत ८६ लाख रुपये खर्ची पडले. हिवतापाचे उच्चाटन करण्यासाठी हाती घेण्यात आलेली मोहीम अतिशय चिकाटीने आणि मनोभावाने चालविण्यात आली तरच ती यशस्वी होते असा अनुभव आहे. पण वरील दोन्ही राज्यांत ह्या मोहीमेकडे जसे लक्ष द्यावयास हवे होते तसे दिले गेलेले नाही. इतकेच काय पण मध्यवर्ती सरकारकडून मोहीम चालविण्यासाठी ज्या रकमा देण्यात येतात त्याही काही वर्षांत पूर्णपणे वापरण्यात आल्या नाहीत. राजस्थानसाठी १९७०–७१ साली ७६ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. पण प्रत्यक्ष खर्च मात्र ६२·४१ लाख रुपयेच झाला.

---

## पाकिस्तानातील शिल्पकृतींची चोरी

पाकिस्तानातील बुद्धकालीन शिल्पकृतींच्या चोऱ्या झाल्या असून त्यांची विक्री पॅरिस शहरात लिलावाने चालू आहे. ह्या शिल्पकृती अप्रतिम असल्याने त्यांना किमती चांगल्या येत आहेत. जुन्या शिल्पकृती कोठे सापडल्या ह्याचा उल्लेख सहसा सापडत नाही. परंतु पाकिस्तानातून चोरल्या गेलेल्या शिल्पकृतींवर त्या कोठे सापडल्या आणि केव्हा सापडल्या ह्याची नोंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांची किंमत अधिकच वाढली आहे. चोरल्या गेलेल्या शिल्पकृती तक्षशिला व स्वात येथील प्राचीन वस्तुसंग्रहालयातून पळविण्यात आल्या व नंतर चोरट्या मार्गाने युरोपमध्ये नेण्यात आल्या. त्या सर्व गांधार-कलाकृती म्हणून माहीत आहेत. त्याशिवाय मोहेंजोदारो येथील दोन मुद्राही अशाच चोरण्यात आल्या आहेत. त्यांची विक्री झाल्याचे अद्याप समजलेले नाही.

---

## उमेदवारांचा खर्च देणे सरकारला झेपणार नाही

राज्यांच्या विधिमंडळांसाठी आणि लोकसभेसाठी उभे राहणाऱ्या उमेदवारांचा निवडणुकीचा खर्च सरकारने सोसावा अशी मागणी राज्यसभेत श्री. कृष्णकांत ह्यांनी केली होती. ही मागणी नाकारताना कायदेमंत्री श्री. एच. आर. गोखले म्हणाले की, कठीण आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सरकारला ही मागणी मान्य करणे शक्य होणार नाही. सध्या देशातील मतदारांची संख्या २७ कोटी आहे. पुढील निवडणुकांच्या वेळी ही संख्या ३० कोटीपर्यंत वाढलेली असेल. मतदारसंघांत वापरावयाच्या मतपत्रिकांचे नुसते वितरण करण्यासाठीच प्रत्येकी १·५० रुपया खर्च येणार आहे.

---

## ऑर्डिनरी शेअर्सच्या बाजारभावात वाढ
### प्रेफरन्स शेअर्सच्या बाजारभावात घट

मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद, मद्रास आणि दिल्ली ह्या प्रमुख पाच स्टॉक एक्स्चेंजेसच्या यादीवर १,४८५ जॉइंट स्टॉक कंपन्या आहेत. त्यांच्या ऑर्डिनरी भागांची बाजारातील किंमत वसूल भांडवलाशी शेकडा टक्केवारी १९७२-७३ मध्ये ४.५%ने वाढली. १९७१-७२ मध्ये ती ५.९%ने उतरली होती. प्रेफरन्स शेअरची किंमत ह्याउलट ०.८% ने उतरली; १९७१-७२ मध्ये ती १.१% ने उतरली होती.

ऑर्डिनरी भागांचा बाजारभाव

| मार्चअखेर | टक्केवारीने फरक |
|---|---|
| १९६९ | + १७.८ |
| १९७० | + १०.३ |
| १९७१ | + ५.५ |
| १९७२ | − ५.९ |
| १९७३ | + ४.१ |

ऑर्डिनरी भागांवरील डिव्हिडंडमधील वाढ आणि १९७३-७४ च्या बजेटात कंपन्यांवरील करात वाढीचा अभाव, ह्यामुळे ऑर्डिनरी भागांचा बाजारभाव सुधारला. १९६९ ते १९७१ तो वाढत चालला होताच; पण १९७२ मध्ये तो घसरला होता. डिव्हिडंड वाढविणाऱ्या कंपन्यांची संख्या वाढली, तर डिव्हिडंड न देणाऱ्या कंपन्यांची संख्या घटली.

---

## उत्तर भारतात मुलींपेक्षा मुलगे अधिक जन्मतात

कोणत्याही देशाच्या लोकसंख्येत पुरुष व स्त्रिया ह्यांचे प्रमाण समतोल नसेल तर त्या देशापुढे अनेक गुंतागुतीचे प्रश्न कालमानाप्रमाणे उभे राहतात. समतोल अनेक कारणांनी बिघडू शकतो. गेल्या महायुद्धात युरोपातील देशांत समतोल ढळला होता. कारण युद्धात अनेक देशांतील पुरुषांची जीवितहानी झाली. तथापि अज्ञात नैसर्गिक कारणांनीही समतोल बिघडू शकतो. जननसंख्येतील मुली आणि मुलगे ह्यांच्या वांवतच्या प्रमाणात उत्तर भारतातील ग्रामीण भाग आणि बाकीच्या भारतामधील ग्रामीण भाग ह्यांच्यात बरीच तफावत दिसून येते. उत्तर भारतामधील काही राज्यांत १०० मुली जन्माला आल्या तर ११४ मुलगे जन्माला येतात. भारताच्या इतर ग्रामीण भागांत १०० मुलींमागे १०९ मुलगे असे प्रमाण दिसून येते. राजस्थान, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, जम्मू व काश्मीर ह्या राज्यांत मुलग्यांच्या जन्माचे प्रमाण मुलींच्या मानाने अधिक आहे.

---

## हिंदी मोटारींमधील विदेशी भाग

मोटारींच्या बनावटीमधील विदेशी भागाचे प्रमाण आता कमी कमी होत जवळ जवळ नाहीसे होत आले आहे. अँबेसेडर गाडीत २० रु. चे, प्रीमिअर प्रेसिडेंट मध्ये ४० रु. चे आणि स्टर्डर्डमध्ये ५० रु. चे विदेशी भाग असतात.

**अॅकॅडमीतून उत्तीर्ण होणारे पदवीधर होणार** — खडकवासला येथील नॅशनल डिफेन्स अॅकॅडमीतून उत्तीर्ण होणाऱ्यांना येत्या जूनपासून जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची बी. ए. किंवा बी. एस्‌सी. पदवी मिळेल. अॅकॅडमी त्या विद्यापीठाला जोडण्यात आली आहे.

**किर्लोस्कर ट्रॅक्टर्स लि.** — ही कंपनी नाशिक येथे ६० अश्वशक्तीचे ट्रॅक्टर्स लवकरच बनवू लागेल. १९७७ अखेर दरसाल ६,५०० ट्रॅक्टर्स तयार होऊ लागतील.

**बेवारशी ठेवी** — बँकांतील ९.६९ कोटी रु. च्या ठेवींना कोणीच मागणीदार नाही.

**अमेरिकेला इजिप्तच्या हल्ल्याची माहिती होती** — इजिप्तच्या युद्धतयारीची अमेरिकेला एप्रिलपासूनच कल्पना होती. अमेरिकेने ती माहिती इस्राएललाही कळविली. पण इजिप्त खरोखरच युद्ध करील असे त्या दोघांनाही वाटले नाही.

**अध्यक्ष निक्सनची संपत्ती** — अध्यक्ष निक्सनची संपत्ती ते अधिकारावर आल्यापासून तिप्पट झाली; आता ती सुमारे १ कोटी रु. आहे.

**लता मंगेशकरचे लंडनमधील संगीत कार्यक्रम** — लंडन येथे नेहरू मेमोरिअल सेंटरतर्फे लता मंगेशकरचे तीन संगीत कार्यक्रम ११, १२ आणि १३ मार्च रोजी होणार आहेत. नेहरूंच्या स्मारक इमारतीसाठी ती विनामूल्य गाणार आहे. लंडन येथील सुप्रसिद्ध रॉयल आल्बर्ट हॉलमध्ये हे कार्यक्रम होतील. ह्या हॉलमध्ये ६,००० श्रोत्यांची बसण्याची व्यवस्था आहे.

**नागपूरला १०० किलोवॅटचा प्रक्षेपक** — नागपूरच्या आकाशवाणी केंद्रासाठी १०० किलोवॅट शक्तीचा ध्वनिक्षेपक बसविण्याचे काम चालू झाले आहे. १९७४ मध्ये प्रक्षेपक कार्यक्रम सादर करू लागेल असा अंदाज आहे. हा प्रक्षेपक भारत इलेक्ट्रॉनिक्सने पुरविला असून त्याच्या उभारणीसाठी ३५ लाखांपेक्षा अधिक खर्च येणार आहे.

**हवा खराब न करण्यासाठी उपाय** — प्रगत देशांतील मोठ्या शहरांतून औद्योगीकरणामुळे हवा खराब होण्याची गती वाढत चालली आहे. हवेच्या खराबीत मोटारींच्या एंजिनांतून बाहेर पडणाऱ्या धुराचाही वाटा आहे. मॉस्कोच्या नगरपालिकेने वाहनासाठी वापरण्यात येणाऱ्या गाड्या 'प्रोपेन' गॅसवर चालविण्याचा निर्णय घेतला आहे. पेट्रोलपेक्षा हे इंधन स्वस्त पडते. त्यामुळे खर्चातही बचत होते.

**इस्राएलची अमेरिकन शस्त्रांची खरेदी** — गेल्या सात आठवड्यात इस्राएलने अमेरिकेकडून सुमारे ८०.० कोटी रु. ची शस्त्रे खरेदी केली आहेत. आणखी पुष्कळ शस्त्रे मिळविल्याखेरीज अरबी देशांशी सामर्थ्यानिशी वाटाघाटी करणे इस्राएलला शक्य होणार नाही.

# परकीय भांडवलाची आयात

## हा भारताचा एकमेव तरणोपाय

(राजेन्द्र प. पटवर्धन, M. B. A. Part I, चा विद्यार्थी पुणे विद्यापीठ.)

सुमारे एक महिन्यापूर्वी 'झा-हक्सर-नेहरू' या नावाचा एक अहवाल पंतप्रधान इंदिरा गांधींना सादर करण्यात आल्याचे वृत्त आले होते. भारताचे अमेरिकेतील भूतपूर्व वकील श्री. लक्ष्मीकांत झा, श्री. बी. के. नेहरू आणि पंतप्रधानांचे सल्लागार श्री. पी. एन्. हक्सर यांनी हा अहवाल संयुक्तरीत्या लिहिल्याचेही वृत्तात म्हटले होते. जनरल मोटर्ससारख्या जगद्‌व्यापी कंपन्यांना भारतात निर्यातीस चालना देणारे कारखाने काढण्यास उद्युक्त करावे असे या अहवालात लिहिल्याचे म्हटले होते. 'म्हटले होते' असे लिहिण्याचे कारण असे की, या तथाकथित अहवालावर श्री. चंद्रशेखर, कृष्णकांत, आदी तरुण तुर्कांनी जहरी टीका केली. याला उत्तर म्हणून सरकारतर्फे 'असा अहवालच अस्तित्वात नाही' असे प्रतिपादन करण्यात आले. हे सर्व अपेक्षितच होते! पण ही गोष्ट अलाहिदा. या वृत्तामध्ये जो महत्त्वाचा मुद्दा—खाजगी परकीय भांडवलाची आयात—उपस्थित झाला आहे, त्याची चर्चा करणे भारताची सध्याची आर्थिक स्थिती आणि गरजा यांचा विचार करता अत्यावश्यक झाले आहे.

भारतातील 'कडव्या' डाव्यांची वक्तव्ये; एस्सो, कोका-कोला, विल्स, इत्यादी परदेशी ट्रेडमार्क्स; या सर्वांमुळे असा गैरसमज होण्याची शक्यता आहे की, भारतात परकीय खाजगी भांडवलाला मुक्तद्वार आहे आणि त्या वाटेल तशी कमाई करीत आहेत. एक गोष्ट खरी की, सिगरेटस्, थंड पेये, आइस्क्रीम अशा जीवनाला अत्यावश्यक नसलेल्या गोष्टींचे उत्पादन परकी कंपन्यांना करू दिले जाऊन परकीय चलनाचा अपव्यय झाला आहे. परकीय सहकार्य या काही गोष्टीत विनाकारण घेण्यात आले आहे; परंतु त्याबरोबरच हीही गोष्ट तितकीच खरी की, भारत सरकारची परवानापद्धती, सतराशेसाठ अधिनियम, दप्तर दिरंगाई, इत्यादी गोष्टींमुळे जनरल मोटर्स, ऑक्सिडेंटल पेट्रोलियम, रॉयल डच शेल, सुमिमोटो, फुजी इत्यादी प्रचंड आणि महत्त्वाच्या कंपन्या भारतात गुंतवणूक करण्यास अनुत्सुक आहेत. सिंगापूर, हाँगकाँग, ऑस्ट्रेलिया यांसारखे देश त्यांना जास्त प्रलोभनीय आणि आकर्षक वाटतात. परिणामतः हाँगकाँगसारखा चिमुकला देश आज भारतापेक्षाही जास्त निर्यात करतो.

लोखंड-मँगेनीजसारख्या सिद्ध झालेल्या खनिजांची मुबलकता रेल्वे, रस्ते, वीज इत्यादी आवश्यक गोष्टींची उपलब्धता, कुशल कामगार आणि इंजिनियर यांची मुबलकता, राजकीय शांतता, पगाराचे प्रमाण कमी, उद्योगधंद्यांचा उंचावलेला दर्जा, इत्यादी पाहता भारत हे परकीय भांडवलदारांचे नंदनवनच व्हावयाचे, परंतु ते अगदी उलट झाले आहे. आज सरकारची धोरणे इतकी विचित्र आणि विकृत आहेत की, आपण लोह-खनिज निर्यात करतो आहोत आणि तयार झालेले पोलाद भारी किंमत देऊन आयात करीत आहोत. एवढे करताना भारतातील लाखो बेकार कामगार, शेकडो बेकार मेटॅलर्जिस्टस् यांना 'स्वावलंबन'/'स्वयंपूर्णता' यांच्या पोकळ घोषणांखाली मुकेकंगाल बनविण्यात येत आहे. आता खनिजांची निर्यात आणि पोलादाची आयात यापेक्षा स्वावलंबनाचे विकृत स्वरूप दुसरे कोणते असणार? हिंदुस्तान स्टीलचे कारखाने उत्पादनक्षमतेच्या ५० % सुद्धा उत्पादन करीत नाहीत. मोठे कारखाने काढण्याची सरकारला कुवत नाही. अशा परिस्थितीत फुजी स्टील कंपनीसारख्या कंपनीला येथे भारतात पोलादाचे कारखाने काढण्यास निमंत्रण देणे हा एकमेव सूज्ञपणाचा मार्ग होता. भारतातील लोहखनिज जगातील लोहखनिजाच्या जवळ जवळ १/४ आहे आणि त्याची प्रत सर्वांत वरची आहे. सर्व जगाला २०० वर्षे पुरेल एवढे लोखंड आपणापाशी आहे. असे असता फुजीसारखी कंपनी पोलादाचे एवढे प्रचंड उत्पादन करील की, त्याच्या निर्यातीपासून—फुजीचा नफा वजा जातासुद्धा—भारताला अपरंपार परकीय चलन मिळेल. सध्या भारतात पोलादाचे भाव—हिंदुस्तान स्टीलच्या मोंगली कारभारामुळे—दिवसेंदिवस वाढतच आहेत. स्टील हे सर्व उद्योगधंद्यांना लागणारे कच्चे द्रव्य असल्याने सर्व किंमती वाढत आहेत. पोलाद-निर्मितीची अशी योजना दोन जपानी कंपन्यांनी भारताला सादर केली होती. परंतु 'स्वाभिमान' 'स्वयंपूर्णता' इत्यादी कल्पनाविलासात गुंग झाल्यामुळे भारत सरकारने या योजनांकडे पाठ फिरविली.

आज कोणत्याही राष्ट्राला स्वयंपूर्णता हे तत्त्व ठेवून चालतच नाही. त्यासारखा मूर्खपणा दुसरा नाही. प्रत्येक देशामध्ये प्रत्येक उद्योगधंद्यास लागणारी मूलद्रव्ये, प्रत्येक धंद्याला लागणारे तंत्रज्ञान आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भांडवल हे उपलब्ध असणे अशक्यच आहे. किंबहुना अशी अपेक्षाच ठेवणे चूक होय. धंदा करताना तो उसने पैसे घेऊन करावयाचा हे तर व्यापाराचे मूलतत्त्व. आज जगातला कोणताही प्रगत देश असा नाही की, जो परकी भांडवलाशिवाय प्रगत झालेला आहे. अमेरिकेची एवढी प्रगती झाली, ती युरोपियन भांडवलावरच झाली. जपान आणि पश्चिम जर्मनीची प्रगती झाली ती अमेरिकन भांडवलावरच. कर्जाऊ पैशांवर उद्योगधंदा उभारणे हे तत्त्व सोव्हिएट युनियनलाही पटू लागले आहे. त्यांनी नुकत्याच, एका अमेरिकन तेल कंपनीबरोबर १ अब्ज डॉलर्सच्या व्यवहारावर सह्या केल्या आहेत. आतापर्यंत कोणत्याही अमेरिकन कंपनीला मिळालेले हे परकीय देशातील सर्वांत मोठे कॉन्ट्रॅक्ट आहे. या करारान्वये ही कंपनी सैबेरियातील नैसर्गिक वायू आणि तेलाचा शोध घेणार आहे. इंडोनेशियाचेच उदाहरण घ्या. त्याच्याजवळील समुद्रात तेलाचे प्रचंड साठे आहेत. त्यांचे उत्खनन करण्यासाठी लागणारे तंत्रज्ञ आणि पैसा इंडोनेशियाजवळ

नव्हता. त्यांनी सर्व जगातून टेंडर्स् मागविली आणि हे तेलाचे कॉन्ट्रॅक्ट एका इटालियन कंपनीला दिले. या कराराच्या अटी इंडोनेशियाला विलक्षण फायदेशीर आहेत. यात इंडोनेशियाचा पैसुद्धा खर्च होणार नाही. तेल सापडले नाही तरी इटालियन कंपनीचीच सर्व जबाबदारी. बरे तेल सापडले, तर त्यापैकी इंडोनेशियाची अंतर्गत गरज असेल तेवढे त्याला; उरलेल्यापैकी काही भाग कंपनीला खर्चापोटी आणि उरलेले निर्यातीसाठी! इतका चांगला व्यवहार इंडोनेशियाने वेळीच २–३ वर्षांपूर्वी केला, म्हणून आज अरबांनी तेलकपात केली, तेव्हा इंडोनेशियाची मान ताठ आहे आणि त्यांना पुरेपूर फायदा होतो आहे. याउलट भारताची कथा—अर्थातच शोककथा—पाहा. अरबांनी हजार लाथा मारल्या, तरी त्यांच्यापुढे नतमस्तक होण्याचे धोरण ठेवूनही आज दृश्य काय आहे, तर पाकिस्तानला सवलत, पण भारताला कपात! बॅरलला १ डॉलर असा ४ वर्षांपूर्वीचा भाव आज ३ डॉलर्स ६२ सेंटस् झाला आहे. एवढे असूनही स्वदेशात तेलाच्या नव्या शोधाच्या नावाने शून्यच. ऑफ शोअर एक्सप्लोरेशन विषयी गेली ५ वर्षे चर्चा सुरू आहे. ४० परदेशी कंपन्यांची टेंडर्स् १९७२ मध्ये मागविण्यात आली. अजून 'स्वाभिमान' वगैरे दृष्टिकोनांतून निर्णय घेण्यात आलेला नाही. म्हणजे तहान लागल्यानंतरसुद्धा आम्हांला विहीर खणण्याची इच्छा होत नाही. रशिया, इंडोनेशिया आणि आता चीनलासुद्धा परकी भांडवलाचे महत्त्व कळते, परंतु आपल्या 'समाजवादी' राज्यकर्त्यांना ते कळत नाही!

आज ज्या राष्ट्राचा निर्यातव्यापार मोठा त्याचीच अर्थव्यवस्था भरभक्कम असते. दुसऱ्या महायुद्धानंतर जपानला निर्यातीचेच अक्षरशः वेड लागले. म्हणूनच आज जपानी अर्थव्यवस्था १० अब्ज डॉलर्सची अभूतपूर्व गंगाजळी निर्माण करू शकली. भारताकडे पाहिले तर परकी चलनाची सतत मारामार. निर्यात आताशी कुठे प्रतिवर्षी २००० कोटी रुपयांची – म्हणजे जवळजवळ २·६ अब्ज डॉलर्स – होते. आयात नेहमीच जास्त असते. या परिस्थितीत निर्यातीसाठी परकी भांडवल, तंत्रज्ञान आणि भारतातील आधी उल्लेखिलेल्या पोषक गोष्टी यांची सांगड घालून प्रचंड कारखाने उभारावयाचे हे भारत सरकारचे धोरण असावयास पाहिजे. जनरल मोटर्सचेच उदाहरण घेऊ. त्याच्या विक्री झालेल्या मालाची किंमत प्रतिवर्षी जवळ जवळ २२ अब्ज डॉलर्स (म्हणजे भारताच्या GNP च्या निम्मी) आहे. त्यांनी त्यांच्या खरेदीपैकी १ टक्का जरी माल भारतात तयार करून विकत घेतला, तरी भारताचा प्रचंड फायदा होईल. येथील बेकारी नष्ट होण्यास मदत होईल. सध्या काय होते आहे की, GM सारख्या कंपन्या भारताकडे फिरकतच नाहीत. त्यांना युगोस्लाव्हिया, रुमानिया यांसारखे कम्युनिस्ट देशही जास्त आकर्षक वाटतात. कारण तेथील राज्यकर्त्यांना व्यापार आणि अर्थशास्त्र पूर्ण समजते आणि त्यांची राजकीय विचारसरणी त्यांना अर्थशास्त्रीय बाबींकडे बघताना आंधळी बनवत नाही. आज भारतात मात्र आयडिऑलजीपुढे आणि घोषणाबाजीपुढे अर्थशास्त्रीय सत्यच कोणाला दिसत नाही. एक वेळ सर्व तंत्रज्ञांना बेकार ठेवू पण उद्योगधंदे काढणार नाही असे सरकारचे विकृत धोरण आहे!

खत-उत्पादनाचीच गोष्ट घ्या. १९६५ साली बेखटेल कॉर्पोरेशन या अमेरिकन कंपनीने भारतात प्रचंड प्रमाणावर ४ खतकारखाने काढण्याची योजना सादर केली होती. हे वेळीच सुरू झाले असते, तर एवढे खत उत्पन्न झाले असते की, १९६८–७१ या काळात कल्पना नाही एवढे धान्योत्पादन झाले असते. १९७२–७३ च्या दुष्काळाचा परिणाम नगण्य झाला असता. परंतु भारत सरकारने ही योजना धुडकावून लावली. टाटांच्या मिठापूर प्रकल्पावर ७ वर्षे निर्णय दिला नाही. एवढेच नव्हे, तर स्वतःही खत-कारखाने काढले नाहीत. यामुळे खतासाठी रोज २३ लक्ष रुपयांचे परकी चलन गेले आणि यंदा तर धान्य-आयातीसाठी ४५० कोटी रु.चे परकी चलन जाणार आहे. गेली ३ वर्षे जनता अन्नटंचाईने भरडली गेली. तरी अजूनसुद्धा भारत सरकारला शहाणपण आलेले दिसत नाही!

सिंगापूर, हाँगकाँग इत्यादी देशांनी इलेक्ट्रॉनिक्स प्रोसेसिंग झोन्स स्थापन केले आहेत. यामध्ये १०० टक्के परकी मालकीच्या कंपन्यांना करमाफीचे आयात परवाने दिले जातात. त्यांनी १०० टक्के उत्पादन निर्यात करावयाचे असते. या झोन्समुळे आज सिंगापूरला अक्षरशः सोने तयार होत आहे. असे झोन्स वास्तविक आपण १५ वर्षांपूर्वीपासूनच सुरू करावयास हवे होते, परंतु काहीही केले नाही. १९७१–७२ मध्ये सरकारला जाग आली आणि सांताक्रुझला एक–पूर्ण एक–प्रोसेसिंग झोनला मान्यता देण्यात आली. परंतु दप्तर–दिरंगाई आणि बंधनेच बंधने यांमुळे परदेशी कंपन्या फारशा आकृष्ट झाल्या नाहीत. अजूनही निर्यात सुरू झाली नाही. १९७५ मध्ये होणार आहे म्हणे.

पर्यटन हा जगातील सर्वांत मोठा उद्योगधंदा! परंतु यात भारताचा वाटा १ टक्कासुद्धा नाही. युगोस्लाव्हिया, ग्रीससारख्या देशांनी परकीय भांडवलाने मध्यमवर्गीयांना परवडतील अशी विश्रामस्थाने देशभर बांधली. आज त्यांना पर्यटनामधून निर्याती-एवढे परकी चलन मिळत आहे! त्यांनी हजारो मोटर इन्स बांधली. आपणही परकीय सहकार्य घेतले नाही असे नाही; पण अगदीच तुटपुंजे आणि चुकीच्या जागी मध्यमवर्गीय परदेशीयांकडे दुर्लक्ष करून फक्त शेरेटनसारखे श्रीमंती घेटोज निर्माण केले.

भारताचे सगळ्यात मोठे दुर्दैव हे की, परकीय भांडवलाचे महत्त्व राज्यकर्त्यांना कळत नाही, एवढेच नाही तर, सर्व विचारशक्तीच त्यांनी गहाण टाकली आहे—कोणाला हे सांगण्याची जरुरी नाहीच. याचे एक ठळक उदाहरण म्हणजे भारताचे उद्योगविकास मंत्री श्री. सुब्रह्मण्यम् यांची ऑक्टोबरांतील पत्रकार परिषद. त्यांना परकीय भांडवलाच्या आयातीबद्दल

विचारले असता ते म्हणाले, “आम्हांला तत्त्वतः परकीय खाजगी भांडवल मंजूर नाही. परंतु आज रशिआ, रुमानिया यासारखे समाजवादी देशही त्याची आयात करीत आहेत; तेव्हा आम्हांलाही मागे राहून चालणार नाही!” म्हणजे आम्ही काय करू ते त्यांनी केले म्हणून! स्वतःच्या प्रज्ञेने नाही! अर्थात सोव्हिएट रशिआला परकी भांडवलाचे महत्त्व कळले हे भारताचे भाग्यच समजायला हवे. कारण आता तरी ते भारत सरकारला कळून येईल!

तंत्रज्ञान व पैशाचे सोंग कोणालाच जमलेले नाही. भारतातला सर्व काळा, पांढरा पैसा एकत्र केला तरी ६,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त काही जमावयाचे नाहीत. उद्योगधंद्यांची खरी वाढ अभिप्रेत असेल, तर परकीय भांडवल हा एकमेव तरणोपाय भारतापुढे आहे. भारत सरकार स्वाभिमानाच्या नावाखाली खाजगी भांडवलाला नकार देते, परंतु सरकारी परकी मदत स्वीकारते! ही केवढी विकृति; सरकारी मदत ही नेहमीच दबाव 'स्ट्रिंग्ज' घेऊन येते, तर खाजगी भांडवल स्वतः धोका पत्करून येते!

---

## हेमामालिनीची कार्डे

युनिसेफला (युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड) हेमामालिनीच्या लोकप्रियतेचा लाभ होत आहे. युनिसेफची भेटकार्डे विकत घेण्यास हेमामालिनी आपल्या चाहत्यांना आवाहन करते आणि हे चाहते त्यानुसार फंडाकडे पैसे पाठवून भेटकार्डे मोठ्या प्रमाणावर विकत घेतात. यंदाच्या तिच्या कार्डावर तिचे नृत्यसाजातील सुंदर छायाचित्र असून तिने शाळांतील विद्यार्थ्यांना ती कार्डे विनंतिपत्रासोबत पाठविली आहेत. फंडाचा विनियोग वेगवेगळ्या देशांतील विद्यार्थ्यांच्या मदतीकडे केला जातो.

---

## किसिंजर स्कॉलरशिप फंड

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डॉ. हेन्री किसिंजर आणि उत्तर विएतनामचे नेते श्री. ले डुक थो ह्यांना शांततेचे नोबेल पारितोषिक मिळाले आहे. श्री. थो ह्यांनी ते नाकारले आहे. डॉ. किसिंजरनी आपल्या वाटयाचे ५७,५०० डॉलर्स स्वीकारले असून इंडोचीनमधील युद्धात कामी आलेल्या अथवा बेपत्ता झालेल्या सैनिकांच्या मुलांना शिष्यवृत्त्या देण्यासाठी त्याचा विनियोग करणार आहेत. 'किसिंजर स्कॉलरशिप फंड' ह्या नावाच्या ह्या निधीचे व्यवस्थापन न्यूयॉर्क येथील 'कम्युनिटी फंड्स इन्कॉपोरेटेड' ह्या संस्थेतर्फे होईल.

---

**पेट्रोलच्या मूळ किमतीवर ५२% कर**—पेट्रोलची मूळ किंमत लिटरला ४५ पैसे पडते. एक्साइज ड्यूटीचे २ रु., सेल्स टॅक्स आणि ऑक्ट्रॉयचे ३० पैसे अशी त्यात वाढ होऊन प्रत्यक्ष किंमत २ रु. ८३ पैसे द्यावी लागते.

**अंदाजपत्रकापेक्षा कर्जउभारणी जास्त**—अंदाजपत्रकात चालू आर्थिक वर्षात जी कर्जउभारणी अपेक्षिली होती, तिच्यापेक्षा ती १५५ कोटी रु. नी अधिक होऊन ४८१ कोटी रु. ची झाली आहे.

**स्कूटरसाठी वेटिंग लिस्ट**—वेस्पासाठी २·५० लक्ष तर लँब्रेटासाठी २ लक्ष लोकांनी (१·५० लक्ष लोक १·५० सी सी साठी आणि ५०,००० लोक ०·७५ सी सी साठी) नावे नोंदविलेली आहेत व ते आपल्या स्कूटरची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. पेट्रोलच्या किमतीत वाढ झाल्यामुळे स्कूटर्सना मागणी वाढली आहे पण उत्पादन वाढण्याची शक्यता नाही.

**विमान-प्रवास महागणार**—विमानांना लागणाऱ्या इंधनाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे देशांतर्गत विमानवाहतुकीचे भाडे २० टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. तेलाच्या किमती वाढण्यापूर्वी दर किलोलिटर जळणासाठी ८०० रुपये द्यावे लागत असत. आता ह्या किमतीत ३०० रुपयांनी वाढ झाली आहे. इंडिअन एअरलाइन्स सध्या दरसाल १६ कोटी रुपयांचे इंधन वापरते. त्यात ६ कोटींची वाढ होईल.

**धंदेवाईक सचोटीचा एक मासला**—बेल्जममधील एका धंदेवाल्याकडे गावच्या म्युनिसिपल कचेरीने धंद्याविषयी भरून पाठविण्याचा नेहमीचा मामुली फॉर्म पाठविला. तो भरून पाठविताना त्याने आपला धंदा 'बँकांत चोरी करणाऱ्यांना मुखवटे पुरविणे' असा नमूद केला. कचेरीने त्याच्या ह्या धंद्याकडे लक्ष दिले नाही. कारण कचेरीचे काम फक्त आकडेवार माहिती गोळा करण्याचे होते. धंद्याच्या स्वरूपाबद्दल त्याला अधिकउणे काहीही विचारण्यात आले नाही किंवा त्याबद्दल त्याला काही तंबीही देण्यात आली नाही. त्याच्याकडून घाऊक माल घेण्याबद्दल तो काही सूट देतो का एवढीच विचारणा करण्यात आली. त्यावर सचोटीने धंदा करणाऱ्या त्या नागरिकाने घाऊक खरेदी करणाराला आपण १५ टक्के सूट देतो असे उत्तर ताबडतोब दिले.

**पेट्रोलच्या किंमतवाढीचा परिणाम**—देशातील पेट्रोलचा पुरवठा कमी झालेला नसला तरी त्याची किंमत वाढली आहे. त्यामुळे दिल्ली, मद्रास, मुंबई, कलकत्ता शहरांतील सामाजिक जीवनावर सावट पडले आहे. रस्त्यावरील गाड्यांची रहदारी कमी झाली आहे आणि दुकानांतून गिऱ्हाइकी घटली आहे. तथापि, मुंबईमधील कॅबरे दाखविणाऱ्या विलासी ठिकाणावर फारसा परिणाम झालेला नाही. ह्या चैनीच्या ठिकाणांना भेट देणारा वर्ग अजूनही आपल्या विलासात दंग आहे. कलकत्त्यात एरवी 'जागा नाही' अशा पाट्या लावणारे अनेक हॉटेल्सचे मालक धंद्याला मंदी आल्याबद्दल कुरकुरत आहेत. मद्रासमधील क्लबमध्ये येणाऱ्यांची संख्या रोडावली आहे. गिंडी रेसच्या मैदानावर नेहमीपेक्षा कमी गाड्या दिसत होत्या. फक्त अहमदाबाद शहरात मात्र मोटारगाड्या नेहमीप्रमाणे धावत असून हॉटेल्स व खाद्यपदार्थांची दुकाने व्यवस्थित चालू आहेत.

# सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

♣

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

Swastik FOAM

cosy sitting pleasure!



SWASTIK RUBBER PRODUCTS LTD.
PUNE-411003

BANK TO BANK...

## THE BELGAUM BANK LIMITED

( SCHEDULED BANK )

*Regd. & Head Office* : 659–60, Raviwar Peth,
**BELGAUM**

Invest in our " Family Benefit Deposit Scheme " and earn Monthly Interest as a Pension – Enquire at any of our 42 Branches – Our Bombay Office at Mandvi, Bombay – 9. & Bangalore Office at 61, Chowdeshwari Temple Street, Bangalore – 2.

OUR MOTTO IS SERVICE
AND WE REALLY SERVE.

S. Y. KAMAT,
*General Manager.*

" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "

—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कार्यालय :
फोर्ट, मुंबई १.
मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय :
महाल, नागपूर
नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. ११ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. १०५ कोटी |

सामुदायिक हितासाठी झटणारी
आगळी बँक


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४११००४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )